# "कोल्हाटी जमातीचा सामाजिक –आर्थिक अभ्यास"
## (विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत अर्थशास्त्र विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी सादर केलेला प्रबंध

● संशोधक विद्यार्थीनी ●


सौ. सुप्रिया हेमंतकुमार काळे
**( Registration No. 02115008364 )**


● मार्गदर्शक ●


प्रा. डॉ. प्रविण जाधव
एम.ए.,पीएच. डी., सेट
अर्थशास्त्र विभाग
नेहरु सामाजिकशास्त्र विद्यास्थान
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे



टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

ऑगस्ट २०१८

# प्रतिज्ञापत्र

मी सौ. सुप्रिया हेमंतकुमार काळे, प्रतिज्ञापूर्वक नमूद करते की, **''कोल्हाटी जमातीचा सामाजिक – आर्थिक अभ्यास'' (विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा)** या विषयातील प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवी करिता सादर करीत आहे. या प्रबंधातील सर्व माहिती मूळ संदर्भातून संकलित केलेली आहे. त्या माहितीचा या प्रबंधाव्यतिरिक्त अन्य कोठेही उपयोग केलेला नाही अथवा माहिती प्रकाशित केलेली नाही.

ठिकाण – जुन्नर **संशोधक विद्यार्थीनी**

दिनांक – ०१/०८/२०१८ **(सौ. सुप्रिया हेमंतकुमार काळे)**

# प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, सौ. सुप्रिया हेमंतकुमार काळे यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत अर्थशास्त्र या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) या पदवीसाठी **"कोल्हाटी जमातीचा सामाजिक – आर्थिक अभ्यास" (विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा)** या विषयावर सादर केलेला प्रबंध माझे मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे. हे संशोधन स्वतंत्र व नवे असून यापूर्वी ते कोणत्याही पदवीसाठी सादर केलेले नाही. सदर संशोधन प्रबंध अहवालात इतर स्त्रोतांपासून घेण्यात आलेल्या संदर्भाचा यथोचित उल्लेख केलेला आहे.

सदर प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी सादर करण्यात माझी अनुमती आहे.

ठिकाण – पुणे

दिनांक – ०१/०८/२०१८

**मार्गदर्शकाचे नाव**

**( प्रा. डॉ. प्रविण जाधव )**

# ऋणनिर्देश

संशोधन प्रबंधामध्ये अतिशय मोलाचा वाटा असणारे व ज्यांनी मला विषय निवडीपासून ते संशोधन अभ्यास पूर्णत्वास नेईपर्यंत योग्य मार्गदर्शन केले व प्रबंध लेखन सुलभ होण्यास मोलाची मदत केली असे माझे आदरणीय गुरुवर्य मार्गदर्शक प्रा. डॉ. प्रविण जाधव सर यांना कोटी कोटी धन्यवाद देते. त्याचप्रमाणे जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आदरणीय ॲड. संजय शिवाजीराव काळे यांनी प्रेरित केले यांचे सुध्दा आभार मानते. श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर चे प्रभारी प्राचार्य डॉ. सी. आर. मंडलिक सर व मा. अध्यक्ष प्रतिनिधी प्रा. व्ही. बी. कुलकर्णी सर यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानते.

संशोधन प्रबंधामध्ये मोलाचा वाटा असणाऱ्या अनेक व्यक्तींचा मला आवर्जुन उल्लेख करावा वाटतो. त्यापैकी श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर चे माजी प्राचार्य डॉ. भास्कर शेळके सर यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये संशोधन अभ्यासास गती येण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले त्यांचेही मी ऋण व्यक्त करते. ग्रंथपाल प्रा. एल. एन. थोरात, सौ. वंदना चव्हाण मॅडम, श्री. अे. पी. पाठक, श्री. प्रकाश शेळके मामा यांनी वेळोवेळी संदर्भ ग्रंथांच्या शोधकार्यामध्ये मला मदत केली त्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानते. माझ्या संशोधन अभ्यासासाठी योग्य दिशा देणारे व वेळोवेळी कर्तव्यदक्षपणे माझ्या चुका निर्दशनास आणून देणारे व माझ्या गुरुवर्यस्थानी असणारे श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर येथील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. जे. पी. खाडे सर यांचे मी ऋण व्यक्त करते. तसेच श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर मधील इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. एम. बी. वाघमारे सर, प्रा. सतिश जाधव, प्रा. अभिजित पाटील, प्रा. विशाल रणखांब यांचीही प्रबंध कार्यामध्ये मदत झाली त्यांचेही मी आभार व्यक्त करते. श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर मधील ऑफीस कर्मचारी व शिक्षकेतरवृंद या सर्वांकडून मला सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते.

डेक्कन कॉलेज ( Deemed University ) चे वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक श्री. धनंजय सुरवसे सर यांनी संदर्भ ग्रंथकामी मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. अण्णासाहेब वाघीरे महाविद्यालय, ओतूर येथील अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गव्हाळे सर,

प्रा. कुंडलीक सर, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,नारायणगांव येथील प्रा. डॉ. फुलसुंदर सर, न्यू आर्ट्स, कॉमर्स, सायन्स कॉलेज, अहमदनगर ग्रंथपाल, अहमदनगरमधील नगर वाचनालयाचे ग्रंथपाल या सर्वांच्या माध्यमातून संशोधन कार्यासाठी मदत मिळाली म्हणून या सर्वांचे मी आभार मानते.

जे माझ्या आयुष्यातील महत्वाचा घटक असून ज्यांनी माझ्या आयुष्याला योग्य दिशा व आकार दिला ते माझे पती श्री. हेमंतकुमार किसन काळे, त्यांचे आई – वडील, सर्व बंधू – भगिनी कुटुंबीय यांच्याकडून मला सतत प्रेरणा व प्रोत्साहन लाभले. त्याचप्रमाणे विवाहानंतर शिक्षणाबरोबरचा तुटलेला संबंध जोडून आणण्यामध्ये मोलाचा वाटा असणारे व माझ्या शिक्षणामध्ये वेळोवेळी सहकार्य करणारे तसेच माझ्या आई – वडिलांच्यास्थानी असणारे श्री. विजयकुमार मगदूम व सौ. सुरेखा मगदूम यांची मी ऋणी आहे. बंधूस्थानी असणारे श्री. संतोष जाधव (मामा) यांनी संशोधनास ज्या–ज्या वेळी गरज पडेल त्यावेळी वेळेची कोणतीही तमा न बाळगता सहकार्य केले त्यांचेही मी आभार मानते.

माझे वडील श्री. महादेवराव बाजीराव काळे (माजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बारामती) व माझी स्वर्गवासी आई कै. हेमलता महादेवराव काळे यांच्या कृपाशिर्वादाने मी हा प्रबंध कार्यपूर्तीस नेला त्या माऊलींचे कोटी–कोटी ऋण व्यक्त करते.

**संशोधक विद्यार्थीनी**

**(सौ. सुप्रिया हेमंतकुमार काळे)**

# अनुक्रमणिका


| | प्रकरण पहिले – प्रस्तावना | १–६५ |
|---|---|---|
| १.१ | प्रास्ताविक | १ |
| १.२ | समाज | २ |
| | १.२.१. समाजाच्या विविध व्याख्या | ३ |
| १.३ | वर्ण व्यवस्था | ५ |
| | १.३.१. कोल्हाटी समाजाचे वर्ण व्यवस्थेतील स्थान | ८ |
| १.४ | जात (Caste) | ९ |
| | १.४.१. जात शब्दाची उत्पत्ती (Origin of word Caste) | ९ |
| | १.४.२. जात शब्दाची व्याख्या | ११ |
| १.५ | जातीव्यवस्थेचा उगम | १२ |
| | १.५.१. जात व जमातीमधील संबंध | १४ |
| | १.५.२. जातीची वैशिष्टये | १५ |
| १.६ | जातिव्यवस्थेचे अर्थकारण– | १७ |
| | १.६.१. शिवकालीन अर्थव्यवस्था व जातिव्यवस्था | १८ |
| | १.६.२. गावगाडा, फिरस्त्यांमधून वतनदारांची निर्मिती | १८ |
| १.७ | शुद्रांची अवहेलना धर्मग्रंथापासूनच | १९ |
| १.८ | भटका – शब्दाचा अर्थ व व्याख्या | २२ |
| | १.८.१. अर्थ | २२ |
| | १.८.२. संकल्पना व व्याख्या | २३ |
| | १.८.३. भटक्या व विमुक्त जाती स्वरुप | २४ |
| १.९ | कोल्हाटी शब्द व कोल्हाटी जमातीची ओळख | २७ |
| | १.९.१. कोल्हाटी जमातीचे स्थान व उगम | २८ |
| | १.९.२ कोल्हाटी जमातीच्या उपजाती/पोटभेद/कुळे | ३१ |
| | १.९.३ कोल्हाटी जमातीची मिश्रणाने निर्मितीची कारणमीमांसा | ३३ |

| | | |
|---|---|---|
| १.१० | कोल्हाटी जमातीची सांस्कृतिक व धार्मिक ओळख | ३५ |
| | १.१०.१. जात पंचायत | ३६ |
| | १.१०.२. न्यायदान पध्दती | ३६ |
| | १.१०.३. कुलदैवते | ३८ |
| | १.१०.४. विवाह पध्दत | ३८ |
| | १.१०.५. पाचवीचा विधी | ४० |
| | १.१०.६. पुरुषांचा मुंजविधी | ४१ |
| | १.१०.७. मृत्यू विधी | ४१ |
| | १.१०.८. कोल्हाटी भाषा | ४२ |
| १.११ | कोल्हाटी जमात निर्मिती विषयी लोककथा किंवा पुराणकथा | ४४ |
| | १.११.१. गीतेतील मुक्ती व मोक्षमार्ग बाबत प्रतिपादन | ४५ |
| १.१२ | कोल्हाटी जमातीचे ऐतिहासिक स्थान (आदर व मानाचे) | ४६ |
| | १.१२.१. गणिका | ४६ |
| | १.१२.२. गणिकांचे गुप्तहेर म्हणून कार्य | ४६ |
| | १.१२.३. कलावंत व नृत्य मनोरंजनाचे महत्वाचे साधन | ४७ |
| | १.१२.४. नृत्यांगणेची वारांगणा कशी झाली? | ४७ |
| १.१३ | कोल्हाटी जमातीची वैशिष्टये | ४८ |
| | १.१३.१ कोल्हाटीण स्त्री विषयक दृष्टीक्षेप | ४९ |
| | १.१३.२. कोल्हाटी जमातीतील गृहिणी स्त्रीची वैशिष्टये | ५० |
| | १.१३.३. कोल्हाटी जमातीतील कलावंतीन(नायकीण)स्त्रींची वैशिष्टये | ५० |
| | १.१३.४. आशादायक परिवर्तन | ५१ |
| १.१४ | कोल्हाटी जमातीची लोकसंख्या | ५१ |
| | १.१४.१. भारतातील कोल्हाटी जमातीची लोकसंख्या | ५१ |
| | १.१४.२. महाराष्ट्रातील कोल्हाटी जमातीची लोकसंख्या | ५१ |
| | १.१४.३. अहमदनगर जिल्हयाची कोल्हाटी जमातीची लोकसंख्या | ५१ |
| १.१५ | भटक्या–विमुक्त जाती जमातींसाठी उपलब्ध असणाऱ्या योजना | ५१ |

| | | |
|---|---|---|
| | १.१५.१. राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ | ५१ |
| | १.१५.२. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.) | ५२ |
| | १.१५.३. शैक्षणिक योजना | ५६ |
| १.१६ | सारांश | ५७ |
| | संदर्भ ग्रंथ | ५९ |

| | प्रकरण दुसरे – संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन (Review of Litarature) | ६६–१२२ |
|---|---|---|
| २.१ | प्रस्तावना | ६६ |
| २.२ | संदर्भ ग्रंथ | ६६ |
| २.३ | आत्मचरित्र | ८४ |
| २.४ | वैचारिक लेख | ८९ |
| २.५ | नियतकालिके व मासिके | ९२ |
| २.६ | विद्यावाचस्पती शोध प्रबंध | ९९ |
| २.७ | विद्यानिष्णांत शोधनिबंध | ११४ |
| २.८ | संशोधनाचे महत्व | ११६ |
| २.९ | सारांश | ११७ |
| | संदर्भ ग्रंथ | ११८ |

| | प्रकरण तिसरे – संशोधनाची कार्यपध्दती | १२३–१९० |
|---|---|---|
| ३.१ | प्रस्तावना | १२३ |
| ३.२ | संशोधन आराखडा | १२४ |
| ३.३ | संशोधन समस्या विधान | १२५ |
| ३.४ | संशोधन विषयाची निवड | १२५ |
| ३.५ | संशोधन विषयाचे कथन | १२६ |
| ३.६ | संशोधन विषयाचे महत्व | १२७ |
| ३.७ | संशोधनाची गृहितके | १२७ |
| ३.८ | संशोधनाची उद्दिष्टये | १२८ |
| ३.९ | संशोधनाच्या मर्यादा | १२८ |

| | | |
|---|---|---|
| ३.१० | संशोधन पद्धती | १२९ |
| | ३.१०.१. नमुना निवड पद्धती | १२९ |
| | ३.१०.१.१. देशातील कोल्हाटी जमातीची संख्या स्थिती | १२९ |
| | ३.१०.१.२. महाराष्ट्र राज्यातील कोल्हाटी जमातीची संख्या स्थिती | १२९ |
| | ३.१०.१.३. जिल्हयाची निवड | १२९ |
| | ३.१०.१.४. तालुक्यांची निवड | १३० |
| | ३.१०.१.५. गावांची नमुना निवड | १३० |
| | ३.१०.२. तथ्य संकल्पनाच्या पध्दती व साधने | १३५ |
| | अ. प्राथमिक स्त्रोत | १३६ |
| | १. निरीक्षण | १३६ |
| | २. अनुसूचीद्वारे मुलाखती | १३७ |
| | ब. दुय्यम स्त्रोत | १३७ |
| ३.११ | तथ्याचे विश्लेषण व निर्वचन | १३७ |
| ३१२ | संशोधन विषयाचा अर्थशास्त्रीय सैध्दांतिक आधार | १३८ |
| | ३.१२.१. पारंपारिक दृष्टचक्र | १३८ |
| | ३.१२.२. परंपरागत दृष्टचक्रामुळे दारिद्र्याच्या दृष्टचक्राची निर्मिती | १३९ |
| | ३.१२.३. परंपरागत दृष्टचक्राची वैशिष्टये | १३९ |
| | ३.१२.४. परंपरागत दृष्टचक्र व कोल्हाटी समाज | १४० |
| | १. जातीव्यवस्था | १४० |
| | २. कौटुंबिक आर्थिक जबाबदारी | १४० |
| | ३. मुली या आर्थिक उत्पादनाचे साधन | १४१ |
| | ४. नैसर्गिक सौंदर्य संपन्नता | १४१ |
| | ५. नृत्य, कला, कौशल्य निपूणता | १४२ |
| | ६. व्यसनाधीनता | १४२ |
| | ७. शिक्षणाचा अभाव | १४२ |
| ३.१३ | प्रकरणांची मांडणी(Chapterization) - | १४३ |
| | १. प्रकरण पहिले – ‘संशोधन विषयाची ओळख ’ | १४३ |
| | २. प्रकरण दुसरे – ‘संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन ’ | १४३ |
| | ३. प्रकरण तिसरे – ‘संशोधनाची कार्यपध्दती’ | १४३ |
| | ४. प्रकरण चौथे –‘माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन’ | १४४ |

| | | |
|---|---|---|
| | ५. प्रकरण पाचवे – ‘संशोधन सारांश, निष्कर्ष व शिफारशी’ | १४५ |
| ३.१४ | अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी | १४६ |
| ३.१५ | अहमदनगर जिल्हयाचे भौगोलिक स्थान | १४८ |
| ३.१६ | अहमदनगर जिल्हयाची प्राकृतिक रचना | १५० |
| ३.१७ | अहमदनगर जिल्हयातील प्राचीन प्रशासकीय विभाग | १५१ |
| ३.१८ | अहमदनगर जिल्हयातील निवडक प्रसिध्द स्थळे | १५३ |
| ३.१९ | किल्ले | १५५ |
| ३.२० | नदया व धरणे | १५६ |
| ३.२१ | जिल्हयाचे हवामान व पर्जन्यमान | १५६ |
| ३.२२ | पिकांची रचना व स्वरुप | १५८ |
| ३.२३ | खनिजे | १६० |
| ३.२४ | वनक्षेत्र व वन उत्पादने | १६० |
| ३.२५ | लोकसंख्या | १६२ |
| ३.२६ | अहमदनगर जिल्हयातील स्त्री–पुरुष लोकसंख्या | १६७ |
| ३.२७ | अहमदनगर जिल्हयातील स्त्री–पुरुषांचे प्रमाण – | १६८ |
| ३.२८ | अहमदनगर जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण – संदर्भ वर्ष २०११ | १६९ |
| ३.२९ | अहमदनगर जिल्हयातील वर्गीकृत बँकांची संख्या, ठेवी व कज | १७१ |
| ३.३० | कृषी सहकारी संस्था (२०१५–१६) | १७२ |
| ३.३१ | वाहतुक व दळणवळण | १७४ |
| ३.३२ | उदयोग व व्यापार | १७४ |
| ३.३३ | पशुधन | १७७ |
| ३.३४ | दुग्ध व्यवसाय | १७८ |
| ३.३५ | वीज | १७९ |
| ३.३६ | शिक्षण | १८० |
| ३.३७ | पाणी पुरवठा | १८१ |
| ३.३८ | अहमदनगर जिल्हयातील विविध योजना | १८२ |
| ३.३९ | अहमदनगर जिल्हयातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे | १८३ |
| ३.४० | सारांश | १८५ |
| | संदर्भ ग्रंथ | १८७ |

| | प्रकरण चौथे – माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थ निर्वचन | १९१–३२१ |
|---|---|---|
| ४.१ | प्रस्तावना | १९१ |
| ४.२ | कोल्हाटी जमातीची कौटुंबिक स्थिती | १९२ |
| | ४.२.१. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीची तालुकानिहाय कुटुंब संख्या | १९२ |
| | ४.२.२. अभ्यास क्षेत्रातील तालुकानिहाय लोकसंख्येच्या प्रमाणात कोल्हाटी जमातीची लोकसंख्या | १९३ |
| | ४.२.३. अभ्यास क्षेत्रातील कुटुंब प्रमुखांचे स्त्री व पुरुष प्रमाण | १९५ |
| | ४.२.४. अभ्यास क्षेत्रातील तालुक्यातील गावनिहाय कोल्हाटी जमातीची कुटुंब संख्या | १९६ |
| | ४.२.५.अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीची वयोगटानुसार लोकसंख्या | १९९ |
| | ४.२.६. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीची कुटुंबानुसार धर्मांतर विषयक माहिती | २०० |
| | ४.२.७. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या रळयाविषयी(कूळ) माहिती | २०१ |
| | ४.२.८. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची विवाह विषयक माहिती | २०२ |
| | ४.२.९. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंब पध्दतीविषयी माहिती | २०३ |
| ४.३ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची शैक्षणिक स्थिती | २०५ |
| | ४.३.१. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी कुटुंब प्रमुखांचा शैक्षणिक स्तर | २०५ |
| | ४.३.२. अभ्यास क्षेत्रातील एकुण लोकसंख्येचा शैक्षणिक स्तर | २०६ |
| | ४.३.३. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी कुटुंबांची उच्च शिक्षणविषयक माहिती | २०८ |
| | ४.३.४. अभ्यास क्षेत्रातील  कुटुंब प्रमुखांचे शिक्षणविषयक आस्था/ अनास्था | २०९ |
| | ४.३.५. अभ्यास क्षेत्रातील  कुटुंब प्रमुखांचे शिक्षण सोडण्याची कारणे | २१० |
| | ४.३.६. अभ्यास क्षेत्रातील  मुलांचे शाळेत जाण्याचे प्रमाण | २११ |
| | ४.३.७. अभ्यास क्षेत्रातील शिक्षण विषयक समस्या | २१२ |
| ४.४ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी कुटुंबामधील मुलांबाबतचा दृष्टीकोन | २१३ |
| | ४.४.१. कोल्हाटी कुटुंबांमधील मुलांचे भवितव्याविषयक माहिती | २१३ |
| | ४.४.२. कोल्हाटी कुटुंबांमधील मुलींच्या भवितव्याविषयक माहिती | २१४ |
| | ४.४.३. कोल्हाटी कुटुंबांमधील मुलांकडे लक्ष देण्याविषयक  माहिती | २१५ |

| | | |
|---|---|---|
| | ४.४.४. कोल्हाटी कुटुंबांमधील मुलगा–मुलगी भेदभावविषयक माहिती | २१६ |
| | ४.४.५. कोल्हाटी कुटुंबांचे मुलांबाबत दृष्टीकोन | २१७ |
| | ४.४.६. कोल्हाटी कुटुंबांचे मुलींबाबत दृष्टीकोन | २१८ |
| ४.५ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीतील कुटुंबांची वैयक्तिक सामाजिक स्थिती | २१९ |
| | ४.५.१. कोल्हाटी कुटुंब प्रमुखांची व्यसनविषयक माहिती | २१९ |
| | ४.५.२. कोल्हाटी कुटुंब प्रमुखांची आंतरजातीय विवाहविषयक माहिती | २२१ |
| | ४.५.३. कोल्हाटी कुटुंबांचे जातीचे महत्व | २२२ |
| | ४.५.४. कोल्हाटी कुटुंबांचे भटकंतीचे प्रमाण | २२३ |
| ४.६ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीची धार्मिक व सांस्कृतिक स्थिती | २२४ |
| | ४.६.१. कोल्हाटी कुटुंबांमधील देवाविषयक आस्था | २२४ |
| | ४.६.२. कोल्हाटी कुटुंबांमधील नवस विषयक माहिती | २२५ |
| | ४.६.३. कोल्हाटी कुटुंबांमधील धार्मिक विधींविषयक माहिती | २२६ |
| | ४.६.४. कोल्हाटी कुटुंबांमधील मृत्यू विधीविषयक माहिती | २२८ |
| | ४.६.५. कोल्हाटी कुटुंबांच्या कुलदैवत विषयक माहिती | २३० |
| | ४.६.६. कोल्हाटी कुटुंबांची वेशभूषा | २३१ |
| | ४.६.७. कोल्हाटी कुटुंबांची आहारविषयक माहिती | २३२ |
| | ४.६.८. कोल्हाटी जमातीची जात पंचायतविषयक माहिती | २३३ |
| | ४.६.९. कोल्हाटी जमातीची विविध छंदविषयक माहिती | २३४ |
| ४.७ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची आरोग्यासंबंधी माहिती | २३५ |
| | ४.७.१. कोल्हाटी कुटुंबांच्या वैद्यकीय सेवेसंबंधी माहिती | २३५ |
| | ४.७.२. कोल्हाटी कुटुंबांमधील महिला बाळंपणविषयक माहिती | २३६ |
| | ४.७.३. कोल्हाटी कुटुंब प्रमुखांची कुटुंब नियोजनाची माहिती | २३७ |
| | ४.७.४. कोल्हाटी कुटुंबांची आरोग्य सुविधाविषयक माहिती | २३८ |
| | ४.७.५. कोल्हाटी कुटुंबांची आजारांविषयक माहिती | २३९ |
| ४.८ | कोल्हाटी जमातींच्या कुटुंबांची गुन्हेगारीविषयक स्थिती | २४० |
| ४.९ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातींच्या कुटुंबांची रोजगारविषयक स्थिती | २४३ |
| ४.१० | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातींच्या कुटुंबांचे उत्पन्नविषयक स्थिती | २५१ |
| ४.११ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची कर्जविषयक माहिती | २५८ |
| ४.१२ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची शेतीविषयक माहिती | २६७ |

| | | |
|---|---|---|
| ४.१३ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची खर्च विषयक स्थिती | २७५ |
| ४.१४ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची बचतविषयक स्थिती | २७६ |
| ४.१५ | अभ्यासक्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची स्थलांतरणाची स्थिती | २७८ |
| ४.१६ | अभ्यासक्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची स्थलांतरणाची कारणे व परिणाम | २७९ |
| ४.१७ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमात व शासकीय योजनांचा आढावा | २८१ |
| ४.१८ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची राहणीमानासंबंधी माहिती | २८४ |
| ४.१९ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची राजकीय जागरुकता विषयक माहिती | २८६ |
| ४.२० | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या पारंपारीक कलावंतीण स्त्री व्यवसायासंबंधी आर्थिक विश्लेषण | २८७ |
| ४.२१ | गृहितकृत्याची पडताळणी | ३०८ |
| ४.२२ | अर्थनिर्वचन ( Interpretation) | ३१४ |
| ४.२३ | सारांश | ३२० |
| | संदर्भसूची | ३२१ |

| | **प्रकरण पाचवे–संशोधन सारांश, निष्कर्ष व शिफारशी** | **३२२–३४५** |
|---|---|---|
| ५.१ | प्रस्तावना | ३२२ |
| ५.२ | निष्कर्ष | ३२२ |
| | ५.२.१. कोल्हाटी जमातीच्या सामाजिक स्थितीविषयक निष्कर्ष | ३२२ |
| | ५.२.२. कोल्हाटी जमातीच्या आर्थिक स्थितीविषयक निष्कर्ष | ३२८ |
| | ५.२.३. कोल्हाटी जमातीतील कलावंतीण स्त्रीच्या आर्थिक स्थितीविषयक निष्कर्ष | ३३५ |
| ५.३ | शिफारशी | ३३९ |
| | ५.३.१. सामाजिक | ३३९ |
| | ५.३.२. आर्थिक शिफारशी | ३४१ |
| | ५.३.३. कलावंतांसाठी विशेष शिफारशी | ३४३ |
| ५.४ | सारांश | ३४५ |

# तक्ता सूची


| त. क्र. | तक्ता तपशिल | पान क्रमांक |
|---|---|---|
| | प्रकरण क्र.३ संशोधनाची कार्यपध्दती | |
| ३.१ | अहमदनगर जिल्हयातील एकुण गावे | १३० |
| ३.२ | अहमदनगर जिल्हयातील १४ तालुक्यांमधील कोल्हाटी जमातीची तालुकानिहाय कुटुंब संख्या | १३१ |
| ३.३ | अहमदनगर जिल्हयातील अभ्यास क्षेत्रासाठी निवडलेल्या तालुक्यांची संख्या | १३५ |
| ३.४ | अहमदनगर जिल्हयाचे तालुकानिहाय क्षेत्रफळ सन २०११ | १४९ |
| ३.५ | अहमदनगर जिल्हयातील तालुकानिहाय पर्जन्य दिवसांची संख्या व एकुण पर्जन्य | १५७ |
| ३.६ | जिल्हयातील एकुण वनक्षेत्र | १६१ |
| ३.७ | अहमदनगर जिल्हयाची लोकसंख्या (लाखात) | १६२ |
| ३.८ | जिल्हयातील मागासवर्गीयांची लोकसंख्या | १६४ |
| ३.९ | धर्मानुसार लोकसंख्या | १६५ |
| ३.१० | वयोगटानुसार लोकसंख्या | १६६ |
| ३.११ | अहमदनगर जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण | १६९ |
| ३.१२ | तालुकानिहाय बँक कार्यालये, वर्गीकृत बँकांची संख्या,ठेवी व कर्जे | १७१ |
| ३.१३ | प्राथमिक कृषी सहकारी संस्थांचे कार्य | १७३ |
| ३.१४ | जिल्हयातील साखर कारखाने विषयक माहिती | १७६ |
| ३.१५ | जिल्हयातील एकुण पशुधन (अ) | १७७ |
| ३.१६ | जिल्हयातील एकुण पशुधन (ब) | १७८ |
| ३.१७ | जिल्हयातील एकुण पशुधन (क) | १७८ |
| ३.१८ | जिल्हयातील विजेचा वापर | १७९ |

| | | |
|---|---|---|
| ३.१९ | पिण्याच्या पाण्याच्या सोयी व टंचाई संबंधी केलेल्या उपाययोजना | १८१ |
| ३.२० | घरबांधणीसाठी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत ग्रामीण क्षेत्रात दिलेली घरे | १८२ |
| ३.२१ | शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे | १८३ |
| ३.२२ | ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे | १८४ |
| | **प्रकरण चौथे–'माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन'** | |
| ४.१ | कोल्हाटी जमातीची तालुका निहाय कुटुंब संख्या | १९२ |
| ४.२ | तालुकानिहाय एकुण लोकसंख्येच्या प्रमाणात कोल्हाटी जमातीची लोकसंख्या टक्केवारी | १९३ |
| ४.३ | कुटुंब प्रमुखांची स्त्री व पुरुष प्रमाण | १९५ |
| ४.४ | तालुक्यातील गावनिहाय कोल्हाटी जमातीची कुटुंब संख्या | १९६ |
| ४.५ | वयोमानानुसार कोल्हाटी जमातीची एकुण लोकसंख्येची विभागणी | १९९ |
| ४.६ | कोल्हाटी जमातीची कुटुंबानुसार धार्मिक विभागणी | २०० |
| ४.७ | कोल्हाटी जमातीतील कुटुंबांची रळयानुसार विभागणी | २०१ |
| ४.८ | विवाहित व अविवाहित कुटुंब प्रमुख विभागणी | २०२ |
| ४.९ | कुटुंब पध्दतीनुसार कोल्हाटी जमातीची विभागणी | २०३ |
| ४.१० | एकुण कुटुंब प्रमुखांचे शैक्षणिक स्तरानुसार विभागणी | २०५ |
| ४.११ | एकुण लोकसंख्येच्या शैक्षणिक स्तरानुसार विभागणी | २०६ |
| ४.१२ | उच्च शिक्षणाचे वेगवेगळया स्तरानुसार विभागणी | २०८ |
| ४.१३ | कुटुंबप्रमुखांचे शिक्षण सोडण्याचे प्रमाण व टक्केवारी | २०९ |
| ४.१४ | शिक्षण सोडण्याच्या कारणानुसार विभागणी | २१० |
| ४.१५ | मुले शाळेत जाण्याचे प्रमाण | २११ |
| ४.१६ | कोल्हाटी जमात म्हणून शाळेत येणाऱ्या समस्यांची विभागणी | २१२ |
| ४.१७ | मुलांच्या भविष्य व उदरनिर्वाहासंदर्भात विभागणी | २१३ |
| ४.१८ | मुलींच्या भविष्य व उदरनिर्वाहासंदर्भात विभागणी | २१४ |

| | | |
|---|---|---|
| ४.१९ | स्वतःच्या मुलांकडे लक्ष देण्यासंदर्भात विभागणी | २१५ |
| ४.२० | मुलगा–मुलगी फरक बाबत विभागणी | २१६ |
| ४.२१ | मुलांबाबत दृष्टीकोन | २१७ |
| ४.२२ | मुलींबाबत दृष्टीकोन | २१८ |
| ४.२३ | व्यसन करणाऱ्यांची विभागणी | २१९ |
| ४.२४ | व्यसनानुसार वर्गवारी | २२० |
| ४.२५ | कुटुंबानुसार आंतरजातीय विवाहाची विभागणी | २२१ |
| ४.२६ | जातीला प्राधान्य देणाऱ्या कुटुंबांची संख्या | २२२ |
| ४.२७ | भटके व स्थिर जीवन जगणाऱ्या कुटुंबांची विभागणी | २२३ |
| ४.२८ | देवावर विश्वास ठेवणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | २२४ |
| ४.२९ | नवस फेडण्याच्या पध्दती | २२५ |
| ४.३० | कोल्हाटी जमातीचे विविध विधींचे आचरण करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | २२६ |
| ४.३१ | मृत्यू विधीची पध्दतीनुसार कुटुंबांची विभागणी | २२८ |
| ४.३२ | दशक्रिया जेवण पध्दतीनुसार कुटुंबांची विभागणी | २२९ |
| ४.३३ | कोल्हाटी कुटुंबांची कुलदैवते | २३० |
| ४.३४ | वेशभूषा/पोशाख पध्दतीनुसार कुटुंबांची विभागणी | २३१ |
| ४.३५ | खाणे–पिणे पध्दतीनुसार कुटुंबांची विभागणी | २३२ |
| ४.३६ | जातपंचायती संदर्भात कुटुंबांच्या मतानुसार विभागणी | २३३ |
| ४.३७ | कोल्हाटी कुटुंबांची विविध छंदानुसार विभागणी | २३४ |
| ४.३८ | वैद्यकीय सेवेच्या उपलब्धतेनुसार कुटुंबांची विभागणी | २३५ |
| ४.३९ | महिला बाळंतपणाच्या सुविधेनुसार विभागणी | २३६ |
| ४.४० | कुटुंबांचे बाळंतपणातील मृत्यूचे प्रमाण | २३७ |
| ४.४१ | कुटुंबांचे कुटुंब नियोजनाचे प्रमाण | २३७ |

| | | |
|---|---|---|
| ४.४२ | सरकारी आरोग्य सुविधांची उपलब्धी | २३८ |
| ४.४३ | कुटुंबांची आजारानुसार होणारी विभागणी | २३९ |
| ४.४४ | गुन्हेगारी संबंधी विश्लेषण | २४० |
| ४.४५ | पूर्वीच्या व्यवसायासंबंधी कुटुंबांची विभागणी | २४३ |
| ४.४६ | सध्याच्या व्यवसायासंबंधी कुटुंबांची विभागणी | २४५ |
| ४.४७ | स्त्री पारंपारिक व्यावसायाची विभागणी | २४६ |
| ४.४८ | पुरुष पारंपारिक व्यावसायाची विभागणी | २४८ |
| ४.४९ | कुटुंबातील व्यक्तिंची व्यवसायानुसार विभागणी | २४९ |
| ४.५० | कुटुंबाची वार्षिक उत्पन्नानुसार विभागणी | २५२ |
| ४.५१ | कुटुंबांची मासिक उत्पन्नानुसार विभागणी | २५४ |
| ४.५२ | कुटुंबांची आर्थिक परिस्थितीनुसार सद्यस्थितीतील विभागणी | २५५ |
| ४.५३ | कुटुंबांची पूर्वीची आर्थिक परिस्थितीनुसार विभागणी | २५६ |
| ४.५४ | नवीन व्यवसाय सुरु करण्याची इच्छा असणाऱ्या कुटुंबांची संख्या | २५७ |
| ४.५५ | कर्ज वितरणाचे प्रमाण | २५८ |
| ४.५६ | कर्ज पुरवठा करणारी साधने | २६० |
| ४.५७ | कर्जाची रक्कमेनुसार विभागणी | २६१ |
| ४.५८ | कर्ज परतफेड व थकबाकी संदर्भातील वितरण | २६२ |
| ४.५९ | कर्ज तारणाचे स्वरुप | २६२ |
| ४.६० | कर्जासाठीचे व्याजदरानुसार विभागणी | २६३ |
| ४.६१ | कर्ज काढण्याच्या कारणानुसार विभागणी | २६४ |
| ४.६२ | कर्जाचा वापर दिलेल्या कारणासाठी करणाऱ्यांचे प्रमाण | २६५ |
| ४.६३ | कर्ज थकित असण्याची कारणे | २६६ |
| ४.६४ | शेती असणाऱ्या कुटुंबांची विभागणी | २६७ |

| | | |
|---|---|---|
| ४.६५ | शेतीबद्दलचे विवरण | २६८ |
| ४.६६ | शेती व्यवसायासंबंधी विवरण | २६९ |
| ४.६७ | शेतीपासून मिळणारे उत्पन्न | २७० |
| ४.६८ | शेतीसाठी कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण | २७१ |
| ४.६९ | शेतीसाठीच्या कर्जाचे विवरण | २७१ |
| ४.७० | शेतीसाठी कर्जपुरवठा करणारे स्त्रोत | २७२ |
| ४.७१ | परतफेड व थकबाकीचे स्वरुप | २७२ |
| ४.७२ | अर्थसहाय्य मंडळ व बचत गटातील सहभागाचे कुटुंबाचे प्रमाण | २७३ |
| ४.७३ | आर्थिक संपत्तीच्या स्वरुपानुसार विभागणी | २७४ |
| ४.७४ | कुटुंबाच्या दरमहा खर्चाची विभागणी | २७५ |
| ४.७५ | बचतीचे स्वरुप | २७६ |
| ४.७६ | बचत न होण्याची कारणे | २७७ |
| ४.७७ | स्थलांतरीत कुटुंबांची संख्या | २७८ |
| ४.७८ | स्थलांतरणाचे कारण | २७९ |
| ४.७९ | स्थलांतरणाचे प्रकार | २८० |
| ४.८० | स्थलांतरणापूर्वी व स्थलांतरणानंतरची आर्थिक सुधारणबाबतची विभागणी | २८० |
| ४.८१ | शासकीय योजनांविषयी माहिती बाबत | २८१ |
| ४.८२ | विविध शासकीय योजनांचे लाभार्थी कुटुंब | २८२ |
| ४.८३ | निवासाच्या मालकी हक्कासंबंधी विश्लेषण | २८४ |
| ४.८४ | निवासासंबंधी विश्लेषण | २८४ |
| ४.८५ | घरातील चैनीच्या वस्तूनुसार विभागणी | २८५ |
| ४.८६ | मतदानविषयक माहिती | २८६ |
| ४.८७ | शिधापत्रक/रेशनकार्ड असणाऱ्यांची संख्या | २८७ |

| | | |
|---|---|---|
| ४.८८ | व्यवसाय करारासंबंधी विश्लेषण | २८८ |
| ४.८९ | कराराचे स्वरुप | २८८ |
| ४.९० | करार अटीनुसार विभागणी | २८९ |
| ४.९१ | मिळणाऱ्या पैशावरील अधिकाराची विभागणी | २९० |
| ४.९२ | आर्थिक मालकीनुसार विभागणी | २९० |
| ४.९३ | कलाप्रदर्शन करताना उधळपट्टी(दौलतजादा)चे विश्लेषण | २९१ |
| ४.९४ | दौलतजादा(उधळपट्टी)तून मिळणाऱ्या उत्पन्नाची मालकी | २९२ |
| ४.९५ | कलावंतीनीच्या व्यवसायकाळातील मूलभूत खर्च करणाऱ्यांची विभागणी | २९२ |
| ४.९६ | व्यवसायाच्या स्थानानुसार विभागणी | २९३ |
| ४.९७ | व्यवसायाचा कालावधी | २९४ |
| ४.९८ | व्यवसायकाळात मुलांच्या आर्थिक संगोपनाची जबाबदारी | २९५ |
| ४.९९ | भविष्यकाळासाठी बचतीसंबंधी तरतूद विभागणी | २९६ |
| ४.१०० | व्यवसायामुळे सद्यस्थितीतील आर्थिक बदल | २९७ |
| ४.१०१ | पारंपारिक व्यवसायामुळे कौटुंबिक उदरनिर्वाहासंबंधी विश्लेषण | २९८ |
| ४.१०२ | रसिकांचा कलावंतीणीबद्दलचा दृष्टीकोन | २९९ |
| ४.१०३ | विशेष बैठकीचा अधिकार | ३०० |
| ४.१०४ | विशेष बैठकीच्या प्रेक्षकवर्गाची विभागणी | ३०० |
| ४.१०५ | विशेष बैठकीचे आर्थिक प्राप्तीची विभागणी | ३०१ |
| ४.१०६ | कलावंतीण स्त्रीच्या जातीनुसार विभागणी | ३०२ |
| ४.१०७ | स्त्री कलावंतीनीच्या समस्यांचे वर्गीकरण | ३०३ |
| ४.१०८ | व्यवसायकाळाव्यतिरिक्त मुलांच्या संगोपनाची जबाबदारी | ३०४ |
| ४.१०९ | मुलांना नाव लावण्यासंबंधी विश्लेषण | ३०५ |
| ४.११० | कलावंतीन स्त्रीची जीवनाविषयी अपेक्षा | ३०६ |

| | | |
|---|---|---|
| ४.१११ | व्यवसायामुळे कुटुंब व जीवनावरील परिणाम | ३०७ |
| ४.११२ | Hypothesis 1 - कोल्हाटी जमातीची शैक्षणिक प्रगतीनुसार आर्थिक व व्यावसायिक स्तरामध्ये परिवर्तन भिन्नता दिसते. | ३०९ |
| ४.११३ | Hypothesis 2 - कोल्हाटी जमातीचा पारंपारिक व्यवसाय शैक्षणिक प्रगतीतील अडथळा आहे. | ३१० |
| ४.११४ | Hypothesis 3 - कोल्हाटी जमातीच्या उदरनिर्वाहाच्या साधनांमध्ये परिवर्तन व विविधता आहे. | ३११ |
| ४.११५ | Hypothesis 4 - कोल्हाटी जमातीमध्ये धार्मिकता व अंधश्रध्देचा पगडा असून भटकंतीचे जीवन दिसते. | ३१२ |
| ४.११६ | Hypothesis 5 - कोल्हाटी जमातीतील पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना विविध समस्या आढळतात. | ३१३ |

# आलेख सूची


| आलेख क्र. | आलेख तपशिल | पान क्रमांक |
|---|---|---|
| ३.१ | अहमदनगर जिल्हयाची लोकसंख्या | १६२ |
| ३.२ | तालुकानिहाय अनु.जाती व जमातीची लोकसंख्या | १६३ |
| ३.३ | अहमदनगर जिल्यातील स्त्री पुरुष लोकसंख्या | १६७ |
| ३.४ | अहमदनगर जिल्हयातील स्त्री पुरुष प्रमाण | १६८ |
| ४.१ | कोल्हाटी जमातीची तालुका निहाय कुटुंब संख्या | १९२ |
| ४.२ | तालुकानिहाय एकुण लोकसंख्येच्या प्रमाणात कोल्हाटी जमातीची लोकसंख्या टक्केवारी | १९४ |
| ४.३ | कुटुंब प्रमुखांची स्त्री व पुरुष प्रमाण | १९५ |
| ४.४ | वयोमानानुसार कोल्हाटी जमातीची एकुण लोकसंख्येची विभागणी | १९९ |
| ४.५ | विवाहित व अविवाहित कुटुंब प्रमुख विभागणी | २०२ |
| ४.६ | कुटुंब पध्दतीनुसार कोल्हाटी जमातीची विभागणी | २०४ |
| ४.७ | एकुण लोकसंख्येची शैक्षणिक स्तरानुसार विभागणी | २०६ |
| ४.८ | खाणे–पिणे पध्दतीनुसार कुटुंबांची विभागणी | २३२ |
| ४.९ | गुन्हेगारीसंबंधी विश्लेषण | २४० |
| ४.१० | कुटुंबातील व्यक्तिंची व्यवसायानुसार विभागणी | २५० |
| ४.११ | कुटुंबाची वार्षिक उत्पन्नानुसार विभागणी | २५२ |
| ४.१२ | कुटुंबांची मासिक उत्पन्नानुसार विभागणी | २५४ |
| ४.१३ | कर्ज वितरणाचे प्रमाण | २५९ |
| ४.१४ | शेती असणाऱ्या कुटुंबांची विभागणी | २६७ |
| ४.१५ | विविध शासकीय योजनांचे लाभार्थी कुटुंब | २८३ |

# संक्षिप्त सूची

| | |
|---|---|
| मर्या. | मर्यादित |
| प्र. आ. | प्रथम आवृत्ती |
| द्वि. आ | द्वितीय आवृत्ती |
| तृ. आ. | तृतीय आवृत्ती |
| इ. स | इसवी सन |
| विजाभज | विमुक्त जाती भटक्या जमाती |
| विमाप्र | विशेष मागास प्रवर्ग |
| इ.मा.व. | इतर मागासवर्गीय |
| पृ.क्र. | पृष्ठ क्रमांक |
| कि.मी. | किलो मीटर |
| चौ.कि.मी. | चौरस किलो मीटर |
| से.मी.– | सेंटी मीटर |
| मिमी | मिली मीटर |
| अनु. | अनुसूचित |
| सह.सा.का.लि.– | सहकारी साखर कारखाना लिमिटेड |
| मे.टन | मेट्रिक टन |
| क्र. | क्रमांक |
| बी.पी.एल.– | Below poverty line |
| A.C | Air Conditionar |
| N.T.B | Nomadic Tribes – B |
| F.P | First Print |
| R.P | Reprint |
| N.B.C.F.D.C.- | National Backward Classes Finance and develpment corporation |

# प्रकरण पहिले

## संशोधन विषयाची ओळख

| | |
|---|---|
| १.१ | प्रास्ताविक |
| १.२ | समाज |
| १.३ | वर्ण व्यवस्था |
| १.४ | जात (**Caste**) |
| १.५. | जातीव्यवस्थेचा उगम |
| १.६. | जातिव्यवस्थेचे अर्थकारण |
| १.७ | शुद्रांची अवहेलना धर्मग्रंथापासूनच |
| १.८ | भटका – शब्दाचा अर्थ व व्याख्या |
| १.९. | कोल्हाटी शब्द व कोल्हाटी जमातीची ओळख |
| १.१० | कोल्हाटी जमातीची सांस्कृतिक व धार्मिक ओळख |
| १.११ | कोल्हाटी जमात निर्मिती विषयी लोककथा किंवा पुराणकथा |
| १.१२ | कोल्हाटी जमातीचे ऐतिहासिक स्थान (आदर व मानाचे) |
| १.१३ | कोल्हाटी जमातीची वैशिष्टये |
| १.१४ | कोल्हाटी जमातीची लोकसंख्या |
| १.१५ | भटक्या–विमुक्त जाती जमातींसाठी उपलब्ध असणाऱ्या योजना |
| १.१६ | सारांश |
| | संदर्भसूची |

# प्रकरण पहिले

# संशोधन विषयाची ओळख

## १. प्रास्ताविक –

पृथ्वीवर आपण वास्तव करतो ती पृथ्वी कशी निर्माण झाली हा प्रश्न नेहमीच मानवाच्या चिंतनाचा विषय बनला आहे. प्राचीन काळापासून ते अगदी अलीकडच्या काळापर्यंत या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न मानवाने केला आहे. जसजशी शास्त्रीय प्रगती होऊ लागली. जुन्या कल्पना मागे पडू लागल्या. विश्वाचे अंतरंग, पृथ्वीची निर्मिती इ. गोष्टींकडे शास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले जाऊ लागले. इ. स. १७ व्या शतकानंतर शास्त्रज्ञाकडून पृथ्वीच्या उत्पत्तीसंबंधीचे सिध्दांत मांडले जाऊ लागले. अर्थात सर्व शास्त्रज्ञांत एकमत नसले तरी शास्त्रीय दृष्टीकोनातून ते विश्वासार्ह मानण्यात येतात.

“अब्जावधी वर्षापूर्वी आकाशाच्या पोकळीत अतितप्त गोळा तुफान स्वतः भोवती फिरत होता. फिरता फिरता त्या गोळयापासून एक तुकडा निर्माण झाला. तो तुकडा स्वतः भोवती फिरुन तप्त गोळयाभोवती फिरु लागला. कालांतराने दोघांतील अंतर वाढत गेले. तसा लोखंडाचा रसासारखा असलेला तुकडा थंड झाला त्याला पृथ्वी असे म्हणतात. थंड होताना त्याची वाफ झाली. वाफेपासून पाऊस पडला. उबारा, ओलावा मिळाल्यामुळे जीव, जंतू उत्पन्न झाले. त्यामध्ये उत्क्रांती होऊन हजारो वर्षांनी मानव निर्माण झाला. अशाप्रकारे पृथ्वी व मानव निर्मितीची प्रक्रिया घडलेली आहे. त्या प्रक्रियेलाच सृष्टी असे म्हणतात”.[१]

जी. बी. शहा (द्वि. आ. २०१३) यांनी ‘प्राचीन भारताचा राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास’ या ग्रंथात सृष्टी निर्मिती संबंधी व्यक्त केलेले मत योग्य वाटते.

“सृष्टी निर्माण झाल्यानंतर मानव वंशाचा व त्याच्या संस्कृतीचा विचार सुरु होतो. तो सिंधु–पुत्र आणि आर्यांचे आगमन तो यापासून. त्यासाठी इतिहास साक्षीदार आहे. ज्या आर्यांचा इतका बोलबाला आहे, ते आर्य इसवी सनापूर्वी २००० वर्षाच्या सुमाराला भारतात आले. आर्य भारतात येण्यापूर्वी देशात मानवंशाचे अस्तित्व होते काय? असा सवाल कोणी विचारला तर, होय असेच उत्तर द्यावे लागेल. होय असे उत्तर दिल्यानंतर कोणता वंश व कोणती संस्कृती हा विचार पुढे येतो. त्याचे उत्तर असे, उत्तर भारतात सिंधू आणि रावी नद्यांच्या काठी मोहेंजोदडो व हडाप्पा ही दोन शहरे उत्खनात सापडली. उत्खनात सापडलेल्या वस्तू, शहरांची

रचना, स्नानगृहे, रस्त्यांची बांधणी यावरुन आर्यांच्याही पूर्वी सुधारीत संस्कृती अस्तित्वात होती; ती आर्येतर वंशाची होती की अन्य कोणत्या वंशाची होती? कोणी म्हणतात ती सुमेरियन किंवा सिथियन या मध्यभारतातील वंशाची होती. कुणी असेही म्हणतात की, द्रविडांपूर्वीसुध्दा भारतात कुणीतरी होते. त्यांची ती असावी. कोणत्याही वंशाची असो. ती सुधारलेली होती, ही गोष्ट मान्य करावीच लागते."[२] प्राचीन काळातही भारतीय संस्कृती प्रगत होती हे लक्षात येते. भारत देश हा अनेक धर्म, आर्य–अनार्य, अनेक पंथ वंश यांचा मिळून बनलेला आहे. या देशामध्ये प्राचीन काळापासून श्रेष्ठ–कनिष्ठ, उच्च–निच्च अशा मतभेदावर व्यक्ती–व्यक्तींमध्ये फरक केलेला दिसून येतो. समाजातील विशिष्ट गटाला दूर्लक्षित करुन त्या गटाच्या हितसंबंधाकडे जाणीवपूर्वक कानाडोळा केलेला दिसून येतो. कोणत्याही समाजाचा अभ्यास करण्यापूर्वी त्याचा इतिहास जाणून घेणे आवश्यक आहे. ती प्रेरणा देण्यासाठी इतिहासचार्य राजवाडे म्हणतात, "इतिहास निव्वळ कालाचाही लिहावयाचा नसतो किंवा देशाचाही लिहावयाचा नसतो. इतिहास लोकांचा म्हणजे मानव समाजाचा इतिहास लिहावयाचा असतो".[३]

राजवाडे (प्र. आ.१९८८, पुर्नमुद्रण २००६) यांच्या या मताचा विचारानुसार समाज इतिहास लेखन हे ऐतिहासिक ऐवज असते. म्हणून प्रस्तुत प्रबंधात कोल्हाटी समाजाच्या सामाजिक व आर्थिक अंगाचा अभ्यास करण्यात आला आहे.

## १.२. समाज –

समूहात राहणाऱ्या व्यक्तींमध्ये असणारी संबंधांची व्यवस्था म्हणजे समाज. मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. या वाक्यानुसार दैनंदिन जीवन जगत असताना तो आधार म्हणून समाजाशी किंवा जनसमुदायाशी एकरुप होऊन वागत असतो. परंतु जात, धर्म, लिंग, वंश, वर्ग या संकल्पनांमुळे तो संकुचित व मर्यादित जीवन जगण्याचा प्रयत्न करतो. उदा. भारतीय समाज, आर्य समाज, हिंदू समाज इ.

### १.२.१. समाजाच्या विविध व्याख्या –

[I] “समाज ही संकल्पना सामान्यभाव/ज्ञानाप्रमाणे देश किंवा राज्य यांच्या सीमांशी समान आहे. समाजशास्त्रज्ञ या नित्याच्या संज्ञेशी देश/राज्य सीमांबरोबर जोडत नाहीत कारण समाज हा कधी राजकीय सीमांपुरता मर्यादित नसतो. (जसे पॅलेस्टिनींचा समाज) तर काही मार्क्सवादयांनी ही अडचण सोडविण्यासाठी समाज बांधणी/जडणघडण ही संज्ञा समाज या संज्ञेचा पर्यायी म्हणून वापरली आहे. परंतु प्रत्यक्ष वापरात दोन्ही संज्ञा समान आहेत. सामाजिक स्तरावर घडणारे कोणतेही क्रियेचे (जसे दोन व्यक्तिंमधील संभाषण, सामाजिक समुह किंवा मोठया संस्थास्तरावरील किंवा संपूर्ण समाजातील) विश्लेषण म्हणजे समाजशास्त्र असे म्हणणे अधिक उपयुक्त ठरेल”.[४]

[II] “ही एक भाववाचक संज्ञा, लोकांचे विविध गुंतागुंतीचे विश्वास, वर्तन, नियम यांना अनुसरुन त्यावर ठाम अथवा चिकटून राहणे असे सांगतो. समाज हा नेहमी एकटया दुकटया व्यक्तिपेक्षा नेहमीच मोठा असतो आणि त्याची व्याख्या नकारात्मकपणे व्यक्ती किंवा व्यक्तिच्या विरुध्द अर्थी अशी केली जाते. तसेच व्यक्तिच्या इच्छेप्रमाणे/ मनाप्रमाणे वागण्यावर बंधने आणणारा घटक परंतु समाज अधिक सकारात्मकपणे देखील व्यक्त करता येतो. जसे एखाद्या व्यक्तिच्या विकासासाठी/ उन्नतीसाठी विविध संस्था, संघटना आणि नातेसंबंधातून पूरक ठरणारा घटक होय. संस्कृती या संज्ञेबरोबर नेहमी विरोधात्मक म्हणून समाज तपासून पाहिला जातो. समाज हा संस्कृतीच्या गाभ्यातून घडला आहे. समाज अधिक संघटित आहे आणि होतो आहे. परंतु संस्कृतीचे तसे नाही दुसऱ्या शब्दात समाज हा अधिकारवाणीने व्यक्त होतो तर संस्कृती प्रश्नार्थक पध्दतीने व्यक्त होते”.[५]

---

[I] (The concept is a commonsense category in which ‘society’ is equivalent to the boundaries of nation states. While sociologists in practice often operate with this everyday terminology. It is not adequate because societies do not always correspond to political boundaries (as in Palestinian society) some Marxists, in order to avoid this difficulty, have substituted ‘Social formation’ for ‘society’ but in practice these two terms are equivalent. It is more useful to argue that sociology is the analysis of the social which can be treated at any level (for example, diadic interaction. Social groups, large organizations or whole societies.)

[II] (An abstract term for the complex set of beliefs, practices, rules & traditions groups of people adhere to Society is always greater than a single individual& as such it is often defined in the negative as the opposite of the individual or as that which constrains the individual & prevents him or her from living out their desires. But it is also used in more affirmative terms to classify the ensemble of institutions, organizations & relationships that give support to the individual. It is often contrasted with culture, with the implication that society is the form to culture’s content-it is organized & organizing, whereas culture is not . To put it another way society speaks in the imperative, whereas culture uses the interrogative.)

**३. मेकाइवर एवं पेज** (समाजशास्त्र विश्वकोश – पुर्नमुद्रण २००५)–

"समाज परिपाटियों, कार्यविधियों, सत्ता, पारस्परिक, सहयोग, अनेकों समुहों एवं श्रेणियों, मानवीय व्यवहार नियंत्रणो तथा स्वतंत्रताओं की एक व्यवस्था है।" [६]

वरील व्याख्यांनुसार, मानव एकटा–दुकटा न राहणारा, सामाजिक समूह करुन परस्पर व्यवहारांसाठी एकत्रित येणारी व्यवस्था म्हणजे समाज होय असे म्हणता येते.

भारतीय संविधानातील कलम ४६ मधील मार्गदर्शक तत्वानुसार "दुर्बल घटक विशेषतः अनुसूचित जाती–जमाती यांच्या शैक्षणिक सामाजिक व आर्थिक विकासासाठी शासन प्रयत्नशील आहे. कल्याणकारी राज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी शासनामार्फत उन्नत समाजाच्या प्रगतीबरोबर समाजातील दुर्बल घटक, अल्पसंख्यांक, मागासवर्गीय, अपंग, महिला इ. च्या कल्याणासाठी प्रयत्न केले जातात".[७]

मराठी विश्वकोश खंड – १८ (प्र.आ.२००९) मध्ये दिलेल्या वरील माहितीनुसार भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वानुसार दुर्बल घटकांसाठी शासन प्रयत्नशील असल्याचे दिसते.

जनतेचे कल्याण व हित साधणे हेच समाजव्यवस्थेचे व शासकीय यंत्रणेचे मुख्य उद्दिष्ट असते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्येदेखील राजाच्या कर्तव्यांची चर्चा आहे.

**प्रजासुखे सुखम् राज्ञः प्रजानांच हिते हितम्।**
**नात्मप्रिये हितम् राज्ञः प्रजानांतु प्रियम् हितम।।**[८]

वरील उक्तीवरुन मराठी विश्वकोश खंड–१८(प्र.आ.२००९)मध्ये दिल्याप्रमाणे असे लक्षात येते की, कौटिल्याच्या काळापासून जनतेच्या सुखसमाधानामुळेच राजाला सुख लाभते व जनतेचे कल्याण तेच राज्यकर्त्याचे कल्याण होय.

भारतीय समाज व्यवस्थेत जात हा प्रमुख घटक असल्याचे दिसून येते. भारतातील सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीवर जात या संकल्पनेचा प्रभाव मोठया प्रमाणात दिसून येतो. जात व्यवस्था हे भारतीय समाज व्यवस्थेचे महत्वपूर्ण वैशिष्टय आहे. जातीतील विषमता ही काही समाज तज्ञांच्या मते वाईट गोष्ट आहे कारण ती प्राचीन काळामध्ये भयंकर

होती. प्राचीनकाळी वर्ण व्यवस्थेचे अस्तित्व होते. या वर्णव्यवस्थेमधूनच जाती व्यवस्था निर्माण झाली आणि भारतीय समाज वर्ण आणि जातीमध्ये बंदिस्त झाला.

इरावती कर्वे (प्र. आ. १९६०, द्वि. आ.२००६) यांनी 'आमची संस्कृती' या ग्रंथामध्ये समाज व संस्कृती यांमधील सहसंबंध स्पष्ट केला आहे. त्यांच्यामते "संस्कृती ही समाजाची निर्मिती आहे. एकटया-दुकटया व्यक्तिच्या जीवनक्रमात संस्कृतीची निर्मिती होणे अशक्य आहे".[९] वरील मतानुसार संस्कृती ही समाजाच्या कृतीतून निर्मित होते.

व्यक्ती, संस्कृती व समाजातील परस्पर संबंध मांडताना कर्वे (प्र.आ.१९६०, द्वि.आ.२००६) लिहितात, "व्यक्तिला उपभोग्य वस्तू व व्यावहारिक विधिनियम, वैचारिक विश्व ही समाजाकडून वारशाने मिळतात. स्वतःच्या दोन शुद्र हातांनी त्याच्या भोवतालच्या उपभोग्य वस्तूंची निर्मिती झालेली नसते. ताटे, वाटया, अन्न शिजवायची भांडी, लुगडी-धोतरे, अंथरुण, पांघरुणे, राहते घर, गावातील रस्ते, विजेचे दिवे, भाज्या, धान्य, फळे, साखर - गूळ इ. पदार्थ, पुस्तके, मंदिरे, हयांपैकी किती बरे आपण आपल्या हातांनी बनविलेले असते? हे पदार्थ बनवायला लागणारी कला व ज्ञान हे काय एका व्यक्तिने व एका पिढीने निर्माण केलेले असते? तसेच स्वराज्य, सुराज्य, कुटुंब, गावगाडा, पूर्व जन्म, पाप-पुण्य हया समाजसंस्था व मूल्ये काय व्यक्तिने बनवलेली असतात? व्यक्ति ज्या समाजात जन्मते त्या समाजातील संस्कार उचलते".[१०] यावरुन व्यक्ती, संस्कृती व समाज यांचे संबंध परस्परपूरक आहेत हे स्पष्ट होते.

## १.३. वर्ण व्यवस्था -

[III] "भारतीय इतिहासाच्या उत्क्रांतीमध्ये ख्रिस्तपूर्व काळामध्ये वर्ण जेव्हा त्याच्या पारंपारिक किंवा मानववंश संबंधित अर्थाने वापरला व समजला जात होता परंतु समाज किंवा समाज व्यवस्थेचे वर्णन करायला तो पुरेसा नव्हता. तेव्हा तो अपूरा व भरकटणारा ठरला.

---

[III] (A time was thus reached in history that is in the evolution of Indian society & this happened already before the beginning of the Christian era. When 'Verna' which seems to have been used & understood. Generally speaking in an ethnic sense did not any longer. Suffice to explain the society to which the people belonged it was simply inadequate & misleading. That is was inadequate if not misleading, became evident at least from about the beginning of the Christian era. When our smriti writers had explain the system by the invention of the concept of 'misra' or 'sankara varnas')

ख्रिस्त काळापासून वर्ण भरकटणारा नसेल परंतु जेव्हा स्मृतीकारांनी समाज किंवा समाज व्यवस्थेचे वर्णन करताना संमिश्र वर्ण ही संज्ञा वापरली तेव्हा वर्ण अपूरा ठरतो".[११]

के. एस. सिंग (प्र. आ.१९७२, द्वि. आ. १९८६) यांनी वर्ण अपूरा कसा ठरतो या संबंधीचे दिलेले स्पष्टीकरण योग्य वाटते.

काही स्मृतीने संदर्भ दिलेले आहेत तर धर्मसूत्रामध्ये काही तत्वे आहेत त्यांना मनु, यज्ञ, वैक्य, स्मार्ट सूत्र (X–११–१५) उसणस (शिवा महात्म्य खंड प्रकरण १२) याठिकाणी काही जातींची नावे अशाप्रकारे दिली आहेत. १. अंन्द्रा, २. अन्त्य ३. अंत्यजा [१२]

शकुंतला देवी (प्र. आ. १९९९) स्मृतीचा संदर्भ देऊन वरीलप्रमाणे तीन जातींचा उल्लेख वरीलप्रमाणे करतात.

चातुवर्ण्य हे आर्यांच्या समाजव्यवस्थेचे सर्वात मोलाचे वैशिष्टय आहे असे इतिहासचार्य वि. का. राजवाडे यांचे मत होते. समाजातून आर्यांच्या समाजरचनेत चातुर्वर्ण्य कसे उदयास आले याची चर्चा त्यांनी पुरुषसूक्ताचा अन्वयार्थ लावून आणि पाणिनीच्या अष्टाध्याचीच्या आधाराने केली आहे. वैदिक ऐतिहासिक परंपरेतील वेगवेगळे सिध्दान्त वापरुन ते वर्णव्यवस्थेची उत्पत्ती सांगतात. सुरुवातीला सर्व आर्य हे ब्राम्हणच होते आणि नंतर क्षत्रिय–वैश्य यांची त्यात भर पडून त्रैवर्णिक समाजरचना अस्तित्वात आली. पुढे शुद्रांचा त्यात अंतर्भाव झाला आणि चातुर्वर्ण्य निर्माण झाले.

भा. ल. भोळे (प्र. आ. १९९८) हे "समग्र राजवाडे साहित्य खंड–८" या ग्रंथामध्ये वर्ण व्यवस्थेसंबंधी वि. का. राजवाडे यांनी मांडलेली वर्णव्यवस्थेची उत्पत्ती प्रस्तावनेमध्ये पुढीलप्रमाणे लिहितात.

या चारही वर्णाच्या व्यक्तींचे वेगळेपण कातडीच्या रंगाच्या आधारे करणाऱ्या मनूवचनाचे उदाहरण राजवाडे "हिंदूस्थानातील आर्य लोकांचा वर्ण" या लेखात करतात, "ब्राम्हण शुक्ल भास्कर रंगाचे, क्षत्रिय तांबडया, वैश्य पिवळया तर शुद्र काळया रंगाचे आणि इतर संकर जाती त्या–त्या संकीर्ण रंगाच्या"[१३] हे मनूवचन यथार्थ असल्याचे राजवाडे अप्रत्यक्षरित्या मान्य करतात. वरील मनुवचनाला राजवाडे यांनी अप्रत्यक्षरित्या मान्य केले असले तरी वर्णव्यवस्था रंगावरुन असेल असे वाटत नाही.

“आर्य समाजात मुख्य वर्ण तीन : ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य हयांनाच त्रैवर्णिक म्हणतात. चौथा वर्ण शुद्राचा मिळून चातुर्वर्ण्य. हे चातुर्वर्ण्य ऋग्वेदांतील पुरुषसूक्तांत वर्णिलेले आहे. ऋग्वेदकाली हे चार वर्ण शुध्द वर्ण होते. लोकसंख्या थोडी होती, तेव्हां काही कालपर्यंत हे चार वर्ण शुध्द राहिले. पुढे लोकसंख्या जसजशी वाढत चालली तसतसा संकर उत्पन्न होऊ लागला. ब्राम्हण बीजापासून क्षत्रिय वैश्य शूद्रक्षेत्राच्या ठाई, क्षत्रियबीजापासून वैश्यशूद्रक्षेत्राच्या ठाई व वैश्य बीजापासून शूद्रक्षेत्राच्या ठाई अधर्म्य प्रजा होऊ लागली तिला अनुलोम संकर असे नाव पडले. उलट शुद्रबीजापासून ब्राम्हणक्षेत्राच्या ठाई जी प्रजा झाली तिला प्रतिलोम संकर म्हणू लागले. कालांतराने अनुलोम व प्रतिलोम यांच्यातही अनुलोम व प्रतिलोम संकर उत्पन्न झाले”.[१४] यावरुन वरीलप्रमाणे अनुलोम प्रतिलोमातून समाजात विविध वर्णाच्या संबंधातून संकर निर्माण झाला असे राजवाडे स्पष्ट करतात. त्याचप्रमाणे मु. ब. शहा (प्र. आ.१९९८)हे आपल्या ग्रंथात राजवाडे यांचे “८०६४ स्थिर जाती हिंदूस्थानात धर्मशास्त्रानुसार ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र हया चार वर्णात समाविष्ट होतात असे सांगितले”[१५] हे मत स्पष्ट करतात.

“चार वर्ग फार जुने हे सांगितले पण अत्यंत प्राचीन काळी हे वर्ग जेव्हा उल्लेखिले गेले तेव्हा त्यांना ‘वर्ण’ हा शब्द लागत नव्हता. दुसरा कोणता तरी शब्द त्यावेळेस रुढ असावा. वर्ण याचा अत्यंत प्राचीन अर्थ संप्रदाय, प्रांतिकता किंवा त्यामुळे आलेले वैशिष्टय असा असावा. हे मागे बुध्दपूर्व जग या पुस्तकात ऋग्वेदातील वर्णविषयक सर्व उल्लेख घेऊन दाखविले आहेत. वर्ण हा शब्द यादृष्टीने जेव्हा वापरला जात होता तेव्हा आर्यवर्ण आणि दासवर्ण हे यजनमूलक भेद ‘वर्ण’ शब्दाने दर्शविले जात होते आणि अगस्त्यलोपामुद्रासंवादसूक्तांत दोन्ही वर्ण उत्कर्षाला पावले असा उल्लेख आहे. कालांतराने भिन्न कर्मदर्शन सामाजिक वर्गास वर्ण शब्द लागला. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र ही नावे प्रचारात होतीच ती वर्णांची नावे झाली.”[१६]

श्री. व्यं. केतकर (प्र.आ.१९३६, पुर्नमुद्रण १९९४) यांनी वरीलप्रमाणे आपल्या ‘भारतीय समाजशास्त्र’ या ग्रंथात विविध पुराव्यांचा आधार घेऊन वर्ण शब्दाची योजना कशी झाली हे मांडले आहे.

“संस्कृतातील व आधुनिक भाषांतील वाड.मयात चातुर्वर्ण्य संस्था असे हया पध्दतीचे नाव आहे. वर्ण या शब्दाचा अर्थ कायदे शास्त्रज्ञ, मानव शास्त्रज्ञ व भारतीय विद्याशास्त्रज्ञ यांनी ‘वर्ग क्लास’ असा केला आहे आणि तो बरोबर आहे”.[१७]

इरावती कर्वे (प्र. आ.१९७५) यांच्या मते, मनू हा भारतातील पहिला स्मृतिकार असून मनू म्हणतो की, जाती अनेक आहेत पण वर्ण फक्त चारच आहेत. ते म्हणजे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र आणि त्यांचा अनुक्रम मनूनेच दिलेला आहे. इरावती कर्वेनी 'हिंदू समाज-एक अन्वयार्थ' या ग्रंथामध्ये मनूने केलेल्या चातुर्वर्ण्य पध्दतीचे सविस्तर वर्णन केलेले दिसते.

मौर्य सातवाहन कालामध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्था भारतीय समाजात खोलवर रुजली तथापी ही व्यवस्था अजूनही इतर ताठर (Rigid) झाली नव्हती. रोमिला थापर या विदूषीच्या मताला बी. एन. सरदेसाई पुष्टी देतात. थापर यांच्यामते "It's evident from the inscriptions of this period that mobility amongst the subcastes was less rigid than it was to become later".[१८]

ब्राम्हण, क्षत्रिय यांच्या वर्ण संकरामुळे अनेक जाती अस्तित्वात आल्या व महाराष्ट्रात जाती जातीतील विषमता, स्पृश्य-अस्पृश्यता मोठया प्रमाणात निर्माण झाली. चार्तुवर्णांच्या संबंध संकरातून जाती निर्माण झाल्या हे वरील तज्ञांच्या विचारातून स्पष्ट होते.

### १.३.१. कोल्हाटी समाजाचे वर्ण व्यवस्थेतील स्थान –

अलबेरुनी (प्र. आ.१९८६,पुर्नमुद्रण २००९) यांच्या मते, इतिहासाकडे एक दृष्टीक्षेप टाकल्यास "प्राचीन काळातील कर्तव्यदक्ष राज्यकर्त्यांनी, आपल्या राज्यातील विविध सामाजिक घटक एकमेकांत मिसळून त्यांच्यामध्ये संकर होऊ नये व त्यामुळे समाजात अव्यवस्था, गोंधळ होऊ नये व आपल्या बचावाची घडी नीट बसावी यासाठी अत्यंत दक्षतेने पाऊल टाकल्याचे दिसते व त्यांनी समाजाचे विविध वर्ग पाडले व त्या वर्गाने नेमून दिलेले कार्य करावे असा दंडकही घातला. एका वर्गातील लोकांनी दुसऱ्या वर्गातील लोकांशी बेटी व्यवहार करु नयेत अशा प्रकारचे कडक नियमही घालून दिले. नियमांचे काटेकोर पालन व्हावे याकडे विशेष लक्ष देऊन नियमाचा भंग करणाऱ्यास कडक शासन केले जाई. खुसरुंनी प्रस्थापित केलेल्या समाजव्यवस्थेचे कित्येक दाखले प्राचीन इतिहासात आढळतात." [१९] राजाने सुव्यवस्थेसाठी समाजव्यवस्थेची मांडणी केली.

अलबेरुनी यांनी (प्र. आ. १९८६, पुर्नमुद्रण २००९) आपल्या ग्रंथात अर्दशीर बिन बाबक या राजाने समाज घटकांची विभागणी पुढील चार वर्गात केलेली दिसते.

पहिला वर्ग – राजे आणि सरदार

दुसरा वर्ग – कायदे पंडित, साधू आणि अग्निपुजक

तिसरा वर्ग – वैदय, खगोलशास्त्रज्ञ व वैज्ञानिक

चौथा वर्ग – कृषिवल, कलावंत[२०]

वरील ऐतिहासिक पुराव्यांमुळे कलावंतांचे स्थान चौथ्या वर्गात होते हे लक्षात येते.

## १.४. जात (Caste)

भारतीय समाज वर्ग व वर्ण व्यवस्थेतून जातींची निर्मिती झाल्याचे दिसून येते. या जातीव्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी जात शब्दाच्या उत्पत्तीची मांडणी करणे गरजेचे वाटते.

### १.४.१. जात शब्दाची उत्पत्ती (Origin of word Caste) –

[IV] "जात या शब्दाचा मूळ स्पॅनीश व पोर्तूगिज यांच्यामध्ये पहावयास मिळते. जात हा शब्द मूळचा स्पॅनीश व पोर्तूगिजचा आहे. Casta म्हणजे अवलाद किंवा वंश होय. तो castus या लॅटिन शब्दापासून निर्माण झालेला असून त्याचा अर्थ शुध्द असा आहे. स्पॅनीशांनी हा शब्द सर्वप्रथम वापरला परंतु भारतीयांमध्ये याचा उपयोग पोर्तूगिजांपासून सुरु झाला तो १५ व्या शतकाच्या मध्यापासून यानंतर या शब्दाला सन १७४० मध्ये caste हा फ्रेंच शब्द पर्याय म्हणून वापरला गेला आणि तो सन १८००च्या पूर्वी वापरला गेल्याची दाट शक्यता आहे. यानंतर बऱ्याच वेळानंतर या शब्दाचे पुर्ननुतनीकरण caste असे झाले. मानव वंशानी हा शब्द सन १५५५ मध्ये वापरला असावा. युरोपीयन्स, भारतीय अमेरिकन आणि निग्रो यांनी casta हा स्पॅनीश एकत्रितरित्या वापरला परंतु casta या शब्दाचा उपयोग वापर भारतीयांनी १७व्या शतकापर्यंत केला नाही. यानंतर भारतीयांनी या शब्दाच्या वापरण्याचे प्रमाण वाढविले आणि casta या शब्दाचे त्यांना सर्वसाधारण प्रकारचे ज्ञान आहे किंवा त्यांना तो कशा पध्दतीने

---

[IV] ( The word "Caste" – This is of Spanish & Portuguese origin. Casta means lineage or race. It is derived from the Latin word. Castus, which means pure. The Spaniards were the first to use it. But it's Indian application is from the Portuguese who had so applied it in the middle of the fifteenth century. The current spelling of the word is after the French word "Caste" which appears in 1740 in the academies & is hardly found before 1800. Before that time it was spelt as cast. In the sense of race or breed of man it was used as early as 1555 A.D. The Spanish word 'Casta' was applied to the mixed breed between Europeans, Indians (American) & Negroes. But caste was not used in its Indian sense still the seventeenth century. The Indian use is the leading one now & it has influenced all other uses. As the Indian idea of caste was but vaguely understood, this word was loosely applied to the hereditary classes of Europe resembling the castes of India who keep themselves socially distinct. Darwin has applied this word to different classes of social insects. The Portuguese used this word to denote the Indian institution as they though such a system was intended to keep purity of blood. Wethus see that derivation of the word does not help us to understand what caste is)

समजला आहे. हा शब्द इकडच्या–तिकडच्या वर्गातल्यांनी ढिल्यापणाने वापरला आहे. युरोपीयांच्या मते, हा शब्द भारतात सामाजिक क्षेत्रात वेगवेगळ्या वर्गासाठी वापरला गेला आहे. युरोपीयनांच्या मते 'castes' हा शब्द सामाजिक विभाजनासाठी वापरला आहे. 'Darwin' च्या मते, हा शब्द सामाजिक क्षेत्रातील वेगवेगळ्या वर्गासाठी वापरला आहे. भारतीय संस्थांनी पोर्तुगिजाच्या या शब्दाची नोंद करुन ठेवली आहे. त्याच्या या विचारानूसार ही पध्दत रक्त शुध्दतेवर आधारित आहे. आपण caste या शब्दाची उत्पत्ती कशी झाली हे पाहिले परंतु म्हणजे काय? हे समजण्यासाठी याची काहीही मदत होत नाही".[२१]

श्री. व्यं. केतकर (प्र. आ. १९०९) यांनी वरीलप्रमाणे 'History of Caste In India' या ग्रंथात जात शब्दाची उत्पत्ती सांगितलेली दिसते.

"जाती हा शब्द जन म्हणजे उत्पन्न होणे या धातूपासून उत्पन्न झाला असून त्याचा अर्थ जन्माने उत्पन्न होणारा समूह असा करता येईल अर्थात हा शब्द फक्त मानवांनाच लागू नसून निरनिराळ्या वनस्पती व प्राणी यांनाही लावला जातो".[२२] मो. वी. पटवर्धन (प्र.आ.१९६६) यांनी समूह करुन राहणे हा केवळ मानवाचाच गुणधर्म नसून तो वनस्पती व प्राणी यामध्येही आढळतो असे स्पष्ट केले आहे. श्री. व्यं. केतकर (प्र. आ. १९०९) यांच्याप्रमाणेच मो.वी.पटवर्धन (प्र. आ.१९६६)[२३] यांनीही जात या शब्दाची उत्पत्ती मांडलेली दिसते.

"जात हा शब्द कसा बनला आहे. हे पाहिले तर जातिभेदाचे स्वरुप आपल्या चटकन लक्षात येईल. संस्कृतमधील जात या शब्दाचे ते मराठी रुप आहे. जन–जन्मणे, जन्म घेणे याचे भूतकालीन रुप म्हणजे जात म्हणजे जन्मलेले असा होतो. यावरुन जाती या शब्दाच्या एकाच गटात जन्मलेल्यांचा समूह असा होतो. परंतु या शब्दाला तेवढाच अर्थ राहिलेला नाही. एखादा पुरुष किंवा एखादी स्त्री कोणत्या गटात जन्मलेली आहे, यावरुन त्याच्या किंवा तिच्या संबंध जन्माचे काय व्हायचे हे त्या व्यक्तीला माहिती नसतानाच ठरुन गेलेले असते. यावरुन केवळ जन्माने एखादया व्यक्तीच्या जीवनातील हरएक बाबींसंबंधी जो वर्ग निश्चित केला जातो त्यास जाती किंवा जात म्हणता येईल".[२४]

वरीलप्रमाणे नामदेव व्हटकर (द्वि.आ.१९६७) या दोन्ही समाजशास्त्र लेखकांनी जन्माने उत्पन्न होणार समूह व एकाच गटात जन्मलेल्यांचा समूह असे साम्य असणारे जातीसंबंधी विचार मांडले आहेत.

'जात' या शब्दाची उत्पत्ती सांगताना शकुंतला देवी (प्र.आ.१९९९) [२५] या विदुषीनेही काही वेगळे सांगितलेले दिसत नाही. यांच्याकडूनही वरीलप्रमाणे श्री.व्यं.केतकर(प्र.आ.१९०९) यांच्या मताची पुर्नरावृत्ती झालेली दिसते.

भारतीय मानववंश शास्त्रीय विभागाच्या सर्वेक्षणानुसार भारतात एकुण ४,६९४ जाती आहेत. प्रमुख जाती उपजातींची एकुण संख्या ६,४०० पर्यंत पोहचते.[२६]

सन १९०१ च्या जनगणनेनुसार भारतात जवळजवळ २,३७८ जमाती होत्या तर काहींची संख्या दशलक्ष तर काही कमी लोकसंख्येच्या होत्या.[२७]

शकुंतला देवी(प्र.आ.१९९९) यांच्यामते वंश किंवा ब्रिड या दोन्हींचा अर्थ म्हणजे जात होय. जाती–जातींच्या संकरातून उपजाती निर्माण झाल्या. शकुंतला देवींच्या मते त्या १९०१ च्या जनगणनेमध्ये भारतात २,३७८ जमाती तर टी. बी. खिलारे (प्र.आ.२०११) यांच्यामते एकुण ४,६९४ जाती व ६,४०० उपजाती आहेत.

### १.४.२. जात शब्दाची व्याख्या –

J. H. Hutton ( R.P.1963)[28]

[V] "जात ही मुळातच अत्यंत गुंतागुंतीची संस्था असून ती इतकी गुंतागुंतीची संस्था आहे की तीचे स्वरुप एका विशिष्ट क्षेत्रापुरते मर्यादित असते आणि ती फक्त भारतातच आहे याबाबत शंका नाही".

भारतीय संस्कृती कोश खंड –४ मध्ये दिल्याप्रमाणे नर्बदेश्वर यांच्या मते, "जाती या व्यावसायिक समूह होत्या म्हणून जेवढा व्यवसाय कनिष्ठ स्वरुपाचा असेल तेवढा त्या जातीचा दर्जा कनिष्ठ होता".[२९]

वरील व्याख्येनुसार जातीव्यवस्था केवळ भारतातच असून ती गुंतागुंतीची असून व्यावसायानुसार तिचा दर्जा ठरतो.

---

[V] "Caste appears to be an institution of highly complex origin, an origin so complex indeed that its very nature must be limited to as single area & that no doubt, is why it is only found in India"

**S. V. Ketkar (F.P.1909)**[30]

[VI] " जात एक सामाजिक समूह असून त्यांची दोन प्रमुख वैशिष्टये आहेत.

१. यात विशिष्ट जातीतील सभासदांच्या पोटी जन्मास आलेल्यांनाच त्या जातीचे सदस्यत्व प्राप्त होते.

२. या सदस्यांना कठोर सामाजिक नियमांद्वारे आपल्या(जाती) समूहाबरोबर विवाह करण्यास बंदी आहे".

श्री. व्यं. केतकर (प्र.आ.१९९०) यांच्या व्याख्येवरुन जाती जातीमध्ये रोटी व्यवहार होतात पण बेटी व्यवहार होत नाहीत म्हणजेच विवाह नियमांसंबंधीची स्पष्टता होते.

**इरावती कर्वे (प्र.आ.१९७५)**[३१]

"जाती हे आतल्या आत विवाह म्हणजे अंतर्विवाह करणारे समूह आहेत".

**मा. म. देशमुख (प्र.आ.१९६७, तृ.आ.१९९८)**[३२]

"एका मूळ पुरुषापासून निर्माण झालेल्या समान आहार, विवाह, व्यवसाय वगैरे सामाजिक, धार्मिक व आर्थिक रुढींनी बध्द असलेल्या अनेक कुटूंबाच्या एकात्म संघटनेला जात असे म्हणता येईल".

मा. म. देशमुख (प्र.आ.१९६७, तृ.आ.१९९८) यांच्या मते, जाती व वर्ण भिन्न आहेत. जाती जन्मावरुन अथवा वंशावरुन ठरतात व वर्ण गुणकर्मावरुन ठरले. जाती निर्मितीबाबत देशमुखांचे मतही सारखेच असल्याचे दिसते.

## १.५. जातीव्यवस्थेचा उगम–

भारतात ज्या आर्याच्यापासून जातिभेदांचा थांगपत्ता लागत जातो ते आर्य इतिहास संशोधकांच्या मते इसवी सनाच्या पूर्वी सुमारे २००० ते २५०० वर्षाच्या कालांत वायव्येकडील खैबर खिंडीतून भारतात आले. इराणच्या आखातातून पूर्वेकडे सरकत सरकत येत असतांना त्यांची ग्रंथ रचनाही चालू असावी. या त्यांच्या ग्रंथात सर्वात जुना ऋग्वेद आपणाला सापडतो. ऋग्वेद आर्यानी इराणच्या आखाताजवळ असतानाच रचायला सुरुवात केली असे विद्वानांचे मत आहे. या ऋग्वेदांतील दहाव्या मंडळांत एक ऋचा आहे तीत म्हटले आहे.

[VI] ("A Caste is a social group having two characteristics –
1. Membership is confined to those who are born of members & included all persons so born.
2. The members are forbidden by an inexorable social law to marry outside the group.")

**ब्राम्हणोस्य मुखमासीब्दाहू राजन्य कृतः।**

**उरु तदस्य यद् वैश्यःपदभ्यांशूद्री अजायतः।।**

याचा अर्थ असा आहे की, त्या विराट पुरुषाच्या मुखापासून ब्राम्हण, बाहूपासून क्षत्रिय, मांडीपासून वैश्य आणि पायापासून शूद्र निर्माण झाले.[३३]

आर्यांनी भारतात प्रवेश करुन अनार्यांचा पराभव केला. ते अनार्यांना शुद्र (दस्य) समजू लागले आणि स्वतःला श्रेष्ठ समजू लागले. आर्यामध्ये गुणकर्मानुसार ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य असे वर्ण पडले. व्यवसाय बदलला की वर्ण बदलत असे. परंतु कालांतराने वर्णबंधने कडक होऊन ब्राम्हण वर्ण सोडणे किंवा स्वीकारणे कठीण झाले. परिणामी ब्राम्हण वर्णास जातीचे स्वरुप आले.

जाती वाढण्याची कारणे [३४]

| धार्मिक कारणे | सामाजिक कारणे | आर्थिक कारणे | राजकीय कारणे | भौगोलिक कारणे |
|---|---|---|---|---|
| १.ब्राम्हण | १. अनार्य संगती | १. व्यवसाय | १. सत्ताधीश | १. प्रदेश भेद |
| २.संस्कार | २. आंतरजातीय विवाह | २.आर्थिक विषमता | २. परकीय आक्रमक | २. स्थानांतर |
| ३.कडक जातिबंधने | ३. आहार | | | |
| ४.धर्मपंथ | ४. वर्णाश्रम | | | |
| | ५. अस्पृश्यता | | | |

मा.म.देशमुख (प्र.आ.१९६७,तृ.आ.१९९८) यांनी आपल्या 'प्राचीन भारताचा इतिहास' या ग्रंथात जातिसंस्था वाढण्याची कारणे स्पष्ट केली आहेत ती योग्य वाटतात.

सामान्यपणे जात ही वेगवेगळया उपविभागामध्ये विभागणी करण्यात आली आहे. एका पोटजातीच्या सभासदाने त्याच पोटजातीच्या सभासदाशी लग्न करावे. जातीपेक्षा पोटजातीला महत्त्व कमी आहे. यांच्या मते, उच्च जातींना वेगळे करण्यात आले आहे. त्यांना

Hypergamy असे म्हणतात. उदा. मनुमध्ये कॅडल (IV६१), विष्णू (Dhs-३६) यज (I२७३), ब्रहदयामा (III२६०), मनु २७९ मध्ये या शब्दाचा वापर केला आहे. स्मृतीमध्ये अंत्यजाचे वेगवेगळे उपविभाग दिसून येतात. अत्री १९९ मध्ये सात अत्यंजाचे विश्लेषण केले आहे. त्यामध्ये रजका (परीट), कर्मकारा (कातडीचे कामगार), नट (नर्तक-नर्तिका) कोल्हांटींचे प्रतिनिधीत्व करते. बुरुडा (बांबूचे काम करणारे), कैवरता(मासे पकडणारे),मेदा, भिल्ला इ. वेद व्यास स्मृतीने (१२-१३) मध्ये १२ जातींचे विश्लेषण केले आहे. ते अंत्यजा नावाने ओळखले जाते.[३५]

या संदर्भावरुन लक्षात येते की, शकुंतला देवी (प्र.आ.१९९९) यांनी मनू या प्राचीन ग्रंथातील विचार घेऊन मनू या प्राचीन ग्रंथामध्ये उच्च जातींना वेगळे व खालच्या जातींना वेगळे स्थान होते असा निर्देश केला आहे. जात निर्मितीच्या ईश्वरीय कल्पनेचा मानवावर भावनिक हल्ला झालेला दिसतो.

**१.५.१ जात व जमाती मधील संबंध-**

निरंजन रे (प्र.आ.१९७२, पुर्नमुद्रण १९८६) यांनी K.S. Singh यांच्या The Tribal Situation In India या ग्रंथातील प्रस्तावनेत पुढील जात व जमाती संदर्भात मत मांडले.

[VII] " सुरुवातीला १८ व्या शतकातील भारताविषयी लिखाणात caste आणि tribe (जात व जमात) यासंकल्पना (संज्ञा) बऱ्याचदा समानार्थी वापरलेल्या आढळतात. परंतु नंतर बराच काळ या संज्ञा समानार्थी नाही तर सजातीय पध्दतीने वापरलेल्या दिसतात".[३६] म्हणजेच जात व जमाती या १८व्या शतकात एकाच रुपाने उल्लेखल्या व वर्णिल्या जात होत्या.

**निरंजन रे (प्र. आ. १९७२, पुर्नमुद्रण १९८६)**

यांनी पुढे caste आणि tribe या समानार्थी वापरल्या जाणाऱ्या संज्ञांपैकी या संज्ञेचा उगम पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

---

[VII] (First in eighteen century writings on India the term caste has often been used synonymously with 'tribe' & later. For a long time, not synonymously but in a cognate manner as in the phrase caste & tribes, as if they were wgnate social group.)

[VIII] "आपण या संज्ञा आणि संकल्पनेच्या इतिहासात डोकवूया. लॅटिन भाषेतील मूळ असणाऱ्या या शब्दाचा मध्यकालीन इंग्लीश मध्ये म्हणजे प्रारंभिक रोमन ज्या तीन शाखांमध्ये विभागले होते ते आधुनिक इंग्रजी मध्ये उत्क्रांत झाले. रोमन लोकांसाठी एक प्रकारची राजकीय विभागणी होती तर ग्रीकांमध्ये भौगोलिक विभागानुसार बंधुत्व या अर्थाशी निगडित होते. तर आयरिश इतिहासात एकाच आडनावाच्या व्यक्तिंचे कुटुंब किंवा समुदाय असा त्याचा अर्थ होतो. इतिहासाच्या वेगवेगळया कालखंडात युरोपातील विविध भागांत एखादया कुटुंब किंवा समुदायाला दिलेला प्रदेश किंवा भाग असाही अर्थ लावला जातो. परंतु ऑक्सफर्ड डिक्शनरीच्या अलीकडील प्रतीनुसार आजच्या मानववंश शास्त्रज्ञ आणि सामाजिक शास्त्रज्ञांच्या मतानुसार "Tribe" म्हणजे रानटी किंवा आदिम स्वरुपाचे जीवन जगणारा एका नेत्याच्या नेतृत्वाखाली राहणारा समुदाय."[३७]

निरंजन रे यांनी K. S. Singh (प्र. आ. १९७२, पुर्नमुद्रण १९८६) या ग्रंथातील प्रस्तावनेत Tribes या शब्दाचा उगम व अर्थ स्पष्ट केलेला दिसतो. त्यांनी भौगोलिक भिन्नतेतून Tribes (जमाती) निर्मिती झाल्याचे स्पष्ट केले आहे.

**१.५.२. जातीची वैशिष्टये–**

सामाजिक स्तरीकरणाची व्यवस्था म्हणून हिंदू समाजाचे वेगळेपण म्हणून जात ही जन्मावर आधारित असल्याचे वरील पर्यंतच्या व्याख्या व विश्लेषणावरुन समजते. असेच इरावती कर्वे (प्र. आ. १९७५) यांनी जातीची वैशिष्टये पुढीलप्रमाणे मांडलेली आहेत.

१. जाती हे आतल्या आत विवाह म्हणजे अंतर्विवाह करणारे समूह आहेत.

२. जाती काही मर्यादित क्षेत्रांत पसरलेल्या असतात.

३. जातींचे काही पारंपारिक आचार असतात. त्यांच्या अंमलबजावणीकरीता पुष्कळ जातींमध्ये

---

[VIII] (Let me turn to the history of the term & concept ' tribe' Derived from Latin root, the middle English term 'tribuz' meaning the three divisions into which the early Romans, were grouped come to evolve into the modern English 'tribe'. With the Romans the 'tribe' was a political division while the Greeks seem to have equated it somewhat with their 'fraternities' at times with geographical divisions at others. In Irish history however the term meant families or communities of person having the same surnames. In certain other areas of the western world & certain periods of history it stood for a division of territory allotted to a family or community. Today with the anthropologists & sociologists of western origin the term means according to latest edition of 'oxford dictionary' "a race of people-now applied especially to a primary aggregate of people in a primitive or barbarous condition, under ahead men of chief".

वडीलधाऱ्या मंडळींची एक समिती असते. जात पंचायत इ.

४. निरनिराळ्या जाती एकमेकांत न मिसळता शेजारी शेजारी राहतात. फक्त काही विशिष्ट प्रसंगीच त्यांचा परस्परांशी संबंध येतो. जातीजातीतील संबंध फक्त बाह्यस्पर्शी व वरवरचा असा असतो.

५. प्रत्येक जातीचा बहूधा एक पारंपारिक धंदा असतो पण तो धंदा इतर जातीही करु शकतात.

६. उच्चनीचत्वाच्या पायावर जातींचा एक अनुक्रम असतो.[३८]

इरावती कर्वे (प्र.आ.१९७५) यांनी या प्रमुख वैशिष्टयांच्या आधारे समाजात आचार विचारांच्या विविधतेचे कारण जातिसंस्था मानले असून वरील जातीची वैशिष्टये स्पष्ट करताना एक भाषीय प्रांत म्हणून महाराष्ट्राचा विचार केला असून महाराष्ट्रातील जातिसंस्थेची प्रमुख तत्वे सर्व ठिकाणच्या जातींना लागू पडतात असे प्रतिपादन केले आहे.

गोविंद घुर्ये या भारतीय समाज शास्त्रज्ञाने भारतीय समाजाचा शास्त्रीय दृष्टीकोनातून जो विविधांगी अभ्यास केला त्यातील एक अंग म्हणजे भारतातील जाती व्यवस्था होय. त्यांनी आपल्या Caste & Race in India (F.P.1932) आणि Caste & Class in India (F.P.1950) या दोन ग्रंथात जातीचा उगम, जातीची वैशिष्टये, जाती-उपजातीतील गतिमान, आधुनिक समाजातील जाती, मागासवर्गीय जाती इ. बाबींवर सविस्तर चर्चा केली आहे. ते म्हणतात.

घुर्ये (प्र.आ.१९३२) यांच्या मते, [IX] "जेव्हा एखादा विदेशी पर्यटक भारताला भेट देतो तेव्हा तो येथील जातिव्यवस्था बघून स्तंभित होतो. त्याला या व्यवस्थेच्या कार्यप्रणालीची पूर्ण कल्पना येणार नाही. परंतु त्याला भारतीय समाज जातिव्यवस्थेत विभागलेला आहे त्याचबरोबर त्यात अनेकविध मान-सन्मान आणि सामाजिक व्यवहाराचे स्तर जातीय वर्तुळातच राहिले असे स्पष्ट होते".[३९]

अशाप्रकारे वरीलप्रमाणे घुर्ये (प्र.आ.१९३२)जाती व्यवस्थेसंबंधी मत व्यक्त करतात.

---

[IX] "A foreign visitor to India is struck by the phenomenon known as the caste system. He may not understand the full working of the system but he is aware of the fact that Hindu society is divided into groups known as castes, with varying degrees of respectability & circles of social intercourse".

## १.६. जातिव्यवस्थेचे अर्थकारण –

“साधारणत : पाटील, कुलकर्णी सोडून चौगुला, महार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, सोनार, जोशी, परीट, गुरव, कोळी हयांना बारा कारु किंवा बलुतंदार म्हणतात. तेली, तांबोळी, साळी, सनगर, शिंपी, माळी, गोंधळी, डौप्या, भाट, ठाकर, गोसावी, जंगम, मुलाना, वाजंत्री, घडसी, कलावंत, तराल किंवा कोरबु, भोई वगैरेंना आठरा नारु किंवा आलुतदार असे म्हणतात”.[४०]

त्रिं. ना. आत्रे (प्र.आ.१९१५, पुर्नमुद्रण १९९५) यांनी ‘गावगाडा’ या ग्रंथात कारु व नारु किंवा बलुतदार व आलुतदार अशी विविध जातींची विभागणी त्याकाळी असल्याचे सांगितले. त्याचबरोबर बी. एन. सरदेसाई (प्र.आ.२००१) यांनी जातिव्यवस्थेच्या मुळाशी आर्थिक कारणे जबाबदार असल्याचे मराठयांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास यात सांगितले. त्यांच्या मते, “आर्थिक कारणे प्रामुख्याने बलुतेदारी पध्दतीशी निगडित आहेत. प्रत्येक बलुता हे वतन असे”.[४१] बलुतेदार वतनांचा निर्देश दिसतो. तसेच अत्रे १८ नारुमध्ये कलावंत म्हणजेच कोल्हाटी जमातीचा समावेश करतात.

इरावती कर्वे (प्र.आ.१९७५) यांच्यामते “जातीसंस्था प्राचीन कालापासून आर्य लोक येण्यापूर्वी पासून अस्तित्वात होती. ज्यांनी वेद भारतात आणले त्या समाजात वर्णसंस्था असली पाहिजे आणि ती आर्य लोकांची खास स्वतःची असावी”.

यानंतर लेखिकेच्या मते वर्णव्यवस्था बदलून जातींची सांधेजोड होऊन समाजामध्ये एक गुंतागुंतीची समाजव्यवस्था निर्माण झाली. कर्वे (प्र.आ.१९७५) यांनी जातीच्या उत्पत्तीचे काही निष्कर्ष पुढीलप्रमाणे मांडले आहे.

१. हिंदू समाजाचा महत्वाचा घटक जात आहे.
२. जात हा अंतर्विवाह करणारा समूह असून ती मर्यादित क्षेत्रात राहते.
३. अंतर्विवाहामुळे जातीतील सर्व लोक एकमेकांचे रक्ताचे (सगे) किंवा विवाहाने झालेले सोयरे नातेवाईक असतात. [४२]

वरील निष्कर्षानुसार त्यांनी जातीला विस्तृत कुटुंब म्हटले आहे असे वाटते.

### १.६.१. शिवकालीन अर्थव्यवस्था व जातिव्यवस्था–

१७वे शतक म्हणजे शिवकालीन व १८वे शतक म्हणजे पेशवेकालीन शतक. यामधील आर्थिक पध्दतींचा विचार केला असता असे दिसते की, अनेक शिवकालीन काव्यग्रंथात कारागिरांचा उल्लेख केलेला आहे. अशा कारागिरांमध्ये पखवानी, टाळकरी, विणेकरी, किर्तनकार, गायक, गारुडी, नर्तिका इ. चा. समावेश होत असे. इतकेच नव्हे तर तांबोळी, कलाल, कासार, गंधी मूर्तीविके इ. व्यावसायिकांचाही समावेश होत असे.[४३]

यावरुन स्पष्ट होते की, व्यावसायाचा मुख्य आधार जात हा आहे. बी. एन. सरदेसाई (प्र.आ.२००१) पुढे जाऊन त्याचे समर्थन करताना म्हणतात की, ‘‘व्यवसाय निश्चितीमुळे प्रत्येकाला समाजामध्ये निश्चित स्थान आणि संरक्षण प्राप्त होत असे’’.[४४] म्हणजेच शिवकालीन व पेशवेकालीन काळात व्यवसायवार जाती व्यवस्थेमुळे प्रत्येकाचे विशिष्ट स्थान व दर्जा ठरलेला होता आणि मानव सुरक्षिततेसाठी जाती उपयुक्त मानल्या जात होत्या.

### १.६.२. गावगाडा, फिरस्त्यांमधून वतनदारांची निर्मिती–

‘‘वतनदारांच्या गावसंबंधाच्या परस्पर व्यवहाराला आणि वतनदारांच्या जगद्व्यापी जाळयात गुरफटलेल्या गावच्या सामाईक अंतर्बाहय व्यवहाराला ‘गावगाडा’ असे म्हणतात’’.[४५]

त्रिं. ना. आत्रे (प्र.आ.१९१५, पुर्नमुद्रण १९९५) यांनी आपल्या ‘गावगाडा’ या ग्रंथात वरील व्याख्या स्पष्ट केलेली आहे. वतन व वतनदार या संज्ञांचा अर्थ ते पुढीलप्रमाणे सांगतात.

‘वतन’ हा शब्द वर्तन (उपजिविकेचे साधन) या संस्कृत शब्दापासून निघाला. राहण्याच्या जागेला अरबी भाषेत ‘वतन’ म्हणतात. उदा. जातधंदा, चाकरी, नेमणूक, उत्पन्न, अधिकार, मानपान, हक्क, वडिलोपार्जित मिळकत, स्थावर अगर जंगम मालमत्ता, जन्मभूमी इ. वतन धारण करणारा वतनदार होय.[४६]

पुढे जाऊन आत्रेंनी वतन पध्दती म्हणजे काय? यावर प्रकाश टाकला आहे. ‘‘सरकारच्या सार्वजनिक नोकरीच्या मोबदल्याबद्दल जमिनीचे उत्पन्न तोडून देण्याची जी ही योजना निघाली ती सर्व प्रकारची सार्वजनिक नोकरीच काय पण वैदयकी, गायन, नर्तनाप्रमाणे थेट निव्वळ खाजगी नोकरी व भीकमाग्या दरवेसपणापर्यंत पांगली हिलाच ‘वतनपध्दती’ म्हणतात’’.[४७]

विविध जाती जातींच्या जनतेकडून राजाकडून राज्यव्यवस्थेत तर धर्माध्यक्षाकडून धर्मव्यवस्थेत या वतनपध्दतीला पाठिंबा मिळाला असे अत्रे सांगतात.

## १.७. शुद्रांची अवहेलना धर्मग्रंथापासूनच–

अनेक समाजसुधारकांनी धर्मग्रंथ, वेद, पुराणे ही केवळ शुद्र वर्णियांना गाळात रुतवण्यासाठीच होती असे मानून त्याबद्दल प्रखर विरोध केलेला दिसतो. अनेक दाखले व पुराव्यानिशी महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या समाजसुधारकांनी आपल्या लेखनातून तसेच कृतीतून ते सिध्द केलेले दिसते.

धनंजय कीर (प्र.आ.१८८९, पुर्नमुद्रण १९३८) यांनी 'महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक' या चरित्र ग्रंथात ते म्हणतात, "वेद हे ईश्वरनिर्मित नसून ते मानवनिर्मित आहेत वेद म्हणजे भेद"[४८] असे जोतीरावांचे ठाम मत होते. जोतीराव फुलेंच्या या मतावरुन त्यांनी वेद, धर्मग्रंथ याबद्दल असणारी चीड व्यक्त केली आहे.

नागनाथ कोत्तापल्ले (प्र.आ.२०००) यांनी आपल्या 'जोतीपर्व' या ग्रंथामध्ये जातीची मानसिकता स्पष्ट केली आहे. ते म्हणतात, "जातीयता प्रत्यक्ष असण्यापेक्षा ती एक मानसिकता आहे. एखादयास भुताने झपाटलेले असावे पण नेमके काय झाले ते सांगता येऊ नये तशी काहीशी अवस्था या मानसिकतेची असते असे म्हणावे लागेल".[४९]

नागनाथ कोत्तापल्ले (प्र.आ.२०००) यांनी हा दृष्टांत जातीची मानसिकता स्पष्ट करण्यासाठी मांडलेला दिसतो. त्यांनी या ग्रंथामध्ये धर्मग्रंथांमुळे जातीची मानसिकता वाढल्याचे स्पष्ट केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर (प्र.आ.१९३६) यांनी प्रारंभी भाषण म्हणून लिहिलेल्या व नंतर प्रकाशित केलेल्या ग्रंथात 'Anihilation of caste' या ग्रंथात वेद व शास्त्रांबद्दल प्रखर टिका केली असताना ते म्हणतात.

[x] "जर तुम्हांला व्यवस्थेला आव्हान देण्याची उर्मी असेल तर तुम्ही वेद आणि शास्त्राला सुरुंग लावण्यास विसरता कामा नये. कारण वेद व शास्त्रे नैतिकतेचा भाग नाहीत.

---

[x] You must not forget that if you wish to bring about a breach in the system then you got to have apply the dynamite to the Vedas & the shastras which deny any part to morality, you must destroy the religion of shrutis & the smritis nothing else will avail. This is may considered view of the matter.

तुम्ही श्रुती आणि स्मृतीनिर्मित धर्म नष्ट केल्यास काहीच शिल्लक राहणार नाही. हा माझा विचाराधिष्ठित दृष्टीकोण आहे".[५०]

विवेक व नीतीचा ध्यास घेतलेल्या वेद व शास्त्रांचा तसेच श्रृती–स्मृतीच्या धर्माचा प्रथम विध्वंस केला पाहिजे. याशिवाय दुसरा मार्ग नाही असे मत आंबेडकर वरीलप्रमाणे मांडतात.

गंगाधर पानतावणे (प्र. आ. १९८७) यांच्या 'पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथात पानतावणे लिहितात की, "त्रैवर्णिकांची सेवा करण्यानेच शुद्रांना व अतिशूद्रांना मरणोत्तर सद्गती मिळेल असे धूर्त शास्त्रकारांनी लिहून ठेवले आहे. याचा अर्थ असा की, तुम्ही जिवंत असता आमच्या गुलामगिरीत राहा. नरकवास भोगा म्हणजे मेल्यावर तुम्हाला स्वर्ग प्राप्त होईल".[५१]

यावरुन धर्मग्रंथांनी शुद्रांना केवळ तीन वर्णीयांची सेवा व चाकरी करण्याचे आदेश दिले होते हे लक्षात येते. तसेच फुले व आंबेडकर या दोघांच्या धर्मग्रंथाच्या मान्यतेला विरोध दिसतो.

मुक्ता साळवे (फेब्रुवारी १८५५) या मांग समाजाच्या १४ वर्षाच्या मुलीने मांग व महारांच्या पतनास प्रामुख्याने जबाबदार असलेल्या वेद ग्रंथावर व त्यांच्या निर्मितीवर जोरदार टिकात्मक निबंध लिहिलेला आहे. तो ज्ञानोदय(मार्च २००४) या नियतकालिकामध्ये प्रसिध्द झाला. या निबंधामुळे मुक्ता आपली व्यथा व्यक्त करताना म्हणते की, "जर वेद ब्राम्हणासाठी आहे तर वेदाप्रमाणे वर्तणूक करणे हा ब्राम्हणांचा धर्म होय. जर आम्हास धर्मसंबंधी पुस्तके पाहण्याची मोकळीक नाही तर आम्ही धर्मरहित आहे असे साफ दिसते की नाही बरे"! [५२]

१४ वर्षीय मुक्ता आपल्या निबंधात वेद व धर्मग्रंथांनी तिच्या कुटुंबीयांवर केलेला अन्याय व अत्याचार स्पष्ट करते. त्याकाळी असणारा वेदांचा पगडा मानवी स्वातंत्र्यावर कसा हल्ला करत असावा याची कल्पना येते.

वरील विवेचनावरुन असे लक्षात येते की, स्वतःची जात उच्च, श्रेष्ठ राहावी याकरिता ब्राम्हणांनी खोटे धर्मग्रंथ लिहून जातीभेद, उच्च नीचता जोपासून ठेवली होती.

नाना ढाकूलकर (प्र.आ.२०००) यांच्या मते, "दुसऱ्या तिसऱ्या शतकाच्या सुमारास मनूस्मृती, विष्णूस्मृती, याज्ञवल्कस्मृती निर्माण झाल्या. जन्मावरुन वर्ण जाती निश्चित

झाल्यामुळे बौध्दिक गुणवत्ता, धार्मिक आचरण यांचे महत्व कमी झाले. परंतु वर्ण जातीची बंधने घट्ट ठेवण्याकरिता वरिष्ठ वर्णिकांनी अनेकानेक ग्रंथ लिहून खालच्या वर्णिकांवर लादले. धर्मग्रंथ वाचण्याचा अधिकार ब्राम्हणाखेरीज इतर वर्णास नसल्यामुळे ब्राम्हण सांगतील तोच धर्म व तीच राजाज्ञा रुढ झाली''.[५३]

नानांच्या या मतामधून वरीलप्रमाणे त्यांनी धर्मग्रंथांच्या निर्मितीचा उद्देश स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यामते चतुर्थवर्णियांना बंधनात अडकविण्यासाठी ब्राम्हणांचा हा प्रयत्न होता. भारतातील कायदा हा प्रामुख्याने धर्मसूत्रे व स्मृतिग्रंथ यावरच आधारलेला होता. इ. स. पू. ६वे शतक ते इ. स. ३रे शतक या कालखंडात धर्मसूत्रे रचली गेली.

| | | | |
|---|---|---|---|
| धर्मसूत्र– | १. गौतमधर्मसूत्र | २. बौध्दायन धर्मसूत्र | ३. अपस्तंभ धर्मसूत्र |
| | ४. वसिष्ठ धर्मसूत्र | ५. हिरण्यकेशी धर्मसूत्र | |
| स्मृतीग्रंथ – | १. मनूस्मृती | २. विष्णूस्मृती | ३. नारदस्मृती |
| | ४. पारशरस्मृती | ५. बृहस्पतीस्मृती | ६. याज्ञवलक्यस्मृती[५४] |

वरील धर्मसूत्र व स्मृतिग्रंथामध्ये चालिरीती, नियम व शासन यांचा ऊहापोह आहे.

आ. ह. साळुंखे (प्र.आ.१९९८) यांनी एका माणसाला दुसऱ्या माणसाच्या तिरस्काराचा बळी बनवणाऱ्या या प्रथेचे धर्मसूत्रांमध्ये आढळणारे काही आधार आपल्या 'वैदिक धर्मसूत्रे आणि बहुजनांची गुलामगिरी' या ग्रंथात तपासून पाहिले आहेत. त्यांच्यामते, शास्त्रकार अनुलोम संकराविषयी नापसंती दाखवत असले तरी ते मागच्या दाराने का होईना त्याला संमती देतातच कारण स्त्री ही उपभोग्य आहे ही धारणा एकीकडून त्यांच्या मनात असते तर दुसरीकडून उच्च वर्णातील पुरुषांना हीन वर्गातील स्त्रीयांचा भोग मिळावा अशी सोयही पहायची असते असे पुढील विवेचनातून दिसते.

अपस्तंब म्हणतो, ''शुद्राने धार्मिक आर्याची निंदा केली तर त्या शुद्राची जीभ छाटावी''.[५५]

गौतम म्हणतो, ''ब्राम्हणाने शुद्राची निंदा केली तर ब्राम्हणाला किंचितही दंड करु नये''.[५६]

शास्त्रवचने ही पूर्णपणे शुद्रांच्या विरोधात असल्याचे दिसते. बौधायनाने धर्मग्रंथात म्हटले आहे, “ब्राम्हण चारही वर्णातील स्त्रियांना भार्या करु शकतो”.[५७]

वसिष्ठांच्या मते, “कृष्ण वर्णाची जी रमणी असते ती फक्त भोगण्यासाठीच असते. धर्मासाठी नसते”.[५८]

यावरुन असे स्पष्ट होते बौध्दयानाने ब्राम्हणाला चारही वर्णातील स्त्रिया भार्या (पत्नी) करता येतील, क्षत्रियाला खालच्या तीनही वर्णातील स्त्रिया भार्या (पत्नी) म्हणून स्वीकार करता येईल तर वैश्याला वैश्य व शुद्र या वर्णातील स्त्रिचा पत्नी म्हणून स्वीकार करता येईल परंतु शुद्राला शुद्र स्त्रीचाच स्वीकार करण्याचा नियम मांडला होता. वरील संदर्भावरुन शुद्र स्त्री व शुद्र व्यक्तिसाठी आणि केवळ त्यांच्याचसाठी अनेक जाचक नियमांची निर्मिती केलेली दिसून येते म्हणूनच ब्राम्हण वर्गांने वर्षानुवर्षे लेखनी ही स्वतःच्याच हातात ठेवली. शुद्रांचे धर्म व वर्णाच्या आधारे शोषण केले. या ब्राम्हणांनी धर्म ग्रंथांची रचना सोईसाठी केलेली दिसते. वसिष्ठ हा अत्यंत वैचारिक अंधत्व असलेला दिसतो.

## १.८. भटका – शब्दाचा अर्थ व व्याख्या –

‘भटक्या जमाती’ या नावावरुनच अर्थ स्पष्ट होतो. एका जागी स्थिर,स्थायिक नसलेल्या जमातींचा यात समावेश होतो. समाज या घटकात पूर्वीच्या संदर्भानुसार मानव टोळया/समूह करुन राहत असे व उपजिविकेसाठी निश्चित साधन नसल्याने भटकत असे. कालांतराने काहींनी निश्चित साधन शोधले व ज्यांना मिळाले नाही ते कायम भटकत व उपेक्षित राहिले.

### १.८.१. अर्थ –

मराठी विश्वकोष खंड–१२ (प्र.आ.१९८५) मध्ये भटके याचा अर्थ “उदरनिर्वाहाकरिता निवडलेल्या अथवा वाटयास आलेल्या व्यावसायानिमित्त अगर उदरनिर्वाहाच्या साधनांच्या शोधार्थ भटकत राहणाऱ्या लोकांना भटके असे म्हणतात”. इंग्रजीत त्यांचा उल्लेख “नोमॅड्स” असा करतात. नोमॅड हा शब्द नोमी किंवा नेमो (गुरे चारणे) या ग्रीक शब्दापासून तयार झालेला आहे. अशाप्रकारे भटका या शब्दाचा अर्थ स्पष्ट केला आहे.

### १.८.२. संकल्पना व व्याख्या[५९] –

#### १. ना. धो. कदम–(२०१३)

नाव सांगायला स्वतःचे गाव नाही राहायला घर नाही. त्यामुळे उपेक्षित जगणे नशीबी आल्यामुळे पोटासाठी गावोगाव भटकत असलेला आणि भिक्षेवर जगणारा, परंपरागत कलेच्या आधाराने स्वतःची उपजिविका करणारा लोकसमूह महाराष्ट्रात वेगवेगळया जाती जमातींच्या नावाने जीवन जगताना आढळतो या समूहाला भटके असे म्हणतात.

#### २. राठोड मोतीराज–

'भटका' हा शब्द छोर या ग्रीक शब्दापासून तयार झाला आहे. त्याचा अर्थ चारणे असा होतो. गवताळ प्रदेशात गुरे–ढोरे पाळणारे चाऱ्याच्या शोधार्थ भटकत असतात. यावरुन भटका म्हणजे एका ठिकाणी न थांबणारा असा होतो.

#### ३. रामनाथ चव्हाण–

अत्यंत क्षुल्लक व्यापाराच्या निमित्ताने गावोगावी भटकत असलेला आणि भिक्षा मागून किंवा काही पारंपारिक कलेल्या आधारे उपजिविका करणारा लोक समूह महाराष्ट्रात वेगवेगळया जाती जमातींच्या नावाने जीवन जगताना आढळतो. अशा या समूहाला भटके विमुक्त असे म्हटले आहे.

आर. जी. दांडगे (प्र. आ. २००२, पुर्नमुद्रण २०१४) यांनी वरील सर्व तज्ञ अभ्यासकांच्या व्याख्या आपला ग्रंथ 'भटक्या विमुक्तांचे प्रश्न व उपाय' मध्ये मांडलेल्या दिसतात. त्यापैकी कदम यांनी विस्तृत, सोपी, सरळ व्याख्या भटक्या जमातीची केलेली दिसते. तर मोतीराज राठोड यांनी त्यामध्ये गवताळ प्रदेशातील पशुपालकांचा समावेश केलेला आहे. अशाच प्रकारचे उल्लेख रामनाथ चव्हाण यांनीही केलेले दिसतात. वरील लेखकांच्या व्याख्या पाहता असे निश्चितपणे म्हणता येईल की, उपजिविकेसाठी सतत गावोगावी भटकत राहण्याची परंपरा असलेल्या या जमाती आहेत.

महाराष्ट्राला विचारवंतांचा उज्वल वारसा आणि परंपरा आहे. राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदर्श मानून भटक्या विमुक्तांच्या संदर्भात मूलगामी वैचारिक लेखन करणारे अनेकविध विचारवंत आहेत. त्यामध्ये लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, डॉ. नारायण भोसले, ना. धो. कदम, भिमराव चव्हाण, भिमराव गस्ती, पंढरीनाथ

पाटील, रामनाथ पाटील, रामनाथ चव्हाण, शंकरराव खरात, के. ओ. गिऱ्हे, जनाबाई गिऱ्हे, लीनकुमार बावने, मोतीराज राठोड, उत्तम कांबळे, रामचंद्र नलावडे, किशोर शांताबाई काळे, वैजनाथ कळसे, भास्कर भोसले, प्रभाकर मांडे, बाळकृष्ण रेणके, बळवंत कांबळे इत्यादी सामाजिक विचारवंतांचा समावेश होतो.

### १.८.३. भटक्या व विमुक्त जाती स्वरुप –

भटक्या व विमुक्त जाती जमातींची यादी अधिकृत व विश्वसनीय मिळत असेल परंतु त्यांची संख्येची नोंद वेगवेगळी असल्याचे अभ्यासामध्ये दिसून आले ते पुढीलप्रमाणे–

गुन्हेगारी प्रवृत्तीचा उगम आर्यकाळात झाला असला तरी हया प्रवृत्तीचा विकास १३ व्या शतकात झाला. १७५७ मध्ये प्लासीची लढाई होऊन कंपनी सरकार संपुष्टात आले. शे–सव्वाशे वर्षाचा काळ उलटून गेला परंतु गुन्हेगारीला आळा बसला नाही. यावेळी शासनाने खास चौकशी करुन १८७१ मध्ये गुन्हेगारी कायदा देशात लागू केला. या कायद्याने देशातील ४२ जाती गुन्हेगार, ठरविल्या. लोकांना सुरक्षित राहता यावे, गुन्हेगारांना वठणीवर आणण्यासाठी सरकारने गुन्हेगार कायद्याचा आधार घेऊन ४२ जाती जमातीपैकी १४ जातींच्या लोकांना पुणे, बारामती, औरंगाबाद, जेजूरी, सोलापूर, चिंचवड इ. ठिकाणी वसाहती स्थापन करुन तारेच्या कुंपणात बंदिस्त केले. या १४ जाती पुढीलप्रमाणे–

१) बेरड, २) बेस्तर, ३) भामटा, ४) कैकाडी, ५) कंजारभाट, ६) काटाबू, ७) बंजारा,
८) पारधी, ९) राजपारधी, १०) राजपूत भामटा, ११) रामोशी, १२) वडार, १३) वाघरी,
१४) छप्पर बंद [६०]

१९२४ मध्ये त्या जाती जमातीसाठी सेटलमेंट कायदा करण्यात आला. या कायदयान्वये ५२ केंद्रे उघडण्यात आली. सर्व केंद्र रेल्वे स्टेशन असणाऱ्या गावीच उघडली गेली. या गावाच्या केंद्रामध्ये गुन्हेगार जातीच्या टोळया पकडून सेटलमेंट स्थापन करुन बंदिस्त ठेवले. काटेरी तारेच्या कुंपणात झोपडया बांधून त्यांच्या बायका मुलांसह त्यांना कोंडून ठेवले[६१].

वरीलप्रमाणे १८७१ चा गुन्हेगार जमाती कायदा व १९२४ चा सेटलमेंट कायदा राबवून घेण्याला शासन जबाबदार असल्यामुळे भटक्या विमुक्तांच्या वाटयाला शासनाकडूनही उपेक्षाच आलेली दिसते.

१९६० मध्ये भटक्या विमुक्तांचे देशपातळीवरील सोलापूरला अधिवेशन झाले. १९६० पासून ते १९८९ पर्यंत म्हणजेच भटक्या विमुक्तांच्या दुसऱ्या अधिवेशनापर्यंत अनेक घडामोडी झाल्या. त्यांचे वर्णन ना. धो. कदम (प्र. आ. १९९५, पुर्नमुद्रण २०१३) यांनी आपल्या ''महाराष्ट्रातील भटका समाज संस्कृती व साहित्य'' या ग्रंथात केलेले दिसते. कदम यांच्या या ग्रंथातून भटक्या व विमुक्त जमातींना इंग्रज सरकारने वेगवेगळया वसाहतीत कोंडून व बंदिस्त ठेवले. त्यामुळे त्या समाजाच्या मुख्य प्रवासापासून कशा अलग झाल्या याची कल्पना येते.

''महात्मा फुले नगर (सेटलमेंट) सोलापूर, दि. ३१–३–१९८९ पंडित नेहरुंनी भटक्या विमुक्तांना ब्रिटिशांच्या तारेच्या कुंपणातून मुक्त केले''.[६२]

यानंतर हा भटका समाज तारेच्या कुंपणाचे बंदिस्त बंधने तोडून भटकंतीचे जीवन जगू लागल्याचे दिसते.

''१९३१ च्या जातवार सेन्सस प्रमाणे पूर्वीच्या बेचाळीस जमातींची लोकसंख्या ८० लाख होती. यामध्ये धनगर समाजाचा समावेश केल्यानंतर आकडेवारी ८० लाखांनी वाढून दीड कोटी झाली आहे''.[६३]

लक्ष्मण माने (प्र.आ.२००३, पुर्नमुद्रण २००३) यांनी ''भटक्यांचे भारुड'' या विधान परिषदेतील निवडक भाषणांचा लेखसंग्रह प्रकाशित केला. यामध्ये ते म्हणतात की, ''या जमातींना १९५० साली स्वातंत्र्य मिळाले. संसदेमध्ये गुन्हेगार जमाती कायदा रद्द करण्यात आला व त्याचे रुपांतर (हॅबिच्युअर ऑफेंडर्स ॲक्ट) सराईत गुन्हेगार कायदा असे करण्यात आले''.[६४]

रामनाथ चव्हाण (प्र.आ.१९८९, चौ.आ.२०१४) यांनी आपल्या ''भटक्या विमुक्तांचे अंतरंग'' या ग्रंथात भटक्यांचे स्वरुप स्पष्ट करताना ते सांगतात, ''इंग्रजांनी १८७१ साली गुन्हेगारी जमाती कायदा निर्माण केला. हा कायदा तब्बल ८१ वर्ष अस्तित्वात होता. या कायदयाखाली १९८ जमाती गुन्हेगार जमाती म्हणून जाहीर करण्यात आल्या. त्या काळात त्यांना ५२ सेटलमेंट निर्माण करुन डांबण्यात आले. त्यानंतर १९५२ साली भारत सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हा कायदा रद्द केला आणि तीन तारेच्या कुंपणात बंदिस्त केलेल्या १९८

जमाती विमुक्त करण्यात आल्या. या जमातीनांच स्वातंत्र्योत्तर काळात विमुक्त जमाती या नावाने ओळखले जाते".[६५]

विनायक लष्कर (प्र.आ.२००२,द्वि.आ.२०१४) यांनी आपल्या सामाजिक वर्जितता आणि महाराष्ट्रातील भटके–विमुक्त या संशोधनपर लेखामध्ये भटके–विमुक्त यांची वर्गवार यादी दिलेली आहे. ती पुढीलप्रमाणे

"महाराष्ट्र शासनाने या सर्व जाती–जमातींची पहाणी करुन एक वर्गवार यादी तयार केली आहे. यामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमाती असे दोन प्रकार आहेत. विमुक्त जातीमध्ये बेरड, बस्तर, भामटा, कैकाडी, कंजारभाट, बंजारा, लमाण, फासेपारधी, रजपूत, भामटा, वडार, वाघरी, रामोशी, राजपारधी इ. चा समावेश होतो. तर भटक्या जमातींमध्ये बाबा बैरागी, बेलदार, भराडी, भुतते, चलवादी, चित्रकथी, घिसाडी, गोपाळ, हेळवे, जोशी, काशीकापडी, कोल्हाटी, नंदीवाले, गवळ, सिकलगार, टकारी, वासुदेव भोई, ओतारी, ठेलारी, इ.चा समावेश होतो".[६६]

महाराष्ट्र शासनाने इ.स.१९६१ मध्ये जाहीर केलेल्या यादीत १३ विमुक्त व २४ भटक्या जमाती केवळ महाराष्ट्रात होत्या. लष्कर यांच्या अभ्यासानुसार "भारतात १९८ विमुक्त व १४७ भटक्या जमातींचे अस्तित्व असून त्यांची लोकसंख्या अंदाजे १० कोटीच्या आसपास आहे कारण त्या स्थिर नाहीत".[६७]

ना. धो. कदम (प्र.आ.१९९५, पुर्नमुद्रण २०१३) यांनी महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, सांस्कृतिक क्रिडा व पर्यटन विभाग परिपत्रक क्र.सी.बी.सी. १६८४ जोप ५९२–१९९९ बी.सी.डब्ल्यू ५, मंत्रालय, मुंबई १९ फेब्रुवारी १९८६ नुसार वरील यादी त्यांनी आपल्या महाराष्ट्रातील भटका समाज, संस्कृती व साहित्य या ग्रंथात परिशिष्ट १ मध्ये सादर केली आहे. ती पुढीलप्रमाणे–

**१४ विमुक्त जाती–** १. बेरड २. बेस्तर ३. भामटा ४. कैकाडी ५. कंजारभाट,
६. कटाबू ७. बंजारा ८. राजपारधी ९. राजपूत १०. रामोशी
११. वडार १२. वाघरी १३. छप्पर बंद १४. फासेपारधी

२८ भटक्या जमाती –

१. बेलदार २. भराडी ३. भुते ४. चित्रकथी ५. गारुडी ६. घिसाडी ७. गोल्ला ८. गोंधळी ९. गोपाळ १०. हेळवे ११. जोशी १२. काशीकापडी १३. कोल्हाटी १४. मैराळ १५. माणसजोशी १६. नंदीवाले १७. पांगूळ १८. रावळ १९. सिक्कलगार २०. ठाकर २१. वैदू २२. वासुदेव २३. भोई २४. बहुरुपी २५. ठेलारी २६. ओतारी २७. गवळी २८. दरवेशी[६८]

वरीलप्रमाणे १४ विमुक्त व २८ भटक्या अशा एकुण ४२ भटक्या विमुक्त जाती आहेत.

## १.९. कोल्हाटी शब्द व कोल्हाटी जमातीची ओळख–

मराठी शब्दकोश २ मध्ये 'कोल्हांट' या शब्दाचा अर्थ "हवेतल्या हवेत डोके खाली करुन उडी घेवून पुन्हा पायावर उभे राहणे म्हणजेच शूरपणाचा देखावा"[६९] असा दिलेला आहे.

R. V. Russell (F.P.1916, R.P.1975) यांनी त्यांच्या 'The Tribes & Castes of the central provinces of India Vol – III' मध्ये कोल्हाटी शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगितलेला आहे.

[XI] "कोल्हाटी हा शब्द मुख्यतः लांब बांबूच्या सहाय्याने उडया मारणारा (डोंबारी) यापासून आलेला आहे".[७०]

K. S. Singh (प्र.आ.२००४) यांनी आपल्या 'People of India Maharashtra' Vol-xxx part two' या ग्रंथामध्ये कोल्हाटी जमातीची व्याख्या "नट किंवा नाचणारे यांच्यापासून उगम होणारे कोल्हाटी 'कोला' या टोपण नावाने ओळखले जातात".[७१]

"महाराष्ट्रात कोल्हाटी हा समाज कलावंत समाज म्हणून ओळखला जातो. एकेकाळी भटकती जमात म्हणून या समाजाला ओळखले जात होते. नाचगाणे करणारा, कसरतीचे खेळ करुन गावगाडयातल्या लोकांची करमणूक करुन उपजिविका करणारा समाज"[७२] अशी ओळख रामनाथ चव्हाण (प्र.आ.२००२) यांनी त्यांच्या भटक्या विमुक्तांची जातपंचायत खंड–१ मध्ये वरीलप्रमाणे करुन दिली आहे.

---

[XI] The word Kolhati is said to be derived from the long bamboo poles which they use for jumping known as kolhat.

त्रिं. ना. आत्रे (प्र.आ.१९१५, पुर्नमुद्रण १९९५) गावगाडा या ग्रंथामध्ये कोल्हाटी जमातीची ओळख करुन देताना म्हणतात, "कोल्हाटी कसरतीचा खेळ, नाच तमाशा करतात त्यांच्या नायकिणी कसब करतात".[७३]

### १.९.१ कोल्हाटी जमातीचे स्थान व उगम–

[XII] "उत्तर व मध्य भारतातील बेरिया ही जात बेसर या ठिकाणी वरील नावाने ओळखली जाते. मध्य भारतातील बेरिया ही जात मुख्यतः सनशियास भटक्या व गुन्हेगारी समाजात विभागली गेली आहे कि ज्यांचा पारंपारिक व्यवसाय हा भाट व जाट जातीचा वंशावळीचा अभ्यास ठेवणे होय. सनशिया व बेरिया मधील मुख्य फरक म्हणजे बेरिया ही जमात त्यांच्या महिलांना वेश्या व्यवसाय करण्यास सांगतात किंवा ज्या कुमारिका आहेत त्यांना त्या व्यवसायात आणतात. वऱ्हाड भागातील बेरार कोल्हाटी जात सुध्दा आपल्या महिलांना वेश्या व्यवसाय करण्यास सांगतात की जी जात कोल्हाटी ही बेरिया जातीतीच एक शाखा आहे. ही सध्या दख्खन भागामध्ये स्थिरस्थावर झाले आहे. सध्या तिच्या परंपरा या पूर्वीच्या जनक जातीपेक्षा वेगळया आहेत".[७४]

R. V. Russell (F.P.1916, R.P.1975) 'The Tribes & castes of the central provinces of India' या ग्रंथामध्ये उत्तर व मध्य भारतातील बेरिया किंवा बेरार ही जमात आणि कोल्हाटी जमात यांच्यातील पारंपारिक व्यवसायानुसार संबंध वरीलप्रमाणे स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, कोल्हाटी जमात ही बेरिया जमातीचीच एक शाखा आहे कारण त्यामध्येही विवाह न करणाऱ्या महिलांमध्ये वेश्या व्यवसाय केला जातो.

[XIII] "कोल्हाटी अथवा गारुडी यांची १९०१ साली पुरुष १,९२२ व स्त्रिया २,६८९ ही संख्या डेक्कन, कर्नाटक, कन्नर, कोलाबा, ठाणा या ठिकाणी होती. त्याबरोबर ४,६११

---

[XII] (The name by which the Beria caste of Northan & Central India is known in Berar. The Berias themselves in central India at any rate are a branch of the sansias, a vagrant & criminal class whose traditional occupation was that of acting as bards & genealogists to a Jat caste. The main difference between the sansias & Beria is that the latter prostitute their women or those of them who are not married. The Kolhatis of Berar, who also do this appear to be a branch of the Beria caste who have settled in the Deccan & now have customs differing in several respects from those of any parent caste)

[XIII] Kolhatis or tumblers numbering (1901) 4611 including 1,922 males & 2,689 females are found in the Deccan, Karnataka, Kanara, Kolaba & Thanna. In addition to 4,611 hindus 68 returned themselves as Muhammadans in 1901. The kolhatis are generally known as Dombaris in Karnatak & as Khelkaris in the Ahmednagar district

हिंदूपैकी १९०१ मध्ये ६८ महमदमध्ये परतले. कोल्हाटी समाज कर्नाटकमध्ये डोंबारी व अहमदनगर मध्ये खेळकरी म्हणून ओळखले जातात".[७५]

R. E. Ethoven (F.P.1922, R.P.1990) यांनी आपल्या 'The Tribes & Caste of Bombay' या ग्रंथात वरीलप्रमाणे कोल्हाटी जमातीचा कर्नाटकमधील डोंबारी व अहमदनगरमधील खेळकरी अशा दोन नावांचा उल्लेख केला आहे.

[XIV] "मूळ उगम – प्राचीन अभ्यासकांनुसार कोल्हाटयांचं मूळ हे शिलिंध्रु कुळातील पुरुष आणि क्षत्रिय कुलीन स्त्री यांच्या अनैतिक संबंधातून आले आहे. त्यांच्या प्रथा परंपरानुसार ते उत्तर भारतातील असून उत्तर भारतीय बावरी, कंजार, वाघीर या जमातींशी साधर्म्य असलेले आहेत. दुसऱ्या संदर्भानुसार कोल्हाटी हे खत्री/क्षत्रिय कुळातील स्त्रियांच्या खालच्या/निम्न वर्गाच्या पुरुषांबरोबरील अनैतिक संबंधातून सापडते. परंतु त्यांच्या मूळ उत्पत्तीविषयी फारसे माहित नाही"[७६.] सय्यद (प्र.आ.१९२०) यांनी वरीलप्रमाणे शांलिध्रु पुरुष व क्षत्रिय स्त्रीच्या संबंधातून कोल्हाटी जातीची निर्मिती स्पष्ट केलेली असून ते त्याबद्दल ठाम नाहीत.

[XV] "अहमदनगर जिल्हयात त्यांना खेळकरी म्हणून संबोधतात. तर बेरार प्रांतातील कोल्हाटी बेरीया समाज जो दक्षिणेकडे स्थायिक झाला आहे. त्यांची एक शाखा म्हणून मानतात. ते या भागातील रहिवासी म्हणून मानले जातात. महाराष्ट्रात उस्मानाबाद, लातूर, सोलापूर आणि अहमदनगर या जिल्हयांमध्ये त्यांची वस्ती आहे".[७७]

K. S. Singh (F.P.2004) यांनी Russell (F.P. 1916, R.P.1975) व Enthoven (F.P.1922, R.P. 1990) यांच्या ग्रंथाचा आधार घेवून विचारांची पुर्नमांडणी

---

[XIV] Origin - Ancient authorities ascribe the origin of the Kolhaties to a liaison between a Shilindhru man and Kshatriya woman. Their traditions say that they originally belonged to Northern India and are akin to the Bowries, the Kanjars, the Waghris and other Northern India tribes. According to another account, they claim to be descended from Khatri women who were degraded for sexual indiscretions with lower castes. Very little is known, however, regarding their origin and the etymology of the name they bear

[XV] In Ahmadnagar district they are known as the Khelkari. ( Enthoven 1922). The Kolhati of Berar appear to be a branch of the Beria who have settled in the Deccan (Russell and Hiralal, 1916). They believe that they are the autochthons of the region and inhabit the districts of Osmanabad, Latur, Sholapur and Ahmadnagar in the state of Maharashtra.

वरीलप्रमाणे केलेली दिसते. तसेच कोल्हाटी समाजाचे वास्तव्य स्पष्ट करताना महाराष्ट्रातील ४ जिल्हांचा निर्देश केला आहे.

"महाराष्ट्रातील एक भटकी जमात कर्नाटक आणि मध्ये प्रदेशातही त्यांची वस्ती आढळते. पण प्रदेशानुरुप त्यांच्या भेद आहेत. महाराष्ट्रात यांना दांडेवाले, कबुतरी, खेळकरी, डोंबारी, कोल्हाटी, बांसबेरिया वगैरे नावाने ओळखतात. कर्नाटकात यांना डोंबारी म्हणतात. त्यांची लोकसंख्या १९६१ च्या जनगणनेनुसार सुमारे २६,००० होती".[७८]

[XVI] "कोल्हाटी ५९७ संख्येने परत आले आणि हे भटके म्हणून अकोला वगळता सर्व जिल्हाभर आढळतात".[७९]

"कोल्हाटी समाजाचे लोक विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात आणि विदर्भ मराठवाडयात मोठया संख्येने आढळतात. एकाच नावाने ओळखला जाणारा हा समाज वेगवेगळया प्रदेशात राहत असल्याने रुढी, परंपरा, भाषा आणि चालिरीती वेगवेगळया आहेत".[८०]

मराठी विश्वकोश खंड ४ (प्र. आ. १९७६) नुसार कोल्हाटी कर्नाटक व मध्यप्रदेशातील रहिवासी आहेत. महाराष्ट्रात त्यांना वरिल प्रमाणे ६ नावाने ओळखतात. तर रामनाथ चव्हाण (प्र.आ.१९८९, तृ.आ.२०००) यांच्यामते वरीलप्रमाणे कोल्हाटी समाज पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ मराठवाडयात आढळतो.

भटक्या विमुक्तांची जातपंचायत या खंड–१ मध्ये रामनाथ चव्हाण (प्र.आ.२००२) पुढील उल्लेख करतात, "उत्तर भारतामध्ये मथुरेच्या आसपास कोल्हाटयांप्रमाणे कसरतीचे प्रयोग करुन उपजीविका करणारे लोक आहेत त्यांना 'नट' या नावाने ओळखले जाते".[८१]

"कोल्हाटी हे दक्षिण महाराष्ट्र, कर्नाटक, कुलाबा व ठाणे जिल्हयात आढळतात. कर्नाटकात त्यास डोंबारी असे म्हणतात. कित्येक ठिकाणी ते खेळकरी या नावाने ओळखले जातात".[८२]

गोविंद कालेलकर (प्र.आ.१९२८, द्वि.आ.१९९९) यांच्यामते, कोल्हाटी महाराष्ट्र, कर्नाटक, कुलाबा, ठाणे येथे आढळतात.

---

[XVI] Kolhatis or Tumblers, are returned as numbering 597 and as found wandering all over the district except in Akola.

## १.९.२ कोल्हाटी जमातीच्या उपजाती/पोटभेद/कुळे–

XVII "वऱ्हाड प्रांतात कोल्हाटी जातीचे दोन प्रकार आढळतात. ते अनुक्रमे डुक्कर कोल्हाटी व खाम किंवा पाल कोल्हाटी. डुक्कर कोल्हाटीला तसे नामकरण करण्यात आले".[८३] R.V.Russell (F.P.1916, R.P.1975) वरिल प्रमाणे वऱ्हाड प्रांतात कोल्हाटी समाजाचे दोन प्रकार आहेत असे स्पष्ट करतात.

XVIII "१. मराठा, २. गुजराती, ३. डुक्करे/पोतरे, ४. पाल किंवा काने, ५. हरका

६. वाले/वालियार–होलिया – त्यांना महार डोंबारी म्हणून संबोधले जाते.

७. गोपाळगणी, ८. आरे, ९. मुसलमान इ. होत.

पुणे जिल्हयामध्ये गुजराती, मराठा, डुक्करे, पोतरे, पाल/काने या उपजाती आढळतात/ पाल व काने यांना मराठा असे आडनावामुळे ओळखले जाते. गुजराती कोल्हाटी हे स्वतःला रजपूत म्हणून समजतात व त्यांनी रजपूत नाव स्वीकारले. डुकरे व पोतरे संज्ञा स्पष्ट नाहीत. परंतु डुकरे हे नाव डुक्कर या नावापासून तयार झाले आहे म्हणजे डुकरे पाळणारी जमात ते डुकराचे व जनावरांचे मांस खातात. कोल्हाटी जमातीत पाल व काने यांना कोल्हाटी जमातीत कमी लेखले जाते. अहमदनगर जिल्हयात मराठी कोल्हाटी यांची उपजमात खरे आणि अक्करमाशी/ बास्टर्ड होय. मुंबई मध्ये मराठा कोल्हाटी अस्तित्वात आहे".[८४]

R. E. Ethoven (F.P.1922, R.P.1990) ने वरीलप्रमाणे कोल्हाटी समाजाच्या नऊ उपजाती सांगितल्या आहेत. मराठी कोल्हाटी ही उपजमात खरी व पात्र व काने कोल्हाटी कमी व अक्करमाशी म्हणून ओळखले जातात.

XIX "कोल्हाटींच्या तीन उपजाती –१. पाल/काने कोल्हाटी, २. डुक्कर/पोटरी कोल्हाटी आणि ३. डोंबारी. मराठवाडयाच्या सर्व जिल्हयांमध्ये त्यांचे अस्तित्व दिसते".[८५]

---

XVII (The caste has two main divisions in Berar, the Dukar Kolhatis and the Kham or Pal Kolhhatis).

XVIII ( They consist of the following endogamour divisions)- 1) Maratha 2) Gujarati 3) Dukre or Potre 4) Pal or Kane 5) Harka 6) Vale or Valiar, that is Holia, also called Mahar Dombars 7) Gopalgani 8) Are 9) Musalman. The Gujarati, Maratha, Dukre or Potre, and Pal or Kane subdivisions are found in the Poona distirct. The Pal or Kane divisions appear to be Marathas from the similarity of their surnames. The Gujarati Kolhatis claim Rajput descent and bear Rajput names. The meaning of the term 'Dukre' or 'Potre' is not clear, but 'Dukre' appears to be derived from dukar a pig, and may refer to those who keep pigs. The Dukre division eats beef and pork and are held socially inferior to Pal or Kane Kolhatis. In ahmednagar district the Maratha Kolhatis are again sub-divided into Khare (proper) and Akaramashe or bastard. Maratha Kolhatis are repored in the Bombay Gazetteer to invest their boys with the sacred thread).

Syed siraj UL Hassan (F.P.1920) यांनी त्यांच्या 'The Caste & Tribes of H.E.H.The Nizam's Dominions' Vol - I या ग्रंथात कोल्हाटी जमातीच्या ३ उपजाती मांडल्या आहेत.

वरील Russell (F.P.1916, R.P.1975), Enthoven (F.P.1922, R.P.1990) व Syed siraj UL Hassan (F.P.1920) यांचीच उपजातीविषयीची मते वरीलप्रमाणे मराठी विश्वकोश खंड–४ (प्र.आ.१९७६) [८६] मध्ये मांडलेली आहेत.

"पोटजाती – पश्चिम महाराष्ट्रातील या समाजातील काही लोक या समाजात पोटजाती मानत नाहीत. एवढेच नव्हे तर कोल्हाटी ही एकच जात असून, त्यात इतर समाजाप्रमाणे पोटजाती नाहीत, असे ते सांगतात. तर विदर्भात राहणारे कोल्हाटी या समाजातील पोटजाती म्हणून गुजराती डुकरे पाळे, काने, हारके, वले, गोपाळणी पोटरे आणि मराठी या पोटजाती सांगतात. त्याच भागात काही ठिकाणी डोंबारी–कोल्हाटी, माळी–कोल्हाटी, भोई–कोल्हाटी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पोटजाती असल्याचे सांगतात. तर वऱ्हाडात खांब–कोल्हाटी व डुक्कर–कोल्हाटी असेही पोटविभाग असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय औरंगाबाद आणि परिसरात गोपाळ–कोल्हाटी, भातू–कोल्हाटी, कबूतर–कोल्हाटी अशीही काही पोटजातींची नावे सांगितली जातात".[८७]

"महाराष्ट्रात कोल्हाटी समाजाचा समावेश भटका समाज म्हणूनच केलेला आहे. या समाजात अनेक पोटजाती आहेत. उदा. गुजराथी डुकरेपाळे, काने, हारके, वले, गोपाळणी, पोटरे आणि मराठे, याशिवाय वेगळे व्यवसाय करणारे, डोंबारी कोल्हाटी, माळी कोल्हाटी, भोई कोल्हाटी, खांब कोल्हाटी(वऱ्हाड प्रांतात) डुकरे कोल्हाटी, गोपाळ कोल्हाटी, भातू कोल्हाटी, खबुतर कोल्हाटी, अशीही काही वेगळया नावाने ओळखल्या जाणाऱ्या पोटजाती आहेत. त्यांची बारा कुळे प्रमुख आहेत. गांगवा, काळवा, भोरजा, मुसावत, नय्या, कच्चर, रत्तबा–बिचवा, चंदनवाळे, विरपणकर, ब्राम्हणवाले, आणि छडीवाले ही बारा कुळे होत".[८८]

---

[XIX] They are divided into three sub-castes: 1) Pal or Kane Kolhatis, 2) Dukkar or Potri Kolhatis and 3) Dombaris. They are found in all the Districts of the Marathawada.

रामनाथ चव्हाण(प्र.आ.१९८९,पुर्नमुद्रण २०००) यांनी आपल्या ‘जाती आणि जमाती’ व ‘भटक्या विमुक्तांची जातपंचायत’(प्र.आ.२००२) या दोन्ही ग्रंथात वरीलप्रमाणे कोल्हाटी जमातीची उपजाती व कूळे सांगितले आहेत. त्याचप्रमाणे Russell (F.P.1916, R.P.1975) व Enthoven (F.P.1922, R.P.1990) यांचा आधार घेऊन गोविंद कालेलकर (प्र.आ.१९२८, द्वि.आ.१९९९)[८९] यांनी कोल्हाटी जमातीचे ९ पोटभेद स्पष्ट केले आहेत.

**१.९.३. कोल्हाटी जमातीची मिश्रणाने निर्मितीची कारणमिमांसा –**

कोल्हाटी जमातीच्या मिश्रणाची कारणमीमांसा करत असताना विविध लेखकांच्या ग्रंथांमध्ये ही जमात मिश्रणाने बनलेली आहे असा उल्लेख आढळतो.

“ही जात अनेक जातींच्या मिश्रणापासून बनलेली आहे. अजूनही ते मराठे, सोनार, शिंपी, लोहार, सुतार इत्यादी जातींच्या लोकांस आपल्या जातीत घेतात. त्यांचा योगक्षेम बहुतांशी त्यांच्या स्त्रियांच्या वेश्यावृत्तीवर चालतो”.[९०]

वरीलप्रमाणे गोविंद कालेलकरांच्या (प्र.आ.१९२८, द्वि.आ.१९९९) मते इतर समाजातील लोकांना आपल्या जमातीत घेतल्याने कोल्हाटी जमात मिश्रणाने बनलेली दिसते.

मराठी विश्वकोश खंड – ४ (प्र.आ.१९७६) मध्ये कोल्हाटी जमात ही मिश्रणाने बनलेली आहे असा उल्लेख केलेला दिसतो. “ही जमात अनेक जमातींच्या मिश्रणाने बनलेली आहे”.[९१]

रामनाथ चव्हाण सुमारे २९ वर्षापूर्वी १९८७ साली महाराष्ट्रातील भटक्या आणि विमुक्त जमातींच्या जनजीवनाविषयी लेखन करण्याचा उद्देशाने त्यांची माहिती मिळविण्यासाठी त्यांच्या पालावर, तांडयावर आणि वस्त्यांवर गावोगावी भटकत असताना त्यांना कोल्हाटी समाजातील काही नियम दिसून आले. ते त्यांनी आपल्या भटक्या विमुक्तांची जात पंचायत खंड–१ (प्र.आ.२००२) मध्ये पुढीलप्रमाणे मांडले आहेत.

“समाजातील उपवर मुलींनी कोणत्याही पुरुषाशी शरीरसंबंध ठेवला तर समाजातील पुरुषांनी त्यात गैर वाटून घेऊ नये. समाजातील तरुण मुलांना शरीरसंबंधासाठी किंवा विवाहासाठी समाजातील तरुण मुली उपलब्ध झाल्या नाहीत तर त्यांनी अन्य समाजातील मिळेल त्या मुलीशी संसार करावा यालाच कजेरी पध्दती असे म्हणतात. या समाजातील तरुण

मुली नाचगाणे करण्याच्या निमित्ताने समाजाबाहेर पडल्याने त्यांचे इतर जातीच्या पुरुषांच्या रखेल्या म्हणून विवाह न करता प्रपंच करु लागल्या. त्यामुळे समाजातील तरुण मुलांना समाजातील मुली लग्नाला मिळणे कठीण झाले. त्यामुळे तरुण मुले इतर समाजातील मुलींना फसवून, फूस लावून किंवा त्यांची खरेदी करुन आणू लागले. त्यातून मुलं जन्माला येऊ लागली. ते तिच्याशी जाती नियमाप्रमाणे विवाह करुन प्रपंच करु लागले. या पदधतीलाच समाजात कजेरी पध्दतीचा विवाह म्हणतात. त्यामुळे समाजात एक म्हण रुढ झाली. आई कोल्हाटी आणि बाप मराठी. पुढे पुरुषही अभिमानाने म्हणून लागले आम्ही जातीचे कोल्हाटी आमचे सोयरे मराठी''.[१२]

वरील विवेचनावरुन कोल्हाटी जमातीतील पूर्वी होणारा जास्त प्रमाणातील वेश्या व्यवसाय व कजेरी विवाह पध्दती ही दोन्ही कारणे या जमातीच्या मिश्रणास कारणीभूत ठरतात.

इरावती कर्वे (प्र.आ.१९७५) यांच्यामते ''जातीच्या लोकांचे विवाह जातीतल्या जातीतच होतात. पण जातीतली ही अंतर्विवाह पध्दती दोन प्रकारांनी मोडू शकते. वरच्या जातीच्या पुरुषाचा खालच्या जातीच्या स्त्रीबरोबर झालेला कायदेशीर विवाह हा एक प्रकार. हयाला अनुलोम विवाह असे नाव आहे. ही प्रथा भारतात फक्त काही भागांत व फक्त काही जातींतच आढळते आणि कोणत्याच प्रदेशात ती सर्वसाधारण नाही. अंतर्विवाहाला अपवाद असा जो दुसरा प्रकार तो फक्त शरीरसंबंधदृष्टया अपवाद म्हणावा लागेल. विवाहामध्ये संततीला काही कर्तव्ये व अधिकार प्राप्त होतात आणि त्यांना एक विशिष्ट दर्जाही आपोआप प्राप्त होतो. या दृष्टीने जातींतील अंतर्विवाहपध्दती जवळजवळ सार्वत्रिक असून अनुलोम विवाहाचाच काय तो तिला अपवाद असतो. वर जो दुसरा अपवाद सांगितला त्यात भिन्न जातींच्या व्यक्तींमधील लैंगिक संबंध येत असला तरी त्यामुळे कुटुंब संस्थेवर अगर जातिव्यवस्थेवर प्रत्यक्ष परिणाम फारसा होत नाही. हया प्रकारात रखेली ठेवणे, मोलकरणीशी मालकाचा संबंध येणे व वेश्याव्यवसाय यांचा समावेश होतो. तरुण मुलींची कुळंबीण वा रखेली म्हणून खरेदी करुन त्यांना घरात दुय्यम पत्नी म्हणून ठेवले जाई आणि त्यांना विकत घेणाऱ्या घरातील पुरुषाचा त्यांच्याशी संबंध असे. त्या पुरुषाला रखेली मालक अथवा मालिक असे म्हणत असे. सुमारे २५–३० वर्षापूर्वी ही पध्दत बरीच प्रचलित होती आणि अशाप्रकारचे संबंध उघड उघड चालत. हयाशिवाय काही पुरुष लपून छपूनही काही स्त्रियांशी जवळ जवळ कायमचा संबंध ठेवीत.

तसेच जमीनदार, संस्थानिक, सरदार व अमीर उमराव हे आपल्या पत्नीच्या मोलकरणीशीही मोकळेपणाने संबंध ठेवीत. प्रस्तुत लेखिकेने असे एक मृत्युपत्र पाहिलेले आहे की ज्यात एका सरदाराने कुळुंबिणीकरता आपल्या रखेलीकरता व तिच्या संततीकरता पैशाची तरतूद करुन ठेवली होती. राजपुतान्यामध्ये मोलकरीन व मालक यांच्यापासून झालेल्या संततीची एक निराळी जातच बनली आहे. त्यातीत पुरुषांना खवास व स्त्रियांना खवासीन असे म्हणतात. रजपूत अमीरांच्या पुत्रांच्या विवाहात वधूबरोबर वयस्क आणि तरुण अशा खवासिनी तिच्या माहेराहून पाठविल्या जात. त्यांतल्या वयस्क स्त्रिया वधूला वागावे कसे हे सांगण्याकरता व तरुण स्त्रिया वराच्या रखेल्या म्हणून येत''.[९३]

इरावती कर्वे (प्र.आ.१९७५) यांनी वरिल निर्देशित केलेल्या उदाहरणांच्या आधारे कोल्हाटी जमातीच्या मिश्रणाचे कारण स्पष्ट होते.

नामदेव व्हटकर (द्वि.आ. १९६७) यांच्यामते, ''अनुलोम आणि प्रतिलोम विवाहापासून झालेली संतती कोणत्या वर्गात जायची यासंबंधी अनुलोम विवाह म्हणजे खालच्या वर्णातील स्त्रीने वरच्या वर्णातील पुरुषांशी विवाह करणे आणि प्रतिलोम विवाह म्हणजे वरच्या वर्णातील स्त्रीने खालच्या वर्णातील पुरुषाशी विवाह करणे. वरिष्ठ वर्णाची स्त्री आणि खालील वर्णाचा पुरुष यांचा विवाह संमतच नव्हता. पण खालील वर्णाची स्त्री आणि वरील वर्णाचा पुरुष यांच्या संबंधातून मूल झाल्यास ते मातृसावर्ण म्हणजे खालच्या वर्णाचे धरले जाई. कोणत्याही तऱ्हेने असे जन्मलेले मूल हे हीन वर्णाचेच ठरु लागले. अशा मिश्र विवाहापासून झालेल्या मुलांना तशाच तऱ्हेने जन्मलेली मुलगी किंवा त्याच्या आईची जी जात असेल त्यामधून वधू निवडावी लागत असे म्हणजे वर्णाच्यादृष्टीने हा जन्माचा कपडा पिढीपिढीला अधिकच मळकट ठरु लागला''.[९४]

नामदेव व्हटकर (द्वि. आ.१९६७) यांनी इरावती कर्वे (प्र. आ. १९७५) या दोन्ही विचारवंताचे मत वरीलप्रमाणे अनुलोम प्रतिलोम विवाह हे संकरित जातींचे कारण मानल्यामुळे ते कोल्हाटी जमातीच्या मिश्रणाच्या निर्मितीस लागू होते असे समान वाटते.

## १.१०. कोल्हाटी जमातीची सांस्कृतिक व धार्मिक ओळख –

भटक्या विमुक्त जमातींपैकी कलावंत म्हणून महाराष्ट्रभर ओळख असणाऱ्या कोल्हाटी जमातीच्या धार्मिक आचरणाची माहिती नाविन्यपूर्ण वाटते. ही जमात बऱ्यापैकी हिंदू संस्कृतीचे

आचरण करताना दिसते. सर्व धार्मिक विधींचा आढावा घेतला असता कोल्हाटी जमातीच्या धार्मिक पध्दतींमध्ये हिंदू संस्कृतीतील धार्मिक पध्दती व इतर भटक्या विमुक्त जमातीमधील धार्मिक पध्दती यांच्यातील साम्य आढळते. या धार्मिक पध्दतीपैकी काही निवडक पध्दतींची नोंद प्रस्तुत प्रकरणामध्ये घेतलेली आहे. ती पुढील प्रमाणे

**१.१०.१. जात पंचायत –**

इतर भटक्या जातीप्रमाणे कोल्हाटी समाजात जातपंचायतीचे पूर्वी अस्तित्व होते. समाजातील सर्वांना पंचायतीतील कामकाजात सहभाग घेता येतो. समाजातील भांडण तंटे, लग्न, विधी, उत्सव व इतर कार्यक्रमात समाजातील वयोवृध्द जाणकार लोक पंच म्हणून नाममात्र काम पाहतात. समाजाअंतर्गत घडले त्या गंभीर घटनांचा न्यायनिवाडा करण्यासाठी समाजाने काही ठिकाणे निश्चित केली आहेत. त्यापैकी पौष पौर्णिमेला जेजूरी, रंगपंचमीला मढी तर अक्षय तृतीयेला सोनारी येथे पंचायत बसते आणि न्यायनिवाडा करते.

रामनाथ चव्हाण (प्र.आ.१९८९, पुर्नमुद्रण २०००) – यांनी कोल्हाटी जमातीची जातपंचायत व त्याठिकाणी असणारी न्यायदानाची पध्दत स्पष्ट केली आहे. या समाजातील न्यायनिवाडयावेळची पध्दत वैशिष्टयपूर्ण आहे. एखाद्या गंभीर घटनेचा न्याय निवाडा करायचा असेल तेव्हा या समाजातील पंचायतीमध्ये भाग घेणारे लोक लिंबाच्या झाडाखाली गोलाकार बसतात. (जेजूरी येथील जातपंचायत बसण्याची जागा बंगाली या नावाने ओळखली जाते.) समाजातून बहिष्कृत केलेली व्यक्ती पाणी टाकून शुध्द करुन समाजात परत घेण्याची पध्दत या समाजात आहे. मात्र अशा तऱ्हेने शुध्द करुन समाजात न घेतलेल्या व्यक्तिशी जर इतर व्यक्तिने संबंध ठेवले तर त्याही व्यक्तिला समाज बहिष्कृत करतो.

**१.१०.२.न्यायदान पध्दती–**

या समाजातील न्यायदान पध्दती सदोष असल्याचे सांगितले जाते. ‘‘समाजातील आर्थिक,शेतीचे अथवा देण्याघेण्याचे व्यवहार कधीही लेखीटाकी केले जात नाहीत. सर्व व्यवहार तोंडी होत असतात. परंतु जर एखादया व्यक्तीने आर्थिक व्यवहारात फसवणूक करण्याचा प्रयत्न केला तर खरे खोटे पाहण्यासाठी एक विशिष्ट पध्दत वापरली जाते. तिला ते हाडी मारणे असे म्हणतात. एका मडक्यात तेल अगर शेण किंवा गोमूत्र घालून ते मडके विस्तवावर ठेवून उकळी येईतोपर्यंत तापविले जाते. नंतर त्या मडक्यात पैसा अगर न विरघळेल असा

खडा टाकतात व ज्याचेवर संशय असेल तर व्यक्तिस उकळत्या आधणातून पैसा किंवा खडा हाताने काढावयास सांगतात. जर त्या व्यक्तीचा हात भाजला तर तो खोटे बोलतो म्हणजे तो खोटा आणि जर हात भाजला नाही तर तो खरा अशाप्रकारे खरे–खोटे पाहण्यासाठी अशा विचित्र प्रथा या समाजात रुढ होत्या". [१५]

रामनाथ चव्हाण (प्र.आ.१९८९,पुर्नमुद्रण २०००) यांच्या शेवटच्या वाक्यावरुन ही न्यायदान पध्दती म्हणजेच हडी मारणे ही पूर्वी रुढ होती. सद्यस्थिती या पध्दतीचा वापर होत नाही.

प्रभाकर मांडे यांनी आपल्या गावगाडयाबाहेर (पुर्नमुद्रण २६ जानेवारी २०१७) या ग्रंथामध्ये जात पंचायतीसंबंधी रामनाथ चव्हाण यांनी दिलेल्या माहिती व्यतिरिक्त अजून काही प्रथा मांडलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे.

**मिशी उतरविण्याचा कट किंवा आरे/बिरीद–**

जातपंचायतीचा सर्वात मोठा कट किंवा सर्वात मोठी शिक्षा मिशी उतरविण्याची असते. एखादयाने जातीचं ऐकले नाही तर जातीचे लोक त्याची मिशी छाटतात. मिशी छाटलेल्या माणसाकडे जातीचे लोक त्याच्या आयुष्यभर जातीत अपमानित झालेला पुरुष म्हणूनच पाहतात. भाऊबंद असेल तर आरे वापरतात. कुणीही त्याच्याकडील लग्नकार्याला किंवा उत्सव समारंभाला जात नाही किंवा त्याला बोलवीत नाहीत. त्यालाच आरे वापरणे असे म्हणतात. सोयऱ्यांनी बिरीद पाळायचे असते म्हणजे सोयऱ्यांनीही त्याच्या लग्नकार्यात सहभागी होऊ नये असा नियम असतो. हा नियम फार कटाक्षाने पाळण्यात येतो.

**कुत्र्याचा कान कापणे–**

आखाडयात पंचायतीत देण्याघेण्याच्या व्यवहारासंबंधीचे तंटेच फार मोठया प्रमाणावर चालतात. देणेकऱ्याच्या विरुध्द निकाल लागला आणि त्याने देणे दिले नाही किंवा जातपंचायतीसमोर तो आला नाही तर एखादया कुत्र्याला पंचायतीत आणून त्याचा कान कापण्याचा विधी करतात व त्याच्याकडून येणे असलेली रक्कम देतात.

**गजिती आणि सरा टाकणे–**

एखादयाने टाकून दिलेली स्त्री किंवा स्वतःच्या मर्जीने नवऱ्याच्या घरुन पळून आलेली स्त्री गंधर्व नियमाप्रमाणे दुसऱ्या पुरुषाची बायको होऊ शकते. अशावेळी त्या गृहस्थाने पंचांना

बोलवून त्यांची अनुमती घेवून ख्याला खुशाली करावयाची असते यालाच गजिती असे म्हणतात. पंचातील एखादा पुरुष किंवा त्या स्त्रीच्या कुळातील हजर असलेला पुरुष पंचांच्या समोर तांब्याभर पाणी टाकतो यालाच सरा असे म्हणतात. आता आजपर्यंत ही आमची होती आता तुमची झाली असा सराचा अर्थ असतो. यावेळी विधीपूर्वक विवाह होत नसला तरी ते स्त्री–पुरुष विवाहित झाले असे मानले जाते.[९६]

या माहितीवरुन इतर भटक्या विमुक्त जातींप्रमाणे कोल्हाटी जमातीतही पूर्वी जातपंचायतीचे अस्तित्व व कठोर निर्बंध असल्याचे दिसते.

### १.१०.३. कुलदैवते–

कोल्हाटी जमात ही हिंदू धर्मियांचे आचरण करीत असल्याने त्यांचे सण–उत्सव, पुजा, देव–देवता यांचेही अनुकरण करताना दिसते. उपास करणे, नवस करणे, राहत्या घरात देव्हारे न ठेवता वेगळया किंवा अंतरावरील खोलीमध्ये ठेवणे, देव्हाऱ्यात चांदीचे व सोन्याचे वेगवेगळया देवतांचे मुखवटे ठेवणे अशा काही बाबी सर्रास केल्या जातात. देवापुढे बकरे कापण्याची या समाजात विशिष्ट पध्दत आहे. नवस म्हणून देवापुढे बकरे उभे केले जाते. या बकऱ्याने अंग झाडले म्हणजे ते देवीला मान्य आहे असे समजले जाते. अंग झाडले नाही तर त्याला सोडून दिले जाते व अंग झाडले तरच त्याचा बळी दिला जातो.[९७]

मराठी विश्वकोश खंड–२ (प्र.आ.१९८५) मध्ये दिल्याप्रमाणे ते महादेवाचे आणि मारुतीचे उपासक आहेत. जेजूरी, आळंदी, शिखर शिंगणापूर, पंढरपूर, कोल्हापूर, ज्योतिबा ही त्यांची तीर्थस्थाने होत. खंडोबा, मरीआई, म्हसोबा, बहिरोबा या त्यांच्या देवता होय. त्याचप्रमाणे Ahmadnagar District Gazetter(1884-2003) मध्ये निजामाच्या राज्यांतील तुळजापूरची देवी, जेजूरीचा खंडोबा आणि स्थानिक मारुती यांची फुलं, चंदन, गंध वाहून ते पूजा करतात.

### १.१०.४. विवाह पध्दती–

Enthoven (F.P.1922, R.P.1990) यांनी आपल्या ग्रंथात कोल्हाटी जमातीच्या लग्नविधीसंबंधी सविस्तर माहिती सांगितली आहे.

कोल्हाटी त्यांच्या मुलाचे लग्न २५ वर्षापूर्वी तर मुलींचे वयात आल्यावर करतात. लग्नापूर्वीच्या शारिरीक संभोगास त्यांच्यात परवानगी नाही. मुलगी वयात आल्यानंतर तिला

लग्न किंवा वेश्याव्यवसायाची निवड करण्याची अनुमती दिली जाते. यावरुन सद्यस्थितीतील मुलींच्या इच्छेविरुध्द विवाह संबंधी नेमक इच्छेला प्राधान्य दिल्याचे दिसते.

लग्नाची मागणी मुलाच्या वडिलाकडून केली जावून ५० ते १०० रु मुलीच्या वडिलांना मुलीची किंमत स्वरुपात दयावी लागते. यावरुन सद्यस्थितीतील हुंडा पध्दतीच्या नेमकी विरुध्द कृती पूर्वी कोल्हाटी जमातीत विवाह ठरविताना केली जात होती. विवाह सोहळयात Enthoven ने मांडलेल्या निवडक कार्यक्रमांचा समावेश होतो.

१. सगाई किंवा मंगणी– जातीतील प्रमुखांना घेवून मुलाचे वडील मुलीच्या वडिलांच्या घरी जाऊन लग्न ठरवितात. मुलीला साखरेचे पाकीट, साडी चोळी, दागदागिने दिले जातात. पानसुपारीचे वाटप, पाहुण्यांना जेवण/मद्य देतात.

२. हळदी– या समारंभात मुला–मुलीला हळद लावतात. त्यांना जवळच्या महिलांकडून गाणी गाऊन आंघोळ घालतात. नवरा–नवरीच्या भुवया तांबडया पावडरने रंगवून कपाळावर बाशिंग बांधले जाते. मुलाच्या हातात सुरी देतात. त्याने ती लग्न समारंभ पार पडेपर्यंत हातात ठेवायची असते.

३. देवकार्य– आंबा, उंबर, रुई, जांभूळ या झाडांच्या फांदया जमातीतील पुरुष व त्याची पत्नी घेवून येतात. मुला–मुलीचे नातेवाईक ताटात दिवा लावून आणतात. अंगावरील कपडयांची गाठ बांधून त्यांच्या डोक्यावर कापड धरले जाते. त्यानंतर लग्न समारंभाच्या ठिकाणी त्यांना वाजत–गाजत आणले जाते. नवरा नवरीचे आई वडिल देवकाची पुजा करतात. जातीतील लोकांना बोकडाचे मटन भोजन म्हणून दिले जाते.

४. गडंगनेर– नवरा नवरीला त्यांचे नातेवाईक जेवण देतात.

५. तेल साडी – नवरीची ओटी(खोबरे वाटी)नारळाची वाटी, हळद, सुपारीने भरली जाते.

६. लग्न – नवरा व नवरीला हळद पावडरच्या ताटावर उभे केले जाते. नवरीचे तोंड पश्चिमेला तर नवऱ्याचे तोंड पूर्वेला असते. त्यांच्यात आंतरपाठ धरला जातो. ब्राम्हण मंगल अष्टक म्हणतो व प्रत्येक मंगल अष्टकाच्या शेवटी तो सावधान म्हणतो.[९८]

अशाप्रकारे विवाहपध्दती किंवा लग्न सोहळा विविध कार्यक्रमांमधून पार पडतो. जमातीतील काही विशेष कार्यक्रम असून या पध्दतत हिंदू संस्कृतीनुसार काही कार्यक्रमांमध्ये साम्य आढळते. पूर्वी हे विवाह ब्राम्हणाशिवाय होत होते. विवाहाबद्दल सांगायचे झाले तर कोल्हाटी

जमातीत विधवा विवाहाला मान्यता आहे. तसेच घटस्फोटाला मान्यता नाही. या काही विवाहाबद्दलच्या ठळक वैशिष्टयांचा अभ्यास Enthoven(F.P.1922, R.P.1990) यांच्या ग्रंथात मांडला आहे.

प्रभाकर मांडे ( पुर्नमुद्रण २६ जानेवारी २०१७ ) यांनी Enthoven (F.P.1922, R.P.1990) यांनी मांडलेल्या विवाह पध्दती व्यतिरीक्त कोल्हाटी जमातीमध्ये समाविष्ठ असलेल्या दाढीचूर व तागमान या दोन प्रथा पुढीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत.

**दाढीचूर–**

मांडवखणी दिल्यावर आणि मांडवात पंच बसल्यावर दाढीचूर होते. दाढीचूर म्हणून प्रत्येकी १० ते १२ रुपये दिले जातात. दाढीचूर प्रीत्यर्थ किती पैसे दयायचे हे पंच ठरवितात. दाढीचूराशिवाय मात्र लग्न लागत नाही. म्हणजेच मांडवखण शिवाय नवरदेव मांडवात येत नाही आणि दाढीचूर झाल्याशिवाय हळद लागत नाही असा रिवाज आहे.

**तागमान–**

नवरदेवाला पोशाख चढविल्यावर मानाचे आहेर होतात त्यालाच तागमान असे म्हणतात. लग्नासाठी किमान चार कुळींचे लोक आवश्यक असतात. या चार कुळातील हजर जेष्ठ व्यक्ती कुळाचे प्रतिनिधीत्व करते आणि तागमान स्वीकारते.[९९]

गो. ग. मुसळे यांच्या नेतृत्वाखाली १९५० साली अखिल महाराष्ट्र कोल्हाटी समाज सेवा संघाची स्थापना झाली. दि. २१ डिसेंबर १९९८ मध्ये एक ऐतिहासिक स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. या स्मरणिकेमध्ये कोल्हाटी जमातीच्या विविध रुढी, परंपरा, प्रथा यांचे सविस्तर विवेचन दिले आहे. त्यापैकी पाचवीच्या विधी संबंधी माहिती पुढीलप्रमाणे.

**१.१०.५. पाचवीचा विधी–**

कोल्हाटी समाजात मूल जन्माला आल्यानंतर पाचव्या दिवशी बाळंतनीच्या हातून जवळपास बाभळीच्या झुडपाखाली सटवाईची पूजा करतात. नंतर नातलग, जवळपासचे सोयरे यांना आमंत्रित करुन पाचवीचा कार्यक्रम करतात. मंडळी जमल्यानंतर घरात गाणे बजावणे चालते या गाण्यामध्ये हिंदी पद्य प्रकारातील बन्नाडे हे विशिष्ट चालीचे गाणे म्हणतात. नंतर मुलाचे पालक किंवा वडिल एका थाळयात काशाचे भांडयात पैसे, पान सुपारी, गुलाल बुक्का ठेवून त्यावर रुमाल झाकून तो थाळा पंचमंडळीपुढे आणून ठेवतो. बसलेल्या मंडळीतील प्रमुख

व्यक्ती, सोयरा तो रुमाल हलकेच उचलून किती पैसे ठेवले आहेत ते पाहतो व कमी वाटल्यास दहा–वीस रुपयाची मागणी करतो. मग थाळयाचा स्वीकार करतो. नंतर गडू सर्वांच्या मध्यभागी रास ढीग करतात व त्या राशीवर मुलाला ठेवतात व लगेच उचलून घेतात हे गहू तेथील स्थानिक कुटुंबाला वाटून देतात.

काही हौशी लोक याच कार्यक्रमात दुपारच्या गाणे बजावण्यानंतर आपली वंशवेल म्हणजे आपल्या वाड–वडिलांनी पूर्वजांची नावे उजळून घेतात. अशा कार्यक्रमामुळे एक फायदा होतो की अनेकांची वंशवेल लक्षात राहण्यास मदत होते. अशाप्रकारे पाचवीचा कार्यक्रम पार पाडला जातो.[१००]

प्रभाकर मांडे (पुर्नमुद्रण २६ जानेवारी २०१७) यांनी कोल्हाटी जमातीतील महत्वपूर्ण असा विधी पुरुषांचा मुंजविधी यासंबंधी मांडलेली माहिती पुढीलप्रमाणे.

### १.१०.६. पुरुषांचा मुंजविधी–

कोल्हाटी जातीत प्रत्येक पुरुषाचा मुंजविधी होणे आवश्यक असते. पुरुषाची मुंज कोणत्याही वयात लावली जाते. मात्र मुंजविधी झाल्याशिवाय त्याला लग्न करण्याची परवानगी नसते. आष्टी तालुक्यातील एका गावात एका गृहस्थाची म्हातारपणी मुंज झाल्याचे कळले. एकावेळी कितीही मुंजी लागू शकतात. मुंजा मुलाच्या हातात पानसुपारी, भंडारा देतात आणि जातीतील बायका गाणी म्हणत हळद लावतात. जमलेल्या स्त्रिया आणि सोयरे पुरुष हळद लावतात.

कंगन ज्यो गाये मधुरो मंजिली हाथों में

हळदी ज्यो गाये मधुये हलदी हाथों में माये दा

असे हळदीच्या गाण्याचे स्वरुप असते. मळवट भरुन हातात मुंजीचे काकण बांधायचे आणि नंतर त्याला विधिपूर्वक स्नान घालावयाचे हा विधीतील भाग महत्वाचा असतो.[१०१]

### १.१०.७. मृत्यूविधी–

कोल्हाटी जमातीमध्ये मर्तिकाला दफन करण्याची पध्दती आहे. पूर्वी मयताचे दिवस तिसऱ्या दिवशी घालत असत. परंतु अलीकडे १३ व्या दिवशी दिवस घालतात.

### तरपावनी–

तरपाई देण्याचा एक महत्वपूर्ण विधी यावेळी केला जातो. तरपाई देणे म्हणजे मेलेल्या

माणसांना दारु अर्पण करणे. जमलेल्या बैठकीत जमिनीवर दारुचा कप सांडतात. त्यामुळे मेलेल्या माणसांचे आत्मे तृप्त होतात असे मानले जाते. या विधी संदर्भात वानराची मनोरंजनात्मक कथा जमातीतील गृहस्थ सांगतात, तरपाई, किंवा तरपावनी केल्याशिवाय कोल्हाटी जातीतील पंच दारु घेत नाहीत.

**चर जागवणे–**

ज्या ठिकाणी विसावा दिला असेल तेथे सुमारे दोन–अडीच फूट लांब व ६ इंच रुंद, ९ इंच खोल  असा चर खणतात. त्याच्यात लाकडे टाकून पेटवून तेथे भात शिजवतात. त्यावर तूप, साखर, टाकून कबरीजवळ नैवेद्य दाखवतात. फुले, गुलाल, बुक्का वाहतात. उदा. अगरबत्या पेटवून तो नैवेद्य गाईला खायला देतात. गाईने नैवेद्य खाल्ला म्हणजे मयताचा आत्मा संतुष्ट झाला असे मानतात. नंतर त्या चराच्या शेजारी चार–पाच इंचाचा खड्डा खणतात त्यास बोरा म्हणतात. मग प्रत्येक जण एकेक घास त्या खड्डयात बोऱ्यात टाकतो व त्यातच हात धुतो यास बोरा भरणे असे म्हणतात. चरामध्ये  पेटलेल्या अग्नीत तूप टाकतात व त्याने त्वरीत पेट घेतला तर मृत आत्मा शांत झाला असे मानतात. यालाच चर जागवणे म्हणतात.

**श्राध्द/तेरावा–**

पूर्वी श्राध्द हा विधी सोयी–सवडीप्रमाणे केला जात असे. सुधारणा करुन बहुतेक करुन तेराव्या दिवशीच हा विधी करतात. बाहेर मोकळया जागेत एका झोपडीवजा पाल बनवतात. चर खणतात. त्या चरावर वरण, भात, मांडे, चपात्या करतात. या कार्यासाठी दोन सोयरे आवश्यक असतात. त्यांच्याच हातून सर्व विधी पार पडतात. ब्राम्हण नसतो. पंच मंडळीची बैठक बसते. मयत व्यक्ती हळद लावून लग्न केलेली पक्का होती की कच्चा याचा विचार घेतात. कच्चा असल्यास खण, दंड त्याच्या नातलगाकडून घेतात. पक्का असल्यास दंड नाही. चरासमोर बारा कुळाचे पूर्वजांना स्मरुन बारा नैवेद्य ठेवतात नंतर तरपावनी करतात. नंतर दुखवटा काढला जातो. पुन्हा चर जगविणे हा कार्यक्रम होतो. दुसऱ्या दिवशी किंवा संध्याकाळी मटणाचे जेवण करतात.[१०२]

## १.१०.८. कोल्हाटी भाषा[१०३]–

कोल्हाटी जमातीची भाषा ही महाराष्ट्रातील कहार, मोची आणि रजपूत या जातीतील लोकांप्रमाणेच हिंदी मिश्रीत स्वरुपाची आहे. गो. ग. मुसळे यांच्या ऐतिहासीक स्मरणिकेत

(१९९८) भाषेसंबंधी काही वाक्ये दिली आहेत. पुढील काही वाक्यांवरुन त्यांच्या बोलीची कल्पना येते.

इकडे ये – यमे आव

तिकडे जा – वमे जा

तुझे नाव काय – तेरा नाव का?

तुझ्या वडिलांचे नाव – तेरे बप्पाका नाव का?

तुझ्या आईचे नाव – तेरे मावका नाव का?

तू कुठे राहतोस? तू कडे ऱ्हायता?

तू इथे कधी आलास? तू यडे कब आया?

तू जेवलास का? तुने रुट्टी खाई का?

तू कधी जाणार आहेस? तू कब जाणेवाला हाय?

तुझ्या गावाला पाऊस झाला का? तेरे गावाक् पाणी पडया का?

तुझे लग्न झाले आहे का? तेरा भ्याव हुव्वा हाय का?

तुला भाऊ आहे का? तेरेकू भाई हाय का?

तुझे शिक्षण किती झाले आहे? तेरा शिक्षण कितना हुव्वा?

**काही प्राण्यांची नावे–**

| | |
|---|---|
| कोंबडा– कुक्कड | कोंबडी – कुक्कडन |
| कुत्रा – कुत्ता | मासा – मच्छी |
| मांजर – ढब्री | शेळी – बक्री |

**अंक –**

| | | | |
|---|---|---|---|
| एक – यक्क | दोन – दो | तीन– तिन्न | चार– चौक |
| पाच – पच्च | सहा – छे | सात– सत्त | आठ– आठ्ठ |
| नऊ– नऊ | दहा– दस | अकरा – ग्यारा | पन्नास– पच्यास |
| वीस – बीस | शंभर– सौ(सव) | आई – मा | मुलगी– छोरी |
| भाऊ– भाई | म्हतारा– बुढ्ढा | बहिण– भान | साखर– सक्कर |
| मुलगा– ब्यट्टा | वाटी– कटोरी | | |

सद्यस्थितीत कोल्हाटी जमातीतील सुशिक्षीत वर्ग या भाषेचा वापर करत नाहीत. परंतु काही ठिकाणी अजूनही बोलीभाषा म्हणून भातूची (कोल्हाटी) भाषा वापरली जाते व संस्कृतीचे जतन केलेले दिसते.

## १.११. कोल्हाटी जमात निर्मितीविषयी लोककथा किंवा पुराणकथा –

कोल्हाटी जमातीचा उगम व पार्श्वभूमी अभ्यासत असताना या जमाती संबंधातील लोककथा R.V.Russell(F.P.1916, R.P.1975), ना.धो.कदम (प्र.आ. १९९५, पुर्नमुद्रण २०१३), रामनाथ चव्हाण (प्र.आ.२००२) यांच्या पुस्तकांतील कथांमध्ये साम्य आढळते.

१. **R.V. Russell** (F.P.1916, R.P.1975)[१०४]

कबुतरी समाजातील स्त्रियांचा नाच कबुतराच्या आकाशात घेतलेल्या भरारीप्रमाणे कलात्मक होता. असे म्हटले जाते की एकेकाळी दानवाने कुणबी समाजाला गुहेमध्ये बंद केले. त्यावेळेस कुणबीने महादेवाकडे प्रार्थना करुन जीवदान मागितले. त्यावेळेस शंकर महादेवाने एक पुरुष व एक स्त्री निर्माण केली व निर्माण केलेल्या स्त्रीपुरुषाने नृत्य केले. त्यांना समाधानी केले व दानवांकडून त्यांना मुक्त करण्याचा वर मागितला. अशाप्रकारे कुणबी समाज हा मुक्त झाला. त्यानिर्मित केलेल्या स्त्री–पुरुषाला कबुतरी व कबुतर अशी नावे देण्यात आली. कारण त्यांच्याकडे असणारे कौशल्यपूर्ण नृत्य करण्याची क्षमता होय व तेच कोल्हाटी समाजाचे पूर्वज आहेत किंवा पूर्वज म्हणून ओळखले जातात.

२. **रामनाथ चव्हाण** (प्र. आ.२००२)[१०५]

इंद्रसभेत दरबार भरलेला असताना त्याठिकाणी नाचगाणी करणाऱ्या एका गंधर्व कन्येने शंकराला व पार्वतीला प्रसन्न करुन शापमुक्त होण्याचा वर मागितला. शंकराने प्रसन्न होऊन तिला शापमुक्त केले. तिने उपजिविकेसाठी दुसरा वर मागितला असता शंकराने दुसरा वरही दिला. यापुढे तुझ्यापोटी जन्म घेणारी संतती ही कलावंत म्हणूनच जन्म होईल आणि लोकांचे मनोरंजन करुन पोट भरेल.

एका वर्षानंतर या गंधर्व कन्येला शंकराच्या कृपाप्रसादाने एक मुलगा व मुलगी झाली. मुलगा वेडयावाकडया उडया मारुन लोकांचे मनोरंजन करी तर मुलगी नाचगाने करुन शंकराची आज्ञा पालन करत होते. ती मुलगी जेव्हा वयात आली तेव्हा लोक नाचगाण्यावर खूश असण्यापेक्षा तिच्या सौंदर्यांवर खूष होऊन तिच्याकडे सोबतीची व शरीरसुखाची मागणी करत.

हे तिला आवडत नसे. तिने शंकराला प्रसन्न करुन सर्व हकिगत सांगितली. शंकर तिला म्हणाले, बेटी तुझा जन्मच त्याच्यासाठी झालेला आहे. त्यात काहीही गैर नाही. लोकांची इच्छा असेल त्याप्रमाणे वर्तवणूक कर आणि पोट भर. शंकराचा प्रसाद समजून ती शंकराच्या आशीर्वादानुसार पृथ्वीवर नाचगाणे करुन हवे त्याच्याशी शरिरसंबंध ठेवून आपली उपजिविका करु लागली. त्यातून पुढे तिची पिढी 'कोल्हाटी' ही जमात म्हणून निर्माण झाली असे जमातीतील जाणकार लोक सांगतात.

**३. ना. धो. कदम** (प्र.आ.१९९५, पुर्नमुद्रण २०१३)[१०६]

वरीलप्रमाणे ना. धो. कदम यांनीही आपल्या पुस्तकात महाराष्ट्रातील भटका समाज संस्कृती व साहित्यामध्ये शंकरापासून गंधर्व कन्येला शापमुक्ती व वरदान मिळाल्यामुळे कोल्हाटी जमातीचा उगम अशी आख्यायिका मांडली आहे.

वरील तीनही लोककथा लक्षात घेता कोल्हाटी जमातीचा उगम व पूर्वज यांचा निर्देश लक्षात येतो. त्यादृष्टीने या आख्यायिका म्हणून लक्षात घ्याव्यात.

**१.११.१. गीतेतील मुक्ती व मोक्षमार्ग बाबत प्रतिपादन –**

ज्याला वासनेपासून परावृत्त व्हावे असे वाटते तो केवळ आपल्या आवश्यक तेवढया गरजा भागविण्याचा प्रयत्न करतो. अशाप्रकारे केवळ देह जगविण्यासाठी, गरजा भागविण्यासाठी ज्यास समाधान वाटते त्याला कधीही स्वतःची लाज वा तिरस्कार वाटणार नाही. आपल्या गरजा भागविणे अपरिहार्य असल्यास त्या किमानपक्षी भागतील व त्याचा व्यत्यय मोक्ष प्राप्तीस येणार नाही याची दक्षता त्याने घ्यावयास हवी.

गीतेमध्ये उल्लेखानुसार हिंदू लोक जीवांचे पुढील ८ वर्ग मानतात.

१. देव – हे उत्तरेकडे राहतात.(हिंदूचेच खास)

२. दैत्य व दानव– दक्षिणेकडे राहतात. हिंदूना विरोध करतात. गाईचा छळ करतात. देव दानव संघर्ष

३. गंधर्व – देवांच्या गायकांचा वर्ग, प्रसंगी ज्या नर्तिका नृत्य करतात त्यांना अप्सरा असे म्हणतात.

४. यक्ष – देवांच्या संपत्तीचे रक्षण करणारा वर्ग

५. राक्षस – अत्यंत कुरुप व ओंगळ

६. किन्नर – मानव देहावर घोडयाचे शिर ठेवल्यास जशी आकृती दिसते त्याप्रकारचे रुप

७. नाग – हे सर्पासारखे दिसतात.

८. विदयाधर – हे मंत्र तंत्र करतात व त्यांना चेटूक करण्याची अघोरी विद्या प्राप्त.[१०७]

वरील गीतेतील प्रतिपादनानुसार गंधर्व वर्गामध्ये गायक, नर्तिका व अप्सरा यांचा समावेश होतो असा उल्लेख सापडतो.

## १.१२. कोल्हाटी जमातीचे ऐतिहासिक स्थान (आदर व मानाचे)–

प्राचीन भारतात मौर्य वंशाला महत्वाचे स्थान आहे. याच वंशातील चंद्रगुप्ताने भारतात प्रथमच प्रथम छत्री साम्राज्याची स्थापना करुन साऱ्या भारतीयांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला. परकीय आक्रमण रोखून भारतात सुव्यवस्था व सुशासन निर्माण करण्याचा प्रयत्न केला. (गुप्तकालाचे समालोचन इ. स. ३०० – ६००)

### १.१२.१. गणिका[१०८] –

तत्कालीन समाजात पुरुषांचे मनोरंजन करणारा स्त्रियांचा जो वर्ग होता त्याला गणिका म्हणत. आजच्या वेश्यांपेक्षा गणिका आपल्या नृत्य गायनाने आणि मोठया चार्तुयाने पुरुषांचे मन राखीत असत. गणिकांना समाजात मानाचे स्थान असल्याचे दिसते.

### १.१२.२. गणिकांचे गुप्तहेर म्हणून कार्य[१०९] –

त्याकाळात वेश्यांना व्यवसायासाठी परवानगी काढावी लागे. सर्वांत सुंदर गणिकेला या व्यवसायाची देखरेख करण्यासाठी नियुक्त केले जात असे. तिला दरमहा पगार दिला जाई. समारंभाप्रसंगी तिला राजदरबारात हजेरी लावावी लागे. सुंदर गणिकांचा उपयोग शत्रुपक्षाकडील माणसे फोडून बातम्या काढण्यासाठी करण्यात येई. समाजात गणिकांना उच्च स्थान होते.

गौतम बुध्दाने बुध्दकालीन प्रसिध्द वारांगना आम्रपाली हिच्या घरी जाऊन आदरातिथ्य स्वीकारल्याचे प्रसिध्द दाखले देता येतील.

जी. बी. शहा (द्वि.आ.२०१३) यांनी वरीलप्रमाणे मांडलेल्या माहितीनुसार गणिका या गुप्तकालामध्ये नृत्यनिपून असून गुप्तहेर म्हणूनही मोलाचे कार्य करीत होत्या.

## १.१२.३. कलावंत व नृत्य मनोरंजनाचे महत्वाचे साधन[११०] –

### पूर्व वैदिक काळ/ ऋग्वेदकाळ –

आर्य भारतात आल्यानंतर ज्या काळास प्रारंभ होतो त्याला पूर्व वैदिक काळ/ऋग्वेद काळ असे म्हणतात. आर्य याचा अर्थ श्रेष्ठ आणि सुसंस्कृत होय.

### मनोरंजनाची साधने –

"वसनो अत्कं सुरभि दृश्ये कं स्वर्णनृतविषिरोबभूथ" हे नेत्या, सुवर्णाचे अत्क धारण केल्याने तू चतुर नर्तकाप्रमाणे शोभत आहे. या ऋग्वेदातील सूक्तावरुन आर्यांच्या मनोरंजनाचे नृत्य हे प्रमुख साधन असावे असे वाटते. विवाह किंवा उत्सवप्रसंगी नृत्याचा कार्यक्रम आयोजित केला जाई. त्यात स्त्री–पुरुष हे दोघेही भाग घेत. नृत्याला संगीताची साथ देण्यात येई. वाद्यामध्ये तंतूवाद्य व आघात वाघ अशी दोन वाद्ये प्रचारात होती. दुंदुभि, वीणा, तुतारी, कर्करी इ. वाद्यांचा ऋग्वेदकाळात वापर होई. ऋग्वेदांतील नववा अध्याय व सामवेद यात बहुतांशी गायन, संगीत यांचीच चर्चा केलेली आहे.

वरील संदर्भांवरुन कोल्हाटी जमात ही कलावंत जमात होती याहीपेक्षा या जमातीचा भारताच्या प्राचीन इतिहासात मोलाचा वाटा व योगदान असलेले पुरावे आपणांस पहावयास मिळतात. या जमातीतील पुरुंषापेक्षाही स्त्रिया स्वातंत्र्यप्राप्ती मध्ये काही अंशी गणिका रुपाने समाविष्ट आहेत.

## १.१२.४. नृत्यांगणेची वारांगणा कशी झाली?

कोल्हाटी जमातीचे स्वातंत्र्यपूर्व स्थान आदर व मानाचे असतानाही या नर्तिकेचे रुपांतर नायकिणी मध्ये कसे झाले याची उकल आपणांस प्रस्तुत संशोधनात पहावयाची आहे. त्यासाठी जातिसंस्थेचे अर्थशास्त्रीय समर्थन आधार देणार आहे.

### जातिसंस्थेचे अर्थशास्त्रीय समर्थन[१११] –

जातिसंस्था ही समाजशास्त्रीयदृष्टया समर्थनीय नाही तर तिचे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेही फायदे होते. एकतर जाती व्यवस्थेत प्रत्येक जातीचे व्यवसाय ठरवून दिलेले असल्याने कोणत्याही व्यक्तिची जीवनवृत्ती ठरविण्याची जबाबदारी व्यक्तीवर येत नाही. तसेच एकच व्यवसाय वंशपरंपरेने करीत राहिल्याने तो व्यवसाय करण्याचे पिंडाचे कौशल्य विकसित होत राहते. त्यामुळे कौशल्य मिळविण्यासाठी धावपळ, खर्च वैगेरे करण्याची गरज नाही. फक्त

एकच जात विशिष्ट व्यवसाय करीत असल्याने स्पर्धा मर्यादित राहत होती. म्हणजेच तीव्र स्पर्धेच्या दोषापासून उदरनिर्वाह सुरक्षित राहत होता. उत्पादकाला बाजारपेठा मिळविण्यासाठी नाना युक्त्या करीत बसावे लागत नव्हते. अन्य जाती हे त्यांच्या उत्पादनाचे गिऱ्हाईक. गिऱ्हाईक म्हणजे निश्चित असल्याने सुरक्षितता किंवा तोटा भिती नव्हती. गावाला ज्या ज्या धंद्यांची जरुर पडेल ते करणाऱ्या जातींनी गावात रहावे आणि गावाने त्यांना पोसावे असा सरळ,सोपा व्यवहार हिंदूच्या अर्थशास्त्रात आहे. समाज आपले पोषण करतो त्या बदल्यात जात समाजात वस्तू व सेवा पुरविते. म्हणून उत्पादन हे नफा नव्हे तर भावनेतून व गरजेतून होत होते. परस्पर पोषण हा अर्थव्यवहाराचा पाया मानला होता. सर्व जातींना त्यांच्या गुणाप्रमाणे व्यवसाय दिले होते. त्यामुळे व्यक्ती आपल्या व्यवसाय बदलून वर्णांतर करणाऱ्यांचा वंश खंडित होतो असे मानले जात होते.

अर्थशास्त्रीय सैध्दांतिक आधार म्हणून वरील जातिसंस्थेचे अर्थशास्त्रीय समर्थन ग्रामीण कोल्हाटी कुटुंबाच्या पारंपारिक दृष्टचक्राच्या व सामाजिक, आर्थिक विकासाच्या अडथळयास संबंधित असल्यासारखे वाटते.

## १.१३. कोल्हाटी जमातीची वैशिष्टये –

१. महाराष्ट्रात हा समाज कलावंत समाज म्हणून ओळखला जातो.

२. नाचगाणे करणारी, कसरतीचे खेळ करुन गावगाडयातील लोकांची करमणूक करुन उपजिवीका करणारी जमात होय.[११२]

३. मनोरंजनाचे काम करत असल्याने उत्तर भारतामध्ये 'नट' या नावाने ओळखले जाते.[११३]

४. कोल्हाटी जमातीची आर्थिक जबाबदारी प्रामुख्याने स्त्री वर्गाकडे असते.[११४]

५. या जमातीतील बहुतांशी नृत्याबरोबरच वेशा व्यवसाय करताना आढळतात.[११५]

६. मुलगी वयात आल्यावर तू वेशावृत्ती स्वीकारणार की लग्न करणार असे विचारले जाते.

७. विधवेला लग्न करण्यास परवानगी आहे.

८. घटस्फोटाला परवानगी नाही.

९. जमातीतील वाद, संघर्ष, कोर्टात जात नाहीत.

१०. कोल्हाटी जमातीतील जातपंचायतीत स्त्रियांना विशेष स्थान किंवा महत्व दिले जाते.

११. इतर जमातीपेक्षा या जमातीमध्ये स्त्रीविषयक नियम जातपंचायती मध्ये शिथिल दिसून येतात.

१२. जमातीची एक सांकेतिक भाषा वापरली जाते. ती गुप्त भाषा ओळखली जाते.

१३. कोल्हाटी जमातीमध्ये बारा कुळे आहेत ती पुढीलप्रमाणे–

१. गांगवा, २.काळवा, ३. भोरजा, ४. मुसावत, ५. नय्या, ६. कच्चर, ७. रत्तबा, ८.बिचवा, ९. चंदनवाले, १०. विरपणकर, ११. ब्राम्हणवाले, १२. छडीवाले.[११६]

## १.१३.१ कोल्हाटीण स्त्री विषयक दृष्टीक्षेप –

मराठी शब्दकोश खंड–२ मध्ये ‘कोल्हाटीण–दोरीवर कसरत करणाऱ्या भिक्षेकऱ्याची एक जात’.

कोल्हाटयाचा खेळ, नाच या अर्थावरुन असे लक्षात येते की कोल्हाटी जमातीतील कोल्हाटीण ही या कसरतीच्या खेळातील तसेच नृत्य प्रकारातील प्रमुख असते. प्रत्येक भटक्या जमातीत स्त्रीला दुय्यम स्थान दिले गेलेले आहे. अपवाद फक्त कोल्हाटी समाजातील स्त्रीचा आहे. कोल्हाटी जमातीतील आर्थिक भार हा बहुतांशी भागामध्ये स्त्रीच्या डोक्यावरच असल्याचे अनेक ठिकाणी उल्लेख केल्यावरुन दिसून येते. सद्यस्थिती काही प्रमाणात बदललेली असली तरीही पार्श्वभूमी अभ्यासताना कोल्हाटी स्त्रीची आर्थिकारणातील भूमिका लक्षात घ्यावी लागते.

कोल्हाटी स्त्रीला नायकीन असेही संबोधले जाते. प्राचीन काळातील नर्तिका, गणिका, मनोरंजन करणाऱ्या, कसरतीचे खेळ करणे तसेच अनेक शूरत्वाचे खेळ करणे अशी त्यांची ओळख दिसते. पूर्वी घेतलेल्या संदर्भावरुन असेही दिसून येते की प्रत्येक कोल्हाटीण स्त्री ही नायकिण नसते. तिला वयात आल्यावर तिच्या मर्जीनुसार हा पारंपारिक व्यवसाय स्वीकारण्याची अनुमती दिली जाते. तिची इच्छा जर लग्न करण्याची असेल तर तिची चांगली काळजी घेतली जाते. जर तिने वेश्यावृत्ती स्वीकारली तरच तिला नायकिण असे संबोधले जाते म्हणजेच या जमातीमध्ये गृहिणी कोल्हाटी स्त्री तर कलावंतीन नायकीन कोल्हाटी स्त्री असे दोन प्रकार पडतात.

### १.१३.२. कोल्हाटी जमातीतील 'गृहिणी स्त्री' ची वैशिष्टये –

जेव्हा वडिलांच्या अनुमतीने वयात आल्यावर मुलीने लग्न करण्याचे ठरविले जाते तेव्हा तिला अनेक बंधने लागू होतात. घरच्यांच्या संमतीने, जातीच्या पध्दतीने विवाह करुन दिला जातो.

१. विवाहीत कोल्हाटींण स्त्री पुरुषांपुढे नर्तन करत नाही.

२. कोल्हाटींण स्त्री गोंदकाम करण्यात कुशल असतात.[११७]

३. स्त्रियांना देवदेवतांचे खूप आकर्षण असते.

४. नैसर्गिक ऋतुमध्ये स्त्रियांना घरापासून वेगळे ठेवण्यात येते.

५. स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवले जाते.

६. स्त्रिया अनेक अन्याय सहन करतात परंतु त्याला विरोध करत नाहीत.

७. गृहिणी व नायकिणीच्या अधिकारांमध्ये फरक दिसतो.

### १.१३.३. कोल्हाटी जमातीतील कलावंतीन(नायकीण) स्त्रीची वैशिष्टये–

१. नायकीण स्त्री अतिशय सुंदर व देखणी असते.

२. या स्त्रियांचे राहणीमान चांगल्या प्रतीचे असते. उदा. अत्तर लावणे, चंदनाने स्नान करणे, उत्कृष्ट साडया नेसणे व विशिष्ट पध्दतीने नेसणे.[११८]

३. पूर्वी नायकीण नऊवारी काष्टी साडीच नेसत असे. कालांतराने बदल होताना दिसतो.

४. या स्त्रीला भाऊ, बहिण, आई, वडिल इ.चा सांभाळ करणे बंधनकारक असते.

५. त्यांना पारंपारिक व्यवसायास सहकार्य करुन समाजात प्रतिष्ठा मिळवण्याचा प्रयत्न करावा लागतो.

६. या जमातीतील कुटुंबामध्ये नायकिणीला मानपान असतो. कारण त्या परिवाराची कमावती म्हणून कुटुंब प्रमुख असते.

७. महाराष्ट्रात विशेषतः तमाशा फडात नाचणाऱ्या, गाणाऱ्या बहुतेक स्त्रिया याच समाजाच्या आहेत. त्यांचे स्वतःच्या मालकीचे तमाशा फड आहेत. तर काहींची स्वतःच्या नावावर तमाशा, कलाकेंद्र आहेत.

८. कलावंतीन स्त्रीला देव–देवतांचे विशेष महत्व असते. त्यामध्ये नवस फेडणे, जत्रा करणे इ. प्रकार दिसतात.

९. कोल्हाटी जमातीच्या जातपंचायतीमध्ये पुरुषांच्या बरोबरीने नायकीणीला मान असतो.[११९]

**१.१३.४. आशादायक परिवर्तन–**

१. जातपंचायत कायदा नुसार कोल्हाटी जमातीची जातपंचायत पूर्णपणे बंद करण्यात आली आहे.

२. जमातीतील लोक न्यायदानासाठी कोर्ट न्यायालय चा आधार घेऊ लागले आहेत.

३. मृत्यूविधी करीत असताना दफन न करता अग्निदाहिनी दिली जाते.

४. मृत्यूविधीनंतर श्राध्द व तेराव्या ऐवजी हिंदू संस्कृतीप्रमाणे दशक्रिया केली जाते.

५. दशक्रिया विधीसाठी दारु व मांसाहाराऐवजी शाकाहारी जेवण केले जाते.

६. जातपंचायत नष्ट झाल्याने खण, दंड, मद्य, मानपान इ.बाबींचा वापर सर्रास कमी होवून कोणाचेही वर्चस्व नसून स्वातंत्र्य निर्माण झाले आहे.

७. परंपरेने चालत आलेल्या काही प्रथा क्षीण होऊन आधुनिकतेकडे वाटचाल झालेली दिसते.

## १.१४. कोल्हाटी जमातीची लोकसंख्या –

**१.१४.१. भारतातील कोल्हाटी जमातीची लोकसंख्या –** कोल्हाटी जमातीची स्वतंत्रपणे जनगणना झालेली दिसून येत नाही.

**१.१४.२. महाराष्ट्रातील कोल्हाटी जमातीची लोकसंख्या –** जनगणनेच्या अभावामुळे पथदर्शक अभ्यासानुसार महाराष्ट्रात अंदाजानुसार कोल्हाटी जमातीची लोकसंख्या ७० हजार ते ८० हजाराच्या दरम्यान आढळून येते.

**१.१४.३. अहमदनगर जिल्हयाची कोल्हाटी जमातीची लोकसंख्या –** जनगणनेच्या अभावामुळे प्रत्यक्ष पाहणीनुसार ५ हजार लोकसंख्या आढळून आली.

## १.१५. भटक्या–विमुक्त जाती जमातींसाठी उपलब्ध असणाऱ्या योजना[१२०]

महाराष्ट्र शासन भटक्या–विमुक्त जाती जमातींसाठी खालीलप्रमाणे योजना व शिष्यवृत्ती देते.

**१.१५.१. राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ–**

राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयातंर्गत भारत सरकारचा उपक्रम आहे. दि. १३ जानेवारी १९९२ रोजी कंपनी कायदा १९५६, विभाग २५ अंतर्गत या महामंडळाची स्थापना एक लाभमुक्त कंपनीच्या स्वरुपात केली

आहे. विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागासप्रवर्गातील लोकांच्या आर्थिक व विकासात्मक प्रगतीकरीता हे महामंडळ अर्थसहाय्य प्रदान करणाऱ्या राज्यस्तरीय महामंडळांना अधिकृत वाहिनी म्हणून सहकार्य करते. राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ,नवी दिल्ली यांचेकडून खालील दिलेल्या विभागांकरिता अर्थसहाय्य योजनांमधून उपलब्ध करुन दिलेले अर्थसहाय्य राज्यस्तरीय महामंडळाकडून लाभार्थ्यांना कमी व्याजदरावर उन्नती करिता दिले जाते.

**जिल्हा कार्यालये–** ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर

**अन्य कार्यालये–** मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा,सोलापूर

**अन्य कार्यालये–** जळगाव, अहमदनगर, नंदूरबार, औरंगाबाद, बीड, परभणी, जालना, लातर, नांदेड, उस्मानाबाद, हिंगोली, धुळे

**अन्य कार्यालये–** बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, अमरावती, अकोला, नाशिक

**१.१५.२. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित)–**

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ(मर्यादित) हे महामंडळ राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ,नवी दिल्ली यांचे सोबत अधिकृत वाहिनी म्हणून आपले कामकाज करत. त्यांचे खालील कर्ज योजना महामंडळाच्या कर्ज योजनांसोबत राबवीत आहे.

१. **बीज भांडवल योजना–** बीज भांडवल योजना अर्जदाराला स्वतःचा व्यवसाय/उद्योगधंदा सुरु करण्याची उत्कृष्ट संधी देत आहे.

| | |
|---|---|
| प्रकल्प मर्यादा – | रुपये ५,००,००० |
| बँक भाग (%)– | ७५% |
| महामंडळाचा भाग(%)– | २५% |
| व्याज दर(%) | ४% |
| परतफेड | ५ वर्षे |

**२. थेट कर्ज योजना–** अर्जदाराला स्वतःचा छोटेखानी/फिरता व्यवसाय/उदयोगधंदा सुरु करण्यासाठी सहजपणे आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणारी योजना

| | |
|---|---|
| प्रकल्प मर्यादा – | रुपये २५,००० |
| बँक भाग (%)– | – |
| महामंडळाचा भाग(%)– | १००% |
| व्याज दर(%) | २% |
| परतफेड | ४ वर्षे |

३. **मुदती कर्ज योजना–** या महामंडळाने अर्जदारासाठी प्रकल्प मर्यादा रु १० लाखापर्यंत आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देत एक उत्कृष्ठ संधी प्रदान केली आहे.

| | |
|---|---|
| प्रकल्प मर्यादा – | रुपये १० लाख |
| बँक भाग (%)– | ८५% |
| महामंडळाचा भाग(%)– | १०% |
| लाभार्थीचा सहभाग – | ५% |
| N.B.C.F.D.C. व्याजदर ५ लाखांपर्यत – | ६% |
| N.B.C.F.D.C. व्याजदर ५ लाखांपेक्षा अधिक – | ८% |
| महामंडळ व्याज दर(%) | २% |
| परतफेड कालावधी | ४ वर्षे |

**४. मार्जिन मनी कर्ज योजना–**

| | |
|---|---|
| प्रकल्प मर्यादा – | रुपये १० लाख |
| N.B.C.F.D.C. सहभाग – | ४०% |
| बँक सहभाग (%)– | ५०% |
| महामंडळाचा भाग(%)– | ५% |
| लाभार्थीचा सहभाग – | ५% |
| N.B.C.F.D.C. व्याजदर ५ लाखांपर्यत – | ६% |
| N.B.C.F.D.C. व्याजदर ५ लाखांपेक्षा अधिक – | ८% |
| महामंडळ व्याज दर(%) | ४% |

परतफेड कालावधी ४ वर्षे

**५. शैक्षणिक ऋण कर्ज योजना –**शिक्षण, उच्च शिक्षण व तांत्रिक प्रशिक्षण घेण्यासाठी इच्छुक प्रत्येक विदयार्थ्यांसाठी शैक्षणिक ऋण योजना सुवर्ण संधी प्रदान करते.

भारतातील शिक्षणासाठी – १० लाख

परदेशी शिक्षणासाठी – २० लाख

N.B.C.F.D.C. व महामंडळ व्याजदर – ४%

**६. सक्षम योजना–** व्यावसायिक शिक्षण घेतलेल्या सुशिक्षित बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणारी उत्कृष्ट कर्ज योजना आहे.

प्रकल्प मर्यादा – महत्तम १० लाख

N.B.C.F.D.C. व्याजदर ५ लाखांपर्यत – ६%

N.B.C.F.D.C. व्याजदर ५ लाखांपेक्षा जास्त –८%

महामंडळ व्याजदर – ४%

परतफेड कालावधी – ५ वर्षे

७. **शिल्प संपदा योजना–** कलाकार आणि कारागिर यांना आपली कला जपण्यास आणि आत्मनिर्भर बनविण्यासाठी शिल्प संपदा योजना फार फायदेशीर ठरते.

प्रकल्प मर्यादा महत्तम – १० लाख

N.B.C.F.D.C. सहभाग – ८५%

महामंडळ सहभाग – १०%

लाभार्थींचा सहभाग – ५%

N.B.C.F.D.C. व्याजदर ५ लाखांपर्यत – ६%

N.B.C.F.D.C. व्याजदर ५ लाखांपेक्षा जास्त –८%

महामंडळ व्याजदर – ४%

परतफेड कालावधी – ५ वर्षे

**८. स्वर्णिम योजना(महिलांकरिता)–** स्त्रियांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी स्वर्णिम योजना तयार करण्यात आली आहे.

प्रकल्प मर्यादा महत्तम १ लाख

N.B.C.F.D.C. सहभाग – ९५%

महामंडळ सहभाग – ५%

N.B.C.F.D.C. व्याज – ५%

महामंडळ व्याजदर – ४%

परतफेड कालावधी – ५ वर्षे

**९. सूक्ष्म वित्त योजना–** सूक्ष्म वित्त योजना योजना तळागाळापर्यंत पोहचवून लाभार्थींना उन्नतीकरिता र्मादर्शन व सहाय्य करते. महिलांकरिता उपयुक्त असलेल्या योजनांपैकी एक योजना आहे.

प्रकल्प मर्यादा महत्तम ५०,०००

N.B.C.F.D.C. सहभाग – ९०%

महामंडळ सहभाग – ५%

लाभार्थींचा सहभाग – ५%

N.B.C.F.D.C. व्याजदर – ५%

महामंडळ व्याजदर – ४%

परतफेड कालावधी – ३ वर्षे

१०. **महिला समृध्दी कर्ज योजना–** ही महिलांसाठींची एक समृध्द कर्ज योजना आहे.

प्रकल्प मर्यादा महत्तम–५०,००० रुपये

N.B.C.F.D.C. सहभाग – ९५%

महामंडळ सहभाग – ५%

N.B.C.F.D.C. व्याज – ४%

महामंडळ व्याजदर – ४%

परतफेड कालावधी – ३ वर्षे

११. **कृषी संपदा योजना–**

मुख्यतः शेतकऱ्यांकरिता कृषि संपदा योजना तयार करण्यात आलेली आहे.

प्रकल्प मर्यादा महत्तम– ५०,००० रुपये

N.B.C.F.D.C. सहभाग – ९५%

लाभार्थी सहभाग – ५%

N.B.C.F.D.C. व्याज – ४%

परतफेड कालावधी – ५ वर्षे

**१.१५.३. शैक्षणिक योजना[१२१] –**

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून खालील प्रकारच्या शिष्यवृत्ती दिल्या जातात.

१. विजाभज विद्यार्थ्यांना राज्य सरकारची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती

२. विमाप्र विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व इतर शैक्षणिक सवलती

३. शिक्षण फी परीक्षा फी प्रदाने(विजाभज)

४. इ.१०वीच्या परिक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इ.११वी मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच इ.१२वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज/विमाप्र वर्गाच्या मुला–मुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती

५. इ.८वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

६. सैनिकी शाळेत प्रशिक्षण घेणाऱ्या विजाभज/विमाप्र विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता

७. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून विजाभज व विमाप्र प्रवर्गातील उमेदवारांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची योजना(मागेल त्याला प्रशिक्षण)

८. माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या विजाभज/विमाप्र विद्यार्थ्यांना शिक्षण फी, परीक्षा फी प्रदान करणे.

९. माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या विजाभज/विमाप्र विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करणे.

१०. इ.५वी ते ७वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज/विमाप्र विद्यार्थीनींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

११. इ.१०वी व १२वी च्या परिक्षेत राज्यात व बोर्डात प्रथम येणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना स्व.वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार प्रदान करणे.

१२. विमुक्त जाती भटक्या जमाती आश्रमशाळा

१३. विमुक्त जाती भटक्या जमाती विद्यार्थ्यांसाठी निवासी कनिष्ठ महाविद्यालये

१४. विद्यानिकेतन शाळा चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान योजना

१५. ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान

१६. वसंतराव नाईक तांडा सुधार योजना

१७. वाहन चालक प्रशिक्षण योजना (विजाभज, इमाव व विमाप्र)

१८. विमुक्त जाती भटक्या जमाती या घटकांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना.

## १.१६. सारांश –

प्रकरण पहिले हे प्रस्तावनेचे प्रकरण असल्याने यामध्ये भटक्या विमुक्त जमातीपैकी कलावंत म्हणून ओळखली जाणारी कोल्हाटी जमातीची ओळख करुन देण्यात आली आहे. जमातीचा अभ्यास करत असताना समाज आणि संस्कृती यांचा परस्परपूरक संबंध असल्याचे दिसून येते. जाती संस्थेच्या उगमापासून ते कोल्हाटी जमातींच्या वैशिष्टयांचा अभ्यास या प्रकरणात केलेला आहे. वर्ण व्यवस्था म्हणजेच चार्तुवर्णाच्या संबंधातून जातींची निर्मिती झाल्याचे संदर्भ आढळतात. जाती व्यवस्था केवळ भारतातच असून ती गुंतागुंतीची आहे. जाती निर्मितीला व्यवसाय हा मुख्य आधार मानला जातो. तसेच शुद्रांची अवहेलना वेद, शास्त्र आणि धर्म ग्रंथांपासूनच झालेली दिसते.

कोल्हाटी जमात ही शुद्र वर्णात गणली जात असे. महाराष्ट्रातील कोल्हाटी समाज हा उत्तर व मध्य भारत, कर्नाटक या ठिकाणी आढळतो. कोल्हाटी जमात मिश्रणाने बनलेली आहे. या समाजाचे इतिहासकालीन संस्कृतीमध्ये गायन, नर्तिका, गंधर्व, अप्सरा, गुप्तहेर, गणिका तसेच संत साध्वी या उल्लेखांमुळे इतिहासातील स्थान आदराचे व मानाचे असल्याचे दिसून येते. प्राचीन काळापासून कसरतीचे खेळ व नृत्य करुन लोकांची मनोरंजन करुन उपजीविका करणारी ही जमात आहे म्हणून उत्तर भारतामध्ये या जमातीला नट म्हणून ओळखले जाते. अनेक ठिकाणी तसेच शासनाच्या यादीमध्ये कोल्हाटी जमातीला उपजात किंवा पोटजात म्हणून डोंबारी जात ओळखली जाते. जमातीतील नृत्य करणाऱ्या स्त्रियांकडून क्वचित प्रसंगी वेश्या व्यवसाय केला जातो. कारण मुलगी वयात आल्यावर तिच्या संमतीने तिचा विवाह केला जातो. अथवा तिला संमतीने नृत्यांगना व्यवसायामध्ये पारंगत केले जाते. या जमातीसाठी

उपलब्ध असणाऱ्या शासकीय योजनांचे प्रमाण अल्प आहे व ज्या योजना उपलब्ध आहेत त्या जमातीपर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. त्यासाठीचे प्रयत्न वाढविणे गरजेचे आहे.

## संदर्भ ग्रंथ(References) –


१. जी. बी. शहा, ‘प्राचीन भारताचा राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास’, प्रशांत प्रकाशन, जळगाव, द्वि.आ. २०१३, पृ. क्र. ३०

२. व्हटकर नामदेव, ‘भारतातील जातीभेद आणि त्यावर उपाय’, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, तृ.आ. १९२२ पृ.क्र.२६ Cited in कदम ना.धो., ‘महाराष्ट्रातील भटका समाज, संस्कृती व साहित्य’, प्रतिमा प्रकाशन, पुणे प्र.आ.१९९५, पुर्नमुद्रण २०१३ पृ. क्र.३

३. (देशपांडे अरविंद, इतिहासाचार्य वि.का. राजवाडे) Cited in यशवंत सुमंत, द. दि. पुंडे, ‘महाराष्ट्रातील जातिसंस्थेविषयक विचार’, प्रतिमा प्रकाशन, पुणे प्र. आ.१ मे १९८८ पुर्नमुद्रण १४ जुलै २००६ पृ. क्र.९०

४. ABERCROMBIA, NICHOLAS & Others, The Penguin Dictionary of Sociology, Penguin Books publication, Ouckland, 1984, p.no.201

5. IAN BUCHANAN, Oxford Dictionary of Critical Theory, Oxford publication, New York, 2010, p.no. 441

६. रावत हरिकृष्ण, समाजशास्त्र विश्वकोश (हिंदी), रावत पब्लिकेशन जयपूर दिल्ली, पुर्नमुद्रण, २००५ पृ.क्र. ३५३

७. मराठी विश्वकोश खंड–१८, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई १५ ऑगस्ट २००९ पृ.क्र. ६९२

८. तत्रैव, पृ.क्र.६९३

९. इरावती कर्वे, ‘आमची संस्कृती’, देशमुख आणि कंपनी, प्रा.लि.,सदाशिव पेठ, पुणे प्र.आ.१९६०, द्वि.आ.२००६, पृ.क्र.५

१०. तत्रैव, पृ.क्र.८

११. K. S. Singh, The Tribal situation In India, Indian Institute of Advanced study, Delhi, F. P.1972, R.P. 1986, p.no.7

१२. Shakuntala Devi, ‘Caste system In India’ pointer publisher, Jaipur (India), F.P. 1999, p.no.63

१३. मु. ब. शहा संपादन, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य खंड (७–८) समाजकारण आणि राजकारण, राजवाडे संशोधन मंडळ,पुणे, प्र.आ.१९९८ पृ. क्र. ८

१४. तत्रैव, पृ. क्र. ६४

१५. तत्रैव, पृ. क्र. ६५

१६. श्री. व्यं. केतकर, 'भारतीय समाज शास्त्र', वरदा बुक्स,पुणे (प्रकाशन क्र.६४४) प्र.आ.१९३६, द्वि.आ.१९९४, पृ.क्र.१८४

१७. इरावती कर्वे, 'हिंदू समाज–एक अन्वयार्थ', मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्र. आ. १९७५, पृ. क्र.३५

१८. थापर रोमिला, 'हिस्ट्री ऑफ इंडिया भाग–१', पृ. क्र. २४ Cited in बी. एन. सरदेसाई, मराठयांचा सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ. २००१, पृ. क्र. ३८

१९. अलबेरुनी, 'अलबेरुनीचा भारत खंड पहिला', साहित्य अॅकॅडमी, नवी दिल्ली प्र. आ. १९८६, द्वि. आ. २००६, तृ. आ.२००९, पृ. क्र. ६७

२०. तत्रैव, पृ. क्र. ६८

२१. S.V. Ketkar, 'History of Caste In India' Messrs, Taylor & Carpenter Book sellers & publishers, ITHACA, F.P.1909, p.no.12-13

२२. मो. वि. पटवर्धन, 'वर्ण व जाती', विदर्भ मराठवाडा बुक कंपनी प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९६६ पृ. क्र. १७

२३. तत्रैव, पृ. क्र. ४५

२४. नामदेव व्हटकर, 'भारतातील जातीभेद आणि त्यावर उपाय', यशश्री प्रकाशन, कोल्हापूर, द्वि.आ.१९६७, पृ. क्र. १९

२५. Shakuntala Dev, F.P. 1999 Op.Cit., p.no.1

२६. टि. बी. खिलारे, प्रभाकर नानावटी, 'जातिभेद व आरक्षण', रॅशनॅलिस्ट फाऊंडेशन, पुणे प्र.आ.२०११, पृ. क्र. ७

२७. Shakuntala Devi, F.P.1999 Op. Cit., p.no.2

२८. J. H. Hutton, 'Caste In India' ( It's nature, function & origins) R. Dayal, Oxford University Press, Bombay, R.P.1963, p. no. 46
२९. भारतातील संस्कृती कोश खंड–४
३०. S. V. Ketkar, F.P.1909 Op. Cit. p. no.15
३१. इरावर्ती कर्वे, प्र.आ.१९७५ Op. Cit. p. no.111
३२. मा. म. देशमुख, 'प्राचीन भारताचा इतिहास', विश्वभारती प्रकाशन, नागपूर, प्र.आ.जुलै १९६७, द्वि. आ. जून १९७२, तृ. आ. जानेवारी १९९८, पृ.क्र.८१
३३. नामदेव व्हटकर द्वि.आ.१९६७ उ.नि.पृ.क्र.२
३४. मा. म. देशमुख प्र.आ.१९६७, पुर्नमुद्रण १९९८ उ.नि.पृ.क्र.८२
३५. Shakuntala Devi, F.P.1999 Op.Cit., p.no.64
३६. K. S. Singh, 'The Tribal situation In India', Shri Narendra Prakash Jain at Shri Jainendra Press, Delhi. F.P.1972, R.P.1986, p. no.7
३७. Ibid, p.no.8
३८. इरावती कर्वे (प्र.आ.१९७५) उ.नि. पृ.क्र.१५
३९. G. S. Ghurye, 'Caste & Race in India, Kegan paul, Trench, Trubner & Co. Ltd., LONDON, F.P. 1932, p. no.1
४०. त्रिं. ना. अत्रे, 'गावगाडा', वरदा बुक्स, पुणे, प्र. आ.१९१५, तृ. आ.१ जानेवारी १९८९, पुनर्मुद्रण १ जानेवारी १९९५, पृ.क्र.१५
४१. बी. एन. सरदेसाई (प्र.आ.२००१), उ.नि.पृ.क्र.४२
४२. इरावर्ती कर्वे (प्र.आ.१९७५) उ. नि. पृ.क्र.१११
४३. बी. एन. सरदेसाई (प्र.आ.२००१) उ. नि.पृ.क्र.१६४
४४. तत्रैव पृ. क्र.१६५
४५. त्रिं. ना. आत्रे (पुर्नमुद्रण १९९५), उ.नि.पृ.क्र.१७
४६. तत्रैव, पृ. क्र.१६
४७. तत्रैव, पृ. क्र.३८

४८. धनंजय कीर, ‘ महात्मा जोतिराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक’,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १८८९, पुर्नमुद्रण १९३८ पृ. क्र. १३५

४९. नागनाथ कोत्तापल्ले, ‘ज्योतीपूर्व’, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.जुलै २०००, पृ. क्र. १९४

५०. B. R. Ambedkar, Annihilation of Caste(speech prepared) Vol-1, Navayana publishing pvt. Ltd., New Delhi, F.P.1936 p. no.74 -75

५१. (आमचे टीकाकार : ब. भा. २९ जुलै १९२७) Cited in गंगाधर पानतावणे, पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अभिजित प्रकाशन, नागपूर, प्र.आ.१९८७, पृ.क्र. ७५

५२. (मुक्ता साळवे, मांग–महाराच्या दुःखाविषयी निबंध, ज्ञानोदय नियतकालिक, १५ फेब्रुवारी १८५५) Cited in जी. ए. उगले, ज्ञानोदय आणि म. फुले,कॅन्डीर प्रकाश, वर्धा, मार्च २००४ पृ. क्र १०८

५३. नाना ढाकूलकर, ‘ महात्म्यांचा महात्मा’, विजय प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १३ जानेवारी २००० पृ. क्र. ७६

५४. एस. एस. गाठाळ, ‘भारताचा इतिहास’ (इ.स.६५० पर्यंत) कैलाश प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. जुलै २००३, पृ. क्र. ३०–३१

५५. आ. ह. साळुंखे, ‘वैदिक धर्मसूत्रे आणि बहुजनांची गुलामगिरी’, एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर,प्र.आ.ऑगस्ट १९९८, द्वि. आ. डिसेंबर १९९८ पृ. क्र.१०८

५६. (न शूद्रे किंचित। २.३.१.) Cited in तत्रैव, पृ.क्र.१०९

५७. (तेषां वर्ण–आनुपूर्व्येण चतस्त्रः भार्याःब्राम्हणस्य। १.१६.२) Cited in तत्रैव पृ.क्र.१०९.

५८. (कृष्ण वर्णा या रामा रमणाय एव न धर्माया १८.१८) Cited in तत्रैव पृ. क्र. ११०

५९. आर. जी. दांडगे, ‘भटक्या विमुक्तांचे प्रश्न व उपाय’, सुगावा प्रकाशन, पुणे प्र.आ.जून २००२, द्वि. आ. ऑगस्ट, २०१४, पृ. क्र. ३८

६०. ना. धो. कदम, (पुर्नमुद्रण २०१३) उ.नि.पृ.क्र.५

६१. (दै. संचार, सोलापूर, दि. २९–३–१९८९ पृ. क्र.२९) Cited in तत्रैव पृ. क्र. १३

६२. तत्रैव, पृ. क्र. ३१

६३. लक्ष्मण माने, 'भटक्यांचं भारुड', ग्रंथाली प्रकाशन, प्र. आ. २५ डिसेंबर २००३, पुर्नमुद्रण २००६ पृ. क्र. २७

६४. तत्रैव, पृ. क्र.१५

६५. रामनाथ चव्हाण, 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग', आशय प्रकाशन, पुणे प्र. आ. १९८९, चौथी आवृत्ती २०१४ पृ. क्र. १३

६६. (संशोधन लेख – विनायक लष्कर – सामाजिक वर्जितता आणि महाराष्ट्रातील भटके – विमुक्त) Cited in आर.जी.दांडगे (प्र.आ.जून २००२, द्वि. आ. ऑगस्ट, २०१४), उ. नि. पृ. क्र. ९

६७. तत्रैव, पृ. क्र.९

६८. ना. धो. कदम,(पुर्नमुद्रण २०१३) उ. नि. पृ. क्र. २१७–२१८

६९. संपादक द. ह. अग्निहोत्री, अभिनव मराठी– शब्दकोश खंड–२,व्हिनस प्रकाशन, पुणे, प्र. आ.१९८५, पृ. क्र. १६७

७०. R. V. Russell, 'The Tribes & Castes of the central provinces of India', Vol-III,Cosmo publications, Delhi, F.P. 1916, R.P. 1975 p. no. 527.

७१. K. S. Singh, 'People of India Maharashtra', popular prakashan Pvt. Ltd. Mumbai, F.P.2004, p. no.1078

७२. रामनाथ चव्हाण, 'भटक्या विमुक्तांची जातपंचायत खंड–१' देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे प्र.आ. २००२, पृ. क्र. ७१

७३. त्रिं. ना. आत्रे (पुर्नमुद्रण १९९५), उ. नि. पृ. क्र.१२७

७४. R. V. Rusell (F.P. 1916, R.P. 1975), Op. Cit., p. no. 527

७५. R.E.Enthoven, 'The Tribes & Castes of Bombay', Asian Education services, New Delhi, F.P. 1922, R.P. 1990 p. no. 237

७६. Syed Siraj Ul Hassan, 'The Caste & Tribes of H.E.H. The Nizam's Dominions, Vol-I, The Time Press Bombay, F.P.1920, p. no. 181

७७. K. S. Singh, (F.P.2004) Op.Cit., p. no. 1078

७८. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, 'मराठी विश्वकोश खंड ४', सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई प्र. आ.१९७६),पृ. क्र.३६७

७९. Gazzater of the Bombay Presidency (Ahamadnagar District) Vol XVII Gov. Central Press, Bombay,1884, p.no.180

८०. रामनाथ चव्हाण, 'जाती आणि जमाती', मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे, प्र. आ. मार्च १९८९, द्वि. आ. सप्टें.१९९०, तृ. आ. फेब्रु. २०००, पृ. क्र. ३४

८१. रामनाथ चव्हाण (प्र.आ.मार्च २००२), उ. नि.,पृ. क्र. ७१

८२. गोविंद कालेलकर, 'मुंबई इलाख्यातील जाती', वरदा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९२८, द्वि. आ. १९९९, पृ. क्र. ४१

८३. R. V. Russell, ( R.P.1975) Op .Cit. p. no. 528

८४. R. E. Enthoven, ( F.P.1922, R.P. 1990) Op. Cit. p. no. 238

८५. Syed Siraj Ul Hassan (F.P.1920) Op.Cit. p.no.182

८६. मराठी विश्वकोश खंड-४ (प्र.आ.१९७६), उ. नि. पृ. क्र. ३६७

८७. रामनाथ चव्हाण (प्र.आ.२००२) उ. नि. पृ. क्र. ३४

८८. तत्रैव पृ. क्र. ७३

८९. गोविंद कालेलकर (पुर्नमुद्रण १९९९), पृ. क्र. ४१

९०. तत्रैव, पृ. क्र. ४१

९१. मराठी विश्वकोश खंड-४ (प्र.आ.१९७६) उ. नि. पृ. क्र. ३६७

९२. रामनाथ चव्हाण (प्र.आ.२००२), उ. नि. पृ. क्र. ७६

९३. इरावर्ती कर्वे (प्र.आ.१९७५), उ.नि. पृ. क्र.१६

९४. नामदेव व्हटकर (द्वि.आ.१९६७), उ. नि. पृ. क्र. २४

९५. रामनाथ चव्हाण(प्र. आ.१९८९, तृ. आ. फेब्रुवारी २०००), उ. नि. पृ. क्र. ३८

९६. प्रभाकर मांडे, 'गाव गाडयाबाहेर', गोदावरी प्रकाशन, अहमदनगर, पुर्नमुद्रण २६ जानेवारी २०१७, पृ. क्र. ११५

९७. रामनाथ चव्हाण (प्र. आ. १९८९, तृ. आ. फेब्रुवारी २०००), उ.नि.पृ.क्र.३९

९८. R. E. Enthoven (F.P.1922, R.P. 1990) Op.Cit. p.no.239

९९. प्रभाकर मांडे, (पुर्नमुद्रण २६ जानेवारी २०१७) उ.नि. पृ.क्र. ११२

१००. गो. ग. मुसळे, अखिल महाराष्ट्र कोल्हाटी समाज सेवासंघ, ऐतिहासीक स्मरणिका, २१ डिसेंबर १९९८, पृ. क्र. ६१

१०१. प्रभाकर मांडे, (पुर्नमुद्रण २६ जानेवारी २०१७) उ.नि. पृ.क्र. ११०

१०२. गो. ग. मुसळे (२१ डिसेंबर १९९८)उ.नि. पृ. क्र. ५४

१०३. तत्रैव, पृ. क्र. ६७

१०४. R.V.Russell (R.P.1975).Op.Cit. p.no.528

१०५. रामनाथ चव्हाण (प्र.आ.२००२), उ.नि.पृ.क्र.७४–७५

१०६. ना.धो.कदम (पुर्नमुद्रण २०१३), उ.नि.पृ.क्र.१७१

१०७. अलबेरुनी (प्र.आ.१९८६, पुर्नमुद्रण २००९), उ.नि.पृ.क्र.६७

१०८. जी.बी.शहा (द्वि.आ.२०१३), उ.नि.पृ.क्र.३०२

१०९. तत्रैव, पृ. क्र. २१६

११०. तत्रैव, पृ. क्र.१११

१११. गो. म. जोशी, 'हिंदूंचे अर्थशास्त्र भाग पहिला', हिंदू संस्कृती, ग्रंथ संपादक व प्रकाशक मंडळ, नागपूर (१९३७), पृ. क्र. २१९–२३०

११२. रामनाथ चव्हाण (प्र.आ.२००२) उ.नि.पृ.क्र.७१

११३. R. V. Russell (R.P.1975) Op.Cit. p.no.527

११४. त्रिं. ना. आत्रे (प्र.आ.१९१५,पुर्नमुद्रण १९९५) उ.नि.पृ.क्र. २५३

११५. R. E. Enthoven ( F.P.1922, R.P. 1990) Op. Cit. p.no.327

११६. रामनाथ चव्हाण (प्र.आ.२००२), उ.नि. पृ. क्र.७३

११७. Syed Siraj Ul Hassan (F.P.1920) Op. Cit. p.no.184

११८. Ibid, p. no. 182

११९. रामनाथ चव्हाण (प्र.आ.२००२), उ. नि. पृ. क्र.८३

१२०. VNVJNTDC(http://www.vnvjntdc.co.in)/कर्जयोजना

१२१. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुण

# प्रकरण दुसरे

## संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन (**Review of Literature**)

| | |
|---|---|
| २.१ | प्रस्तावना |
| २.२ | संदर्भ ग्रंथ |
| २.३ | आत्मचरित्र |
| २.४ | वैचारिक लेख |
| २.५ | नियतकालिके व मासिके |
| २.६ | विद्यावाचस्पती शोधप्रबंध |
| २.७ | विद्यानिष्णांत शोधनिबंध |
| २.८ | संशोधनाचे महत्व |
| २.९ | सारांश |
| | संदर्भ ग्रंथ |

# प्रकरण दुसरे

# संशोधन विषयाशी संबंधीत साहित्याचा आढावा

## २.१. प्रस्तावना–

अहमदनगर जिल्हयातील कोल्हाटी जमातीच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा संशोधनात्मक अभ्यास करताना भटक्या जमातीतील कोल्हाटी जमातीशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंधित असणारे संदर्भ साहित्य लक्षात घ्यावे लागेल. मूळात कोल्हाटी जमातिविषयीचे साहित्य व संशोधन कमी व दुर्मिळ आहे.

१२व्या शतकात कोल्हाटी समाजाचा आदिम संदर्भ सापडतो. त्या जमातीचा सामाजिक आर्थिक स्थितीचा आढावा घेताना कोल्हाटी समाज व कलावंतीनीच्या जीवनाचा विविध अंगांनी अभ्यास करणे शक्य आहे.

कोल्हाटी जमातीच्या संदर्भ साहित्याचे अवलोकन करताना व संशोधन विषयाच्या परिपूर्णतेच्या व सामाजिक उपयुक्ततेच्या अंगाने व त्यांच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यासाठी कोल्हाटी जमातीविषयीचे संदर्भ साहित्य, विविध ग्रंथ, प्रबंध, मासिके, नियतकालिके, संशोधन अहवाल, संशोधन पत्रिका, विद्यावाचस्पती व विद्यानिष्णांत पदवीसाठी सादर केलेले प्रबंध, शासकीय व खाजगी सर्वेक्षण अहवाल, विविध शोध निबंध, वर्तमानपत्रे इ. चा चिकित्सक अभ्यास करुन त्याविषयीचे विवेचन संदर्भासहित दिले आहे.

## २.२. संदर्भ ग्रंथ–

### २.२.१ **Gazetteer of the Bombay Presidency (Ahmadnagar District) (F.P. 1884, 2nd edition 1976, R.P 2003)[१]**

Government Central Press, Mumbai यांनी प्रकाशित केलेल्या अहमदनगर जिल्हयाचा विस्तृत अभ्यास मांडलेला आहे. यामध्ये जिल्हयातील बँका, वाहतूक, दळणवळण, शिक्षण, आरोग्य, महामार्ग इ. अनेक बाबींची विश्वसनीय सांख्यिकी माहिती दिलेली आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी कोल्हाटी जमातीविषयीची माहिती यामध्ये सांगितलेली आहे. त्याचबरोबर जिल्हयातील तालुकानिहाय माहिती अभ्यासण्यास मदत मिळते. कोल्हाटी जमातीची काही ठळक वैशिष्टये या गॅझेटियरमध्ये अभ्यासायला मिळतात. त्यापैकी

कोल्हाटी जमातीच्या स्त्रीया दिसायला नीटनेटके असतात. ही जमात मराठी, गुजराती, हिंदुस्थानी यांची संमिश्र भाषा बोलतात. भटक्या जमातीतील कोल्हाटी त्यांचे झोपडे (संसार) डोक्यावर किंवा गाढवावरुन वाहतात. अशा कोल्हाटी जमातीच्या विविध वैशिष्टयांची ओळख गॅझेटियरमधील माहितीतून होते. गॅझेटियर हे विशेषत : अहमदनगर जिल्हयाची ओळख करुन देण्यास उपयुक्त ठरते. अहमदनगरसाठी प्रस्तुत संशोधनातील प्रकरण ४ थे मांडण्यात गॅझेटियरचा उपयोग महत्वाचा ठरतो.

### २.२.२. Syed Siraj Ul Hassan ( F.P. 1920 )[२]

सय्यद सिराज उल हसन यांनी आपला ग्रंथ 'The Castes & Tribes of H.E.N. The Nizam's Dominions' Vol- I यामध्ये विविध जमातींविषयी माहिती मांडलेली आहे. त्यापैकी कोल्हाटी जमातीच्या माहितीचा आढावा प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त ठरतो.

या ग्रंथामध्ये सय्यद यांनी कोल्हाटी जमातीचे मूळ/उमग, विविध पोटजाती, कोल्हाटीण स्त्री विषयक वैशिष्टये, कोल्हाटी जमातीची अंतर्गत रचना, विवाह पध्दती, धर्म पध्दती, अंत्यविधी, सामाजिक दर्जा, व्यवसाय इ. बाबीसंबंधी सविस्तर माहिती दिलेली आहे. या सर्व माहितीचा प्रस्तूत संशोधनात आधार घेतला आहे.

या ग्रंथामध्ये नमूद केल्याप्रमाणे, कोल्हाटी जमातीतील मुलीचे लग्न बालवयात किंवा ती यौवनात आल्यावर लावतात. विवाहपूर्व पुरुषासोबत तिचे संबंध असतात. त्याच्याबरोबर तिचे लग्न लावून दिले जाते. विवाहीत स्त्रिया अतिशय शाली जीवन जगतात. शरीरबांधणीत मजबूत असणाऱ्या मुली खंडोबाला सोडून दिल्या जातात. त्या अविवाहीत राहतात व वेश्या व्यवसाय करतात (मुरळी म्हणून राहतात) यावरुन सय्यद यांनी कोल्हाटी जमातीच्या विवाह पध्दतीविषयी सखोल माहिती मांडलेली दिसते. विवाह पध्दती बरोबरच इतर घटक त्यांनी विस्तृत विशद केले आहेत.

### २.२.३. G. S. Ghurye (F.P.1932)[३]

G.S.Ghurye यांनी 'Caste & Race in India' या ग्रंथामध्ये भारतीय समाजाचा शास्त्रीय दृष्टीकोनातून जो विविधांगी अभ्यास केला त्यातील एक महत्त्वाचे अंग म्हणजे भारतातील जातिव्यवस्था. आपल्या या 'Caste & Race in India' या ग्रंथात घुर्ये यांनी जातीचा उगम, जातीची वैशिष्टये, जाती–उपजातीतील गतिमान, आधुनिक समाजातील जाती,

मागासवर्गीय जाती इ. बाबींवर सविस्तर चर्चा केलेली आहे. त्यांनी वैज्ञानिक पध्दतीने जातींचा अभ्यास केला. आर्य भारतात आले तेव्हा तीन वर्ण/वर्ग होते. त्यांच्यात आंतरवर्गीय विवाहाची प्रथा नव्हती. त्यानंतर समाजात व्यवसायाधारित गट तयार झाले. हे व्यावसायिक गट अंतर्विवाही गट बनले. नंतर व्यवसायाधारित अनेक जाती अस्तित्वात आल्या. (उदा. सुतार, सोनार, लोहार, माळी, शिंपी इ.) त्यांच्या या माहितीचा प्रस्तुत संशोधनात उपयोग होणार आहे. घुर्ये यांनी या ग्रंथात जाती व्यवस्थेची वैशिष्टये सांगितली आहेत. ती पुढीलप्रमाणे– समाजाचा विभागीय विभाग, धर्मसत्ता किंवा अधिकार इ.च्या स्तर पदक्रम, आहार आणि सामाजिक परस्पर संबंधावर बंधने, नागरी आणि धार्मिक अपंगत्व व विविध विभागातील विशेषाअधिकार, व्यवसाय निवडीचा अभाव अशा विविध वैशिष्टयांचा सविस्तर अभ्यास व विश्लेषण घुर्ये यांनी आपल्या ग्रंथात केल्याचे दिसते. प्रस्तुत प्रकरण १ मध्ये जाती व्यवस्थेचा अभ्यास करताना या तत्वाचा उपयोग झाला आहे.

### २.२.४. नामदेव व्हटकर (द्वि. आ. १९६७)[४]

"भारतातील जातिभेद आणि त्यांवर उपाय" या ग्रंथामध्ये जाती, वंश, धर्म, वर्ण, स्पृश्यास्पृश्य, वर्ग, पक्ष, प्रांत या सर्वांमुळे उत्पन्न झालेले भेद, त्याचप्रमाणे या भेदांचे मूळ या सर्व विषयांचा अभ्यास आणि विचार एकाच व्यक्तिने म्हणजे नामदेव व्हटकर यांनी केलेला आहे. हे या ग्रंथाचे वैशिष्टय होय. या सर्व संकल्पना स्पष्ट करत असताना ते म्हणतात, आर्य आपल्या सोबत रक्ताच्या शुध्दीची कल्पना घेऊन आले म्हणजेच आपल्या आर्य वंशाच्या रक्ताची शुध्दी सांभाळण्यासाठी ते विवाहाच्या बाबतीत इतरांना सदैव वगळून दूर ठेवीत आले व आर्यांची लग्न आर्यांतच व्हावीत अशी कडक बंधने त्यांनी निर्माण केली. त्याचबरोबर व्हटकर २ हजार वर्षाच्या प्रदीर्घ काळात धंदयावरुनही जाती उपजाती बनत गेल्याचे स्पष्ट करतात. व्हटकर यांनी आपल्या ग्रंथात दिलेले जातिभेदाचे स्वरुप, स्पृश्य–अस्पृश्यता, संकल्पनांचा उपयोग जातिसंबंधी विश्लेषणात होणार आहे.

नामदेव व्हटकर यांनी रामनाथ चव्हाण यांच्या प्रमाणेच महाराष्ट्राच्या सर्व जिल्हयांतील खेडयापाडयांत फिरुन समाज जीवन प्रत्यक्ष पाहिले आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी भारतातील सर्व प्रकारच्या जातीभेदांचा सखोल अभ्यास केला आहे. या प्रत्यक्ष निरीक्षणातून समाजातील जातिभेद व जातीयता कशी नष्ट होईल याविषयी उपाय सूचविले आहेत. त्यांच्या या गहन

अभ्यासाचा कोल्हाटी जमातीच्या पारंपारिक व्यवसाय व वैशिष्टयांच्या अभ्यासासाठी उपयोग होणार आहे.

### २.२.५. शारदा देशमुख (प्र.आ.१९७३)[५]–

शिवकालीन व पेशवाईतील स्त्री–जीवन हा एक जुना व महत्वपूर्ण ग्रंथ असून देशमुख यांनी या ग्रंथामध्ये पेशवेकाळातील उच्च, मध्यम तसेच कनिष्ठ वर्णातील स्त्रीयांविषयी विविध स्वरुपातील माहिती प्रसिध्द केली आहे. त्या काळातील स्त्रियांचा पारंपारिक वारसा, बालपण, शिक्षण यांविषयी माहिती दिली आहे. त्याकाळातील विवाहसंस्था व कौटुंबिक जीवनाबद्दल ते सांगतात, शाहू महाराज स्वतः काही मुलामुलींचे विवाह स्वतःच्या पसंतीने ठरवीत व समारंभ घडवून आणीत. यावरुन पुण्यवृध्दीसाठी पेशव्यांमध्ये अशी लग्न लावून देत तर पुष्कळदा मुलीच्या बापाला काही रक्कम बक्षीस देऊन ते मोकळे होत. हे सिध्द करण्यासाठी देशमुख यांनी पेशवे दप्तरातून निवडलेले कागद पुराव्यासाठी संदर्भ म्हणून वापरले आहेत. प्रस्तुत कालखंडात स्त्रियांवर चहुबाजुंनी बंधने घालून स्त्रियांनी पुर्नविवाह करु नये हा नियम आचारात आणण्याचे श्रेय संपादन करणारा हा एकटाच समाज होय. देशमुख म्हणतात याबाबतीत ब्राम्हण स्त्रियांनी शतकानुशतके जो संयम दाखविला तो अलौकिक म्हटला पाहिजे. यावरुन शारदा देशमुख यांनी ब्राम्हण स्त्रियांची अप्रत्यक्षरित्या बाजू घेतली आहे असे दिसते.

या ग्रंथात विवाहसंस्थेविषयक ‘पाट लावणे’ या संकल्पनेचा अभ्यास व माहिती देण्यात आली आहे. पाट लावणे म्हणजे विधवा स्त्रीला पुर्नविवाह व पुरुषाला विधवा स्त्री सोबत पूर्नविवाह करण्याची परवानगी होय. लग्न हा शब्द स्त्रीच्या प्रथम संबंधास लावला जातो. तर पाट, मोहतूर, गंधर्व हे शब्द स्त्रीच्या द्वितीय संबंधास लावले जातात. यावरुन पाट लावणे म्हणजेच पुर्नविवाह करणे असे या ग्रंथात स्पष्ट केले आहे. पाट लावलेल्या स्त्रीला धर्मपत्नीचा कोणताही मान धार्मिकदृष्टया मिळत नसे. अशाप्रकारे विविध विवाह विषयक संकल्पना या ग्रंथाच्या अभ्यासाने स्पष्ट होतात. विवाहाबरोबरच विवाहबाहय संबंधातील स्त्रियांची जीवन रचना या ग्रंथात स्पष्ट केलेली आहे. सुंदर स्त्री दासी म्हणून विकत घेऊन रक्षा म्हणून बाळगणे किंवा घरातल्या दासींशीच व्यवहार करणे असा शरिरसंबंधविषयक आचार त्या काळात रुढ होता. हया संबंधापासून झालेली संतती हीन जातीची समजली जाई. बऱ्याचवेळा ती आईच्या जातीची समजली जात असे. अशा विविध स्त्रीविषयक बाबींची चर्चा या ग्रंथात केलेली दिसते.

पेशवेकाळीन स्त्रीची वेशभूषा, अलंकार, तिचे सार्वजनिक जीवन, व्यवसाय तसेच त्या काळातील स्त्रियांचे अर्थार्जनाचे मार्ग याविषयीची सखोल माहिती मिळते. या ग्रंथातील माहितीचा कोल्हाटी जमातीच्या आणि विशेष करुन कलावंतीण स्त्रीच्या व्यवसाय व अर्थार्जनाच्या अभ्यासासाठी उपयोग होणार आहे. पेशवेकाळात कोल्हाटी जमातीचे अस्तित्व आणि जमातीतील स्त्रीचे अस्तित्व समजण्यास मदत होते. या ग्रंथातून त्याकाळातील स्त्रीला कोणकोणती बंधने होती आणि त्यामधून ती कशाप्रकारे मार्ग काढून आपला उदरनिर्वाह करीत होती. तिला जातीची, धर्माची बंधने असून ही ती स्वतःकडे असणाऱ्या कौशल्यावर आपले चरितार्थ भागविण्याचा प्रयत्न करीत होती. यासाठी देशमुख यांनी स्वयंपाकीणी स्त्रिया, वेश्या व्यवसाय करणाऱ्या, कीर्तनकार, तमाशा, मुरळी, कुणबिणी अशी उदाहरणे दिली आहेत. देशमुख यांचा हा ग्रंथ विविध दर्जेदार संदर्भ ग्रंथांचा वापर करुन पेशवेकाळातील स्त्रीयांचे नेमके चित्र रेखाटण्याचा प्रयत्न दिसतो.

### २.२.६. **Russell & Harilal ( F.P.1916, R.P.1975)**[६]

यांनी “The Tribes & Caste of the Central provinces of India” या ग्रंथामध्ये कोल्हाटी जमातीची विविध प्रांतामध्ये विविध नावे सांगितली आहेत. कोल्हाटी जातीस दांडेवाले, बंसबेरिया, कबुतरी या नावानेही ओळखले जाते. उत्तर व मध्य भारतातीत बेरिया ही जात बेरार याठिकाणी बेरिया म्हणून ओळखली जाते. मध्य भारतात ही सन्सशियास असून यांचा पारंपारिक व्यवसाय भाट किंवा जाट जातीच्या वंशावळीचा अभ्यास करणे होय. सन्सेशिया व बेरिया या दोन्हीमध्ये ही महिला व कुमारिकांना वेश्या व्यवसाय करण्यासाठी सांगतात. कोल्हाटी ही बेरिया जातीची एक शाखा असून ती दख्खनमध्ये स्थिरस्थावर झालेली दिसते.

Russell यांच्या ग्रंथानुसार १९९१ मध्ये वऱ्हाड भागामध्ये कोल्हाटी समाज हा १३०० होता व मध्य प्रांतात तो स्वतंत्र दिसतो. यांनी या ग्रंथात कोल्हाटी समाजाची नावानुसार विभागणी बरोबरच नावांचे अर्थही सांगितले आहे. त्यांच्यामते कोल्हाटी हा शब्द मुख्यतः लांब बांबूच्या सहाय्याने उडया मारणारा (डोंबारी) पासून आला असावा. दांडेवाला व बंसबेरिया याचा अर्थ बाबूंची काठी खेळणारी जात, कबुतरी, महिला म्हणजे जीचे नर्तन कबुतराच्या भरारी प्रमाणे असते असे. अशा पध्दतीने कोल्हाटी जातीच्या विविध नावांच्या उत्पत्तीसंबंधी

Russell ने तर्क सांगितले आहेत. या ग्रंथामध्ये त्यांनी कोल्हाटी समाजासंबंधी वऱ्हाड व मध्य प्रांतातील जन्मापासून लग्न, सण, मृत्यूपर्यंत चे विधी सांगितले आहेत. तसेच त्यांचे राहणीमान, जीवनशैली, विधी इ. संदर्भात सविस्तर विवेचन केलेले दिसते.

Russell यांनी त्यांच्या ग्रंथात कोल्हाटी जातीचे दोन प्रकार सांगितले आहे. "पहिला डुक्कर कोल्हाटी व दुसरा खाम किंवा पाल कोल्हाटी होय. यापैकी डुक्कर कोल्हाटी कुत्र्याच्या साहाय्याने शिकार करतात. तर पाल कोल्हाटी पुरुष आळशी व बिनाकी पुरुष जे हाडांपासून कंगवे व हाडांची खेळणी बनविणे याव्यतिरिक्त काहीही उदयोग करत नसत. ते पुरुष फक्त स्त्रीयांच्या अनैतिक संबंधातून येणाऱ्या कमाईवर अवलंबून असत".

Russell यांच्या ग्रंथात मेजर गनथॉर्फने असे मत मांडले आहे की, कोल्हाटी समाजातील पुरुष म्हणजे सहकाऱ्यांचा मजबूत संच होय. ते रानडुक्कराची शिकार कुत्र्याच्या सहाय्याने करतात व स्वतः शरिराभोवती वेगवेगळे शस्त्र बांधतात व चालतात. ते नेहमी रानडुक्कराची शिकार करण्यात जास्त रुची दाखवितात.

या समाजातील स्त्रियांची नावे ही आकर्षित असणाऱ्या गोष्टीवरुन पडतात जसे की पन्ना(emerld),मुंगा(Coral), मेहताब(dezzling), गुलाब( a flower), मोती ( a pearl) आणि केसर (saffron)

### २.२.७. इरावती कर्वे (प्र.आ.१९७५)[७]

इरावती कर्वे यांनी आपल्या 'हिंदू समाज-एक अन्वयार्थ' या ग्रंथामध्ये वर्ण व्यवस्थेतून जातीव्यवस्था कशी निर्माण झाली. जातीसंस्थेच्या उगमाला कोण कोणत्या बाबी कारणीभूत आहेत यांची चर्चा केलेली आहे. कर्वे यांनी जातींची वैशिष्टये स्पष्ट करुन त्याबद्दल सविस्तर विवेचन केलेले आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी प्रकरण २ मध्ये जात या समूहाची वैशिष्टये मांडली आहे. जात हे अंतर्विवाह करणारे समूह, जाती काही मर्यादीत क्षेत्रात पसरलेल्या असतात. जाती एकमेकांत न मिसळता शेजारी-शेजारी राहतात. प्रत्येक जातीचा बहुधा एक पारंपारिक धंदा असतो पण इतर जाती तो धंदा करु शकतात. अशाप्रकारे जातिव्यवस्थेतील जात या समूहाची वैशिष्टये मांडताना त्या दिसतात. जातीबद्दलच्या उत्पत्तीचे काही निष्कर्ष त्यांनी प्रकरण ६ मध्ये मांडलेले दिसते. काही निवडक जातींविषयी त्या सखोल माहिती मांडतात. निवडक जातींमध्ये ब्राम्हण, मराठा, कुणबी, कुंभार, महार, सोनार इत्यादी जातींचा उल्लेख

केलेला आहे. प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी उपयोग होणार आहे.

### २.२.८. S. V. Ketkar (F. P. 1909)[८]

केतकर यांनी आपला ग्रंथ **'History of Caste In India'** यामध्ये जात या शब्दाची उत्पत्ती, जातीच्या विविध तज्ञांच्या व्याख्या मांडल्या आहेत. मि.सेनार्ट, नेसफिल्ड, रिस्ले या समाजशास्त्रज्ञांच्या व्याख्यांवर चर्चा करुन आपली स्वतःची जातीबद्दलची संकल्पना मांडली आहे. जाती व्यवस्थेच्या उगमा बद्दलचे सिध्दांत मांडले आहेत. जाती व जमाती, जाती व व्यवसाय यांचा संबंध स्पष्ट केला आहे. यावरुन त्यांनी आपल्या या ग्रंथात भारतातील विविध जातींचा इतिहास मांडलेला दिसतो. केतकर यांच्या मते, जातीची अंतर्गत रचना ही अगदी सोपी नाही. तर जाती या पुन्हा अनेक गटांमध्ये विभागलेल्या असतात त्यांना गोत्र असे म्हणतात. हे गोत्र एकुण असतात. एकाच किंवा सारख्या गोत्राचे कुटुंब एकमेकांशी विवाह करु शकत नाहीत. अशाप्रकारे केतकर यांनी केवळ जात या शब्दाशी संबंधीत माहिती न देता गोत्र म्हणजे काय याचे विश्लेषण केले आहे. जातीविषयक सिध्दांत, जातीचे प्रकार, व्यावसायाधारित जाती यांच्याविषयी माहिती स्पष्ट केली आहे.

### २.२.९. R. E. Enthoven ( F.P. 1922, R.P.1990)[९]

R. E. Enthoven यांनी आपल्या 'The Tribes And Caste of Bombay' या संदर्भ ग्रंथामध्ये विविध जाती जमातींच्या वैशिष्टयांचे वर्णन केलेले दिसते. त्यामध्ये त्यांनी एकुण ४८३ जातींचा अभ्यास केलेला आहे. Enthoven च्या मते कर्नाटक मध्ये कोल्हाटी समाजास डोंबारी व अहमदनगर मध्ये खेळकरी म्हणून ओळखले जाते. या जातीमध्ये विविध पोटजाती आहेत. त्यात स्त्रिया मोठया प्रमाणात वेश्या व्यवसाय करताना दिसून येतात. त्यामध्ये पुढील प्रकार आढळतात.

मराठी, गुजराती, डुकरे, पाल, काने, हरका, होलिया, गोपाळगणी, मुसलमान अशा विविध नावांनी त्यांना ओळखले जाते. यामध्ये गुजराती कोल्हाटी स्वतःला रजपूत समजतात. डूकरे हे नाव डुक्कर पाळणारी जमात समजतात. डुकरे हे नाव डुक्कर पाळणारी जमात म्हणून संबोधले जाते. ही जमात डूक्कर व जनावरांचे मांस खाते. पाल व काने यांना जमातीत कमी लेखले जाते. अहमदनगर जिल्हयामध्ये मराठा कोल्हाटी यांची उपजात खरे व अक्करमाशी किंवा बस्टर्ड म्हणून ओळखली जाते.

Enthoven यांनी ग्रंथात मांडले आहे की, “कोल्हाटी समाजात बहुपत्नीत्वास परवानगी आहे व घटस्फोटाला परवानगी नाही. तसेच विधवा विवाहास मान्यता आहे”. या ठळक मुद्द्यांचा उल्लेख केला. ग्रंथात त्यांनी जमातीतील लोकांची घर रचना, राहणीमान यासंबंधी माहिती दिली आहे. तसेच लग्नकार्य मग त्यामध्ये देवकार्य, हळदी, मंगणी, पोशाख, सर्व विधी, विधवा विवाह, मृतविधी यासंबंधी सविस्तर माहिती सांगितली आहे. त्यांच्या या माहितीचे संशोधनाच्यादृष्टीने खूप महत्व आहे.

### २.२.१०. श्रीधर व्यंकटेश केतकर (प्र.आ.१९३६, द्वि.आ.१९९४)[१०]

श्रीधर व्यंकटेश केतकर हे मूलतः समाजशास्त्रज्ञ होते. त्यांच्या “भारतातील समाजशास्त्र” या ग्रंथामध्ये त्यांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोन स्पष्ट होतो. केतकरांच्या मते, भारतीय समाजशास्त्र हा विषय अत्यंत व्यापक असून महत्वाचा आहे. त्यामुळे त्यांनी या ग्रंथात भारतीय समाजाचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे. केतकर या ग्रंथातील जातीमिश्रण आणि एकराष्ट्रीकरण या प्रकरणामध्ये विविध जाती जमातींची माहिती दिलेली आहे. यामध्ये कोल्हाटी जमात व तिचे इतर जमातींबरोबर असलेले मिश्रण मांडले आहे. भारतीय समाजशास्त्र या ग्रंथातील विवेचनाचा प्रस्तुत संशोधनासाठी उपयोग झाला आहे.

### २.२.११. त्रिं. ना. आत्रे ( प्र. आ.१९१५, पुनर्मुद्रण १९९५ )[११]

‘गावगाडा’ हे पुस्तक त्रिं ना. आत्रे यांनी १९१५ साली लिहिले, त्याकाळाची गावगाडयाची परिस्थिती व वर्तमान परिस्थितीत खूप बदल झालेला दिसून येतो.

सामाजिक संशोधनामध्ये जातीसंस्थेचा अभ्यास करत असताना अर्थशास्त्रीय संकल्पना स्पष्ट होण्यासाठी गावगाडा हा ग्रंथ उपयुक्त ठरतो. आत्रेंनी आपल्या ग्रंथात गावगाडयातील समाजशास्त्रीय अर्थकारण स्पष्ट केले आहे. त्यांनी ग्रंथामध्ये वतन, वतनदार, वतनपध्दती या मुख्य संकल्पनांवर भर दिला आहे. बलुतेदार व बलुते पध्दतीविषयी विवेचन केलेले दिसते. आत्रे म्हणतात की, “वतन हा शब्द **वर्तन** (उपजिविकेचे साधन) हया संस्कृत शब्दापासून निघाला. राहण्याच्या जागेला अरबी भाषेत वतन म्हणतात. वतन धारण करणारा तो वतनदार होय”.

आत्रेंनी प्राचीन काळातील महत्वपूर्ण संकल्पनाची उकल केल्याचे दिसते. त्यांच्यामते व्यभिचारी पंथात प्रामुख्याने वाघे, मुरळया, हिजडे, जोगिणी, भाविणी येतात तर व्यभिचारी

जातीत कोल्हाटी, हरदास, रमजानी, कसबी वगैरे येतात. या जाती–परजातीतील मुले लहानपणी विकत घेऊन आपापल्या जातीची भरती करतात तसेच वरील जातीतल्या कुमारिका किंवा विधवेने वाकडे पाऊल पडले तर हया जाती तिचे वाळंतपण चोरुन करतात. तिला चोळी बांगडी करुन वाटेला लावतात व मूल ठेवून घेतात. व्यभिचारी जातीतील मुलगी वाणढाळ असेल तर तिचे लग्न लावून देतात तर रुपवान असेल तर तिला नायकीण करतात. जातीधर्म व जातधंदा म्हणून स्त्रिया चव्हाटयावर पाल ठोकतात आणि त्यांचे आईबाप चक्क सांगतात की आमचे वतन, कसब व आमची काळी आमच्या मुली आहेत. आत्रेंच्या मते, " कुटुंबात जसा कुटुंब प्रमुखास आपले आई–बाप, भाऊ भावजया वगैरे. पुष्कळ ऐतखाऊ गोत पोसावे लागते. तसे नायकिणीला पोसावे लागते व तिचा घरीदारी मोठा बडेजाव असतो".

एक कोल्हाटीण आत्रेंना म्हणाली की, " मी जर हा धंदा सोडला तर म्हातारपणी आई–बापा कोठे जातील? भावांची लग्नकार्ये कशी होतील?" आत्रेंच्या मते हा धंदा अब्रुदार असता तर या मायाळूपणाला मोल नाही. अशाप्रकारे कोल्हाटीण नायकिणीच्या जीवनात असलेली कौटुंबिक आर्थिक जबाबदारी गावगाडयामध्ये दिसून येते.

### २.२.१२. K. S. Singh (F.P.1998)[१२]

के.एस.सिंग यांनी आपल्या 'People of India' National Series Vol V 'Indias Communities' मध्ये कोल्हाटी जमातीविषयक थोडक्यात माहिती मांडलेली दिसते. त्यांच्या 'People of India' Maharashtra Vol XXX या ग्रंथाच्या तुलनेत ही माहिती सारांशरुपाने मांडलेली दिसते. यामध्ये त्यांनी काही मोजक्याच ठळक वैशिष्टयांचा उल्लेख केलेला आहे. सिंग यांनी या ग्रंथात कोल्हाटी जमातीचा बेरिया समाजाशी संबंध लावला आहे. त्यांचे हे मत रसेल आणि हरिलाल यांच्या म्हणण्यानुसार समान असल्याचे दिसते. त्यांचे स्थान स्पष्ट करताना ते म्हणतात ते दक्षिण भागात स्थायिक झालेले आहेत.

तर उस्मानाबाद, लातूर, सोलापूर व अहमदनगर जिल्हयात ते विखुरलेले दिसतात. मराठी ही त्यांची मातृभाषा असून हिंदी व उर्दू भाषा हे चांगल्यापैकी बोलतात. सिंग यांनी थोडक्यात परंतु महत्वपूर्ण माहितीवर प्रकाश टाकलेला आहे. जो प्रस्तुत संशोधनामध्ये कोल्हाटी जमातीचे स्थान व अभ्यासासाठी उपयुक्त आहे. सिंग यांनी अजून इतरही जमातींचा अभ्यास या ग्रंथात केल्याचे दिसते. इतर जमातींचा संदर्भ व जीवन अभ्यासासाठी हा उपयुक्त

आहे.

### २.२.१३. गोविंद मंगेश कालेलकर(प्र. आ.१९२८, पुर्नमुद्रण १९९९)[१३]

२०व्या शतकातील सुरुवातीला एन्थोवेन हे एक इंग्रज समाजशास्त्रज्ञ तत्कालीन मुंबई प्रांतात म्हणजे आजच्या महाराष्ट्रात सामाजिक संशोधनाचे काम करीत होते. त्यांनी मुंबई प्रातांत सर्वत्र फिरुन विविध जाती जमाती यांची खूप माहिती गोळा केली. ती त्यांनी एकत्रित करुन "TRIBES & CASTS OF BOMBAY" या पुस्तकात प्रसिध्द केली. त्या जुन्या काळात अशा तऱ्हेचे संशोधनात्मक माहितीचे पुस्तक मराठीत कोणी करणे शक्य नव्हते. या मराठी रुपांतराचे काम त्याकाळी गोविंद मंगेश कालेलकर यांनी केले. ८० वर्षापूर्वीच्या त्याकाळात आपली जात आपले कूळ आपले देवक आपले पूर्वज यांच्याविषयी मोठे अज्ञान होते. ते दूर करण्यात कालेलकर यांचा मोठा वाटा आहे. या पुस्तकात जवळजवळ ४८३ जातींची माहिती दिली आहे.

हिंदू समाज संस्कृतीची निर्मिती विविध जातीतून झालेली आहे. ती कशा पध्दतीची आहे हे लोकांसमोर येणे जरुरीचे आहे. या हेतूनेच या ग्रंथाचे महत्व लक्षात येते. अनेक जमातींबरोबरच कोल्हाटी जमातीचा अभ्यास या ग्रंथात केलेला दिसून येतो. कालेलकरांच्या मते कोल्हाटी हे दक्षिण महाराष्ट्र, कर्नाटक, कुलाबा व ठाणे जिल्हयात आढळतात. कर्नाटकात त्यांना डोंबारी असे म्हणतात. त्यांच्या उत्पत्ती बाबत सांगताना ते म्हणतात की, "नाट उर्फ कोला नावाच्या पुरुषापासून आपली उत्पत्ती झाली आहे अशी दंत कथा मराठा कोल्हाटयात प्रचिलीत आहे. या नाटाचा बाप तेली जातीचा असून आई क्षत्रिय होती असे सांगतात. गुजराती कोल्हाटी आपण राजपूताचे वंशज आहोत असे सांगतात". अशाप्रकारे कालेलकरांच्या पुस्तकात कोल्हाटी समाजाबद्दल विविध माहितीचे दर्शन होते. इतर समाजांच्या अभ्यासासाठी व संशोधनासाठी हे पुस्तक उपयुक्त असल्याचे दिसते.

### २.२.१४. रामनाथ चव्हाण (प्र.आ.१९८९,तृ.आ.२०००)[१४]

"जाती आणि जमाती" या ग्रंथामध्ये गावगाडयातील आणि गावगाडया बाहेरील काही जाती जमाती त्यांची नियती, शरणता, संस्कृती आणि समाज स्थितीगती विषयक संशोधनात्मक आणि वस्तूनिष्ठ निरिक्षण आढळते. मातंग, चर्मकार, मेहत्तर, ढोर, बुरुड, पदमशाली, कोल्हाटी, कुडमुडे, काशीकापडी, घिसाडी, परदेशी, भोई, वैदू, वाघरी, गोपाळ,

वैदू, बेलदार, सिकलगार, टकारी, रामोशी, मांग गारुडी, राजपूत भामटा, कंजारभाट, पारधी, छप्परबंद, राजगौड इ. अंधश्रध्द मागासलेल्या जमातींचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून निरिक्षण तर केलेच त्याचबरोबर सामाजिक बांधिलकी आणि परिवर्तनवादी दृष्टीमुळे हे विवेचन अधिक प्रभावी परिणामकारक ठरले आहे. रामनाथ चव्हाण यांनी उपरोक्त जातीजमातीतील स्थितीशील जीवनाचा परिचय करुन देतानाच त्यांच्यातील परिवर्तनची नोंदही घेतलेली दिसते.

हा ग्रंथ विविध भटक्या–विमुक्त जाती–जमातींचा एक अभ्यास आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील काही ज्ञान–अज्ञात जातींच्या जीवनाबद्दल दुर्मिळ अशी माहिती दिली आहे. या माहितीचे मोल अधिक आहे कारण चव्हाण यांनी जमातींच्या दैनंदिन जीवनातून व प्रत्यक्ष भेटीतून गोळा केली आहे. त्यापैकी कोल्हाटी जमातीची माहिती नवीन व विचार करायला लावणारी आहे. प्रस्तुत संशोधनासाठी संदर्भ ग्रंथाच्यादृष्टीने या ग्रंथाचे मोल अधिक आहे.

### २.२.१५. रामनाथ चव्हाण (प्र. आ. २०००)[१५]

'वेदनेच्या वाटेवरुन' या ग्रंथामध्ये भटक्या जमातीतील ५० भटक्या स्त्रियांच्या कहाण्या लिहिलेल्या आहेत. आंधारमय जीवनातील वेदना उजेडात आणण्याचे एक मोलाचे कार्य केलेले दिसते. या ५० स्त्रियांच्या कहाण्यांमधून सामाजिक, आर्थिक, विषमतेवर काही टिपण्णी करणे आणि वेदनांच्या मुळाचा शोध घेणे लेखकाला क्रमप्राप्त वाटले आहे. म्हणून या ५० जाती जमातीतील स्त्रियांचे चव्हाणांनी संशोधनात्मक आणि वस्तूनिष्ट निरिक्षण नोंदविले आहे.

वेदनेच्या वाटेवरुन या ग्रंथातून केवळ स्त्रीविषयी असलेली सहानुभूती नव्हे तर या ५० भटक्या जमातींच्या जगण्याचा आढावा घेऊन प्रत्येक जमातीतील सामाजिक बांधिलकीचे दर्शन होते. त्यामधून परिवर्तनवादी दृष्टीकोन साकार झालेला दिसतो.

या भटक्या जमातीतील ५० स्त्रिया चव्हाणांना प्रत्यक्षात भेटलेल्या असून लेखक म्हणून ते त्यांची जबाबदारी धोरण बजावतात परंतु मानव म्हणून महाराष्ट्रातील लेखक, विचारवंत, शासनकर्ते यांनाही विचार करायला भाग पाडतात. या ग्रंथातील सर्वच स्त्रिया संघर्षाला सामोऱ्या जाणाऱ्या जिद्दी आणि त्यागी प्रवृत्तीच्या आहेत. या ५० स्त्रियांच्या जीवन चित्रणातून शहरी स्त्री आणि ग्रामीण भटकी स्त्री यातला भेदभाव तर स्पष्टच होतोच परंतु भटकी स्त्री अंगमेहनत

करुन जगण्यासाठी पडेल ते काम करत आपल्या कुटुंबाचा डोलारा सांभाळताना दिसते. या स्त्रिया खरोखरच रणरागिनी ठराव्यात इतक्या शूर असून चव्हाण यांनी अशाच स्त्री समस्येचा वेध घेवून एक समाजशास्त्रीय दस्तऐवजाची निर्मिती केल्याचे दिसते.

### २.२.१६. रामनाथ चव्हाण (प्र.आ.२००२)[१६]

रामनाथ चव्हाण यांनी 'भटक्या विमुक्तांची जातपंचायत खंड – १' मध्ये कोल्हाटी समाजाच्या संस्कृती, आचार विचार, व्यवसाय परंपरागत भूमिका, कला यांविषयीचे सविस्तर विवेचन केलेले दिसते. रामनाथ चव्हाण यांनी १९८७ साली महाराष्ट्रातील भटक्या आणि विमुक्त जमातींच्या जन–जीवनाविषयी लेखन करण्याच्या उद्‌देशाने त्यांची माहिती मिळविण्यासाठी त्यांच्या पालांवर, तांडयांवर आणि वस्त्यांवर, गावोगावी भटकत त्यांनी वेगवेगळया जमातींची माहिती मिळविली. त्यासंदर्भात त्यांनी विविध पुस्तके प्रकाशित केली. त्यापैकी हा एक खंड–१. भटक्या विमुक्त जातींचे एक वैशिष्टय म्हणजे त्यांची जातपंचायत होय. या जातपंचायतीला ते देवापेक्षा जास्त मानत व पाळत असे. त्यामुळे जमातींच्या जातपंचायतीचे स्वरुप, त्यांचे न्याय निवाडे, शिक्षा देण्याची पध्दत, खटले चालविण्याची प्रत्येक जातीची रित ही वेगवेगळी असे. या सर्वांचा प्रत्यक्ष अभ्यास करुन रामनाथ चव्हाण यांनी भटक्या विमुक्तांची जातपंचायत या ग्रंथाचे खंड–१, खंड–२, खंड–३ असे तीन खंड प्रकाशित केले. पुढेही काही खंडांचे काम चालू आहे. त्यापैकी खंड–१ मध्ये कोल्हाटी जमाती बरोबरच वैदू, डोंबारी, वडारी, कैकाडी, पारधी अशा अनेक जमातींच्या जातपंचायती व इतर माहिती प्रदान करण्याचे कार्य त्यांनी केले. कोल्हाटी समाजातील जुने कार्यकर्ते श्री. गोविंद मुसळे गुरुजी यांनीच त्यांना कोल्हाटयांच्या जातपंचायतीत बसण्याची संधी दिली. या ग्रंथात रामनाथ चव्हाण अनेक वैयक्तिक बऱ्या वाईट घडणाऱ्या घटनांचा उल्लेख करतात व असे म्हणतात की, ''कोल्हाटी जमात आजही आपली कलावंत ही ओळख कायम ठेवून आहे''. उत्तर भारतामध्ये मथुरेच्या आसपास 'नट' म्हणून ओळखले जाणारे कोल्हाटयांशी साधर्म्य साधणारी एक जमात आढळते असे ते सांगतात. कोल्हाटी जमातीच्या उत्पत्तीविषयी एक कथा त्यांनी आपल्या ग्रंथात मांडली आहे. त्यातून कोल्हाटी जमातीच्या निर्मितीची कल्पना येते.

### २.२.१७. **K. S. Singh (F.P.2004)**[१७]

K.S. Singh यांच्या 'People of India' Maharashtra Vol XXX Part Two या ग्रंथामध्ये भारतातील विविध जाती व जमाती या विषयीचा अभ्यास मांडलेला आहे. या ग्रंथाचा आढावा घेणे प्रस्तुत संशोधनासाठी गरजेचे वाटते. कारण सिंग यांनी कोल्हाटी जमातीचा उगम व त्याचबरोबर जमातीचे जिल्हानिहाय वास्तव्य सांगितलेले दिसते. सिंग यांचेही Russell, Enthoven, कालेलकर या लेखकांप्रमाणेच कोल्हाटी समाजाच्या उत्पत्तीचे विधान समान असल्याचे दिसते. ते म्हणतात, नट किंवा नर्तन करणारे यांच्यापासून उगम होणारे कोल्हाटी कोला या टोपणनावाने ओळखले जातात. तेली पिता व क्षत्रिय मातेपासून यांच्या जन्म झाल्याचे ते स्पष्ट करतात. या ग्रंथात कोल्हाटी जमातीची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक वैशिष्टये अभ्यासण्यास मिळतात. सिंग यांच्या याआधीच्या 'India's Communities' या ग्रंथात त्यांनी कोल्हाटी जमातीच्या वैशिष्टयांचे थोडक्यात विश्लेषण केल्याचे दिसते. परंतु या ग्रंथात त्यांनी जमातीचा सखोल वर्णनात्मक विस्तार मांडलेला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये त्याचा उपयोग केला आहे.

### २.२.१८. रामनाथ चव्हाण (प्र. आ. २००४)[१८]

श्री रामनाथ चव्हाण यांनी यापूर्वी भटक्या विमुक्तांची जातपंचायत खंड–१ मध्ये अकरा भटक्या जाती जमातींची संकलित माहिती प्रसिध्द केलेली आहे. खंड–२ हे त्यापुढील ग्रंथ असून या खंडामध्ये त्यांनी ९ नव्या भटक्या जमातींच्या माहितीची व वैशिष्टयांची भर घातली आहे. खंड–२ मध्ये अनुक्रमे मांग गारुडी, काशीकापडी, सिकलीकर, रजपूत भामटा, दसनाथ गोसावी, गोपाळ,टकारी, घिसाडी, छप्पर बंद अशा विशिष्ट जमातींचा अभ्यास केला आहे. रामनाथ चव्हाण यांना सर्वच भटके विमुक्त आपले भाईबंद वाटतात. ते म्हणतात आपण सर्व एकाच वाटेवरचे सहप्रवासी, वेदनेचे वाटेकरी आहोत म्हणून या भावनेतून व बांधिलकीतून पिढयानपिढया उपेक्षित व अस्थिर जगण्याला शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न त्यांनी या बहुमोल लेखनातून केलेला दिसतो. रामनाथ चव्हाण यांच्यामते "१८७१ मध्ये 'गुन्हेगारी जमाती कायदा' इंग्रजांनी निर्माण केला व या जमातीबद्दल अधिकच वाईट विचार असणाऱ्यांना फूस मिळाली. पुढे जाऊन १९५२ मध्ये गुन्हेगार कायदा भारत सरकारने रद्द केला. १९६० साली

पंतप्रधान पंडित नेहरु आणि मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या उपस्थितीत सेटलमेंटच्या तारांची कुंपणे समारंभपूर्वक तोडण्यात आली. तरी या कायदयामुळे जी मानसिकता तयार झाली ती पूर्णपणे तोडण्यात आजपर्यंत फारसे यश मिळाल्याचे दिसत नाही".

रामनाथ चव्हाण यांनी खंड–२ मध्ये भटक्या जातींच्या उत्पत्तीसंबंधी निरीक्षणात्मक तर्क मांडल्याचे दिसते. पहिली उत्पत्ती भटक्या जमातीचा उगम गावगाडयाच्या नैमित्तीक गरजा भागविण्याच्या पध्दतीमध्ये असण्याची शक्यता सर्वात जास्त दिसते. दुसरी उत्पत्ती म्हणजे यातील बहुतेक अवैदिक परंपरेशी संबंधित असल्यामुळे वैदिकांनी आणि वैदिकांच्या प्रभावाखाली व नियंत्रणाखाली असणाऱ्या इतर सर्व जाती–जमातींनी यांना बहिष्कृत केले असावे आणि तिसरी उत्पत्ती म्हणजे भटक्या जमातींचा उगम इस्लामच्या आगमनानंतर म्हणजे साधारणपणे ११व्या शतकानंतर झाला असावा आणि त्याच्या मूळात तत्कालीन राजकारण, व्यवसायाधारित वर्णवादी व्यवस्था असावी.

रामनाथ चव्हाणांच्या वरील भटक्या जमातीच्या उमगाच्या उत्पत्तीवरुन कोल्हाटी जमात आजही स्थिर नसून भटकत असल्याच्या कारणावर उजळ प्रकाश टाकला आहे. आजही ती जमात पूर्वी बांधून दिलेली कला सादरीकरणाचा व्यवसाय करण्यासाठी गावोगावी भटकताना दिसते.

### २.२.१९. रामनाथ चव्हाण (प्र.आ.२००६)[१९]

हा महाराष्ट्रातील भटक्या जमातींच्या लोकजीवनाचा परिचय करुन देणारा हा तिसरा खंड आहे. भटक्या जमातीच्या पिढयान्‌पिढया दुर्लक्षित असलेले लोकजीवन सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्टया कळण्यासाठी व जमातीच्या परिवर्तनाला व विकासाला दिशा मिळावी हा लेखन उद्‌देश आहे. भटक्या जमातीच्या चालीरिती, रुढी परंपरा, देवदेवता उत्सव, लग्नप्रथा, अंत्यसंस्कारांच्या प्रथा, व्यवसाय, भाषा(चोर भाषा, सांकेतिक भाषा, पारुषी भाषा) आणि त्यांच्या जमातीच्या जातपंचायती विषयी अतिशय मोकळेपणाने माहिती देतात. रामनाथ चव्हाण यांच्या ग्रंथामधून विविध भटक्या जमातीची जगण्याची तऱ्हा, व्यवसायाची पध्दत, त्यांच्या लोककथा, त्यांच्या श्रध्दा व अंधश्रध्दा, जातपंचायतीचे नियम व वेगवेगळया गुन्हयास दिल्या जाणाऱ्या शिक्षा याची माहिती प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त ठरते.

प्रा. लक्ष्मण माने या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात की, "जातिव्यवस्था हे हिंदू

समाजाचे प्राचीन काळापासूनचे वैशिष्टय आहे. हजारो वर्षाचा भारतीय संस्कृतीचा इतिहास पाहिला तर असे दिसून येते की, येथील प्रत्येक माणूस जातीव्यवस्थेत बध्द आहे. किंबहुना बिनजातीच्या आई–बापाच्या पोटी इथे जन्मच घेता येत नाही आणि जातीव्यवस्था कठोर आणि बंदिस्त आहे''.

प्रा. लक्ष्मण माने यांनी रामनाथ चव्हाण यांच्या विचारांना दुजोरा दिलेला दिसून येतो. भटक्या विमुक्तांची जातपंचायत खंड–३ मध्ये एकुण ०६ भटक्या जमातींचा सखोल अभ्यास करुन त्यांच्या जमातीबद्दल दूर्मिळ माहिती मांडण्याचे मोलाचे कार्य रामनाथ चव्हाण यांनी केले आहे.

## २.२.२०. यशवंत सुमंत व द. दि. पुंडे (प्र.आ.१९८८ पुर्नमुद्रण २००६)[२०]

महाराष्ट्रात गेली अनेक शतके जातीयता, सामाजिक बहिष्कार, अंधश्रध्दा, परंपरा, रुढी यांचा पगडा असल्याचे दिसते. अनेकवेळा सामाजिक सुधारणांच्या प्रयत्नाने समाजात तणाव, उद्रेक निर्माण झाले. अशावेळी जातिसंस्थाविषयक अभ्यासाची गरज असताना १९८८ साली यशवंत सुमंत व द. दि. पुंडे यांनी विविध तज्ञ अभ्यासकांचे जातिसंस्थेविषयी लेख संकलित करुन ते या ग्रंथाच्या आधारे प्रकाशित केले.

यशवंत सुमंत यांच्या मते, ''प्राचीन व मध्ययुगीनकाळात वर्ण–जातिव्यवस्थाविरोधी अनेक चळवळी व संघर्ष झाले असले तरी जातिसंस्थेविषयीच्या प्रश्नांचा विचार सुरु झाला तो १९ व्या शतकापासून झाला''.

त्यांच्या मते, त्यानंतर अनेक सुधारणावादी नवशिक्षितांनी प्रबोधनाची कास धरली व त्यामधून अर्वाचीन महाराष्ट्रातील जातीविषयक चिंतनास आरंभ झाला. सुमंत यांनी १८ व्या शतकापासून ते १९ व्या शतकापर्यंतचे २० समाजशास्त्रज्ञ विचारवंतांचे लेख नोंदविले असून त्या विचारांची चिकित्सा करण्याचे कार्य या ठिकाणी केलेले आहे. हा ग्रंथ केवळ समाजशास्त्राच्या अभ्यासकांनाच नव्हे तर पुरोगामी विचारांच्या सर्व अभ्यासकांना उपयुक्त ठरणारा आहे. अनेक मानव्य शाखांना संदर्भमूल्य असणारा हा ग्रंथ मोलाचे मार्गदर्शन करत आहे.

## २.२.२१. सतीशकुमार जाधव (प्र.आ.२०१०)[२१]

सतीशकुमार यांनी आपल्या शोध ग्रंथामध्ये भटक्या जमातीतील कोल्हाटी जमातीची

अनेक वर्षापासून समाज व संस्कृती  उजाळा देण्याचे कार्य केले आहे. त्यांनी या संदर्भग्रंथाचे उत्कृष्ट लेखन कार्य पार पाडण्यामागचे कारण ते स्वतः कोल्हाटी समाजातील असून अनेक अनुभव त्यांनी जवळून प्रत्यक्ष अभ्यासले आहेत.  भटक्या जमातीपैकी कोल्हाटी जमातीतील अनेक प्रश्न अनुत्तरीत राहिले आहेत. त्यांना वाचा फोडण्याचे काम जाधव यांनी आपल्या कोल्हाटी समाज आणि संस्कृती या ग्रंथाच्या माध्यमाने केले आहे.

जाधव यांनी त्यांच्या पुस्तकात कोल्हाटी समाजाची रचना, लक्षणे किंवा वैशिष्टयांच्या आधारे स्पष्ट केली आहे. त्यांच्यामते, ‘‘कोल्हाटी समाजाच्या पूर्वीच्या व आजच्या परिस्थितीत मोठया प्रमाणावर परिवर्तन घडून आल्याचे जाणवते. कोल्हाटी समाज हा खेडयात–शहरात वस्ती करुन राहणे, स्वतःची उपजिवीका भागविणे, स्वतःच्या कलागुणातून मिळणाऱ्या मोबदल्यात स्वतःचा परिवार चालविणे इ. महत्वाच्या स्थित्यंतरातून स्वतः परिस्थितीनुसार बदल करीत आला. या समाजात पुरुष व स्त्रियांचे स्थान, त्यांचे राहणीमान, पोशाख पध्दती या विषयाचे जीवन दर्शन त्यांच्या समाज विषयक बाबीतून घडते’’.

डॉ. जाधव यांच्यामते कोल्हाटी जमातीची जीवन पध्दती सर्वस्वी निसर्गाच्या बदलावर, घडामोडीवर अवलंबून आहे. कारण प्रत्येक ऋतुत ते आपल्या स्वतःच्या जीवनात, आहारात, वेशभूषेत बदल घडवून आणतात तसेच धर्म व अंधश्रध्दा या दोन प्रमुख बाबी आदिवासी व कोल्हाटी या दोन्ही जमातीत समानता दाखवितात.

डॉ. सतीश जाधव यांच्या मते कोल्हाटी समाज आदिवासी समाजातील एक घटक आहे. सण, उत्सव, विवाहप्रसंगी छोटे मोठे कार्यक्रम प्रसंगी मध्यप्राशन, नशा येणाऱ्या पदार्थांचे सेवन करणे, आनंदाच्या भरात नाचणे, मांस खाणे ही सर्व त्यांना दोन्ही समाजातील साधर्म्यतेची कारणे वाटत असावीत. जाधव यांनी कोल्हाटी जमातीची ऐतिहासिक पार्श्वभूमी बरोबरच, सांस्कृतिक परिस्थिती, कोल्हाटी समाजाची आर्थिक परिस्थिती, समाजकारण व राजकारणामधील सहभाग यामधून होणारे परिवर्तन स्पष्ट केले आहे. पुढे त्यांनी कोल्हाटी समाजाची शैक्षणिक परिस्थीतीचे विवेचन केले आहे. शैक्षणिक परिस्थितीतून त्यांनी सुधारणावादी दृष्टीकोन मांडला आहे.

डॉ. सतीश जाधव यांनी आपल्या या पुस्तकाच्या माध्यमातून कोल्हाटी जमातीबद्दल विविधांगी संशोधन केल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्या पुस्तकात आधुनिक व प्रगत

अर्थव्यवस्थेत भटक्या जमातीपैकी एक असणाऱ्या कोल्हाटी जमातीकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष अधोरेखित केले आहे व त्याबद्दल खंत व्यक्त केली आहे.

वर्तमान काळातील कोल्हाटी समाजाबद्दल ते वक्तव्य करतात कि, ५० वर्षापूर्वी हा समाज सामाजिक रुढी, परंपरा, बंधने प्रथा, यांच्यात अडकलेला होता. परंतु आधुनिक काळात त्या रुढी, प्रथा, परंपरा, बंधन यांचा त्याग करुन या समाजाने शिक्षणाचा वसा घेतला आहे.

### २.२.२२. डॉ. ना. धो. कदम (प्र. आ. १९९५, पुर्नमुद्रण २०१३)[२२]

महाराष्ट्रातील समाजातील विकासोन्मुख घटकामध्ये भटक्या विमुक्तांचा समावेश कदम यांनी त्यांच्या पुस्तकात केला आहे. त्यांच्या संशोधन कार्याचे योगदान पुस्तकाच्या माध्यमातून चिरकाल राहणार आहे. ना. धो. कदम यांनी भटक्या समाजबांधवांचे जीवनमान, संस्कृती, साहित्य, समाजबांधवांच्या जीवनमान, संस्कृती, साहित्य यांचा अभ्यास करुन १४ भटक्या विमुक्तांचे जीवनाचे अंतरंग प्रसिध्द केले आहे. यामध्ये वैदू, कैकाडी, नंदीवाले, डवरी–गोसावी, माकडवाले, कुडमुडे जोशी, पोतराज, वाघ्या मुरळी, बेरड, गारुडी, बहुरुपी, वासूदेव, धनगर यांचा समावेश त्यांनी केला आहे. या जमातींच्या समस्या मांडून त्यावर निष्कर्ष व उपाय योजना सुचविण्याचे कार्य केले आहे. तसेच या पुस्तकात त्यांनी विविध जमातींच्या साहित्याचे स्वरुप स्पष्ट केले आहे. ते करत असताना लोककथा, लोकगीत, समग्र वाड.मय, भाषा यांचा आधार घेतला आहे. कदम यांनी वरीलपैकी प्रत्येक जमातीचे मूळ रीतीभाती, राहणीमान, व्यवसाय, पोटजाती यांचा अभ्यास मांडला आहे. या जमातींची दैवते, सण, जातपंचायत बैठकीची गावे, कुळी अडनावे, गोत्रे इ. नमूद केल्याचे दिसते. त्यांना महाराष्ट्रातील मागासवर्गीयांची यादी अशी अनेक दुर्मिळ माहिती आपल्या पुस्तकात मांडल्याचे दिसून येते.

कोल्हाटी जमातीची डोंबारी ही पोटजात मांडून कोल्हाटी जमातीच्या निर्मितीविषयी लोककथा त्यांनी आपल्या पुस्तकात सादर केली आहे. त्या कथेत ‘‘इंद्र दरबारात गंधर्वकन्येच्या असभ्य वर्तनामुळे शिळा होशील व पृथ्वीवर पडशील असा शाप तिला दिला. तीने शंकराचा धावा करुन शंकरपार्वती प्रसन्न झाले. पार्वतीने शंकराला विनविले. शंकराने वर दिला कि, तुझ्यापोटी जन्म घेणारी संतती कलावंतीन होईल व लोकांचे मनोरंजन करुन पोट भरेल. शंकराच्या कृपाप्रसादाने गंधर्व कन्येने एक मुलगा व मुलगीला जन्म दिला. अप्रतिम सौंदर्य उपजत कलावंत म्हणून नावारुपास आले. आईच्या सांगण्याप्रमाणे मुलगी नाचगाणी व

मुलगा कसरतीचे खेळ करु लागला. पृथ्वीवरील लोक नाचगाण्याशिवाय शरीरसुखाची मुलीला मागणी करु लागले. मुलीने नाचगाणे थांबवून मार्गदर्शनानुसार कैलासावर शंकराकडे गेली. शंकर म्हणाले तुझा जन्मच त्यासाठी आहे तू काही गैर वाटून घेऊ नकोस. पृथ्वीवर जाऊन लोकांचे मनोरंजन कर व पोट भर'' यावरुन कोल्हाटी जातीचा उगम निश्चित होतो.

### २.२.२३. रामनाथ चव्हाण (प्र.आ. १९८९, पुर्नमुद्रण २०१३)[२३]

भारतामध्ये प्रस्थापित समाज व्यवस्थेने अनेक समूह जाती जमातींची उपेक्षा केली. काहींना गाववेशी बाहेर ठेवून अस्पृश्य मानले. काहींना जंगलात ठेवले तर काहींच्या जीवनात स्थिरताच ठेवली नाही. ते भटकतच राहिले अशा भटक्या विमुक्त समुहाच्या दुःख, वेदना, जीवन, संस्कृती, रुढी, परंपरा, रिती, यांचा परिचय अत्यंत प्रामाणिकपणे आणि वस्तूनिष्ठपणे या ग्रंथामध्ये चव्हाण यांनी केला आहे. हे संबंध लेखन समाजशास्त्रीय स्वरुपाचे असल्याने सामाजिक संशोधनास उपयुक्त ठरणारे आहे. या ग्रंथानुसार भटक्यांच्या २८ जाती असून शेकडो पोटजाती आहेत तर विमुक्त जाती १४ असून त्यांनाही पुष्कळ पोटजाती आढळतात. या समुहामध्ये जातीव्यवस्थेच्या तत्वानुसार उच्चनीच्यता, श्रेष्ठ–कनिष्ठता आढळते. त्यांच्यामध्येही रोटी बेटी व्यवहार घडत नाही.

या भटक्या जाती–जमाती अंधश्रध्दा, उच्चनिच्यता मानणारा, भूतकाळ व स्वजाती इतिहासाविषयी अभिमान व गर्व बाळगणारे आहेत. समकालीन हालाखी व दुःखस्थितीस देव किंवा नियतीस जबाबदार धरतात म्हणजे दैववादी आहेत याला कारण त्यांची निरक्षरता आहे. जातपंचायत ही त्यांच्या सर्वोच्च स्थानी असून तो शोषणाचा मोठा अड्डा बनलेला आहे. इथे जाती अंतर्गत गुन्हयासाठी आर्थिक व शारिरीक दंडाची योजना तसेच सामाजिक बहिष्कार केला जातो.

रामनाथ चव्हाण यांच्या या ग्रंथामध्ये त्यांनी ''वर्षानुवर्ष भटक्यांचे जीवन जगणारा रायरंद हा कलावंत समाज म्हणून महाराष्ट्रात ओळखला जाणाऱ्या भटक्या जमातीची माहिती लिहिलेली दिसते''. तसेच डोंबारी या कलावंत भटक्या जमातीची माहिती सविस्तर मांडलेली आहे.

यावरुन कोल्हाटी जमाती प्रमाणे इतर भटक्या जमाती आपल्या कला कौशल्याचा वापर करुन पोटासाठी भटकत राहून निश्चित ठिकाण नसल्याचे दिसते.

### २.२.२४. उत्तम कांबळे (पुर्नमुद्रण २०१५)[२४]

प्रस्तुत ग्रंथामध्ये उत्तम कांबळे यांनी अनेक भटक्या जाती–जमातीचा अभ्यास करुन त्यांची ओळख करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांची ओळख म्हणून काही जमातीची छायाचित्रेही दिली आहेत. भटक्यांचे लग्न या पुस्तकातील विशेष बाब म्हणजे भटक्या जातीमधील विवाह विधी होय. काळानुसार जमातींमध्ये बालविवाहाची प्रथा आहे. काही जातीत गरोदर बाईच्या पोटाला कुंकु लावून तिच्या पोटातील भावी मुलगी लग्नासाठी निश्चित केली जाते. मुलींनी जाती मोडू नयेत म्हणून बालविवाहाचा वापर केला जातो. अनेक ठिकाणी २१ व्या शतकातही भटक्या स्त्रीच्या स्वातंत्र्यावर गदा आणली जाते. डोंबारी, जमातीतील विवाह पध्दती बाबत कांबळे म्हणतात “ या समाजात मुलीच्या लग्नापेक्षा मुलांच्या लग्नाचा प्रश्न अवघड आहे. कारण मुलांकडून मुलीला हुंडा देण्याची प्रथा या समाजात आहे. डोंबारी समाजात १२ उपजाती आहेत. प्रत्येकी एक पंच असे १२ पंचांची जात पंचायत असते. मुलगी बघण्यास जाण्यापूर्वी देवाचा कौल घेतला जातो. देव काय म्हणतो असे पुजाऱ्याला विचारले जाते”.

अशाप्रकारे विविध जातींच्या विविध विवाहपध्दतीचे वर्णन व त्यामधून भटक्या समाजातील स्त्री भरडली गेली आहे हे निदर्शनास येते.

## २.३. आत्मचरित्र

### २.३.१. गोपीचंद पवार (प्र.आ. १९९८)[२५]

गोपीचंद पवार हे कोल्हाटी जमातीचे असून त्यांनी जीवनातील प्रत्यक्ष भोगाव्या लागणारे कटू अनुभवांचे चित्रण ‘कोल्हांट उडी’ या त्यांच्या आत्मचरित्रात केलेले आहे. जमातीतील काही संकल्पना, रुढी, परंपरा, रितीरिवाज मांडत असताना ते कोणताही आडपडदा राखत नाहीत. निडरपणे त्यांनी आपली मते व्यक्त केली आहेत. या पुस्तकात आपले मनोगत मांडत असताना ते म्हणतात की भटकेपणा कमी होत आहे पण बायांचं स्थलांतर थांबलेलं नाही. रीतिरिवाजात तूसभरसुध्दा फरक पडलेला नाही. जात पंचायतचा धाक व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेणारा आहे. मला जाचक रीतिरिवाज कर्मकांड नको, मला व्यक्ती स्वातंत्र्य हवं असं ज्यावेळी मी म्हणालो तेव्हा मला वाळीत टाकण्यात आलं. ज्यांनी अंधश्रध्दा सोडली, ठोकारली ते वाळीत पडले. त्यांचे दुःख मांडताना ते पुढील काव्य लिहितात.

"आम्हाला बुध्दी आहे पण, वाव नाही
ताकद आहे पण युक्ती नाही
शिक्षणाची सक्ती आहे पण वेळ नाही
भूक आहे पण वाढणारी नाही
मनगटात जोर आहे पण काम नाही
स्त्रिया अबला आहेत पण उद्रेक नाही
काम करावे पण सराव नाही
सर्वांना घरे आहेत पण आम्हाला साधी सावली नाही
अंगात कला आहेत पण तिला बधत नाहीत
बनतात पण हिच्याशी जमत का नाही
का करता क्रुकर्म? असं सांगणारा उपजला नाही
सर्वांना समान हक्क आहे पण आम्हाला डोकं नाही
एकोपा करावा वाटतो पण आपआपसात पटत नाही
असं हे सारं नागडं रुप मांडलं आहे"

अशा प्रकारे पवार यांनी कोल्हाटी समाजाला काही गोष्टी उपजत असूनही तो प्रगती पथावर येत नाही. तो का येत नाही तर त्याला जातच कारणीभूत आहे. इतरांना स्वाभिमानाने सांगावी वाटणारी ही जात सांगताना पवार यांना लाज वाटल्याचे ते नमूद करतात. या जातपंचायतीमुळे अनेकांचे शोषण व पिळवणूक कशी होते. तसेच पाचवीचा कार्यक्रम, वटीभरण, चालिरीती यांच्या अभ्यासासाठी हे पुस्तक अतिशय उपयुक्त आहे.

### २.३.२. लक्ष्मण माने (प्र.आ.१९८०, पुर्नमुद्रण २०००)[२६]

लक्ष्मण माने यांनी आपल्या उपरा या आत्मचरित्रपर पुस्तकामध्ये जे जगले, जे भोगले, जे अनुभवले व पाहिलं ते तसंच लिहित गेले. या पुस्तकानं भटक्या-विमुक्त जाती जमातीच्या प्रश्नांवर सामाजिक मंथन निर्माण केलं. भटक्यांचे प्रश्न हा सामाजिक चर्चेचा विषय झाला आणि भटक्या विमुक्तांच्यासाठी काम करणाऱ्या मंडळींच्या कामाला चालना मिळाली. माने हे गुन्हेगार जमाती म्हणून ठरवलेल्या जमातीपैकी कैकाडी या जमातीचे असून अतिशय बिकट आर्थिक परिस्थितीत त्यांनी खडतर जीवनाची वाटचाल केली. शिक्षणासाठीचा खर्च पेलवणारा

नसतानाही त्यांनी अनेक यशाची शिखरे गाठली. सारं जीवन जातींनी घालून दिलेल्या कुंपणात बंदिस्त असतानाही जीवनाची मार्गक्रमणा सुरु केली. आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत जिद्दीने यश संपादन करुनही ते बैचेन व अस्वस्थ होताना म्हणतात, हा प्रश्न लक्ष्मण माने या एका माणसाचा नाही तर प्रश्न आहे असे हजारो लाखो लक्ष्मण माने झोपडपट्यांत, फूटपाथवर, गावकुसाबाहेर आणि ज्यांना गावकुसही नाही ते दऱ्याखोऱ्यांत रानोमाळात खितपत पडले आहेत. त्यांना ना संधी, ना सोय, ना सवलत, ना आधार, ना आसरा, ना निवारा, ना दोन वेळच्या पोटाची सोय! अस जग मी पाहतोय, जिथं स्वतःच्या अस्तित्वाची शंका यावी. जिवंतपणाची शंका यावी.

भटक्या जमातींना शिक्षणापासून वंचित ठेवणारा समाज व शिक्षण व्यवस्था कारणीभूत असल्याचे त्यांच्या जीवनातील प्रसंगावरुन दिसते. शिक्षणाची आवड असतानाही शिक्षक शाळेत घेत नव्हते.

ते सांगतात ''तसा शाळंत जात होतो, म्हणजे पोर शाळंत असायची आन मी बाहेर परसात बसून ऐकायचो मास्तरला बानं इचारलं, पर मास्तरनं शाळत घेतलं नाही. लेका बिन भिकाराला शाळा, आसतीया व्हयं? त्येनं शिकल्यावर लेका कणगी कोण वळणार? ते काय चालायचं न्हाय! शाळा शिकत्यात!''

यावरुन आर्थिक परिस्थीती जेवढी जास्त बिकट शिक्षणापासूनची वंचितता जास्त असल्याचे दर्शन होते. मानेंनी केलेल्या वरील जखमी व्यथेवरुन केवळ कैकाडी जमातीचा नव्हे तर सर्व भटक्या–विमुक्त जमातींचा आर्थिक कणा किती ठिसूळ आहे हे स्पष्ट होते.

### २.३.३. किशोर काळे (प्र.आ.१९९४, पुर्नमुद्रण २००९)[२७]

ही आत्मचरित्रपर पुस्तकं लिहिली आहे. ही कथा आहे एका निरागस मुलास समाजाने नाकारलेल्या, गरिबीने लाचार झालेल्या, आई–बापाच्या प्रेमापासून वंचित राहिलेल्या व कोल्हाटी समाजात एका नाचणारणीच्या पोटी जन्म घेऊन डॉक्टरी शिकलेल्या पोराची व्यथा या ग्रंथात आहे. या पुस्तकात किशोर काळे यांनी जन्मल्यापासून ते उच्च शिक्षण घेईपर्यंत कोल्हाटी समाजातील नाचणारणीचा मुलगा म्हणून त्यांना कशा पध्दतीने उपेक्षिताचे, दारिद्र्याचे जीवन जगावे लागले याचे प्रत्यक्ष वर्णन केले आहे. ही कथा वाचल्यानंतर खरोखरच समाजामध्ये कलावंतीनीचे गौण स्थान, तिच्याकडे असणाऱ्या वासनेच्या नजरा, तिला बाहयच

नव्हे तर कुटुंबातून होणारा त्रास याची जाणीव होते. किशोर काळे यांनी स्वतः भोगलेल्या जीवनातून अनेक संदर्भ त्यांनी कलावंतीन स्त्रीबद्दल असलेली आत्मीयता व सहानूभूती दर्शवितात. या पुस्तकाच्या मनोगतातच ते लिहितात ‘‘वेश्या म्हणजे पैशासाठी रोज अनेक व्यक्तींशी संबंध ठेवणारी पण या कोल्हाटयाच्या स्त्रिया त्यांना कोणी सांभाळणारा असेल तर लग्नाची स्त्रीसुध्दा पवित्र वागणार नाही इतक्या निष्ठेने त्या व्यक्तीशी वागतात. अशा नाचणारणीला तुम्ही वेश्या म्हणता! त्या वेश्या नसतात तुमच्या नजरा वेश्या झालेल्या असतात’’.

किशोर काळेंच्या या कथेतून कोल्हाटी समाजातील एक वैशिष्टय दिसून येते ते म्हणजे या समाजातील स्त्रियांवर कुटुंबाचा असणारा आर्थिक भार होय. कुटुंबातील प्रमुख म्हणून आर्थिक जबाबदारी घेताना या कलावंतीन स्त्रियांना, मानसिक, शारिरीक त्रास सहन करावा लागतो. काळेंची आई क्षणोक्षणी या व्यथेतून जात असल्याचे दिसते. एवढंच नव्हे तर नाचणारणीला आपलं पितं मुल आई–बापाजवळ सोडून, त्यांच्या संसाराला ठिगळ लावण्यासाठी ती गावोगाव नाचायला जाते. त्यावेळी तिला मुल जवळ बाळगण्याची मुभा नसते. तिचं आईच हृदय मारुन तिला लोकांचे मनोरंजन करुन पोटाची खळगी भरण्यासाठी इच्छा नसताना ही कला सादर करुन लोकांना खूश करावे लागते. या सर्व पध्दतीमधून कोल्हाटी समाजातील कलावंतीन स्त्री असणाऱ्या कुटुंबातील पुरुषाची मानसीकताही लक्षात येते की, कुटुंबाची आर्थिक जबाबदारी न घेता तो व्यसनाधीनतेच्या आहारी जाण्यातच सुख मानतो. भारतीय संस्कृतीमध्ये पुरुषप्रधान समाजात वावरत असतानाही या समाजातील ग्रामीण भागात आजही ही पंरपरागत पध्दती अस्तित्वात असल्यामुळे या समाजाची प्रगती खोळंबून राहिली आहे.

कोल्हाटी समाजातील नाचणाऱ्या स्त्रीला एक आदर्श आई म्हणून जगता आले नाही तरी आदर्श मुलगी, बहीण, मानलेली बायको म्हणून ती नक्कीच कर्तव्य पूर्ण करते हे किशोरच्या आत्मचरित्रातून दिसून येते. राम, श्रीकृष्ण इ. महापुरुषांना स्त्रीयांविषयी आदर भाव होता. परंतु महापुरुषांच्या भूमीवर आजही पुरुषमंडळी आयतं बसून खातात–पितात आणि त्यांच्या मायबहिणी त्यांची हौस–मौज खाणंपिणं भागविण्यासाठी नाचगाणं करतात. अशीच एक अंगावर रोमांच उभी करणारी, प्रत्येकाला कीव यावी अशी माय लेकराची कथा कोल्हाटयाचं

पोर या आत्मकथेमधून प्रतिबिंबित होते.

## २.३.४. लक्ष्मण गायकवाड (प्र. आ. १९८७, पुर्नमुद्रण २०१३)[२८]

उपेक्षित समाजातील उपेक्षीत तरुण म्हणून जीवनाची सुरुवात करणाऱ्या पुढे जाऊन भटक्यांसाठी कार्यकर्ते म्हणून कार्य करणाऱ्या, त्यांना सामाजिक न्याय मिळवण्यास धडपड करणाऱ्या व्यक्तिची आत्मचरित्रपर कथा उचल्या या पुस्तकात पहायला मिळते.

गायकवाड हे चोर, गुन्हेगार, समजल्या जाणाऱ्या पालावर राहणाऱ्या उचल्या जमातीचे लेखक आहेत. या उचल्या पुस्तकामुळे विमुक्त भटक्या समाजाच्या समस्येला, त्यांचा अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम मोठया प्रमाणात झाले. या पुस्तकाचे इंग्रजी, हिंदी, कन्नड, गुजराती, तेलगू, उर्दू भाषेत अनुवादित पुस्तक निर्माण झाल्याने तळागाळापर्यंत दि नोटीफाईड ट्राईब्ज जमातीच्या व्यथा मानव समाजात प्रथमच निदर्शनास आल्या.

गायकवाड यांनी उचल्या जमातीचा उदर निर्वाह चोऱ्या करुन पोट भरणे असा सांगितला आहे. जमातीतील मुलाबाळांची शिक्षणापासूनची वंचितता व त्यामुळे होणारी आर्थिक हेळसांड व पोट भरण्यासाठी चोऱ्या-माऱ्या करणे असा पारंपारिक क्रम चालू असे. चोरीविषयी ते सांगतात की, ‘‘आमच्यात चोऱ्या करा हे शिकवण्यासाठी टोळया असतात. शाळंत पोरानला शिकवन्यासाठी मास्तर राहतात अन शाळा शिकण्यासाठी पोरानला आईबाप मारतात. आमच्या उचल्याच्यांत समदं येगळं. आमच्या पोरानला येगळया चोऱ्या शिकवण्यासाठी येगळे टोळीवालं हायीत. आमच्या चोऱ्यांचे चार प्रकार पडतात. १. खिस्तंग मतने (खिसे कापणे), २. चप्पूल मुठल आणणे (जोडे, गठुडे चोरणे), ३. पड्डू घालने (ठकवने), ४. उठेवारी (बोलता बोलता फसविणे) उदा. नकली सोने देऊन असली सोनं हडपने’’.

वरील केलेल्या विवेचनावरुन असे लक्षात येते की प्रत्येक भटक्या जमातीतील पारंपारिक व्यवसायाचे शिक्षण हे त्या जमातीतूनच लहानपणापासून दिले जाते. ज्याप्रमाणे उचल्या जमातीत चोऱ्या करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. त्याचप्रमाणे कोल्हाटी जमातीतील मुलींना नृत्यासाठी(नाचकामासाठी)बालपणापासून प्रवृत्त करुन प्रशिक्षण दिले जाते. त्याचा परिणाम शिक्षणापासून ते वंचित राहतात. गायकवाड यांच्या उचल्या पुस्तकामध्ये अशा अनेक भटक्या जमातींच्या जीवनातली प्रथा समान वाटतात. उदा. रुढी, अंधश्रध्दा, पारंपारिक व्यवसायाचा स्वाभिमान, जातपंचायत इ.

## २.४. वैचारिक लेख

### २.४.१. लक्ष्मण माने (प्र.आ.२००३, पुर्नमुद्रण २००६)[२१]

लक्ष्मन माने यांनी भटक्या विमुक्त जमाती संघटनेचे सरचिटणीस व त्यांचे मित्रमंडळी यांच्या प्रोत्साहन व सहकार्याने आपली विधान परिषदेतील निवडक भाषणांचा संग्रह तयार करुन भटक्यांचे भारुड या वैचारिक ग्रंथाची निर्मिती केली. या ग्रंथामध्ये त्यांनी १९९० पासून ते १९९५ पर्यंतच्या सर्व भाषणांचा समावेश केला आहे. भटक्या विमुक्तांसाठीच्या चळवळीतील तडफदार व्यक्तिमत्व असणाऱ्या माने यांनी केवळ भटक्या विमुक्त जमाती संदर्भातच नव्हे तर एकुण सामाजिक दुर्लक्षित अनेक प्रश्नांना या ग्रंथामध्ये वाचा फोडली आहे. यापैकी महत्वाचा प्रश्न एकच जमात परंतु प्रत्येक प्रांतामध्ये ती वेगवेगळया सूचीमध्ये घालण्यात आली आहे. एका ठिकाणी ती अनुसूचित जातींमध्ये असेल तर दुसऱ्या ठिकाणी ती अनुसूचीत जमातीमध्ये असेल तर तिसऱ्या ठिकाणी ती ओबीसींमध्ये असेल. तेव्हा, यामध्ये कुठेतरी एकसूत्रता आणण्याची आवश्यकता आहे अशी मागणी त्यांनी केली. त्याचप्रमाणे मंडल आयोगाच्या धर्तीवर भटक्या विमुक्त जातींसाठी एक आयोग निर्माण करावा अशी ते सूचना करतात. दि. २०/१२/१९९० रोजी केलेल्या भाषणात माने यांनी कै. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ यामध्ये होणाऱ्या गैरप्रकारांकडे लक्ष वेधून घेतले आहे. शासन या गैरप्रकारांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष व बेपर्वाई करीत आहे असे ते स्पष्ट आरोप करतात. तसेच निवडणूक व मतदार संघामध्ये भटक्या विमुक्तांना राखीव जागा मिळावी यासाठी विधेयकाची विनंती ते करतात. अशा अनेक आरोप, विनंती, मागण्या, विरोध माने यांनी या ग्रंथातील भाषणांमध्ये केलेला असून यामधून त्यांची भटक्यांच्या स्थैर्यासाठी असणारी तळमळ स्पष्ट होते.

या विषयांबरोबरच पोलीसांचा छळ, मुंबईतील बॉम्बस्फोट, दंगलग्रस्तांचे पुर्नवसन, धर्मांध, जातीयवाद, अनुदानातील वाटा, देवदासींचा प्रश्न, स्त्रियांची उपेक्षा, समान नागरी कायदा इ. अनेक समस्यांवर त्यांनी भाष्य करुन त्या सोडविण्यासाठी मार्ग सूचविले आहेत. कोल्हाटी जमात ही भटक्या विमुक्तांपैकी एक असल्याने या जमातीतील समस्या व शासकीय दुर्लक्ष समोर येण्यास हा ग्रंथ उपयुक्त ठरतो.

## २.४.२. लक्ष्मण माने (प्र.आ.१९८४, पुर्नमुद्रण २००९)[३०]

लक्ष्मण माने यांनी भटक्या विमुक्तांचे प्रश्न मांडणारे व त्यावर उपाययोजना सूचविणारे उपयुक्त अनेक वैचारिक ग्रंथांचे लेखन केले. त्यापैकी १९८४ साली प्रकाशित झालेल्या ‘बंद दरवाजा’ या वैचारिक ग्रंथातून भटक्या जमातीची एकुण परिस्थिती काय आहे? हे तर सांगितलेच आहे. शिवाय माने हे भटक्या जमातील असल्याने त्यांना या जमातीविषयी आस्था आहे हे त्यांच्या लेखनातून दिसते.

लक्ष्मण माने हे चळवळीतले तरुण तडफदार कार्यकर्ते असल्यामुळे भटक्या जमातीतील सुशिक्षितांपर्यंत आपला आवाज पोहचविण्याचे अनमोल कार्य समाजक्रांतीत महत्वाचे ठरते. ते स्वतः जमातीत जावून जमातीविषयी जाणून घेतात. त्यांचा समाजाबाबतचा दृष्टीकोन, सामाजिक प्रश्न हाताळण्याची त्यांची पध्दत, भटक्या विमुक्तांच्या व्यथा समजून घेण्यातील वाक्‌बगारपणा, विशेषतः स्त्रियांचे जीवन या जातपंचायतीच्या वरवंटयाखाली कसे भरडून निघत आहे. त्यांना विकायची वस्तू समजले जाते. काडकरी नावाच्या पारधी समाजाच्या स्त्रीची विलक्षण हकीकत पुस्तकात आली आहे.

स्त्री जीवनाच्या फरफटीचे दर्शन बऱ्याचदा या पुस्तकात होते. बंद दरवाजात होणाऱ्या भटक्या विमुक्तांच्या परिस्थीतीचे दर्शन विलक्षण व भीषण आहे. ते दर्शन घडवून देत असताना लक्ष्मण माने म्हणतात की, “गावाच्या बाहेर एकांदा माळ असतो. हागनदारी असते, गावंदरी असते. म्हसणवाटा असतो. नाहीतर वसाड पडलेली जागा असते. जितं मानूस जात न्हाय, मानूसच काय कुत्रंबी फिरकत न्हाय. ध्या दुपारी भ्या वाटतंय तिथं आसतो. असा एक गाव. आमीच बसिवलेला तात्पुरता, जातगाव, जातपंचायत, जातगंगा हिथंबी आसतो. पंच, पाटील, कोतवाल, येस्कर, न्हावी आन् सोनारसुध्दा. हितंबी लाकडं फोडायला येस्करच लागतो. न्याय द्यायला कोट लागतं. शिक्षा करायला कोतवाल तसा गाव नसलेला गाव. बिनचेहऱ्याचा गाव. हा तसा गाव नसतोच. जनावरांच्यझ्रा पाठीवर, पोत्यांच्या खोळीत, खुगीरात, लगायात अडकलेला. अंगात वारं भरल्यागत रोजच्या जागा बदलणारा. आपल्या रीतिभाती, परंपरा, चालीरीती, भेष, भाषा, भूषा, साऱ्यांनी कवटाळून–साऱ्यांच्यापेक्षा आगळावेगळा, चिरेबंद, असा जातगाव असतो. तो काई एक गाव न्हाई. आठरापगड जातींचा आठरापगड गाव. आठरापगड गुत्यांचा आठरापगड गाव. आठरापगड जातींचा फिरस्ता गाव. त्याला सीमा नाय. नाव नाय. गावकूस असा गाव”.

अशाप्रकारे वरीलप्रमाणे माने भटक्यांच्या फिरस्तीबद्दल विशिष्ट वाक्यरचनेत निर्देश करतात. या पुस्तकात आजवर अनेक ज्ञात नसलेल्या व कागदोपत्री नोंद नसलेल्या अनेक जाती शोधून काढल्या आहेत. अशा प्रकारे समाजशास्त्रीय ज्ञानात भर घातलेली आहे.

**२.४.३. लक्ष्मण माने (प्र.आ.१९८४, पुर्नमुद्रण २००९)[३१]**

पालावरचं जग हा लक्ष्मण माने यांचा दुसरा वैचारिक लेख महत्वाचा आहे. या लेख संग्रहातील लेख केसरी, वृत्तपत्रात प्रसिध्द झाले आहेत. या लेख संग्रहातून परंपरानिष्ठ समाजातील लोकांचे प्रश्न समाजाच्या ऐरणीवर मांडले आहेत. या ग्रंथात लक्ष्मण माने यांनी भटक्या विमुक्तांसाठी योध्याप्रमाणे लढा दिला. भटक्या जमातींवर आजही गुन्हेगारीचा शिक्का आहे. तो पुसून टाकण्याचा आटोकाट प्रयत्न करतात.

भटक्या विमुक्तांच्या चळवळीला गती यावी व सलग महिना दीड महिना रोज भटक्या विमुक्तांच्या प्रश्नांचे व्यापक चित्रण व्हावे, झालेली कोंडी फोडून काही नवीन माणसे चळवळीत आणावीत. आपणच आपला आत्मशोध घ्यावा म्हणून लातूर ते मुंबई अशी शोधयात्रा आम्ही काढली. चाळीस दिवस महाराष्ट्रात भटक्या विमुक्तांचे प्रश्नांचे जागरण घातले. जागरणात हवसे, नवसे, गवसे सारे आले. लोकांचे प्रश्न समाजाच्या ऐरणीवर मांडले गेले. प्रश्नांची जाहीर चर्चा सुरु झाली. एक नवी जाणीव भटक्या विमुक्तांच्या चळवळीत निर्माण झाली. यावरुन माने यांनी भटक्या विमुक्त चळवळ उभारुन त्यांना समाजासाठी सांघिक कार्याची जाणीव जागृती केलेली दिसते.

**२.४.४. लक्ष्मण माने (२००३)[३२]**

का कराचं शिकून? या वैचारिक लेखसंग्रहामध्ये माने यांनी विमुक्तांच्या जीवनात शिक्षण का नाही, शिकण्याची काडीमात्र इच्छा नाही. शिकण्याची ऐपत नाही. शिक्षण अगदी दारात आले तरी ते उपयोगाचे नाही. अशी मानसिकता त्यांची आहे. शिकून दोन वेळच्या जेवणाची मारामार असेल तर न शिकून अधिक चांगले पोट भरते. तसेच ही शिक्षण प्रक्रिया केवळ मनुवादी संस्कार, मानवाचे ब्राम्हणीकरण करुन एकापरिने बहुजन दलित उपेक्षित समाजातील माणसाला माणसातून उठवत आहे. कर्मठ व मंढी झाली आहे. प्रत्येक जातीत नवशिक्षितांचा आणि नव्याने ब्राम्हण झालेल्या नवश्रीमंतांचा एक वर्ग आपल्या घरादाराच्या, गावाच्या आणि समाज विषयीच्या उदासिनतेने पाठ फिरवून उभा आहे.

### २.४.५. डॉ. आर. जी. दांडगे (प्र. आ. २००२, पुर्नमुद्रण २०१४)[३३]

खऱ्या अर्थाने वंचित, उपेक्षित, दुर्लक्षित असलेल्या भटक्या विमुक्त जाती व जमातीस सामाजिक न्याय मिळतो का? हया समाजाच्या प्रश्नांच्या मुळाशी जाणे व त्याबाबत लिखाण होणे महत्वाचे व गरजेचे आहे. दांडगे यांनी "भटक्या विमुक्तांचे प्रश्न व उपाय" या लेखासंग्रहातून तो प्रयत्न केल्याचे दिसते. या समाजाच्या सद्यस्थितीला व समावेशक धोरणास केंद्रस्थानी ठेवून संशोधनात्मक अभ्यास करुन त्यांची वंचीतता मांडणाऱ्या लेखकांनी या लेखासंग्रह स्वरुपी पुस्तकाच्या माध्यमातून भटक्या समाजातील अनेक घटकांची ऐतिहासिक व समकालीन मांडणी केलेली दिसते. या पुस्तकात अनेक तज्ञांचे शोधनिबंध समाविष्ट केल्याचे दिसतात. त्यापैकी प्रामुख्याने विनायक सुभाष लष्कर यांनी सामाजिक वर्जितता आणि महाराष्ट्रातील भटके विमुक्त या लेखामध्ये सामाजिक वर्जितता (Social Exclusion) याचा आधार घेऊन विचार मांडलेले दिसतात.

या संकल्पनेचा उगम सर्वप्रथम युरोपमध्ये झाला. लष्कर यांचे मते, "समाजातील वर्जित समूहांच्या वर्जिततेच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिणामांचा अभ्यास करण्यासाठी सामाजिक वर्जितता ही संकल्पना सामाजिक शास्त्रामध्ये सर्रास वापरली जात आहे" म्हणजेच यावरुन विविध प्रकारच्या आर्थिक सामाजिक विषमतांचा वंचित व्यक्तीवर कशाप्रकारे परिणाम होतो. हे दर्शविण्यासाठी सामाजिक वर्जितता ही संकल्पना वापरण्यात येते.

या लेखासंग्रहामध्ये डॉ. खामकर यांनी महाराष्ट्रातील भटक्या व विमुक्त जमातींची सदयस्थिती, समस्या आणि उपाययोजना या लेखामध्ये भटक्यांच्या आर्थिक, सामाजिक शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक समस्या मांडून त्यावर उपाय योजना सूचविल्या आहेत. यालेखा संग्रहामधील लेखांचा कोल्हाटी जमातीच्या सामाजिक, आर्थिक समस्या अध्ययनास फायदा होणार आहे.

## २.५. नियतकालिके व मासिके –

### २.५.१. ७० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अहमदनगर,(१९९७)[३४]

अहमदनगरमध्ये होत असलेल्या ७०व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने "पैस" ही स्मरणिका प्रकाशित करण्यात आली. या स्मरणिकेत अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक व साहित्यिक वैशिष्टये, परंपरा यांचे एकत्रित

दर्शन घडविण्याचे कार्य व विविध क्षेत्रातील वाटचालीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. या स्मरणिकेतील –

१. कै.सा.गो. उर्फ सरदार मिरीकर यांचा वैभवशाली ऐतिहासिक नगर,

२. डॉ. अशोकराव एरंडे यांचा अहमदनगर जिल्हयातील सत्यशोधक चळवळ,

३. डॉ. गंगाधर मोरजे यांचा अहमदनगर जिल्हयातील शैक्षणिक परिवर्तन,

४. डॉ. लिला गोविलकर यांचा अहमदनगरचे संत साहित्य : महाराष्ट्राची अमृतवाहिनी,

५. वृषाली तावरे यांचा अहमदनगर जिल्हयातील कर्तृत्ववान स्त्रिया या लेखांचा प्रकरण क्र. ४ 'अहमदनगर जिल्हा–एक दृष्टीक्षेप' या प्रकरणासाठी विशेष संदर्भ लक्षात घेतला आहे.

'कानामात्रा उकार नसलेले अहमदनगर' या लेखात प्रा.मेधा यशवंत काळे म्हणतात की, ''पाच शतकांपूर्वी निजामशाहीचा संस्थापक अहमदशाह याने सिनानदी व भिंगारची नदी या दोन नदयांच्या परिसरात जे गाव वसविले त्याला त्याच्या नावावरुन अहमदनगर हे नाव पडले''.

हे मत लक्षात घेता अहमदनगर जिल्हा हा पाचव्या शतकापासून असून तो निजाम अहमदशहाने वसविले आहे.

### २.५.२. अखिल महाराष्ट्र कोल्हाटी समाज सेवा संघ – ऐतिहासिक स्मरणिका (२१ डिसेंबर १९९८)[३५]

अखिल महाराष्ट्र कोल्हाटी समाज सेवा संघाचे–१९५० संस्थापक व स्मरणिकेचे अध्यक्ष श्री.मुसळे हे कोल्हाटी समाजाचे असून चळवळीचे कार्यकर्ते होते. या स्मरणिकेत भटक्या विमुक्त जाती समुहातील कोल्हाटी जाती संदर्भात कसरतीचे मेहनतीचे खेळ करुन गावोगाव भटकणाऱ्या जमातीने जातपंचायत कशी शाबूत ठेवली आहे. तसेच लोक न्यायालय व लोकपंचायत यांची गुरुजींनी तुलना करुन काही मते नोंदविली आहेत. जगण्याचे साधन शोधत असताना कसरतीपासून ते कलावंतीनपर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. मुसळे गुरुजी यांनी समाजातील कार्यकर्ते व संघटनेतील सदस्यांचा वैशिष्टयांसह परिचय दिला आहे. तसेच त्यांनी १९५० पासून कोल्हाटी समाजासाठी शासकीय शासन दरबारी समाज सुधारणेसाठी केलेली धडपड व्यक्त होते. हे कार्य सामाजिक दृष्टया मोलाचे आहे. या स्मरणीकेत लोकनाटय केंद्र, त्यांचे मालक, कलावंतीण स्त्रिया यांचे उल्लेख मिळतात. ते प्रस्तुत संशोधनकामी उपयुक्त ठरतात. मुसळे यांनी कोल्हाटी समाजातील विवाहपध्दती, जात पंचायत(न्यायपंचायत),

मुंजपध्दती, लग्न–सोयर संबंध, मुलांचे जावळ काढणे, मुलाची पाचवी कार्यक्रम अशा विविध विधींचे विवेचन केले आहे. ते सामाजिक संशोधनासाठी उपयुक्त ठरते.

श्री. मुसळे यांच्या स्मरणीकेत सुमारे पन्नास वर्षापूर्वी कोपरगाव येथील श्री. रामभाऊ जाधव (नयेवाले) त्यावेळी त्यांचे वय ७०–७५ वर्ष होते. त्यांनी आपल्या बिल्डींगला कान्होपात्रा असे नाव दिलेले आहे. त्यांच्याशी झालेली चर्चा सांगताना मुसळे म्हणतात की, ‘‘आम्ही बोलत बसलो असताना मी त्यांना सहज विचारले, कान्होपात्रा हे बिल्डींगला दिलेले नाव तुम्हाला काय म्हणून आवडले. तेव्हा ते म्हणाले तुम्हाला माहीत नाही की ‘कान्होपात्रा’ ही आपल्या कोल्हाटी जातीची एक थोर संत होऊन गेलेली आहे’’. अशाप्रकारे अनेक प्राचीन उल्लेख या स्मरणिकेत सापडतात.

### २.५.३. हाकारा (जानेवारी – जून १९९१)[३६]

पालघर जिल्हा ठाणे याठिकाणी दि. २३,२४,२५ डिसेंबर रोजी ५ वे आदिवासी साहित्य संमेलन संपन्न झाले. त्यानिमित्त हाकाराचा हा विशेषांक प्रकाशित केला गेला होता. आदिवासी कसा निर्माण झाला. संशोधनाचा जटिल विषय आहे. परंतु हाकारा या मासिकांमध्ये तो पुराव्यानिशी सोप्या व नेमक्या शब्दांत मांडण्यात आला आहे. या संमेलनाचे अध्यक्ष श्री. वाहरु सोनवणे आपल्या अध्यक्षीय भाषणात आदिवासी समूहाचा शोध उगम, जीवनप्रणाली विषयक दुर्मीळ माहिती प्रदान करताना म्हणतात, ‘‘ एकलव्याने जिद्दीला पेटून मातीचा पुतळा करुन त्याचा गुरु केला आणि धनुष्यबाण चालवण्यात अर्जनापेक्षाही हुशार ठरला. आदिवासींचे हुशार होणे द्रोणाचार्यालाही खपले नाही. गुरुदक्षिणेच्या कपटी डावांनी एकलव्याचा अंगठा तोडून त्या पिढीतल्या आदिवासींना दडपून टाकले. तेव्हा द्रोणाचार्य खलनायक होता असे लिखाण साहित्य व इतिहासात कुठ सापडत नाही. गुलाम भारताच्या इतिहासात स्वातंत्र्याच्या लढाईत ख्वाजा नाईक, तंटया भील, रामदास महाराज, भागोजी नाईक, बिरसा मुंडा, राणी दुर्गावती इ. आदिवासी क्रांतीवीरांनी ब्रिटिश राज्यविरुध्द झुंज दिली. अनेक आदिवासींनी स्वातंत्र्यासाठी रक्त सांडले. पण प्रस्थापित इतिहासकारांनी इतिहासाच्या पानावर आदिवासी वीरांची दखल घेतली नाही’’. यावरुन खरा इतिहास दडवला जातो व उच्चभ्रूंचे वर्चस्व वाढविण्यासाठी वस्तुस्थीतीतील  दोष दाखवून इतिहासाची डोळेझाक केलेली दिसते.

### २.५.४. हाकारा (ऑक्टोबर–डिसेंबर १९९६)[३७]

या अंकामध्ये डॉ.प्र.लं. गावडे यांनी ‘आदिवासींच्या शिक्षणातील अडथळा–भाषा’ या लेखामध्ये आदिवासी जमातीच्या शिक्षणाचा प्रश्न हा अनेक गुंतागुंतीमुळे विशेष लक्ष वेधणारा काहीसा जटिल कसा आहे हे स्पष्ट केले आहे. यासाठी त्यांनी आदिवासी बोलीभाषा, शिक्षणाबद्दलची अनास्था व निरागसता इ. कारणाचा शोध लावल्याचे दिसते. आदिवासी मुलांची एकाग्रता होत नसून ते फार कमी बोलतात. त्यांना शिक्षणाबद्दल विलक्षण तिरस्कार, तिटकारा असल्याचे एका आदिवासी गीतावरुन दिसून येते.

“ बामणाच्या जन्मा येशी चिकू लिकू मरशी
वाण्याच्या जन्मायेशी तोलू तोल मरशी
पण कातोडयाच्या जन्मा येशीत जंगलचा राजा होशी”

यावरुन ते त्यांच्या आदिम जीवनाविषयी अभिमानाने खूश होत आहे. ती वस्तुस्थिती त्यांनी हवीहवीशी वाटत असते म्हणून ते शिक्षणापासून दूर पळत आहेत.

या अंकामध्ये वरुणराज भिडे यांनी अपेक्षित तरीही अपूर्व आदिभारती या लेखात आदिवासी बोली भाषा प्रकल्पांचा प्रारंभ मांडला आहे. डॉ. अशोक केळकर, यांनी १९७२ मध्ये समाजप्रबोधन पत्रिका या नियतकालिकात आदिवासींच्या प्रश्नांची भाषिक गरज हा लेख लिहिला. डॉ. चित्रा नाईक यांच्यावर याचा प्रभाव होऊन १९७५ मध्ये आदिवासी बोली भाषा प्रकल्पास सुरुवात झाली. प्रारंभी माडिया गोंडी, कोलामी आणि वारली या तिन्ही भाषांचा अभ्यास होऊन त्यांचे शब्दकोश तयार झाले.

### २.५.५. हाकारा (ऑक्टोबर –डिसेंबर २००० )[३८]

हाकारा या अंकामध्ये सौ. कुसुम अलाम यांनी कैफियत आदिवासी माणसाची या लेखामध्ये ज्ञानाचे डोळे नसलेला हा माणूस आजही अन्न–वस्त्रांशिवाय स्वाभिमानशून्य जिणे जगतो आहे व त्याचे चित्रण करुन दिले. तसेच पूर्वीच्या काळी आदिवासी स्त्रियांना हल्लेखोर पळवून नेत असत म्हणून त्या अंगावर गोंदून घेत असत असेही त्या मांडतात.

प्रा. अरविंद सी. राणे यांनी आदिवासींच्या शिक्षणातील मुख्य समस्या या लेखात आदिवासी समाज शिक्षणापासून वंचित कसा व का आहे त्याची उत्तरे स्पष्ट केली आहेत ती पुढीलप्रमाणे

१. शिक्षणाला गौण स्थान

२. शिक्षणाविषयी नावड

३. शिक्षकाची उदासिनता

४. शिक्षणातील गळती आणि स्थगिती

५. शिक्षण देण्याची पद्धत व पुस्तके

६. शिक्षण निवासस्थानाचा अभाव

७. किमान सुविधांचा अभाव[३२]

यासर्व कारणांमुळे प्रा.राणे यांनी आदिवासी समाज ज्ञानाच्या प्रवाहापासून दूर राहून त्यांच्या साक्षरतेवर विपरित परिणाम होत असल्याचे नमूद केले आहे.

### २.५.६. हाकारा (त्रैमासिक विशेषांक २००६)[३९]

हाकारा या अंकांच्या वाटचालीमुळे महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची तीन दशके वाटचाल सुरु असल्याचे दिसते. या विशेष अंकामध्ये साहित्य, संस्कृती, अस्मिता, कला, उपजिविका अशा विविध विभागांमार्फत साहित्यातील आदिवासी लेख, आदिवासी लोक गीतातील सौंदर्य हा उषा किरण आत्राम यांनी आपल्या लेखात आदिवासी गीतांचे वर्णन करुन त्याचा अर्थ स्पष्ट केला आहे. तसेच डॉ. धैर्यशील शिरोळे यांनी आदिवासी स्त्री जीवन एक अल्पसा परिचय या लेखातून "आदिवासी स्त्री जीवनाची सुरुवात नकारात्मक पध्दतीने होत नाही असे स्पष्ट केले आहे". त्यांनी स्त्रीच्या सर्व मानसिक शारिरीक, सांस्कृतीक बाबींची उकल या लेखात केलेली दिसते.

वरील सर्व हाकारा त्रैमासिकांच्या अंकांची कोल्हाटी समाजाचा अभ्यास करत असताना तुलनात्मक संकल्पनांच्या स्पष्टीकरणासाठी वापर केला आहे.

### २.५.७. सक्षम समीक्षा त्रैमासिक ( ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०११)[४०]

हे त्रैमासिक श्री शैलेश त्रिभुवन यांची अनेक संशोधन कर्त्यांसाठी असलेली देणगी म्हणावी लागेल. या मासिकामध्ये अनेक ज्वलंत प्रश्नांवर प्रकाश टाकण्यासाठी शोधनिबंधाचे प्रस्तुतीकरण केले जाते. यामध्ये कविता, कथांचे वैचारिक विश्लेषण, एकांकिका, अनुवाद व भाषांतर, नाटक, लेख यांचा समावेश होतो. त्यातील काही लेख व शोध निबंधाचा प्रस्तुत संशोधनामध्ये समावेश करण्यात येणार आहे.

प्रा. श्री. श्रीराम गडकर आपल्या दलित व दलितेतर कथाकार या लेखात शंकरराव खरात यांच्या कथेचा उल्लेख करताना म्हणतात, "शंकरराव खरात यांच्या कथेचा परिघ खूप मोठा आहे. गोंधळी, वासुदेव, चित्रकथी, कुडमुडया जोशी, बहुरुपी, पोतराज, जोगतीण, आराधी, घिसाडी, मुरली, नंदीवाला, मांग, गारुडी, वडार, भामटा, फासेफारधी, डोंबारी, कैकाडी, बेलदार, माकडवाला, उचल्या, वैदू इ. वेगवेगळया माणसांचे चित्रण त्यांच्या कथा करतात".

या लेखात त्यांनी बाबुराव बाबूल, केशव मेश्राम, योगिराज वाघमारे, वामन होवाळ, अविनाश डोहस, योगेंद्र मेश्राम, माधव कोंडविलकर इ. दलित कथाकारांनी संघर्षाचे भान ठेवून कथा लिहिल्या आहेत.

या त्रैमासिकामध्ये प्रा. डॉ. जया जितेंद्र कदम यांनी आपल्या दलित लेखिकांच्या कथेमधील समता संघर्ष या लेखामध्ये पुरुषप्रधान व्यवस्थेविरुध्द संघर्ष या मुद्दयाला हात घालत असताना त्या लिहितात स्त्री कोणत्याही जात धर्माची असो तिला कुटुंबात व समाजात दुय्यम स्थान दिले जाते. अशा तिच्या दुय्यम स्थानाचे चित्रण जसे दलित लेखिकांच्या कथेमधून येते तसे हे दुय्यमत्व नाकारण्यासाठीचा संघर्षही प्रखरपणे चित्रित होतो.

वरील वक्तव्य सिध्द करत असताना त्यांनी उर्मिला पवारांच्या 'सहावं बोट' या संग्रहातील शल्टा, प्लॅस्टिकचा कान, अंजूम अशा अनेक कथांमधून प्रधान व्यवस्थेला बळी पडणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखांचा आधार घेतला तसेच कवच मधील इंदिरा, हाताचा एक मधील विनादिनी या स्त्रियांच्या कथा-कादंबऱ्यांमधून सामाजिक जातियताःश्रेष्ठ कनिष्ठता व त्यापोटी होणारा स्त्रीचा उपहास दिसून येतो.

**२.५.८. सक्षम समीक्षा त्रैमासिक (जाने-फेब्रु-मार्च २०१५)[४१]**

या अंकामध्ये डॉ. यशवंत मनोहर यांचे कोथरुड येथे झालेल्या साहित्यिक कलावंत संमलेनाचे अध्यक्षीय भाषण आहे की ज्याचे शीर्षकच साहित्यकापुढील जळते प्रश्न असे आहे. त्यात डॉ. मनोहर म्हणतात, "देशात कोणत्याही साहित्यकाला व कलावंताला धर्म म्हणून जात वा पोटाजाती म्हणूनच का जन्म घ्यावा लागतो. इतर देशांमध्ये जाती पोटजातींच्या जहरांचं चिरंतन नाही म्हणून त्या देशाचं कोणतं नुकसान झालं आणि या जाती पोट जातींच्या जखमांमुळे आपल्या देशाचं कोणत भल किंवा नुकसान झालं हे समजून घ्यायला हव."

मनोहरजींच्या मते वर्ण व धर्माच्या या चौकटीतून जो मनुष्य संघर्ष करुन मुक्त होतो त्याची गाठ प्रतिभावंतपणाशी होते.

### २.५.९. सक्षम समीक्षा त्रैमासिक (एप्रिल–मे–जून २०१५)[४२]

या त्रैमासिकामध्ये डॉ. गंगाधर पानतावणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक लेखन या शोधनिबंधात आंबेडकरांच्या साहित्यातून नवीन पीढीला नवे परिवर्तन विचार दृष्टी आणि जीवनदृष्टी देण्याचा प्रयत्न केला आहे. अस्पृश्यतेमुळे कसे नुकसान झाले आहे व जात ही एक मनाची अवस्था आहे. हे आंबेडकरांचे मत पानतावणे यांनी पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. वर्णभेद, अस्पृश्यता यांच्यावरील वैचारिक लेखनाचा प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित असल्याने त्याचा उपयोग केला गेला आहे. हे त्रैमासिक सर्वांगीण लेखांचा समावेश करीत असल्याचे दिसून येते.

### २.५.१०. गोरवाणी (ऑक्टोबर ते डिसेंबर २०१४)[४३]

या त्रैमासिकामध्ये श्रीकृष्णा राठोड यांनी बंजारा जमात आणि आयुर्वेदाभ्यास या लेखामध्ये आयुर्वेदातील विशिष्ट वनस्पती व त्यांचा उपयोग आणि आदिवासीपैकी बंजारा जमात यांचा सहसंबंध मांडला आहे. त्यांच्या मते या “ बंजारा लोकांकडे आयुर्वेदाचा भरमसाठ खजिना आजही उपलब्ध आहे. कायम जंगलात राहिल्यामुळे वनस्पतींची यांना तंतोतंत माहिती आहे”.

यावरुन बंजारा जमातीतील लोक शारिरीक आजार दूर करण्यासाठी पटाईत असतात. तसेच वरील लेखामध्ये ते मानसिक आजार दूर करण्यात निष्णात असतात असेही दिसते.

### २.५.११. गोरवाणी (जानेवारी ते मार्च २०१६)[४४]

या त्रैमासिकामध्ये श्री पंडित कांबळे यांनी समाज वास्तव मांडणारा कथा संग्रह या लेखामध्ये सामाजिक अंध रुढींची चिरफाड करणारा नवकथाकार नयराज खुने यांच्या कथा संग्रहाची समीक्षा केलेली दिसून येते. या कथासंग्रहाचे नाव आगडोंब होय. खुने यांनी या संग्रहात सामाजिक पारंपारिक रुढीला छेद देणाऱ्या, मानवी मनाला स्पर्शून जाणाऱ्या प्रसंगी अंगात रक्त सळसळायला लावणाऱ्या अशा विविध रुपे घेऊन आलेल्या दहा कथा प्रस्तूत केलेल्या आहेत. प्रस्तुत कथांमधून प्रभावीपणे नायक नायिकांची तडफदार पात्र मनाला शहारुन सोडतात. “लक्सुमामा, हालपेस्टा, तडजोड या तमासगीर व आरादी नाटक करणाऱ्या

कलावंताचे चित्रण करणाऱ्या कथा आहेत. छळ व राखण या कथा पारधी व मातंग समाजाच्या इमानदारी, प्रामाणिकपणा व समाज शोषणाविरुध्दची जाणीव निर्माण करणाऱ्या या दोन कथा आहेत''

अशाप्रकारे आगडोंब या सहनशिलतेचा अंत संपला की पोटात उसळणाऱ्या काही कथांचा संग्रह असून त्याचे वर्णन कांबळे यांनी अभ्यासपूर्ण केलेले दिसते.

### २.५.१२. मराठी संशोधन पत्रिका (एप्रिल–मे–जून २०१६)[४५]

या त्रैमासिकामध्ये अनुराधा मु. भिडे यांनी आपल्या संत जनाबाई काही बरोबर तर काही चुकीच्या समजूती या लेखातून कष्टपूर्वक शोध घेऊन पुन्हा जनाबाईंच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत लेखात त्या प्रमुख चार मुद्दयांचा शोध घेतात.

१. जनाबाईंचा वर्ण

२. त्यांचे गाव

३. सासुरवाशीण आहेत का?

४. दळण याचा अध्यात्मिक अर्थ यासाठी भिडे या संशोधनाला योग्य असे पुरावेही सादर करतात. प्रस्तुत लेखात भिडे यांनी समारोपात पुढील मुद्दयांवर प्रकाश टाकलेला आहे.

१. संत जनाबाई हया क्षत्रिय वर्णाच्या कन्या आहेत.

२. संत जनाबाई हया पुसेगावच्या कन्या आहेत

३. संत जनाबाई हया गंगाखेडच्या सासुरवाशीण आहेत.

४. देळणा हे त्यांचे उच्चप्रतीचे कुशल कर्म आहे.

अशा प्रकारे भिडे यांनी संत जनाबाईंच्या बाबतीत असणाऱ्या समजूती व गैरसमजूती मराठी संशोधन पत्रिकेत स्पष्ट केल्या. या लेखाच्या आधारे कोल्हाटी जमातीतील मंगळवेढा येथे जन्मलेल्या संत कान्होपात्रांच्या अभ्यासास मदत मिळणार आहे.

## २.६. विद्यावाचस्पती शोध प्रबंध

### २.६.१. गणपत लक्ष्मण इंगोले (१९८३)[४६]

पेशवेकालीन स्त्री जीवन (१७०८–१८१८) या विषयामध्ये मराठवाडा विद्यापीठाअंतर्गत इंगोले यांनी शोध प्रबंध सादर केला आहे. इतिहास विभागाअंतर्गत हा विषय सादर करण्यात आला आहे. या संदर्भाचा आढावा घेणे प्रस्तुत संशोधनासाठी महत्वपूर्ण ठरते कारण कोल्हाटी

जमातीचा इतिहास मांडत असताना इतिहासातील कोल्हाटी स्त्रीचे स्थान व कोल्हाटी जमातीचा पांरपारिक व्यवसाय म्हणजेच नृत्य व मनोरंजनाचे कार्य यासंबंधीचे उल्लेख या प्रबंधामध्ये सापडतात. पेशवेकालीन स्त्रीचा अभ्यास करताना इंगोले यांनी पेशवेकाळातील उच्चवर्ग, मध्यम वर्ग व निम्न वर्ग शुद्र स्त्रियांचा अभ्यास केल्यामुळे शुद्र वर्णातील कोल्हाटी जमातीच्या स्त्रीच्या जीवन मार्गावर प्रकाश टाकण्यास मदत मिळते. इंगोले यांनी सर्वप्रथम पेशवेपूर्व काळातील स्त्री जीवन व प्राचीन परंपरा मांडली आहे. नंतर त्यांनी पेशवेकालीन समाजातील स्त्रीचे स्थान मांडले आहे. ते मांडत असताना त्या काळातील स्त्रीचा जन्म, शिक्षण, विवाह, कुटुंब, कुटुंबाव्यतिरिक्त जीवन व स्त्रीचे समाजातील स्थान या घटकांची सविस्तर माहिती दिली आहे.

शोध प्रबंध प्रकरण पाचवे यामध्ये पेशवेकालीन आर्थिक जीवनातील स्त्रीचे स्थान स्पष्ट केले आहे. भारत हा कृषीप्रधान देश असला तरी याठिकाणी विविध जाती जमातीच्या स्त्रिया आपल्या वंशपरंपरेने चालत असणारे काम करुन आपआपले अर्थाजन करत असत. त्यामध्ये हलक्या प्रतीचे काम करण्यासाठी हलक्या जातीतील स्त्रियांना लाचार व्हावे लागत असे. स्त्रियांच्या व्यवसायामध्ये विशेष उल्लेख कुणबीण, वेश्या व्यवसाय, रखेली या व्यावसायासाठी शुद्र जातींचा उल्लेख इंगोले यांनी केलेला आहे. पेशवेकालीन स्त्रीचे अर्थाजनाचा इंगोले यांनी केलेला अभ्यास कोल्हाटी जमातीतील स्त्रीच्या व्यवसायावर प्रकाश टाकताना दिसतो. हा प्रबंध खूप मोलाचे मार्गदर्शन करतो. त्याकाळात अनेक जमातीतील स्त्रीवर मात्र लग्न न करण्याचे बंधन आई–वडिलांनी ती जन्माला येण्यापूर्वीच लादले जायचे आणि धार्मिकतेच्या नावाखाली त्या स्त्रिया ते पाळायचे. आई–बापांनी लादलेले जीणे जगणाऱ्या दुदैर्वी स्त्रियांनाही शरीरे होती. त्यांनाही भूक होती. ती निवारण्यासाठी पेशवेकाळात त्या वेश्यावृत्ती करत असे इंगोलेंनी त्यांचे मत मांडले आहे. कोल्हाटी जमातीच्या आर्थिक अभ्यासामध्ये हा प्रबंध महत्वाचा ठरतो.

### २.६.२. पंढरीनाथ धनाजी काळे (जुलै १९८४)[४७]

पंढरीनाथ धनाजी काळे यांनी पुणे विद्यापीठाअंतर्गत डॉ. आनंद यादव यांच्या मार्गदर्शनाखाली १९८४ साली मराठी तमाशा एक कलाप्रकार उद्गम आणि वाटचाल (उद्गम ते १९८२) या विषयामध्ये शोध प्रबंध सादर केला आहे. काळे यांनी या प्रबंधामध्ये तमाशा या शब्दाची तात्विक चर्चा, तमाशा केव्हा जन्माला आला असावा. तमाशा कसा जन्मला आला, तमाशा वाड.मयाची निर्मिती कशी झाली अशा विषयांचा अभ्यास करुन तमाशाची वाटचाल

स्पष्ट केली आहे. तमाशा आणि कोल्हाटी जमात यांचा खूप जवळचा संबंध असल्याने हा प्रबंध प्रस्तुत संशोधनासाठी मार्गदर्शक ठरतो.

काळे यांनी प्रबंधात नमूद केल्याप्रमाणे तमाशा हा शब्द मूळ अरबी भाषेतून असून त्याचा अर्थ प्रक्षेणीय दृश्य असा आहे. तसेच नामदेव व्हटकर यांनी मराठीचे लोकनाटयः तमाशा– कला आणि साहित्य या ग्रंथात तमाशा हा शब्द मूळ पार्शियन भाषेतील आहे. तेथून तो उर्दूत आला. पुढे तो उर्दूतून रुढ झाला आहे असे प्रतिपादन केले आहे. यावरुन तमाशा हा शब्द मूळचा मराठी भाषेतील नसून तो उर्दूतून मराठीत आला असे काळे यांनी अनुमान काढलेले दिसते.

काळे यांनी त्यांच्या प्रकरण क्र.३ मध्ये तमाशा कसा जन्माला आला याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यामते, तमाशा महाराष्ट्रातील परंपरागत प्रचलित लोककलांच्या सादरी करणाच्या माध्यमातून जन्माला आला असावा. त्यापैकी काही लोककला लोप पावलेल्या दिसतात तर काही अजूनही अस्तित्वात आहेत. काळे यांनी काही लोककलांचा उल्लेख केला आहे. त्यांच्यातील बाहुल्यांचा खेळ, दशावतार, ललित, कोल्हाटी यांचा नाच या लोककला तमाशाला जन्मास घालण्यास हितावह व उपकारक ठरतात. काळे यांनी प्रकरण क्र. ४ मध्ये डोंबारी व कोल्हाटी समान लोककला सादर करणाऱ्या या जमातींचा व तमाशाचा सहसंबंध व्यक्त केला आहे. तमाशात डोंबारी कोल्हाटी यांच्या नाचाप्रमाणे कलावंतांचा समूह दिसतो. एवढेच काय पण या तमाशातील नाचणाऱ्या मुलींपैकी ७५ टक्के नाचणाऱ्या डोंबारी कोल्हाटी समाजाच्या आढळतात. तसेच तमाशाच्या उगमामध्ये कोल्हाटी जमातीचा फार मोलाचा वाटा असल्याचे या प्रबंधातील माहितीवरुन स्पष्ट होते.

### २.६.३. आदम महोम्मद शिकलगार (१५ ऑगस्ट १९९९)[४८]

शिकलगार यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत पुणे जिल्हयातील नागरी वसाहतीतील स्थलांतरित शिकलगार जमात (सामाजिक, आर्थिक, व राजकीय स्थितीचा एक अभ्यास) या विषयामध्ये संशोधन केले आहे. त्यांच्यामते शिकलगार ही मुस्लिमजमातीपैकी एक भटकी जमात असावी. हिंदू समाजातील १२ बलुतेदारापैकी लोहार या बलुतेदाराचे काम ही जमात करते. या पार्श्वभूमीवर समाज म्हणजे काय? मुस्लीम समाजाचे स्वरुप कोणते? शिकलगार यांची मुस्लीम व भटकी जमात आहे का? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न

या संशोधनामार्फत केलेला आहे.

पुणे जिल्हयातील स्थलांतरित शिकलगार जमातीच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा अभ्यास करताना शिकलगार जमातीच्या पूर्व इतिहासाचा प्रश्नावलीद्वारे आढावा घेऊन जमातीचे स्थलांतर, सांस्कृतिक स्थलांतर, स्थलांतराचे नियम, कारणमीमांसा, परिणाम करणारे घटक इ. संदर्भाने अध्ययन केले आहे. शिकलगार जमातीची सामाजिक, आर्थिक व राजकीय सद्यस्थितीची माहिती प्रश्नावलीद्वारे मिळविली आहे. संशोधनाची उद्दिष्टये व गृहिते आखून शास्त्रीय संशोधन पध्दतीद्वारे मिळविलेल्या तथ्यांचे विश्लेषण करुन निष्कर्ष काढले आहेत आणि शेवटी शिफारशी सुचविल्या आहेत. समाजशास्त्राशी संबंधित प्रबंध असल्याने या प्रबंधातील संशोधन पध्दतीचा आधार कोल्हाटी जमातीच्या अभ्यासासाठी मार्गदर्शक ठरणारा आहे. भटक्या–विमुक्त जमातीसाठी जवळचा संबंध असणारा घटक म्हणजे स्थलांतर होय. भटक्या जमातींच्या स्थलांतरावर तसेच भटकण्यावर त्यांच्या आर्थिक, सामाजिक बाबी अवलंबून असतात. म्हणून शिकलगार यांनी शिकलगार जमातीची भटकंती व त्या भटकंतीचा त्यांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय जीवनावर होणारा प्रभाव स्पष्ट केला आहे. त्यांनी त्यासाठी विशिष्ट नमुना निवड पध्दतीचा वापर केला आहे. या शोधप्रबंधातील तथ्य विश्लेषणाचा उपयोग प्रस्तुत संशोधनासाठी होणार आहे.

### २.६.४. गणपत राठोड (२० मे २०००)[४९]

गणपत राठोड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विश्वविद्यालय, औरंगाबाद विद्यापीठामध्ये हिंदी विभाग अंतर्गत बीड ‘‘जिले के बंजारा लोकगीतों का अध्ययन’’ या विषयामध्ये शोधप्रबंध सादर केला आहे. या विषयाअंतर्गत राठोड यांनी बंजारा जमातीच्या लोकगीतांचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये समाज व लोकगीत, लोकगीतांमधील संस्कार, श्रमगीत, लोकगीतांमधील परिवर्तन, लोकगीतांमधील धार्मिक तत्व अशा विविध उपविभागांमध्ये या विषयाचा अभ्यास केलेला आहे. बंजारा जमातीचा सामाजिक व आर्थिक अभ्यास झालेला असला तरी बंजारा जमातीच्या लोकगीतांचा नाविन्यपूर्ण अभ्यासाचे श्रेय गणपत राठोड यांना देता येते. बंजारा जमात ही लोककला सादर करणारी जमात असून कोल्हाटी जमातीचा अभ्यास करताना लोककलेचे महत्व जाणून घेण्यासाठी या प्रबंधाचा अभ्यास महत्वाचा वाटतो.

### २.६.५. बंडू हरिभाऊ किर्दक (२००५)[५०]

"अकोला जिल्हयातील बेलदार जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास" या संशोधन विषयाचे अध्ययन समाजशास्त्र या विषयाअंतर्गत करण्यात आले आहे. बेलदार जमातीचा सामाजिक अंगाने अभ्यास करत असताना किर्दक यांना आढळते की, "या जमातीचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत असून बेलदारांची बोलीभाषा लोप पावत आहे. बेलदार जमात ही एक विवाही जमात आहे कारण ते लोक विवाहाला पवित्र संस्कार मानतात"

अशाप्रकारे बेलदार जमातीविषयक अकोला जिल्हयातील अनेक वैशिष्टय संशोधकाने नमूद केलेली दिसतात.

### २.६.६. सतीशकुमार जाधव (एप्रिल २००७)[५१]

"कोल्हाटी समाज आणि संस्कृती : एक ऐतिहासिक अध्ययन" कोल्हाटी जमातीच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक पार्श्वभूमीवर लिखाण करणारा हा शोधप्रबंध असून समाजशास्त्र विषयाअंतर्गत हे सामाजिक संशोधन केलेले आहे. या प्रबंधामध्ये जाधव यांनी कोल्हाटी जमातीचा उगम, महाराष्ट्रातील धर्म आणि कोल्हाटी समाज, महाराष्ट्रातील कोल्हाटी समाजाची सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला आहे.

कोल्हाटी जमातीतील कला सादर करणाऱ्यांची दुरावस्था व्यक्त करताना ते म्हणतात "कोल्हाटी समाजात आर्थिक उत्पन्न मिळविण्याच्यादृष्टीने भरपूर परिश्रम घेतले जातात. परंतु कसरतीचे खेळ व्यावसायातील अनिश्चिततेमुळे आर्थिक उत्पन्नपूर्व होऊ शकले नाही. उत्पन्नासाठी मरमर प्रयत्न करावे लागतात तरीही कलेची कदर व दखल घेतली जात नाही."

यावरुन कुटुंबातील प्रत्येक सदस्याला कुटुंब चालविण्यासाठी स्वतःचा आर्थिक आधार दयावाच लागतो. स्वतःला कामात गुंफुन कुटुंबाला आर्थिक मदत करावीच लागते असे स्पष्ट होते. एवढेच नव्हे तर परंपरागत दृष्टीकोनाचा प्रभाव स्पष्ट करताना जाधव म्हणतात की, या समाजाने आपल्या आर्थिक उत्पन्नाच्या साधनात पारंपारिक व्यावसायालाच पसंती दिल्याने या समाजाचा विकास हा इतर समाजाच्या तुलनेत म्हणावा तेवढा झालेला दिसत नाही. म्हणजेच समाजात कला जपणे व त्या कलेत स्वतः सामावून घेण्याच्या वृत्तीमुळे या समाजाला आधुनिक काळाशी जुळवताना अनेक समस्या, अडचणी, उपेक्षा, अवहेलना यांना तोंड दयावे

लागते. जाधव यांच्या शोध प्रबंधातील कोल्हाटी जमातीच्या सामाजिक व आर्थिक अभ्यासाचा कोल्हाटी जमातीच्या अहमदनगर जिल्हयाच्या अभ्यासासाठी फायदा होणार आहे. तसेच जाधव यांनी समाजाची परिवर्तन व विकासाकडे होणारी वाटचाल प्रस्तुत संशोधनाला योग्य मार्ग दाखवणारी ठरते.

### २.६.७. बाळासाहेब बळे (२००८)[५२]

बाळासाहेब बळे यांनी पुणे विद्यापीठाअंतर्गत महाराष्ट्रातील पारधी समाजाच्या लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास (लोकजीवन व लोक संस्कृतीच्या विशेष संदर्भात) या विषयामध्ये शोध प्रबंध सादर केला आहे. बळे यांच्यामध्ये जमातीविषयक लोक साहित्याचा अभ्यास केल्याशिवाय जमातीचे उलगडणे शक्य नाही म्हणून त्यांनी गुन्हेगार जमाती असा ज्या जातींचा उल्लेख होतो त्यापैकी एक पारधी जमातीचा लोकजीवन व लोक साहित्याचा अभ्यास करण्याचा निश्चय केला. यासाठी बळे यांनी प्रथमतः या सर्व जमातींचे वस्तूनिष्ठ सर्वेक्षण करुन वास्तविक अस्तित्व समजावून घेऊन मानवी मूल्यांच्यादृष्टीने पायाभूत व प्रामाणिक प्रयत्नांना सुरुवात केली. या प्रत्यक्ष सर्वेक्षणाबरोबर क्षेत्रीय अभ्यास पध्दतीच्या मार्गाने पारधी जमातीच्या सांस्कृतिक संदर्भासह जमातीच्या वास्तव स्थिती गतीचा, लोक साहित्याचा आणि भाषेचा परिचय प्रबंधाच्या आधारे सर्वांना करुन देण्याचा प्रयत्न केला. या अभ्यासासाठी प्रमुख केंद्र श्रीगोंदा तालुका आणि महाराष्ट्रातील प्रदेशनिहाय म्हणजे खानदेश, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मध्य पश्चिम महाराष्ट्र, उत्तर मध्य महाराष्ट्र अशा महाराष्ट्र व्याप्ती क्षेत्राचे प्रातिनिधिक केंद्रे निश्चित करुन सर्वेक्षण करण्यात आले. उपलब्ध संपादित लोकसाहित्याचे शास्त्रीय वर्गीकरण व चिकित्सा करण्यात आली. या चिकित्सेच्याआधारे पारधी समाजाची सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक गोष्टींविषयक चिकित्सा शोध प्रबंधाच्या तंत्रानुसार मांडण्यात आली.

पारधी जमातीची ऐतिहासिक पार्श्वभूमी मांडताना पारध या संस्कृत क्रियावाचक शब्दास अनुसरुन अतिप्राचीन काळापासून मांडण्यात आली आहे. बळे पारधी समाजाची इतर माहिती देताना पारधी जमात अत्यंत परंपरानिष्ठ, अंधश्रध्दा, पृथ्थकरण जपणारी व स्वीकृत गुन्हेगाराला धार्मिक नैतिकतेने जपणारी असल्याचे दिसते. तसेच स्त्री–पुरुष संबंधात चारित्र्य शुध्दीला अतिशय महत्व देते असे मत व्यक्त करतात. बळे यांनी प्रबंधामध्ये पारधी समाजाच्या

सण–उत्सव, जन्मविधी, मर्तक विधी, विवाहविधी, इ.ची सविस्तर चर्चा केली आहे. तसेच पारधी समाजाचे वैशिष्टय असणारे जव्हारणं विधीनाटय यांचे स्वरुप व उद्‌देश स्पष्ट केले आहेत. जव्हारणं म्हणजे जंगली जत्रा, जोगणं देवदेव होय.

### २.६.८. निवृत्ती विनायक मिसाळ (एप्रिल २००९)[५३]

निवृत्ती मिसाळ यांनी पुणे विद्यापीठाअंतर्गत धनगर समाजाचे लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास (अहमदनगर जिल्हयाच्या संदर्भात) या विषयामध्ये मराठी विभागा अंतर्गत शोधप्रबंध सादर केला आहे. या प्रबंधामध्ये त्यांनी अहमदनगर जिल्हयातील धनगर जमातीचा विशेष संदर्भ म्हणून अभ्यास केला आहे. प्रबंधाच्या सुरुवातीला त्यांनी धनगर जमातीची उत्पत्ती, इतिहास, धनगर समाजाचे धार्मिक–सांस्कृतिक जीवन, धनगर जमातीच्या जाती व उपजाती, विविध प्रांतातील पोटनावे इ.चा अभ्यास केला आहे.

मिसाळ यांच्या मते, धनगर ही जगामध्ये मेंढपाळ जमात म्हणून ओळखली जात असून ही आजही रानावनातून डोंगर दऱ्यातून मेंढयामागे भटकणारी जमात आहे. या जमातीचे सामाजिक व सांस्कृतिक वेगळेपण मांडण्याचा प्रयत्न मिसाळ यांच्या प्रबंधातून केलेला दिसतो. हा समाज परिवर्तनापासून खूप दूर असलेला दिसतो. अंधश्रध्दा, अज्ञान आणि दारिद्रय असल्यामुळे सत्वहीन आत्मभान गमावून जगणारा हा समाज आढळतो. मिसाळ यांनी धनगर समाजाचा अभ्यास करताना या समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, समाजाची प्राचीन राज्ये, प्राचीन वाड.मयातील धनगर जमातीचे स्थान स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. धनगर ही भटकी जमात असल्यामुळे त्यांच्या वर्ण व शरिररचनेत विशेष नाविन्य आढळते. या समाजाने हा व्यवसाय स्वखुशीने संभाळला असल्याचे दिसते. मिसाळ यांनी धनगर समाजाच्या निम्न आर्थिक दर्जाला चातुर्वर्ण्य व्यवस्थेस जबाबदार मानले आहे.

मिसाळ यांनी धनगर जमात व संस्कृती दर्शन यांचा मेळ घातला आहे. धनगर संस्कृती व लोककला याबद्‌दल सविस्तर विवेचन करताना ते म्हणतात, व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाच्या जडण–घडणीत संस्काराचा आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या संस्कृतीचा फार मोठा वाटा असतो. याचे कारण म्हणजे संस्कृतीत प्रचंड सामर्थ्य आणि शक्ति असते व संस्कृतीला नियतीने अमरत्वाचा पट्टा बहाल केलेला असतो.

अशाप्रकारे मिसाळ धनगर जमातीच्या विविध अंगाचा आपल्या प्रबंधामध्ये अभ्यास करतात जो प्रस्तुत संशोधनाला दिशा देण्यास मदत करतो.

### २.६.९. महादेव दत्तू डोंगरे (२०१०)[५४]

''पुणे जिल्हयातील कातकरी जमातीचा सामाजिक–आर्थिक अभ्यास'' डॉ. डोंगरे यांनी अर्थशास्त्र विषयातून या उपरोक्त विषयाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. कातकरी जमातीचे सामाजिक, आर्थिक व इतर जीवन कशाप्रकारे आहे तसेच त्यांच्या जीवनातील समस्या व त्यावर उपाययोजना आपल्या प्रबंधातून सादर करण्याचे कार्य डोंगरे यांनी केले आहे.

या अभ्यासासाठी पुणे जिल्हयाची निवड करण्यात आली आहे. उपरोक्त संशोधन विषयामध्ये आदिवासी जमातीचा उगम, वैशिष्टये, आर्थिक व्यवहार, स्त्रियांचे सामाजिक व आर्थिक स्थान, पुणे जिल्हयाचा सर्व अभ्यास, कातकरी जमातीतील कुटुंबस्थिती, शैक्षणिक स्थिती, विवाहपध्दती यांचा अभ्यास केलेला दिसतो.

अभ्यासपूर्ण निष्कर्ष मांडताना डोंगरे म्हणतात की, ''कातकरी जमातीचा सामाजिक–आर्थिक विकास हा दारिद्र्याच्या दृष्टचक्रात अडकला आहे म्हणजेच सामाजिक घटक कातकरी जमातीतील आर्थिक घटकावर परिणाम करतात आणि आर्थिक घटक सामाजिक घटकावर परिणाम करताना दिसतात. या शोध प्रबंधातील अर्थशास्त्रीय संशोधन पध्दतीचा उपयोग कोल्हाटी जमातीच्या सामाजिक आर्थिक अभ्याससाठी होत आहे''.

### २.६.१०. वाल्मिक दगडू परहर (मे २०१२)[५५]

पुणे विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाअंतर्गत वाल्मिक दगडू परहर यांनी ''रत्नागिरी जिल्हयातील कातकरी समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे चिकित्सक अध्ययन'' २००० ते २००९ या विषयामध्ये शोध प्रबंध सादर केला आहे. या संशोधन विषयामध्ये परहर यांनी रत्नागिरीतील कातकरी जमातीच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास, त्यांच्या आरोग्यविषयक सुविधांचा अभ्यास, त्यांच्यासाठी असलेल्या शासकीय योजना व कायदे तसेच कातकरी जमातीचा पूर्व इतिहास अशी विविध उद्दिष्टये डोळयासमोर ठेवली आहेत. परहर यांच्यामते, कातकरी समाजाची आर्थिक व सामाजिक स्थिती हलाखीची आहे. तसेच जागतिकी करणाच्या प्रक्रियेत या समाजाचा पारंपारिक व्यवसाय मोडकळीस आला असून विकासात्मक

योजनांचा लाभ अल्प प्रमाणात झालेला दिसतो.

या प्रबंधासाठी परहर यांनी वर्णनात्मक, तुलनात्मक व ऐतिहासिक या संशोधन पध्दतींचा वापर केला आहे. या तिन्ही पध्दतीचा वापर करुन जिल्हयातील कातकरी समाजातील सत्यतेची पडताळणी करुन निष्कर्षाच्या माध्यमातून सामाजिक व आर्थिक समस्यांचा शोध घेतला आहे. जिल्हयातील सर्व तालुक्यांमध्ये कातकरी समाजाची समान प्रमाणात कुटुंबे व वाडया नसल्याने तालुक्यातील प्रमाणानुसार कमी अधिक प्रमाणात कुटुंबे व वाडयांची निवड केली आहे. या संशोधनात २० टक्के वाडे व कुटुंबांची साधा नमूना निवड पध्दतीने म्हणजे एकुण १०९ वाडयांपैकी २५ व १८०२ कुटुंबांपैकी ३६४ कुटुंबांची क्षेत्रीय सर्वेक्षणासाठी निवड केली आहे. म्हणजेच एकुण १८०२ कुटुंबांपैकी २० टक्के कुटुंबांची निवड करण्यात आली आहे. कातकरी या आदिम जमातीने आपला जीवनक्रम पर्यावरणाशी मिळता जुळता कसा ठेवून मर्यादित सामर्थ्य व साधनांद्वारे निसर्गाशी संघर्ष करुन ही जमात आपल्या गरजांची पूर्तता कशी करत आहे याचे दर्शन या प्रबंधात होते. कातकरी जमातीची अर्थव्यवस्था मागास व अविकसित असल्याचे दिसते. आदिवासी समाज बहुविध असे पारंपारिक व्यवसाय करताना दिसतात. या समाजावर अंधश्रध्दा व परंपरांचा पगडा दिसतो. असे विविध सामाजिक,शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक निष्कर्ष परहर यांनी रत्नागिरी जिल्हयातील एकुण ९ तालुक्यांमधील २५ वाडे व ३६४ कुटुंबांच्या अभ्यासातून काढलेले दिसतात. निष्कर्षाचा अभ्यास करुन निर्माण झालेल्या समस्या सोडविण्यासाठी संशोधकाने शिफारशी केलेल्या आहेत.

### २.६.११. सुरेश विठ्ठलराव पाथरकर (मार्च २०१२)[५६]

“रायगड जिल्हयातील आदिवासींचे लोकजीवन व प्रगतीचा इतिहास” (१९०१ ते १९८१) या विषयातील शोध प्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत इतिहास विभागात सादर करण्यात आला आहे. संशोधकाने प्रस्तुत संशोधनात प्रथम प्रकरणात रायगड जिल्हयातील आदिवासी समाज जीवनाची वैशिष्टयपूर्ण ओळख करुन दिली आहे. ओळख करुन देत असताना समाजाच्या ठळक वैशिष्टयांबरोबरच भारतातील आदिवासींचे प्रादेशिक वर्गीकरण, वांशिक वर्गीकरण, आर्थिक वर्गीकरण करण्यात आले आहे. या वर्गीकरणाच्या आधारे रायगड जिल्हयातील आदिवासी समाज जीवनाची ओळख

करण्यात आली आहे. प्रकरण २ मध्ये आदिवासींचे राहणीमान, वेशभूषा, अलंकार, विवाह पध्दती, त्यांचे वैवाहिक जीवन, त्यांची मनोरंजनाची साधने, व्यसने, आदिवासी स्त्री, अंधश्रध्दा, धार्मिक जीवन यांचा उहापोह करुन सविस्तर माहिती मांडली आहे. याच प्रकरणामध्ये नाविन्यपूर्ण अशा आदिवासी लोकनृत्यांची माहिती सादर करण्यात आली आहे. पुढील प्रकरणात आदिवासी जमातीचे आर्थिक जीवन व त्यांच्या विकासाची गती स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आदिवासी जमातीच्या अर्थाजनाचे साधन पाथरकर, शेती, पशुपालन, शिकार, खादय संकलन, मासेमारी, लाकडी कोरीव काम, फाटी विकणे इ. असल्याचे स्पष्ट करतात. आदिवासी समूदाय रायगड जिल्हयात मागासलेला असल्याचे स्पष्ट करतात. आदिवासी समुदाय रायगड जिल्हयात मागासलेला असल्याचे ते सांगतात. त्यांच्या मागासलेपणाची कारणमीमांसा करत असताना काही कारणे ते सांगतात ती पुढीलप्रमाणे

१. परंपरागत पध्दतीने शेती, २. जंगलविषयक कायद्यातील जाचक तरतूदी,

३. कर्जबाजारीपणा, ४. जंगल कामगारांचे शोषण, ५. जमिनीचे हस्तांतरण, ६. वेठबिगारी पध्दत, ७. कुळ कायदयाचे परिणाम, ८. औद्योगिक क्षेत्रातील आदिवासींचे प्रश्न इ.

तसेच शासनाचे आदिवासींच्या आर्थिक विकासासाठी असणारे प्रयत्न व आदिवासी जमातीला मिळणारे लाभ त्यांचे मूल्यमापन करण्यात आले आहे. आदिवासींचे पारंपारिक शैक्षणिक जीवन व त्यांच्या जीवनातील शिक्षणातील अडथळा म्हणजे भाषा आहे. हे पाथरकर यांनी पटवून दिले आहे. रायगड जिल्हा व आदिवासींचे शैक्षणिक वाटचाल प्रस्तुत प्रबंधामध्ये मांडण्यात आली आहे. रायगड जिल्हयातील आदिवासींचे लोकजीवन व प्रगतीचा इतिहास हा विषय सामाजिक शास्त्राअंतर्गत असल्याने या संशोधनाचा अर्थशास्त्र विषयाअंतर्गत कोल्हाटी जमातीचा इतिहास, शैक्षणिक व सामाजिक अभ्यास करताना फायदेशीर ठरणार आहे.

### २.६.१२. अरुण रामराव चव्हाण (डिसेंबर २०१३)[५७]

अरुण चव्हाण यांनी "विमुक्त जाती व भटक्या जमातींचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास : संदर्भ मराठवाडा व विदर्भ" या विषयामध्ये शोध प्रबंध डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास सामाजिकशास्त्रे विद्याशाखा अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदविकरिता सादर करण्यात आला आहे.

या अभ्यासाअंतर्गत चव्हाण यांच्या मते, अत्यंत प्राचीन काळापासून म्हणजेच आर्य भारतात येण्याच्या अगोदरपासून विमुक्त भटक्या जाती–जमाती भारतात राहात होत्या मात्र तेव्हा त्या भटक्या–विमुक्त म्हणून ओळखल्या जात नव्हत्या कारण भारतात त्या जाती–जमाती स्थायी जीवन जगत होत्या. त्यामध्ये निग्रो, ऑस्टेलाईन, मेडिटरेनिअन वंशाच्या लोकांचाही समावेश होतो. अशाप्रकारे प्रथम प्रकरणात भटक्या–विमुक्त जाती व जमातींचा उगम, स्थान,

आर्थिक इतिहास, शैक्षणिक इतिहास, सामाजिक इतिहास यांचा अभ्यास करण्यात आला आहे. भटक्या विमुक्तांचे धार्मिक विधी, न्यायदानासाठी असणारी जातपंचायत, भटके आणि गुन्हेगारी जमाती कायदा यांचा वैशिष्टयपूर्ण अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत दोन्हीचा आधार घेतला आहे. प्राथमिक माहितीच्या आधारे अध्ययनासाठी मराठवाडा आणि विदर्भ हे दोन प्रादेशिक विभाग निवडले आहेत. प्रत्येक विभागातून २०० विमुक्त भटक्या जमातीची कुटुंबे असे एकुण ४०० विमुक्त भटक्या जमातीच्या

कुटुंबांची प्रत्यक्ष पाहणीसाठी निवड केली आहे. महाराष्ट्रातील एकुण ४३ जाती जमातीपैकी ५ विमुक्त जाती व ५ भटक्या जमाती अशा एकुण १० जाती–जमातींचा अभ्यास करण्यात आला आहे. यामध्ये बंजारा, कैकाडी, पारधी, राजपूत, वडार या ५ विमुक्त जाती आणि बेलदार, भोई, धनगर, गोसावी, वंजारी या ५ भटक्या जमाती अशा एकुण १० भटक्या विमुक्त जाती जमातींचा अभ्यास करण्यात आला आहे. पुढे निवडलेल्या जमातीपैकी प्रत्येक जमातीचे विदर्भातील २० कुटुंबे व मराठवाडयातील २० कुटुंब असे एकुण प्रत्येक जमातीचे ४० कुटुंब निवडले आहे. त्याप्रमाणे निवडलेल्या १० जमातींचे मिळून एकुण ४०० कुटुंबांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली आहे. ४०० कुटुंबांपैकी ५० टक्के कुटुंब ग्रामीण भागातील तर ५० टक्के कुटुंब शहरी भागातील आहेत.

अशाप्रकारे अभ्यासानुसार मराठवाडा व विदर्भातील भटक्या विमुक्त जमातीचे राहणीमान निकृष्ट असून या जमातीतील उच्च शिक्षणाचे प्रमाण अल्प आढळते. या जमातीतील कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ अल्प प्रमाणात मिळत असून काही कुटुंबे दारिद्र्यात जीवन जगत आहेत. या प्रबंधाचा अभ्यास भटक्या–विमुक्त जमातीतील कोल्हाटी जमातीच्या

शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व धार्मिक अभ्यासासाठी मार्गदर्शक ठरतो.

### २.६.१३. अशोक शिवाजी सरवदे (२०१३)[५८]

"बीड जिल्हयातील अनुसूचित जातीचे आर्थिक व सामाजिक अध्ययन" या शोध प्रबंधामध्ये बीड जिल्हयाचे सामाजिक शास्त्राअंतर्गत अर्थशास्त्र विषयाकरिता संशोधन केलेले आहे. यामध्ये बीड जिल्हयातील अनुसूचित जातीच्या आर्थिक व्यावसायिक स्थितीचा, शैक्षणिक अध्ययन तसेच अनुसूचित जातीसाठी शासनाच्या विविध योजनांचा त्यांच्या राहणीमानावर होणारा परिणाम अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे. या संशोधनातील निष्कर्षाचा तौलानिक अभ्यासासाठी उपयोग होणार आहे.

बीड जिल्हयातील अनुसूचित जमातीची शैक्षणिक स्थिती सांगताना सरवदे म्हणतात की, "अनुसूचित जातीमध्ये अंधश्रध्दा दैववादावर विश्वास असून इच्छापूर्तीसाठीही नवस करण्याचे प्रमाण जास्त होते. तसेच काही प्रमाणात निरक्षरता असून प्राथमिक शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त तर उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण सर्वात कमी होते".

यावरुन प्राथमिक शिक्षणानंतर काही घटकांचा उच्च शिक्षणावर प्रभाव पडत असल्याचे दिसते.

### २.६.१४. सुलभा कोरेकर (२०१३)[५९]

कोरेकर यांच्यामते, पारधी ही मूळ आदिवासी असलेली मात्र गुन्हेगारी कायदयामुळे गुन्हेगार जमात म्हणून ओळखली जाणारी तर स्वातंत्र्योत्तर काळात विमुक्त जमात अर्थात अनुसूचित जमात म्हणून सध्या ओळखली जाते. महाराष्ट्र राज्यातील आदिवासी पारधी जमात मूळ भारतीय वंशाची असून स्वातंत्र्यापूर्वी ही जमात अनेक टप्प्यांमधून गेली आहे. गुन्हेगारीशिवाय जगता येत नाही असा समज या समाजाचा झाल्याने पोटासाठी चोऱ्यामाऱ्या करणारे, भटकंती करणारे पारधी, अशी ओळख घेऊन सार्वजनिक ठिकाणी कारागृहात अनेक कुटुंबांचा अंत झाला म्हणजेच दुःख दारिद्र्य व उपेक्षांचे ओझे घेऊन पारधी जन्माला येतो व मरतो. अशाप्रकारे पारधी समाजाच्या यातनांचे स्पष्टीकरण प्रबंधामध्ये करण्यात आले आहे.

या संशोधनासाठी क्रियाभिमुख संशोधनाचा अवलंब केला आहे. संशोधन विषयासाठी उस्मानाबाद जिल्हयातील आठ तालुक्यातील तालुहानिहाय सर्व पारधी वस्ती संख्या लक्षात घेता जिल्हयातील त्यांचे प्रमाण काढण्यात आले असून नमूना निवडीसाठी सहेतुक नमुना निवड

तंत्राचा उपयोग केला आहे. सर्वेक्षणासाठी तयार करण्यात आलेल्या अनुसूचीचे विविध भाग करुन त्याद्वारे व तथ्य संकलन करण्यात आले आहे. या तथ्यांच्या विश्लेषणामधून पारधी जमातीचा पारंपारिक व्यवसाय शिकार असून वन्यजीव संरक्षण कायदयामुळे या व्यवसायावर बंदी आली व परिणामी उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे शेती, मजूरी, पशुपालन, शेतराखण, नोकरी, भिक्षा, उसतोड, बांधकाम, दारुविक्री, हमाली इ.चा समावेश होतो. परंतु कौशल्याचा अभाव, अपुरे शिक्षण, नकारात्मक मानसिकता इ. समस्यांमुळे हा समाज आर्थिक विवंचनाग्रस्त आहे. अशाप्रकारे आपल्या प्रबंधामध्ये कोरेकर पारधी जमातीची आर्थिक चिकित्सा स्पष्ट करतात.

### २.६.१५. भूषण अण्णा वायकर(२०१३)[६०]

प्रस्तुत प्रबंधामध्ये तमाशा व तमाशा कलावंत यांच्याशी संबंधित संकल्पनांचा अभ्यास केला आहे. वायकर तमाशाची उत्पत्ती सांगताना हा शब्द तुर्कस्थानात रुढ झाला होता व मराठीमध्ये हा शब्द उर्दू भाषिकांच्या माध्यमाने आला असे संदर्भाच्याआधारे स्पष्ट करतात. तमाशाचे विविध प्रकार सविस्तर वर्णन केले आहेत. त्यापैकी संगीतबारी हा तमाशा प्रकार स्पष्ट करताना संगीतबाऱ्या प्रामुख्याने कोल्हाटी बायका चालवितात. त्यांच्या घराण्यात हा धंदा पिढीजात असतो. काही जिल्हा व तालुक्यांच्या गावी शेठ सावकरांनी अशा प्रकारच्या बाऱ्यांच्या कार्यक्रमासाठी कायमस्वरुपी थिएटर बांधली आहेत. तिथेच या बायकांची राहण्याची आणि इतर सोय करण्यात आलेली असते. या संगीतबारीमध्ये दौलतजादा प्रकाराला विशेष महत्व दिले जाते असे वायकर स्पष्ट करतात. पुढे जाऊन त्यांनी तमाशाचे बदलते स्वरुप स्पष्ट केले आहे.

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी वायकर यांनी उपयोजित संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. त्यासाठी नमुना सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करुन तमाशा फडमालक, व्यवस्थापक आणि कलावंतांची निवड करुन प्रश्नावली, निरीक्षण, अनुसूची या प्राथमिक स्त्रोतांचा अवलंब केला आहे. यासाठी नोंदणीकृत एकुण ३५ तमाशा एककांचे सविस्तर लोकसंख्या आधार अध्ययन केले आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी ३५ फडमालक व ३५ प्रमुख व्यवस्थापकांची निवड केली आहे. सर्वच कलावंत एकाठिकाणी सापडणे अशक्य व कठीण आहे म्हणून कोटा नमूना निवड पध्दतीचा वापर करुन संशोधनासाठी निवडलेल्या ३५ तमाशा फडातून ३५० कलावंतांची संशोधनासाठी निवड केली आहे. या कलावंतांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, आर्थिक तथ्यांच्या संकलनाद्वारे त्यांच्या समस्यांचा आढावा घेतला असून प्रस्तुत अध्ययनातून फड मालक, व्यवस्थापक, कलावंत बालकलाकार यांच्यासंबंधी निष्कर्ष काढले. त्यामधून व्यावसायिकांना त्यांच्या कलेचा योग्य मोबदला मिळत नाही. तमाशा व्यवसायिक आणि कलावंत आर्थिक आरिष्टात सापडले आहेत. तमाशा व्यवसायाला पुरेसे अर्थसहाय्य व सर्वत्र कलावंतांना शासनाकडून मानधन मिळत नाही. अशी कलावंत व व्यावसायिक यांच्या समस्यांना वाचा फोडणारी गृहितकृत्य सिध्द केली आहेत. कुठेतरी वायकर यांनी मांडलेल्या सामाजिक व आर्थिक समस्या कोल्हाटी जमातीच्या कलावंत कुटुंबांशी मिळत्याजुळत्या आहेत.

## २.६.१६. भालेराव नितीन नारायण (२०१५)[६१]

''भटक्या विमुक्तांचे वैचारिक लेखन'' मराठी विषयाअंतर्गत झालेल्या या संशोधन विषयामध्ये भटक्या-विमुक्त जाती जमातींचे वैचारिक लिखाण व त्या लिखाणातून ध्वनीत झालेल्या सामाजिक प्रश्नांचा, अविष्कृत झालेल्या स्त्रीविषयक विचारांचा अभ्यास करण्यात आला आहे.

भालेराव भटक्या जमातीतील काही समूहांसाठी मत व्यक्त करतात की, ''भटक्या जमातींना भटकंतीची सवय लागल्यामुळे आणि भीक मागून खाण्याची सवय लागल्यामुळे त्यांच्याअंगी आईतखाऊपणा भिनलेला दिसतो''.

भटक्या स्त्रीबद्दल ते आपल्या प्रबंधात स्पष्ट करतात की, ''भटकी स्त्री वरवर मुक्त वाटत असली तरी ती अंतर्गत कुटुंब व्यवस्थेमुळे पोखरली आहे. त्यांचे हे विधान कोल्हाटी जमातीतील स्त्रीच्या बाबतीत लागू होताना दिसते. कारण कोल्हाटी जमातीतील नायकीण स्त्रीची अवस्था यापेक्षा काही वेगळी नाही''.

या प्रबंधामार्फत भटक्या विमुक्तांच्या साहित्याकडे एक नवीन साहित्य प्रवाह म्हणून लक्ष वेधण्याचे काम भालेराव यांनी केले आहे. कारण दलित साहित्य नेहमी आकर्षण ठरले आहे. परंतु भटक्या विमुक्तांचे साहित्य या समाजासारखेच उपेक्षित राहू नये अशी धडपड भालेराव यांनी केलेली दिसते. यासाठी त्यांनी लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मण माने, मोतीराज राठोड, रामनाथ चव्हाण, किशोर काळे, शंकरराव खरात अशा अनेक भटक्या विमुक्तांच्या वैचारिक लेखनाचा आढावा घेतला आहे. या सर्व संदर्भावरुन भटक्या विमुक्त जमातींनीच खऱ्या अर्थाने भारतीय संस्कृतीचे शील संवर्धन केले असून या खऱ्या अर्थाने भारत भूमीच्या मूलनिवासी आहेत हे स्पष्ट होते. याप्रबंधातून भटक्या विमुक्तांच्या लिखाणाची ओळख होऊन या भटकंती करणाऱ्या प्रवाहाला समाजाच्या प्रवाहात आणण्यास मदत होणार आहे. कोणताही भटक्या जमातीचा अध्ययन करणारा संशोधन विषय हा भटक्या विमुक्तांच्या वैचारिक लेखनाचा दुय्यम स्त्रोत म्हणून प्रामुख्याने अवलंब करत असतो. कोल्हाटी जमातीच्या धार्मिक, पारंपारिक, सामाजिक, आर्थिक बाबींवर प्रकाश टाकण्यास या प्रबंधाचे मार्गदर्शन होणार आहे.

**२.६.१७. संदीप रतन कांबळे (सप्टेंबर २०१५)[६२]–**

संदीप कांबळे या अभ्यासकाने "अहमदनगर जिल्हयातील भलरी लोकगीतांचा वाड.मयीन आणि सामाजिक अभ्यास" या विषयामध्ये मराठी विभाग, पुणे विद्यापीठ अंतर्गत शोध प्रबंध सादर केलेला आहे. कांबळे यांनी प्रकरण पहिले मध्ये अहमदनगर जिल्हा सामाजिक, भौगोलिक, ऐतिहासिक व धार्मिक स्थितीचा अभ्यास मांडलेला आहे. त्यांनी मांडलेल्या पहिल्या प्रकरणाची रचना अहमदनगर जिल्हयातील कोल्हाटी समाजाचा अभ्यास करताना मार्गदर्शनाचे कार्य करते. या प्रकरणात त्यांनी अहमदनगरमधील ऐतिहासिक वारसा चालविणाऱ्या प्रसिद्ध स्थळांची माहिती दिली आहे. पुढील प्रकरणामध्ये त्यांनी लोकसाहित्य व लोकगीत या संकल्पनांचे स्वरुप स्पष्ट केले आहे. लोकसाहित्याचा अभ्यास करत असताना संशोधन पध्दतीचे स्वरुप स्पष्ट केलेले आहे. तसेच पुढील प्रबंधामध्ये त्यांनी भलरी समाजाची असणारी लोकगीते, त्याची उत्पत्ती आणि स्वरुप स्पष्ट केले आहे. हिंदू संस्कृतीमध्ये भलरी लोकगीताचे स्थान स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच कांबळे यांनी आपल्या अभ्यासात संग्रहीत भलरी लोकगीतांचे विविधांगी वर्गीकरण आणि विश्लेषण केलेले दिसते. या लोकगीतं–

मधून शृंगार, विनोद, जीवनातील उपहास, कौटुंबिक जीवनाच्या भावाशय, कृषी संस्कृती यांचे दर्शन होत असल्याचे कांबळे विश्लेषणात्मक स्पष्टीकरण देताना दिसतात. अशाप्रकारे या प्रबंधामध्ये भलरी समाजाच्या गीतांचा वैशिष्टयांसह अभ्यास केलेला दिसतो. पुढील प्रकरणांमध्ये भरली लोकगीतांचे सामाजिक आकलन करण्यात आले आहे. भलरी आणि समाज यांचा परस्पर संबंध तसेच भलरी वर्ग संघर्ष आणि जात वास्तवता तसेच या लोकगीताबद्दल असणारे गैरसमज आणि मर्यादा स्पष्ट करण्यात आल्या आहेत. वैशिष्टयपूर्ण अभ्यास प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त आहे कारण यामध्ये भलरी लोकगीतांचे प्रसारमाध्यमातील स्थान स्पष्ट करण्यात आले आहे.

## २.७. विद्यानिष्णांत शोधनिबंध –

### २.७.१. अमोल तुकाराम माने (२००८)[६३]

माने यांनी अर्थशास्त्र विषयांतर्गत सादर केलेला शोधनिबंध "महाराष्ट्रातील गोंधळी समाज : सामाजिक व आर्थिक विश्लेषण" (विशेष संदर्भ परभणी शहर व बोरी गावासंदर्भात) यामध्ये गोंधळी समाजाच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीचे अध्ययन केले आहे. त्यांच्यामते हा समाज सामाजिकदृष्टया मागासलेला आहे. या समाजाची आर्थिक स्थिती निम्न दर्जाची आहे. या समाजाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व सर्वांगीण विकासासाठी माने यांनी प्रस्तुत शोधनिबंधात अनेक शिफारशी केलेल्या आहेत. यावरुन गोंधळी या भटक्या समाज्याविषयी सविस्तर माहिती मिळते. माने यांच्यामते, गोंधळी समाजाच्या सामाजिक–आर्थिक विकासासाठी गोंधळी समाजामध्ये जागृती निर्माण करुन त्यांचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व सर्वांगीण विकास करणे महत्वपूर्ण ठरते. कारण हा समाज आजही अज्ञान, अंधश्रध्दा, खुळचट कल्पनांना चिकटून आहे. यामधून बाहेर पडण्याचा प्रयत्न स्वतः गोंधळी समाजाने, समाजातील प्रत्येक व्यक्तीने करायला हवा. या संशोधनामध्ये गोंधळी समाजात पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याचे दिसते. गोंधळी समाजाने शिक्षणाचे महत्व ओळखून या समाजातील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याची आज आवश्यकता आहे. माने यांच्यामते, शासनाने गोंधळी समाजाच्या शैक्षणिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत तसेच त्यांच्या वस्ती असलेल्या भागात अधिकाधिक बालवाडया सुरु करण्यात याव्यात की ज्यामध्ये सामाजिक संस्थांचा सहभाग घ्यावा. १०० टक्के अनुदानावर आधारित

असे या बालवाडयांचे स्वरुप असावे.

वरील शैक्षणिक समस्येबरोबरच सर्व भटक्या विमुक्त जमातींची असणारी समस्या माने यांनी आधोरेखित केली आहे. त्यांच्यामते, घटनेमध्ये सुधारणा करुन भटक्या विमुक्तांची वेगळी जनगणना करावी व त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण दयावे म्हणजे विविध सवलतींचा फायदा शासनामार्फत मिळेल. तसेच शासनाने समाजातील लोकांच्या आरोग्यविषयक समस्यांची सोडवणूक करावी. या समाजात मुला–मुलींचे विवाह विवाहयोग्य वयाच्या पूर्वी होताना दिसतात. तसेच कुटुंबांतील स्त्रियांना या समाजात पुरुषापेक्षा कमी लेखले जाते. म्हणजेच स्त्री–पुरुष समानता या मुल्याकडे पूर्ण दुर्लक्ष केलेले दिसते. अशा विविध समस्यांचा अभ्यास अमोल माने यांनी केलेला दिसतो. या संशोधन अभ्यासामुळे भटक्या विमुक्त जमातीतील गोंधळी जमातीच्या पार्श्वभूमी, समस्या, अडचणीची माहिती मिळते. ही माहिती कोल्हाटी जमातीच्या अभ्यासामध्ये मार्गदर्शनाचे काम करते.

### २.७.३. प्रताप शिवाजीराव शेळके (२०१०)[६४]

शेळके यांनी अर्थशास्त्र विभागांतर्गत ‘‘उस्मानाबाद जिल्हयातील पारधी समाजाचा आर्थिक व सामाजिक अभ्यास’’ (कळंब तालुका संदर्भात) या शोधनिबंधात पारधी या गुन्हेगार जमातीचा अभ्यास केलेला आहे. शेळके यांच्या अभ्यासामधून गुन्हेगारी आणि पारधी हे समाजाने बनविलेले एक समीकरण आहे असे दिसते. त्यांच्यामते उदरनिर्वाहासाठी पारधी समाज चोरीचा मार्ग स्वीकारताना दिसतो. हा एक भटका समाज असून इतर समाजापासून अलिप्त राहणारा समाज आहे.

शेळके यांनी एम. फील संशोधनासाठी त्यांच्या कळंब तालुक्यतील १०६ पारधी कुटुंबांचा अभ्यास केलेला आहे. त्यांच्या अभ्यासानुसार पारधी जमातीमध्ये रुढी, परंपरा, अंधश्रध्दा यांचा पगडा असल्याने त्यांचा शिक्षण आणि विज्ञानावर विश्वास बसत नाही आणि हेच त्यांच्या दारिद्रयतेचे कारण आहे. तसेच पारधी मुला–मुलींचे विवाह होताना अल्पवयीन विवाहाचे प्रमाण १०० टक्के आढळते आणि बालविवाहामुळे आजही त्यांना वेगवेगळया समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अभ्यासलेल्या कुटुंबांपैकी ९४ टक्के कुटुबांचा पारंपारिक व्यवसाय शिकार करणे हा आढळला. परंतु या व्यवसायावर शासनाने बंधन घातल्याने पारधी लोकांवर उपासमारीची वेळ आली. निरक्षरता, गुन्हेगारी जमातीचा शिक्का यामुळे त्यांना पर्यायी

व्यवसाय मिळत नाही व त्यांच्या दारिद्रयात वाढ होत आहे.

पारधी समाजामध्ये उपजिविकेचे साधन म्हणून दारु गाळणे, शेती, क्वचित नोकरी असे व्यवसाय आढळतात. शेळके यांनी पारधी जमातीच्या आर्थिक बाबींवर प्रकाश टाकला असता पारधी समाजाच्या उत्पन्न व खर्च यामध्ये मोठया प्रमाणात तफावत झालेले दिसते. ही तफावत भरुन काढण्यासाठी तसेच आर्थिक गरज भागविण्यासाठी हा समाज चोरी करणे, दरोडे किंवा भीक मागणे यांसारख्या गोष्टी करताना दिसतात. या समाजातील बऱ्याच कुटुंबांना राहण्यासाठी स्वतःची जागा नाही. यावरुन घर ही मूलभूत गरज उपलब्ध नसलेल्या पारध्यांचे सामाजिक स्थान शोधून काढण्याचा प्रयत्न प्रताप शेळके यांनी आपल्या संशोधनातून केला आहे. शेळके यांच्यामते, गुन्हेगारी आणि पारधी समाज असे समाजाने बनविलेले एक समीकरण आहे. परंतु या समाजाला पोटासाठी चोरी व भीक मागणे असे दोनच पर्याय समोर उभे राहतात असे पारधी समाज सांगतो. त्यांनी हा व्यवसाय निवडण्यामागे असणारी कारणे शेळके यांनी अधोरेखित केली आहेत. या संशोधनातील महत्वाची बाब म्हणजे या कुटुंबांमध्ये स्त्रीला पुरुषाइतके महत्व दिले जाते. म्हणजे पारधी स्त्रीही कुटुंब प्रमुख, वस्तीप्रमुख, जातपंचायतीचा पंच, पोलिस व पारधी यांच्यात मध्यस्थ तसेच अटक झालेल्या पुरुषाला जामीनावर सोडविण्यासाठी प्रयत्न करते. म्हणजेच पारधी समाजात स्त्रीसत्ताक कुटुंब पध्दत आढळते. ही बाब कोल्हाटी जमातीशी साधर्म्य राखते म्हणून उस्मानाबाद जिल्हयातील पारधी समाजाचा सामाजिक आणि आर्थिक अभ्यास हा विषय कोल्हाटी जमातीच्या अभ्यासासाठी महत्वपूर्ण आहे.

## २.८. संशोधनाचे महत्व–

महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसा, वैचारिक वारसा पुढे चालवित अनेक विचारवंत, समाजशास्त्रज्ञ लेखकांनी आपले विचार विविध ग्रंथांमध्ये मांडले आहेत. परंतु कुठेतरी हे सर्व ग्रंथ व संदर्भ कोल्हाटी जमातीच्या परिपूर्ण अभ्यासात अपुरे असल्याचे वाटते. कोल्हाटी जमात ही कलावंत जमात असल्याने ती हिंदू संस्कृतीचा एक अंग आहे. त्याचबरोबर पहिल्या प्रकरणात दिलेल्या संदर्भावरुन ती इतिहासातील एक महत्वाचा भाग आहे. ऐतिहासीक मनोरंजनाचे साधन आहे. अशा महत्वपूर्ण जमातीचे उगम व स्थान शोधून काढणे गरजेचे वाटले म्हणून प्रस्तुत संशोधनात अहमदनगर जिल्हयाचा विशेष संदर्भ घेऊन कोल्हाटी जमातीचा सामाजिक व आर्थिक अभ्यास करण्यात आला आहे.

डॉ. सतीशकुमार जाधव यांनी इतिहास विभागाअंतर्गत २००७ साली कोल्हाटी जमातीचा सामाजिक व सांस्कृतिक वारसा अभ्यासला आहे. त्या पार्श्वभूमीवर दुर्मिळ लिखाण असलेल्या या जमातीवर संशोधन करण्याचे कार्य हाती घेतलेले आहे. भटक्या विमुक्तांपैकी कोल्हाटी जमात शासन दरबारी कशी दुर्लक्षित झाली आहे हे निदर्शनास आणून देण्याची गरज वाटते. त्यासाठी कोल्हाटी जमातीचा सामाजिक व आर्थिक अभ्यास हा विषय निवडण्यात आला. प्रस्तुत संशोधनामध्ये कोल्हाटी जमातीची पूर्वीची सामाजिक – आर्थिक स्थिती व सध्याची सामाजिक – आर्थिक स्थिती यांचा अभ्यास करुन या जमातीची आधुनिकतेकडे तसेच विकासाकडे वाटचाल झाली आहे किंवा नाही याचा आढावा घेतला गेला आहे. भटकंती व स्थिरता या दोन्ही मार्गावर वसलेली ही जमात आणि तिच्या आर्थिक समस्यांना वाचा फोडण्याचा उद्देश या संशोधन कार्यामागे आहे.

## २.९. सारांश–

प्रस्तुत प्रकरणात कोल्हाटी जमातीचा सामाजिक व आर्थिक अभ्यास विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा या संशोधन विषयाची सामाजिक उपयुक्तता व महत्व शोधण्याच्यादृष्टीने विविध संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन करण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मराठी, संशोधनपध्दती व संख्याशास्त्र इ. विषयांवरील ग्रंथाचे अवलोकन करण्यात आले. तसेच विविध विषयांवरील विशेषत : विविध जाती–जमातींवरील प्रबंध व शोधनिबंध, शासकीय व खाजगी अहवाल, लेख यांचाही आढावा घेण्यात आला आहे.

भारतात व महाराष्ट्रात भटक्या जमाती व त्यांच्या जीवनावर अनेक प्रकारचे ग्रंथ, प्रबंध, अहवाल, लेख व इतर साहित्य लिहीले गेले व प्रकाशितही झाले. परंतु त्यामध्ये कोल्हाटी जमातीच्या लिखाणाला पुरेसा वाव मिळालेला दिसत नाही. म्हणून कोल्हाटी जमातीच्या अभ्यास व लेखनास सहाय्यभूत ठरणारे असे हे तिसरे प्रकरण आहे. या प्रकरणातून अनेक उल्लेख, उत्पत्ती प्राप्त होऊन या संशोधनास गती प्राप्त होईल. संदर्भ साहित्याचा परामर्श घेतला असता कोल्हाटी जमातीवरील साहित्य तुलनेने कमी आहे असे दिसून आले. तरीही उपलब्ध संदर्भानुसार कोल्हाटी जमातीच्या विविध बाबींवर उजाळा मिळण्यास मदत झाली आहे. विविध ठिकाणी भटकंती करीत असणाऱ्या कोल्हाटी समाजाच्या प्रश्नांचा अभ्यास करण्याचा उद्देश या संशोधन विषयाचा आहे.

## संदर्भ ग्रंथ (References) –


१. Gazzater of The Bombay Presidency (Ahamadnagar District) Vol XVII Gov. Central Press, Bombay, F.P.1884, R.P. 2003

२. Syed Siraj Ul Hassan, 'The Caste & Tribes of H. E. H. The Nizam's Dominions, Vol-I, The Time Press Bombay, F.P.1920

३. G. S. Ghurye, 'Caste & Race in India, Kegan paul, Trench, Trubner & Co. Ltd., LONDON, F.P.1932

४. नामदेव व्हटकर, 'भारतातील जातिभेद आणि त्यावर उपाय', यशश्री प्रकाशन,कोल्हापूर, द्वि.आ. १९६७

५. शारदा देशमुख, शिवकालातील व पेशवाईतील स्त्री–जीवन, रं.श्री.सरदेशपांडे, कार्यवाह टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ४११००९, प्र.आ.१९७३

६. R.V. Russell, 'The tribes & castes of the central provinces of India', Vol - III, Cosmo publications, Delhi, F.P. 1916, R.P.1975

७. इरावती कर्वे, हिंदू समाज–एक अन्वयार्थ, मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्र.आ.ऑगस्ट १९७५

८. S.V. Ketkar, 'History of Caste In India' Low price publication, Delhi, F.P.1909

९. R.E.Enthoven, 'The Tribes & Castes of Bombay', Asian Education services, New Delhi, F.P. 1922, R.P. 1990

१०. श्री. व्यं. केतकर, भारतीय समाज शास्त्र, वरदा बुक्स, पुणे (प्रकाशन क्र.६४४) प्र. आ. १९३६, द्वि. आ.१९९४

११. त्रिं. ना. आत्रे, 'गावगाडा', वरदा बुक्स, पुणे, प्र.आ.१९१५, तृ.आ.१ जानेवारी १९८९, पुनर्मुद्रण १ जानेवारी १९९५

१२. K. S. Singh, PEOPLE OF INDIA National Series Volume V, India's Communities, Oxford University Press, Mumbai, F.P.1998.

१३. गोविंद कालेलकर, 'मुंबई इलाख्यातील जाती', वरदा प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९२८, द्वि.आ. १९९९

१४. रामनाथ चव्हाण, 'जाती आणि जमाती', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे प्र.आ.१९८९, तृ. आ. २०००

१५. रामनाथ चव्हाण, 'वेदनेच्या वाटेवरुन', देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, प्र. आ. २०००

१६. रामनाथ चव्हाण, 'भटक्या विमुक्तांची जात पंचायत', खंड–१, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, प्र.आ.२००२

१७. K. S. Singh, 'People of India Maharashtra', Popular prakashan Pvt. Ltd. Mumbai, F.P. 2004

१८. रामनाथ चव्हाण, 'भटक्या विमुक्तांची जातपंचायत', खंड–२, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, प्र.आ.२००४

१९. रामनाथ चव्हाण, 'भटक्या विमुक्तांची जातपंचायत', खंड–३, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, प्र.आ. २००६

२०. यशवंत सुमंत व द. दि. पुंडे,'महाराष्ट्रातील जातिसंस्थेविषयक विचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८८, पुर्नमुद्रण २००६

२१. सतीशकुमार जाधव, 'कोल्हाटी समाज आणि संस्कृती', लोकविदया प्रकाशन, प्र. आ. २०१०

२२. नागनाथ धो. कदम, 'महाराष्ट्रातील भटका समाज, संस्कृती व साहित्य', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ.१९९५, पुर्नमुद्रण २०१३

२३. रामनाथ चव्हाण, 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग', सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९८९, पुर्नमुद्रण २०१३

२४. उत्तम कांबळे, 'भटक्यांचे लग्न', मनोविकास प्रकाशन, पुणे पुर्नमुद्रण २०१५

२५. गोपीचंद पवार, 'कोल्हाट उडी', शब्ददान प्रकाशन, नांदेड, प्र.आ.१९९८

२६. लक्ष्मण माने, 'उपरा', ग्रंथाली प्रकाशन, सातारा, प्र.आ. १९८०, पुर्नमुद्रण २०००

२७. किशोर काळे, 'कोल्हाटयाचं पोर', ग्रंथाली प्रकाशन, सातारा, प्र.आ.१९९४, पुर्नमुद्रण, २००९

२८. लक्ष्मण गायकवाड ‘उचल्या’, श्री विदया प्रकाशन, पुणे प्र.आ.१९८७, पुर्नमुद्रण २०१३
२९. लक्ष्मण माने, ‘भटक्यांचे भारुड’, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र.आ. २००३, पुर्नमद्रण २००६
३०. लक्ष्मण माने, ‘बंद दरवाजा’, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र.आ.१९८४, पुर्नमुद्रण २००९
३१. लक्ष्मण माने, ‘पालावरच जग’, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र.आ.१९८४, पुर्नमुद्रण २००९
३२. लक्ष्मण माने, ‘का कराचं शिकुन’?, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र.आ. २००३
३३. आर. जी. दांडगे, ‘भटक्या विमुक्तांचे प्रश्न व उपाय’, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००२, पुर्नमुद्रण २०१४
३४. ‘पैस’ स्मरणिका, संपादक– सुमती लांडे, मुळा एज्युकेशन सोसायटी, सोनई,ता. नेवासा, ७० वे अखिल भारतीय महाराष्ट्र साहित्य संमेलन विशेषांक, १९९७
३५. गो. गं. मुसळे, ‘अखिल महाराष्ट्र कोल्हाटी समाज सेवा संघ ऐतिहासिक स्मरणिका’, प्रकाशक – अखिल महाराष्ट्र राज्य कोल्हाटी समाज सेवा संघ, पुणे २१ डिसेंबर, १९९८
३६. वाहरु सोनवणे, अध्यक्षीय भाषण– ‘हाकारा’, वर्ष–१२वे, अंक–पहिला, दुसरा, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, जाने–जून १९९१
३७. प्र. ल. गावडे, आदिवासींच्या शिक्षणातील अडथळा– भाषा, हाकारा, वर्ष १७ वे अंक चौथा, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, ऑक्टोबर–डिसेंबर १९९६
३८. अरविंद सी.राणे, आदिवासींच्या शिक्षणातील मुख्य समस्या, हाकारा वर्ष २१ वे, अंक–चौथा, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, ऑक्टोबर–डिसेंबर २०००
३९. धैर्यशील शिरोळे, आदिवासी स्त्री जीवन एक अल्पसा परिचय, हाकारा विशेषांक २००६ महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
४०. श्रीराम गडगर, दलित व दलितेतर कथाकार, समक्ष–समीक्षा त्रैमासिक, वर्ष–पहिले, अंक–तिसरा, शब्दाली प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०११
४१. यशवंत मनोहर (अध्यक्षीय भाषण)साहित्यकापुढील जळते प्रश्न, सक्षम समिक्षा त्रैमासिक, शब्दाली प्रकाशन (जाने–फेब्रू–मार्च २०१५)

४२. गंगाधर पानतावणे, डॉ. बाबासाहेबांचे वैचारिक लेख, सक्षम समिक्षा त्रैमासिक, शब्दाली प्रकाशन (एप्रिल–मे–जून २०१५)

४३. कृष्णा राठोड, बंजारा समाज आणि आर्युवेद अभ्यास, गोरवाणी, वर्ष सातवे,अंक ४, संपादक–रमेश आत्माराम जाधव, (ऑक्टोबर ते डिसेंबर, २०१४)

४४. पंडित कांबळे, समाज वास्तव मांडणारा कथा संग्रह, गोरवाणी, वर्ष आठवे,अंक एक, संपादक–रमेश आत्माराम जाधव, (जानेवारी ते मार्च २०१६)

४५. अनुराधा भिडे, 'संत जनाबाई– काही बरोबर तर काही चुकीच्या समजुती', मराठी संशोधन पत्रिका, वर्ष–६३, अंक–२, मराठी संशोधन मंडळ, मुंबई, एप्रिल–जून २०१६

४६. गणपत लक्ष्मण इंगोले, 'पेशवेकालीन स्त्री–जीवन १७०८–१८१८', मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९८३

४७. पंढरीनाथ धनाजी काळे, ' मराठी तमाशा(एक कला प्रकार)उद्‌गम आणि वाटचाल' (उद्‌गम ते इ.स.१९८२), पुणे विद्यापीठ, पुणे, १९८४

४८. आदम मोहम्मद शिकलगार, 'पुणे जिल्हयातील नागरी वसाहतीतील स्थलांतरित शिकलगार जमात' (सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा एक अभ्यास) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, ऑगस्ट १९९९

४९. गणपत राठोड, 'बीड जिले के बंजारा लोकगीतों का अध्ययन', डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, मई २०००

५०. बंडू हरिभाऊ किर्दक, 'अकोला जिल्हयातील बेलदार जमातीचा समाजशास्त्रीय–अभ्यास', संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, २००५

५१. सतीशकुमार जाधव, 'कोल्हाटी समाज आणि संस्कृती : एक ऐतिहासिक अध्ययन', स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, एप्रिल २००७

५२. बाळासाहेब बळे, ' महाराष्ट्रातील पारधी समाजाच्या लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास' (लोकजीवन व लोकसंस्कृतीच्या विशेष संदर्भात), पुणे विद्यापीठ, पुणे, २००८

५३. निवृत्ती मिसाळ, 'धनगर समाजाचे लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास' (अहमदनगर जिल्हयाच्या संदर्भात),पुणे विद्यापीठ, पुणे, एप्रिल २००९

५४. महादेव दत्तु डोंगरे, 'पुणे जिल्हयातील कातकरी जमातीचा सामाजिक–आर्थिक अभ्यास', टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, मे २०१०

५५. वाल्मिक दगडू परहर, 'रत्नागिरी जिल्हयातील कातकरी समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे चिकित्सक अध्ययन' (२००० ते २००९), पुणे विद्यापीठ, पुणे, मे २०१२

५६. सुरेश विठ्ठलराव पाथरकर, 'रायगड जिल्हयातील आदिवासींचे लोकजीवन प्रगतीचा इतिहास' (१९०१ ते १९८१), टिळक महाराट्र विद्यापीठ, पुणे, मार्च २०१२

५७. अरुण रामराव चव्हाण, 'विमुक्त जाती व भटक्या जमातींचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास : संदर्भ मराठवाडा व विदर्भ', डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, डिसेंबर २०१३

५८. अशोक शिवाजी सरवदे, 'बीड जिल्हयातील अनुसूचित जातीचे आर्थिक व सामाजिक अध्ययन', डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद, २०१३

५९. सुलभा कोरेकर, 'पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास(विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा), टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे,  २०१३

६०. भूषण अण्णा वायकर, 'महाराष्ट्रातील तमाशा व्यवसायाचे अर्थशास्त्र एक अध्ययन २००७–०८ ते २०११–१२', पुणे विद्यापीठ, पुणे, २०१३

६१. नितीन नारायण भालेराव, 'भटक्या विमुक्तांचे वैचारिक लेख', सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मार्च २०१५

६२. संदीप रतन कांबळे, 'अहमदनगर जिल्हयातील भलरी लोकगीतांचा वाड.मयीन आणि सामाजिक अभ्यास', सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, २ सप्टेंबर,२०१५

६३. अमोल तुकाराम माने, ' महाराष्ट्रातील गोंधळी समाज : सामाजिक व आर्थिक विश्लेषण' (विशेष संदर्भ परभणी शहर व बोरी गावासंदर्भात) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २००८

६४. शेळके प्रताप शिवाजीराव, 'उस्मानाबाद जिल्हयातील पारधी समाजाचा आर्थिक  व सामाजिक अभ्यास' (कळंब तालुका संदर्भात) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१

# प्रकरण तिसरे

## संशोधनाची कार्यपध्दती

| | |
|---|---|
| ३.१ | प्रस्तावना |
| ३.२ | संशोधन आराखडा |
| ३.३ | संशोधन समस्या विधान |
| ३.४ | संशोधन विषयाची निवड |
| ३.५ | संशोधन विषयाचे कथन |
| ३.६ | संशोधन विषयाचे महत्व |
| ३.७ | संशोधनाची गृहितके |
| ३.८ | संशोधनाची उद्‌िष्टये |
| ३.९ | संशोधनाच्या मर्यादा |
| ३.१० | संशोधन पद्‌धती |
| ३.११ | तथ्याचे विश्लेषण व निर्वचन |
| ३.१२ | संशोधन विषयाचा अर्थशास्त्रीय सैध्दांतिक आधार |
| ३.१३ | प्रकरणांची मांडणी **(Chapterization) -** |
| ३.१४ | अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी |
| ३.१५ | अहमदनगर जिल्हयाचे भौगोलिक स्थान |
| ३.१६ | अहमदनगर जिल्हयाची प्राकृतिक रचना |
| ३.१७ | अहमदनगर जिल्हयातील प्राचीन प्रशासकीय विभाग |
| ३.१८ | अहमदनगर जिल्हयातील निवडक प्रसिध्द स्थळे |
| ३.१९ | किल्ले |
| ३.२० | नद्‌या व धरणे |
| ३.२१ | जिल्हयाचे हवामान व पर्जन्यमान |

| | |
|---|---|
| ३.२२ | पिकांची रचना व स्वरुप |
| ३.२३ | खनिजे |
| ३.२४ | वनक्षेत्र व वन उत्पादने |
| ३.२५ | लोकसंख्या |
| ३.२६ | अहमदनगर जिल्हयातील स्त्री–पुरुष लोकसंख्या |
| ३.२७ | अहमदनगर जिल्हयातील स्त्री–पुरुषांचे प्रमाण – |
| ३.२८ | अहमदनगर जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण – संदर्भ वर्ष २०११ |
| ३.२९ | अहमदनगर जिल्हयातील वर्गीकृत बँकांची संख्या, ठेवी व कर्ज |
| ३.३० | कृषी सहकारी संस्था (२०१५–१६) |
| ३.३१ | वाहतुक व दळणवळण |
| ३.३२ | उदयोग व व्यापार |
| ३.३३ | पशुधन |
| ३.३४ | दुग्ध व्यवसाय |
| ३.३५ | वीज |
| ३.३६ | शिक्षण |
| ३.३७ | पाणी पुरवठा |
| ३.३८ | अहमदनगर जिल्हयातील विविध योजना |
| ३.३९ | अहमदनगर जिल्हयातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे |
| ३.४० | सारांश |
| | संदर्भ ग्रंथ |

# प्रकरण तिसरे

# संशोधनाची कार्यपध्दती

## ३.१. प्रस्तावना –

सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी सामाजिक संशोधन होणे अत्यंत गरजेचे आहे. "सामाजिक जीवनासंबंधी नवीन तथ्यांचा शोध घेण्यासाठी तसेच जुन्या सामाजिक तथ्यांच्या पुर्नस्पष्टीकरणासाठी करावयाची एक पध्दतशीर प्रक्रिया म्हणजे सामाजिक संशोधन होय". संशोधन सामाजिक असले तरी त्यातील होणारे बदल शास्त्रीयदृष्टीने अभ्यासणे महत्वाचे आहे. संशोधकास संशोधन विषय ठरविल्यानंतर निष्कर्षाचे परिक्षण चिकित्सकवृत्तीने करावे लागते. संशोधनाला शास्त्रीय आधार असेल तर त्यातील निष्कर्ष अचूक ठरतात. ते संशोधन समाज उपयोगी व गुणात्मक मानले जाते. तसेच त्याचे समाजाला फायदे मिळतात. शास्त्रीय संशोधन करीत असताना विशिष्ट पध्दतीने माहिति गोळा करुन निष्कर्ष काढावे लागतात. पायरी पायरीने संशोधन कार्य पूर्ण करावे लागते. त्यामुळे संशोधन तितकेच अवघड व जोखमीचे कार्य असते.

*** संशोधनाच्या व्याख्या –**

**१. मोझर –** "साहित्याच्या संदर्भात सामाजिक घटना व सामाजिक समस्यांच्या बाबतीत नवीन ज्ञान प्राप्त करणे व त्या ज्ञानाचा व्यवहारासाठी उपयोग करणे".

**२. जे. डब्ल्यू. वेस्ट –** "संशोधन म्हणजे सुव्यवस्थित व नियोजनबध्द् अभ्यासण्याची प्रक्रिया होय".[१]

वरील व्याख्यांवरुन मोझर यांच्या मते सामाजिक संशोधन म्हणजे सामाजिक समस्या निराकरण तर वेस्ट यांच्या मते सामाजिक संशोधन हे सुव्यवस्थित व नियमबध्द् असते.

अर्थशास्त्र विषय हा सामाजिक शास्त्राअंतर्गत असल्याने प्रस्तुत संशोधनामधील कोल्हाटी समाजाचा होणारा अभ्यास हा आर्थिक व सामाजिक या दोन्ही अंगाने होत आहे. सामाजिक संशोधनतील शास्त्रीय पायऱ्यांचा आधार घेऊन कोल्हाटी जमात ही कोणत्या प्राथमिक अवस्थेत जगत आहे? याची उकल करण्यात आली आहे. कोल्हाटी जमात ही भटक्या विमुक्त जमातीतील एक असल्याने या जमातीचा अभ्यास गुंतागुंतीची बाब आहे. तसेच

ही कलावंताची जमात असल्याने पोट भरणे किंवा उदरनिर्वाह निमित्त यांची कुटुंबे मनोरंजन व कसरतीचे खेळ करण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत होतात. क्वचितच कुटुंबे शिक्षित होऊन एका ठिकाणी स्थायिक झालेली दिसतात. त्यामुळे जमातीतील लोकांचा अभ्यास करताना त्यांच्या समस्या शोधणे, त्यांना बोलते करणे, त्यांच्या सहवासात राहणे, राहणीमान, रुढी, परंपरा, सण, उत्सव, विचार जमातीतील स्त्रिया, त्यातील कलावंतीन (नायकीण) यांच्याशी चर्चा करणे इ. चे निरिक्षण करणे अवघड काम आहे. अहमदनगर जिल्हयातील कोल्हाटी जमातीचा सामाजिक आर्थिक अभ्यास हे इतर जमातींच्या संशोधनापेक्षा जोखमीचे काम आहे. कारण प्राचीन काळापासून ते सद्यस्थितीपर्यंत जमातींचे स्थान, दर्जा समोर आणत असताना वस्तू निष्ठतेला महत्व दयावे लागले आहे. ही जमात अनेक ठिकाणी विखूरलेली आहे. इतर जमातींपेक्षा नावीण्यपूर्ण असणाऱ्या या जमातीच्या अभ्यासासाठी पुढीलप्रमाणे आराखडा व संशोधन पध्दती अवलंबविण्यात आली आहे.

### ३.२ संशोधन आराखडा –

संशोधन आराखडा संशोधनातील महत्वाचे पाऊल आहे. नियंत्रित वस्तूनिष्ठ अशा संशोधनात तयार केली जाणारी अभ्यासाची योजना म्हणजे संशोधन आराखडा होय.

*** व्याख्या –**

**१. एफ. एन. करलिंगर –**

"संशोधन आराखडा संशोधनाची एक योजना, संरचना आणि एक रणनिती आहे ज्याद्वारे संशोधन प्रश्नाची उत्तरे प्राप्त केली जातात आणि भिन्नत्व प्रसरणावर (variance) नियंत्रण ठेवले जाते."

**२. ऐकॉफ –**

"निर्णय क्रियान्वित करण्याची स्थिती येण्यापूर्वीच निर्णय निर्धारित करण्याच्या प्रक्रियेला आराखडा असे म्हणतात."[२]

वरिल व्याख्यांवरुन असे दिसते की, संशोधन आराखडा ही अशी योजना आहे की, जी समस्या निर्धारणापासून तर संशोधन अहवालाच्या शेवटच्या बारीक पायरी पर्यंतच्या योग्य प्रकारे विचार विनिमय करुन उपलब्ध पर्यांयावर लक्ष देऊन अशाप्रकारे निर्णय घेण्यात येतात की, कमीत कमी प्रयत्न, वेळ, आणि पैसा खर्च करुन जास्तीत जास्त प्रमाणात संशोधन

उद्‌िष्टांची प्राप्ती करता येईल.

"अहमदनगर जिल्हयातील कोल्हाटी जमातीचा सामाजिक,आर्थिक अभ्यास" या संशोधन विषयाच्या संदर्भ साहित्याचा आढावा घेतल्यानंतर या जमातीवर फारसे संशोधन झाले नसल्याचे दिसून आले. आजही काही भागात या जमातीचे जीवनमान, राहणीमान, व्यवसायीक दृष्टीकोन, भिन्न दिसून आले. समाजातील क्वचित लोक पारंपारिक दृष्टचक्रात व्यवसाय व आर्थिक बाबींमध्ये अडकलेले दिसतात. याबाबींचा उलगडा करण्यासाठी हा संशोधन विषय निवडण्यात आला आहे.

अहमदनगर जिल्हयाचा विचार करता प्राचीन पार्श्वभूमी असलेल्या या जिल्हयात अनेक तालुक्यांमध्ये कोल्हाटी जमात कोणत्या अवस्थेत जीवन जगत आहे हे अजमाविण्यासाठी अभ्यास क्षेत्र म्हणून विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हयाची निवड केली आहे. भिन्न समाजस्थिती जाणण्यासाठी पुणे जिल्हा, सोलापूर जिल्हा या तुलनेने जास्तीत जास्त कोल्हाटी लोकसंख्या असणाऱ्या जिल्हयातील स्थितीचा आधार घेतला आहे.

हा संशोधन विषय "पारंपारिक दृष्टचक्र" या सैध्दांतिक संकल्पनेवर आधारलेला आहे. ज्याप्रमाणे डॉ. आंबेडकर म्हणतात, जाती व्यवस्थेला नष्ट केल्याशिवाय समाजाचा व देशाचा विकास होणार नाही कारण समाज व पर्यायी देश जातीसंस्थेच्या पारंपारिक दृष्टचक्रात अडकला आहे. त्याप्रमाणेच कोल्हाटी जमात पारंपारिक दृष्टचक्र भेदल्याशिवाय विकास व प्रगती करु शकणार नाही. या जमातीतील काही लोकांनी हे दृष्टचक्र भेदून प्रगती व विकासाकडे यशस्वी वाटचाल केली आहे. त्याचे पुरावे व दाखले प्रस्तुत संशोधनात दिले गेले आहेत. अशाप्रकारे हा सैध्दांतिक आधार घेऊन विषय मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## ३.३. संशोधन समस्या विधान - (Research Problem)

अहमदनगर जिल्हयातील कोल्हाटी समाजाच्या सामाजिक व आर्थिक बाबींचे चिकित्सक अध्ययन करणे.

## ३.४. संशोधन विषयाची निवड - ( Selection of Research Topic)

"कोल्हाटी जमातींचा सामाजिक – आर्थिक अभ्यास" (विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा) हा संशोधन विषय निवडण्यामागे अनेक कारणे आहेत. त्यापैकी महत्वाचे म्हणजे इतिहासाचार्य

राजवाडे यांच्या लेखनातून मिळालेली प्रेरणा होय. राजवाडे म्हणतात, देशाचा इतिहास अभ्यासण्यापेक्षा प्रथम समाजाच्या इतिहासावर प्रकाश टाकला पाहिजे. हे लक्षात घेता प्रचलित साहित्यामध्ये कोल्हाटी जमातीवर बरेच लेखन व अभ्यास बाकी असल्याचे लक्षात आले. ही जमात संशोधकाने अगदी जवळून पाहिली असल्याने जमातीतील समस्यांची प्रकर्षाने जाणीव झाली. संशोधनाची ओढ असताना ज्या विषयाची गरज व आवश्यकता आहे असे विषय समोर येताच कोल्हाटी जमातीच्या अभ्यासाची नितांत गरज असल्याने संशोधकाने या विषयाची निवड केली. कोल्हाटी समाजाच्या संदर्भ साहित्याचा आढावा घेत असताना या जमातीचे इतिहासातील स्थान लक्षात आले. ते प्रचलित समाजाच्या समोर एका दृष्टीक्षेपात यावे या उद्देशाने या विषयाची गरज आहे.

कोल्हाटी समाजातील उदरनिर्वाह व उपजिविकेच्या साधनांकडे समाज उपेक्षेच्या व अवहेलनेच्या नजरेतून पाहतो. परंतु हे साधन प्राचीन जातीव्यवस्थेचे मूळ आहे. ही जातीव्यवस्था कशी निर्माण झाली? या जातिसंस्थेची वैशिष्टये नेमकी कोणती? याचा अभ्यास करण्याची गरज आहे. अतिपूर्व काळापासून कार्ये व साधनांच्या चौकटी घालून दिल्या असल्याने कोल्हाटी जमातीच्या प्रश्नांची व समस्यांची उकल कधी झाली नाही. या समाजाचे सामाजिक व आर्थिक इतिहासात मोलाचे योगदान आहे. या जमातीचे आर्थिक विकास, सामाजिक स्थान, इतिहास, पार्श्वभूमी, उगम, संस्कृतीचा शोध हे संशोधनाची निवड करण्यामागचा मुख्य हेतू संशोधकाचा आहे.

## ३.५. संशोधन विषयाचे कथन – (Narration of Research Topic)

"कोल्हाटी जमातीचा सामाजिक – आर्थिक अभ्यास" (विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा) हा संशोधन विषय असून सामाजिक व आर्थिक स्थिती हे प्रत्येक समाजाच्या विकासाचे निर्देशक मानले जातात. कोल्हाटी जमात ही भटक्या जमातीपैकी एक असल्याने त्यांची आर्थिक स्थिती, शैक्षणिक प्रवाहातील वेग तसेच समाजाचे मुख्य प्रवाहातील स्थान व सहभाग, या जमातीचे अस्तित्व व उगम, काळाच्या ओघातील परिवर्तन यासारख्या संशोधन बाबींचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे हा संशोधन विषयाचा गाभा आहे.

## ३.६. संशोधन विषयाचे महत्व -(Significance of Research Topic)

या संशोधन विषयाचे सर्वात मुख्य महत्व म्हणजे कोल्हाटी जमातीतील लोकांना होणारे आहे. यामधून त्यांचा आपल्या जमातीतील लोकांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणारा आहे. त्यांच्या आत्मविश्वासात भर पडणार असून त्यांना स्वतःच्या उगमापासून ते विकासापर्यंतच्या बाबींचा उलघडा या संशोधनातून होणार आहे.

जातीसंस्थांच्या उगमापासून व संदर्भ ग्रंथाचा आढावा घेत असताना कोल्हाटी समाजाचे इतिहासातील स्थान प्रचलित समाजापुढे येणे शक्य होणार आहे. समाज या जमातीतील स्त्रियांकडे तसेच त्यांच्या उपजिविका व उदरनिर्वाहाकडे उपेक्षा व अवहेलनेने पाहतो. या संशोधनातून पारंपारिक व्यवसाय हे जातीसंस्थेचे मूळ कसे आहे हे स्पष्ट होण्यास मदत होणार आहे.

कोल्हाटी जमातीच्या सामाजिक स्थान, अर्थकारण, संस्कृती, जीवनपध्दती, बोलीभाषा, रुढी परंपरा, इतिहासातील उल्लेख या बाबींचा प्रचलित साहित्यात एक दृष्टीक्षेप देण्यासाठी या संशोधनाचे मोठे महत्व लक्षात घेता येईल. कोल्हाटी जमातीवर लिखाण अतिशय तुरळक व विखुरलेले आढळते. त्यामुळे या जमातीच्या सांस्कृतिक इतिहासाबद्दल व त्यांच्या विकासाबद्दल साहित्यात भर टाकण्यामध्ये या संशोधन विषयाचे महत्व विचारात घेता येईल. कोल्हाटी जमातीच्या इतिहास व पार्श्वभूमी आणि सद्यस्थितीतील विकास लक्षात घेण्याचे कार्य या संशोधनामार्फत होणार आहे.

कोल्हाटी जमातीची सामाजिक आर्थिक स्थिती शासनाच्या निदर्शनास आणून देणे महत्वाचे आहे. या जमातीच्या आर्थिक सामाजिक समस्या सोडवण्यासाठी या संशोधनातील शिफारशी महत्वाच्या ठरणार आहेत. २१व्या शतकातील सामाजिक संक्रमणाच्या अवस्थेत कोल्हाटी जमातीच्या संस्कृती, रुढी – परंपरा, ऐतिहासिक सामाजिक स्थान या बाबींवर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने हे संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

## ३.७. संशोधनाची गृहितके–(Research Hypotheses)

१. कोल्हाटी जमातीचे शैक्षणिक प्रगतीनुसार आर्थिक व व्यवसायीक स्तरामध्ये परिवर्तन (भिन्नता) दिसते.

२. कोल्हाटी जमातीचा पारंपारिक व्यवसाय शैक्षणिक प्रगतीतील अडथळा आहे.

३. कोल्हाटी जमातीच्या उदरनिर्वाहाच्या साधनामध्ये परिवर्तन व विविधता आहे.

४. कोल्हाटी जमातीमध्ये धार्मिकता व अंधश्रध्देचा पगडा असून भटकंतीचे जीवन दिसते.

५. कोल्हाटी जमातीतील पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्त्री वर्गांना विविध समस्या आढळतात.

## ३.८. संशोधनाची उद्दिष्टये –(**Research Objectives**)

प्रस्तुत संशोधनासाठी पुढीलप्रमाणे उद्दिष्टये लक्षात घेतली आहेत.

१. अहमदनगर जिल्हयातील कोल्हाटी जमातीच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. अहमदनगर जिल्हयातील कोल्हाटी जमातीच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.

३. संशोधनाद्वारे कोल्हाटी समाजातील समस्यांची उकल करुन उपाय योजना सुचविणे.

## ३.९. संशोधनाच्या मर्यादा – (**Limitations of Research Topic**)

सामाजिक संशोधनामध्ये अनेक मर्यादा पडतात. अहमदनगर जिल्हयातील कोल्हाटी जमातीचा सामाजिक – आर्थिक अभ्यास या विषयाचा अभ्यास करत असताना हा समाज संघटित नसून विखूरलेला आहे. ही एक महत्वाची मर्यादा आहे. इतर जमातींच्या समित्या, मंडळ, संघटना अस्तित्वात असून या जमातीच्या प्राथमिक संकल्पनासाठी पथदर्शक अभ्यासाचा आधार घेतला आहे. ही जमात अहमदनगर जिल्हयातील १४ तालुक्यांपैकी काही तालुक्यांमध्ये जास्त तर काही तालुक्यांमध्ये तुरळक संख्येने आढळते. त्यामुळे संशोधन क्षेत्र व्यापक व संख्या कमी असल्याने अनेक मर्यादा पडतात. महाराष्ट्रातील अनेक जिल्हयामध्ये हा समाज वसलेला आहे. त्या सर्वांचा अभ्यास करणे शक्य नाही. कारण वेळ, श्रम, खर्च यांच्या अभावाने संपूर्ण जमातीच्या लोकसंख्यांचा अभ्यास करणे शक्य नाही. ही एक मर्यादा आहे. अहमदनगर जिल्हयातील १४ तालुक्यांपैकी काही तालुके व त्यापैकी काही गावे यांची सहेतुक नमुना निवडीनुसार नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे.

प्रस्तुत संशोधन हे कोल्हाटी समाजातील निवडलेल्या नमुन्यावर आधारित असून यातील सर्व निष्कर्ष सर्व कोल्हाटी जमातीला लागू नाही. संशोधकाने अनुसूचीद्वारे संकलित केलेल्या माहितीद्वारे विश्लेषण केले आहे. “अनुसूची ही अशी तथ्ये प्राप्त करणाऱ्या औपचारिक पध्दतीचे प्रतिनिधित्व करते की, जे वस्तुनिष्ठ स्वरुपात आणि सहजतेने ओळखण्यासारखे आहेत. संशोधनककर्ता स्वतः अनुसूची भरतो”.[३] त्यामुळे उत्तरदात्यांचे विचार, भावना,

मनोवृत्ती जाणून घेणे अडचणीचे वाटले. दिलेल्या माहितीची सत्यता पडताळण्याची ही एक मर्यादा असल्याने उपलब्ध माहितीवरुन संशोधकाने संशोधन विश्लेषण ग्राहय धरले आहे.

## ३.१०. संशोधन पद्धती ( Research methodology ) –

### ३.१०.१. नमुना निवड पदधती( Method of Sampling for Research) -

'कोल्हाटी जमातीचा सामाजिक – आर्थिक अभ्यास'(विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा) या विषयासाठी खालील संशोधन पध्दती अवलंबविण्यात आली आहे यालाच सहेतुक नमुना निवड पद्धती असे म्हणतात. पथदर्शक अभ्यासाच्या (Pilot Study) आधारे खालीलप्रकारे नमुना निवड करण्यात आली आहे.

#### ३.१०.१.१. देशातील कोल्हाटी जमातीची संख्या स्थिती–

भारत देशामध्ये १९०१ च्या गणनेनुसार एकुण २३७८ आदिवासी जमाती होत्या.[४] पथदर्शक अभ्यासाच्या आधारे कोल्हाटी जमात ही भटकी जमात असल्याने एका ठिकाणाहून इतर ठिकाणी स्थलांतरित होताना दिसून आली. भारतामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात याठिकाणी या जमातीतील लोकांचे अस्तित्व आढळते.

#### ३.१०.१.२. महाराष्ट्र राज्यातील कोल्हाटी जमातीची संख्यास्थिती –

महाराष्ट्र राज्यात ३५ जिल्हयांचा समावेश आहे.[५] पथदर्शक अभ्यासानुसार असे लक्षात आले की, त्यापैकी जास्तीत जास्त कोल्हाटी जमातीची लोकसंख्या असणाऱ्या काही जिल्हयांमध्ये धुळे, बुलढाणा, लातूर, बीड, जळगांव, उस्मानाबाद, सोलापुर, अहमदनगर, पुणे, परभणी, जालना इ. जिल्हयांचा उल्लेख करता येईल. तूरळक संख्या असणाऱ्या काही जिल्हयांमध्ये नागपूर, यवतमाळ, नांदेड, मुंबई, औरंगाबाद इ. जिल्हयांचा उल्लेख करता येईल.

#### ३.१०.१.३. जिल्हयाची निवड–

प्रस्तुत संशोधनासाठी जास्तीत जास्त लोकसंख्या असणाऱ्या जिल्हयांचा अभ्यास करत असताना या जमातीची शासकीय गणना केली जात नाही असे आढळले. तरीही एकंदरीत पथदर्शक अभ्यासानुसार लोकसंख्येचा आढावा घेतला असता पुणे, अहमदनगर, सोलापूर या जिल्हयामधील अहमदनगर या जिल्हयातील लोकसंख्या जास्त व केंद्रीत असल्याची आढळली. त्यामुळे संशोधकाने सहेतुक नमुना निवड पध्दतीने 'अहमदनगर' जिल्हयाचा अभ्यास करण्याचे निश्चित केले आहे.

### ३.१०.१.४. तालुक्यांची निवड –

अहमदनगर जिल्हयात एकुण १४ तालुक्यांचा समावेश होतो. यापैकी ०४ तालुके संशोधन अभ्यासासाठी नमुना म्हणून निवडण्यात आली आहे. ज्या तालुक्यांमध्ये या जमातीचे केंद्रीकरण जास्त प्रमाणात आढळते त्या तालुक्यांची निवड केली आहे.

### ३.१०.१.५. गावांची नमुना निवड –

पथदर्शक अभ्यासानुसार खालीलप्रमाणे काही तक्त्यांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यावरुन जास्त संख्या असणाऱ्या काही गावांची नमुना निवड म्हणून करण्यात आली आहे.

अहमदनगर जिल्हयातील १४ तालुक्यांमध्ये एकुण गावांची संख्या १५८४ एवढी आहे. त्यांची तालुक्यांमधील वितरण पुढीलप्रमाणे

**तक्ता क्रमांक ३.१**

**अहमदनगर जिल्हयातील एकुण गावे**

| अ.क्र. | तालुका | गावांची संख्या |
|---|---|---|
| १ | अकोले | १९० |
| २ | संगमनेर | १७० |
| ३ | कोपरगांव | ८० |
| ४ | राहाता | ५८ |
| ५ | श्रीरामपूर | ५६ |
| ६ | नेवासा | १२९ |
| ७ | शेवगांव | ११२ |
| ८ | पाथर्डी | १३४ |
| ९ | नगर | १०८ |
| १० | राहुरी | ९६ |
| ११ | पारनेर | १३१ |
| १२ | श्रीगोंदा | ११४ |
| १३ | कर्जत | १२० |
| १४ | जामखेड | ८६ |
| | **एकुण गावे** | **१५८४** |

(आधार –जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१५ जिल्हा अहमदनगर)

अहमदनगर जिल्हयात १४ तालुक्यात कोल्हाटी जमातीची लोकवस्ती आहे. त्यांची पथदर्शक अभ्यासानुसार कुटुंब संख्या ५६८ आहे. त्यामध्ये एकुण १४ तालुक्यांपैकी कोल्हाटी बहुल ०४ तालुक्यांची निवड करुन त्यामधील एकुण ४२० कुटुंबांचे प्राथमिक सर्वेक्षण केले आहे.

**तक्ता क्रमांक ३.२**

**अहमदनगर जिल्हयातील १४ तालुक्यांमधील कोल्हाटी जमातीची तालुकानिहाय कुटुंब संख्या**

**१. नगर तालुका–**

| गाव संख्या | कुटुंब संख्या |
|---|---|
| निमगाव वाघा | ४२ |
| केडगाव | २९ |
| बुरुडगाव रोड | २५ |
| सुर्यनगर | ०८ |
| मंगलगेट | १२ |
| **एकुण गावसंख्या– ०५** | **एकुण कुटुंबसंख्या –११६** |

**२. नेवासा तालुका–**

| गावसंख्या | कुटुंब संख्या |
|---|---|
| बेल पिंपळगाव | ३३ |
| नेवासा फाटा | ०८ |
| घोडेगाव | १० |
| निपाणी निमगांव | ०३ |
| कुकाना | ०७ |
| पिंपरी शहाली | ०४ |
| मंगळापूर | ०१ |
| आंतरवली | ०४ |
| माळी चिंचोरे | ०५ |
| गोगलगांव | ०१ |
| वडाळा | ०५ |
| गिडेगाव | २१ |
| सोनई | ०२ |
| **एकुण गावसंख्या–१३** | **एकुण कुटुंब संख्या १०४** |

३. जामखेड तालुका –

| गावसंख्या | कुटुंब संख्या |
|---|---|
| कान्होपात्रानगर | ५६ |
| जाधव गल्ली | ०६ |
| खाडेनगर | ११ |
| खांडवी | २६ |
| बावी | ०४ |
| **एकुण गावसंख्या–०५** | **एकुण कुटुंब संख्या१०३** |

४. शेवगाव तालुका –

| गावसंख्या | कुटुंब संख्या |
|---|---|
| बोधेगाव | १७ |
| घोटण | ०९ |
| चापडगांव | ०१ |
| दहीगांव | ०४ |
| ढोर जळगांव | ०५ |
| जोहरापूर | ०४ |
| हातगांव | ०१ |
| राक्षी | ०४ |
| भातकुडगांव | ०१ |
| क-हेटाकळी | ०८ |
| प्रभूवडगांव | ०७ |
| रावतळकुडगांव | ०३ |
| खडकामडका | ०२ |
| शेवगांव | ३१ |
| **एकुण गावसंख्या–१४** | **एकुण कुटुंब संख्या ९७** |

५. श्रीगोंदा तालुका –

| गावसंख्या | कुटुंब संख्या |
|---|---|
| उखलगाव | २५ |
| बांगर्डे | ०७ |
| खांडगाव | ०२ |
| थिटी सांगवी | ०३ |
| **एकुण गाव संख्या ०४** | **एकुण ३७** |

६. कोपरगांव तालुका–

| गावसंख्या | कुटुंब संख्या |
|---|---|
| कोपरगाव | १० |
| ब्राम्हणगाव | १५ |
| **एकुण गाव संख्या ०२** | **एकुण २५** |

७. कर्जत तालुका–

| गावसंख्या | कुटुंब संख्या |
|---|---|
| डाकू निमगांव | १० |
| राशीन | १२ |
| **एकुण गाव संख्या ०२** | **एकुण २२** |

८. श्रीरामपूर तालुका–

| गावसंख्या | कुटुंब संख्या |
|---|---|
| श्रीरामपूर | १० |
| बेलापूर | १० |
| **एकुण गाव संख्या ०२** | **एकुण २०** |

९. पारनेर तालुका–

| गावसंख्या | कुटुंब संख्या |
|---|---|
| वाळवणे | २० |
| **एकुण गाव संख्या ०१** | **एकुण २०** |

१०. पाथर्डी तालुका–

| गावसंख्या | कुटुंब संख्या |
|---|---|
| पाथर्डी | १० |
| भालगाव | ०३ |
| खरवंडी | १० |
| जिरेवाडी | ०५ |
| **एकुण गाव संख्या ०४** | **एकुण १८** |

११. संगमनेर तालुका–

| गावसंख्या | कुटुंब संख्या |
|---|---|
| संगमनेर | १० |
| **एकुण गाव संख्या ०१** | **एकण १०** |

१२. राहाता तालुका–

| गावसंख्या | कुटुंब संख्या |
|---|---|
| रुई | ०५ |
| **एकुण गाव संख्या ०१** | **एकुण ०५** |

१३. राहुरी तालुका–

| गावसंख्या | कुटुंब संख्या |
|---|---|
| राहुरी | ०२ |
| चिंचोली फाटा | ०२ |
| **एकुण गाव संख्या ०२** | **एकुण ०४** |

१४. अकोला तालुका–

| गावसंख्या | कुटुंब संख्या |
|---|---|
| अकोला | ०३ |
| भंडारदरा | ०१ |
| **एकुण गाव संख्या ०२** | **एकुण ०४** |

(स्त्रोत – पथदर्शक अभ्यासानुसार २०१५–१६)

२०११ पर्यंतच्या भारतीय जनगणनेनुसार भटक्या जमातीपैकी कोल्हाटी जमातीची प्रत्यक्ष जनगणनेची नेमकी आकडेवारी मिळत नाही. त्यामुळे पथदर्शक अभ्यासानुसार वरीलप्रमाणे नमुना निवड, कुटुंब संख्या निश्चित केली. अहमदनगर जिल्हयातील १४ तालुक्यांमधील ६६ गावांमध्ये एकुण कोल्हाटी कुटुंबांची संख्या ५९० आढळली.

**तक्ता क्रमांक ३.३**

**अहमदनगर जिल्हयातील अभ्यास क्षेत्रासाठी निवडलेल्या तालुक्यांची संख्या**

| अ.क्र. | तालुका | गावसंख्या | कुटुंब संख्या |
|---|---|---|---|
| १ | नगर | ०५ | ११६ |
| २ | नेवासा | १३ | १०४ |
| ३ | जामखेड | ०५ | १०३ |
| ४ | शेवगाव | १४ | ९७ |
| | **एकुण** | **३७** | **४२०** |


(स्त्रोत – पथदर्शक अभ्यासानुसार २०१५–१६)

पथदर्शक अभ्यासाद्वारे गावांची निवड करत असताना कोल्हाटी समाज अनेक तालुक्यांमध्ये विखुरलेला आढळला. काही गावांमध्ये मोजकीच घरे आढळली. संशोधकाने पथदर्शक अभ्यासानुसार ज्या गावांमध्ये कोल्हाटी कुटुंब संख्या जास्त आहे त्या गावांची सहेतुक नमुना निवड पद्धतीनुसार नमुना म्हणून निवड केली आली.

**३.१०.२. तथ्य संकलनाच्या पध्दती व साधने– ( Methods & Tools of Research Hypotheses)**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधक प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत या दोहोंचा वापर करुन तथ्य संकलन करणार आहे. तरीही हा एका जमातीचा अभ्यास असल्याकारणाने संशोधक जास्तीत जास्त प्राथमिक स्त्रोतांवर जास्त अवलंबून आहे.

**तथ्य संकलनाची तंत्रे[६]**




### अ. प्राथमिक स्त्रोत (Primary Sources) -

संशोधन विषयाची तथ्य प्रामुख्याने या स्त्रोतावर अवलंबून असणार आहेत.

### १. निरीक्षण(Observation) -

निरीक्षण ही संशोधनासंबंधी अदययावत माहिती मिळविण्याच्या दृष्टीने महत्वाचे साधन मानले जाते. कोल्हाटी कुटुंबांना भेट देऊन, त्यांच्या सहवासात वेळ घालवून तथ्य गोळा करण्यात आली आहेत. उदा. वेशभूषा, घराची रचना, राहणीमान, स्वच्छता, सोयी –सुविधा, स्त्रियांचे हावभाव, औपचारिकता इ. निरिक्षण करण्यासाठी वेळोवेळी कोल्हाटी कुटुंबातील वेगवेगळया व्यक्तिंना भेट देण्यात आली आहे. या निरिक्षणातून त्यांच्या समस्यांची उकल होण्यास मदत झाली आहे. निरिक्षणात्मक नोंदीची गावनिहाय अनुसूची बनविण्यात आली आहे.

## २. अनुसूचीद्वारे मुलाखती(Schedule)-

कोल्हाटी जमातीच्या तथ्य संकलनामध्ये या प्राथमिक स्त्रोतांचा महत्वाचा हातभार लागलेला आहे. जमातीतील कुटुंब व कुटुंब प्रमुख हा आधार घटक घेण्यात आला आहे. मग तो स्त्री असो किंवा पुरुष असो. अनुसुचीतील प्रश्नाच्या आधारावर कुटुंब प्रमुखाच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत. अनुसूचीद्वारे कोल्हाटी जमातीतील कुटुंबांची पोटजात, वास्तव्य, ठिकाण, मूळ ठिकाण, व्यवसाय, कौटुंबिक शिक्षण, पारंपारिक व्यवसायातील समावेश, रितीरिवाज, विवाह पध्दती, जन्म ते मृत्यू पर्यंतच्या प्रथा या सर्वांविषयी माहिती घेण्यात आली आहे.

"अशाप्रकारे प्राथमिक स्त्रोताद्वारे संशोधनकर्ता प्रत्यक्ष स्वतः तथ्यांचे संकलन करीत असतो. निरीक्षण, प्रश्नावली, मुलाखत आणि निरीक्षण हे प्राथमिक स्त्रोत आहेत. सामाजिक संशोधनात प्राथमिक स्त्रोतांचे विशेष महत्व आहे."[७]

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने वरीलपैकी निरीक्षण व अनुसूची या दोन तथ्य संकलन पध्दतींचा अवलंब केला आहे.

### ब. दुय्यम स्त्रोत (Secondary Sources) –

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य आधार प्राथमिक स्त्रोत असला तरी त्याला परिपूर्णता आणून त्याची सिध्दता पटवून देण्यासाठी विविध संदर्भ साहित्यांचा आधार घेतला गेला आहे.

कोल्हाटी जमातीविषयी माहिती गोळा करत असताना या जमातीचे आर्थिक विश्लेषण, सामाजिक विश्लेषण, इतिहासातील सामाजिक स्थान, सैध्दांतिक विश्लेषणासाठी संदर्भ ग्रंथ, शोध निबंध, विविध संशोधनपत्रिका, शासकीय कार्यालयातील माहिती, वर्तमानपत्रे, नियतकालीके, साप्ताहिके, जनगणना अहवाल, संशोधन संस्थांनी केलेले संशोधन, शासकीय गॅझेटर, पुस्तके इत्यादी संदर्भ साहित्यांचा द्रितीय स्त्रोत म्हणून वापर करण्यात आला आहे. संशोधकाकडून यामधील आवश्यक माहिती घेण्यात आली आहे.

## ३.११. तथ्याचे विश्लेषण व निर्वचन (Testing & Analysis of Hypothesis)-

अहमदनगर जिल्हयातील कोल्हाटी जमातीचा सामाजिक व आर्थिक विकास या संशोधन विषयाची विविध साधनाच्या सहाय्याने तथ्य संकलित करण्यात आले आहेत. त्यामध्ये निरिक्षण, मुलाखत, अनुसूची इ. प्राथमिक स्त्रोतांचा समावेश आहे. तसेच संशोधन संदर्भीय

द्वितीय स्त्रोताद्वारे माहिती मिळविण्यात आली आहे. या तथ्यांचे आर्थिक व सामाजिक या दोन भागात विभाजन करुन गुणात्मक व संख्यात्मक पध्दतीने त्याचे वर्गीकरण करण्यात आले आहे.[८] गोळा केलेल्या प्राथमिक व दुय्यम माहितीचे विश्लेषणाकरिता काही पध्दतीचा व तंत्राचा वापर संशोधकाने केला आहे. त्यापैकी सारणीकरण, तथ्य संकेतीकरण, तथ्यांचे चित्राद्वारे विश्लेषण, माहितीचे आलेखाद्वारे विश्लेषण, टक्केवारी पध्दतीने विश्लेषण, आकृतीद्वारे विश्लेषण, परिकल्पनांची तपासणी करणे, विचलनाची नावे ठरविणे इ.

त्याचप्रमाणे गृहीतकृत्याची पडताळणी करण्यासाठी तसेच दोन चलांमधील संबंध दाखविण्यासाठी T-Test, $X^2$ चाचणी, मध्यमान, प्रमाण विचलन, सहसंबंध या सांख्यिकीय पद्धतींचा अवलंब प्रस्तुत संशोधनासाठी व तथ्याची अचूकता वाढविण्यासाठी संशोधकाने केले आहे.

## ३.१२. संशोधन विषयाचा अर्थशास्त्रीय सैध्दांतिक आधार –

### ३.१२.१. पारंपारिक दृष्टचक्र –

भारत देश विकसनशील अर्थव्यवस्था असल्या कारणाने त्याच्या वैशिष्टयांमध्ये दारिद्रय, बेरोजगारी, अल्प उत्पादकता, कुपोषण इत्यादींचा समावेश होतो. या सर्व कारणांना देशाच्या आर्थिक विकासातील अडथळा म्हणता येईल. परंतु या कारणांबरोबरच देशातील पारंपारिक व्यवसायाधारित जाती व्यवस्था ही सुध्दा देशाच्या विकासाला अडथळा आहे. कोल्हाटी जमातीचा सामाजिक व आर्थिक अभ्यास या विषयाचा शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करत असताना जमातीच्या मूळ आर्थिक पाया शोधणे महत्वाचे वाटते. संशोधकाच्या मते या जमातीमध्ये दारिद्रयाचे दृष्टचक्र निर्माण झाले आहे त्याचे मूळ कारण म्हणजे परंपरागत दृष्टचक्राची निर्मिती होय.

कोल्हाटी जमातीचा सामाजिक व आर्थिक अभ्यास या संशोधन विषयाचा अर्थशास्त्रीय सैध्दांतिक आधार म्हणून जातिसंस्थेचे अर्थशास्त्रीय समर्थन ग्रामीण कोल्हाटी कुटुंबाच्या पारंपारिक दृष्टचक्राच्या सामाजिक आर्थिक विकासास अडथळा असल्याचे दिसते. कोल्हाटी समाजातील उदरनिर्वाह व उपजिविकेच्या साधनांकडे समाज उपेक्षेच्या अवहेलनेच्या नजरेने पाहतो. परंतु हे साधन प्राचीन जातीव्यवस्थेचे मूळ आहे. अतिपूर्व काळापासून कार्ये व साधनांच्या चौकटी घालून दिल्या असल्याने कोल्हाटी जमातीच्या प्रश्नांची व समस्यांची

उकल कधीही झाली नाही.

### ३.१२.२. परंपरागत दृष्टचक्रामुळे दारिद्र्याच्या दृष्टचक्राची निर्मिती –

**रॅग्नर नर्क्स** या सुप्रसिध्द अर्थतज्ञाने ‘Problems of capital formation in under development countries’ या ग्रंथात दारिद्र्याच्या दृष्टचक्राच्या संकल्पनेचे विवेचन केले आहे.

*** व्याख्या –**

“दारिद्र्याच्या दृष्टचक्राचा संबंध चक्रिय संबंध असणाऱ्या अशा आर्थिक घटकांशी येतो की, जे घटक गरीब देशाला दारिद्र्यातच ठेवतात.”[१]

रॅग्नर नर्क्स यांनी अनेक आर्थिक कारणे सांगितली आहेत. परंपरागत दृष्टचक्र हे जातिसंस्थेमुळे निर्माण झाले. जातिसंस्थेचे निर्मितीचे मूळ म्हणजे समाजातील लोकांची व्यवसायवार आर्थिक विभागणी होय. म्हणजेच नर्क्स यांनी सांगितल्याप्रमाणे पहिल्या घटकाचा संबंध दुसऱ्या घटकाशी, दुसऱ्याचा तिसऱ्या घटकाशी व अपर्यायास्तव तिसऱ्याचा पुन्हा पहिल्या घटकाशी संबंध जोडला जातो. यावरुन परंपरागत दृष्टचक्रामुळे दारिद्र्याच्या दृष्टचक्राची निमिती होते हे स्पष्ट होते.

### ३.१२.३. परंपरागत दृष्टचक्राची वैशिष्ट्ये –

संशोधकाने संदर्भ साहित्याचा आढावा घेतला असता पुढील काही परंपरागत दृष्टचक्राची वैशिष्टये लक्षात आली.

१. वर्णव्यवस्थेतून जातीव्यवस्था उदयास आली.

२. वर्ण व जातीव्यवस्था उच्चवर्णीयांच्या सोयीनुसार उभारण्यात आली.

३. कोल्हाटी जमातीतील कुटुंबांनी या परंपरागत व्यवसायाला सर्वस्वी स्विकारले.

४. धर्मशास्त्राने घालून दिलेली चौकट म्हणजेच या जमातीसाठीचे परंपरागत दृष्टचक्र होय.

५. परंपरागत दृष्टचक्र भेदण्याची शक्ती व तयारी दाखविल्यास शिक्षा व दंडास सामोरे जावे लागत असे.

६. शिक्षणाचा अभाव किंवा शिक्षणापासून वंचित राहिल्याने ग्रामीण भागात या दृष्टचक्रातून बाहेर पडण्याची प्रेरणा नष्ट झाली.

### ३.१२.४. परंपरागत दृष्टचक्र व कोल्हाटी समाज –

अल्पविकसित देशाचा आर्थिक विकास ज्याप्रमाणे दारिद्रयाच्या दृष्टचक्रात अडकतो तशी कोल्हाटी जमात परंपरागत दृष्टचक्रात अडकली आहे. कोल्हाटी जमातीच्या सामाजिक–आर्थिक विकासात अनेक मुद्दे अडथळे ठरले आहेत.

**१. जातिव्यवस्था –**

शुद्र, अतिशूद्र हे दोन भिन्न वंशिय लोक त्रिवर्ण हिंदू लोक हिंदुस्थानात प्रभावशाली होण्याआधी वस्ती करुन होते. हिंदू समाजातील शूद्र लोक हे द्रविड वंशिय, अतिशूद्र हे अद्रविड वंशीय असे मानावे. द्रविडांची संस्कृती बाल्यावस्थेत होती पण ते शेती करण्यात कुशल होते म्हणून त्यांचा समावेश चौथा वर्ण म्हणून करण्यात आला. हे शुद्र बलीचे अनुयायी होते.

श्री. म. माटे हे यशवंत सुमंत संपादीत ग्रंथ महाराष्ट्रातील जातीसंस्थेविषयक विचार या ग्रंथामध्ये असा अनुमान मांडतात की, " देवाने आपल्याला असे जन्माला घातले आहे असला निर्बळ विचार शुद्रांनीही पत्करला असेल".[१०]

श्री. म. माटे यांनी काढलेले शुद्राविषयीचे अनुमान कोल्हाटी समाजासाठीही लागू पडते. तेही दैववादी विचार स्वीकारुन आपले काम परंपरेनेच आपल्याला स्विकारावे लागते असे मानतात. म्हणूनच ते पारंपारिक दृष्टचक्रात गुंतलेले दिसतात.

श्री. म. माटे यांनी १९३३ मध्ये अस्पृश्यांचा प्रश्न यावरील प्रबंध ज्यावर त्यांनी १५ वर्षे प्रत्यक्ष कार्याची जोड दिली. त्यानुसार त्यांना असे वाटले की, हिंदुस्थानातील कोणत्या जाती कोणत्या वंशाच्या आहेत हे ठरविण्याची शास्त्रीय पद्धती अजून उपलब्ध झालेली नाही.[११]

**२. कौटुंबिक आर्थिक जबाबदारी –**

भटक्या विमुक्त जातीतील कोल्हाटी जमातीतील कलावंतीन स्त्रीच्या संदर्भात विचार करता एकुणच आर्थिक प्राप्तीची जबाबदारी कलावंतीण स्त्रीचीच असते असा दृष्टीकोन या समाजाचा अभ्यास करताना दिसून येतो.

'कोल्हाटयाचं पोर' या किशोर काळे यांच्या आत्मचरित्रातील कलावंतीन स्त्री शांताबाई काळे यांची जीवनगाथा पाहिली असता असे दिसते की, त्यांनी कुटुंबाची व मुलाच्या उच्च शिक्षणाच्या पूर्तीसाठी कलावंतीण म्हणून आर्थिक प्राप्ती करुन कौटुंबिक आर्थिक जबाबदारी

यशस्वीपणे पार पाडल्याचे दिसते. एवढेच नव्हे तर मुलाला वडिलांचे नाव नसताना स्वतःचे नाव देऊन बाप म्हणून जबाबदारी पार पाडताना दिसतात.

**३. मुली आर्थिक उत्पादनाचे साधन –**

या जमातीमध्ये भविष्यापेक्षा वर्तमानाचा विचार करण्याची प्रवृत्ती दिसून येते. जमातीतील स्त्रियांचा उपभोग वस्तू म्हणूनच उपयोग केला जातो. त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवून कुटुंबातील आर्थिक उत्पादनाचे साधन म्हणून मुलींकडे पाहिले जाते. वेळप्रसंगी मुलींच्या जन्मावेळी आनंद तर मुलाच्या जन्मावेळी दुःख व्यक्त केले जाते. पुढे जाऊन अशा कलावंतीण स्त्रियांना शारिरीक विकलांगप्रसंगी रस्त्यावर येऊन जगावे लागते अथवा पर्यायी मार्गाचा वापर करण्याशिवाय पर्याय नसतो.

**४. नैसर्गिक सौंदर्य संपन्नता –**

१. आनंद यादव यांनी त्यांच्या 'झोंबी' या कथासंग्रहामध्ये नायकीणीच्या सौंदर्य संपन्नतेविषयी काही वैशिष्टये मांडली आहेत.

" तिच्या माडीला दोन खिडक्या व दोन दारं होती. खिडक्यांना रंगीत फुलांचे दोन पडदे वाऱ्याने ते जुळजुळायचे. सकाळी बाहेरच्या गटारात मोरीतनं येणारं पाणी सुगंधी असायच....ती नायकीण क्वचितच दिसायची. यादव म्हणतात, माझ्या जन्मात मी पहिल्यांदाच स्वच्छ लुगडे नेसलेली ती बाई पाहिली. तिच्या कपाळावरचे बारीक ओले गंध, दंडाच्याही चार बोटं असलेली झालरची चोळी, रंगीत डिझाइनच पातळ, केसाचे कानावरुन फुगे पाडून मागं घातलेली वेणी पाहिली".[१२] आनंद यादवांनी वरील केलेल्या वर्णनावरुन खरोखरच नायकीण ही सौंदर्य, शृंगार यांनी संपन्न असलेली स्त्री.

२. 'माळावरची मैना' या कथा संग्रहामध्ये तेत्तीस स्त्री व्यक्तिरेखा चित्रित झाल्या आहेत. यापैकी बहुतांशी स्त्रीया या पुरुषी मनोवृत्तीपुढे अगतिक ठरल्या त्या "पोटासाठी अनैतिक व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया" असे चित्रण दिसते. या संग्रहातील सोना नायकीन सौंदर्य संपन्न असल्याकारणाने सोपानराव तिला रखेली म्हणून माळावर ठेवतो व ती आपल्या आई, वडिल, भावांना घेऊन माळावर राहते व पैशाच्या मोबदल्यात सोपानरावांशी शरीर संबंध ठेवून त्याच्या धाकात जीवन जगते.[१३]

**५. नृत्य, कला, कौशल्य निपूणता –**

कोल्हाटी जमात परंपरागत दृष्ट चक्रात गुंतलेली असण्यामागे या जमातीतील स्त्रियांची नृत्य कला कौशल्यातील निपुणता असण्याची संभाव्यता आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या कथासंग्रहातील ‘वैजयंता’ या कथेतील वैजयंताच्या कलेचे वर्णन करताना पुढील मत मांडतात.

“वैजयंताच्या पायातील नुपुरांच्या नादानं वातावरण भारलं होतं. उन्मादानं वेडावलेले प्रेक्षक मंत्रमुग्ध होऊन डोलत होते. तिचं अप्रतिम लावण्यं, मधुर स्वर, नृत्य नैपुण्य यामुळे तमाशा शौकीन वास्तव जग विसरुन कलेच्या दुनियेत वावरत होते”.[१४]

यावरुन असे स्पष्ट होते की, नर्तिका किंवा कलावंतीन ही केवळ लावण्यवतीच नसून कला सम्राज्ञीसुध्दा असते.

**६. व्यसनाधीनता –**

कोल्हाटी समाजामध्ये कुटुंबातील आर्थिक, मानसिक जबाबदारी ही स्त्रियांच्या शारिरीक कष्टावर अवलंबून असल्याने पुरुषांमध्ये आयते खाण्याची प्रवृत्ती बळावते. कोणताही कामधंदा न करता व्यसनाधीनता दिसून येते. काही भागात कलावंतीण स्त्रियाही व्यसनाच्या आहारी गेलेल्या दिसून येतात. त्यामध्ये प्रामुख्याने पान, तंबाखू, क्वचित मद्य प्राशन दिसून येते.

**७. शिक्षणाचा अभाव –**

या जमातीमध्ये मुलगी वयात येण्यापूर्वीच तिला नृत्य कलेचे धडे शिकविण्यास सुरु केले जाते. त्यानंतर त्या मुलीला शिक्षणापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले जाते. एवढेच नव्हे तर ज्या कुटुंबात मुलींची संख्या जास्त त्या कुटुंबातील मुलाला शिक्षणास प्राधान्य व प्रोत्साहन दिले जात नाही. कोल्हाटी जमात एका ठिकाणी स्थिर नसून मनोरंजनाचे खेळ करण्यासाठी भटकत असल्याचे दिसते हे ही शिक्षणाच्या अभावाचे एक कारण आहे.

## ३.१३. प्रकरणांची मांडणी(Chapterization) –

### १. प्रकरण पहिले – 'संशोधन विषयाची ओळख'

प्रस्तुत संशोधनातील पहिले प्रकरण 'संशोधन विषयाची ओळख' या विषयाची पार्श्वभूमी संबंधीचे विवेचन मांडणारे आहे. यामध्ये भटका या शब्दाची व्याख्या, कोल्हाटी या शब्दाचा अर्थ, कोल्हाटी जमातीचा इतिहास, या जमातीची इतिहासातील सामाजिक स्थान, कोल्हाटी जमातीची वैशिष्टये, विशेषतः कोल्हाटी समाजातील गृहिणी स्त्रीची वैशिष्टय आणि कोल्हाटी समाजातील कलावंतीन स्त्रीची वैशिष्टये, कोल्हाटी स्त्रियांचा आर्थिक – सामाजिक दर्जा, कोल्हाटी कला – कौशल्यांचा आढावा, भारतातील प्रादेशिक वितरण, अनेक पोटजाती, कोल्हाटी जमात ही मिश्रणाने निर्माण कशी झाली याची कारणमीमांसा, कोल्हाटी जमातीची लोकसंख्या इ. प्रकाश टाकला जाणार आहे.

महाराष्ट्रातील कोल्हाटी जमातीचे भौगोलिक वितरण, जिल्हानिहाय कोल्हाटी जमातीचे वितरण, कोल्हाटी स्त्री–पुरुष निहाय लोकसंख्या वितरण, कोल्हाटी स्त्री–एक दृष्टिक्षेप, सारांश संदर्भ सूची इ.

### २. प्रकरण दुसरे – 'संशोधन विषयाशी संबंधीत साहित्याचा आढावा'

संशोधन विषयाशी संबंधीत साहित्याचा आढावा या प्रकरणात संशोधन विषयाची संबंधीत संदर्भ साहित्याचे सिंहावलोकन केले आहे. इतर प्राचीन ग्रंथांवरुन व उल्लेखांवरुन कोल्हाटी जमातीतील संकल्पनांची उकल करण्यात येणार आहे. तसेच स्वातंत्र्यपूर्व कोल्हाटी जमातीचे अस्तित्व व योगदान याचे पुरावे मांडले आहे. यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, विद्यापाचस्पती व विद्यानिष्णांत पदवीसाठी सादर केलेले प्रबंध, शासकीय व खाजगी सर्वेक्षण अहवाल, विविध निबंध, नियतकालिके, वर्तमानपत्रातील लेख इ. चा परामर्श घेतला आहे. शेवटी सारांश आणि संदर्भ सूची.

### ३. प्रकरण तिसरे – 'संशोधनाची कार्यपध्दती'

संशोधनाची कार्यपध्दती या प्रकरणात विषयाच्या संशोधन पध्दती व आराखडा यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. संशोधन विषयाचा आराखडा, विषयाची निवड, कथन, संदर्भ, विषयाचे महत्व, उद्दिष्टये, गृहितके, परिकल्पना, मर्यादा, संशोधन पध्दती व नमुना निवड.

तथ्य संकलन पध्दती व साधने, तथ्यांचे विश्लेषण व विवेचन आणि संशोधन विषयाचा अर्थशास्त्रीय सैध्दांतिक आधार, प्रकरण मांडणी, सारांश व संदर्भ सूची इ.

प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यास क्षेत्र म्हणून अहमदनगर जिल्हयाची पार्श्वभूमी यावर प्रकाश टाकला आहे. अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भौगोलिक स्थान, क्षेत्रफळ, प्राकृतिक रचना, नदया व धरणे, हवामान, पर्जन्यमान, वनक्षेत्र व वन उत्पादने, नैसर्गिक साधन संपत्ती इत्यादींचा परामर्श घेतला आहे.

अहमदनगर जिल्हा व कोल्हाटी जमात – प्रथम जिल्हयाची लोकसंख्या, लोकसंख्येची घनता, अनुसूचीत जाती–जमातीची लोकसंख्या, कर्ती लोकसंख्या, स्त्री – पुरुष प्रमाण, साक्षरता इ. नंतर जिल्हयातील एकुण लोकसंख्या व कोल्हाटी जमातीची लोकसंख्या यांची तुलना व वर्गीकरण, प्रशासकीय विभाग, वाहतुक दळणवळण सुविधा, बँका, बाजारपेठ, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, वीज, शिक्षण पाणी पुरवठा, निवास घरे व कुटुंबे, जमीनीच्या धारण क्षेत्राची रचना, पिकाचे स्वरुप, उदयोग, व्यापार आणि कोल्हाटी जमात व अहमदनगर जिल्हा यांच्यातील एकरुपता, वरील सर्व बाबींशी या जमातीचा संबंध सहभाग या प्रकरणात दाखविला आहे. शेवटी सारांश व संदर्भसूची.

**४. प्रकरण चौथे – 'माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन'**

प्रस्तुत प्रकरणामध्ये अहमदनगर जिल्हयातील कोल्हाटी समाजाची कुटुंब संख्या, त्या कुटुंबांची वैयक्तिक, कौटुंबिक माहिती, कोल्हाटी कुटुंब म्हणून जगताना, कोल्हाटी गृहिणी म्हणून जगताना, कोल्हाटी कलावंत स्त्री म्हणून जगताना, कोल्हाटी जमातीकडे समाजाचा दृष्टीकोन, जमातीतील लोकांनी जमातीच्या विकासासाठी केलेली धडपड, अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी कुटुंबांची वास्तविक स्थिती, कुटुंब व्यवस्था, वैवाहिक स्थिती, रुढी – परंपरा, चालीरिती, शैक्षणिक स्थिती, आरोग्यस्थिती, सामाजिक–प्रशासकीय दुरावा, समाजात वावरताना येणाऱ्या विविध सामाजिक समस्यांचा आढावा घेण्यात आला आहे तसेच संदर्भांचा आधार घेऊन कोल्हाटी जमातीतील धार्मिक रुढी व परंपरा यांचे आचरण स्पष्ट करण्यात आला आहे. या प्रकरणामध्ये निवडलेल्या संशोधन क्षेत्रातील कोल्हाटी कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीचे विवेचन करताना आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत, वार्षिक उत्पन्न पातळी, आर्थिक व्यवहार, स्थावर मालमत्ता, व्यावसायिक स्थिती, आर्थिक सुब्बतेतील स्त्रीचा हातभार,

पुरुषाचा हातभार, रोजगार उपलब्धतेचा कालावधी, व्यवसनाधिनतेचा आर्थिक स्थितीवरील परिणाम, परंपरागत व्यवसायातून रोजगार प्राप्त व्यक्तींची मानसिकता, रोजगार किंवा व्यवसाय नसणाऱ्या व्यक्तींची मानसिकता, गाव कारभारातील कोल्हाटी लोकांचा सहभाग, जाती संस्था व गांजलेल्या रुढी परंपरांचा अर्थकारणावर होणारा परिणाम, कोल्हाटी जमातीच्या अनेक घुसमटणाऱ्या प्रश्नांना वाचा, समस्यांची उकल इ. बाबींवर या प्रकरणात प्रकाश टाकला आहे. प्रस्तुत संशोधनाचा महत्वाचा मुद्दा असणारे गृहीतकृत्याची पडताळणी या प्रकरणामध्ये करण्यात आली आहे. त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सांख्यिकीय पध्दतीची व तक्त्यांचे विश्लेषण प्रस्तुत प्रकरणात करण्यात आले आहे.

**५. प्रकरण पाचवे –'संशोधन सारांश, निष्कर्ष व शिफारशी'**

या प्रकरणामध्ये निष्कर्ष व शिफारशी या मुख्य घटकांचा उल्लेख करण्यात आला आहे. या प्रकरणात सर्व तथ्यांचे सामाजिक निष्कर्ष व आर्थिक निष्कर्ष असे दोन भाग करण्यात आले आहेत. शेवटी निष्कर्षाच्या आधारावर संशोधकांकडून शिफारशी सूचविण्यात आले आहेत. त्यांचेही सामाजिक शिफारशी व आर्थिक शिफारशी अशा दोन भागात विवेचन केले जाईल. अंतिमतः सारांश मांडण्यात येईल. प्रकरणांच्या शेवटी परिशिष्ट आणि संदर्भ सूची यांची यादी जोडली आहे.

महाराष्ट्राच्या प्रबोधनाचा इतिहास अभ्यासताना अहमदनगर जिल्हा एक ऐतिहासिक नगर म्हणून ओळखला जातो. कारण हिंदू – मुस्लिम ऐक्य हे अहमदनगर जिल्हयाचे एक वैशिष्टय असून अहमदनगरच्या प्रारंभ काळात धार्मिक, सामाजिक, प्रबोधनाचे काम संतांनी केले आहे. नगर प्रांत हा संतांची कर्मभूमी असल्याने संतांनी केलेल्या समाजसेवेचे संस्कार घडून तो पूण्यभूमी बनला आहे. पेशवाईत गाजलेला विठ्ठल सुंदर (साडेतीन शहाण्यांपैकी एक) त्रिंबकजी डेंगळे, संत साईबाबा, संत ज्ञानेश्वर, प्रसिध्द अभिनेते सदाशिव अमरापूरकर, थोर स्वातंत्र सेनानी रावसाहेब पटवर्धन व अच्च्युतराव पटवर्धन, कवी नारायण वामन टिळक, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, प्रसिध्द चित्रकार प्रमोद कांबळे या थोर व नावाजलेल्या व्यक्तींची जन्मभूमी व कर्मभूमी म्हणून अहमदनगर जिल्हयाचे नावलौकिक आहे.

हिंदू धर्माची मूळ चौकट ही चार्तुवर्णावर आधारित आहे. हे वर्ण शेकडो जातींच्या समावेशाने हिंदू संस्कृतीची वाटचाल चालू आहे. धर्मशास्त्राचे अधिष्ठान व जन्मावरुन जाती

अशा धार्मिक निर्बंधामुळे देशात गेल्या १५०–२०० वर्षापासून अनेक बाबतीत प्रगती होऊनही मानव अजूनही जाती मध्ये अडकून पडला आहे. अहमदनगर जिल्हा संतांचा जिल्हा आहे व ज्ञानेश्वरीसारखा महान ग्रंथ या जिल्हयात लिहिला गेला यावरुन अहमदनगर जिल्हयाचा भारत व महाराष्ट्रातील अर्वाचीन वारसा लक्षात येतो. आजही अहमदनगर जिल्हा सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक चळवळीचे केंद्रस्थान मानला जातो. अहमदनगर जिल्हयामध्ये विविध भटक्या जमातींचे वास्तव्य आहे. त्यापैकी कोल्हाटी जमात अनेक वर्षापासून व अनेक पिढयान्‌पिढया वास्तव्य करत आहे. या जमातीचा व अहमदनगर जिल्हयाचा परस्परसंबंध लक्षात घेता जमातीच्या सामाजिक व आर्थिक जीवनावर जिल्हयातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय व भौगोलिक पार्श्वभूमीचा परिणाम झालेला आहे तर कोल्हाटी जमातीचा व्यवसाय, उदरनिर्वाहत्मक बाबी, रोजगार यांचा प्राचीन काळापासून नगर जिल्हयाच्या अर्थकारणात सहभाग आहे. नगर जिल्हयातील अनेक तालुक्यांचा अभ्यास केला असता विशेषतः काही तालुके व अंतिमतः काही गावांमध्ये या जमातीचे केंद्रीकरण आढळते. भटकंती करत असतानाही या गावांमधील कोल्हाटी जमातीचे अस्तित्व, वास्तव्य व त्याचे सामाजिक, आर्थिक पडसाद या जिल्हयावर पडलेले दिसतात. त्यांची सांगड घालत असताना एक अभ्यास क्षेत्र म्हणून अहमदनगर जिल्हातील सर्वांगीण परिस्थितीचा आढावा घेणे जरुरीचे ठरते. या अभ्यास क्षेत्राचा विशेष संदर्भ म्हणून आधार घेताना तेथील परिस्थितीचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम या क्षेत्रात राहणाऱ्या कोल्हाटी जमातीच्या विकासावर होत असतो म्हणून कोल्हाटी जमातीचा सामाजिक, आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यापूर्वी अभ्यास क्षेत्र अहमदनगर जिल्हयाची पार्श्वभूमी जाणून घेणे संयुक्तिक ठरते.

## ३.१४. अहमदनगर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी –

अहमदनगर प्रांताचा प्राचीन परंपरेचा धागा रामायण व महाभारत काळापर्यंत सापडतो. त्यामुळे प्राचीन वारसा असणाऱ्या या अहमदनगर जिल्हयामधील परंपरेचा परामर्श घेणे क्रमप्राप्त आहे.

भास्करराव जाधव ‘पैस’ (१९९७) या स्मरणिकेतील अहमदनगर जिल्हयातील सामाजिक चळवळ या लेखात अहमदनगरच्या स्थापनेसंबंधी म्हणतात, “अहमदनगर शहर आणि जिल्हयात हिंदू, मुस्लिम आणि ख्रिश्चन अशा तीन धर्मियांची वस्ती आहे. अहमदनगर

शहराची स्थापना मुस्लिमधर्मिय राजाने ५०४ वर्षापूर्वी केली''.[१५]

जाधव यांच्या मतक्यावरुन अहमदनगरचे संस्थापक मुस्लिम राजा असून हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन या तीन धर्मीयांचा या प्रांतावर पगडा असल्याचे दिसते.

### ३.१४.१ अहमदनगरचा इतिहास व नामकरण –

या जिल्हयाच्या नावावरुन पूर्वीच्या काळात या भागावर असलेल्या निजामशाही व मोगल साम्राज्याचे वर्चस्व लक्षात येते. ''१५ व्या शतकाच्या शेवटी इ.स. १४८६ मध्ये तत्कालीन बहामनी राज्याचे ५ तुकडे झाले. त्यामधून फुटून निघालेल्या मलिक अहमदशहा बहिरी या निजामशहाने १४९० मध्ये सिना नदीकाठी शहर वसविण्यास सुरुवात केली. त्याच्या नावावरुनच या शहराला अहमदनगर असे नाव पडले. इ. स. १४९८ मध्ये शहर रचना पूर्ण होऊन अहमदनगर निजामशाहीची राजधानी बनले. या शहराची तुलना त्याकाळी कैरो, बगदाद, या समृध्द शहरांशी केली जात असे. अहमदशहा, बुरहाणशहा, सुलताना चांदबिबी यांची कारकीर्द असणारी निजामशाही येथे इ.स. १६३६ पर्यंत टिकली. निजामशाहीच्या पडत्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे भोसले यांनी छोटया मूर्तझा निजामशहाला मांडीवर घेऊन नगरचा कारभार पाहिला. पुढे काही काळ नगरने मराठेशाही व शहाजहान बादशहाची मोगलशाही अनुभवली. १७५९ मध्ये नगर पेशव्यांकडे आले आणि १८०३ मध्ये ते इंग्रजांच्या ताब्यात गेले. १८१८ पासून अहमदनगरवर पूर्णपणे इंग्रजांचा अंमल होता. १८२२ मध्ये ब्रिटिशांनी अहमदनगर जिल्हयाची स्थापना केली''.[१६]

वरील संदर्भावरुन अहमदनगरचा इतिहास त्याच्या नामकरणापासून ते जिल्हा म्हणून अहमदनगरच्या स्थापनेपर्यंतचा प्रवास वर्णन दर्शवितो. यावरुन अहमदनगरवर असणारे सुरुवातीपासून स्थापनेपर्यंतचे विविध सत्तांचे वर्चस्व लक्षात येते.

सरदार मिरिकर (प्र. आ. १९१६, तृ. आ. २०१६) यांनीही पुढीलप्रमाणे आपल्या 'अहमदनगर शहराचा इतिहास' या ग्रंथात अहमदनगर राज्याची स्थापना इ.स. १४९० च्या सुमारास ब्राम्हणी राज्याचा प्रमुख सेनापती मलिक अहमद यांनी केली व हाच अहमदनगरचा पहिला बादशहा अहमद निजामशाह होय असे नमूद केले आहे.

### ३.१४.२ अहमदनगरचे पौराणिक महात्म्य –

अहमदनगर परिसराला महान प्राचीन परंपरा लाभली असून पुढील विवेचनावरुन प्राचीन

भारतीय संस्कृतीच्या काही पाऊलखुणा अजूनही या भागात दिसतात.पूर्वीच्या काळी घडलेल्या अनेक घटनांचा संबंध या जिल्हयातील भागांशी जोडला जातो. आपणास रामायणाच्या संदर्भावरुन व अनेक संतांची कर्मभूमी म्हणून या जिल्हयाचे महात्म्य लक्षात येते.

“राम हे भाऊ लक्ष्मण व पत्नी सीता यांच्यासह अगस्त्य ऋषींना गोदावरीजवळ भेटले होते. अगस्त्य ऋषींच्या परंपरेनुसार त्यांचे आश्रम अहमदनगर जिल्हयातील अकोले याठिकाणी होते. परंतु भवभूतीच्या उत्तर रामायण चरित्रानुसार ते मुराला (आधुनिक मुळा) च्या काठी वसलेले होते. या ठिकाणी अगस्त्य ऋषींनी रामाला पंचवटी ज्याठिकाणी (पिंपळाची झाड) असतील तिथे स्थिर होण्याचा सल्ला दिला. यावेळी त्यांनी रामाचे सादरीकरण एक धनुष्य दोन बाणांच्या भातांसह केलेले होते. गोदावरीचा दक्षिण किनाऱ्यापासून ते अश्माका प्रदेशापर्यंतचा विस्तार हा आधुनिक अहमदनगर ते बीडपर्यंत येत होता”.[१७]

अहमदनगर जिल्हयाची सांस्कृतिक व पौराणिक परंपरा लक्षात घेता रामायणाशी संदर्भ असून अकोला याठिकाणी अगस्ती ऋषींचे वास्तव्य होते असे म्हणता येईल.

“अहमदनगर जिल्हा हा पूर्वी दंडकारण्य म्हणून ओळखला जाणाऱ्या भागात मोडत होता असे म्हणतात म्हणून पूर्वीच्याकाळी घडलेल्या बऱ्याच घटनांचा या भूमीशी संबंध जोडला जातो. जटायुकथा ही या भागातील पट्टा किल्ल्यावर घडल्याचे सांगतात. श्री अगस्तीची यात्रा आजही अकोल्याशेजारी आगर येथे महाशिवरात्रीस भरते. पाथर्डी तालुक्यात पांडवकालीन अवशेष आढळतात. शालिवाहनांची राजधानी प्रतिष्ठान पैठण जिल्हयाला लागूनच असल्यामुळे जिल्हयात तत्कालीन अवशेष सापडतात. नेवासे उत्खननातील अवशेष पुणतांबे शालिवाहन काळापासूनच प्रसिध्द आहेत”.[१८]

## ३.१५. अहमदनगर जिल्हयाचे भौगोलिक स्थान –

अहमदनगर जिल्हयाचे भौगोलिक स्थान व विस्तार पुढील संदर्भावरुन समजतो.

“उत्तर अक्षांश १८°२ ते १९°९ व पूर्व रेखांश ७३°९ ते ७५°५ दरम्यान हा जिल्हा वसलेला आहे”.[१९]

मराठी विश्वकोष खंड १(१९७६) नुसार अहमदनगरचे वरीलप्रमाणे भौगोलिक स्थानाचा निर्देश केलेला आहे.

अहमदनगर जिल्हयाचे क्षेत्रफळ १७४१२ चौ. कि. मी. तर लोकसंख्या इ. स. २०११ च्या जनगणनेनुसार ४५,४३,०८० इतकी आहे. राजाच्या मध्यभागी असलेल्या अहमदनगर जिल्हयाच्या उत्तरेस नाशिक जिल्हा व औरंगाबाद जिल्हा, पूर्वेस बीड जिल्हा, पूर्व व आग्नेय दिशांस उस्मानाबाद जिल्हा, दक्षिणेस सोलापूर जिल्हा तर नैऋत्येस व पश्चिमेस पुणे जिल्हा व ठाणे जिल्हा हे जिल्हे वसलेले आहेत. क्षेत्रफळाच्यादृष्टीने राज्यात सर्वात मोठा असणाऱ्या या जिल्हयाने राज्याचे ५.५४ टक्के भौगोलिक क्षेत्र व्यापलेले आहे. जिल्हयाच्या पश्चिमेकडील प्रामुख्याने अकोले तालुका व संगमनेर तालुक्यात सहयाद्रीच्या डोंगररांगा पसरलेल्या आहेत.[२०]

वरील माहितीवरुन अहमदनगर जिल्हयाचे स्थान व क्षेत्रफळ लक्षात घेता हा जिल्हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा आहे तसेच जिल्हयात एकुण ४ उपविभाग आणि १४ तालुक्यांचा समावेश होतो.

### ३.१५.१. अहमदनगर जिल्हयातील उपविभाग व तालुक्यांची नावे[२१] –

सेन्सस ऑफ इंडिया २०११ महाराष्ट्र या शासकीय हॅण्डबूक प्रमाणे अहमदनगर जिल्हयातील उपविभाग व तालुक्यांची नोंद पुढीलप्रमाणे दिलेली आहे.

१. संगमनेर उपविभाग    २. कर्जत उपविभाग

३. अहमदनगर उपविभाग    ४. श्रीरामपूर उपविभाग

**अहमदनगर जिल्हयातील तालुक्यांची नावे**

१) अकोले  २) कर्जत  ३) कोपरगाव  ४) जामखेड  ५) नगर

६) नेवासा  ७) पाथर्डी  ८) पारनेर  ९) राहाता  १०) राहुरी

११) शेवगांव  १२) श्रीगोंदा  १३) श्रीरामपूर  १४) संगमनेर

### ३.१५.२. अहमदनगर जिल्हयाचे तालुकानिहाय क्षेत्रफळ (सन २०११)

**तक्ता क्रमांक : ३.४**

**अहमदनगर जिल्हयाचे तालुकानिहाय क्षेत्रफळ २०११**

| अ.क्र. | तालुका | क्षेत्र(चौ.कि.मी.) | गावांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अकोले | १४७१.९ | १९० |
| २ | संगमनेर | १६७२.४८ | १७० |
| ३ | कोपरगांव | ७२४.८८ | ८० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | राहाता | ६१४.४१ | ५८ |
| ५ | श्रीरामपूर | ५४२.६ | ५६ |
| ६ | नेवासा | १२८६.६४ | १२९ |
| ७ | शेवगांव | १०८०.९७ | ११२ |
| ८ | पाथर्डी | ११६२.३१ | १३४ |
| ९ | नगर | १३९६.६१ | १०८ |
| १० | राहुरी | ९३१.३७ | ९६ |
| ११ | पारनेर | १८५६.८ | १३१ |
| १२ | श्रीगोंदा | १५१७.१७ | ११४ |
| १३ | कर्जत | १४७०.९३ | १२० |
| १४ | जामखेड | ८५२.३६ | ८६ |
| एकुण जिल्हा | | १६५८१.४३ | १५८४ |

आधार – जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहदनगर जिल्हा २०१५–१६

वरिल तक्ता क्र. ३.१ नुसार अहमदनगर जिल्हयामध्ये १४ तालुक्यांपैकी क्षेत्रफळाच्या दृष्टीने संगमनेर तालुका १६७२.४८ चौ.कि.मी. असून सर्वात जास्त क्षेत्रफळाचा आहे. तर श्रीरामपूर हा ५४२.६ चौ.कि.मी. क्षेत्र असून सर्वात कमी क्षेत्रफळाचा आहे. तालुक्यापैकी सर्वाधिक गावांची संख्या (१९०) अकोले तालुक्यात आहे तर सर्वात कमी गावांची संख्या (५६) श्रीरामपूर तालुक्यात आहे. प्रस्तुत संशोधनासाठी निवड केलेल्या नेवासा १२८६.६४ चौ.कि.मी., शेवगाव १०८०.९७ चौ.कि.मी.,नगर १३९६.६१ चौ.कि.मी.,जामखेड ८५२.३६ चौ.कि.मी. या चार तालुक्यांपैकी नगर तालुक्याचे क्षेत्रफळ जास्त आहे व जामखेड तालुक्याचे क्षेत्रफळ कमी आहे.

## ३.१६ अहमदनगर जिल्हयाची प्राकृतिक रचना–

जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर या अधिकृत संकेतस्थळ याठिकाणी निर्देश केलेल्या माहितीवरुन अहमदनगर जिल्हयात विविध प्रकारच्या जमिनी आहेत. जिल्हयाच्या पश्चिम भागात सहयाद्रीच्या डोंगराळ बंदरांची संख्या आहे. त्यांना कळसूबाई, अदुला, बाळेशळ आणि हरिश्चंद्रगड पर्वतरांगा, कळसुबाई सहयाद्रीचे सर्वोच्च शिखर म्हणतात. जिल्हयामध्ये

हरिश्चंद्रगड, रतगड, कळंग व अजूबा हे काही शिखर आहेत. पुणे–संगमनेर मार्गावर विटा घाट आणि चंदनपुरी घाट पहावयास मिळतात. जिल्हयाच्या उत्तरेकडील भागांमध्ये गोदावरी व प्रवरा आणि दक्षिणेकडील नदया भीमा, घोड, आणि सिना यांचा मैदानी प्रदेश आढळतो.

एखादया प्रदेशात भिन्न भूमीचे स्वरुप हे भौतिक रचना असते. अहमदनगर जिल्हयाची भौतिक रचना विचारात घेतली असता त्यात तीन भौगोलिक विभाग आहेत.

**१. पश्चिम डोंगराळ प्रदेश –**

अकोले तालुका व संगमनेर तालुक्यांचा यामध्ये समावेश आहे. या प्रदेशातील अदुला, बालेश्वर आणि हरिश्चंद्रगडाच्या पर्वतरांगांमध्ये एकाच भागात अनेक उंच शिखर आढळतात. ५४७ फूट उंची असलेला कळसूबाई हे सहयाद्रीतील सर्वोच्च शिखर आहे.

**२. केंद्रीय पठार प्रदेश –**

अहमदनगर आणि पारनेर तालुका आणि संगमनेर, श्रीगोंदा व कर्जत तालुक्यांचा भाग यांचा यामध्ये समावेश आहे.

**३. उत्तर व दक्षिण मैदानाचे क्षेत्र –**

या विभागात उत्तर कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, राहुरी, नेवासा, शेवगाव, पाथर्डी या तालुक्यांचा समावेश आहे. हा प्रदेश गोदावरी आणि प्रवरा नदीच्या खोऱ्याचा भाग आहे. दक्षिणेकडील तालुके श्रीगोंदा, कर्जत, जामखेड हे सुध्दा भौतिक विभागात समाविष्ट आहेत. हे प्रदेश घोड, भीमा आणि सिना नदीच्या खोऱ्यात मोडतात.[२२]

अशाप्रकारे वरीलप्रमाणे अहमदनगर जिल्हयाची नाविन्यपूर्ण प्राकृतिक व भौगोलिक रचना विचारात घेता येते.

## ३.१७. अहमदनगर जिल्हयातील प्राचीन प्रशासकीय विभाग –

जिल्हयातील प्राचीन प्रशासकीय विभाग व सद्यस्थितीतील प्रशासकीय विभाग यांच्यामध्ये भिन्नता दिसून येते. त्या दोन्ही विभागांची रचना पुढीलप्रमाणे

### ३.१७.१. सरकार अहमदनगर प्राचीन प्रशासकीय विभाग[२३] –

अहमदनगर जिल्हयास पूर्वी सरकार अहमदनगर असे म्हणत असत. निजामशाही राज्याचा अस्त झाल्यावर मोगल बादशहांनी दक्षिणेचे जे सहा सुभे होते. त्यापैकी औरंगाबाद सुभ्यास हा जिल्हा जोडून दिला. औरंगाबाद सुभ्यास सुभे खुजस्ते बुनियाद असे म्हणत असत.

पूर्वी प्रांतांचे वर्गीकरण करण्याची प्राचीन पध्दत अशी असे की, बऱ्याच गावांचा एक गट तयार करुन त्याला तर्फ म्हणत असत. प्रत्येक तर्फावर शेखदार अगर तरफदार म्हणून एक मुलकी अधिकारी असे. तीन–चार तर्फे मिळून परगाणा बनवित असत. त्याला महाल अगर परगणा म्हणत असत. ज्यावर एक कमावीसदार अगर मामलेदार असे. असे काही परगणे मिळून एक जिल्हा होत असे व त्याला सरकार म्हणत असत.

**सरकार अहमदनगरमधील परगणे –**

१. परगणे हवेली अहमदनगर
२. परगणे पांडे पेडगाव
३. परगणे नेवासा
४. परगणे शेवगाव
५. परगणे चांभार गोंदे
६. परगणे जामखेड
७. परगणे आष्टी
८. परगणे बारागाव नांदूर
९.परगणे कडेवळीत
१०. परगणे राशीन

पूर्वीच्या व हल्लीच्या नगर जिल्हयात बरेच अंतर आहे. पूर्वी हा जिल्हा पूर्वेकडे व दक्षिणेकडे जास्त पसरलेला होता. संगमनेर, अकोले, कोपरगांव व पारनेरचा बराच भाग हे तालुके या जिल्हयात नव्हते. तसेच सोलापूर जिल्हयातील करमाळा तालुका नगर जिल्हयात होता. अशाप्रकारे प्राचीन परगण्यांची रचना लक्षात येते.

## ३.१७.२. सद्यस्थितीतील प्रशासकीय विभाग[२४] –

| अ.क्र. | उपविभाग | समाविष्ट तालुके |
|---|---|---|
| १ | अहमदनगर | अहमदनगर, पारनेर, पाथर्डी, शेवगाव |
| २ | कर्जत | कर्जत, श्रीगोंदा, जामखेड |
| ३ | श्रीरामपूर | श्रीरामपूर, नेवासा, राहुरी, राहाता |
| ४ | संगमनेर | अकोले, संगमनेर, कोपरगांव |

जिल्हयातील शहरे – १८ एकुण गावे – १५७८
महानगरपालिका – १ नगर परिषदा – ९
कटक मंडळे – १ पंचायत समित्या – १४
ग्रामपंचायती – १३११ नगर पंचायत – १

अशाप्रकारे प्रशासकीय कार्यपध्दतीत प्राचीन विभागांपेक्षा अमूलाग्र बदल घडवून लखिना पॅर्टन या रचना व कार्यपध्दतीचा पहिला प्रयोग अहमदनगर जिल्हयाचे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. अनिलकुमार लखिना यांनी अहमदनगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात केलेला दिसतो.

## ३.१८. अहमदनगर जिल्हयातील निवडक प्रसिध्द स्थळे–

प्रत्येक जिल्हयाला एक आगळेवेगळे व्यक्तिमत्व असते. त्याचप्रमाणे अहमदनगर जिल्हा विविधतेने किती समृध्द आहे याची जाणीव तेथील प्रसिध्द स्थळांचा आढावा घेतल्यानंतर होते. प्रस्तुत संशोधनामध्ये सर्व स्थळे न घेता काही निवडक स्थळांची वैशिष्टये आधोरेखित केली आहेत. ती पुढीलप्रमाणे–

### ३.१८.१. शिर्डी (राहाता)–

अहमदनगर मनमाड महामार्गावर अहमदनगरपासून सुमारे ८५ कि. मी. अंतरावर आंतराष्ट्रीय किर्तीचे श्री साई बाबांचे शिर्डी हे देवस्थान आहे. श्रध्दा, सबुरी हा साई बाबांचा अतिशय साधा सोपा संदेश सर्व दूरपर्यंत सातासमुद्रापलिकडे पोहचल्या असल्याने दररोज हजारोंच्या संख्येने भक्तगण शिर्डीचे साईबाबांच्याचरणी नतमस्तक होण्यासाठी येतात.

### ३.१८.२. कळसूबाई शिखर (अकोले)–

अहमदनगरची सरहद्द असलेल्या घाटघरजवळ कळसूबाई हे सर्वाधिक म्हणजे १६४६ मी. उंचीचे शिखर आहे. अहमदनगर पासून १७७ कि. मी. अंतरावर हे ठिकाण आहे. कळसावर स्वयंभू शिळेची मूर्ती असलेले कळसूबाई मंदिर आहे.

### ३.१८.३. भंडारदरा(अकोले)–

अहमदनगर पासून १६२ कि.मी. अंतरावर भंडारदरा हे निसर्गाने नटलेले सुंदर दगडी धरण पहायला मिळते. हे ब्रिटिश काळात प्रवरा नदीवर बांधलेले असून अतिशय सुंदर पध्दतीने हे अप्रतिम स्थापत्य काम केलेले आहे.[२५]

अहमदनगरमधील भंडारदरा हे जलसिंचनाच्या उद्देशाने असलेले एक दगडी धरण महत्वाचे आहे.

### ३.१८.४. श्री क्षेत्र शनि शिंगणापूर (नेवासा) –

नगर–औरंगाबाद रस्त्याने घोडेगावजवळ नगरपासून सुमारे ४० कि. मी. अंतरावर हे अद्भूत असे शनि भगवानांचे स्थान आहे. जगाच्या पाठीवर घरांना दरवाजा नसलेले हे बहुदा

एकमेव गाव असावे. शनि भगवानांची मूर्ती म्हणजे शिळा रुपात उघडयावर चौथाऱ्यावर स्थापलेली आहे त्याबाबत आख्यायिका सांगतात.

**३.१८.५. मुळा धरण(राहुरी) –**

नगरच्या उत्तरेला सुमारे २५ कि. मी. अंतरावर अहमदनगर जिल्हयातील सर्वात मोठे धरण असून ज्ञानेश्वर सागर नावाने ओळखले जाते याची पाणी साठवण क्षमता २६ घनफूट एवढी आहे.

**३.१८.६. कोरठण खंडोबा (पारनेर) –**

हे स्थान नगर पुणे रस्त्यावर नगर पासून १५ कि.मी. अंतरावर पिंपळगाव रोठा या गावी आहे. हे जागृत खंडोबाचे स्थान म्हणून प्रसिध्द आहे.

**३.१८.७. राळेगण सिध्दी(पारनेर) –**

नगर–पुणे महामार्गावर वाडेगव्हाण फाटयाने नगरपासून ५२ कि. मी. अंतरावर राळेगणसिध्दी हे गाव असून श्री. अण्णा हजारे यांनी गावाचा सर्वांगिण विकास कसा करावा याचा आदर्श देशासमोर ठेवला. ते आदर्श गाव म्हणजेच राळेगण सिध्दी.

**३.१८.८. रेहकुरी अभयारण्य (कर्जत) –**

अहमदनगरपासून ७० कि. मी. अंतरावर विस्तीर्ण असे रेहकुरी अभयारण्य पहायला मिळते. पर्यटकांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्राणी दर्शन या अभयारण्यात मिळते. अभयारण्याचे क्षेत्र ३४० हेक्टर असून हे प्राणी पाहण्यासाठी अनेक मनोरे उभे केलेले आहेत.

**३.१८.९. मढी (पाथर्डी) –**

नगर–पाथर्डी मार्गावरील निवडुंगे गावापासून वरती डोंगराकडे जाणाऱ्या फाटयाने थोडया अंतरावर मढी येथे नवनाथापैकी कानिफनाथांची संजीवन समाधी मंदिर आहे. नगरपासून मढीचे अंतर ५१ कि.मी. आहे. होळी ते गुढीपाडवा या दरम्यान येथे फार मोठी यात्रा भरते. सर्व भटक्या जाती जमातीचे जातीमधील न्याय निवाडे जातपंचायतीमार्फत केले जातात. होळी पेटवायचा मान गोपाळ समाजाचा आहे. येथील गाढवांचा बाजार फार प्रसिध्द आहे. दूर–दूरवरुन गाढवांच्या खरेदी–विक्रीसाठी व्यापारी व ग्राहक येतात. अनेक भटक्या जातींमध्ये विवाह सोहळे येथे पार पडतात.[२६]

भटक्या जाती जमातीसाठींची न्यायनिवाडा करणारी जात पंचायत मढी येथे भरते.

त्याचप्रमाणे भटक्या जमातींचे विवाह सोहळे पार पाडले जातात. त्यामुळे कोल्हाटी जमातीसाठी मढी या स्थानाचे विशेष महत्व आहे.

### ३.१८.१०. कांबी(शेवगाव)–

काम्यक ऋषींचे आश्रमस्थान म्हणून गावाला कांबी असे नाव पडले. पूर्वी या भागात घनदाट जंगल होते. कांबी हे होळकरांचे जहागिरी गाव. आजही तेथे होळकरांचे वंशज आहेत. सुप्रसिध्द सिने अभिनेत्री मधु कांबीकर याच गावची. शापितमधील चित्रपट भूमिकेमुळे जनमानसाने तिला डोक्यावर घेतले. वडिलांच्या स्मरणार्थ मधुताईंनी मोठे वाचनालय येथे सुरु केले आहे.

## ३.१९. किल्ले –

### ३.१९.१. पेमगिरी किल्ला(संगमनेर)–

संगमनेरपासून नैऋत्येला सुमारे २७ कि.मी. अंतरावर इतिहास प्रसिध्द पेमगिरीचा किल्ला पहायला मिळतो. शहाजीराजांनी याच किल्ल्यावर मुर्तूजा निजामशाह याचा राज्याभिषेक करुन या नामधारी निजामशाहच्या आडून स्वराज्य स्थापनेच्यादृष्टीने जमवाजमव करुन स्वराज्य स्थापनेची मुहूर्तमेढ रोवली.

### ३.१९.२. जीवधन किल्ला (अकोले)–

हा किल्ला अतिशय जुना म्हणजे सुमारे २००० वर्षापूर्वी बांधलेला असावा. या किल्ल्यावरील गजशिल्प पाहण्यासारखे आहे. एवढया उंचीवर असलेले पाण्याच्या टाक्या प्रेक्षणीय आहे. हा किल्ला ३७५४ फूट उंचीवर आहे.

### ३.१९.३. ऐतिहासिक भुईकोट किल्ला (नगर) –

जुन्या बसस्थानकापासून २५० मी. अंतरावर भिंगारकडे जाणाऱ्या रस्त्यालगत ही जुनी वास्तू पहायला मिळते. १४९० मध्ये सुरुवातीला मातीचे तटाने येथे बांधकाम सुरु झाले. १५५९ ते १५६२ याकाळात दगडी तटबंदीचे बांधकाम झाले. सुमारे १ मैलाचा परिघ आणि २२ बुरुज असलेला हा जमिनीवर बांधलेला जुना किल्ला अहमदनगर शहरापूर्वी निर्माण झालेला असल्याने याला इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे.[२७]

अहमदनगर जिल्हयात ऐतिहासिक पर्यटन स्थळे म्हणून पेमगिरी, जीवधन, भुईकोट व पेडगाव हे किल्ले महत्वाचे आहेत.

### ३.१९.४. पेडगाव किल्ला (श्रीगोंदा) –

संभाजी राजांची औरंगजेबाने उंटावरुन धिंड ज्या ठिकाणी काढली ते गाव म्हणजे पेडगाव. हे गाव भिमानदी किनाऱ्यावर असून अनेक ऐतिहासिक अवशेष आज वाडे, भिंती, किल्ल्याच्या रुपाने भग्न अवस्थेत पहायला मिळतात.

### ३.१९.५. खर्डा (जामखेड) –

अहमदनगरपासून ९७ कि. मी. अंतरावर जामखेडपासून २३ कि. मी. अंतरावर खडर्याचा भुईकोट किल्ला रस्त्यालगतच पहायला मिळतो. हा किल्ला उत्तरमुखी, चौकोनी असून तटबंदी व प्रवेशद्वार अद्याप चांगल्या परिस्थितीत आहे. किल्ल्यामध्ये एक बारव व एक मशीद आहे.[२८] हा किल्ला वास्तूशिल्प, तटबंदीच्यादृष्टीने लक्षणीय आहे.

## ३.२० नद्या व धरणे –

### ३.२०.१ नद्या –

गोदावरी व भीमा हया अहमदनगर जिल्हयातील मुख्य नदया आहेत. गोदावरी प्रथम कोपरगाव तालुक्यामधून व नंतर श्रीरामपूर, नेवासे व शेवगाव तालुक्यांच्या उत्तर सीमांवरुन वाहते. प्रवरा ही गोदावरीची महत्वाची उपनदी अकोला तालुक्यात उगम पावते व नेवासे तालुक्यातील प्रवरासंगम येथे गोदावरीस मिळते. या नदीवर भंडारदरा येथे धरण बांधले असून अनेक पाटबंधारे काढलेले आहेत. मुळा, अढळा, म्हाळुंगी या प्रवरा नदीच्या महत्वाच्या उपनदया असून धोरा ही गोदावरीची आणखी एक उपनदी नगर शहराच्या उत्तरेला आहे. जिल्हयाच्या दक्षिणेकडील सर्व भाग भीमेच्या खोऱ्यात येतो. भीमा नगर–पुणे जिल्हयाच्या सरहद्दीवर फक्त ५६ कि.मी. वाहते. परंतु घोड, सीना व कुकडी या तिच्या प्रमुख उपनदयांचे जिल्हयाच्या दक्षिण भागात जाळे आहे.

प्रवरा नदी महाराष्ट्रातील नगर जिल्हयातील अकोला, संगमनेर, श्रीरामपूर, राहुरी, पाचेगाव व नेवासे या तालुक्यातून वाहते. नेवासापर्यंत म्हणजे १७५ कि. मी. ती पूर्ववाहिनी असून नंतर ईशान्येकडे वळून गोदावरीला मिळते. उगमापासून १७७ कि. मी. वर उजव्या बाजूने तिला मुळा मिळते. त्यापूर्वी डावीकडील अढळा व म्हाळुंगी येऊन मिळतात. याठिकाणी भंडारदरा धरण व निळवंडे धरण आहेत.तसेच मुळा नदीच्या प्रवाहात मुळा धरण व कालवे आहेत.[२९]

## ३.२१. जिल्हयाचे हवामान व पर्जन्यमान –

जिल्हयाचे हवामान सर्वसाधारणपणे कोरडे व उत्साहवर्धक आहे. उन्हाळयात सरासरी ३९.५० से. तर हिवाळयात १३.५० से. तापमान असते. जिल्हयात बऱ्याच मोठया प्रदेशात वार्षिक ५०.८ से.मी. ते ६३.५ से.मी. इतका कमी पाऊस पडतो. जिल्हयाच्या पश्चिम सरहद्दीवरील सहयाद्रीवर ५०८ से.मी. पाऊस पडतो. तर फक्त ४५ कि.मी.पूर्वेस वसलेल्या अकोला गावी ५५.९ से.मी. पाऊस पडतो. अकोल्याच्या पूर्वेस तो आणखी कमी होत जातो. यामुळेच जिल्हयात दर तीन किंवा सहा वर्षातून एकदा तरी दुष्काळ येतो. थोडयाफार पावसामुळे पश्चिमेकडील अकोला आणि नदयांच्या व पाटबंधाऱ्यांच्या पाण्यामुळे उत्तरेकडील श्रीरामपूर, राहुरी, नेवासे व शेवगाव हे तालुके मात्र दुष्काळमुक्त आहेत. जिल्हयातील दुष्काळी परिस्थिती नाहीशी करण्याच्यादृष्टीने शासनाने घोड, मुळा व कुकडी हे प्रकल्प हाती घेतले आहेत.[३०]

**तक्ता क्रमांक : ३.५**

**अहमदनगर जिल्हयातील तालुकानिहाय पर्जन्य दिवसांची संख्या व एकुण पर्जन्य**

(पर्जन्य–मि.मी.)

| अ. क्र. | तालुका | सरासरी | | वर्ष २०१५ मधील | | संदर्भ वर्षातील पर्जन्यातील शेकडा वाढ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पर्जन्य दिवसांची संख्या | पर्जन्य | पर्जन्य दिवसांची संख्या | पर्जन्य | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | अकोले | ३८ | ४९४ | ४३ | ८१२ | ८५.८१ |
| २ | संगमनेर | ३० | ३६० | २७ | २८८ | –२०.०० |
| ३ | कोपरगांव | ३५ | ३८३ | २३ | ३९१ | २.०९ |
| ४ | राहाता | २८ | ३८३ | २५ | ३१५ | –१७.७५ |
| ५ | श्रीरामपूर | ३१ | ४१५ | २५ | ३६५ | –१२.०५ |
| ६ | नेवासा | २६ | ४६९ | २९ | ४७४ | १.०७ |
| ७ | शेवगांव | २६ | ५१० | ३१ | ३६६ | –२८.२४ |
| ८ | पाथर्डी | ३१ | ४९० | २८ | ४१४ | –१५.५१ |
| ९ | नगर | २६ | ४६० | २९ | ४१२ | –१०.४३ |
| १० | राहुरी | २० | ४१९ | २७ | २९० | –३०.७९ |
| ११ | पारनेर | २४ | ४०९ | २६ | ४३८ | ७.०९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | श्रीगोंदा | १५ | ३०८ | २५ | २९९ | –२.९२ |
| १३ | कर्जत | १७ | ३५१ | २५ | २७६ | –२१.३७ |
| १४ | जामखेड | २८ | ५६७ | ३० | ३६३ | –३५.९८ |

आधार – जिल्हा कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर

वरील तक्त्यानुसार अहमदनगर जिल्हयाच्या २०१५–१६ च्या पर्जन्यमानानुसार पुढील निष्कर्ष निघतात की,

१. अहमदनगरमधील एकुण तालुक्यांपैकी अकोले तालुक्यामध्ये सर्वात जास्त सरासरी पर्जन्य दिवसांची संख्या ३८ आहे. तर सर्वात कमी सरासरी पर्जन्य दिवसांची संख्या श्रीगोंदा तालुक्यात १५ इतकी आहे.

२. वर्ष २०१५–१६ मधील सर्वात जास्त पर्जन्य असणारा तालुका अकोले(८१२ मि.मी.) व सर्वात कमी पर्जन्य असणारा तालुका कर्जत (२७६ मि.मी.)

३. अकोले तालुक्यात २०१५–१६ या सालात सरासरीच्या तुलनेत ८५.८१ टक्के इतकी शेकडा वाढ झालेली दिसते. ही अहमदनगर जिल्हयातील उच्चत्तम पर्जन्यमान वाढ आहे. त्याखालोखाल पारनेर तालुक्यातील वाढ ७.०९ टक्के असल्याचे दिसते.

४. श्रीगोंदा तालुक्यात –२.९२ टक्के इतकी पर्जन्यमानात घट झालेली आहे. ही जिल्हयातील सर्वात निच्चत्तम घट आहे.[३१]

वरील संदर्भासाठी जिल्हा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांचा आधार घेतला आहे.

## ३.२२. पिकांची रचना व स्वरुप –

बाजरी, भूईमूग व तूर ही जिल्हयातील प्रमुख खरीप पिके होत, तर करडई, गहू व हरभरा ही प्रमुख रब्बी पिके होत. ज्वारी हे जिल्हयातील प्रमुख पीक असून ते दोन्ही हंगामात घेतले जाते.

संगमनेर, पाथर्डी, पारनेर व शेवगाव हे तालुके बाजरीच्या उत्पादनासाठी महत्त्वाचे आहेत. श्रीरामपूर, कोपरगाव, राहाता व राहुरी हे तालुके खरीप ज्वारीच्या उत्पादनासाठी महत्त्वाचे गणले जातात. श्रीगोंदा, पारनेर, कर्जत व अहमदनगर या तालुक्यांत रब्बी ज्वारी मोठया प्रमाणावर घेतली जाते.

गव्हाच्या उत्पादनाच्या दृष्टीनेही अहमदनगर जिल्हा महत्वाचा असून कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, नेवासा, राहुरी व अहमदनगर या तालुक्यामध्ये गव्हाचे उत्पादन मोठया प्रमाणावर घेतले जाते.

भूईमूग व करडई ही जिल्हयातील गळिताची प्रमुख पिके असून या पिकांच्या उत्पादनात आघाडीवर असलेल्या जिल्हयांपैकी अहमदनगर एक गणला जातो. भुईमूगाचे पीक जिल्हयात कमी–अधिक प्रमाणात सर्वत्रच घेतले जाते. पारनेर, श्रीगोंदा व जामखेड हे तालुके करडईच्या उत्पादनासाठी महत्वाचे मानले जातात. अलीकडे सूर्यफुलांच्या उत्पादनाचेही आकर्षण वाढत असून गेल्या दहा–पंधरा वर्षात सूर्यफुलांच्या लागवडीखालील क्षेत्रात जिल्हयात बरीच वाढ झालेली आहे. राज्यातील सूर्यफुलांच्या एकूण उत्पादनापैकी पंधरा टक्क्यांहून अधिक उत्पादन अहमदनगर जिल्हयात होते.

हरभरा व तूर ही जिल्हयात घेतली जाणारी प्रमुख कडधान्ये होत. राहुरी, शेवगाव, पारनेर व अहमदनगर हे तालुके तुरीच्या उत्पादनाच्यादृष्टीने, तर नेवासा, अहमदनगर, राहूरी, शेवगाव व पाथर्डी हे तालुके हरभऱ्याच्या उत्पादनाच्यादृष्टीने महत्वाचे गणले जातात.

ऊसाखालील क्षेत्र व ऊसाचे उत्पादन या दोन्हीही दृष्टींनी अहमदनगर जिल्हा राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा जिल्हा ठरतो. राज्यातील एकूण ऊस–उत्पादनात या जिल्हयाचा वाटा १३ टक्क्यांहून अधिक असून राज्यातील उसाखालील बारा टक्क्यांहून अधिक क्षेत्र या जिल्हयात आहे. राहुरी, श्रीरामपूर, कोपरगाव, राहाता, संगमनेर व शेवगाव हे तालुके ऊस–उत्पादनात अग्रेसर आहेत.

अलीकडील काळात जिल्हयात फलोत्पादनाकडेही लोकांचा कल वाढता आहे. कोपरगाव, राहाता, संगमनेर, पाथर्डी, राहुरी व अहमदनगर या तालुक्यांमध्ये द्राक्षांच्या अनेक बागा असून कोपरगाव तालुका द्राक्ष – उत्पादनात आघाडीवर आहे. अहमदनगर येथे डाळिंबाच्या व श्रीरामपूर येथे मोसंबीच्या बागा आहेत.

जिल्हयात उत्पादित होणाऱ्या शेवंतीच्या फुलांना राज्यात व राज्याबाहेर मोठी मागणी आहे. पारनेर व अहमदनगर हे तालुके शेवंतीच्या फुलांच्या उत्पादनासाठी विशेष प्रसिध्द आहेत.[३२]

## ३.२३. खनिजे –

जिल्हयात महत्वाची खनिजे नाहीत. दगड, माती व मुरुम ही गौण खनिजे जिल्हयात मोठया प्रमाणावर असून त्यांचा बांधकामासाठी उपयोग होतो.[३३]

## ३.२४. वनक्षेत्र व वन उत्पादने–

२००८–०९ या वर्षात वन विभागातर्फे पश्चिम घाट विकास योजना जिल्हास्तर बिगर आदिवासी व आदिवासी योजना, राज्य पुरस्कृत योजनांतर्गत वन विकास, उपयुक्त झाडांची लागवड, मृदा संधारणार्थ वनीकरण, अभयारण्य विकास अशा अनेक योजना राबविण्यात आल्यात. सन २०१५–१६ या वर्षात जिल्हयातील एकुण १७०४० चौ.कि.मी. क्षेत्रापैकी ३८९१.२० चौ.कि.मी. क्षेत्र वनव्याप्त आहे.

### ३.२४.१. सामाजिक वनीकरण कार्यक्रमांतर्गत वृक्षरोपणाचे लक्ष्य व साध्य –

वातावरणाचा समतोल राखण्यासाठी पर्जन्यमान वृष्टीसाठी वनविकास होणे आवश्यक आहे. संतुलित पर्यावरणासाठी ३३ टक्के जमीनीवर वनीकरण असणे आवश्यक आहे. तथापि महाराष्ट्राच्या एकुण भौगोलिक क्षेत्रापैकी वन जमिनीचे प्रमाण हे मुलत : ३३ टक्के नाही. तेव्हा या उद्‌दिष्टाच्या जवळपास वनक्षेत्र वाढविणे ही काळाची गरज लक्षात घेऊन शासन वन विकासाच्या अनेक योजना राबवित आहे. सन २०१५–१६ मध्ये वृक्षरोपणाचे लक्ष्य ३५.६० चौ. कि. मी. व साध्य ३५.६० चौ. कि. मी. इतके होते त्यामध्ये लागवड केलेल्या वृक्षांच्या संख्येचे लक्ष्य २८३४००० व साध्य २८३४००० असे असून जिल्हयाच्या एकुण भौगोलिक क्षेत्राशी ०.२१ टक्के इतके अत्यल्प आहे.

जिल्हयात वन्यजीव व पक्षांसाठीचे अभयारण्य अंतर्गत २.१७ चौ. कि. मी. इतके क्षेत्र आहे. पक्षांसाठीचे अभयारण्य अहमदनगर जिल्हयात असून अभयारण्याचा खर्च पुणे येथील कार्यालयामार्फत होत असल्याने सदरचा खर्च निरंक आहे.

### ३.२४.२. वन उत्पादने–

जिल्हयात वनक्षेत्रापासून इमारती व जळाऊ व चंदन ही प्रमख उत्पादने आणि गवत, सुकलीपाला, कडीपत्ता, तेंदूपाने, हिरडा वगैरे गौण उत्पादने मिळतात. २०१५–१६ या वर्षात सर्व प्रकारच्या वन उत्पादनापासून व परमिट फी, महसूल फी, पास फी इ. माध्यमातून २४७.४८ हजार रुपये उत्पन्न शासनास मिळाले.

**तक्ता क्रमांक : ३.६**

**जिल्हयातील एकुण वनक्षेत्र**

जिल्हा–अहमदनगर संदर्भ वर्ष २०१५–१६

(क्षेत्र चौ. कि. मी.)

| अ. क्र. | विभाग | वनक्षेत्र | | | | जिल्हयाच्या एकुण भौगोलिक क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | राखीव | संरक्षित | अवर्गीकृत | एकुण | |
| १ | वनविभाग | १४९३.३८ | २४.११ | ३८.६६ | १५५६.१५ | ९.१३ |
| २ | महसूल विभाग | ३४०.०९ | ० | ५.२५ | ३४५.३४ | २.०३ |
| ३ | महाराष्ट्र वन विकास महामंडळ | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | वनविभागाच्या अखत्यारित आणलेली खाजगी वने | ० | ० | ० | ० | ० |
| एकुण | | १८३३.४७ | २४.११ | ४३.९१ | १९०१.४९ | ११.२ |

आधार – मुख्य वन सांख्यिकी,महाराष्ट्र राज्य, नागपूर

### ३.२४.३. पर्यावरण –

जिल्हयामध्ये सन २०१५ –१६ मध्ये प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे एकुण ३७४४ कारखान्यांनी नोंद केली असून प्रदूषणाच्या प्रमाणानुसार त्यांचे रेड, ऑरेंज व ग्रीन असे वर्गीकरण करण्यात आले आहे. यामध्ये १०३१ कारखाने रेड, २९० कारखाने ऑरेंज तर २४२३ कारखाने ग्रीन या संवर्गात आहेत.[३४]

यावरुन अहमदनगर जिल्हयात कारखान्यांच्या प्रदुषणाच्या प्रमाणानुसार वर्गीकरण करुन त्यामध्ये रेड झोनपेक्षा ग्रीन झोनमधील कारखान्यांची संख्या अडीच पट आहे. यावरुन पर्यावरण प्रदुषणासंदर्भात सकारात्मक विचार झाला आहे असे दिसते.

## ३.२५. लोकसंख्या –

**तक्ता क्रमांक :३.७**


**अहमदनगर जिल्हयाची लोकसंख्या (लाखात)**

| वर्ष | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | १५.८८ | २०.१७ | २३.५६ | २८.३९ | ३२.३६ | ३६.३० |
| नागरी | १८.७३ | २५.१५ | ३५.१३ | ५३.३४ | ८०.३६ | ९१.२६ |
| एकुण | १७.७५ | २२.६९ | २७.०८ | ३३.७२ | ४०.४० | ४५.४३ |
| दशवार्षिक वृध्दी दर | २५.८८ | २७.७७ | १९.३६ | २४.५४ | १९.८० | १२.४४ |

आधार – जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६, जिल्हा अहमदनगर

**आलेख क्र. ३.१**

**अहमदनगर जिल्हयाची लोकसंख्या (लाखात)**




आधार – तक्ता क्र. ३.७

**भारताची जनगणना १९६१ ते २०११–**

वरील तक्ता क्र ३.४. व आलेख क्र.१ वरुन असा निष्कर्ष निघतो की,

१. १९६१ मध्ये नागरी लोकसंख्येपेक्षा ग्रमीण कमी आहे. हेच चित्र पुढे २०११ सातत्याने दिसून येते. ग्रमीण लोकसंख्येचे प्रमाण कमी असून १९९१ नंतर नागरी लोकसंख्येचे प्रमाण ग्रामीण लोकसंख्येपेक्षा दुप्पट असल्याचे दिसते. तसेच २०११ मध्ये ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण नागरी लोकसंख्येपेक्षा अडीच पट वाढलेले दिसते.

२. १९६१ नंतर २०११ पर्यंतच्या ५ दशकांमध्ये एकुण लोकसंख्येत सातत्यपूर्ण वाढ झालेली दिसून येते आणि १९९१ ते २००१ या दशकात वाढ इतर दशकांच्या तुलनेत जास्त आहे.

३. २००१ मधील वृध्दीदरापेक्षा २०११ चा वृध्दीदर एक तृतीयांश इतका कमी झालेला आहे.[३५]

यावरुन लोकसंख्या वाढीसंदर्भात जिल्हयाचा विचार केला असता लोकसंख्या वाढ नियंत्रित केल्याचे दिसते.


### ३.२५.१. लोकसंख्येची घनता –

२०११ च्या जनगणनेनुसार अहमदनगर जिल्हयातील लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी.मागे २६६ व्यक्ती होती. अहमदनगर जिल्हयातील लोकसंख्याविषयक निवडक आकडेवारीनुसार नागरी क्षेत्रातील लोकसंख्येची घनता १९५६ एवढी म्हणजेच सर्वाधिक आहे. तर ग्रमीणक्षेत्रातील लोकसंख्येची घनता २१९ एवढी आहे.

नागरी क्षेत्रात सर्वाधिक लोकसंख्येची घनता श्रीरामपूर ९८९८ एवढी आहे. तर ग्रामीण क्षेत्रात सर्वाधिक लोकसंख्या घनता राहता येथे ४२७ एवढी आहे. नागरी भागात सर्वात कमी लोकसंख्येची घनता श्रीगोंदा ३६४ एवढी आहे. तर ग्रामीण क्षेत्रात लोकसंख्येची घनता जामखेड या ठिकाणी १४६ एवढी आहे.[३६] यावरुन सर्वात कमी लोकसंख्या घनता जामखेड मध्ये आहे असे दिसते.

### ३.२५.२. अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या –

**आलेख क्र.३.२**




आधार – जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६, जिल्हा अहमदनगर

वरील आलेख क्र ३.२ नुसार अहमदनगर जिल्हयातील तालुकानिहाय अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची टक्केवारी जनगणना २०११ नुसार दिली आहे. अहमदनगर जिल्हयात अनुसूचित जातींची लोकसंख्या एकुण १२.६३ टक्के तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या ८.३३ टक्के असल्याचे दिसते. जिल्हयात सर्वाधिक अनुसूचित जातींची लोकसंख्या म्हणजेच १९.२९ टक्के असणारा तालुका श्रीरामपूर आहे. तर सर्वात कमी अनुसूचित जातींची लोकसंख्या असणारा तालुका अकोले ४.५६ टक्के आहे. अहमदनगर जिल्हयात सर्वाधीक अनुसूचित जमातीची लोकसंख्या अकोले तालुक्यात ४७.८६ टक्के एवढी आहे. तर अनुसूचित जमातीची लोकसंख्या सर्वात कमी जामखेड याठिकाणी १.४३ एवढी आहे. यावरुन अकोले तालुक्यात अनुसूचित जातीचे प्रमाण सर्वात कमी तर जामखेडमध्ये अनुसूचित जमातीचे प्रमाण सर्वात कमी आहे.[३७]

### ३.२५.३. अहमदनगर जिल्हयातील मागासवर्गीय लोकसंख्या–

**तक्ता क्रमांक : ३.८**

**जिल्हयातील मागासवर्गीयांची लोकसंख्या**

जिल्हा – अहमदनगर संदर्भ वर्ष :२०११

| अ. क्र. | बाब/ तालुका | मागासवर्गीय लोकसंख्या | | | | | | मागासवर्गीय लोकसंख्येचे एकुण लोकसंख्येतील प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनुसूचित जाती | | | अनुसूचित जमाती | | | अ.जा.(%) | अ.ज.(%) |
| | | एकुण | पुरुष | स्त्रिया | एकुण | पुरुष | स्त्रिया | | |
| १ | अकोले | १३३२३ | ६७२० | ६६०३ | १३९७३० | ७०३२७ | ६९४०३ | ४.५६ | ४७.८६ |
| २ | संगमनेर | ४०८०६ | २०७४९ | २००५७ | ५१६५२ | २६३१९ | २५३३३ | ८.३६ | १०.५९ |
| ३ | कोपरगांव | ४०३९५ | २०५४० | १९८५५ | ३४३७७ | १७३४४ | १७०३३ | १३.३६ | ११.३७ |
| ४ | राहाता | ५४९१८ | २७८५४ | २७०६४ | २०१३० | १०१६६ | ९९६४ | १७.१४ | ६.२८ |
| ५ | श्रीरामपूर | ५५४६२ | २७७३४ | २७७२८ | १९५५६ | ९७८१ | ९७७५ | १९.२९ | ६.८० |
| ६ | नेवासा | ५२६६१ | २६८६७ | २५७९४ | १८८९४ | ९५०५ | ९३८९ | १४.७२ | ५.२८ |
| ७ | शेवगांव | ३६१६९ | १८२३६ | १७९३३ | ४६८१ | २३७७ | २३०४ | १४.७२ | १.९१ |
| ८ | पाथर्डी | २५५०८ | १३०५७ | १२४५१ | ४११८ | २०९८ | २०२० | ९.८८ | १.६० |
| ९ | नगर | ९७००४ | ४९३५७ | ४७६४७ | १४३९६ | ७३९९ | ६९९७ | १४.१८ | २.१० |
| १० | राहुरी | ४३६१९ | २२३२० | २१२९९ | ३४०३६ | १७१७७ | १६८५९ | १३.५१ | १०.५४ |
| ११ | पारनेर | १९११६ | ९५९७ | ९५१९ | १७०५४ | ८५५६ | ८४९८ | ६.९७ | ६.२२ |
| १२ | श्रीगोंदा | ४०१९८ | २०६०२ | १९५९६ | १३८७० | ७१७५ | ६६९५ | १२.७२ | ४.३९ |
| १३ | कर्जत | ३३९४७ | १७३४७ | १६६०० | ३४६४ | १७६७ | १६९७ | १४.४० | १.४७ |
| १४ | जामखेड | २०५७२ | १०५४१ | १००३१ | २२७२ | ११७४ | १०९८ | १२.९९ | ८.३३ |

आधार – भारताची जनगणना – २०११

वरील अहमदनगर जिल्हयातील मागासवर्गीय जमातींची लोकसंख्येनुसार अकोले तालुक्यातील अनुसूचित जातीचा एकुण लोकसंख्यांच्या प्रमाणात ४.५६ टक्के इतकी आहे. तर अनुसूचित जमातीची लोकसंख्या तुलनात्मक जास्त ४७.८६ टक्के आहे. तर श्रीरामपूर तालुक्यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या एकुण लोकसंख्येच्या प्रमाणात १९.२९ टक्के आहे. तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या ६.८० टक्के इतकी तुलनात्मक कमी आहे.

सर्व तालुक्यांमध्ये तुलना करता अनुसूचित जातीतील स्त्रियांची लोकसंख्या सर्वाधिक नगर तालुक्यात ४७.६४७ इतकी आहे. तसेच अनुसूचित जमातीतील स्त्रियांची लोकसंख्या अकोले तालुक्यात ६९४०३ इतकी आहे. याउलट सर्वात कमी स्त्रियांची संख्या जामखेड या ठिकाणी १०९८ आहे.[३८]

### ३.२५.४. अहमदनगर जिल्हयातील धर्मानुसार लोकसंख्या –

**तक्ता क्रमांक :३.९**

**धर्मानुसार लोकसंख्या**

जिल्हा–अहमदनगर संदर्भ वर्ष–२०११

| अ. क्र. | धर्म | ग्रामीण | | नागरी | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री |
| १ | बौध्द | ११९१९ | ११३९८ | ५३६७ | ५२१४ | १७२८६ | १६६१२ |
| २ | ख्रिश्चन | ४३४६ | ४५३९ | ६६८७ | ७१९४ | ११०३३ | ११७३३ |
| ३ | हिंदू | १७५५४१९ | १६४३८१२ | ३६५७२९ | ३४२१८३ | २१२११४८ | १९८५९९५ |
| ४ | जैन | ६१८७ | ५९२५ | १३५८९ | १३०१७ | १९७७६ | १८९४२ |
| ५ | मुस्लिम | ८९५०७ | ८६२०१ | ७३९२५ | ७१११० | १६३४३२ | १५७३११ |
| ६ | शीख | ६८६ | ६४३ | २२७० | १८३२ | २९५६ | २४७५ |
| ७ | इतर | ४८४३ | ५११७ | २३५१ | २१४९ | ७१९४ | ७२६६ |
| सर्व धर्म एकुण | | १८७२९०७ | १७५७६३५ | ४६९९१८ | ४४२६९९ | २३४२८२५ | २२००३३४ |

आधार – भारताची जनगणना – २०११

वरील तक्त्यानुसार २०११ साली धर्मानुसार लोकसंख्येची नागरी व ग्रामीण असे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने बौध्द, ख्रिश्चन, हिंदू, जैन, मुस्लिम, शीख व इतर यांचा समावेश केला गेला आहे. आकडेवारीनुसार ग्रामीण भागात हिंदूधर्मीय पुरुष लोकसंख्या १७,५५,४१९ एवढी तर स्त्रीयांची लोकसंख्या १६,४३,८१२ एवढी व सर्वात जास्त

असल्याचे दिसते तर नागरी भागातसुध्दा त्यापेक्षा वेगळी स्थिती नसून हिंदू धर्मीयांची लोकसंख्या पुरुष ३,६५,७२९ व स्त्री ३,४२,१८३ एवढी आहे. सर्व धर्मीयांच्या लोकसंख्येत जास्त आहे. नागरी भागात सर्वात कमी शीख धर्मियांची लोकसंख्या असून नागरी भागातसुध्दा सर्वात कमी स्त्री–पुरुष लोकसंख्या शीख धर्मीयांची आहे.

या माहिती शिवाय अहमदनगर जिल्हयात सर्व धर्मीयांची एकुण लोकसंख्या पुरुष २३४२८२५ तर स्त्री २२०००३३४ एवढी असल्याचे दिसते.

### ३.२५.५. अहमदनगर जिल्हयातील वयोगटानुसार लोकसंख्या – जनगणना २०११

**तक्ता क्रमांक : ३.१०**
**वयोगटानुसार लोकसंख्या**

जिल्हा–अहमदनगर संदर्भ वर्ष–२०११

| अ. क्र. | बाब | ग्रामीण | | नागरी | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री |
| १ | ०–६ | २४३६६५ | २०६८०८ | ५६५७३ | ४८९६८ | ३००२३८ | २५५७७६ |
| २ | ७–१४ | २९६५९१ | २५७५४८ | ७११०९ | ६१२६३ | ३६७७०० | ३१८८११ |
| ३ | १५–१९ | १८६२५० | १५९१४७ | ४६३०० | ४१५०२ | २३२५५० | २००६४९ |
| ४ | २०–२४ | १७९६१४ | १६५५१८ | ४८३१९ | ४६७२३ | २२७९३३ | २१२२४१ |
| ५ | २५–२९ | १५२४७० | १४३६७२ | ४२९२५ | ४१५९५ | १९५३९५ | १८५२६७ |
| ६ | ३०–३४ | १२९१९५ | १२८०२४ | ३६६३० | ३५८३६ | १६५८२५ | १६३८६० |
| ७ | ३५–३९ | १२३५०८ | १२४६९६ | ३३६९६ | ३३९५१ | १५७२०४ | १५८६४७ |
| ८ | ४०–४९ | २१०१०८ | १९९५४५ | ५६८५६ | ५४२०० | २६६९६४ | २५३७४५ |
| ९ | ५०–५९ | १४१८८३ | १३९६६७ | ३८५०६ | ३४१९२ | १८०३८९ | १७३८५९ |
| १० | ६० वर्षावरील | २०२७८९ | २२६८९८ | ३७८३४ | ४३३७० | २४०६२३ | २७०२६८ |
| ११ | वय अनिर्देशित | ६८३४ | ६११२ | ११७० | १०९९ | ८००४ | ७२११ |
| | सर्व वयोगट (एकुण) | १८७२९०७ | १७५७६३५ | ४६९९१८ | ४४२६९९ | २३४२८२५ | २२००३३४ |


आधार – भारताची जनगणना – २०११

वरील तक्त्यानुसार अहमदनगर जिल्हयामध्ये एकुण लोकसंख्येपैकी २०११ व्या जणगणनेनुसार ७–१४ वयोगटाची म्हणजेच न कमवणारी लोकसंख्या पुरुषांची ३,६७,७००

एवढी व स्त्रियांची ३,१८,८११ एवढी आहे. अशी एकुण संख्या ६,८६,५११ एवढी आहे. तर वयोगट ३५–३९ या वयोगटातील म्हणजेच कर्ती व कमवती पुरुष लोकसंख्या १,५७,२०४ व स्त्री लोकसंख्या १,५८,६४७ एवढी आहे. तर एकुण लोकसंख्या ३,१५,८५१ एवढी आहे असे दिसते की कर्ती लोकसंख्येच्या तुलनेत न कमवती लोकसंख्या, कुटुंब प्रमुखावर अवलंबून असलेली लोकसंख्या दुप्पट असल्याचे दिसते. अहमदनगर जिल्हयातील न कमवत्या लोकसंख्येचा आर्थिक भार कमी असणाऱ्या कर्त्या लोकसंख्येवर पडतो. त्यामुळे वैयक्तिक आर्थिक विकास प्रमाण घटलेले दिसते.[३९]

## ३.२६. अहमदनगर जिल्हयातील स्त्री–पुरुष लोकसंख्या(जनगणना १९६१–२०११)

**आलेख क्र.३.३**




आधार – जिल्हा  सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६, जिल्हा अहमदनगर


अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या जिल्हास्तरीय अहमदनगर जिल्हा सांख्यिकी कार्यालयाच्या आकडेवारीनुसार,पृ. क्र. २७ वरील अहमदनगर जिल्हयातील स्त्री–पुरुष लोकसंख्या आलेखावरुन १९६१ च्या जनगणनेनुसार पुरुषांची लोकसंख्या ९,०५,३१३ तर स्त्रीयांची लोकसंख्या ८,७०,६५६ इतकी आहे. १९९१ जनगणनेनुसार पुरुषांची लोकसंख्या १७,३०,६०९ आहे. १९६१ व १९९१ चा तुलनात्मक विचार करता पुरुषांची लोकसंख्या दुप्पट झालेली दिसते. तर १९९१ च्या जनगणनेनुसार १६,४२,३२६ आहे. ही १९६१ ते १९९१ च्या स्त्री संख्येचा तुलनात्मक विचार करता दुप्पट झालेली दिसून

येते.

२०११ सालच्या जनगणनेनुसार पुरुषांची लोकसंख्या २५,४३,८२५ एवढी आहे. १९६१ च्या पुरुष लोकसंख्येच्या तुलनेत ५० वर्षात २०११ ची पुरुष लोकसंख्या अडीचपट वाढली आहे. त्याचबरोबर स्त्रीयांची संख्या २०११ मध्ये २२,००,३३४ एवढी असून ती अडीचपट वाढलेली दिसते. २०११ च्या जनगणनेनुसार पुरुषांची लोकसंख्या स्त्री लोकसंख्येपेक्षा कमी आहे.[४०]

## ३.२७. अहमदनगर जिल्हयातील स्त्री–पुरुषांचे प्रमाण –

**आलेख क्र.३.४**




आधार – जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६, जिल्हा अहमदनगर

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६ मधील ४.१६ च्या आलेखानुसार अहमदनगर जिल्हयातील स्त्री पुरुष प्रमाण १९६१ ते २०११ च्या तक्त्यानुसार १९६१ मध्ये दर हजार पुरुषांच्या प्रमाणात स्त्री संख्या ९६२ आहे. ती ३८ ने कमी आहे. यानंतर १९७१ च्या जनगणनेनुसार स्त्री संख्या ४४ ने कमी झाली आहे. १९८१ नुसार ४९, १९९१ नुसार ५१ ने कमी आहे. २००१ नुसार ६० ने तर २०११ नुसार ६६ ने कमी झालेली दिसते. याचा अर्थ १९६१ पासून दर हजार पुरुषांमागे स्त्री संख्या सातत्याने घटत गेली आहे.[४१] याचा अर्थ अहमदनगर जिल्हयात कौटुंबिकदृष्टया स्त्रीविषयक पारंपारिक दृष्टीकोन दिसतो.

## ३.२८. अहमदनगर जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण – संदर्भ वर्ष २०११

तक्ता क्रमांक : ३.११

| अ. क्र. | तालुका | ग्रामीण/नागरी | एकुण(%) |
|---|---|---|---|
| १ | अकोले | एकुण | ७४.८६ |
| | | ग्रामीण | ७४.३६ |
| | | नागरी | ८८.५८ |
| २ | संगमनेर | एकुण | ७९.९६ |
| | | ग्रामीण | ७७.७० |
| | | नागरी | ९०.१३ |
| ३ | कोपरगाव | एकुण | ७९.८४ |
| | | ग्रामीण | ७८.३८ |
| | | नागरी | ८५.०८ |
| ४ | राहाता | एकुण | ८२.०८ |
| | | ग्रामीण | ८१.६२ |
| | | नागरी | ८४.२१ |
| ५ | श्रीरामपूर | एकुण | ८२.१२ |
| | | ग्रामीण | ८०.३९ |
| | | नागरी | ८५.९० |
| ६ | नेवासा | एकुण | ७८.५१ |
| | | ग्रामीण | ७८.५१ |
| | | नागरी | ०.०० |
| ७ | शेवगाव | एकुण | ७३.९४ |
| | | ग्रामीण | ७३.९४ |
| | | नागरी | ०.०० |
| ८ | पाथर्डी | एकुण | ७४.७४ |
| | | ग्रामीण | ७३.४७ |
| | | नागरी | ८५.३६ |
| ९ | नगर | एकुण | ८६.३५ |
| | | ग्रामीण | ८०.१५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नागरी | ९०.०२ |
| १० | राहुरी | एकुण | ७९.७४ |
| | | ग्रामीण | ७९.१२ |
| | | नागरी | ८१.९७ |
| ११ | पारनेर | एकुण | ७५.६४ |
| | | ग्रामीण | ७५.६४ |
| | | नागरी | ०.०० |
| १२ | श्रीगोंदा | एकुण | ७६.२५ |
| | | ग्रामीण | ७५.६३ |
| | | नागरी | ८१.९० |
| १३ | कर्जत | एकुण | ७४.११ |
| | | ग्रामीण | ७३.४८ |
| | | नागरी | ८६.१४ |
| १४ | जामखेड | एकुण | ७२.६२ |
| | | ग्रामीण | ६९.७७ |
| | | नागरी | ८३.१२ |
| | **एकुण** | **एकुण** | **७९.०५** |
| | | **ग्रामीण** | **७६.८९** |
| | | **नागरी** | **८७.५७** |

आधार : भारताची जनगणना २०११

तक्ता क्र. ३.८ नुसार जिल्हयातील साक्षरता तक्ता २०११ जनगणना लक्षात घेता अहमदनगर जिल्हयातील १४ तालुक्यांपैकी नगर तालुक्यातील एकुण साक्षरता प्रमाण ८६.३५ असून ते सर्वाधिक आहे. याउलट जामखेड तालुक्यातील साक्षरता प्रमाण ७२.६२ एवढे असून ते सर्वात कमी आहे. तसेच संगमनेर, कोपरगांव, राहुरी या तीन तालुक्यांचे साक्षरता प्रमाण ७९.९६, ७९.८४, ७९.७४ असे म्हणजेच थोडया फार फरकाने समान आहे. अहमदनगर जिल्हयाची एकुण साक्षरता ७९.०५ असून ती नगर तालुक्यातील साक्षरतेपेक्षा कमी आहे.

जिल्हयाच्या साक्षरता तक्त्यानुसार अनुसूचित जातीची टक्केवारी ७६.५२ टक्के असून त्यामध्ये पुरुष ८५.३० टक्के व स्त्रिया ६७.५१ टक्के इतकी साक्षरता आहे. अनुसूचित

जातीतील पुरुषांच्या स्त्री साक्षरता प्रमाण १८ टक्के ने कमी तर अनुसूचित जमातीची एकुण साक्षरता प्रमाण ६२.२४ असून पुरुष साक्षरता प्रमाण ७२.४३ आहे तर स्त्री साक्षरता ५१.८८ टक्के आहे. अनुसूचित जमातीतील स्त्रिया साक्षरतेचे प्रमाण पुरुषांपेक्षा २१ टक्के ने कमी आहे.[४२]

वरील आकडेवारीवरुन असे दिसते की, जिल्हयातील अनुसूचित जाती व जमातीतील स्त्री साक्षरतेकडे दुर्लक्ष होत आहे. जमातीतील स्त्री साक्षरता प्रमाण निम्याने म्हणजेच ५०टक्के कमी आहे.

## ३.२९. अहमदनगर जिल्हयातील वर्गीकृत बँकांची संख्या, ठेवी व कर्जे –

**तक्ता क्रमांकः ३.१२**

**तालुकानिहाय बँक कार्यालये, वर्गीकृत बँकांची संख्या,ठेवी व कर्जे**

जिल्हा :– अहमदनगर संदर्भ वर्ष :– २०१५–१६

| अ. क्र. | तालुका | बँकांची कार्यालये असलेली गावे व शहरे | वर्गीकृत बँका (संख्या) | वर्गीकृत बँकांची शाखा कार्यालये | वर्गीकृत बँकांच्या ठेवी(लाखरुपये) | वर्गीकृत बँकांनी दिलेली कर्ज(लाख रुपये) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | अकोले | २६ | ६ | ३५ | ८००३१ | ५००७८ | ५६५९६ |
| २ | संगमनेर | ३९ | २२ | ७३ | १२८०८५ | ५८८८५ | ५७७७६ |
| ३ | कोपरगांव | ३४ | १३ | ४० | १०५५७६ | ६४८५९ | ६६१५१ |
| ४ | राहाता | ३० | २५ | ५४ | १५५७७२ | ५०८०५ | ५५००९ |
| ५ | श्रीरामपूर | २२ | १६ | ३५ | ८८०६९ | ५९७७१ | ५६८९६ |
| ६ | नेवासा | २९ | ९ | ३४ | ५९६६४ | ४४३४२ | ५०१९६ |
| ७ | शेवगांव | २२ | ६ | २६ | ५३४१३ | ५२६६५ | ५७५४६ |
| ८ | पाथर्डी | २० | ९ | २६ | ८०७४५ | ५२६६२ | ५५२६७ |
| ९ | नगर | ३७ | ३१ | ११० | ७१५०१६ | ८७४७५ | ८३७६८ |
| १० | राहुरी | ३४ | ११ | ४३ | ८०७४५ | ५९७७० | ५८६९८ |
| ११ | पारनेर | ३८ | ८ | ४५ | ५५९१३ | ५१६१२ | ५५१०१ |
| १२ | श्रीगोंदा | ३३ | १३ | ४२ | ८०५६७ | ५८४७७ | ५७९१८ |
| १३ | कर्जत | १७ | ७ | २७ | ५६२७१ | ५८८८० | ५५९८७ |
| १४ | जामखेड | १४ | ७ | २० | ४६६२५ | ५७४२५ | ५८१०५ |
| एकुण | | ३९५ | १८३ | ६१० | १७८६४९२ | ८०७७०६ | ८२५०१४ |

आधार – जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६, जिल्हा अहमदनगर

२०१५–१६ या वर्षात जिल्हयातील ३९५ शहर व गांवात बॅकेची सुविधा उपलब्ध होती. १८३ वर्गीकृत बँकांची ६१० बँक कार्यालये जिल्हयात आहे.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही जिल्हयाची लीड अग्रणी बँक असून या बँकेमार्फत एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत विविध योजनांखाली वितरित करावयाच्या कर्जाचे बँकनिहाय नियोजन केले जाते.

२०१५–१६ या वर्षात भारतीय जीवन विमा निगमच्या ७ शाखा कार्यरत होत्या. या सर्व शाखामार्फत संदर्भ वर्षात ३०३०० लाख रुपयाचे विमे उतरविले गेले.[४३]

## ३.३०. कृषी सहकारी संस्था (२०१५–१६) –

अहमदनगर जिल्हयामध्ये १४ तालुक्यातील कृषी सहकारी संस्थांची एकुण संख्या १३५१ आहे. या संस्थांची एकुण सभासद संख्या १०,३८,६४९ इतकी आहे. यांमधील अत्यल्प खातेदार सभासद २,१७,२९३, अल्प खातेदार ४,३३,८७०, मोठे खातेदार १,८४,२७१ आणि इतर सभासद २,०३,२१५ इतके आहे. या सभासदांसाठी यावर्षात कृषी सहकारी संस्थांनी ५३,६४,२२४ (हजारात) इतके रुपये भाग भांडवल असून त्यापैकी ३५,२३,९३७ हजार इतके राखीव आणि इतर निधी ठेवला असून संस्थेची एकुण कर्जे १,२५,१४,५७७ हजारात इतकी आहेत. अहमदनगर जिल्हयातील नेवासा, शेवगाव, नगर व जामखेड या चार संशोधन अभ्यासासाठी निवडलेल्या निवडलेल्या तालुक्यांची, सहकारी संस्थांची संख्या ३१४ आहे. नेवासा या ठिकाणची कृषी सहकारी संस्थेतील सभासद संख्या १,४९,६५७ तर नगर या ठिकाणची सभासद संख्या ८९,८२८, जामखेड मधील सभासद संख्या ४१,९४५ एवढी आहे. या चार तालुक्यांपैकी जामखेड या चार तालुक्यांपैकी जामखेडमधील सहकारी संस्थांची संख्या व सभासद संख्या तुलनात्मक कमी आहे. तर शेवगाव या तालुक्यातील सभासद संख्या जास्त आहे.

अहमदनगर मध्ये एकुण १४ तालुक्यांपैकी श्रीगोंदा तालुक्यामध्ये सर्वाधिक म्हणजेच १७३ असून त्यांची सभासद संख्या ९७,५९४ आहे. एकुण तालुक्यांपैकी २०१५–१६ सालामध्ये पारनेर तालुक्यात संस्थेने घेतलेले कर्ज सर्वाधिक २१,६०,०५६ हजारात आहे. या संस्थांशिवाय जिल्हयामध्ये राहुरी तालुक्यात एक शेतकरी सेवा संस्था आहे. त्याची सभासद संख्या ८९२ आहे. तसेच अकोले तालुक्यात आदिवासी सहकारी संस्थांची संख्या ३८ आहे.

त्यांची सभासद संख्या ४०,९०५ असून या संस्थांनी १,२७,४६७ हजारात एवढे कर्ज घेतलेले आहे.

अहमदनगर जिल्हयामध्ये २०१५–१६ कृषी सहकारी संस्थांचे १४ तालुक्यातील खेळते भांडवल १,४४,०३,५५१ रुपये आहे. जिल्हयातील कर्जदार सभासदांची संख्या ५,५८,३२९ आहे. त्यांची कर्जाची रक्कम रुपये १,२१,००,७४४ (हजारात) एवढे कर्ज दिले आहे. या संस्थांची एकुण थकबाकी सभासद संख्या २,९०,०३४ एवढी आहे. या सभासदांची थकबाकी रक्कम ९८,३६,४२० (हजारात) आहे. संशोधनसाठी नमुना निवड केलेल्या चार तालुक्यातील कृषी सहकारी संस्थांची माहिती पुढील प्रमाणे.

**तक्ता क्रमांक : ३.१३**

**प्राथमिक कृषी सहकारी संस्थांचे कार्य**

| तालुका | खेळते भाग भांडवल(रुपये) | कर्जदार सभासद संख्या | दिलेले कर्ज(रुपये हजारात) |
|---|---|---|---|
| नेवासा | २२१५९२१ | ३००३५ | १०११०२० |
| शेवगाव | २१३१६७६ | ७३६१८ | २६८९६ |
| नगर | १२२८१७ | ६९३२५ | १८७६९ |
| जामखेड | ७४८२३५ | १८६७४ | ८४५६२५ |

आधार –जिल्हा उपनिबंध कार्यालय, अहमदनगर

वरील ४ तालुक्यांपैकी नेवासा या तालुक्याचे खेळते भांडवल जास्त आहे. तर कर्जदार सभासद संख्या शेवगाव तालुक्यात जास्त आहे. तर तुलनात्मक जामखेड मध्ये कमी आहे. जिल्हयातील अकोले तालुक्यात असणारी आदिवासी सहकारी संस्थांचे एकुण खेळते भागभांडवल १७२८०७ तर कर्जाची रक्कम १६४४२५ एवढी आहे.[४४]

वरीलप्रमाणे सहकारी संस्थांची सद्यस्थिती पाहता सहकारी चळवळीस आपले लक्ष शेती व्यवसायावर केंद्रित करावे लागणार आहे. देशाने लहान मोठया धरण योजना आखून उत्पादन वाढीचा मार्ग खुला केला आहे. आता सहकारी कार्यकर्त्यांवर मोठी जबाबदारी आहे की, त्यांनी आपआपल्या क्षेत्रांमध्ये जास्तीत जास्त कार्य करुन सहकारी चळवळीमार्फत देशाची अन्नधान्य वाढीची समस्या सोडविण्यास मदत होईल.

## ३.३१. वाहतुक व दळणवळण–

मध्य रेल्वेची दौंड लाईन ही एकमेव रेल्वे लाईन आहे. जी जिल्हयातून जाते. ही लांब लाईन १९७ कि.मी. अंतर पार करते. ज्यामध्ये १९ स्टेशन आहेत. त्यापैकी अहमदनगर आणि कोपरगाव हे मुख्य स्टेशन आहेत. या दोन्ही स्टेशनवर मानवी, वाहतुकीव्यतिरिक्त वस्तूंची वाहतुक, प्रामुख्याने साखर व फळे यांची वाहतुक होते. जिल्हयातील भूमार्ग बरेच विकसित आहेत. जवळजवळ सर्व गावे एकमेकांना चांगल्या रस्त्यांनी जोडलेली आहेत. ब्रिटिश बाळात अहमदनगर व कोपरगाव हा मुख्य मार्ग होता. अहमदनगर पुढे नाशिक व कोपरगावला जोडलेले आहे. अहमदनगर ते औरंगाबाद मार्ग व्यस्त आहे. कारण तो पुणे व पुढे जाऊन मुंबईला जोडला आहे. अहमदनगर ते सोलापूर व्यतिरिक्त अहमदनगर ते सातारा ते कल्याण हे जास्त चांगले मार्ग आहेत. स्वातंत्र्यानंतरचा काळ हा खरा विकासाचा काळ होता. १९७५ नंतर औद्योगिक विकासाबरोबरच महाराष्ट्रातील मार्गांवर विशेष लक्ष देण्यात आले. जिल्हयात नाशिक–पुणे हा एकमेव राष्ट्रीय महामार्ग आहे. त्याची लांबी ५८ कि.मी. आहे. हा मार्ग जिल्हयाच्या पश्चिम भागातून जातो.[४५]

## ३.३२. उदयोग व व्यापार–

[I] “अहमदनगर हा औद्योगिक जिल्हा नाही तर तो प्रामुख्याने कृषीप्रधान जिल्हा आहे. हे क्षेत्र दुष्काळ व जलसिंचनाच्या अपुऱ्या सोयी सुविधांसाठी प्रसिध्द आहे म्हणून प्रमुख प्रयत्न शेतीला दिशा देण्यासाठी केले जातात. जरी शेजारील जिल्हे पुणे आणि नाशिक हे औद्योगिक पैलूसाठी विकसित आहेत. अहमदनगर हे मागास राहिले”.[४६]

वरील संदर्भावरुन अहमदनगर जिल्हा कृषीप्रधान असून तो पुणे व नाशिक या जिल्हयांच्या तुलनेत मागासलेला असल्याचे स्पष्ट होते.

---

[1] (Ahmednagar is not an industrial district. It is basically an agricultural district. The area was famous for famines & acute shortage of water due to lack of irrigation facilities. Hence, major attempts were made in the direction of agriculture & when neighbouring district like Pune & Nasik were developing in the industrial aspects. Ahmadnagar remained backward.)

### ३.३२.१. उदयोग –

अहमदनगर जिल्हयात संदर्भ वर्षात १०६६ नोंदणीकृत कारखाने कार्यान्वित असून त्यातील कामगारांची संख्या ३१२८४ आहे.

### ३.३२.२. जिल्हा उदयोग केंद्र –

ग्रामीण व कुटीर उदयोगांच्या विविध योजना राबविण्यासाठी तसेच उदयोजकांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हयात मे १९७८ मध्ये जिल्हा उदयोग केंद्र स्थापन करण्यात आले. लघुउदयोग घटकांची नोंदणी, लघु उद्योगांना प्राथमिक सुविधा, कच्चा माल उपलब्ध करुन देणे. सहकारी औद्योगिक वसाहतींना अर्थसहाय्य करणे, नवीन उदयोगांना प्रशिक्षण व मार्गदर्शन करणे,उदयोजकांना योग्य बाजारपेठ मिळविण्यासाठी मदत करणे अशा प्रकारच्या विविध योजना उदयोग केंद्रामार्फत राबविल्या जातात. उदयोजक व शासन यात केंद्रामार्फत समन्वय साधला जातो.

### ३.३२.३. रोजगार व स्वयंरोजगार –

रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयामार्फत दरवर्षी रोजगार मेळावे भरविण्यात येतात व त्यामार्फत खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात उपलब्ध असलेल्या नोकऱ्या पात्र उमेदवारांना मिळण्यासाठी प्रयत्न केले जातात. सन २०१५–१६ वर्षात रोजगार व स्वयंरोजगार योजनेअंतर्गत लाभ प्राप्त झालेल्या उमेदवारांची संख्या ४२९१ इतकी आहे.[४७]

यावरुन पुणे व नाशिक जिल्हयांच्या तुलनेत अहमदनगर मागास राहिला असला तरी उदयोजक व शासन यामध्ये समन्वय साधून शासनामार्फत औदयोगिक विकासासाठी प्रयत्न केले जात असल्याचे दिसते. स्वयंरोजगारासाठी पात्र उमेदवारांना न्याय मिळण्यासाठी विशेष धडपड केली जात असल्याचे स्पष्ट होते.

### ३.३२.४. अहमदनगर जिल्हयातील साखर कारखाने –

भारतात प्रामुख्याने ग्रामीण भागात ऊस कारखानदारीने महत्वपूर्ण कामगिरी केली आहे. कारखानदारीने महत्वपूर्ण कामगिरी केली आहे. भारत हा साखर उत्पादनात जगातील चौथ्या क्रमांकाचा देश आहे. पहिल्या तीन मोठया देशात रशिया, ब्राझील व क्युबा हे जगातील सर्वात जास्त साखर उत्पादन करणारे देश आहेत. साखर कारखानदारीमुळे अल्कोहोल, वीजनिर्मीती, कागद, ॲसिड,पशुखाद्य,मिठाई,इथेनॉल इ. मुळे ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होते.

संतांची भूमी म्हणून ओळखला जाणारा अहमदनगर जिल्हा पश्चिम महाराष्ट्राच्या मध्यभागी वसलेला आहे. महाराष्ट्रात क्षेत्रफळाच्यादृष्टीने प्रथम क्रमांकावर असलेल्या जिल्हयामध्ये साखर उदयोग प्रगती पथावर आहे. महाराष्ट्र राज्याच्या निम्म्याहून अधिक साखरेचे उत्पादन एकटया अहमदनगर जिल्हयात केले जाते. अहमदनगर जिल्हयातील साखर कारखान्यातील एकुण साखर कारखान्यांची संख्या २०१५–१६ मध्ये २२ एवढी आहे.[४८]

**तक्ता क्रमांक:३.१४**

**जिल्हयातील साखर कारखाने विषयक माहिती**

जिल्हा अहमदनगर — संदर्भ वर्ष– २०१५–१६

| अ.क्र. | तालुका | साखर कारखान्याचे नाव | सहकारी/खाजगी |
|---|---|---|---|
| १ | अकोले | अगस्ती सह. सा. का. लि. अकोले | सहकारी |
| २ | संगमनेर | संगमनेर भाग सह. सा. का. लि. संगमनेर | सहकारी |
| ३ | कोपरगांव | कोपरगांव स. सा. का. लि. कोळपेवाडी | सहकारी |
| ४ | कोपरगांव | संजीवनी स.सा.का.लि.कोपरगांव | सहकारी |
| ५ | राहाता | पद्मश्री विखे सह. सा. का. प्रवरानगर | सहकारी |
| ६ | राहाता | गणेश स. सा. का. लि. गणेशनगर | सहकारी |
| ७ | श्रीरामपूर | अशोक सह. सा. का. लि. अशोकनगर | सहकारी |
| ८ | नेवासा | मुळा स. सा. का. लि. सोनई | सहकारी |
| ९ | नेवासा | ज्ञानेश्वर सह. सा. का. लि. नेवासा | सहकारी |
| १० | शेवगांव | केदारेश्वर सह. सा. का. लि. शेवगांव | सहकारी |
| ११ | पाथर्डी | वृध्देश्वर स.सा.का.लि.तिसगांव | सहकारी |
| १२ | नगर | पियुष सा. का. लि. वाळकी | खाजगी |
| १३ | राहुरी | तनपूरे स. सा. का. लि. राहुरी फॅक्टरी | सहकारी |
| १४ | पारनेर | पारनेर स. सा. का. लि. देवीभोयरे | सहकारी |
| १५ | श्रीगोंदा | स. शि. ना. नागवडे स. सा. का. लि. | सहकारी |
| १६ | श्रीगोंदा | साईकृपा १ स. सा. का. लि. देवदैठण | खाजगी |
| १७ | श्रीगोंदा | कुकडी स. सा. का. पिंपळगांवपिसा | सहकारी |
| १८ | श्रीगोंदा | साईकृपा २ स. सा. का. लि. हिरडगांव | खाजगी |
| १९ | कर्जत | अंबालिका सा. का. राशिन | खाजगी |
| २० | शेवगांव | गंगामाई स. सा. का. शेवगांव | खाजगी |
| २१ | राहुरी | प्रसाद स. सा. का. राहुरी | खाजगी |
| २२ | जामखेड | जय श्रीराम स. सा. का. जामखेड | खाजगी |

आधार– प्रादेशिक सहसंचालक(साखर)अहमदनगर

वरील माहितीबरोबरच सादिक सय्यद यांनी अर्थसंवाद जाने–मार्च २०१६ अंक ४ मध्ये अहमदनगर जिल्हयातील साखर कारखान्यातील एकुण साखर उत्पादनाचा विचार करता सन २०१२–१३ मध्ये एकुण साखरेचे उत्पादन ९५६४८६ मे.टन इतके होते. यात सर्वात जास्त

साखर उत्पादन ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना लि.नेवासा याचे ९८.६२५ मे.टन इतके होते. त्यांचे प्रत्यक्ष गाळप ८,९६,४८७ मे.टन कमी असतानाही साखर उत्पादन प्रथम क्रमांकाचे आहे. त्याचे प्रमाण १०.३१ टक्के होते. त्याखालोखाल संगमनेर सहकारी साखर कारखाना लि.संगमनेर यांचेही प्रत्यक्ष गाळप ७,९२,०४७ मे.टन कमी असतानाही साखर उत्पादन अधिक आहे. त्यांचे साखर उत्पादन ९६५१४ मे.टन होते. त्याचे प्रमाण १०.०९ टक्के होते. तर पद्मश्री विखेपाटील सहकारी साखर कारखाना लि. प्रवरानगर यांचे प्रत्यक्ष गाळप ९३४३०५ मे.टन होते. त्याचे प्रमाण ९.७७ टक्के होते. या तिनही कारखान्यांचे एकुण साखर उत्पादन २,८८,५६९ मे.टन असून ते ३०.१७ टक्के आहे.[४९]

## ३.३३. पशुधन–

अहमदनगर जिल्हा कृषी क्षेत्रावर आधारित असल्याने तेथील पशुधनाची माहिती घेतली आहे. ती माहिती खालीलप्रमाणे.

अहमदनगर जिल्हयातील संकरित विदेशी गाई–बैल संख्या एकुण ८८१९६६ इतकी आहे.४६ त्यापैकी नेवासा, शेवगाव, नगर व जामखेड यामधील संख्या पुढीलप्रमाणे

**तक्ता क्रमांक ३.१५**

**जिल्हयातील एकुण पशुधन (अ)**

| अ.क्र. | तालुका | संकरित/ विदेशी गाई–बैल संख्या |
|---|---|---|
| १ | नेवासा | ७००१८ |
| २ | शेवगाव | २२९८३ |
| ३ | नगर | ५७३०७ |
| ४ | जामखेड | ३३६३५ |

आधार – जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६, जिल्हा अहमदनगर

वरिलपैकी नेवासा तालुक्यामध्ये संकरित गाई–बैल संख्या जास्त असून शेवगाव मध्ये ती कमी आहे. अहमदनगर जिल्हयातील एकुण विदेशी व देशी संकरित गाई–बैलांची संख्या १४२७१८५ इतकी आहे.

**तक्ता क्रमांक ३.१६**

**जिल्हयातील एकुण पशुधन (ब)**

| अ. क्र. | तालुका | विदेशी / संकरित व देशी गाई–बैल संख्या |
|---|---|---|
| १ | नेवासा | ११२७१० |
| २ | शेवगाव | ८१७०२ |
| ३ | नगर | ९७०६८ |
| ४ | जामखेड | ६६४०३ |

आधार – जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६, जिल्हा अहमदनगर

वरिलपैकी नेवासा तालुक्यात विदेशी व देशी संकरित गाई–बैलांची संख्या जास्त व जामखेड मध्ये कमी आहे.

अहमदनगर जिल्हयातील २०१२ च्या १९ व्या पशुगणनेनुसार म्हशी/रेडयांची संख्या २२१३६३ आहे.

**तक्ता क्रमांक ३.१७**

जिल्हयातील एकुण पशुधन (क)

| **अ.क्र.** | **तालुका** | **म्हशी/रेडयांची संख्या** |
|---|---|---|
| १ | नेवासा | २२४३८ |
| २ | शेवगाव | २०१४० |
| ३ | नगर | ३४१४७ |
| ४ | जामखेड | १३७६३ |

आधार – जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६, जिल्हा अहमदनगर

यापैकी नगरमध्ये ही संख्या जास्त असून जामखेड मध्ये ती कमी आढळते. २०१२च्या पशुगणनेवरुन अहमदनगर जिल्हयातील एकुण पशुधन संख्या १६४८५४८ इतकी आहे.[५०] याचा अर्थ कृषिआधारित या जिल्हयामध्ये पशुपालन व्यवसाय बऱ्यापैकी आढळतो.

## ३.३४. दुग्ध व्यवसाय–

अहमदनगर जिल्हयात दुग्ध विकास सहकारी संस्थांची संख्या ९३९ इतकी आहे. त्यापैकी नेवासा ३०, शेवगाव ३३, नगर ४८, जामखेड ३० असून जिल्हयातील १४ तालुक्यापैकी संगमनेर तालुक्यात सर्वाधिक दुग्धविकास सहकारी संस्थांची संख्या २१३ इतकी

आहे. सर्वात कमी नेवासा व जामखेड याठिकाणी ३० आहे. दुग्ध विकास सहकारी संख्या अवसायनात गेल्याने सन २०१४–१५ च्या तुलनेत संदर्भ वर्षात सहकारी दुग्ध संस्थांची संख्या कमी झाली आहे. २०१५–१६ या वर्षभरात अहमदनगर जिल्हयात एकुण दुग्ध संकलन २११५५३ (हजारात) लिटर आहे. हे संकलन संगमनेर तालुक्यात १०६०७२ (हजारात) लिटर आहे आणि कर्जत तालुक्यात सर्वात कमी ६९५ (हजारात) आहे.[५१]

## ३.३५. वीज –

**तक्ता क्रमांक : ३.१८**

**जिल्हयातील विजेचा वापर**

जिल्हा – अहमदनगर संदर्भ –२०१५–१६

| अ. क्र. | तालुका | एकुण विजेचा वापर ००० किलो वॅट तास | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | घरगुती | व्यापारी कामा साठी लघु शक्ती साठी | औद्योगिक | सार्वजनिक दिवाबत्ती | कृषी | इतर | एकुण | विजेचा दरडोई वापर(किलो वॅट तास) |
| १ | अकोले | १५७१० | २७४० | ४३६० | ३५६० | ८१६८० | २४९० | ११०५४० | ३६६.५५ |
| २ | संगमनेर | ४०२४० | १०२९० | १४७४० | ७९४० | १२६४५० | २७६० | २०२४२० | ३९८.५५ |
| ३ | कोपरगांव | २४७६० | ५१७० | ९९६० | १४३० | ५५५१० | १२२० | ९८०५० | ३१०.८६ |
| ४ | राहाता | ४०५६० | २०४९० | ८९१० | २५२० | ७७६६० | २९५० | १५३०९० | ४५८.८६ |
| ५ | श्रीरामपूर | ३०७१० | ६७६० | १००८० | २८६० | ४५९९० | १९९० | ९८३९० | ३२६.५४ |
| ६ | नेवासा | १४६५० | ४६४० | ६२९० | ३२८० | १९०७१० | १२५० | २२०८२० | ५९८.५२ |
| ७ | शेवगांव | ११६८० | २४२० | ३६१० | ५७२० | ८१७९० | ४८० | १०५७०० | ४१७.२२ |
| ८ | पाथर्डी | ९३६० | १७९० | ३२८० | २७४० | ३४३१० | ३०० | ५१७८० | १९३.४९ |
| ९ | नगर | १२६६३० | ३५२४० | ६३५७० | १३८६० | ८२७२० | १०१० | ३२३०३० | ४४३.३० |
| १० | राहुरी | २३८३० | ५११० | ७६६० | १५०० | ५१७२० | १३८० | ९१२०० | २७०.८९ |
| ११ | पारनेर | १७२६० | ४३३० | １１१२० | ३९८० | ११४०५० | २७६० | १५३५०० | ५४३.०१ |
| १२ | श्रीगोंदा | १२९७० | ३१३० | ४२०० | ३५८० | २४४५१० | ५५० | २६८९४० | ८२१.२१ |
| १३ | कर्जत | ८६७० | १६०० | ४१६० | ३८४० | १४३०५० | ८७० | १६२१९० | ६६५.३९ |
| १४ | जामखेड | ११०५० | २२०० | २६४० | २७०० | १२१६० | १३२० | ३२०७० | १९४.१८ |
| | एकुण | ३८८०८० | १०५९१० | १५४५८० | ५९५१० | १३४२३१० | २१३३० | २०७१७२० | ४३७.६१ |

आधार – अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१५–१६

वरिल निर्देशित माहितीनुसार २०१६ अखेर जिल्हयामध्ये विद्युतीकरण झालेली गावांची संख्या १५८१ आहे. तसेच जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६ मधील तक्ता क्र.३.१५ मधील माहितीनुसार एकुण १४ तालुक्यांपैकी नगर तालुक्यामध्ये घरगुती विजेचा वापर सर्वाधिक म्हणजेच १२६६३० (कि. वॅ. तास) केला जातो. औद्योगिक क्षेत्रासाठी विजेचा

सर्वाधिक नगर जिल्हयामध्येच ६३५७० (कि. वॅ. तास) केला जातो. कृषी क्षेत्रासाठी होणारा वीजेचा वापर श्रीगोंदा तालुक्यात २४४५१० (कि. वॅ. तास) इतका होतो. एकुण तालुक्यांपैकी विजेचा दरडोई सर्वाधिक वापर करणारा तालुका श्रीगोंदा असून त्याखालोखाल कर्जत, नेवासा व पारनेर आहेत.

तक्ता क्र. ३.१५ मधील एकुण विजेचा वापर वितरणानुसार जिल्हयामध्ये प्रथम क्रमांकावर कृषिक्षेत्रासाठी विजेचा वापर सर्वाधिक १३४२३१० ( कि. वॅ. तास) आहे. तर सर्वात कमी वीज वापर हा सार्वजनिक दिवाबत्तीसाठी ५९५१० (कि. वॅ. तास) आहे.[५२]

## ३.३६. शिक्षण–

जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन २०१६ मधील संदर्भ वर्ष २०१५–१६ नुसार अहमदनगर जिल्हयातील प्राथमिक शाळांची एकुण संख्या ५०४६ इतकी आहे. तसेच खाजगी अनुदानित प्राथमिक शाळा ७५३ आणि विनाअनुदानित प्राथमिक शाळा ६०० आहेत. प्राथमिक शाळांमध्ये २२ हजार शिक्षक संख्या आहे तर ८,५८,००० विद्यार्थी संख्या आहे. प्रति शिक्षक विद्यार्थी संख्या अहमदनगर जिल्हयाची ४० आहे तर महाराष्ट्राची ३१.१ आहे. यावरुन अहमदनगर जिल्हयात शिक्षणाचे महत्व लोकांना समजलेले दिसते.

माध्यमिक शिक्षण व उच्च माध्यमिक शिक्षण संस्थांची संख्या २०४१ आहे. तर उच्च शिक्षण संस्थांची संख्या ४८ आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यार्थी संख्या ७६३००० आहे. तर उच्च शिक्षण विद्यार्थी संख्या ५७००० आहे. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण संस्था संख्या ३९ असून त्यामधील विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता ३९०० आहे. व्यवसाय पदविका शिक्षण संस्था २९ असून त्यांची विद्यार्थी संख्या १०८७५ आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची संख्या १६ असून त्यांची विद्यार्थी प्रवेश क्षमता ५४१० आहे. विनाअनुदानित औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची संख्या २३ आहे.

जिल्हयातील मागासवर्गीय वसतिगृह संख्या – शासकीय १८, अनुदानित १०७ अशी एकुण १२५ वसतिगृह आहे. या वसतिगृहांमध्ये ६३३३ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे.[५३]

## ३.३७. पाणी पुरवठा–

अहमदनगर जिल्हयातील पिण्याच्या पाण्याच्या सोयी व टंचाई संबंधीच्या २०१५–१६ च्या संदर्भानुसार एकुण १४ तालुक्यापैकी संशोधन नमुना म्हणून निवडलेल्या ४ तालुक्यांमधील माहिती पुढीलप्रमाणे

**तक्ता क्रमांक: ३.१९**

**पिण्याच्या पाण्याच्या सोयी व टंचाई संबंधी केलेल्या उपाययोजना**

जिल्हा – अहमदनगर संदर्भ– २०१५–१६

| अ. क्र. | तालुका | गाव संख्या | वस्ती/वाडया संख्या | एकुण | पाणी टंचाईग्रस्त गावसंख्या | पाणी टंचाईग्रस्त वस्ती/वाडया संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगर | १०६ | ४९२ | ५९८ | ७३ | २३१ |
| २ | शेवगाव | ११२ | ३१८ | ४३० | ५८ | ४६ |
| ३ | नेवासा | १२९ | ३७९ | ५०८ | ५६ | १५० |
| ४ | जामखेड | ८६ | ३५० | ४३६ | ९६ | ९८ |

आधार – कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, अहमदनगर

वरील माहितीनुसार ४ तालुक्यांपैकी पाणी टंचाईग्रस्त तालुका म्हणून जामखेड तालुक्याचा निर्देश करता येतो. तर त्याखालोखाल नगर, शेवगाव, नेवासा असा क्रम लागतो. नगर मध्ये पाणी टंचाईग्रस्त वस्ती/वाडयांची संख्या सर्वाधिक २३१ आहे व सर्वात कमी पाणी टंचाईग्रस्त वस्ती/वाडयांची संख्या शेवगावमध्ये ४६ आहे.

अहमदनगर जिल्हयातील १४ तालुक्यांपैकी सर्वाधिक पाणी टंचाई असणारा तालुका संगमनेर असून या तालुक्यात पाणी टंचाईग्रस्त १३६ गावे व ४२८ वस्ती/वाडया आढळतात. तर राहुरी तालुक्यात पाणी टंचाईग्रस्त ९ गावे व ४५ वस्ती/वाडया अशी सर्वात कमी संख्या आहे.[५४]

## ३.३८. अहमदनगर जिल्हयातील विविध योजना–

### ३.३८.१. गृहनिर्माण–

अहमदनगर जिल्हयातील २०१५–१६ च्या माहितीनुसार शासकीय योजनेअंतर्गत इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळणाऱ्या लाभार्थींची घर संख्या ८३,७१७ इतकी आहे. त्यापैकी अभ्यासासाठी निवडलेल्या नगर तालुक्यामध्ये लाभार्थी घर संख्या ४,८४१, शेवगाव तालुक्या मध्ये ५,६२६, नेवासा तालुक्यामध्ये ८,२१८, जामखेड तालुक्यामध्ये ४,२०५ घर संख्या आहे. तसेच अहमदनगर जिल्हयातील नगर तालुक्यामध्ये दारिद्र्यरेषेखालील घर नसलेली कुटुंब संख्या ५,४५८ इतकी आहे. तर शेवगाव मध्ये ७,३६०, नेवासा १०,००३, जामखेडमध्ये ५,७९७ इतकी आहे.[५५]

यावरुन नेवासा तालुक्यामध्ये घरे नसलेली कुटुंब संख्या सर्वाधिक असल्याचे दिसते. शासकीय दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी घरबांधणीसाठी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत इंदिरा आवास योजना व राजीव गांधी निवास योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना मिळालेली आहे. ती पुढीलप्रमाणे

**तक्ता क्रमांक: ३.२०**

**घरबांधणीसाठी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत ग्रामीण क्षेत्रात दिलेली घरे**

जिल्हा – अहमदनगर संदर्भ वर्ष : २०१५–१६

| अ.क्र. | तालुका | दारिद्र्य रेषेखालील कुटुंब संख्या | इंदिरा आवास योजने अंतर्गत मंजूर घरे |
|---|---|---|---|
| १ | नगर | १२,६९७ | ४,८४१ |
| २ | शेवगाव | ११,०४६ | ५,६२६ |
| ३ | नेवासा | १५,६८८ | ८,२१८ |
| ४ | जामखेड | ८,६३५ | ४,२०५ |

आधार – प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अहमदनगर

वरिल माहितीनुसार ४ तालुक्यांपैकी नेवासा तालुक्यामध्ये घर लाभार्थी संख्या जास्त असून जामखेड तालुक्यामध्ये घर लाभार्थी संख्या कमी आहे.

### ३.३८.२. जिल्हा महिला व बालविकास–

अहमदनगर जिल्हयातील जिल्हा महिला व बालविकास योजनेअंतर्गत त्यातील सेविका व बालकांची संख्या पुढीलप्रमाणे अंगणवाडयांची एकुण संख्या ५,०६६ असून त्यामध्ये कार्यरत असणाऱ्या सेविकांची संख्या ५,००४ इतकी आहे. त्या अंगणवाडीतील बालकांची संख्या ग्रामीण भागात २,९७,४५१ व नागरी भागात १३,३१७ असून एकुण ३,१०,७६८ आहे.

अहमदनगर जिल्हयातील अंगणवाडीतील कुपोषीत बालकांचे प्रमाण नेवासा तालुक्यात १.१८, जामखेड तालुक्यात १.२०, शेवगाव मध्ये १.७, जामखेड मध्ये २.२८ टक्के आहे. यावरुन जामखेडमध्ये कुपोषित बालकांची संख्या ४ तालुक्यात जास्त दिसते. त्याबरोबरच एकात्मिक विकास सेवा योजना अंतर्गत माता व बालसंगोपन योजनेचा लाभ घेणाऱ्या बालकांची संख्या २०१५–१६ मध्ये २९३०२९ व मातांची संख्या ५९५७० आहे.[५६]

## ३.३९. अहमदनगर जिल्हयातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे–

### ३.३९.१. अहमदनगर जिल्हयातील शहरी भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे–

**तक्ता क्र. ३.२१**

**शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे**

जिल्हा – अहमदनगर संदर्भ –दारिद्र्यरेषेची पाहणी २००२–०७

| अ. क्र. | महानगर पालिका व नगरपरिषद | शहरी कुटुंबांची एकुण संख्या | दारिद्र्य रेषेखालील शहरी कुटुंबे | | | | | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची (%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | अल्प संख्यांक | इतर | एकुण | |
| १ | अहमदनगर | ६२८६८ | १७२२ | ८९२ | ४६३ | ३०२० | ६०९७ | ९.७० |
| २ | श्रीरामपूर | १६८७१ | १२३३ | ९७८ | १२०३ | ४४९ | ३८६३ | २२.९० |
| ३ | संगमनेर | १५०२५ | १२२ | २७५ | ४८२ | ६३० | १५०९ | १०.०४ |
| ४ | कोपरगांव | १३१०२ | १२४२ | ९०८ | ० | ९४ | २२४४ | १७.१३ |
| ५ | राहाता | ८७२७ | ४२३ | ३४३ | २५२ | ४३९ | १४५७ | १६.७० |
| ६ | राहुरी | १२३८६ | ४१६ | २०२ | १०९ | २७१ | ९९८ | ८.०६ |
| ७ | देवळाली प्रवरा | ६३९४ | ३८७ | २२७ | १९८ | ४७६ | १२८८ | २०.१४ |
| ८ | पाथर्डी | ४३५६ | १७० | ३ | १४७ | ८९४ | १२१४ | २७.८७ |
| ९ | श्रीगोंदा | ६०३३ | १९० | ५२ | ६२ | ३०८ | ६१२ | १०.१४ |
| १० | शिर्डी | २६१८७ | ५७८ | ३१६ | २१८ | ३४५ | १४५७ | ५.५६ |
| | एकुण | १७१९४९ | ६४८३ | ४१९६ | ३१३४ | ६९२६ | २०७३९ | १२.०६ |

(संदर्भ – दारिद्ररेषेची पाहणी २००२–०७)

अहमदनगर जिल्हयातील शहरी भागातील दारिद्रयरेषेखालील एकुण कुटुंब संख्या १७१९४९ असून त्यापैकी अनुसूचित जाती संख्या ६४८३, अनुसूचित जमाती संख्या ४१९६, अल्पसंख्यांक संख्या ३१३४ तर इतर ६९२६ अशी संख्या आढळते. जिल्हयातील एकुण शहरी भागापैकी दारिद्रय रेषेखालील कुटुंब संख्या सर्वाधिक असणारा पाथर्डी तालुका असून एकुण जिल्हयाच्या २७.८७ इतकी टक्केवारी आहे. तर सर्वात कमी दारिद्रय रेषेखालील कुटुंब संख्या शिर्डी शहरात असून ५.५६ टक्के इतकी आहे.[५७]

### ३.३९.२. अहमदनगर जिल्हयातील ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबे–

**तक्ता क्र. ३.२२**

**ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबे**

जिल्हा – अहमदनगर संदर्भ –दारिद्रयरेषेची पाहणी २००२–०७

| अ. क्र. | तालुका | ग्रामीण कुटुंबांची एकुण संख्या | दारिद्रय रेषेखालील ग्रामीण कुटुंबे | | | | | दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची (%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | अल्प संख्यांक | इतर | एकुण | |
| १ | अकोले | ५१९४९ | १०७० | ७५३३ | ० | ५०७० | १३६७३ | २६.३२ |
| २ | संगमनेर | ७३५८१ | २४१२ | २९२४ | ० | १२४०५ | १७७४१ | २४.११ |
| ३ | कोपरगांव | ४४०७४ | १९४५ | २४८२ | ० | ५६७४ | १०१०१ | २२.९२ |
| ४ | राहाता | ५३०१० | ३२५६ | १५०८ | ० | ७९६३ | १२७२७ | २४.०१ |
| ५ | श्रीरामपूर | ३९९४८ | २८२० | १३७१ | ० | ४८०० | ८९९१ | २२.५१ |
| ६ | नेवासा | ६९९८५ | ३६९७ | १४९७ | ० | १०४९४ | १५६८८ | २२.४२ |
| ७ | शेवगांव | ४४२६६ | २१५४ | ४०१ | ० | ८४९१ | ११०४६ | २४.९५ |
| ८ | पाथर्डी | ४२०९५ | १५६७ | ३०१ | ० | ८७१६ | १०५८४ | २५.१४ |
| ९ | नगर | ५६५५५ | २७५५ | ८३५ | ० | ९१०७ | १२६९७ | २२.४५ |
| १० | राहुरी | ४९०८८ | १९६३ | २२९२ | ० | ६६५४ | १०९०९ | २२.२२ |
| ११ | पारनेर | ५१९७० | १५९८ | १४६४ | ० | ९५६८ | १२६३० | २४.३० |
| १२ | श्रीगोंदा | ५४७३८ | २५७६ | ८७० | ० | ८३४९ | ११७९५ | २१.५५ |
| १३ | कर्जत | ४८३५८ | २५२४ | ४६७ | ० | ९५२८ | १२५१९ | २५.८९ |
| १४ | जामखेड | ३२३५५ | १७८० | १४८ | ० | ६७०७ | ८६३५ | २६.६९ |
| | एकुण | ७११९७२ | ३२११७ | २४०९३ | ० | ११३५२६ | १६९७३६ | २३.८४ |

(संदर्भ – दारिद्ररेषेची पाहणी २००२–०७)

अहमदनगर जिल्हयातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची एकुण संख्या ७११९७२ इतकी आहे. त्यापैकी अनुसूचित जाती संख्या ३२११७, अनुसूचित जमाती संख्या २४०९३ तर इतर ११३५२६ इतकी संख्या आहे. जिल्हयातील एकुण ग्रामीण भागातील सर्वाधिक दारिद्र्यरेषेखालील कुटुंब टक्केवारी जामखेड भागात २६.६९ टक्के आहे. तर सर्वात कमी दारिद्र्यरेषेखालील कुटुंब टक्केवारी श्रीगोंदा भागात २१.५५ आहे.[५८]

## ३.४०. सारांश –

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाचे शास्त्रीय विश्लेषण करण्यासाठीचा संशोधन आराखडा आणि पद्धती यांचा आढावा घेण्यात आला आहे. संशोधनाचा आराखडा, विषयाची निवड, कथन, संशोधन संदर्भ, संशोधनाचे महत्व, उद्दिष्टये, गृहितके, मर्यादा इत्यादिंचा परामर्श घेण्यात आला आहे. तसेच संशोधन पध्दतीत जिल्हा, तालुका, गाव, कुटुंब यांच्या आधारावर नमुना निवड करण्यात आली आहे. तथ्य संकलनाच्या साधनांमध्ये प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा समावेश केला आहे. तथ्याचे विश्लेषण व निर्वचनाचे विवेचन करुन संशोधन विषयाचा अर्थशास्त्रीय सैध्दांतिक आधार म्हणून परंपरागत दृष्टचक्र या संकल्पनेचा संबंध कोल्हाटी जमातीच्या सामाजिक – आर्थिक स्थितीशी जोडण्यात आला आहे. शेवटी प्रकरण मांडणी, सारांश व संदर्भसूची देण्यात आली आहे. हे प्रकरण सामाजिक व शास्त्रीय संशोधनाच्यादृष्टीने महत्वाचे आहे.

प्रस्तुत प्रकरणात संशोधन अभ्यास क्षेत्र म्हणून विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा निवडण्यात आला आहे. त्याकरिता अहमदनगर जिल्हयाच्या सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, राजकीय व भौगोलिक पार्श्वभूमीचा थोडक्यात आढावा घेतला आहे. जिल्हयाच्या इ.स.वी.सनाच्या १४ व्या शतकापासून ते आजपर्यंतच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा उहापोह केला आहे. तसेच जिल्हयाचे भौगोलिक स्थान, क्षेत्रफळ, तालुकानिहाय क्षेत्रफळ, प्राकृतिक रचना,नदया, धरणे, पर्जन्यमान, हवामान, वनक्षेत्र इ. चे विवेचन करण्यात आले आहे. जिल्हयातील ऐतिहासिक पार्श्वभूमीवर जिल्हयाचे सामाजिक व सांस्कृतिक महत्व लक्षात येते. तसेच नगर जिल्हयाचा महाराष्ट्रातील अर्वाचिन वारसा लक्षात येतो. तसेच हा जिल्हा सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक चळवळीचे केंद्रस्थान मानला जातो.

अहमदनगर जिल्हयातील एकुण लोकसंख्या, लोकसंख्येची घनता, मागासवर्गीय लोकसंख्या, स्त्री–पुरुष प्रमाण इ. लोकसंख्याविषयक संकल्पनांचे जनगणना २०११च्या संदर्भानुसार विश्लेषण करण्यात आले आहे. कोल्हाटी जमातीची विशेष जनगणना होत नसल्याने संशोधनास लोकसंख्येच्या अचूक आकडेवारीविषयी मर्यादा येतात. अहमदनगर जिल्हयातील साक्षरता व शिक्षण यांचाही आढावा घेण्यात आला आहे. जिल्हयात २०११ च्या जनगणनेनुसार ७९.०५ टक्के इतके साक्षरता प्रमाण आहे. त्यापैकी एकुण पुरुषांचे साक्षरता प्रमाण एकुण स्त्रियांच्या साक्षरता प्रमाणापेक्षा जास्त असल्याचे आढळते.

अहमदनगर जिल्हयातील पीक रचना व स्वरुप, दुग्धव्यवसाय, पशुधन, याबाबींवरही प्रकाश टाकण्यात आला आहे. जिल्हयातील खूप कमी प्रमाणातील शेती ही कोल्हाटी जमातातील लोकांना रोजगार देण्यात असमर्थ ठरताना दिसते.

आधारभूत संरचना म्हणून वीज, पाणी, शिक्षण, आरोग्य, वाहतुक, दळणवळण याचाही आढावा घेण्यात आला आहे. तसेच जिल्हयाच्या प्रगतीत आधारभूत ठरणारे घटक म्हणून उदयोग व साखर कारखाने यांची प्रगती जाणून घेणे आवश्यक वाटते.

प्रकरणाच्या अंतिम भागात अभ्यास क्षेत्रातील भटक्या विमुक्त जाती व जमातींची नावे व लोकसंख्या यांचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. तसेच नेवासा, शेवगाव, नगर, जामखेड या चार तालुक्यांमधील सर्वेक्षणातील प्रत्यक्ष लोकसंख्येचा निर्देश करण्यात आला आहे. तसेच नेवासा, शेवगाव, नगर, जामखेड या चार तालुक्यांमधील सर्वेक्षणातील प्रत्यक्ष लोकसंख्येचा निर्देश करण्यात आला आहे. तसेच जिल्हयामध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध अनुसूचित जाती व जमातींसाठी असणाऱ्या योजनांचा आढावा घेण्यात आला आहे. कोल्हाटी जमातीसाठी जिल्हयात कोणत्याही विशेष योजना असलेल्या दिसून येत नाहीत.

## संदर्भ ग्रंथ(References) –


१. संदीप चपटे, 'संशोधन स्वरुप आणि पध्दती', सक्षम समीक्षा त्रैमासिक (एप्रिल–मे–जून), शब्दाली प्रकाशन, २०१२, पृ.क्र.३९

२. प्रदीप आगलावे, 'सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे', विदया प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १ जानेवारी २०००, पृ. क्र. १४५

३. तत्रैव, पृ. क्र. २८१

४. Shakuntala Devi, 'Caste System In India', Pointer Publisher, Jaipur (India), F.P.1999 page no. 2.

५. http:// ahmednagar.gov.in/html-docs/GEO-Main.htm

http:// www.glorious india.com/unleashed/place.php?id=4104.

६. बी. डी. कुलकर्णी व एस. व्ही. ढमढेरे, 'अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती', डायमंड प्रकाशन प्र. आ. सप्टेंबर २००७, पृ. क्र. ७४

७. प्रदीप आगलावे, (प्र.आ.जानेवारी २०००),उ.नि.पृ.क्र.२०३

८. दिलीप खैरनार, 'प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी', डायमंड प्रकाशन, प्र.आ. २००९, पुर्नमुद्रण २०११, पृ. क्र. ७३

९. M. L.Thingan " The Economics of Development & Planning", Vrinda publication (p) Ltd., New Delhi, 38th Edition 2005, page no. 31-32.

१०. श्री. म. माटे, अस्पृष्टांचा प्रश्न, लोकसंग्रह छापखाना, पुणे,१९३३ पृ. क्र.१३६

Cited in यशवंत सुमंत व द. दि. पुंडे, 'महाराष्ट्रातील जातीसंस्थेविषयक विचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९८८, पुर्नमुद्रण २००६, पृ. क्र. २२१

११. विनय हार्डीकर व श्री. म. माटे, 'निवडक श्री. म. माटे – खंड २', देशमुख आणि कंपनी पब्लीशर्स, सदाशिव पेठ, पुणे, २५ डिसेंबर, २००७, पृ. क्र. ३५

१२. बाबुराव उपाध्ये, 'ग्रामीण साहित्यातील स्त्री चित्रण', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्र.आ.१५ ऑगस्ट, २००९ पृ. क्र. २०५

१३. तत्रैव, पृ. क्र. २९१

१४. संपादक दिपक चांदणे व अस्मिता चांदणे,'लोकसाहित्यिक अण्णाभाऊ साठे समग्र वाड.मय' (खंड–१), प्रतिमा पब्लिकेशन्स, पुणे प्र. आ. १ ऑगस्ट, २०१२, पृ. क्र. ८०

१५. भास्कर जाधव, अहमदनगर जिल्हयातील सामाजिक चळवळ, संपादक सुमती लांडे, ७० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पैस , मुळा एज्युकेशन सोसायटी, सोनई, ता. नेवासा, अहमदनगर, १९९७, पृ. क्र. २१

१६. http://ahmednagar.gov.in

१७. Bombay Gazetters Department, Governemnt of Maharastra, First Edition 1884, Revised 2003, page no. 41

१८. संपादक- लक्ष्मणशास्त्री जोशी, मराठी विश्वकोश खंड-१(अंक ते आतुर चिकित्सा), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,मुंबई, प्र.आ. १९७६, पृ.क्र. ६८२

१९. तत्रैव, पृ. क्र. ६८१

२०. http:// mr.wikipedia.org/5/866

२१. Census of India 2011 Maharashtra, series 28, District census Handbook, Ahamadnagar, Ad. Set up, page no. 9

२२.http://ahmednagar.nic.in/html_docs/geography_of ahmednagar_distric.htm

२३. सरदार ना. य. मिरीकर, अहमदनगर शहराचा इतिहास, अहमदनगर ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय, अहमदनगर, प्र.आ.१९१६, तृ.आ.२०१६ पृ.क्र.१५

२४. http://ahmednagar.nic.in/html_docs/geography

२५. पांडव पुरी, अंतरंग, अहमदनगर जिल्हा, शब्दगंध प्रकाशन, अहमदनगर, द्वि.आ. २०१४ पृ.क्र.३

२६. तत्रैव, पृ.क्र. ९९

२७. तत्रैव, पृ.क्र. ६७

२८. तत्रैव, पृ.क्र. ९५

२९. संपादक श.म.भालेराव, भारतीय सरिता कोश, डायमंड प्रकाशन, पुणे, प्र.आ.२००७ पृ. क्र. ८७७

३०. मराठी विश्वकोश खंड-१, १९७६, उ.नि.पृ.क्र.६८१

३१. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६ जिल्हा अहमदनगर, पृ. क्र. ८४

३२. तत्रैव पृ. क्र. २९७

३३. मराठी विश्वकोश खंड–१ १९७६,उ.नि. पृ. क्र. ६८१

३४. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६, जिल्हा अहमदनगर, पृ. क्र. १०

३५. तत्रैव, पृ. क्र. ६

३६. तत्रैव, पृ. क्र. २४१

३७. तत्रैव, पृ. क्र. ३३

३८. तत्रैव, पृ. क्र. २४३

३९. तत्रैव, पृ. क्र. २४८

४०. तत्रैव, पृ. क्र. ३०

४१. तत्रैव, पृ. क्र. ३१

४२. तत्रैव, पृ. क्र. १६५–१६६

४३. तत्रैव, पृ. क्र. ५५

४४. तत्रैव, पृ. क्र. ११९

४५. K.K.Sharma, Intellectual's sandharbh Maharashtra (State & District at a Glance) vol-1, Intellectual book bureau, Bhopal, F.P. 2004, p.no.540

४६. I.bid, page no 538

४७. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६, जिल्हा अहमदनगर, पृ.क्र.११

४८. तत्रैव, पृ. क्र. १२२

४९. सादिक बशीर सय्यद, अहमदनगर जिल्हयातील साखर उदयोगाची स्थिती, अर्थसंवाद, जाने–मार्च २०१६, खंड ३९, अंक ४, पृ.क्र. ३५४

५०. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१६, जिल्हा अहमदनगर पृ.क्र. २५२

५१. तत्रैव पृ. क्र. ८६

५२. तत्रैव पृ. क्र. २२

५३. तत्रैव पृ. क्र. २०४–२०५

५४. तत्रैव पृ. क्र. १४६–१४७

५५. तत्रैव पृ. क्र. २०३

५६. तत्रैव पृ. क्र. १९५

५७. तत्रैव पृ. क्र. १९८

५८. तत्रैव पृ. क्र. १९९

## प्रकरण चौथे

## माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थ निर्वचन

| | |
|---|---|
| ४.१ | प्रस्तावना |
| ४.२ | कोल्हाटी जमातीची कौटुंबिक स्थिती |
| ४.३ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची शैक्षणिक स्थिती |
| ४.४ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी कुटुंबामधील मुलांबाबतचा दृष्टीकोन |
| ४.५ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीतील कुटुंबांची वैयक्तिक सामाजिक स्थिती |
| ४.६ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीची धार्मिक व सामाजिक स्थिती |
| ४.७ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची आरोग्यासंबंधी माहिती |
| ४.८ | कोल्हाटी जमातींच्या कुटुंबांची गुन्हेगारीविषयक स्थिती |
| ४.९ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातींच्या कुटुंबांची रोजगारविषयक स्थिती |
| ४.१० | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातींच्या कुटुंबांचे उत्पन्नविषयक स्थिती |
| ४.११ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची कर्जविषयक माहिती |
| ४.१२ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची शेतीविषयक माहिती |
| ४.१३ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची खर्च विषयक स्थिती |
| ४.१४ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची बचतविषयक स्थिती |
| ४.१५ | अभ्यासक्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची स्थलांतरणाची स्थिती |
| ४.१६ | अभ्यासक्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची स्थलांतरणाची कारणे व परिणाम |
| ४.१७ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमात व शासकीय योजनांचा आढावा |
| ४.१८ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची राहणीमानासंबंधी माहिती |
| ४.१९ | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची नागरीकत्वाविषयक माहिती |
| ४.२० | अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या पारंपारीक कलावंतीण स्त्री व्यवसायासंबंधी आर्थिक विश्लेषण |
| ४.२१ | गृहितकृत्याची पडताळणी |
| ४.२२ | अर्थनिर्वचन(Interpretation) |

# प्रकरण चौथे

# माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थ निर्वचन

## ४.१. प्रस्तावना–

प्रस्तुत संशोधन अभ्यासानुसार प्राचीन काळापासून भारतामध्ये जातीव्यवस्थेचे अस्तित्व असल्याचे दिसून येते. या जातीव्यवस्थेतूनच भटक्या विमुक्तांची भटकंती सुरु झाल्याचे दिसते. या जाती–जमाती आजही गावोगावी भटकत आहेत. अशाचप्रकारे कलावंत म्हणून ओळखली जाणारी कोल्हाटी जमात उदरनिर्वाहाचे मार्ग म्हणून आपल्या पारंपारिक व्यवसायाला चिकटून आहे. पर्याय नसल्याने शिक्षणाचा आधार नसल्याने अजूनही समाजातील ४० टक्के लोक पारंपारिक व्यवसायावर अवलंबून असलेले दिसतात. जमातीतील लोक आजही आपले पारंपारिक संस्कृती, धार्मिक आचरण यांचे पालन करताना दिसतात. जे लोक उच्चशिक्षित आहेत त्यांच्या कुटंबात पारंपारिक व्यवसाय आढळत नाही. परंतु जे आजही आधुनिक समाजात वावरत असताना पारंपारिक व्यवसाय करतात अशी कुटुंब रुढी, परंपरा, धार्मिक विधी यांचे पालन करतात. अशा अनेक बाबी अहमदनगर जिल्हयातील नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव तालुक्यातील कोल्हाटी जमातीच्या समाजशास्त्रीय अभ्यास व संशोधनात स्पष्ट झाल्या आहेत.

या प्रकरणासाठीची तथ्ये संकलित करण्याकरिता मुलाखत अनुसूचीचा उपयोग करण्यात आला. मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने प्राप्त झालेल्या नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या तालुक्यातील कोल्हाटी जमातीच्या ४२० कुटुंबियांची कौटुंबिक स्थिती, शैक्षणिक स्थिती, सामाजिक स्थिती, धार्मिक व सांस्कृतिक स्थिती इ. माहितीचे संकलन करुन प्रस्तुत संशोधन व प्रकरणात विश्लेषण व निर्वचन केले आहे. कोल्हाटी जमात ही भटक्या विमुक्तांपैकी असली तरी पूर्वीच्या तुलनेत बरेच कुटुंब स्थिर आढळले. त्यामुळे जमातीच्या निवडलेल्या कुटुंबांची प्रत्यक्ष पाहणी करुन निरिक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला. मुलाखत अनुसूची व निरीक्षण यांच्या आधारे जमातीतील कुटुंबांचा सामाजिक दृष्टीकोन सारणीबध्द करण्यात आला आहे. अहमदनगर जिल्हयातील १३ तालुक्यातील एकुण ५६८ कुटुंबांपैकी कुटुंबे म्हणजेच नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव तालुक्यातील ४२० कुटुंबांच्या सामाजिक स्थितीच्या माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात

आले आहे.

## ४.२. कोल्हाटी जमातीची कौटुंबिक स्थिती–

### ४.२.१ – अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीची तालुकानिहाय कुटुंब संख्या–


**तक्ता क्र.–४.१**

**कोल्हाटी जमातीची तालुका निहाय कुटुंब संख्या**

| तालुका | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| कुटुंबसंख्या | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |
| **एकुण** | (२७.६२) | (२४.७७) | (२४.५२) | (२३.०९) | (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

**आलेख क्र. ४.१**




आधार – तक्ता क्र.–४.१

अहमदनगर जिल्हयातील नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव या चार तालुक्यातील कोल्हाटी जमातीच्या ४२० कुटुंबांची प्रत्यक्ष पहाणी केली असता वरील तक्ता क्र. ४.१ नुसार तालुकानिहाय कुटुंब संख्या नगर तालुक्यामध्ये ११६, नेवासा तालुक्यामध्ये १०४, जामखेड तालुक्यामध्ये १०३ तर शेवगाव तालुक्यामध्ये ९७ एवढी आहे. एकुण ४ तालुक्यांमधील ४२०

कुटुंबांपैकी नगर जिल्हयात सर्वाधिक २७.६२ टक्के, त्याखालोखाल अनुक्रमे नेवासा २४.७७ टक्के, जामखेड २४.५२ टक्के तर सर्वात कमी शेवगाव मध्ये २३.०९ टक्के इतकी आहे. यावरुन नगर हा उच्चतम कुटुंब संख्या असणारा तालुका व शेवगाव हा निच्चतम कुटुंबसंख्या असणारा तालुका. या तालुक्यातील तुलनात्मक टक्केवारीतील फरक ४.५२ टक्के इतका आहे तर नेवासा आणि जामखेड या दोन तालुक्यामधील कुटुंब संख्या तुलनात्मक जवळजवळ सारखीच आहे.

वरिल चारही तालुके अहमदनगर जिल्हयातील जास्तीत जास्त कुटुंब संख्या असणारे तालुके असल्याने कुटुंब संख्येमध्ये फार मोठा फरक दिसत नाही. जास्त मोठा फरक नगर तालुका व शेवगाव तालुक्यातील कुटुंब संख्येत दिसून येतो.

### ४.२.२. अभ्यास क्षेत्रातील तालुकानिहाय लोकसंख्येच्या प्रमाणात कोल्हाटी जमातीची लोकसंख्या –


**तक्ता क्र.–४.२**

**तालुकानिहाय एकुण लोकसंख्येच्या प्रमाणात कोल्हाटी जमातीची लोकसंख्या टक्केवारी**

| अ.क्र | तालुका | एकुण लोकसंख्या | एकुण कोल्हाटी जमातीची एकुण लोकसंख्या | | | एकुण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्री | एकुण | |
| १ | नगर | २५५८६२ (पु.१३२६६१+ स्त्री१२३२०१) | २२७ (४१.८८) | ३१५ (५८.१२) | ५४२ (१००) | (०.२१) |
| २ | नेवासा | ३५७८२९ (पु.१८५००१+ स्त्री १७२८२८) | २३१ (४८.५३) | २४५ (५१.४७) | ४७६ (१००) | (०.१३) |
| ३ | जामखेड | १२४३६३ (पु.६५०७३+ स्त्री ५९२९०) | २५५ (४२.५७) | ३४४ (५७.४३) | ५९९ (१००) | (०.४७) |
| ४ | शेवगांव | २४५७१४ (पु.१२५८३७+ स्त्री ११९८७७) | २१८ (४६.१९) | २५४ (५३.८१) | ४७२ (१००) | (०.१९) |
| | **एकुण** | | **९३१** | **११५८** | **२०८९** | (१००) |

आधार– प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

## आलेख क्र.-४.२




आधार – तक्ता क्र. ४.२

कोल्हाटी जमातीच्या चार तालुक्यांमधील प्रत्यक्ष लोकसंख्येच्या पाहाणीनुसार वरिलप्रमाणे चार तालुक्यातील एकुण कोल्हाटी जमातीची लोकसंख्या २०८९ आहे. त्यापैकी एकुण पुरुष लोकसंख्या ९३१ तर एकुण स्त्री लोकसंख्या ११५८ आहे. यावरुन स्त्री लोकसंख्या जास्त असल्याचे दिसते. नगर तालुक्यामध्ये एकुण कोल्हाटी जमातीची लोकसंख्या ५४२ असून ती तालुक्याच्या ग्रामीण लोकसंख्येशी तुलना करता (०.२१ टक्के) आहे.याचप्रमाणे नेवासा तालुक्याची एकुण कोल्हाटी जमातीची लोकसंख्या ४७६ असून ती तालुक्यातील एकुण ग्रामीण लोकसंख्येच्या (०.१३ टक्के) आहे. जामखेड तालुक्याची कोल्हाटी जमातीची एकुण लोकसंख्या ५९९ असून ती तालुक्याच्या एकुण ग्रामीण लोकसंख्येच्या (०.४७ टक्के) आहे. तर शेवगाव तालुक्यातील एकुण कोल्हाटी जमातीची लोकसंख्या ४७२ असून ती तालुक्यातील एकुण ग्रामीण लोकसंख्येच्या (०.१९ टक्के) इतकी आहे. यावरुन ४ तालुक्यापैकी तालुकानिहाय एकुण लोकसंख्येशी तुलना करता जामखेड तालुक्यामध्ये कोल्हाटी जमातीची लोकसंख्या सर्वाधिक असून इतर तालुक्यांपेक्षा स्त्री लोकसंख्यासुध्दा जामखेड तालुक्यात सर्वाधिक आहे.

त्याचप्रमाणे वरील तक्ता क्र.४.२ मधील प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणीनुसार नगर तालुक्यातील एकुण लोकसंख्येपैकी स्त्री लोकसंख्या (५८.१२ टक्के) ही पुरुष लोकसंख्येपेक्षा (४१.८८

टक्के) जास्त आहे. नेवासा तालुक्यातील एकुण लोकसंख्येपैकी स्त्री लोकसंख्या (५१.४७ टक्के) ही पुरुष लोकसंख्येपेक्षा (४८.५३ टक्के) जास्त आहे. जामखेड तालुक्यातील एकुण लोकसंख्येपैकी स्त्री लोकसंख्या (५७.४३ टक्के) म्हणजेच पुरुष लोकसंख्येच्या (४२.५७ टक्के) जास्त आहे. अशाचप्रकारे शेवगाव तालुक्यामध्येसुध्दा एकुण लोकसंख्येपैकी स्त्री लोकसंख्या (५३.८१ टक्के) म्हणजेच पुन्हा पुरुष लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. यावरुन प्रत्येक तालुक्यामध्ये एकुण लोकसंख्येमध्ये स्त्री लोकसंख्येचा वाटा जास्त असल्याचे दिसते.

### ४.२.३. अभ्यास क्षेत्रातील कुटुंब प्रमुखांचे स्त्री व पुरुष प्रमाण–


**तक्ता क्र.–४.३**

**कुटुंब प्रमुखांचे स्त्री व पुरुष प्रमाण**

| अ. क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुटुंब प्रमुख स्त्री | ५९ (५०.८६) | २१ (२०.१९) | ५६ (५४.३७) | ४३ (४४.३३) | १७९ (४२.६२) |
| २ | कुटुंब प्रमुख पुरुष | ५७ (४९.१४) | ८३ (७९.८१) | ४७ (४५.६३) | ५४ (५५.६७) | २४१ (५७.३८) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

**आलेख क्र.–४.३**




आधार – तक्ता क्र. ४.३

वरील तक्ता क्र. ४.३ मध्ये कोल्हाटी जमातीच्या प्रत्यक्ष पाहणीतून प्राप्त झालेल्या नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या तालुक्यांतील स्त्री कुटुंबप्रमुख व पुरुष कुटुंबप्रमुखांच्या संख्येचा विचार करता नगर मध्ये स्त्री कुटुंबप्रमुख ५९(५०.८६) व पुरुष कुटुंबप्रमुख ५७(४९.१४) आहे. तर नेवासा तालुक्यामध्ये स्त्री कुटुंब संख्या २१(२०.१९) तर पुरुष कुटुंब प्रमुख संख्या ८३(७९.८१) आहे. जामखेड तालुक्यात स्त्री कुटुंबप्रमुख संख्या ५६(५४.३७) व पुरुष कुटुंबप्रमुख संख्या ४७(४५.६३) आहे तर शेवगाव तालुक्यात स्त्री कुटुंबप्रमुखांची संख्या ४३(४४.३३) आणि पुरुष कुटुंबप्रमुखांची संख्या ५४(५५.६७) आहे. यावरुन स्त्री कुटुंबप्रमुख संख्या सर्वाधीक असणारे तालुके नगर, जामखेड त्याखालोखाल शेवगाव व सर्वात कमी नेवासा आहे. तर पुरुष कुटुंबप्रमुख संख्या सर्वाधिक असणारा नेवासा तालुका असून ती संख्या ८३ आहे. त्याखालोखाल नगर ५७, शेवगाव ५४, जामखेडमध्ये ४७ ही सर्वात कमी आहे. चार तालुक्यांतील स्त्री कुटुंबप्रमुख एकुण संख्या १७९ असून त्याची एकुण ४२० कुटुंब संख्येत टक्केवारी (४२.६५ टक्के) इतकी आहे तर पुरुष कुटुंबप्रमुखांची चार तालुक्यातील कुटुंब संख्या २४१ आहे. ती एकुण ४२० कुटुंब संख्येच्या तुलनेत (५७.३८ टक्के) आहे.

वरील तक्त्यानुसार तालुक्यातील एकुण कुटुंब संख्येच्या प्रमाणात स्त्री कुटुंबप्रमुखांची तुलना करता नगर तालुक्यापेक्षा जामखेड तालुक्यातील स्त्री कुटुंबप्रमुखांची संख्यात्मक टक्केवारी जास्त आहे.

### ४.२.४. अभ्यास क्षेत्रातील तालुक्यातील गावनिहाय कोल्हाटी जमातीची कुटुंब संख्या–

**तक्ता क्र.–४.४**

**तालुक्यातील गावनिहाय कोल्हाटी जमातीची कुटुंब संख्या**

| अ. क्र. | तालुका | गावाचे नाव | कुटुंब प्रमुख | | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्री | |
| १ | नगर | निमगाव वाघा | २६ | १६ | ४२ |
| | | केडगाव | १३ | १६ | २९ |
| | | बुरुडगाव रोड | ०९ | १६ | २५ |
| | | सुर्यनगर | ०३ | ०५ | ०८ |
| | | मंगलगेट | ०६ | ०६ | १२ |
| | | एकुण | ५७ | ५९ | ११६ (२७.६२) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | नेवासा | बेल पिंपळगाव | ३० | ०३ | ३३ |
| | | नेवासा फाटा | ०७ | ०१ | ०८ |
| | | घोडेगाव | ०९ | ०१ | १० |
| | | निपाणी निमगांव | ०३ | ०० | ०३ |
| | | कुकाना | ०४ | ०३ | ०७ |
| | | पिंपरी शहाली | ०३ | ०१ | ०४ |
| | | मंगळापूर | ०० | ०१ | ०१ |
| | | आंतरवली | ०४ | ०० | ०४ |
| | | माळी चिंचोरे | ०५ | ०० | ०५ |
| | | गोगलगांव | ०१ | ०० | ०१ |
| | | वडाळा | ०२ | ०३ | ०५ |
| | | गिडेगाव | १३ | ०८ | २१ |
| | | सोनई | ०२ | ०० | ०२ |
| | | एकुण | ८३ | २१ | १०४(२४.७७) |
| ३ | जामखेड | कान्होपात्रानगर | २२ | ३४ | ५६ |
| | | जाधव गल्ली | ०२ | ०४ | ०६ |
| | | खाडेनगर | ०३ | ०८ | ११ |
| | | खांडवी | १७ | ०९ | २६ |
| | | बावी | ०३ | ०१ | ०४ |
| | | एकुण | ४७ | ५६ | १०३(२४.५२) |
| ४. | शेवगांव | बोधेगाव | १६ | ०१ | १७ |
| | | घोटण | ०६ | ०३ | ०९ |
| | | चापडगांव | ०१ | ०० | ०१ |
| | | दहीगांव | ०२ | ०२ | ०४ |
| | | ढोर जळगांव | ०५ | ०० | ०५ |
| | | जोहरापूर | ०२ | ०२ | ०४ |
| | | हातगांव | ०० | ०१ | ०१ |
| | | राक्षी | ०२ | ०२ | ०४ |
| | | भातकुडगांव | ०० | ०१ | ०१ |
| | | कऱ्हेटाकळी | ०३ | ०५ | ०८ |
| | | प्रभूवडगांव | ०१ | ०६ | ०७ |
| | | रावतळकुडगांव | ०३ | ०० | ०३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | खडकामडका | ०२ | ०० | ०२ |
| | | शेवगांव | ११ | २० | ३१ |
| | | एकुण | ५४ | ४३ | ९७ (२३.०९ ) |
| नगर | | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
| (२७.६२) | | (२४.७७) | (२४.५२) | (२३.०९) | (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र.४.४ नुसार नगर जिल्हयातील नगर तालुक्यामध्ये निमगाव वाघा गावात सर्वाधीक ४२ कुटुंब संख्या आहे तर सर्वात कमी सुर्यनगर येथे ८ असून केडगाव, बुरुडगावरोड व सुर्यनगर या ठिकाणी कोल्हाटी जमातीच्या पुरुषकुटुंब प्रमुखापेक्षा स्त्री कुटुंबप्रमुखांची संख्या जास्त आहे. पुढे नेवासा तालुक्यामध्ये सर्वाधीक कोल्हाटी जमातीची कुटुंब संख्या ३३ असून सर्वात कमी गोगलगाव व मंगळापूर याठिकाणी १ आहे. तसेच पुरुष कुटुंबप्रमुख संख्या सर्वाधीक बेल पिंपळगाव याठिकाणी आहे. त्याखालोखाल गिडेगाव या ठिकाणी आहे. तर सर्वात कमी गोगलगाव याठिकाणी पुरुष कुटुंब प्रमुख आहे.

जामखेड तालुक्यात सर्वाधीक कोल्हाटी जमातीची कुटुंब संख्या कान्होपात्रा नगर याठिकाणी ५६ आहे तर सर्वात कमी कोल्हाटी जमातीची कुटुंब संख्या बावी याठिकाणी ४ आहे. या तालुक्यामध्ये सर्वाधीक स्त्री कुटुंब संख्या तुलनात्मक कान्होपात्रानगर याठिकाणी ३४ इतकी आहे. तक्ता क्र. ४.४ नुसार शेवगाव तालुक्यात एकुण कोल्हाटी जमातीची कुटुंब संख्या शेवगाव याठिकाणी ३१ आहे तर सर्वात कमी कोल्हाटी जमातीची कुटुंब संख्या चापडगाव, हातगाव, भातकुडगाव याठिकाणी प्रत्येकी १ आहे. शेवगाव तालुक्यातील बोधेगाव याठिकाणी पुरुष कुटुंबप्रमुखांची संख्या १६ आहे तर शेवगाव तालुक्यातील शेवगाव याठिकाणी स्त्री कुटुंब प्रमुखांची संख्या सर्वाधिक २० आहे.

### ४.२.५. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीची वयोगटानुसार लोकसंख्या–


**तक्ता क्र. ४.५**

**वयोमानानुसार कोल्हाटी जमातीची एकुण लोकसंख्येची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ० ते ५ | ३८ (७.०१) | ३९ (८.१९) | ६२ (१०.३५) | ३१ (६.५७) | १७० (८.१४) |
| २ | ६ ते १४ | ७० (१२.९२) | ६५ (१३.६६) | ८५ (१४.१९) | ६० (१२.७१) | २८० (१३.४०) |
| ३ | १५ ते ६० | ४१४ (७६.३८) | ३४९ (७३.३२) | ४३२ (७२.१२) | ३४७ (७३.५२) | १५४२ (७३.८२) |
| ४ | ६१ च्या पुढे | २० (३.६९) | २३ (४.८३) | २० (३.३४) | ३४ (७.२०) | ९७ (४.६४) |
| | एकुण लोकसंख्या | ५४२ | ४७६ | ५९९ | ४७२ | २०८९ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

**आलेख क्र.–४.४**




आधार – तक्ता क्र. ४.५

वरील तक्ता क्र. ४.५ मध्ये मांडल्याप्रमाणे सदस्य संख्येसंबंधी तथ्य संकलित केली असता त्याची वर्गवारी पुन्हा ० ते ५, ६ ते १४, १५ ते ६०, ६० च्या पुढे अशी करण्यात आली. यामध्ये एकुण चार तालुक्यांमध्ये १५ ते ६० या वयोगटातील लोकसंख्या १५४२ असून ती (७३.८२ टक्के) सर्वाधिक दिसून येते. ही सदस्य संख्या अर्थशास्त्रीय अभ्यासानुसार उत्पादक असते म्हणजेच या वयोगटातील लोकसंख्येला कर्ती लोकसंख्या असे म्हणतात. तसेच ६० च्या पुढे या वयोगटामधील लोकसंख्या सर्वात कमी ९७ (४.६४ टक्के) आढळते. चारही तालुक्यातील एकुण लोकसंख्येच्या प्रमाणात ० ते ५ व ६ ते १४ या वयोगटातील लोकसंख्या टक्केवारी अनुक्रमे (८.१४ टक्के) व (१३.४० टक्के) आहे. चारही तालुक्यांमध्ये ६० च्या पुढे असणारे वृध्द वयोगट प्रमाण नगण्य आहे. कारण बालविवाह, निकृष्ट आहार, कलावंतीन स्त्री–पुरुषांना आर्थिक आधाराचा अभाव,आरोग्य सुविधा आभाव इ. मुळे आर्युमान कमी असल्याचा निष्कर्ष निघतो. त्याचप्रमाणे १५–६० या वयोगटातील चारही तालुक्यांमधील लोकसंख्या प्रमाण जास्त आहे. कारण सद्यस्थितीत पुरुष कुटुंबप्रमुख कष्टाच्या जोरावर तर स्त्री कुटुंबप्रमुख सौंदर्य व शारिरिक श्रम (नृत्य–कला) यांच्या जोरावर आपले आर्युमान अबाधित ठेवू शकतात असे म्हणता येते. ही कर्ती (उत्पादक) लोकसंख्या नगर तालुक्यात सर्वाधिक (७६.३८ टक्के) तर जामखेड तालुक्यामध्ये सर्वात कमी (७२.१२ टक्के) असल्याचे दिसते. ० ते ५ वयोगटाची लोकसंख्या कमी असल्याने गेले १० वर्षात लोकसंख्या वाढ किंवा जननदराचे प्रमाण कमी असून ते आर्थिक विकासाचे लक्षण(निर्देशक) आहे असे वाटते. कारण प्रत्यक्ष पाहणीनुसार ० ते ५ वयोगट लोकसंख्या कमी असण्यासाठी रोगराई व बालमृत्यू प्रमाण विशेष कारणे ठरत नाहीत.

### ४.२.६. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीची कुटुंबानुसार धर्मांतरविषयक माहिती–

**तक्ता क्र.–४.६**

**कोल्हाटी जमातीची कुटुंबानुसार धार्मिक विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिंदू | ११६ | १०४ | १०३ | ९७ | १०० |
| २ | मुस्लिम | – | – | – | – | – |
| ३ | ख्रिश्चन | – | – | – | – | – |
| ४ | बौध्द | – | – | – | – | – |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

तक्ता क्र. ४.६ नुसार नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या तालुक्यातील प्रत्यक्ष पाहणीनुसार ४२० कुटुंबांपैकी नगर तालुक्यातील ११६ कुटुंबांपैकी ११६ हिंदू धर्मीय आहेत. नेवासा १०४, जामखेड १०३, शेवगाव ९७ असे अनुक्रमे सर्व तालुक्यांमध्ये हिंदू धर्माचे प्रमाण १०० टक्के आहे. यावरुन मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द या धर्मामध्ये चारही तालुक्यातील कुटुंबांचे धर्मांतर झालेले नाही असे स्पष्ट होते.

### ४.२.७. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या रळयाविषयी(कूळ) माहिती –

**तक्ता क्र.–४.७**

**कोल्हाटी जमातीतील कुटुंबांची रळयानुसार(कूळ) विभागणी**

| अ.क्र. | रळा | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण संख्या | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | चंदनवाले | २२ | ०० | १४ | ०० | ३६ | (८.५७) |
| २ | गांगवेवाले | ८५ | ७४ | ०१ | ०६ | १६६ | (३९.५२) |
| ३ | भोरजेवाले | ०५ | ०८ | ०८ | ६१ | ८२ | (१९.५२) |
| ४ | मुसवादवाले | ०१ | ०९ | ०५ | १३ | २८ | (६.६७) |
| ५ | नैय्येवाले | ०३ | ०८ | ७५ | ०५ | ९१ | (२१.६७) |
| ६ | कच्चरवाले | ०० | ०५ | ०० | १२ | १७ | (४.०५) |
| | **एकुण** | **११६** | **१०४** | **१०३** | **९७** | **४२०** | (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

प्रस्तुत संशोधनामध्ये कोल्हाटी जमातीची १२ रळे आहेत. ४ तालुक्यातील प्रत्यक्ष पाहाणीनुसार १२ रळ्यांपैकी चंदनवाले, गांगवेवाले, भोरजेवाले, मुसवादवाले, नैय्येवाले, कच्चरवाले हे ६ रळे आढळले. तक्ता क्र. ४.७ नुसार ४२० कुटुंबांपैकी, ४ तालुक्यात चंदनवाले ३६ कुटुंब संख्या आहे. गांगवेवाले १६६, भोरजेवाले ८२, मुसवादवाले २८, नैय्येवाले ९१, कच्चरवाले १७ इतकी कुटुंबसंख्या रळयानुसार आढळली. यावरुन एकुण ४ तालुक्यात सर्वाधीक रळा असणारी कुटुंब संख्या १६६ गांगवेवाले आहे. याची एकुण ४२० कुटुंब संख्येच्या तुलनेत टक्केवारी (३९.५२ टक्के) इतकी आहे. त्याखालोखाल नैय्येवाले (२१.६७ टक्के), भोरजेवाले (१९.५२ टक्के), चंदनवाले (८.५७ टक्के), मुसवादवाले (६.६७ टक्के),तर सर्वात कमी कच्चरवाले (४.५ टक्के) इतकी आहे. त्याचप्रमाणे निवडलेल्या नगर,नेवासा, जामखेड व

शेवगाव या तालुक्यांमधील नगर व नेवासा याठिकाणी गांगवेवाले रळयाची कुटंब संख्या जास्त आहे. तर जामखेड तालुक्यामध्ये नैय्येवाले रळयाची कुटुंब संख्या जास्त आहे. शेवगाव तालुक्यामध्ये भोरजेवाले रळयाची कुटुंब संख्या जास्त आहे. रळयानुसार विभागणीमध्ये चारही तालुक्यात विविधता दिसून येते.

### ४.२.८. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची विवाह विषयक माहिती–


**तक्ता क्र.–४.८**

**विवाहित व अविवाहित कुटुंब प्रमुख विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विवाहीत | ५८ (५०.००) | ८७ (८३.६६) | ४६ (४४.६६) | ५५ (५६.७०) | २४६ (५८.५७) |
| २ | अविवाहीत | ५८ (५०.००) | १७ (१६.३४) | ५७ (५५.३४) | ४२ (४३.३०) | १७४ (४१.४३) |
| | एकुण | ११६ (१००.००) | १०४ (१००.००) | १०३ (१००.००) | ९७ (१००.००) | ४२० (१००.००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

**आलेख क्र. ४.५**




आधार – तक्ता क्र. ४.८

तक्ता क्र. ४.८ नुसार अहमदनगर जिल्हयातील ४ तालुक्यातील कोल्हाटी जमातीच्या ४२० कुटुंबांपैकी विवाहित व अविवाहित कुटुंबप्रमुखांच्या विभागणीनुसार सर्वाधिक विवाहित कुटुंबप्रमुखांची संख्या नेवासा तालुक्यात ८७ आहे तर सर्वाधिक अविवाहित कुटुंबप्रमुखांची संख्या जामखेड या तालुक्यात ५७ इतकी आहे. तर सर्वात कमी विवाहित कुटुंबप्रमुखांची संख्या जामखेड या तालुक्यात ४६ आहे तर सर्वात कमी अविवाहित कुटुंबप्रमुखांची संख्या १७ आहे. तसेच नगर तालुक्यातील विवाहित व अविवाहित कुटुंबप्रमुखांची संख्या ५८ व ५८ सारखी आहे.

तसेच नेवासा तालुक्यातील विवाहित कुटुंब संख्येची टक्केवारी (८३.६६टक्के) आहे म्हणजेच येथे पारंपारिक व्यवसायाला प्राधान्य न देता विवाह करुन आधुनिक विचारांचा पुरस्कार केल्याचा निष्कर्ष निघतो. याउलट जामखेड तालुक्याची वैवाहित स्थिती पाहता विवाहित कुटुंबांची टक्केवारी (४४.६६ टक्के) तर अविवाहित कुटुंबांची टक्केवारी (५५.३४ टक्के) म्हणजे जास्त असल्याने याठिकाणी विवाह न करता पारंपारिक व्यवसायाला जास्त महत्व दिले जाते असा निष्कर्ष निघतो. शेवगाव तालुक्यामध्येसुध्दा नेवासा तालुक्याप्रमाणेच विवाहित कुटुंब संख्या (५६.७० टक्के), अविवाहित (४९.३० टक्के) कुटुंबांपेक्षा जास्त आहे. तर नगर तालुक्यात दोन्हीचे प्रमाण समान म्हणजेच (५०%) आहे.

### ४.२.९. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंब पध्दतीविषयी माहिती–


**तक्ता क्र.–४.९**

**कुटुंब पध्दतीनुसार कोल्हाटी जमातीची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | संयुक्त | ३४ (२९.३१) | ३७ (३५.५८) | ५१ (४९.५१) | २३ (२३.७२) | १४५ (३४.५२) |
| २ | विभक्त | ८२ (७०.६९ | ६७ (६४.४२) | ५२ (५०.४९) | ७४ (७६.२८) | २७५ (६५.४८) |
| | एकुण | ११६ (१००.००) | १०४ (१००.००) | १०३ (१००.००) | ९७ (१००.००) | ४२० (१००.००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

**आलेख क्र. ४.६**




आधार – तक्ता क्र. ४.९

तक्ता क्र.४.९ नुसार अहमदनगर जिल्हयातील चार तालुक्यातील ४२० कुटुंबातील प्रत्यक्ष पहाणीवरुन कुटुंब पध्दतीनुसार कोल्हाटी जमातीच्या कुटुंब संख्या विभागणी नगर तालुक्यातील ११६ कुटुंबांपैकी संयुक्त ३४ व विभक्त ८२ असल्याचे दिसते. नेवासा तालुक्यातील १०४ कुटुंबांपैकी संयुक्त ३७ व विभक्त ६७, जामखेड तालुक्यातील १०३ कुटुंबांपैकी संयुक्त ५१ व विभक्त ५२, शेवगाव तालुक्यातील एकुण ९७ कुटुंबांपैकी संयुक्त २३ व विभक्त ७४ अशी संख्या आहे. यावरुन एकुण ४२० कुटुंबांपैकी एकुण संयुक्त कुटुंब १४५ असून ती टक्केवारी ३४.५२ टक्के आणि एकुण विभक्त कुटुंब संख्या २७५ असून ती टक्केवारी (६५.४८ टक्के) आहे. यावरुन कोल्हाटी जमातीतील कुटुंबांचे विभक्त राहण्याचे प्रमाण बदलत्या काळानुसार जास्त आहे.

त्याचप्रमाणे नगर तालुका व शेवगाव तालुका याठिकाणी ते प्रमाण अनुक्रमे (७०.६९ टक्के) व (७६.२८ टक्के) म्हणजेच शेवगावमध्ये विभक्त राहण्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच जामखेड तालुक्यात ४ तालुक्यांपैकी तुलनात्मकरित्या संयुक्त म्हणजेच एकत्रित राहणारी कुटुंब जास्त आढळतात कारण त्याठिकाणी पारंपारिक व्यवसायाचे प्रमाण जास्त असल्याने आई किंवा बहिण पारंपारिक व्यवसायाच्या माध्यमाने संयुक्त कुटुंबातील आई,वडिल, भाऊ, भावजया, बहिणी यांचा सांभाळ करतात असा निष्कर्ष निघतो.

## ४.३. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची शैक्षणिक स्थिती–

अहमदनगर जिल्हयामधील नमुना निवड केलेल्या नगर,नेवासा, जामखेड, शेवगाव या चार तालुक्यांमधील कुटुंबाची कौटुंबिक माहिती अभ्यासल्यानंतर त्यांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास पुढीलप्रमाणे करता येईल.

### ४.३.१. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी कुटुंब प्रमुखांचा शैक्षणिक स्तर –

**तक्ता क्र. ४.१०**

**एकुण कुटुंब प्रमुखांचे शैक्षणिक स्तरानुसार विभागणी**

| निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | उच्च शिक्षित | एकुण कुटुंब संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ९७<br>(२३.०९) | ९५<br>(२२.६३) | १४९<br>(३५.४७) | ३५<br>(८.३४) | ४४<br>(१०.४७) | ४२०<br>(१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

अहमदनगर जिल्हयातील नमुना निवड केलेल्या ४२० कुटुंबातील कुटुंबप्रमुखांची शैक्षणिक स्थितीची नोंद घेतली असता एकुण ४२० कुटुंबप्रमुखांपैकी ९७ कुटुंबप्रमुख निरक्षर असून त्यांचे प्रमाण २३.०९ टक्के आहे. तर सर्वाधिक माध्यमिक शिक्षण ३५.४७ टक्के झालेले दिसते. तर उच्चशिक्षीत असणाऱ्यांची संख्या ४४ असून त्यांचे प्रमाण १०.४७ टक्के आहे. यावरुन एकुण ४२० कुटुंबप्रमुखांपैकी उच्च शिक्षणाच्या तुलनेत निरक्षर कुटुंबप्रमुखांची संख्या जास्त आहे.

### ४.३.२. अभ्यास क्षेत्रातील एकुण लोकसंख्येचा शैक्षणिक स्तर –


**तक्ता क्र.४.११**

**एकुण लोकसंख्येची शैक्षणिक स्तरानुसार विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक | ८७ (१६.०५) | ७३ (१५.३४) | १२४ (२०.७०) | ७१ (१५.०४) | ३५५ (१६.९९) |
| २ | माध्यमिक | २११ (३८.९३) | १८२ (३८.२४) | १८६ (३१.०५) | १४९ (३१.५७) | ७२८ (३४.८५) |
| ३ | उच्च माध्यमिक | ६५ (११.९९) | ६९ (१४.५०) | ५५ (९.१८) | ७० १४.८३) | ३६१ (१२.४०) |
| ४ | उच्चशिक्षीत | ९३ (१७.१६) | ९६ (२०.१७) | ६५ (१०.८५) | १०७ (२२.६७) | ३८६ (१७.२८) |
| ५ | अशिक्षित | ८६ (१५.८७) | ५६ (११.७६) | १६९ (२८.२१) | ७५ (१५.८९) | २०८९ (१८.४८) |
| | एकुण | ५४२ (१००) | ४७६ (१००) | ५९९ (१००) | ४७२ (१००) | २०८९ (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

**आलेख क्र. ४.७**




आधार – तक्ता क्र. ४.११

प्रस्तुत संशोधनासाठी शैक्षणिक स्तर विचारात घेणे अतिशय महत्वाचे आहे. समाज परिवर्तनाला चालना देणाऱ्या घटकांपैकी शिक्षण हा अग्रक्रमावर असणारा घटक आहे. शिक्षणामुळे व्यक्तिच्या मनात नवपरिवर्तन, उमेद, आकांक्षा निर्माण होतात. व्यक्तिला नवीन जीवन शैलीचे आकर्षण वाटू लागते. तिच्यातील विवेकवाढ जागृत होऊन पारंपारिक विचारसरणीची जागा आधुनिकतेशी नाते जोडणारे प्रवाह घेतात.

अहमदनगर जिल्हयातील चार तालुक्यांचा शैक्षणिक दर्जा तक्ता क्र. ४.११ मध्ये दिल्याप्रमाणे एकुण विचार केला असता ४२० कुटुंबांमध्ये माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजेच (३४.८५ टक्के) टक्के आहे. तर त्याखालोखाल अशिक्षित म्हणजे कधीच शाळेत न जाणाऱ्यांचे प्रमाण (१८.४८ टक्के) आहे. यावरुन कोल्हाटी जमातीमध्ये अर्ध्यावर शिक्षण सोडण्याचे प्रमाण जास्त दिसते. तसेच मुला–मुलींना शाळेत जाण्यास प्रवृत्त केले जात नाही. त्यामागे असणारी कारणे बरीच आढळतात परंतु शिक्षणाबद्दलची निरागसता निर्माण होण्यामागे कुठेतरी पारंपारिक व्यवसाय कारणीभूत असल्याचा निष्कर्ष निघतो. तसेच एकुण लोकसंख्येपैकी (१७.२८ टक्के) लोक हे उच्चशिक्षित असून त्यामध्ये विविध पदवीधर, पदव्युत्तर यांचा समावेश होतो. हे प्रमाण तुलनात्मकरित्या बरे असल्याचे वाटते कारण प्राथमिक, उच्च माध्यमिक व अशिक्षितांच्या तुलनेत बऱ्यापैकी लोकांनी आतापर्यंत पदवी प्राप्त करुन पारंपारिक व्यवसायाला विरोध दर्शवून शिक्षणाचा पुरस्कार केल्याचे दिसते म्हणजेच कुठेतरी उदरनिर्वाहासाठी ते पारंपारिक व्यवसाय न निवडता इतर रोजगाराच्या वाटांकडे वळतात व हा आधुनिकतेकडे वाटचालीचा एक निर्देशक आहे.

तालुकानिहाय स्थिती पाहता शेवगाव तालुक्यामध्ये उच्च शिक्षितांचे प्रमाण (२२.६७ टक्के) सर्वाधिक असल्याचे दिसते. त्याखालोखाल नेवासा (२०.१७ टक्के), नगर (१७.१६ टक्के), जामखेड (१०.८५ टक्के) असा क्रम आहे. यावरुन जामखेड तालुक्यात उच्चशिक्षितांचे प्रमाण नगण्य असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे अशिक्षित लोकसंख्येचा विचार करता जामखेड तालुक्यात अशिक्षितांचे प्रमाण सर्वाधिक (२८.२१ टक्के) आहे. तर नेवासा तालुक्यात सर्वात कमी (११.७६ टक्के) आहे. यावरुन पुन्हा असा निष्कर्ष निघतो की जामखेड तालुका शिक्षणाच्या बाबतील बराच मागास राहिलेला असून नेवासा तालुक्यातील शिक्षणाचे प्रमाण विकसित वाटते.

### ४.३.३. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी कुटुंबांची उच्च शिक्षणविषयक माहिती –

**तक्ता क्र.–४.१२**

**उच्च शिक्षणाचे वेगवेगळया स्तरानुसार विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | पदवीधर | ४७ | ३५ | २४ | ३८ |
| २ | पदव्युत्तर | ०७ | १४ | २५ | १५ |
| ३ | एम.बी.बी.एस. | ०१ | ०१ | ०१ | ०२ |
| ४ | डी.फार्मसी | ० | ०२ | ० | ०२ |
| ५ | बी.एस्सी.नर्सिंग | ० | ०३ | ० | ०२ |
| ६ | बी.ई. | १४ | ११ | १० | १० |
| ७ | डी.एड. | १० | ०८ | ०२ | १२ |
| ८ | बी.एड. | ०२ | ०७ | ०२ | ०८ |
| ९ | एलएलबी | ०१ | ०१ | ०२ | ०२ |
| १० | बीएचएमएस | ०१ | ० | ० | ० |
| ११ | आयटीआय | ०७ | १० | ० | ०९ |
| १२ | सेट/नेट | ० | ० | ० | ०१ |
| १३ | एम.फील | ०१ | ० | ० | ० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

तक्ता क्र.४.१२ मध्ये प्रत्यक्ष पाहणीनुसार नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या चार तालुक्यांमध्ये काही निवडक शैक्षणिक स्तरासंबंधी आकडेवारी मांडलेली आहे. या माहितीवरुन तालुक्यांमधील शैक्षणिक प्रगतीचा अंदाज येतो. त्याचबरोबर पारंपारिक व्यवसाय सोडून समाज शिक्षणाचा आधार घेऊन इतर रोजगाराच्या वाटा शोधण्याचा प्रयत्न करत आहे असे दिसते. त्याचप्रमाणे नगर तालुक्यामध्ये १ अेपीआय व १ पीएसआय तसेच शेवगाव तालुक्यामध्ये २ ग्रामसेवक प्रत्यक्ष पाहणीत आढळले. यावरुन जमातीतील बऱ्यापैकी तरुण पिढी दर्जेदार व सन्मानपूर्वक रोजगार मिळविण्यासाठी धडपड करु लागली आहे. हे एक परिवर्तनाचे चिन्ह किंवा संकेत मानता येते.

### ४.३.४. अभ्यास क्षेत्रातील कुटुंबप्रमुखांचे शिक्षणविषयक आस्था/अनास्था –

तक्ता क्र.–४.१३

**कुटुंबप्रमुखांचे शिक्षण सोडण्याचे प्रमाण व टक्केवारी**

| अ. क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण सोडावे लागले असे म्हणणारे | ८७ (७५.००) | ७५ (७२.१२) | ९२ (८९.३२) | ७७ (७९.३८) | ३३१ (७८.८१) |
| २ | शिक्षण सोडावे लागले नाही असे म्हणणारे | २९ (२५.००) | २९ (२७.८८) | ११ (१०.६८) | २० (२०.६२) | ८९ (२१.१९) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.१३ वरुन नगर,नेवासा,जामखेड व शेवगाव तालुक्यातील प्रत्यक्ष पाहणीनुसार एकुण ४२० कुटुंबप्रमुखांपैकी ३३१ कुटुंब प्रमुखांना अर्ध्यावर शिक्षण सोडावे लागले तर ८९ कुटुंबप्रमुखांना शिक्षण सोडावे लागले नाही यावरुन कोल्हाटी जमातीमध्ये अनेक कारणांमुळे शिक्षण निम्म्यात सोडण्याची वेळ येते असा निष्कर्ष निघतो. यामध्ये पुन्हा शिक्षणाबद्दलची समाजातील अनास्था दिसून येते. मुले–मुली शाळेत जातात परंतु काही कारणास्तव त्यांना इतर मार्गांकडे वळावे लागते तर उदरनिर्वाह, कौटुंबिक जबाबदारी यामुळे त्यांना शिक्षणाची कास सोडावी लागते. तालुकानिहाय शिक्षण सोडण्याचे प्रमाण पाहिले असता जामखेड तालुका अग्रस्थानी असून त्याठिकाणी (८९.३२ टक्के) लोकांना शिक्षण अर्धवट सोडावे लागले तर नेवासा तालुका तुलनात्मकदृष्टया कमी प्रमाण म्हणजे (७२.१२ टक्के) शिक्षण सोडणाऱ्यांचे प्रमाण दाखवितो. तसेच जामखेड तालुक्यामध्ये केवळ (१०.६८ टक्के) कुटुंबप्रमुखांनी आपले शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याचा निष्कर्ष निघतो.

### ४.३.५. अभ्यास क्षेत्रातील कुटुंबप्रमुखांचे शिक्षण सोडण्याची कारणे –

**तक्ता क्र.–४.१४**

**शिक्षण सोडण्याच्या कारणानुसार विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर्थिक परिस्थिती | ६३ (७२.४१) | ६२ (८२.६७) | ६८ (७३.९१) | ५८ (७५.३२) |
| २ | मर्जीने | १२ (१३.७९) | ०७ (९.३३) | ०९ (९.७९) | ०५ (६.५०) |
| ३ | आई–वडिलांनी सोडायला लावले | १२ (१३.७९) | ०६ (८) | १५ (१६.३०) | १४ (१८.१८) |
| | एकुण | ८७ (७५) | ७५ (७२.१२) | ९२ (८९.३२) | ७७ (७९.३८) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

वरिल तक्ता क्र. ४.१३ मध्ये शिक्षण सोडण्याचे प्रमाण व टक्केवारी पाहिल्यानंतर तक्ता क्र. ४.१४ मध्ये शिक्षण अर्ध्यावर सोडण्याची कारणे स्पष्ट करण्यात आली आहेत. या कारणांचा अभ्यास करता चारही तालुक्यांमध्ये जास्तीत जास्त कुटुंबप्रमुखांनी आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण सोडल्याचे स्पष्ट होते. नगर तालुक्यामध्ये (७२.४१ टक्के), नेवासा तालुक्यामध्ये (८२.६७ टक्के), जामखेड तालुक्यामध्ये (७३.९१ टक्के) तर शेवगाव मध्ये (७५.३२ टक्के) कुटुंबप्रमुखांचे शिक्षण सोडण्याचे कारण सरासरी ७५ टक्के पेक्षा जास्त आर्थिक परिस्थिती असल्याचे दिसते. तसेच आई–वडिलांनी शिक्षण सोडायला लावण्यामध्ये प्रथम क्रमांक शेवगाव (१८.१८ टक्के) नंतर जामखेड (१६.३० टक्के) तालुक्याचा आहे. नगरमध्ये मर्जीने शिक्षण सोडणाऱ्या कुटुंबप्रमुखांचे प्रमाण सर्वात जास्त (१३.७९ टक्के) आहे. सर्व कारणांचा विचार करता आर्थिक परिस्थिती शिक्षणामध्ये अडथळा निर्माण करत असल्याचा निष्कर्ष निघतो.

### ४.३.६. अभ्यास क्षेत्रातील मुलांचे शाळेत जाण्याचे प्रमाण –

**तक्ता क्र.–४.१५**

**मुले शाळेत जाण्याचे प्रमाण**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुले शाळेत जाणारी कुटुंब संख्या | ९२ (७९.३१) | ९५ (९१.३४) | ८८ (८५.४३) | ८६ (८८.६६) | ३६१ (८५.९५) |
| २ | मुले शाळेत न जाणारी कुटुंब संख्या | २४ (२०.६९) | ०९ (८.६५) | १५ (१४.५६) | ११ (११.३४) | ५९ (१४.०५) |
| | **एकुण** | **११६** | **१०४** | **१०३** | **९७** | **४२०** |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.१५ मध्ये दर्शविल्यानुसार मुलांना शाळेत पाठविण्याचे प्रमाण चारही तालुक्यांमध्ये जास्त म्हणजे (८५.९५ टक्के) आहे तर शाळेत न पाठविणाऱ्यांचे प्रमाण (१४.०५ टक्के) म्हणजेच तुलनात्मकदृष्टया फार कमी आहे. त्याचप्रमाणे तालुकानिहाय शाळेत जाण्याच्या स्थितीचा अभ्यास केला असता नेवासा तालुक्यातील कुटुंबांमध्ये सर्वाधीक (९१.३४ टक्के) मुले शाळेत जातात तर नगर तालुक्यात तुलनात्मकदृष्टया नेवासा तालुक्यापेक्षा कमी मुले शाळेत जातात. परंतु एकुण ४२० कुटुंबांचा विचार केला असता मुलांच्या शाळेत जाण्याच्या प्रमाणावरुन सदयस्थिती शिक्षणाबाबत समाधानकारकता दर्शविते. त्यामुळे भावी पिढी बाबत विकासाचे द्वार खुले होण्याची आशा निर्माण होते. मुलांच्या शिक्षण विषयक व्यापक व हितावह निष्कर्ष निघतो.

## ४.३.७. अभ्यास क्षेत्रातील शिक्षण विषयक समस्या –

### तक्ता क्र.४.१६

### कोल्हाटी जमात म्हणून शाळेत येणाऱ्या समस्यांची विभागणी

| अ. क्र | तपशील | नगर | | नेवासा | | जामखेड | | शेवगाव | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | होय | नाही | होय | नाही | होय | नाही | |
| १ | शाळेत चोर म्हणून चिडविणे | ०३ (२.५९) | ११३ (९७.४१) | ०२ (१.९२) | १०२ (९८.०८) | ०८ (७.७७) | ९५ (९२.२३) | ०४ (४.१२) | ९३ (९५.८८) | ४२० |
| २ | जाती वरुन हिणवणे | १६ (१३.७९ ) | १०० (८६.२१) | ०७ (६.७३ | ९७ (९३.२७ | २७ (२६.२१) | ७६ (७३.७९) | १२ (१२.३७) | ८५ (८७.६३) | ४२० |
| ३ | शिक्षकां कडून भेदभाव | ०५ (४.३१) | १११ (९५.६९) | ०४ (३.८५) | १०० (९६.१५) | २३ (२२.३३) | ८० (७७.६७) | ०७ (७.२२) | ९० (९२.७८) | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कोल्हाटी जमातीचा पारंपारिक व्यवसाय व त्यामधील उदरनिर्वाहासाठीची भटकंती या शिक्षणाच्या मार्गामध्ये अडथळा निर्माण करतात. त्याचप्रमाणे नाचगाणे करणे, स्त्रियांचा विवाह न होणे, विवाहाशिवाय मुले जन्माला येणे, मुलांच्या पुढे बापाचे नाव न लावता आईचे नाव लावणे या समस्या या समाजामध्ये अगदी पूर्वीपासूनच भेडसावत आल्या आहेत. परंतु तक्ता क्र.४.१६ नुसार या समस्यांची विभागणी केली असता आधुनिक काळात शाळेत शिकत असताना नविन पिढीला या समस्यांना कमी प्रमाणात सामोरे जावे लागत आहे असे दिसते. तालुकानिहाय स्थिती पाहता नगरमध्ये शाळेत चोर म्हणून चिडवण्याचे प्रमाण (२.५९ टक्के), जातीवरुन हिणवणे (१३.७९टक्के), शिक्षकांकडून भेदभावाचे प्रमाण ४.३१ आहे. तर नेवासा तालुक्यामध्ये शाळेत चोर म्हणून चिडविण्याचे प्रमाण (१.९२ टक्के), जातीवरुन हिणवणे (६.७३ टक्के), शिक्षकांकडून भेदभाव (३.८५ टक्के), जामखेड तालुक्यामध्ये शाळेत चोर म्हणून चिडविणे (७.७७), जातीवरुन हिणवणे (२६.२१ टक्के), शिक्षकाकडून भेदभाव (२२.३३ टक्के), शेवगाव तालुक्यामध्ये शाळेत चोर म्हणून चिडविणे (४.१२ टक्के),

जातीवरुन हिणविणे (१२.३७टक्के), शिक्षकांकडून भेदभाव (७.२२ टक्के) अशी एकंदरीत शाळेत भेडसावणाऱ्या समस्यांची स्थिती पाहता असे निष्कर्ष निघतात की, चारही तालुक्यामध्ये तुलनात्मकदृष्टया जामखेड तालुक्यामध्ये जातीवरुन हिणविणे व शिक्षकांकडून भेदभाव या समस्यांचे प्रमाण जास्त आहे. इतर परिस्थितींचा विचार करता जामखेड मध्ये पारंपारिक व्यवसाय व मुलाच्या पुढे आईचे नाव लावण्याचे प्रमाण जास्त असल्याने जामखेडमध्ये या समस्या जास्त असल्याचा निष्कर्ष निघतो तसेच नेवासा तालुक्यामध्ये पारंपारिक व्यवसाय व कलावंतीन कुटुंबप्रमुख-स्त्री चे प्रमाण कमी असल्याने त्याठिकाणी या समस्यांचा अनुभव व प्रमाण नगण्य आहे असा निष्कर्ष निघतो.

## ४.४. अभ्यासक्षेत्रातील कोल्हाटी कुटुंबामधील मुलांबाबतचा दृष्टीकोन-

कोल्हाटी जमात ही कलावंत जमात असून उदरनिर्वाहासाठी भटकंती करावी लागत असल्याने जमातीतील कुटुंबांमध्ये शिक्षणाबरोबरच मुलांच्या भवितव्यासंबंधी असणारा दृष्टीकोन इतर भटक्या जमातींपेक्षा वेगळा आहे. तो पुढीलप्रमाणे

### ४.४.१. कोल्हाटी कुटुंबांमधील मुलांचे भवितव्याविषयक माहिती -

**तक्ता क्र. ४.१७**

**मुलांच्या भविष्य व उदरनिर्वाह संदर्भात विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पारंपारिक व्यवसाय | १३ | ०६ | २९ | १० | ५८ |
| ३ | नोकरी | ३१ | २४ | ३० | १९ | १९४ |
| २ | उच्च शिक्षण | ५४ | ५८ | २३ | ५९ | १०४ |
| ४ | अधिकारी | १५ | ०३ | ०१ | ०६ | २५ |
| ५ | इतर | ०३ | ०५ | १४ | - | २२ |

आधार-प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१७-१८

प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणीनुसार एकुण ४२० कुटुंबांपैकी ज्या कुटुंब प्रमुखांनी मुलांना काय बनवू इच्छिता? व मुलांच्या भविष्य व उदरनिर्वाह संदर्भात आपली मते नोंदवली आहेत त्याची विभागणी तक्ता क्र. ४.१७ मध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार नगर,नेवासा, जामखेड,

शेवगाव तालुक्यांमध्ये उच्चशिक्षणासंबंधी प्रबळ इच्छा जाणवते कारण १९४ कुटुंब प्रमुखांना आपल्या मुलांना उच्चशिक्षीत बनवायचे आहे. यातून कोल्हाटी जमातीचे मुलांच्या भविष्याबाबत परिवर्तन दिसून येते. मोठया प्रमाणात उदरनिर्वाहासाठी ते पारंपारिक व्यवसायाचा आधार न घेता मुलांना उच्चशिक्षित, नोकरी लावणे, अधिकारी, इतर उदयोग व व्यवसाय या मार्गांचा अवलंब करण्याला प्राधान्य देताना दिसतात. चार तालुक्यातील जामखेड तालुका मुलांच्या भविष्य व उदरनिर्वाहासंबंधी आजही उदासीन दिसतो. या तालुक्यात इतर ३ तालुक्यांशी तुलना करता २९ कुटुंबप्रमुखांचे मत पारंपारिक व्यवसायाकडे वळण्याचे आहे. यावरुन जामखेड तालुक्यात अजूनही मुलांच्याबाबत आधुनिक दृष्टीकोन किंवा मत मांडले जात नाही असा निष्कर्ष निघतो. समाजाला जातीव्यवस्थेच्या बंधनातून बाहेर काढण्यासाठी जामखेड तालुक्यात अजूनही प्रबोधनाची गरज वाटते.

### ४.४.२. कोल्हाटी कुटुंबांमधील मुलींच्या भवितव्याविषयक माहिती –

**तक्ता क्र. ४.१८**

**मुलींच्या भविष्य व उदरनिर्वाह संदर्भात विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पारंपारिक व्यवसाय | १२ | ०७ | ३८ | १० | ६७ |
| २ | लग्न लावणे | २६ | ४३ | २३ | ४७ | १३९ |
| ३ | उच्च शिक्षण | ३५ | १६ | ०७ | २१ | ७९ |
| ४ | नोकरी | २७ | १४ | १७ | ०३ | ६१ |
| ५ | इतर | ०३ | ०४ | ०४ | ० | ११ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

तक्ता क्र.४.१७ मध्ये मुलांबाबत भविष्यासंबंधी मतांचा अभ्यास केल्यानंतर तक्ता क्र. ४.१८ मध्ये नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या चार तालुक्यातील एकुण ४२० कुटुंबांमधील कुटुंब प्रमुखांची मुलींचे भविष्य उदरनिर्वाह संबंधी बाबी अभ्यासण्यात आले. चार तालुक्यांपैकी मुलींना भविष्यात उदरनिर्वाहासाठी पारंपारिक व्यवसायाकडे वळविण्याची मते सर्वाधिक ३८ जामखेड तालुक्यात दिसून येतात.त्याचप्रमाणे मुलींचे लग्न लावून देण्यात जामखेड तालुका सर्वात कमी २३ कुटुंबप्रमुखांचे मत आहे. याउलट पारंपारिक व्यवसाय म्हणून मुलींचे भविष्य घडविणारे कुटुंबप्रमुख सर्वात कमी नेवासा ०७ तर शेवगाव १० असल्याचे दिसते आणि मुलींचे

भविष्यात लग्न लावून देण्याचे मत प्रमाण सर्वात जास्त शेवगाव ४७, नेवासा ४३ आहे. वरील विश्लेषणावरुन असे निष्कर्ष निघतो की मुलींच्या भविष्यासंदर्भात जामखेड तालुका अजूनही उदरनिर्वाहासाठी अवलंबून आहे. तर नेवासा व शेवगाव मध्ये बऱ्यापैकी कुटुंबप्रमुख मुलींचे लग्न लावून देण्याचे स्वप्न पाहतात. चारही तालुक्यांमध्ये मुलींना लग्नानंतर शिक्षणास परवानगी देण्याचे प्रमाण नगण्य आहे. तसेच नगर, नेवासा, शेवगाव या तीन तालुक्यांमध्ये मुलींना उच्च शिक्षण देण्याचे अनुक्रमे ३५,१६ व २१ कुटुंबप्रमुखांचे मत आहे. मुलींना नोकरी लावून सक्षम बनविण्याचे मत नगरमध्ये सर्वात जास्त २७ कुटुंबप्रमुख असल्याचे दिसते. यावरुन या ठिकाणीही जामखेड तालुका मागास विचारांचा वाटतो.

### ४.४.३. कोल्हाटी कुटुंबांमधील मुलांकडे लक्ष देण्याविषयक माहिती –

**तक्ता क्र. ४.१९**

**स्वतःच्या मुलांकडे लक्ष देण्यासंदर्भात विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुलांकडे लक्ष देवू शकणारी कुटुंब संख्या | ९८ (८४.४९) | ९२ (८८.४६) | ४६ (४४.६७) | ७६ (७८.३५) | ३१२ (७४.२९) |
| २ | मुलांकडे लक्ष देवू न शकणारी कुटुंब संख्या | १८ (१५.५१) | १२ (११.५४) | ५७ (५५.३३) | २१ (२१.६५) | १०८ (२५.७१) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कोल्हाटी जमात ही भटक्या विमुक्तांपैकी एक असल्याकारणाने तसेच कलावंत म्हणून कार्य करीत असल्याने जमातीतील कुटुंबांना मुलांकडे लक्ष देणे शक्य होत नाही. तसेच कुटुंबातील कलावंतीन कुटुंबप्रमुख स्त्री व इतर कलावंतीनींना नाचकाम व मनोरंजनासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकावे लागते अशावेळी मुलांच्या संगोपनाची जबाबदारी घेण्यासाठी घरातील इतर व्यक्ती, नातेवाईक, शेजारी, हॉस्टेल अशा पर्यायी मार्गाचा अवलंब केला जातो.

तक्ता क्र.४.१९ नुसार एकुण ४२० कुटुंबांपैकी मुलांकडे लक्ष देऊ शकणाऱ्या कुटुंबांची संख्या ३१२ म्हणजेच (७४.२९ टक्के) असून ती तुलनात्मकदृष्टया जास्त आहे. म्हणजेच आधुनिक काळानुरुप मुलांना प्राधान्य क्रम देऊन त्यांच्या संगोपनाला महत्व दिले जात असल्याचे दिसते. परंतु तरीही मागील निष्कर्षाप्रमाणेच यातही जामखेड तालुका मागास दृष्टीकोन बाळगणारा वाटतो कारण चारही तालुक्यातील विरुध्द स्थिती म्हणजेच जामखेड तालुक्यामध्ये मुलांकडे लक्ष देणारी कुटुंब संख्या (४४.६७ टक्के) असून ती सर्वात कमी आहेत.

### ४.४.४. कोल्हाटी कुटुंबांमधील मुलगा–मुलगी भेदभावविषयक माहिती –

**तक्ता क्र. ४.२०**

**मुलगा–मुलगी फरक बाबत विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | होय | १४ (१२.०७) | ०५ (४.८१) | ३७ (३५.९२) | ०८ (८.२५) | ६४ (१५.२४) |
| २ | नाही | १०२ (८७.९३) | ९० (९५.१९) | ६५ (६४.०८) | ८९ (९१.७५) | ३५६ (८४.७६) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कोल्हाटी जमात एकेकाळी पूर्वी मुलींच्या जन्माबाबत आनंद सोहळा साजरा करीत असे व मुलीलाच उत्पन्नाचे साधन मानत असे. या विचार सरणीला मागे टाकत ही जमात पुढे पाऊल टाकताना दिसते.

तक्ता क्र. ४.२० नुसार एकुण ४२० कुटुंब संख्येचा विचार केला असता केवळ ६४ कुटुंबांमध्ये मुलगा–मुलगी भेदभाव केला जातो तो (१५.२४ टक्के) असून ३५६ कुटुंबे म्हणजे (८४.७६ टक्के) मुलगा–मुलगी समान मानून मुलांना वागणूक देतात. तालुकानिहाय स्थितीचा विचार केला असता जामखेडे तालुक्यामध्ये मुलगा–मुलगी भेदभावाचे प्रमाण सर्वाधीक म्हणजेच (३५.९२ टक्के) आहे तर सर्वात कमी मुलगा–मुलगी भेदभावाचे प्रमाण नेवासा तालुक्यात (४.८१ टक्के) आहे. यावरुन जामखेड तालुका पारंपारिक विचाराचा असून नेवासा

तालुक्यामध्ये आधुनिक विचारसरणी प्रकट होते. नेवासा तालुक्यानंतर शेवगाव तालुका मुलांमध्ये भेदभाव करत नाही असा निष्कर्ष निघतो.

### ४.४.५. कोल्हाटी कुटुंबांचे मुलांबाबत दृष्टीकोन –

**तक्ता क्र. ४.२१**

**मुलांबाबत दृष्टीकोन**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उत्पन्नाचे साधन नाही म्हणून दुर्लक्ष | ०४ | ० | २२ | ०१ | २७ |
| २ | स्वतंत्र निर्णय क्षमता | ७१ | ४५ | ४१ | ५५ | २१२ |
| ३ | मुलांवर विश्वास | २९ | ३७ | २३ | ३३ | १२२ |
| ४ | पारंपारिक व्यवसायात अडथळा | ०० | ०२ | ०२ | ०१ | ०५ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

तक्ता क्र. ४.२१ मध्ये नगर,नेवासा, जामखेड, शेवगाव या चार तालुक्यांमधील एकुण ४२० कुटुंबप्रमुखांना मुलगा असल्यास त्याकडे बघण्याचा दृष्टीकोन विचारला असता मिळणाऱ्या मतांची विभागणी केली आहे. त्यानुसार एकुण चार तालुक्यांचा एकुण ४२० कुटुंब प्रमुखांचा विचार घेतला असता मुलांना स्वतंत्र निर्णय घेण्याची क्षमता देण्याकडे कल जास्त आहे. कारण २१२ कुटुंबप्रमुखांचे मत मुलांना त्यांचे निर्णय घेऊन देणे हे आहे. हे मत किंवा दृष्टीकोन तुलनात्मकदृष्टया सर्वाधिक आहे. त्याखालोखाल मुलांवर विश्वास ठेवण्याचे दृष्टीकोन १२२ कुटुंबप्रमुखांच्या मतामध्ये दिसून आले. त्याचप्रमाणे आधुनिक विचार सरणीचा पुरस्कार करुन मुलांना पारंपारिक व्यवसायात अडथळा न मानता अडथळा मानणाऱ्या कुटुंब प्रमुखांची मते केवळ ०५ आहेत. यावरुन असा निष्कर्ष निघतो की कोल्हाटी जमातीत मुलांच्या बाबतीत दृष्टीकोनात हळूहळू बदल व परिवर्तन होत आहे.

### ४.४.६. कोल्हाटी कुटुंबांचे मुलींबाबत दृष्टीकोन –

**तक्ता क्र. ४.२२**

**मुलींबाबत दृष्टीकोन**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उत्पन्नाचे साधन | १४ | ०२ | ४२ | ०९ | ६७ |
| २ | लग्न लावून देणे | १७ | ४० | १६ | २५ | ९८ |
| ३ | शिकवून सक्षम करणे | १५ | ०५ | २० | ०६ | ४६ |
| ४ | पारंपारिक विळख्यात सापडण्याची काळजी | ५३ | २९ | १२ | ५१ | १४५ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

कोल्हाटी जमात प्राचीन काळापासून आपल्या पारंपारिक व्यवसायाची कास धरुन आहे. समाजाच्या भीतीने, जातिव्यवस्थेच्या बंधनामुळे तर कधी आर्थिक विवंचनेमुळे मुलांपेक्षा मुलींवर उदरनिर्वाहासाठी अवलंबून असल्याचे दिसते. त्यासाठी या समाजातील मुलींना विवाह करण्याबाबत अडथळे व बंधने येत असत. परंतु तक्ता क्र.४.२२ मधील विभागणी व आकडेवारीनुसार जमातीतील एकुण मतांचा विचार केला असता जास्तीत जास्त मतांचे प्रमाण म्हणजे कुटुंबप्रमुखांना मुलगी पारंपारिक विळख्यात सापडण्याची काळजी वाटते. त्याचप्रमाणे खालोखाल ९८ कुटुंब प्रमुखांचे मत मुलींचे लग्न लावून देण्याचे आहे. तर मुलींना उत्पन्नाचे व उदरनिर्वाहाचे साधन मानणाऱ्या ६७ कुटुंबप्रमुखांपैकी एकटया जामखेड तालुक्यातील ४२ कुटुंब प्रमुखांचे मत आढळते. एकुण ४ तालुक्यातील ४६ कुटुंबप्रमुखांचे मत मुलींना शिकवून समक्षम करणे आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो. नगर नेवासा व शेवगाव या तीन तालुक्यांमध्ये मुली म्हणजे उत्पन्नाचे साधन या प्राचीन संकल्पनेला विरोध करुन मुलींचे लग्न लावून देणे किंवा मुलींना शिकवून समक्ष बनविणे या दृष्टीकोनास प्राधान्य दिले जाते तर हे करत असताना मुलगी पारंपारिक विळख्यात सापडण्याची पालकांना काळजी वाटते असे दिसते. तसेच जामखेड तालुक्यातील पालक/कुटुंबप्रमुख हे मुलींना अजूनही उत्पन्नाचे साधन मानतात असे आढळतात.

## ४.५. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीतील कुटुंबांची वैयक्तिक सामाजिक स्थिती

–अहमदनगर जिल्हयातील कुटुंबांची वैयक्तिक सामाजिक माहिती उदा. व्यसन, जातीलामहत्व देणे, आंतरजातीय विवाह इ.विषयक माहिती पुढील प्रमाणे मांडण्यात येईल.

### ४.५.१. कोल्हाटी कुटुंब प्रमुखांची व्यसनविषयक माहिती –

**तक्ता क्र. ४.२३**

**व्यसन करणाऱ्यांची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुरुष | व्यसनी | ५२ (२२.९१) | २२ (९.५२) | ९८ (३८.४३) | १६ (७.३४) | १८८ (२०.१९) |
| | | निर्व्यसनी | १७५ (७७.०९) | २०९ (९०.४८) | १५७ (६१.५७) | २०२ (९२.६६) | ७४३ (७९.८१) |
| २ | स्त्री | व्यसनी | २० (६.३५) | ०७ (२.८६) | ५७ (१६.५७) | १० (३.९४) | ९४ (८.१२) |
| | | निर्व्यसनी | २९५ (९३.६५) | २३८ (९७.१४) | २८७ (८३.४३) | २४४ (९६.०६) | १०६४ (९१.८८) |
| | एकुण पुरुष+स्त्री | | ५४२ | ४७६ | ५९९ | ४७२ | २०८९ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

अहमदनगर जिल्हयातील नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या चार तालुक्यातील प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणीनुसार तक्ता क्र. ४.२३ मध्ये एकुण लोकसंख्येतील पुरुष व्यसनांचे व स्त्री व्यसनांचे प्रमाण काढण्यात आले आहे. चारही तालुक्यातील एकुण पुरुष लोकसंख्येमध्ये सर्वाधीक व्यसनी पुरुषांचे प्रमाण जामखेड तालुक्यामध्ये (३८.४३ टक्के) आहे. तर सर्वात कमी व्यसनी पुरुषांचे प्रमाण शेवगाव तालुक्यामध्ये (७.३४ टक्के) त्यानंतर नेवासा तालुक्यामध्ये (९.५२ टक्के) आहे. त्याचप्रमाणे एकुण स्त्री लोकसंख्येमध्ये व्यसन करणाऱ्या स्त्रीयांचे प्रमाण सर्वाधिक जामखेड तालुक्यामध्ये (१६.५७ टक्के) असून सर्वात कमी व्यसन करणाऱ्या स्त्रीयांचे प्रमाण नेवासा तालुक्यामध्ये (२.८६ टक्के) आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, जामखेड तालुक्यामध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण तुलनात्मकदृष्टया स्त्री व पुरुष

दोन्हीमध्ये जास्त आहे. तर नेवासा व शेवगाव तालुक्यांमधील स्त्री व पुरुष लोकसंख्या जास्तीत जास्त निर्व्यसनी आढळले. तसेच नगर तालुक्यातील स्त्री–पुरुष व्यसनाधीनतेचे प्रमाण तुलनात्मकदृष्टया मध्यम आहे.

**तक्ता क्र. ४.२४**

**व्यसनानुसार वर्गवारी**

| अ. क्र. | तपशील | नगर | | नेवासा | | जामखेड | | शेवगाव | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री |
| १ | गुटखा खाणे | १४ | ०४ | ०९ | ०२ | २० | १८ | ०३ | ०२ | ४६ | २६ |
| २ | तंबाखू खाणे | २१ | १६ | ११ | ०५ | ४५ | ३८ | १२ | ०८ | ८९ | ६७ |
| ३ | बीडी/सिगारेट | ०१ | ० | १ | ० | ३ | ० | ० | ० | ०५ | ०० |
| ४ | दारु पिणे | १६ | ० | १ | ० | २९ | ०१ | १ | ० | ४७ | ०१ |
| ५ | गांजा | ० | ० | ० | ० | ०१ | ० | ० | ० | ०१ | ० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

तक्ता क्र.४.२३ मध्ये व्यसनी व निर्व्यसनी स्त्री–पुरुष प्रमाण पाहिल्यानंतर व्यसनांमध्ये हे स्त्री–पुरुष नेमके कोणत्या व्यसनांच्या आहारी जातात हे तक्ता क्र. ४.२४ नुसार लक्षात येते.

त्यानुसार स्त्रियांमध्ये तंबाखू खाणे या व्यसनाचे प्रमाण जामखेड तालुक्यामध्ये सर्वाधीक असून त्यानंतर स्त्रीया गुटखा खाणे या व्यसनाला जामखेड तालुक्यामध्येच जास्त प्राधान्य दिले जाते. बिडी व दारु पिणे हे चारही तालुक्यांमध्ये अगदी नगण्य प्रमाण आहे तर स्त्रीया गांजा, चरस या व्यसनापासून पूर्णपणे अलिप्त दिसतात. व्यसने करणाऱ्या पुरुषांमध्ये जामखेड तालुक्यात तंबाखू खाणे या व्यसनाला प्राधान्य पसंती दिली जाते. तसेच गांजा,चरस या व्यवसापासून चारही तालुक्यातील पुरुष दूर असल्याचे दिसते. बिडी/सिगारेट पिणाऱ्या पुरुषांचे प्रमाण चारही तालुक्यांमध्ये अतिशय कमी आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, जामखेड तालुक्यामध्ये स्त्री व पुरुष व्यसनी लोकसंख्या तंबाखू खाणे, गुटखा खाणे, दारु पिणे यामध्ये पुढे आहे तर उरलेले ३ तालुक्यांमध्ये या व्यसनांचे प्रमाण कमी किंवा किरकोळ आहे.

### ४.५.२. कोल्हाटी कुटुंबप्रमुखांची आंतरजातीय विवाहविषयक माहिती –

अभ्यास क्षेत्रामधील एकुण ४२० कुटुंबप्रमुखांपैकी २४६ कुटुंब प्रमुख विवाहीत असल्याने तक्ता क्र. ४.२५ मध्ये एकुण नमुना २४६ आहे.

**तक्ता क्र. ४.२५**

**कुटुंबानुसार आंतरजातीय विवाहाची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जातीय विवाह | ५२ (८९.६५) | ८५ (९७.७०) | ४० (८६.९६) | ४९ (८९.०९) | २२६ (९१.८७) |
| २ | आंतरजातीय विवाह | ०६ (१०.३४) | ०२ (२.३०) | ०६ (१३.०४) | ०६ (१०.९१) | २० (८.१३) |
| | एकुण | ५८ (१००) | ८७ (१००) | ४६ (१००) | ५५ (१००) | २४६ (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र.४.२५ मध्ये दिल्याप्रमाणे नगर,नेवासा, जामखेड, शेवगाव तालुक्यामध्ये विवाहित कुटुंबप्रमुखांची संख्या २४६ आहे. या २४६ कुटुंबप्रमुखांच्या कुटुंबांमध्ये २२६ विवाह जातीय विवाह झालेले असून त्यांचे प्रमाण (९१.८७ टक्के) आहे. तर २० विवाह आंतरजातीय विवाह असून त्यांचे प्रमाण एकुण विवाहाच्या (८.१३ टक्के) आहे. यावरुन चारही तालुक्यांमध्ये आंतरजातीय विवाहाचे प्रमाण कमी असून जातीय विवाहाकडे कल जास्त दिसतो. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, बऱ्यापैकी आजही हा समाज विवाहासाठी जात सोडायला तयार नाही म्हणजेच अजूनही रोटी–बेटी व्यवहार जातीतच होताना दिसतात.

### ४.५.३. कोल्हाटी कुटुंबांचे जातीचे महत्व –

**तक्ता क्र. ४.२६**

**जातीला प्राधान्य देणाऱ्या कुटुंबांची संख्या**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जातीला प्राधान्य देणारे | ७१ (६१.२१) | १८ (१७.३१) | ६० (५८.२५) | १० (१०.३१) | १५९ (३७.८६) |
| २ | मनुष्याला प्राधान्य देणारे | ४५ (३८.७९) | ८६ (८२.६९) | ४३ (४१.७५) | ८७ (८९.६९) | २६१ (६२.१४) |
| | एकुण | ११६ (१००) | १०४ (१००) | १०३ (१००) | ९७ (१००) | ४२० (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.२६ मध्ये नगर,नेवासा, जामखेड, शेवगाव तालुक्यातील एकुण ४२० कुटुंबातील कुटुंबप्रमुखांना जात व मनुष्य यापैकी कोणास प्राधान्य देणार? असे विचारले असता २६१ कुटुंबप्रमुखांनी मनुष्याला प्राधान्य देणार असे सांगितले. त्यांचे प्रमाण (६२.१४ टक्के) आहे. तर १५९ कुटुंबप्रमुख अजुनही जातीला प्राधान्य देताना दिसतात. त्यांचे प्रमाण (३७.८६ टक्के) आहे म्हणजेच एकुण विचार करता मनुष्याला प्राधान्य देणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता शेवगाव तालुका (८९.६९ टक्के) व नेवासा तालुका (८२.६९ टक्के) कुटुंबप्रमुख सर्वात जास्त प्रमाणात मनुष्याला प्राधान्य देतात तर नगर तालुका (६१.२१ टक्के) व जामखेड तालुका (५८.२५ टक्के) आजही जातीला प्राधान्य देताना दिसतो. याठिकाणीही नगर व जामखेड जातीव्यवस्थेच्या बंधनात गुंतलेला आहे असा निष्कर्ष निघतो.

### ४.५.४. कोल्हाटी कुटुंबांचे भटकंतीचे प्रमाण –

तक्ता क्र. ४.२७

**भटके व स्थिर जीवन जगणाऱ्या कुटुंबांची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भटके | २० (१७.२४) | ०४ (३.८५) | ६२ (६०.१९) | १४ (१४.४३) | १०० (२३.८१) |
| २ | स्थिर | ९६ (८२.७६) | १०० (९६.१५) | ४१ (३९.८१) | ८३ (८५.५७) | ३२० (७६.१९) |
| | एकुण | ११६ (१००) | १०४ (१००) | १०३ (१००) | ९७ (१००) | ४२० (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कोल्हाटी जमात भटक्या विमुक्त जमातीपैकी असून त्यांचा व्यवसाय भटकंती स्वरुपाचा असल्याने त्यांच्या आर्थिक विकास, शिक्षण, परिवर्तन या बाबींशी संवेदनशील माहिती तक्ता क्र.४.२७ मध्ये मांडलेली आहे. नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव या चार तालुक्यातील एकुण ४२० कुटुंबांचा विचार केला असता १०० कुटुंबे (२३.३१ टक्के) आजही भटके जीवन जगताना दिसतात तर ३२० कुटुंबे (७६.१९ टक्के) आज एका ठिकाणी स्थिर जीवन जगताना दिसतात. या भटके व स्थिर कुटुंबांपैकी सर्वात जास्त भटकंती करणारी कुटुंब जामखेड तालुक्यामध्ये ६२ कुटुंब संख्या असून ती (६०.१९ टक्के) आहे. यावरुन जामखेड मध्ये भटकंती करणारे कुटुंबप्रमुख व पर्यायाने कुटुंब जास्त आढळतात. याउलट, नगर, नेवासा, शेवगाव या तीनही तालुक्यांमध्ये स्थिर जीवन जगणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अनुक्रमे ९६ (८२.७६ टक्के), १०० (९६.१५ टक्के), ८३ (८५.५७ टक्के) आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की जामखेड वगळता इतर तीनही तालुक्यांमधील कुटुंबे जास्तीतजास्त स्थिर जीवन जगतात.

## ४.६. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीची धार्मिक व सांस्कृतिक स्थिती –

माणूस समाजप्रिय प्राणी असल्याने समाजातील रुढी,परंपरा, संस्कृती, धार्मिक विधी यांना महत्व देताना दिसतो. हे चित्र कोल्हाटी जमातीत काही वेगळे दिसून येत नाही. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीची धार्मिक व सांस्कृतिक स्थिती पुढीलप्रमाणे

### ४.६.१. कोल्हाटी कुटुंबांमधील देवाविषयक आस्था–

**तक्ता क्र. ४.२८**

**देवावर विश्वास ठेवणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण**

| अ क्र | तपशील | नगर | | नेवासा | | जामखेड | | शेवगाव | | एकुण टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | होय | नाही | होय | नाही | होय | नाही | होय | नाही |
| १ | देवा वर विश्वास ठेवणारे | **९१** (७८.४५) | **२५** (२१.५५) | **८३** (७९.८१) | **२१** (२०.१९) | **९९** (९६.१२) | **०४** (३.८८) | **९३** (९५.८८) | **०४** (४.१२) | **३६६** (८७.१४) | **५४** (१२.८६) |
| २ | देवतांची पूजा करणारे | **८९** (७६.७२) | **२७** (२३.२८) | **८३** (७९.८१) | **२१** (२०.१९) | **८३** (८०.५८) | **२०** (१९.४२) | **९२** (९४.८५) | **०५** (५.१५) | **३४७** (८२.६२) | **७३** (१७.३८) |
| ३ | नवस करणारे | **७९** (६८.१०) | **३७** (३१.९०) | **५५** (५२.८८) | **४९** (४७.१२) | **६२** (६०.१९) | **४१** (३९.८१) | **८०** (८२.४७) | **१७** (१७.५३) | **२७६** (६५.७१) | **१४४** (३४.२९) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.२८ मधील माहितीनुसार कोल्हाटी जमातीतील लोक आजही धर्म, श्रध्दा, अंधश्रध्दा, परंपरा या बाबींना चिकटून आहेत असे दिसून येते. नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या चारही तालुक्यामधील एकुण ४२० कुटुंबांमध्ये देवाला मानणाऱ्या बाबींची ३ भागात विभागणी केली असता देवावर विश्वास ठेवणारी कुटुंब संख्या ३६६ असून त्यांचे प्रमाण (८७.१४ टक्के) इतके जास्त आहे. तर या देवतांची पुजा करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण (८२.६२ टक्के) इतके आहे. नवस करणाऱ्या कुटुंबांची संख्या २७६ असून त्यांचे प्रमाण (६५.७१ टक्के) आढळते. यावरुन चारही तालुक्यांमध्ये देवाला मानणारे एकुण कुटुंब संख्या जास्त असल्याचे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे तालुकानिहाय अभ्यास केला असता तुलनात्मकदृष्टया

जामखेड तालुक्यामध्ये देवाला मानणारे लोक जास्त असून त्यांची पूजा करण्याचे प्रमाण शेवगावमध्ये जास्त आहे. इच्छापूर्तीसाठी नवस करणाऱ्या २७६ कुटुंबांपैकी शेवगाव तालुक्यामध्ये नवसाचे प्रमाण जास्त आहे. त्याखालोखाल नगर व जामखेड तालुक्याचा क्रमांक लागतो. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, थोडया फार फरकाने चारही तालुक्यांमधील कुटुंबस्थिती देवाला मानणारी व नवसासारख्या अंधश्रध्दाळू संकल्पनेवर विश्वास ठेवणारी आहे. ही अंधश्रध्दा या जमातीच्या आर्थिक विकासाच्या मार्गात अडथळा ठरताना दिसते.

### ४.६.२. कोल्हाटी कुटुंबांमधील नवस विषयक माहिती –

**तक्ता क्र. ४.२९**

**नवस फेडण्याच्या पध्दती**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पशू बळी देऊन | ४२ (५३.१६) | १९ (३४.५५) | ४५ (७२.५८) | १० (१२.५०) | ११६ (४२.०३) |
| २ | साधे जेवण देऊन | १० (१२.६६) | २५ (४५.४५) | १५ (२४.१९) | २१ (२६.२५) | ७१ (२५.७२) |
| ३ | दान करुन | २७ (३४.१८) | १० (१८.१८) | ०२ (३.२३) | २८ (३५.००) | ६७ (२४.२८) |
| ४ | देवाला वाहून | ० (०.००) | १ (१.८२) | ० (०.००) | २१ (२६.२५) | २२ (७.९७) |
| | एकुण | ७९ | ५५ | ६२ | ८० | २७६ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र.४.२९ मध्ये दिल्याप्रमाणे नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव तालुक्यामध्ये नवस करणाऱ्या कुटुंब संख्येचे प्रमाण जास्त आहे. परंतु या नवस फेडण्याच्या पध्दती मध्ये चारही तालुक्यांमध्ये विविधता दिसते. सर्वात जास्त नवस करण्याचे प्रमाण शेवगाव व नगर तालुक्यामध्ये असून सर्वात कमी देवाला नवस करण्याची पध्दत नेवासा या तालुक्यामध्ये कमी प्रमाणात आहे. काही लोक देवाला पशू बळी देऊन, साधे जेवण देऊन, दान करुन, देवाला विविध वस्तू, धान्य, उपहार वाहून अशा विविध पध्दतीने नवस फेडतात. परंतु चारही

तालुक्यातील नवस फेडण्याच्या पध्दतीमध्ये सर्वाधिक पशू बळी देऊन नवस फेडण्याचे प्रमाण आहे. यामध्ये जामखेड व नगर तालुका अग्रेसर आहे. तर नेवासा व शेवगाव मध्ये पशू बळी देण्याचे प्रमाण कमी असून त्याठिकाणी साधे जेवण देऊन किंवा देवाला उपहार वाहून नवस फेडण्याच्या पध्दतीला प्राधान्य दिले जाते. एकंदरीत चार तालुक्यांमध्ये अंधश्रध्देबाबत असा निष्कर्ष निघतो की एकुण अंधश्रध्देचे प्रमाण जास्त आहे.

### ४.६.३. कोल्हाटी कुटुंबांमधील धार्मिक विधींविषयक माहिती –

**तक्ता क्र. ४.३०**

**कोल्हाटी जमातीचे विविध विधींचे आचरण करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण**

| अ. क्र. | तपशील | नगर | | नेवासा | | जामखेड | | शेवगाव | | एकुण टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | होय | नाही | होय | नाही | होय | नाही | होय | नाही |
| १ | नामकरण | १०४ | १२ | १०१ | ०३ | ९७ | ०६ | ९४ | ०३ | ३९६ | २४ |
| | | (८६. ६६) | (१०. ३४) | (९७. १२) | (२. ८८) | (९४. १७) | (५. ८३) | (९६. ९१) | (३. ०९) | (९४. २९) | (५. ७१) |
| २ | पाचवीचा विधी | १०५ | ११ | १०१ | ०३ | १०० | ०३ | ९४ | ०३ | ४०० | २० |
| | | (९०. ५२) | (९. ४८) | (९७. १२) | (२. ८८) | (९७. ०९) | (२. ९१) | (९६. ९१) | (३. ०९) | (९५. २४) | (४. ७६) |
| ३ | मुंजविधी | ८६ | ३० | ७३ | ३१ | ९४ | ०९ | ६४ | ३३ | ३१७ | १०३ |
| | | (७४. १४) | (२५. ८६) | (७०. १९) | (२९. ८१) | (९१. २६) | (८. ७४) | (६५. ९८) | (३४. ०२) | (७५. ४८) | (२४. ५२) |
| ४ | तिसरा | ८९ | २७ | १०४ | ० | ९९ | ०४ | ९७ | ० | ३८९ | ३१ |
| | | (७६. ७२) | (२३. २८) | (१००) | ० | (९६. १२) | (३. ८८) | (१००) | ० | (९२. ६२) | (७. ३८) |
| ५ | दशक्रिया | ११६ | ० | १०४ | ० | १०३ | ० | ९७ | ० | ४२० | ० |
| | | (१००) | ० | (१००) | ० | (१००) | ० | (१००) | ० | (१००) | ० |
| ६ | तेरावा | ९४ | २२ | ९० | १४ | ९१ | १२ | ९६ | ०१ | ३३३ | ४९ |
| | | (८१.०३) | (१८. ९७) | (८६.५४) | (१३.४६) | (५१.४६) | (११.६५) | (९८.९७) | (१.०३) | (७९.२९) | (११.६७) |
| ७ | समाजाच्या यात्रा | ७९ | ३७ | ३४ | ७० | ५० | ५३ | ३२ | ६५ | १९५ | २२५ |
| | | (६८.१०) | (३१.९०) | (३२.६९) | (६७.३१) | (४८.५४) | (५१.४६) | (३२.९९) | (६७.०१) | (४६.४३) | (५३.५७) |
| ८ | सूतक पाळणे | ११६ | ० | १०४ | ० | १०३ | ० | ९७ | ० | ४२० | ० |
| | | (१००) | | (१००) | | (१००) | | (१००) | | (१००) | |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कोल्हाटी जमातीविषयी विविध संदर्भ ग्रंथांचा आढावा घेतला असता आणि प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणीनुसार या जमातीमध्ये नामकरण, पाचवी, मुंजविधी, तिसरा, दशक्रिया, तेरावा, समाजाच्या यात्रा, सूतक इ. प्रथा व धार्मिक विधींचे थोडया-फार फरकाने सर्रास आचरण केले जाते.

तक्ता क्र.४.३० मध्ये नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या ४ तालुक्यांमध्ये वरील सर्व धार्मिक विधींच्या आचरणाचे प्रमाण दर्शविले आहे. त्यानुसार चारही तालुक्यांचा विचार केला असता नामकरण विधीचे आचरण सरासरी (९४ टक्के) कुटुंबे करताना दिसतात म्हणजेच केवळ (५.६ टक्के) कुटुंबे हा विधी करत नाहीत. त्याचप्रमाणे पाचवीचा विधी चारही तालुक्यांमध्ये (९५ टक्के) कुटुंबे करताना दिसतात तर (५ टक्के) कुटुंबे पाचवीचा निधी करत नाहीत. यावरुन नामकरण विधी व पाचवीचा विधी या दोन्हीला जमातीत महत्वपूर्ण स्थान आहे असा निष्कर्ष निघतो. मुंजविधी काही प्रमाणात कुटुंबांमध्ये केला जात नाही. नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव तालुक्यांमध्ये सरासरी (७५ टक्के) कुटुंब हा मुंजविधी करतात. तर (२५ टक्के) कुटुंबांमध्ये हा केला जात नाही. मृत्यू विधी झाल्यानंतर तिसरा घातला जातो. हा विधी नेवासा व शेवगाव याठिकाणी (१०० टक्के) कुटुंबांमध्ये केला जातो.परंतु नगर व जामखेड तालुक्यांची सरासरी पाहता (८६ टक्के) कुटुंबांमध्ये तिसरा घातला जातो व (२४ टक्के) कुटुंबे ही तिसऱ्याचा विधी करत नाही. चारही तालुक्यांमध्ये दशक्रिया (दहावा) हा विधी (१०० टक्के) कुटुंबांमध्ये केला जातो. तर तेरावा घालण्याचे प्रमाण शेवगाव तालुक्यातील कुटुंबांमध्ये सर्वाधिक (९८.९७ टक्के) इतके आहे. त्याखालोखाल नेवासा (८६.५४ टक्के), नगर (८१.०३ टक्के) या प्रमाणात तेराव्याचा विधी कुटुंबांमध्ये केला जातो. तेरावा विधी सर्वात कमी जामखेड तालुक्यातील कुटुंबांमध्ये (५१.४६ टक्के) केला जातो. त्यानंतर सर्वात मोठी अंधश्रध्दा असणारी पध्दती व विधी म्हणजेच समाजाच्या यात्रा, जमातीतील कुटुंबे विशिष्ट तीर्थस्थानी जाऊन बळी देऊन, साधे जेवण देऊन, दान करुन यात्रा साजरे करतात. या यात्रा करण्याचे प्रमाण सर्वात जास्त नगर (६८.१० टक्के) तर जामखेड (४८.५४ टक्के) असल्याचे दिसते. तर नेवासा व शेवगाव तालुक्यांमध्ये या प्रकारच्या यात्रा कमी प्रमाणात केल्या जातात. नेवासा तालुक्यात (३२.६९ टक्के) कुटुंबे तर शेवगाव मध्ये (३२.९९ टक्के) कुटुंबे या यात्रा करताना दिसतात. कोल्हाटी जमातीत तसेच इतरही जाती-जमातीमध्ये कुटुंबातील व्यक्ती मृत

पावल्यानंतर एका कुळातील लोक सूतक पाळतात. चारही तालुक्यांमध्ये (१०० टक्के) लोक आप–आपल्या कुळातील सुतक पाळण्याचे आचरण करताना दिसतात.

यावरुन असा निष्कर्ष निघतो की, नेवासा व शेवगाव वगळता नगर व जामखेड तालुक्यामध्ये अंधश्रध्देचे प्रमाण असून नेवासा व शेवगाव तालुक्यांमध्ये ते तुलनात्मकदृष्टया कमी आहे. हे समाजाच्या यात्रा करण्याच्या प्रमाणावरुन सिध्द होते. परंतु इतर विधी मात्र चारही तालुक्यांमध्ये सर्रास केले जातात असे दिसते.

### ४.६.४. कोल्हाटी कुटुंबांमधील मृत्यूविधीविषयक माहिती –

**तक्ता क्र. ४.३१**

**मृत्यूविधीची पध्दतीनुसार कुटुंबांची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दफन | ०४<br>(३.४५) | ०<br>० | ४०<br>(३८.८३) | ०४<br>(४.१२) | ४८<br>(११.४३) |
| २ | अग्निदाहिनी | ११२<br>(९६.५५) | १०४<br>(१००) | ६३<br>(६१.१७) | ९३<br>(९५.८८) | ३७२<br>(८८.५७) |
| | एकुण | ११६<br>(१००) | १०४<br>(१००) | १०३<br>(१००) | ९७<br>(१००) | ४२०<br>(१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.३१ मध्ये दिल्याप्रमाणे एकुण ४ तालुक्यांमध्ये ४२० कुटुंबांपैकी ३७२ कुटुंबे ही आधुनिक काळानुसार अग्निदाहिनी देऊन मृत्यूविधी पार पाडतात. त्यांचे प्रमाण (८८.५७ टक्के) तर ४८ कुटुंबे अजूनही प्रेताला दफन करुन म्हणजेच पारंपारिक पध्दतीने मृत्यूविधी पार पाडतात. त्यांचे प्रमाण (११.४३ टक्के) आहे. तालुकानिहाय पाहणीनुसार नेवासा तालुक्यामध्ये (१०० टक्के) कुटुंबे अग्निदाहिनी या विधीचा अवलंब करतात तर जामखेड तालुक्यामध्ये अजूनही (३८.८३ टक्के) कुटुंब दफन विधीचा अवलंब करतात. यावरुन असा निष्कर्ष निघतो की नेवासा तालुका वैचारिकदृष्टया पुढारलेला आहे. तर जामखेड तालुका अजूनही जातीतील पारंपारिक प्रथांना धरुन आहे.

**तक्ता क्र. ४.३२**

**दशक्रिया जेवण पध्दतीनुसार कुटुंबांची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शाकाहारी | २१ (१८.१०) | २५ (२४.०४) | २८ (२७.१८) | ०६ (६.१९) | ८० (१९.०५) |
| २ | मांसाहारी | १३ (११.२१) | ० (०.००) | ०७ (६.८०) | ०८ (८.२५) | २८ (६.६७) |
| ३ | दोन्हीही | ८२ (७०.६९) | ७९ (७५.९६) | ६८ (६६.०२) | ८३ (८५.५७) | ३१२ (७४.२९) |
| | एकुण | ११६ (१००) | १०४ (१००) | १०३ (१००) | ९७ (१००) | ४२० (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.३१ मध्ये नगर,नेवासा, जामखेड, शेवगाव या चारही तालुक्यांमध्ये दशक्रिया विधी करणाऱ्या कुटुंबांची संख्या (१०० टक्के) आहे म्हणजेच या विधीला जमातीमध्ये विशेष महत्व दिल्याचे दिसते. या विधीनंतर जातीतील लोक, नातेवाईक, मित्र परिवार यांना जेवण दिले जाते. हे जेवण पूर्वी केवळ मांसाहार असे. परंतु कालांतराने यामध्ये परिवर्तन घडले आहे. हे परिवर्तन तक्ता ४.३२ मध्ये अभ्यासता येईल. त्यानुसार एकुण ४२० कुटुंबांपैकी ३१२ कुटुंबांमध्ये शाकाहार व मांसाहार दोन्हीही प्रकारचे जेवण दिले जाते. केवळ मांसाहाराचे जेवण देणारे कुटुंब २८ असून त्यांची टक्केवारी (६.६७ टक्के) आहे. तर केवळ शाकाहारी जेवण देणारे कुटुंब मांसाहाराच्या तुलनेत जास्त ८० असून त्यांची टक्केवारी (१९.०५ टक्के) आहे. यावरुन जमातीमध्ये परिवर्तनाला सुरुवात झाली आहे असा निष्कर्ष निघतो.

### ४.६.५. कोल्हाटी कुटुंबांच्या कुलदैवत विषयक माहिती –

तक्ता क्र. ४.३३

**कोल्हाटी कुटुंबांची कुलदैवते**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | खंडोबा | ११४ | १०४ | १०३ | ९६ |
| २ | तुळजाभवानी माता | ९३ | १०४ | १०३ | ९३ |
| ३ | अंबाबाई | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ४ | माणकेश्वरदेवी | ३० | ०६ | ० | १८ |
| ५ | सप्तश्रृंगी माता | ०० | ०६ | ०० | ०० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

संदर्भ ग्रंथांचा आढावा घेतला असता कोल्हाटी जमातीची तीर्थक्षेत्र व देवदेवतांची अनेक नावे आढळतात. मात्र नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव या चार तालुक्यातील प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणीनुसार काही मोजकेच कुलदैवते समोर आली आहे. इतर हिंदू धर्मातील देवी–देवतांची ते पूजा करतात परंतु कुळाचे कुलदैवतेला विशेष प्राधान्य दिले जाते. त्यापैकी खंडोबा, तुळजाभवानी, अंबाबाई, माणकेश्वर, सप्तश्रृंगी या कुलदैवतांचा विशेष उल्लेख आढळतो. एकुण ४२० कुटुंबांपैकी (२५ टक्के) कुटुंबांना आपली कुलदैवते सांगता आली नाहीत. तर (७५ टक्के) कुटुंबांच्या उत्तरामध्ये विविधता आढळते. नगर तालुक्यामध्ये खंडोबा, तुळजाभवानी, माणकेश्वर या कुलदैवतांचा समावेश होता. तर नेवासा तालुक्यामध्ये खंडोबा, तुळजाभवानीबरोबर सप्तश्रृंगी मातेचा समावेश होतो. जामखेड तालुक्यामध्ये खंडोबा, तुळजाभवानीबरोबर अंबाबाईचे नाव जोडले जाते. तर शेवगाव तालुक्यामध्ये खंडोबा, तुळजाभवानीबरोबर माणकेश्वर देवीचे नाव घेतले जाते. यावरुन असा निष्कर्ष निघतो की खंडोबा, तुळजाभवानी हे कुलदैवत जास्तीत जास्त कुटुंबांचे श्रध्दास्थान आहे.

### ४.६.६. कोल्हाटी कुटुंबांची वेशभूषा –

**तक्ता क्र. ४.३४**

**वेशभूषा/पोशाख पध्दतीनुसार कुटुंबांची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पारंपारिक | १२ | १५ | ३० | ०६ | ६३ | (१५) |
| २ | आधुनिक | १०४ | ८९ | ७३ | ९१ | ३५७ | (८५) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० | (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कोल्हाटी जमातीची पारंपारिक वेशभूषा नऊवारी साडी स्त्रीयांसाठी तर पुरुषांसाठी धोतर, पायजमा, सदरा, फेटा असा आहे. परंतु शिक्षण, समाजातील वावर, अनुकरण यामुळे आधुनि पिढीने पारंपारिक पोशाखाला नकार दिला आहे. सद्यस्थितीत स्त्रीचा सहावारी साडी, पंजाबी ड्रेस तर अधिक शिक्षीत जिन्स पॅन्ट वगैरे वापरताना दिसतात. पुरुषांमध्ये शर्ट–पँट, फॅशनचे कपडे परिधान केले जातात. तक्ता क्र.४.३४ मध्ये त्याचे प्रमाण दिसते.

एकुण ४२० कुटुंबांची वेशभूषा परिधान करण्याची संख्या विचारात घेता केवळ ६३ कुटुंबांमध्ये पारंपारिक वेशभूषा परिधान केली जाते म्हणजेच केवळ १५ टक्के कुटुंबप्रमुख आपल्या जमातीच्या पोशाखाची जोपासना करतात तर ३५७ कुटुंबांमध्ये आधुनिक वेशभूषा परिधान केली जाते. म्हणजे ८५ टक्के कुटुंबप्रमुख वेशभूषेच्या बाबतीत आधुनिकतेकडे वळलेले आहेत. वेशभूषेवर कोणत्याही बाहय घटकाचा परिणाम होतो/नाही हे पुढील विश्लेषणात स्पष्ट केले आहे.

### ४.६.७. कोल्हाटी कुटुंबांची आहारविषयक माहिती–


**तक्ता क्र. ४.३५**

**खाणे–पिणे पध्दतीनुसार कुटुंबांची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शाकाहारी | १७ (१४.६६) | ११ (१०.५८) | ०६ (५.८३) | ०४ (४.१२) | ३८ (९.०५) |
| २ | मांसाहारी | ३८ (३२.७६) | ११ (१०.५८) | २१ (२०.३९) | ० (०.००) | ७० (१६.६७) |
| ३ | दोन्हीही | ६१ (५२.५९) | ८२ (७८.८५) | ७६ (७३.७९) | ९३ (९५.८८) | ३१२ (७४.२९) |
| | एकुण कुटुंबे | ११६ (१००) | १०४ (१००) | १०३ (१००) | ९७ (१००) | ४२० (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

**आलेख क्र.४.८**




आधार – तक्ता क्र. ४.३५

कोल्हाटी जमातीमध्ये भटकंतीमुळे पूर्वीपासून मांसाहारावर जास्त भर दिला जात असे. परंतु इतर लोकांमधील येणे–जाणे, विचारांची देवाण घेवाण यामुळे जमातीतील शाकाहारी आहाराचे महत्व वाढले आहे. तरीही नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव तालुक्यांमधील एकुण

४२० कुटुंबांपैकी ३१२ कुटुंब शाकाहार व मांसाहाराचे सेवन करतात. त्यांचे प्रमाण (७४.२९ टक्के) आहे. यावरुन केवळ मांसाहार न करता त्याबरोबर आरोग्यासाठी शाकाहारी आहाराची गरज असल्याचे (७५.०० टक्के) कुटुंबांना पटलेले दिसते. त्याचप्रमाणे नगर व जामखेड तालुक्यामध्ये अजूनही केवळ मांसाहारीचे सेवन करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अनुक्रमे (३२.७६ टक्के) व (२०.३९ टक्के) आहे तर शेवगाव मधील एकुण कुटुंब संख्या शाकाहार व मांसाहाराला प्राधान्य देते. याठिकाणी एकही कुटुंब केवळ मांसाहारावर अवलंबून नाही. यावरुन असा निष्कर्ष निघतो की जमातीमध्ये आरोग्य विषयक संकल्पनांचा विचार होत आहे.

### ४.६.८. कोल्हाटी जमातीची जात पंचायतविषयक माहिती–

**तक्ता क्र. ४.३६**

**जातपंचायती संदर्भात कुटुंबांच्या मतानुसार विभागणी**

| तपशिल | जातपंचायतीवर विश्वास आहे का | जात पंचायत सद्यस्थितीत आहे का? | जातपंचायतीमध्ये बहिष्कार टाकला जातो का? | बहिष्काराचे समर्थ करणेबाबत |
|---|---|---|---|---|
| होय | २८६ (६८.१०) | ००६ (१.४३) | ३७५ (८९.२९) | २४७ (५८.८१) |
| नाही | १३४ (३१.९०) | ४१४ (९८.५७) | ४५ (१०.७१) | १७३ (४१.१९) |
| एकुण | ४२०(१००) | ४२० (१००) | ४२० (१००) | ४२० (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

जातपंचायत ही एक न्यायदानाची संस्था म्हणून कार्य करीत असे. परंतु जातपंचायत कायदा अंमलात आल्यापासून जातपंचायतीवर बंदी घालण्यात आली आहे. पूर्वी ही जातपंचायत जमातीतील सर्व तंटे, भांडणे, समस्या निवारण करत असे. सर्वश्रेष्ठ स्थान पंचांना दिले जात असे. काही वेळा न्याय देताना दंड, शिक्षा, बहिष्कार टाकणे या मार्गांचा अवलंब केला जात असे. जातपंचायती संबंधीत नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव या चार तालुक्यांमधील एकुण ४२० कुटुंबांची मते घेतली आहेत.

त्यानुसार ४२० कुटुंबांपैकी २८६ कुटुंबांचा जातपंचायतीवर विश्वास आहे. त्यांचे प्रमाण ६८.१० टक्के आहे. तर १३४ कुटुंबांचा जातपंचायतीवर विश्वास नाही त्यांचे प्रमाण ३१.९०

टक्के आहे. एकुण कुटुंबांपैकी केवळ ०६ कुटुंबांच्यामते जातपंचायत सद्यस्थितीत आहे तर ४१४ कुटुंबांच्यामते जात पंचायत सद्यस्थितीत नाही. ३७५ कुटुंबांच्या मते जातपंचायतीमध्ये बहिकार टाकला जातो. तर केवळ ४५ कुटुंबांच्या मते, जातपंचायतीमध्ये बहिष्कार टाकला जात नाही. या बहिष्काराबाबत ४२० उत्तरदात्यांच्या मतांची नोंद केली असता २४७ ५८.८१ कुटुंबप्रमुख बहिष्काराचे समर्थन करतात तर १७३ ४१.१९ कुटुंबप्रमुख बहिष्काराचे समर्थन करत नसून त्यास विरोध करतात. यावरुन असा निष्कर्ष निघतो की अजूनही कोल्हाटी जमात जातपंचायतीसारख्या समाजासाठी घातक बाबींवर विश्वास ठेवत असून त्याचे समर्थन करतात.

### ४.६.९. कोल्हाटी जमातीची विविध छंदविषयक माहिती–

**तक्ता क्र. ४.३७**

**कोल्हाटी कुटुंबांची विविध छंदानुसार विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गायन | ८६ | २४ | २४ | ४७ | १८१ |
| २ | नृत्य | ५१ | १६ | ४३ | १५ | १२५ |
| ३ | वादन | २७ | ०९ | ०८ | ११ | ५५ |
| ४ | अभिनय | ३२ | १० | १३ | १२ | ६७ |
| ५ | वक्तृत्व | ४५ | ७० | २१ | ४० | १७६ |
| ६ | वादविवाद | ३० | ६० | १५ | ३० | १३५ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

कोल्हाटी जमातीचा पारंपारिक व्यवसाय नाचगाणे, कला–सादरीकरण असल्याने कुटुंबातील वडिलधाऱ्या व्यक्तींचे अनुकरण व प्रभाव पडून अनेक कुटुंबामधील मुला–मुलींचे छंद व कला कौशल्य, आवडी–निवडीमध्ये विविधता आढळते. मुला–मुलींच्या छंदामध्ये गायन, नृत्य, वादन, अभिनय, वक्तृत्व, वादविवाद अशा छंदांचा समावेश केला आहे. त्यापैकी एकुण कुटुंब संख्येमध्ये वक्तृत्व व वादविवाद छंद जास्त प्रमाणात आढळतो. त्याचप्रमाणे गायन हा छंद सर्वाधिक कुटुंबांच्या मुलांमध्ये आढळतो. नृत्य, वादन, अभिनय, या छंदांचा समावेश काही विशिष्ट कुटुंबांमध्येच होताना दिसतो. तक्ता क्र. ४.३७ मध्ये एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते की, नगर, नेवासा व शेवगाव तालुक्यामधील मुलांमध्ये वत्कृत्व व वादविवाद छंद

तुलनात्मकदृष्टया जास्तीत जास्त जोपासला जातो. तर जामखेड तालुक्यामधील मुलांमध्ये नृत्य, गायन, वादन या छंदांना प्राधान्य दिले जाते. या विभागणीला शिक्षण व वातावरण परिस्थिती परिणामकारक असल्याचा निष्कर्ष निघतो.

## ४.७. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची आरोग्यासंबंधी माहिती –

अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीमध्ये आरोग्याविषयी समाधानकारक परिस्थिती आढळते. कोल्हाटी कुटुंबे आरोग्यासंबंधी काळजी घेताना दिसतात. त्यांची आरोग्यविषयक माहिती पुढीलप्रमाणे–

### ४.७.१. कोल्हाटी कुटुंबांच्या वैद्यकीय सेवेसंबंधी माहिती–

**तक्ता क्र. ४.३८**

**वैद्यकीय सेवेच्या उपलब्धतेनुसार कुटुंबांची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सरकारी दवाखाना | ६४ (५५.१७) | २४ (२३.०८) | २६ (२५.२४) | २७ (२७.८४) | १४१ (३३.५७) |
| २ | खाजगी दवाखाना | ५२ (४४.८३) | ८० (७६.९२) | ७७ (७४.७६) | ७० (७२.१६) | २७९ (६६.४३) |
| | एकुण | ११६ (१००) | १०४ (१००) | १०३ (१००) | ९७ (१००) | ४२० (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.३८ मधील माहितीनुसार कोल्हाटी जमातीतील कुटुंबे आरोग्यासंबंधी अतिशय काळजी घेताना दिसतात. नगर,नेवासा, जामखेड, शेवगाव या चारही तालुक्यांमधील एकुण ४२० कुटुंबांची वैद्यकीय सेवा घेता का? आणि कुठे? ही माहिती गोळा केली असता किरकोळ आजार व मोठा आजारासंदर्भात ही १०० कुटुंबे दवाखान्यात जातात. म्हणजेच मांत्रिक, घरगुती उपचार या मार्गाचा अवलंब केला जात नाही. दवाखान्यात जाण्याची विभागणी सरकारी दवाखाना व खाजगी दवाखाना अशी केला असता १४१ कुटुंब संख्या सरकारी दवाखान्यांचा लाभ घेते. त्यांची टक्केवारी एकुण कुटुंब संख्येच्या (३३.५७ टक्के) आहे. तर

२७९ कुटुंब संख्या खाजगी दवाखान्याला प्राधान्य देताना दिसतात. त्यांची टक्केवारी एकुण कुटुंब संख्येच्या (६६.१३ टक्के) आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की निम्म्यापेक्षा जास्त कुटुंब संख्या खाजगी दवाखान्यांना प्राधान्य देताना दिसते तर उरलेले आर्थिक समस्येमुळे सरकारी दवाखान्यामध्ये जातात. म्हणजेच आरोग्यासंबंधी निष्काळजीपणा कमी प्रमाणात दिसतो.

### ४.७.२. कोल्हाटी कुटुंबांमधील महिला बाळंपणविषयक माहिती–

अभ्यास क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष पाहणीतील ४२० कुटुंबांपैकी ४०८ कुटुंबांमधील महिला बाळंतपण विषयक विभागणी पुढीलप्रमाणे

**तक्ता क्र. ४.३९**

**महिला बाळंतपणाच्या सुविधेनुसार विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | घरी बाळंतपण करणारी कुटंब संख्या | ४९ | १५ | ११ | ०६ | ८१ |
| २ | दवाखान्यात बाळंतपण करणारी कुटंब संख्या | ६७ | ७९ | ९० | ९१ | ३२७ |
| | एकुण | ११६ | ९४ | १०१ | ९७ | ४०८ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणीनुसार कोल्हाटी जमातीतील एकुण ४२० कुटुंबांची स्त्रियांच्या बाळंतपणासंबंधीची स्थिती पाहिली असता ८१ कुटुंबांमध्ये स्त्रियांचे बाळंतपण घरी झालेले आहे. तर ३२७ कुटुंबांमध्ये स्त्रियांचे बाळंतपण दवाखान्यात झालेले आढळून आले. यावरुना दवाखान्यात बाळंत होणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक दिसते. तर सोय नसल्यामुळे, आर्थिक परिस्थितीमुळे परवडत नसल्याने काही मोजक्या कुटुंबांमध्ये स्त्री चे बाळंतपण घरी केले जाते. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, बऱ्यापैकी बाळंतपणासाठी ७७.८५ टक्के शासकीय, वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत व ज्याठिकाणी नाहीत २० टक्के त्याठिकाणी पर्यायी घरी बाळंतपण केले जाते.

### तक्ता क्र. ४.४०

### कुटुंबांचे बाळंतपणातील मृत्यूचे प्रमाण

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आईचा मृत्यू | ०७ | ० | ०३ | ० | १० |
| २ | बाळाचा मृत्यू | ०९ | ० | ०२ | ० | ११ |
| ३ | दोघांचा मृत्यू | ०१ | ० | ० | ० | ०१ |
| | एकुण | १७ | ० | ०५ | ० | २२ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

तक्ता क्र. ४.४० मध्ये दिल्याप्रमाणे नेवासा व शेवगाव या दोन्ही तालुक्यांमध्ये बाळंतपणातील आईचा मृत्यू, बाळाचा मृत्यू व दोघांचा मृत्यू झालेला नाही. यावरुन या तालुक्यांमध्ये बाळंतपणाबद्दल म्हणजेच स्त्रीच्या आरोग्याची काळजी घेतली जाते असे स्पष्ट होते. नगर व जामखेड तालुक्यांमध्ये आई व बाळाच्या मृत्यूचे प्रमाण नगण्य आहे. याठिकाणीसुध्दा चिंताजनक आकडेवारी दिसून येत नाही. तक्ता क्र. ४.३९ मध्ये अभ्यासल्याप्रमाणे एकुण ४ तालुक्यामधील स्त्रियांचे बाळंतपण ७५ टक्के पेक्षा जास्त दवाखान्यात होत असल्याने मृत्यूचे प्रमाण कमी असणे साहजिकच आहे.

### ४.७.३. कोल्हाटी कुटुंबप्रमुखांची कुटुंब नियोजनाची माहिती–

### तक्ता क्र. ४.४१

### कुटुंबांचे कुटुंब नियोजनाचे प्रमाण

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुटुंब नियोजन करणारी कुटुंबे | १०८ (९३.१०) | ९४ (९०.३८) | ८२ (७९.६१) | ९२ (९४.८५) | ३७६ (८९.५२) |
| २ | कुटुंब नियोजन न करणारी कुटुंबे | ०८ (६.९०) | १० (९.६२) | २१ (२०.३९) | ०५ (५.१५) | ४४ (१०.४८) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कुटुंब नियोजन करणारे कुटुंब वैचारिक व शैक्षणिकदृष्टया प्रगत मानले जाते. तसेच संतती नियमनाचा अवलंब न करणारे कुटंब वैचारिक व शैक्षणिकदृष्टया मागास मानले जाते. लोकसंख्या वाढ ही देशाची गंभीर समस्या असून कुटुंब नियोजन करुन त्या समस्येचे निराकरण करण्यास मदत करणे हे प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे. ही जबाबदारी पूर्ण करण्यात कोल्हाटी जमातीतील बऱ्यापैकी कुटुंबांनी म्हणजेच कुटुंबप्रमुखांनी हातभार लावलेला दिसतो. तक्ता क्र. ४.४१ मधील प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणीनुसार नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव तालुक्यातील एकुण ४२० कुटुंबप्रमुखांपैकी ३७६ कुटुंबप्रमुखांनी कुटुंब नियोजन केले आहे. त्यांचे प्रमाण (८९.५२ टक्के) आहे. तर ४४ कुटुंबप्रमुखांनी अजूनही कुटुंब नियोजन केले नाही. त्याचे प्रमाण (१०.४८ टक्के) आहे. त्यापैकी सर्वाधीक कुटुंब नियोजनाचे प्रमाण नेवासा, शेवगाव तालुक्यामध्ये आहे. तर सर्वात कमी कुटुंब नियोजन जामखेड तालुक्यामध्ये आहे. यावरुन जामखेड तालुका वैचारिक व आरोग्यविषयक मागास वाटतो.

### ४.७.४. कोल्हाटी कुटुंबांची आरोग्य सुविधाविषयक माहिती–

**तक्ता क्र. ४.४२**

**सरकारी आरोग्य सुविधांची उपलब्धी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सरकारी कर्मचारी घरी येतात असे म्हणणारे | ८९ (७६.७२) | ८५ (८१.७३) | ९७ (९४.१७) | ६७ (६९.०७) | ३३८ (८०.४८) |
| २ | नाही म्हणणारे | २७ (२३.२८) | १९ (१८.२७) | ०६ (५.८३) | ३० (३०.९३) | ८२ (१९.५२) |
| | | ११६ (१००) | १०४ (१००) | १०३ (१००) | ९७ (१००) | ४२० (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.३८ नुसार नगर, नेवासा,जामखेड, शेवगाव या चार तालुक्यांमधील जास्तीत जास्त कुटुंबे खाजगी दवाखान्यामध्ये औषध–उपचार घेत असले तरी शासकीय आरोग्य सुविधा या कुटुंबांपर्यंत पोहचतात की नाही याचे विश्लेषण महत्वाचे ठरते. कारण

त्यावरुन शासनाचे ग्रामीण भागातील भटक्या विमुक्त जाती–जमाती तसेच ज्यांना खाजगी दवाखान्याची सेवा घेणे परवडत नाही अशा कुटुंबांकडे लक्ष आहे किंवा नाही हे समजते. तक्ता क्र. ४.४२ नुसार एकुण ४२० कुटुंबांपैकी ३३८ कुटुंबांचे सरकारी कर्मचारी घरी येतात असे दिसते. त्यांचे प्रमाण (८०.४८ टक्के) आहे. यावरुन ८० कुटुंबांपर्यत सरकारी कर्मचारी पोहचतात हे स्पष्ट होते. तर एकुण कुटुंबांपैकी ८२ कुटुंबांचे सरकारी कर्मचारी घरी येत नाहीत असे म्हणणे आहे म्हणजे २० कुटुंबांना शासकीय कर्मचारी व शासकीय सुविधांची माहिती मिळत नाही. यावरुन असा निष्कर्ष निघतो की ज्या ठिकाणी शक्य आहे त्या ठिकाणी सरकारी कर्मचारी व सेवा पुरविल्या जातात परंतु शेवटच्या व्यक्ती या घटकापर्यंत अजुनही त्यांचा अभाव आहे.

### ४.७.५. कोल्हाटी कुटुंबांची आजारांविषयक माहिती–

**तक्ता क्र. ४.४३**

**कुटुंबांची आजारानुसार होणारी विभागणी**

| अ.क्र. | तपशील | | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | थंडी/सर्दी/ खोकला/ताप | नेहमी होणारे संसर्ग | ९० (७८) | ७१ (६८) | ५३ (५२) | ७९ (८१) | २९३ (७०) |
| २ | कॅन्सर/हार्निया/ एड्स/कावीळ/ अपंग | मोठे रोग | १९ (१६) | ०४ (४) | ११ (११) | ०२ (२) | ३६ (९) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.४३ मधील प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणीनुसार नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या चारही तालुक्यांमधील एकुण ४२० कुटुंबांमध्ये थंडी, ताप, खोकला, सर्दी अशा किरकोळ आजारांचे अस्तित्व २९३ कुटुंबांमध्ये आढळते. त्याचे प्रमाण (७० टक्के) असून कॅन्सर,हार्निया, एड्स, कावीळ अशा मोठया आजारांचे अस्तित्व ३६ कुटुंबांमध्ये आढळते. त्यांचे प्रमाण एकुण कुटुंबसंख्येच्या (९ टक्के) आहे. यापैकी नगर व जामखेड या दोन्ही तालुक्यांमध्ये मोठे आजाराचे संसर्ग असणारे कुटुंब आढळतात तर नेवासा व शेवगाव मध्ये मोठया आजाराचे प्रमाण नगण्य म्हणजे (२.४ टक्के) आढळते. किरकोळ आजारांचे प्रमाण

चारही तालुक्यांमध्ये बऱ्यापैकी आढळते. यावरुन एकुण कुटुंबसंख्येपैकी केवळ सरासरी १० ते १२ कुटुंबे ही निरोगी आहेत असा निष्कर्ष निघतो.

## ४.८. कोल्हाटी जमातींच्या कुटुंबांची गुन्हेगारीविषयक स्थिती –

कोल्हाटी जमात ही भटक्या विमुक्त जमातीपैकी एक असून या जमातीमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण कमी असल्याचे दिसते. त्यासंबंधीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे


**तक्ता क्र. ४.४४**

**गुन्हेगारी संबंधी विश्लेषण**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गुन्हेगारीसंदर्भात केसेस झालेल्यांची संख्या | ०३ (२.५८) | ०१ (०.९६) | ०५ (४.८५) | ०१ (१.०३) | १० (२.३८) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

**आलेख क्र.४.९**




आधार –तक्ता क्र. ४.४४

संदर्भ ग्रंथांचा आढावा घेतला असता कोल्हाटी जमात ही एकेकाळी गुन्हेगारी जमातीमध्ये समाविष्ठ होती. १८७१ मध्ये गुन्हेगारी कायदा देशात लागू केला. या गुन्हेगार कायद्याने देशातील ४२ जाती गुन्हेगार ठरविल्या. त्यापैकी १४ जातींच्या लोकांना वसाहती स्थापन करुन तारेच्या कुंपणात बंदिस्त केले. परंतु या १४ जमातींमध्ये कोल्हाटी जमात नव्हती. तरीही कुठेतरी भटके विमुक्त म्हणून कायद्याने गुन्हेगारीचा शिक्का कपाळी मारला.

तक्ता क्र. ४.४४ मध्ये  हे सिध्द होते की, कोल्हाटी जमात ही गुन्हेगार जमात नसून उदरनिर्वाहासाठी पारंपारिक व्यवसायावर अवलंबून आहे. कारण नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या चार तालुक्यांमधील एकुण ४२० कुटुंबांपैकी केवळ १० कुटुंबांमध्ये गुन्हेगारी दिसून आली. त्याचे प्रमाण (२.३८ टक्के) आहे. त्यापैकी जामखेड तालुक्यामध्ये (४.८५ टक्के), गुन्हेगारी, नगर तालुक्यामध्ये (१.०३ टक्के) तर नेवासा तालुक्यात सर्वात कमी (०.९६ टक्के) गुन्हेगारीचे प्रमाण आढळले. यावरुन असा निष्कर्ष निघतो की शिक्षण व नोकरीचा अभाव असल्याने जामखेड व नगर तालुक्यांमध्ये या ठिकाणी कुठेतरी गुन्हेगारीकडे वळण्याचा प्रयत्न होत आहे.

या प्रकरणातील कोल्हाटी जमातीविषयक सामाजिक स्थितीचे अध्ययन केल्यानंतर जमातीविषयक आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे क्रमप्राप्त ठरते. प्रस्तुत प्रकरणामध्ये अहमदनगर जिल्हयातील नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या तालुक्यांमधील कोल्हाटी जमातीच्या ४२० कुटुंबांची प्रत्यक्ष पाहणी करुन त्यांचे आर्थिक प्रश्न जाणून घेण्यात आले आहेत. ही जमात उदरनिर्वाह व पोटाची खळगी भरण्यासाठी गावोगावी भटकत आहे. आपल्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी उपलब्ध साधने त्यांना अपूरी पडत आहेत. याठिकाणी केवळ पर्याय नाही म्हणून पारंपारिक व्यवसाय व भटकंती करणारी कुटुंबे आढळली. त्यांचे कुटुंब एका ठिकाणी स्थिर असले तरी त्या कुटुंबांतील कलावंतीन किंवा नाचकाम करणारी व्यक्ती वेळोवळी व्यवसायानिमित्त एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकताना दिसते. परिणामी त्या कुटुंबप्रमुख स्त्री व पुरुष यांचे पाल्याकडे लक्ष देणे शक्य होत नाही. बऱ्याच वेळा शिक्षण मोफत अजूनही भटकेपणामुळे व इतर आर्थिक गरजा पूर्ण होत नसल्याने या मुलांना शिक्षणापासनू दूर रहावे लागते. शिक्षण हे मानवाचे जीवन बदलून टाकते कोल्हाटी जमातीतील ज्या कुटुंबांमध्ये शिक्षण आहे त्या कुटुंबांची जीवनशैली आधुनिक बनली परंतु ज्यांनी आर्थिक, सामाजिक व

व्यावसायिक न्यूनगंड बाळगून शिक्षण घेतले नाही ती कुटुंबे आजही जातिव्यवस्था व पारंपारिक व्यावसायाचे दृष्टचक्र यामध्ये अडकून पडली आहेत.

देशातील इतर बाबींचा विचार केला तर अर्थव्यवस्था वेगाने विकासाकडे वाटचाल करताना दिसते. परंतु आजही भटक्या विमुक्त जाती–जमातीतील अर्थव्यवस्था ही मागासलेली असल्याचे दिसते. दारिद्रय, बेरोजगारी, निरक्षरता, पारंपारिक जातिव्यवस्थेचा पगडा, धार्मिक पगडा, अंधश्रध्दा, रुढी–परंपरा यांनी ग्रासलेल्या कोल्हाटी जमातीची अवस्था काही वेगळी नाही. जमातीमधील वार्षिक उत्पन्नाची पातळी अत्यंत कमी आहे. तसेच शासकीय नोकरीतील सहभाग कमी असून कुटुंबामध्ये बेकारांचा समावेश जास्त आहे. तसेच बऱ्याच कुटुंबात एकच व्यक्ती कमवती व उत्पन्नाच्या तुलनेत खाणारी तोंडे जास्त अशी परिस्थिती आढळते. अशावेळी अपर्यायास्तव पारंपारिक व्यवसायाचा आधार घेणे हा सोपा मार्ग ते निवडतात. या व्यवसायाला जोडधंदा किंवा पूरक व्यवसाय करताना जास्त कोणी आढळत नाही आणि ज्यांची इच्छा आहे त्यांना भांडवल, व्यावसायिक साधने, मनुष्यबळ यांची कमतरता असल्याचे स्पष्ट होते. तसेच जमातीचा व्यवसाय म्हणजेच नाचगाणे व मनोरंजन करणे याकडे इतर समाजाचा दृष्टीकोन तिरस्काराचा असल्याने जमातीतील मुलांना अवहेलना, द्वेष यांचा सामना करावा लागतो. या मुलांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो आणि हे एक शिक्षणापासून वंचितता असण्यामागचे कारण आहे. परंतु पूर्वीच्या तुलनेत जमातीची शैक्षणिक स्थिती व आर्थिक स्थितीत बदल आहे. जमात परिवर्तनाच्या मार्गावर आहे.

कोल्हाटी जमातीची आर्थिक स्थिती जाणून घेण्यासाठी महत्वाची आर्थिक निर्देशके व संबंधित घटकांची पडताळणी करण्यात आली आहे. त्यामध्ये सध्याचा व्यवसाय, पूर्वीचा व्यवसाय, सध्याची आर्थिक स्थिती, पूर्वीची आर्थिक स्थिती, रोजगार, दारिद्रयाचे प्रमाण, वार्षिक व मासिक उत्पन्न, खर्चाची पातळी, कर्ज व शेतीविषयक माहिती, स्थावर मालमत्ता, उपभोग्य वस्तू, चैनीच्या वस्तू, आरोग्यविषयक सोयी–सुविधा, राहणीमानाची पातळी, मूलभूत गरजा इ. महत्वाच्या बाबींचा आढावा घेऊन अहमदनगर जिल्हयातील निवडक नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव या ४ तालुक्यांमधील आर्थिक विकासाचा स्तर व आर्थिक विषमतेचा स्तर कसा आहे ते नमूद करण्यात आले आहे.

## ४.९. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातींच्या कुटुंबांची रोजगारविषयक स्थिती–

रोजगारविषयक स्थितीचे विश्लेषण करताना प्रथम प्रत्यक्ष पाहणीतील ४२० कुटुंबांची प्रथम कुटुंबप्रमुख स्त्री व कुटुंबप्रमुख पुरुष यांची संख्या विचारात घेतली आहे. त्यानुसार कुटुंब प्रमुख स्त्री सध्याचा व्यवसाय व पूर्वीचा व्यवसाय तसेच कुटुंबप्रमुख पुरुष सध्याचा व्यवसाय व पूर्वीचा व्यवसाय यांचे तुलनात्मक अध्ययन करण्यात आले आहे. पुढे जाऊन पारंपारिक व्यवसायाला केंद्रीत करुन त्याची पुन्हा उपविभागणी करुन स्त्री–पुरुष यांचे पारंपारिक व्यवसायातील प्रमाण लक्षात घेतले आहे.

### ४.९.१. कोल्हाटी कुटुंबांची व्यवसायविषयक माहिती –

**तक्ता क्र. ४.४५**

**पूर्वीच्या व्यवसायासंबंधी कुटुंबांची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्त्री | पारंपारिक व्यवसाय | ५९ (५१) | १७ (१६) | ५५ (४१) | ४० (४१) | १७१ (४१) |
| | | शेती | – | ०३ (३) | – | ०१ (०१) | ०४ (०१) |
| | | घरगुती उदयोग | – | – | – | – | |
| | | इतर | – | ०१ (०१) | ०१ (०१) | ०२ (२) | ०४ (०४) |
| २ | पुरुष | पारंपारिक व्यवसाय | – | – | – | – | |
| | | शेती | १८ (१६) | ५३ (५१) | १७ (१७) | ३८ (३९) | १२६ (३०) |
| | | नोकरी | – | ०३ (०३) | ०२ (०२) | ०३ (०३) | ८ (०२) |
| | | व्यापार व उदयोग | ०१ (०५) | – | ०५ (०५) | ०५ (०५) | ११ (३) |
| | | इतर | ३८ (३३) | २७ (२७) | २३ (२३) | ०८ (०८) | ९६ (२३) |
| | | एकुण | ११६ (१००) | १०४ (१००) | १०३ (१००) | ९७ (१००) | ४२० (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

अहमदनगर जिल्हयातील नगर,नेवासा,जामखेड, शेवगाव या चार तालुक्यांमधील प्रत्यक्ष पाहणीनुसार स्त्री कुटुंबप्रमुख संख्या विचारात घेऊन पूर्वीच्या व्यवसायासंबंधी अध्ययन केले असता तक्ता क्र. ४.४५ नुसार नगर तालुक्यामध्ये एकुण ५९ स्त्री कुटुंब प्रमुखांपैकी ५९ कुटुंबांमध्ये पारंपारिक व्यवसाय केला जात होता. म्हणजेच त्याठिकाणी (१०० टक्के) पारंपारिक व्यवसाय स्त्री कुटुंबांमध्ये केला जात होता. त्याचप्रमाणे नगर तालुक्यात एकुण ५७ पुरुष कुटुंब प्रमुखांपैकी पारंपारिक व्यवसाय ५ कुटुंबे (८.७८ टक्के) तर १३ कुटुंबे (२२.८० टक्के) शेती करत होते. १ कुटुंब म्हणजेच (१.७६टक्के) व्यापार व उदयोग व्यवसाय करत असे तर ३८ कुटुंबे म्हणजेच (६६.६६ टक्के) प्रमाणात कुटुंबे इतर व्यवसाय उदयोग करत असे. याठिकाणी नगर तालुक्यामध्ये पूर्वी एकाही कुटुंबांमध्ये नोकरी केली जात नसे असे लक्षात येते. यानंतर नेवासा तालुक्याचे अध्ययन केले असता एकुण २१ स्त्री कुटुंबप्रमुखांपैकी १७ कुटुंबप्रमुख पारंपारिक व्यवसाय करत होते तर त्यांचे प्रमाण (८०.९५ टक्के) टक्के होते. ३ कुटुंबांमध्ये म्हणजे (१४.२९ टक्के) प्रमाणात शेती केली जात होती. नेवासा तालुक्यातील स्त्री कुटुंबप्रमुख कुटुंबांमध्ये एकही कुटुंब घरगुती उदयोग करत नाही. त्याचप्रमाणे ०१ कुटुंब इतर व्यवसाय करताना दिसते. अशाप्रकारे स्त्री कुटुंबप्रमुखांची पूर्वीच्या व्यवसायासंबंधी विभागणी लक्षात येते. त्याचप्रमाणे नेवासा तालुकामधील ८३ पुरुष कुटुंबप्रमुखांपैकी एकाही कुटुंबांमध्ये पारंपारिक व्यवसाय केला जात नव्हता तर त्यापैकी ५३ कुटुंबे (६३.८६टक्के), नोकरीमध्ये ३ कुटुंबे (३.६१ टक्के), २७ कुटुंबे (३२.५३ टक्के) अशी विभागणी होती. तसेच एकाही कुटुंबामध्ये व्यापार उदयोग केला जात नव्हता. यावरुन नेवासा तालुक्यामध्ये शेतीचे प्रमाण जास्त असून स्त्री–पुरुष दोन्हींचा विचार केला असता पारंपारिक व्यवसायाचे प्रमाण इतर तालुक्यांच्या तुलनेत कमी नगण्य आहे. त्यानंतर स्त्री कुटुंब प्रमुखांची सर्वात जास्त संख्या व प्रमाण असणाऱ्या जामखेड तालुक्याचा अभ्यास केला असता एकुण ५६ स्त्री कुटुंब प्रमुखांपैकी ५५ कुटुंबांमध्ये (९८.२१टक्के) प्रमाणात पारंपारिक व्यवसाय होता तर केवळ एका कुटुंबामध्ये (१.७९टक्के) इतर व्यवसाय होता असे दिसते. त्याचप्रमाणे एकुण ४७ पुरुष कुटुंब प्रमुखांच्या कुटुंबांपैकी १३ कुटुंबांमध्ये (२७.६६ टक्के) शेती व्यवसाय केला जात होता. २ कुटुंबांमध्ये (४.२६ टक्के) नोकरी, ०५ कुटुंबांमध्ये (१०.६३ टक्के) व्यापार व उदयोग आणि २० कुटुंबे (४२.५५टक्के) इतर म्हणजेच शेतमजुरी, मोल–मजूरी,मिळेल ती कामे करत होती.

तसेच चारही तालुक्यांपैकी पुरुष कुटुंबप्रमुखांच्या कुटुंबामध्ये जामखेड तालुक्यामध्ये सर्वाधिक पारंपारिक व्यवसाय ०७ कुटुंबांमध्ये (१४.९०टक्के) केला जातो. यावरुन इतर तालुक्यांच्या तुलनेत पूर्वी जामखेड तालुक्यामध्ये नगरप्रमाणेच पारंपारिक व्यवसायाचे प्रमाण जास्त आहे. कारण शेवगाव तालुक्यामध्ये एकुण ४३ स्त्री कुटुंबप्रमुखांच्या कुटुंबांपैकी ४० कुटुंबे (९३.०२टक्के) पारंपारिक व्यवसाय करत होते तर २ कुटुंबांमध्ये (४.६५टक्के) इतर व्यवसाय केला जात होता. तर एकुण ५४ पुरुष कुटुंब प्रमुखांपैकी ३८ कुटुंबे (७०.३८ टक्के) शेती, ०३ कुटुंबे (५.५५टक्के), नोकरी ०५ कुटुंबे (९.२६टक्के) व्यापार व उदयोग, आणि ०८ कुटुंबे (१४.८१टक्के) इतर व्यवसायात होती यावरुन चारही तालुक्यांमध्ये पूर्वीचा व्यवसाय जास्त प्रमाणात पारंपारिक व्यवसाय असून त्यामध्ये प्रथक क्रमांकावर नगर खालोखाल जामखेड, शेवगाव, नेवासा असा क्रम दिसतो.

**तक्ता क्र. ४.४६**

**सध्याच्या व्यवसायासंबंधी कुटुंबांची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्त्री | पारंपारिक व्यवसाय | ५८(५०) | १७(१६) | ५५(५३) | ३२(३३) | १६२(३९) |
| | | शेती | – | ०३(३) | – | ०१(१) | ०४(१) |
| | | घरगुती उदयोग | – | – | – | ०२(२) | ०२० |
| | | इतर | ०१(१) | ०१(१) | ०१(१) | ०८(८) | ०३(८) |
| २ | पुरुष | पारंपारिक व्यवसाय | ०२(२) | – | ०५(५) | ० | ०७(२) |
| | | शेती | १३(११) | ४८(४६) | १६(१६) | ३१(३२) | १०८(२६) |
| | | नोकरी | ११(९) | २०(१९) | ०४(४) | १३(१३) | ४८(११) |
| | | व्यापार व उदयोग | ११(९) | ०१(१) | १२(१२) | ०४(४) | २८(७) |
| | | इतर | २०(१७) | १४(१३) | १०(१०) | ०६(६) | ५०(१२) |
| | | एकुण | ११६ (१००) | १०४ (१००) | १०३ (१००) | ९७ (१००) | ४२० (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

अहमदनगर जिल्हयातील नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या चार तालुक्यांमधील प्रत्यक्ष पाहणीनुसार पूर्वीच्या व्यवसायासंबंधी विश्लेषणानंतर ज्या माहितीवर या जमातींची सद्यस्थितीतील आर्थिकता अवलंबून आहे तो घटक म्हणजे एकुण ४२० कुटुंबांचा सध्याचा व्यवसाय होय. हा घटक अभ्यासतानासुध्दा स्त्री कुटुंबप्रमुख व पुरुष कुटुंबप्रमुखांची वेगवेगळी माहिती संकलित करुन त्यांच्या सध्याच्या उदरनिर्वाहाचे साधनाची नोंद केली आहे. चार तालुक्यांपैकी नगर तालुक्यामधील एकुण ५९ स्त्री कुटुंबप्रमुखांपैकी ५८ कुटुंबे म्हणजेच जेमतेम पूर्वी इतकीच कुटुंबे पारंपारिक व्यवसाय करतात तर पुरुष कुटुंबप्रमुखांच्या कुटुंबांची पारंपारिक व्यवसायाची संख्या ३ ने कमी झाली असून सध्या २ कुटुंबे (३.५०टक्के) पारंपारिक व्यवसाय करताना दिसतात. त्याचप्रमाणे सध्या शेती १३ कुटुंबे (२२.८१टक्के) नोकरी ११ कुटुंबे (१९.३०टक्के) कुटुंबे, व्यापार व उदयोग ११ कुटुंबे (१९.३०टक्के), तर इतर कामे २० कुटुंबे (३५.०९टक्के) करताना दिसतात. यामध्ये नगरमध्ये एकही कुटुंब पूर्वी नोकरी करीत नव्हते परंतु सद्यस्थितीत ११ कुटुंबांमध्ये नोकरी करताना पुरुष कुटुंबप्रमुख आढळते.

**तक्ता क्र. ४.४७**

**स्त्री पारंपारिक व्यावसायाची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रस्त्यावर कसरतीचे खेळ करणे | ०४(७) | ०७(४१) | १३(२४) | ० | २४(१५) |
| २ | तमाशा फडात नाचकाम | ०४(७) | ०४(२४) | ०९(१६) | १४(४४) | ३१(१९) |
| ३ | दिवाणखाना | १२(२१) | ०२(१२) | ०९(१६) | ०७(२२) | ३०(१९) |
| ४ | कलाकेंद्रात नृत्य करणाऱ्या | ३१(५३) | ०४(२४) | १३(२४) | ०७(२२) | ५५(३४) |
| ५ | पार्टी मालकीन | ०५(९) | – | ०९(१६) | ०४(१३) | १८(११) |
| ६ | कलाकेंद्र मालक | ०२(३) | – | ०२(४) | – | ०४(२) |
| | एकुण | ५८ | १७ | ५५ | ३२ | १६२ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कोल्हाटी जमातीतील पारंपारिक व्यवसायाचा पगडा लक्षात घेता पारंपारिक व्यवसायाची उपविभागणी करण्यात आली असून प्रत्यक्ष पाहणीनुसार जे उपविभाग दिसून आले

ते ६ प्रकारचे आहेत. या कलावंतीनीमध्ये रस्त्यावर कसरतीचे खेळ करणाऱ्या, तमाशा फडात नाचकाम करणाऱ्या, दिवाणखान्यामध्ये नाचकाम करणाऱ्या, कलाकेंद्रात नाचकाम करणाऱ्या कलाकेंद्रात पार्टी मालकीन संगीतबारी चालवणाऱ्या तर कलाकेंद्राची मालकीन म्हणून काम पाहणाऱ्या असे उपविभाग दिसून आले. नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या चार तालुक्यांमध्ये एकुण १७९ स्त्री कुटुंबप्रमुखांपैकी १६२ स्त्री कुटुंबप्रमुख अजूनही सदयस्थितीत पारंपारिक व्यवसाय करतात तर २४१ पुरुष कुटुंबप्रमुखांपैकी केवळ ०७ पुरुष सद्यस्थितीत पारंपारिक व्यवसाय करतात. नगर तालुक्यातील एकुण ५८ कलावंतीनीपैकी ०४ कुटुंबप्रमुख स्त्रिया या ६० वर्षाच्या पुढील असून त्यापूर्वी रस्त्यावर खेळ करीत होत्या. ०४ कुटुंब प्रमुख स्त्रिया आजही तमाशा फडात नाचकाम करतात. दिवाणखान्यामध्ये नाचकाम करणाऱ्या कुटुंबप्रमुख स्त्रियांची संख्या ४ तालुक्यांमध्ये सर्वात जास्त म्हणजेच १२ आहे. कलाकेंद्रात नृत्य करणाऱ्या कुटुंबप्रमुख स्त्रियांची संख्यासुध्दा सर्वाधिक ३१ आहे. ५ कुटुंब प्रमुख स्त्रिया पार्टीमालकीन रंगीतबारी चालवितात. तर ०२ कुटुंब प्रमुख स्त्रिया कलाकेंद्राच्या मालक आहेत. अशाप्रकारे नगर तालुक्यामध्ये उपविभागातील कलाकेंद्रात नाचकाम करणाऱ्या स्त्रियांची संख्या जास्त आहे. त्यानंतर नेवासा तालुक्यातील १७ कलावंतीन स्त्रियांपैकी ७ कुटुंबप्रमुख स्त्रिया रस्त्यावर कसरतीचे खेळ करत असे. त्यांचे वय ६० च्या पुढे आहे. ४ कुटुंबप्रमुख स्त्रिया तमाशा फडात नाचकाम करताना दिसतात. केवळ २ कुटुंबप्रमुख स्त्रिया दिवाणखाण्यात नाचकाम करताना दिसतात. ०४ कुटुंबप्रमुख स्त्रिया कलाकेंद्रात नृत्य करतात तर संगीतबारी चालविणारी व कलाकेंद्राचे मालक म्हणून काम करणारी एकही कुटुंबप्रमुख स्त्री आढळली नाही. जामखेड तालुक्यामध्ये एकुण ५५ कलावंतीनीपैकी १३ कुटुंबप्रमुख स्त्रिया रस्त्यावर कसरतीचे खेळ करुन आपले पोट भरत होत्या. ०९ कुटुंबप्रमुख स्त्रिया तमाशाफडात नाचकाम करतात. ०९ कुटुंबप्रमुख स्त्रिया दिवाणखान्यामध्ये नाचकाम करतात. १३ कुटुंबप्रमुख स्त्रिया कलाकेंद्रात नाचकाम करतात. तर सर्वाधिक संगीतबारी चालविणाऱ्या कुटुंबप्रमुख स्त्रियांमध्ये जामखेडचा क्रमांक असून त्यांची संख्या ०९ आहे. तर ०२ कुटुंबप्रमुख स्त्रीया कलाकेंद्राच्या मालक आहेत. त्याचप्रमाणे शेवगाव तालुक्यामध्ये एकुण ३२ कलावंतीनीपैकी एकही कलावंतीन रस्त्यावर खेळ करण्याचे काम करत नाही किंवा नव्हती तर सर्वाधिक तमाशा फडात नाचकाम करणाऱ्या कुटुंब प्रमुख स्त्रियांची संख्या १४ ही शेवगावमध्ये आहे. तर ०७ कुटुंबप्रमुख स्त्रिया दिवाणखान्यामध्ये

नाचकाम करतात. तर ०७ कुटुंबप्रमुख स्त्रिया कलाकेंद्रात नाचकाम करतात. याठिकाणी ०४ कुटुंबप्रमुख स्त्रियात सर्वात कमी संगीतबारी चालविताना दिसतात तर एकही कुटुंबप्रमुख स्त्री कलाकेंद्राची मालक नाही. अशाप्रकारे स्त्री कलावंतीनीच्या कार्य विभागणीवरुन असा निष्कर्ष निघतो की, चारही तालुक्यांमध्ये कलाकेंद्रात नाचकाम करणाऱ्या कुटुंबप्रमुख स्त्रियांची संख्या सर्वाधिक असून नगर व जामखेड तालुक्यांमध्ये त्यांचे प्रमाण जास्त आहे. त्याखालोखाल तमाशा फडात व दिवाणखान्यात काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या अनुक्रमे ३१ व ३० आहे. त्यापैकी शेवगाव तालुक्यात तमाशा फडात नाचकाम करणाऱ्या व नगर, जामखेड तालुक्यामध्ये दिवाणखान्यात नाचकाम करणाऱ्या कुटुंबप्रमुख स्त्रियांची संख्या जास्त आहे. जामखेडमध्ये संगीतबारी चालविण्याचे काम सर्वाधिक केले जाते. तर कलाकेंद्राचे मालक असणाऱ्या कुटुंब प्रमुख स्त्रिया केवळ नगर व जामखेडमध्ये आढळतात.

**तक्ता क्र. ४.४८**

**पुरुष पारंपारिक व्यावसायाची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कलाकेंद्राचे मालक | – | – | ०२ | – | ०२ |
| २ | कलाकेंद्र/तमाशा फड याठिकाणी मदतनीस | ० | ० | ०१ | ० | ०१ |
| ३ | कलाकेंद्र/तमाशा फड सोंगाडया | ०१ | ० | ०१ | ० | ०२ |
| ४ | पेटीवादक/तबला वादक | ०१ | – | ०१ | ० | ०२ |
| | एकुण | ०२ | ० | ०५ | ० | ०७ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

तक्ता क्र. ४.४७ प्रमाणेच तक्ता क्र.४.४८ मध्ये चारही तालुक्यांमधील पारंपारिक व्यवसाय करणऱ्या एकुण ०७ कुटुंबप्रमुख पुरुषांची कामाची उपविभागणी केली आहे. त्यामध्ये कलाकेंद्राचे मालक, कलाकेंद्र/तमाशाफड याठिकाणी मदतनीस, कलाकेंद्र/तमाशाफड याठिकाणी सोंगाडया, पेटीवादक/तबलावादक यांचा समावेश केला आहे. या ०७ कलावंत कुटुंबप्रमुख पुरुषांपैकी नेवासा व शेवगाव तालुक्यामध्ये एकही कुटुंबप्रमुख पुरुष पारंपारिक व्यवसाय करत नाही तर नगर तालुक्यामध्ये ०१ कुटुंबप्रमुख पुरुष सोंगाडया म्हणून काम करतो

तर ०१ कुटुंबप्रमुख पुरुष पेटी व तबला वादनाचे काम करतो. तर शेवगाव तालुक्यामधील ०४ कलावंत कुटुंबप्रमुख पुरुषांपैकी ०२ कलाकेंद्राचे मालक, ०१ कलाकेंद्र/तमाशाफड याठिकाणी मदतनीस, ०१ सोंगाडया व ०१ पेटी व तबलावादक म्हणून काम करतात. यावरुन नेवासा व शेवगाव तालुक्यामधील पूर्णपणे सर्व कुटुंबप्रमुख पुरुषांनी उदरनिर्वाहासाठी पारंपारिक व्यवसायाला विरोध केल्याचे दिसते. तर नगर व शेवगाव तालुक्यामध्ये ते प्रमाण अत्यल्प आहे.


**तक्ता क्र. ४.४९**

**कुटुंबातील व्यक्तिंची व्यवसायानुसार विभागणी**

| अ. क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पारंपारिक व्यवसाय | ११० (२०.३०) | ३५ (७.३५) | १४४ (२४.०४) | ५५ (११.६८) | ३४४ (१६.४८) |
| २ | शेती स्वतः | १४ (२.५८) | ६४ (१३.४५) | २० (३.३४) | ४७ (९.९८) | १४५ (६.९४) |
| ३ | मजूर | २७ (४.९८) | १९ (३.९९) | २० (३.३४) | १४ (२.९७) | ८० (३.८३) |
| ४ | खाजगी/शासकीय नोकरी | ३७ (६.८३) | ४७ (९.८७) | २७ (४.५१) | ४२ (८.९२) | १५३ (७.३३) |
| ५ | उद्योग/व्यवसाय | २३ (४.२४) | १० (२.१०) | १० (१.६७) | ७ (१.४९) | ५० (२.३९) |
| ६ | गृहिणी | ८९ (१६.४२) | १०४ (२१.८५) | ९२ (१५.३६) | ९४ (१९.९६) | ३७९ (१८.१५) |
| ७ | शिक्षण | १८७ (३४.५०) | १७१ (३५.९२) | २२५ (३७.५६) | १६२ (३४.३९) | ७४५ (३५.६८) |
| ८ | इतर | ५५ (१०.१५) | २६ (५.४६) | ६१ (१०.१८) | ५० (१०.६२) | १९२ (९.२०) |
| | एकुण | ५४२ (१००) | ४७६ (१००) | ५९९ (१००) | ४७१ (१००) | २०८८ (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

**आलेख क्र. ४.१०**




आधार – तक्ता क्र.४.४९

प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणीमध्ये केवळ कुटुंबप्रमुखांच्या व्यवसायाचा विचार न करता कुटुंबांतील व्यक्तींची व्यवसायावर विभागणी तक्ता क्र. ४.४९ मध्ये केली आहे. ज्यावेळी पूर्ण कुटुंबाची आर्थिकता अभ्यासायची असेल तर कुटुंबातील व्यक्तींचा व्यवसाय अभ्यासणे अनिवार्य ठरते. प्रकरण क्र. ४ मध्ये नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव या चार तालुक्यांमधील एकुण स्त्री व पुरुष लोकसंख्येचा अभ्यास केला आहे. त्यानुसार चार तालुक्यांमध्ये २०८८ लोकसंख्या आढळते. त्यापैकी नगर तालुक्यातील ५४२ लोकसंख्येची व्यवसायवार विभागणी केली असता एकुण ११६ कुटुंबांमधील ११० लोक पारंपारिक व्यवसाय करतात. त्यांचे प्रमाण (२०.३० टक्के) आहे तर १४ लोक (०२.५८ टक्के) स्वतः शेती करतात. २७ लोक (४.९८ टक्के) मजूर म्हणून काम करतात. ३७ लोक (६.८३ टक्के) नोकरी करतात. एकुण लोकसंख्येतील ८९ स्त्रिया (१६.४२ टक्के) गृहिणी म्हणून जीवन व्यतीत करतात. तर कुटुंबातील १८७ मुले–मुली (३४.५० टक्के) शिक्षण घेतात व उरलेले ५५ लोक (१०.१५ टक्के) इतर कामे म्हणजेच जोड व्यवसाय, लहान –मोठे उदयोगधंदे, घरगुती उदयोग अशी

कामे करतात. यावरुन नगर तालुक्यामध्ये केवळ व्यवसायामध्ये पारंपारिक व्यवसायाचे प्रमाण जास्त आहे. त्यानंतर नेवासा तालुक्यामध्ये ४७६ एकुण लोकसंख्येपैकी अनुक्रमे पारंपारिक व्यवसाय ३५ लोक (७.३५ टक्के), स्वतः शेती ६४ लोक (१३.४५ टक्के), मजूरी १९ लोक (३.९९ टक्के), नोकरी ४७ लोक (९.८७ टक्के), उदयोग /व्यवसाय १० लोक (२.१० टक्के), तर १०४ गृहिणी (२१.८५ टक्के), शिक्षण १७१ (३५.९२ टक्के) व इतर २६ लोक (५.४६ टक्के) अशी कुटुंबातील व्यक्तींची व्यवसायवार विभागणी आहे. यावरुन नेवासा तालुक्यात पारंपारिक व्यवसायाला कमी प्राधान्य दिले जाते. तर शेती करणारे, नोकरी करणारे त्याचप्रमाणे गृहीणींची संख्या चारही तालुक्यांमध्ये तुलनात्मक सर्वात जास्त आहे. जामखेड तालुक्यामध्ये एकुण ५९९ लोकसंख्येपैकी १४४ लोक (२४.०४ टक्के) पारंपारिक व्यवसाय करतात तर ही संख्या चारही तालुक्यांमध्ये तुलनात्मक सर्वाधिक आहे. त्याचप्रमाणे स्वतः शेती २० लोक (३.३४ टक्के), २० लोक मजूर (३.३४ टक्के), २७ लोक नोकरी (४.५१ टक्के), उद्योग व व्यवसाय १० लोक (१.६७ टक्के), ९२ स्त्रिया गृहिणी (१५.३६ टक्के) तर २२५ मुले–मुली शिक्षण (३७.५६ टक्के), ६१ लोक (१०.१८ टक्के) इतर कामे करतात. यावरुन जामखेड तालुक्यामध्ये सर्वाधिक पारंपारिक व्यवसायाला कुटुंबातील व्यक्ती प्राधान्य देताना दिसतात तसेच सर्वात कमी नोकरदारांची संख्या आहे. शेवगाव तालुक्यामध्ये एकुण ४७१ लोकसंख्येपैकी ५५ लोक (११.६८ टक्के) पारंपारिक व्यवसाय, ४७ लोक (९.९८ टक्के) स्वतः शेती, १४ लोक (२.९७ टक्के), मजूर, ४२ लोक (८.९२ टक्के) नोकरी, ७ लोक (१.४९ टक्के) उदयोग/व्यवसाय तर ९४ स्त्रिया (१९.९६ टक्के) गृहिणी, १६२ मुले–मुली (३४.३९ टक्के) शिक्षण, ५० लोक (१०.६२ टक्के) इतर कामे करतात. यावरुन नेवासा तालुक्यानंतर पारंपारिक व्यवसायाला कमी प्राधान्य देण्यामध्ये शेवगावचा दुसरा क्रमांक लागतो.

## ४.१० अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातींच्या कुटुंबांचे उत्पन्नविषयक स्थिती–

संशोधन अभ्यासामध्ये समाजाचे आर्थिक विश्लेषण अभ्यासत असताना अभ्यास क्षेत्रातील कुटुंबांचा व्यवसायाबरोबरच उत्पन्नविषयक माहितीचा आढावा घेणे गरजेचे असते. त्यासाठी कोल्हाटी कुटुंबांची उत्पन्नविषयक माहिती पुढीलप्रमाणे.


### तक्ता क्र. ४.५०

### कुटुंबाची वार्षिक उत्पन्नानुसार विभागणी

| अ. क्र. | तपशील (रक्कम रु) | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५० हजार | ४७ (४०.५२) | ४० (३८.४६) | ६३ (६१.१७) | ४४ (४५.३६) | १९४ (४६.१९) |
| २ | ५० हजार ते १ लाख | २५ (२१.५५) | १६ (१५.३८) | १६ (१५.५३) | १२ (१२.३७) | ६९ (१६.४३) |
| ३ | १ लाख ते २ लाख | ३० (२५.८६) | २३ (२२.१२) | १२ (११.६५) | २१ (२१.६५) | ८६ (२०.४८) |
| ४ | २ लाख ते ५ लाख | १४ (१२.०७) | २५ (२४.०४) | १२ (११.६५) | २० (२०.६२) | ७१ (१६.९०) |
| | एकुण | ११४ (१००) | १०४ (१००) | १०३ (१००) | ९७ (१००) | ४२० (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

### आलेख क्र. ४.११




आधार – तक्ता क्र. ४.५०

अहमदनगर जिल्हयातील नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या तालुक्यांमधील कोल्हाटी जमातीची वार्षिक उत्पन्नाची पातळी विचारात घेताना विविध उत्पन्न गट तयार केले आहेत. प्रत्येक उत्पन्न गटात तालुकानिहाय किती कुटुंबांचा समावेश होतो तसेच त्याचे प्रमाण किती आहे हे दर्शविले आहे. शेकडा प्रमाण काढताना त्या–त्या तालुक्यातील एकुण कुटुंब संख्या विचारात घेऊन प्रमाण काढलेले आहे. तक्ता क्र. ४.५० वरुन असे स्पष्ट होते की, १० ते ५० हजाराच्या दरम्यान वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंब संख्येमध्ये जामखेड तालुक्यातील सर्वाधिक ६३ कुटुंबांचा समावेश होतो म्हणजेच एकुण ४ तालुक्यातील १९४ कुटुंबापैकी सर्वाधिक (६१.१७ टक्के) कुटुंबे जामखेडमध्ये १० ते ५० हजार या उत्पन्नगटात असून या उत्पन्नगटात सर्वात कमी कुटुंबे नेवासा तालुक्यात ४० व त्यांचे प्रमाण (३८.४६ टक्के) आहे. तसेच ५० हजार ते १ लाख या उत्पन्न गटात सर्वात जास्त कुटुंबांची संख्या नगर तालुक्यामध्ये (२१.५५ टक्के) असून नेवासा व जामखेड या दोन्ही तालुक्यांमध्ये ती १६ कुटुंब संख्या म्हणजेच सारखी आहे. तर शेवगाव तालुक्यामध्ये या उत्पन्न गटात ती सर्वात कमी १२ (१२.३७ टक्के) प्रमाणात आहे. त्याचप्रमाणे १ ते २ लाख या मध्यम उत्पन्न गटामध्ये सर्वाधिक कुटुंबांचे प्रमाण नगर (२५.८६ टक्के), त्याखालोखाल नेवासा (२२.१२ टक्के), शेवगाव (२१.६५ टक्के) तर शेवटी जामखेड (११.६५ टक्के) आहे. तर २ लाख ते ५ लाख या उच्च उत्पन्न गटामध्ये सर्वाधिक कुटुंब संख्या नेवासा तालुक्यामध्ये २५ असून ती (२४.०४ टक्के) या प्रमाणात आहे. त्याखालोखाल या गटात शेवगाव तालुक्यामध्ये २० कुटुंबे (२०.६२ टक्के), नगर तालुक्यामध्ये १४ कुटुंबे (१२.०७ टक्के) व शेवटी जामखेड १२ कुटुंबे (११.६५ टक्के) या प्रमाणात आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, चारही तालुक्यांमध्ये १० ते ५० हजार उत्पन्न गटात म्हणजेच दारिद्र्य रेषेखालील १९४ कुटुंबांमध्ये सर्वात जास्त जामखेड तालुक्यातील कुटुंबांचा समावेश आहे. तर अल्प उत्पन्न गट म्हणजेच ५० हजार ते १ लाख उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांमध्ये सर्वाधिक नगर तालुक्यातील कुटुंबांचा समावेश आहे. तर मध्यम उत्पन्न गटामध्ये व उच्च उत्पन्न गटामध्ये नेवासा तालुक्यातील कुटुंब संख्या प्रथम क्रमांकावर आहे आणि जामखेड व नगर हे २ तालुके तुलनात्मकदृष्टया आर्थिक मागासलेले दिसतात.


### तक्ता क्र. ४.५१

### कुटुंबांची मासिक उत्पन्नानुसार विभागणी

| अ. क्र. | तपशील (रक्कम रु) | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५०० ते ३००० | ४७ (४०.५२) | ४० (३८.४६) | ६३ (६१.१७) | ४४ (४५.३६) | १९४ (४६.१९) |
| २ | ३००० ते ६००० | २५ (२१.५५) | १६ (१५.३८) | १६ (१५.५३) | १२ (१२.३७) | ६९ (१६.४३) |
| ३ | ६००० ते १०००० | ३० (२५.८६) | २३ (२२.१२) | १२ (११.६५) | २१ (२१.६५) | ८६ (२०.४८) |
| ४ | १०००० पेक्षा जास्त | १४ (१२.०७) | २५ (२४.०४) | १२ (११.६५) | २० (२०.६२) | ७१ (१६.९०) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

### आलेख क्र. ४.१२




आधार – तक्ता ४.५१

तक्ता क्र.४.५० मधील प्रत्यक्ष पाहणीप्रमाणेच मासिक उत्पन्नाची विभागणी अतिअल्प, अल्प, मध्यम व उच्च मासिक उत्पन्न गटात करण्यात आली आहे. त्यानुसार तक्ता क्र. ४.५१

नुसार वरील सर्व समान निष्कर्ष लागू होतात. जामखेड तालुक्यातील अतिअल्प उत्पन्न गटातील कुटुंबांचे प्रमाण सर्वात जास्त असून ते (६१.१७ टक्के) आहे तर नेवासा तालुक्यातील अतिअल्प उत्पन्न गटातील कुटुंबे सर्वात कमी (३८.४६ टक्के) आहेत. उच्च उत्पन्न गट म्हणजेच १० हजारापेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांची संख्या नेवासा तालुक्यामध्ये २५ असून (२४.०४ टक्के) आहे तर सर्वात कमी जामखेड तालुक्यामध्ये १२ असून (११.६५ टक्के) आहे. त्याचप्रमाणे एकुण निवडलेल्या ४२० कुटुंबांचा विचार केला असता सर्वाधिक कुटुंब संख्या अतिअल्प म्हणजेच १५ हजार ते ३० हजार या उत्पन्न गटात १९४ कुटुंबे असून (४६.१९ टक्के) आहे. यावरुन पुन्हा मासिक उत्पन्नातसुध्दा नेवासा व शेवगाव तालुक्यातील ही जमात तुलनात्मकदृष्टया पुढारलेली आहे तर नगर व जामखेड तालुक्यात आर्थिकदृष्टया मागासलेली आहे.

**तक्ता क्र. ४.५२**

**कुटुंबांची आर्थिक परिस्थितीनुसार सद्यस्थितीतील विभागणी**

| अ. क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उत्तम | ०६ (५.१७) | २० (१७.२४) | ०५ (४.८५) | १८ (१८.५६) | ४९ (११.३४) |
| २ | चांगली | ३० (२५.८६) | ४६ (३९.६६) | १२ (११.६५) | ३० (३०.९३) | ११८ (२७.३१) |
| ३ | बरी | ५० (४३.१०) | ३० (२५.८६) | २० (१९.४२) | ३० (३०.९३) | १३० (३०.०९) |
| ४ | वाईट | ३० (२५.८६) | २० (१७.२४) | ६६ (६४.०८) | १९ (१९.५९) | १३५ (३१.२५) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कोल्हाटी जमातीचे वार्षिक व मासिक उत्पन्नाचे अध्ययन केल्यानंतर ते उत्पन्न प्रत्येक कुटुंबाला पुरेसे आहे किंवा नाही याचे मुल्यांकन करण्यासाठी कुटुंबातील सद्यस्थितीतील आर्थिकतेचे चार स्तर ठरविण्यात आले आहे. तक्ता क्र. ४.५२ मध्ये दिल्याप्रमाणे उत्तम, चांगली, बरी, वाईट अशी आर्थिक परिस्थितीची विभागणी करण्यात आली आहे. त्यानुसार

नगर,नेवासा, जामखेड व शेवगाव तालुक्यांमधील एकुण ४२० कुटुंबांपैकी आर्थिक परिस्थिती वाईट असणाऱ्या कुटुंबांची संख्या सर्वात जास्त म्हणजेच १३५ असून त्यांचे प्रमाण (३१.२५ टक्के) आहे. या १३५ कुटुंबांपैकी सर्वात जास्त कुटुंब संख्या जामखेड तालुक्यामध्ये ६६ कुटुंबे (६४.०८ टक्के) आहे. तर सर्वात कमी कुटुंब संख्या नेवासा तालुक्यामध्ये २० कुटुंबे (१७.२४ टक्के) आहे. त्याचप्रमाणे एकुण ४ तालुक्यामधील १३० कुटुंबे (३०.०९ टक्के) बरी आर्थिक परिस्थिती असणाऱ्या गटात येतात. तर एकुण ४२० कुटुंबांपैकी ११८ कुटुंबे चांगली आर्थिक परिस्थिती असणाऱ्या गटात आहेत. तर उत्तम आर्थिक परिस्थिती असणाऱ्या कुटुंबांची संख्या सर्वात कमी ४९ कुटुंबे (११.३४ टक्के) आहेत. त्यामध्ये सर्वात जास्त नेवासा तालुक्यातील कुटुंबांचा समावेश होतो. त्यांचे प्रमाण २० कुटुंबे (१७.२९ टक्के) आहे. या उत्तम आर्थिक परिस्थिती गटामध्ये सर्वात कमी जामखेड तालुका व नगर तालुक्यातील कुटुंबांचा समावेश आहे. यावरुन सद्यस्थितीत नेवासा तालुक्यातील चांगली व उत्तम आर्थिक परिस्थिती असणारी कुटुंब संख्या जास्त असून वाईट आर्थिक परिस्थिती असणारे कुटुंब संख्या जामखेड तालुक्यामध्ये आहे.

**तक्ता क्र. ४.५३**

**कुटुंबांची पूर्वीची आर्थिक परिस्थितीनुसार विभागणी**

| अ. क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उत्तम | ०२<br>(१.७२) | ०४<br>(३.८५) | ०१<br>(०.९७) | –<br>०.०० | ०७<br>(१.६७) |
| २ | चांगली | ०८<br>(६.९०) | १९<br>(१८.२७) | १४<br>(१३.५९) | ३३<br>(३४.०२) | ७४<br>(१७.६२) |
| ३ | बरी | ९४<br>(८१.०३) | ५६<br>(५३.८५) | ५३<br>(५१.४६) | ६३<br>(६४.९५) | २६६<br>(६३.३३) |
| ४ | वाईट | १२<br>(१०.३४) | २५<br>(२४.०४) | ३५<br>(३३.९८) | ०१<br>(१.०३) | ७३<br>(१७.३८) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कोल्हाटी जमातीची प्रगती किंवा विकास अभ्यासण्यासाठी प्रत्येक कुटुंबातील सद्यस्थिती बरोबर पूर्वीची आर्थिक परिस्थिती अभ्यासणे तितकेच गरजेचे आहे. कारण यांच्या तुलनेतून आर्थिक प्रगती व विकासाचा अंदाज येण्यास मदत होणार आहे. जेव्हा पूर्वीची आर्थिक स्थिती बरी किंवा वाईट असेल व सद्यस्थितीत आर्थिक परिस्थिती चांगली किंवा उत्तम दर्शवित असेल तेव्हा अनेक कुटुंबे आर्थिक विकासाच्या मार्गावर असल्याचे चिन्ह दिसते. तक्ता क्र. ४.५३ मध्ये दिलेल्या प्रत्यक्ष पाहणीनुसार नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव तालुक्यांमधील एकुण ४२० कुटुंबांपैकी पूर्वी बरी आर्थिक परिस्थिती असणाऱ्या कुटुंबांची संख्या २६६ असून त्यांचे प्रमाण (६३.३३ टक्के) आहे. तर उत्तम परिस्थिती असणाऱ्या कुटुंबांची संख्या ०७ कुटुंबे (१.६७ टक्के) म्हणजेच अत्यल्प आहे. यावरुन असे दिसते की, पूर्वीच्या आर्थिक परिस्थितीच्या तुलनेत सद्यस्थितीमध्ये चारही तालुक्यातील परिस्थिती समाधानकारक आहे. तसेच जामखेड तालुक्यामधील वाईट परिस्थिती असणाऱ्या पूर्वीच्या कुटुंब संख्येत सद्यस्थितीत वाढ झालेली दिसते. यावरुन त्यांना योग्य व मुलभूत गरजा भागविण्यासाठीचे उदरनिर्वाहाचे साधन मिळाले नाही. इतर तीन तालुक्यांमधील स्थिती काही वेगळी नसून चारही तालुक्यांमध्ये वाईट परिस्थिती गटातील मुल्यांकन असमाधानकारक असल्याचे दिसते.

**तक्ता क्र. ४.५४**

**नवीन व्यवसाय सुरु करण्याची इच्छा असणाऱ्या कुटुंबांची संख्या**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यवसाय सुरु करण्यास इच्छुक असणारे | ३३ (२८.४५) | २६ (२५.००) | २१ (२०.३९) | १६ (१६.४९) | ९६ (२२.८६) |
| २ | इच्छुक नसणारे | ८३ (७१.५५) | ७८ (७५.००) | ८२ (७९.६१ | ८१ (८३.५१) | ३२४ (७६.५३) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र.४.५२ नुसार प्रत्यक्ष पाहणीमध्ये नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव तालुक्यातील जास्तीत जास्त कुटुंबांची आर्थिक परिस्थिती सद्यस्थितीत वाईट असल्याचे दिसते. म्हणजेच त्या कुटुंबांना उत्पन्न पुरत नसून ते समाधानी नाहीत. त्यामुळे प्रत्येक कुटुंबाला नवीन व्यवसाय सुरु करण्याची इच्छा आहे किंवा नाही हे मत विचारण्यात आले. तक्ता क्र. ५.५४ मध्ये व्यवसाय सुरु करण्याची इच्छा असणारे व इच्छा नसणारे अशी कुटुंबांची विभागणी दिली आहे. एकुण ४२० कुटुंबांपैकी ३२४ कुटुंबे ही व्यवसायामध्ये इच्छुक नाहीत तर ९६ कुटुंबे ही व्यवसाय करण्यासाठी इच्छुक आहेत. यामध्ये असे दिसते की, ज्यांचे उत्पन्न उदरनिर्वाहासाठी पुरेसे आहे ते समाधानी असल्यामुळे नवीन व्यवसायास इच्छुक नाहीत तर काही व्यवसायाची साधने उपलब्ध नसल्यामुळे इच्छुक नाहीत तर ज्यांचे उदरनिर्वाहाचे साधन समाधानकारक नाही त्यांना आपल्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी नविन व्यवसाय सुरु करण्याची इच्छा आहे. यावरुन २२.८६ टक्के कुटुंबांना नवीन व्यवसाय करण्याची इच्छा असल्याचे आढळून येते.

## ४.११. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची कर्जविषयक माहिती–


**तक्ता क्र. ४.५५**

**कर्ज वितरणाचे प्रमाण**

| अ. क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्ज घेणारे | ०९ (७.७६) | १० (९.६२) | १६ (१५.५३) | १० (१०.३१) | ४५ (१०.७१) |
| २ | कर्ज न घेणारे | १०७ (९२.२४) | ९४ (९०.३८) | ८७ (८४.४७) | ८७ (८९.६९) | ३७५ (८९.२९) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

**आलेख क्र. ४.१३**




आधार – तक्ता क्र. ४.५५

नवीन व्यवसाय करण्याची इच्छा असूनही व्यवसायासाठी व एकंदरीत एकुण कर्जाचे प्रमाण कमी दिसते. तक्ता क्र. ४.५५ मध्ये दिलेल्या प्रत्यक्ष पाहणीनुसार एकुण ४२० कुटुंबांपैकी केवळ ४५ कुटुंबांनी कर्ज घेतलेले असून त्यांचे प्रमाण (१०.७१ टक्के) आहे. त्यापैकी सर्वाधिक कर्ज जामखेड तालुक्यातील कुटुंबांनी घेतलेले दिसते. नगरमध्ये (७.७६ टक्के), नेवासा (९.६२ टक्के), जामखेड (१५.५३ टक्के), शेवगाव (१०.३१ टक्के) कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण चारही तालुक्यामध्ये आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, ४ तालुक्यांचा विचार करता या जमातीत कर्जाचे प्रमाण अत्यल्प आहे तर तालुकानिहाय तुलना केली असता जामखेड तालुक्यामध्ये सर्वाधिक कर्ज घेणाऱ्यांची संख्या आहे.

## तक्ता क्र. ४.५६

## कर्ज पुरवठा करणारी साधने

| अ. क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सावकार | ०१ (११.११) | ० | ०३ (१८.७५) | ०१ (१०.००) | ०५ (११.११) |
| २ | नातेवाईक | ० | ० | ०१ (६.२५) | ० | ०१ (२.२२) |
| ३ | पतसंस्था | ०१ (११.११) | ० | ०२ (१२.५०) | ०२ (२०.००) | ५ (११.११) |
| ४ | बँका | ०७ (७७.७८) | १० (१००) | ०२ (१२.५०) | ०५ (५०.००) | २४ (५३.३३) |
| ५ | अन्य व्यक्ती | ० | ० | ०८ (५०.००) | ०२ (२०.००) | १० (२२.२२) |
| | एकुण | ०९ | १० | १६ | १० | ४५ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र.४.५६ मध्ये दिलेल्या एकुण ४५ कर्जदारांनी कर्जासाठी कोण–कोणत्या साधनांचा वापर केला. यावरुन प्रत्येक तालुक्यामधील कर्जाची निकड, कुटुंबांचा कर्जविषयक दृष्टीकोन समजण्यास मदत होते. या साधनांमध्ये सावकार, नातेवाईक, पतसंस्था, बँका, अन्य व्यक्ती यांचा समावेश होतो. तक्ता क्र. ४.५६ मध्ये दिलेल्या वितरणानुसार एकुण ४५ कर्जदारांपैकी सर्वात जास्त कर्ज बँकांकडून २४ कुटुंब प्रमुखांनी (५३.३३ टक्के) याप्रमाणात घेतले असून त्यानंतर अन्य व्यक्तिकडून कर्ज घेण्याचे प्रमाण (२२.२२ टक्के) आहे. तसेच चारही तालुक्यांमध्ये सावकार व पतसंस्था या दोन्हींना समान प्रमाणात (११.११ टक्के) प्राधान्य दिले जाते. तर सर्वात कमी प्रमाणात कर्ज नातेवाईकांकडून (२.२२ टक्के) प्रमाणात घेतले जाते. नेवासा तालुक्यातील कर्जविषयक दृष्टीकोन आधुनिक वाटतो कारण त्याठिकाणी सर्व कर्ज बँकामार्फत म्हणजेच संस्थात्मक आहेत. तर जामखेड तालुक्यातील कर्जाची निकड व तारण उपलब्धता नसल्याने सावकार, पतसंस्था, अन्य व्यक्ती अशा पारंपारिक मार्गांचा अवलंब केला जातो.

**तक्ता क्र. ४.५७**

**कर्जाची रक्कमेनुसार विभागणी**

| अ. क्र. | तपशील(रक्कम रु) | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०,००० ते ५०,००० | ०४ | ०२ | ०५ | ०१ | १२ |
| २ | ५०,००० ते १ लाख | ०२ | ०३ | ०३ | ०१ | ०९ |
| ३ | १ लाख ते ५ लाख | ०१ | ०३ | ०६ | ०४ | १४ |
| ४ | ५ लाखाच्या पुढे | ०२ | ०२ | ०२ | ०४ | १० |
| | एकुण | ०९ | १० | १६ | १० | ४५ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

तक्ता क्र. ४.५७ मध्ये एकुण ४५ कर्जधारक कुटुंबांपैकी कर्जाच्या रक्कमेनुसार विभागणी करण्यात आली आहे. कर्ज रक्कमेचे १० हजार ते ५० हजार, ५० हजार ते १ लाख, १ लाख ते ५ लाख व शेवटी ५ लाखाच्या पुढे असे गट करण्यात आले आहेत. त्यामध्ये ४५ कर्जधारक कुटुंबांपैकी सर्वात जास्त कर्ज जामखेड तालुक्यामध्ये १६ कुटुंबांनी घेतले असून त्यांचे प्रमाण आहे. कर्ज रक्कमेच्या विविध गटांमध्ये सर्वात जास्त कर्ज १ लाख ते ५ लाख या रक्कमेच्या दरम्यान घेण्यात आले आहे. यामध्ये १४ कुटुंबांपैकी ०६ कुटुंबांनी या कर्ज रक्कमेदरम्यान कर्ज घेतले आहे. त्यानंतर १० ते ५० हजार या रक्कमेच्या दरम्यान एकुण ४५ कुटुंबांपैकी १२ कुटुंबांनी कर्ज घेतले असून सर्वात कमी कर्ज घेण्याचे प्रमाण ५० हजार ते १ लाख रक्कमेसाठी आहे. सर्वात मोठी कर्जाची रक्कम म्हणजेच ५ लाखाच्या पुढे यामध्ये शेवगाव तालुक्यामध्ये सर्वाधिक कुटुंबांनी कर्ज घेतले असून या तालुक्यामध्ये हॉटेल व्यवसायिकांचे प्रमाण जास्त असल्याने भांडवलासाठी त्यांनी इतक्या मोठया रकमेचे कर्ज घेतलेले दिसते. अशाप्रकारे कर्जाच्या रक्कमेनुसार प्रत्येक तालुक्यातील कर्जाची गरज व प्रमाण लक्षात येते.

### तक्ता क्र. ४.५८

### कर्ज परतफेड व थकबाकी संदर्भातील वितरण

| अ.क्र. | तपशिल | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नियमित कर्ज परतफेड करणारे | ०२ | ०५ | ०२ | ०३ | १२ |
| २ | थकबाकीदार | ०७ | ०५ | १४ | ०७ | ३३ |
| | एकुण | ०९ | १० | १६ | १० | ४५ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव तालुक्यामधील एकुण ४२० कुटुंबांपैकी ४५ कुटुंबांनी कर्ज घेतले असून त्यापैकी प्रत्यक्ष पाहणीनुसार १२ कुटुंबांमधील कर्जदार नियमित परतफेड करणारे असून त्यामध्ये नेवासा तालुक्यातील कर्जदार सर्वाधिक परतफेडीच्या बाबतीत जागरुक दिसतात. तर एकुण ४५ कुटुंबांपैकी ३३ कुटुंबांमधील कर्जदार थकबाकीदार असल्याचे दिसते. थकबाकीदारांमध्ये जामखेड तालुक्यातील कर्जदार सर्वाधिक १४ कर्जदार समाविष्ट आहेत. तर नेवासा तालुक्यामधील कर्जदार थकबाकीदारांचे प्रमाण सर्वात कमी ०५ आहे. यावरुन नेवासा तालुक्यातील मूळचेच कर्ज घेण्याचे प्रमाण कमी व परतफेडीत नियमितता असल्याने तेथील कुटुंबांना मिळणारे उत्पन्न पुरेसे असून कर्जविषयक जागरुक व उपयुक्त दृष्टीकोन आहे. तर जामखेड तालुक्यामध्ये विविध कारणांमुळे कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण जास्त तर परतफेड न करता थकबाकीदारांचे प्रमाणही जास्त आहे. तर नगर व नेवासा तालुक्यामध्येही परतफेडीच्या तुलनेत थकबाकीदार जास्त आढळतात.

### तक्ता क्र. ४.५९

### कर्ज तारणाचे स्वरुप

| तपशिल | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| घर | ०३ | ०४ | ०६ | ०७ | २० |
| शेती | ०२ | ०६ | ० | ०२ | १० |
| सोने व स्थावर | ०२ | ० | ०२ | ० | ०४ |
| विनातारण | ०२ | ० | ०८ | ०१ | ११ |
| एकुण | ०९ | १० | १६ | १० | ४५ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

कर्जदारांनी दिलेल्या तारणाचे ४ प्रकारचे स्वरुप प्रत्यक्ष पाहणीमध्ये आढळले आहे. त्यामध्ये घर, शेती, सोने व विनातारण कर्ज यांचा समावेश ४५ कर्जधारकांनी केलेला आहे. त्यापैकी घरांचा तारण म्हणून सर्वाधिक म्हणजेच २० कर्जदारांनी वापर केला आहे. तर त्यानंतर विनातारण कर्ज घेण्याचे प्रमाण जास्त आहे. चारही तालुक्यांमध्ये जामखेड तालुक्यामध्ये सर्वात जास्त म्हणजे एकुण ११ बिनतारण कर्जापैकी ०८ कर्जदारांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे नेवासा तालुका हा शेती संपन्न असल्याने सर्वाधिक शेती तारण कर्जाचा वापर याठिकाणी केला जातो तर जामखेडमध्ये शेती असणाऱ्यांचे प्रमाण अल्प असल्याने त्याठिकाणी एकाही कर्जासाठी शेती तारण ठेवलेली दिसत नाही. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, एकुण चार तालुक्यांमध्ये स्वतःचे घर असणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याने कर्जासाठी घर तारण ठेवण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. तर नेवासा तालुक्यामध्ये शेती असणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याने शेती तारण देण्याचे प्रमाण जास्त आहे तर जामखेड तालुक्यामधील कुटुंबांकडे तारणाची उपलब्धता नसल्याने व कर्जाची ताबडतोब व्यवस्था करण्यासाठी बिनतारणी कर्जाचे प्रमाण जास्त आहे.

**तक्ता क्र. ४.६०**

**कर्जासाठीचे व्याजदरानुसार विभागणी**

| अ. क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २० टक्के | ०१ | ०० | ०८ | ०३ | १२ |
| २ | १४ टक्के | ०२ | ० | ०६ | ०५ | १३ |
| ३ | ११ टक्के | ०६ | ०६ | ०२ | ०२ | १६ |
| ४ | ९ टक्के | ०० | ०४ | ०० | ०० | ०४ |
| | एकुण | ०९ | १० | १६ | १० | ४५ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

तक्ता क्र. ४.५५ नुसार नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव तालुक्यामध्ये ४५ कुटुंब प्रमुखांकडून कर्जे घेण्यात आली आहेत. त्यांचे व्याजदर २० टक्के, १४ टक्के,११ टक्के, व ९ टक्के असल्याचे आढळले. याव्यतिरिक्त व्याजदर न आढळल्याने या चार गटात कर्जाची विभागणी करण्यात आली आहे. तक्ता क्र. ४.६० मध्ये दाखविल्याप्रमाणे ४५ कर्जदारांपैकी ११

टक्के व्याजदराने सर्वाधिक कर्जे घेण्यात आले आहे. १६ कर्जदारांनी ११ टक्के व्याजदराने तर १३ कर्जदारांनी १३ टक्के व्याजदराने, १२ कर्जदारांनी २० टक्के व्याजदराने तर अगदी अल्प म्हणजे ०४ कर्जदारांनी ०९ व्याजदराने कर्ज घेतले आहे. यावरुन चारही तालुक्यांमध्ये जामखेड तालुक्यामध्ये २० टक्के व्याजदराने कर्ज घेतलेल्यांची संख्या जास्त आहे म्हणजे कर्जाची निकड, गरज, पैशाची अडचण दूर करण्यासाठी कुटुंबे बऱ्यापैकी व्याज देण्यास तयार असतात. बहुधा २० टक्के व्याज सावकार व अन्य व्यक्तिंकडूनच घेतल्याचे दिसते.

**तक्ता क्र. ४.६१**

**कर्ज काढण्याच्या कारणानुसार विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लग्नासाठी | ० | ०१ | ० | ०१ | ०२ |
| २ | घर बांधणे | ०३ | ०२ | ०२ | ०२ | ११ |
| ३ | धार्मिक विधी | ०३ | ० | ०६ | ०१ | १० |
| ४ | शिक्षणासाठी | ० | ०२ | ० | ०१ | ०३ |
| ५ | आजारपण | ० | ०१ | ०१ | ० | ०२ |
| ६ | व्यसन | ० | ० | ०४ | ० | ०४ |
| ७ | व्यावसाय | ०३ | ०४ | ०५ | ०५ | १७ |
| | एकुण | ०९ | १० | १६ | १० | ४५ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

सर्वसाधारणपणे कर्ज काढण्याची गरज म्हणजे आहे त्या उत्पन्नात आवश्यक गरजा पूर्ण न झाल्यास किंवा आकस्मिक अडचणींमध्ये व्यक्ती कर्जाचा आधार घेताना दिसतो. परंतु नगर,नेवासा, जामखेड व शेवगाव तालुक्यामध्ये आढळलेल्या कारणांची प्रत्यक्ष पाहणी करताना लग्न, घर बांधणे, धार्मिक विधी, शिक्षण, आजारपण, व्यसन, व्यवसाय अशा स्वरुपात विभागणी केली आहे. या कारणांपैकी सर्वाधिक कर्ज व्यवसायासाठी काढण्यात आले असून एकूण ४५ कर्जधारकांपैकी १७ जणांनी व्यवसायासाठी कर्ज काढले आहे. त्यामुळे अनुत्पादक कर्ज घेण्यापेक्षा उत्पादक कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण अधिक असल्याचे आढळते. त्यानंतर १० कर्जधारकांनी धार्मिक विधीसाठी कर्ज काढले आहे. सर्वात कमी कर्ज लग्न व आजारपण या

कारणांसाठी काढलेले दिसते. तालुकानिहाय तुलना केली असता जामखेड तालुक्यामध्ये धार्मिक, व्यवसाय व व्यसनासाठी कर्जाचा वापर होताना दिसतो. तर नेवासा तालुक्यामध्ये लग्न, शिक्षण व व्यवसाय यासाठी कर्जाचा वापर होतो तर नगरमध्ये धार्मिक व व्यवसायाला कर्ज काढण्याचे प्रमाण जास्त आहे. शेवगाव तालुक्यामध्ये हॉटेल व्यावसायिक मोठया प्रमाणात असल्याने व्यवसायासाठी कर्ज जास्त काढलेले दिसते.

**तक्ता क्र. ४.६२**

**कर्जाचा वापर दिलेल्या कारणासाठी करणाऱ्यांचे प्रमाण**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जाचा वापर दिलेल्या कारणासाठीच करणारे | ०७ (७७.७८) | ०९ (९०) | ०६ (३७.५) | ०९ (९०) | ३१ (६८.८९) |
| २ | न करणारे | ०२ (२२.२२) | ०१ (१०) | १० (६२.५) | ०१ (१०) | १४ (३१.११) |
| | एकुण | ०९ | १० | १६ | १० | ४५ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.६२ नगर, नेवासा, शेवगाव व जामखेड तालुक्यांमधील एकुण ४५ कर्जधारकांपैकी ३१ कर्जधारक घेतलेल्या कर्जाचा वापर दिलेल्या कारणासाठीच करतात. त्यांचे प्रमाण ६८.८९ टक्के आहे त्यापैकी नेवासा व शेवगाव तालुक्यामध्ये घेतलेल्या कर्जाचा वापर बऱ्याच प्रमाणात दिलेल्या कारणासाठीच होतो. तसेच नगरमधील परिस्थिती मध्यम आहे. परंतु जामखेड तालुक्यामध्ये घेतलेल्या कर्जाचा वापर दिलेल्या कारणासाठीच न करणाऱ्यांचे प्रमाण अधिक म्हणजेच ६२.५ टक्के आहे यावरुन त्याठिकाणी कर्जे काढूनही आर्थिक समस्या भागत नाहीत. आकस्मिक कारणे, व्यसने यामुळे कर्ज गैर ठिकाणी वापरले जात असल्याचे दिसते.

**तक्ता क्र. ४.६३**

**कर्ज थकित असण्याची कारणे**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यसन | ०७ | ० | १० | ०१ | १८ |
| २ | इतरांची देणी | ०७ | ० | १० | ०२ | १९ |
| ३ | मृत्यू | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | आजारपण | ०१ | ०२ | ०१ | ० | ०४ |
| ५ | महागाई | ०७ | ०५ | १४ | ०७ | २८ |
| ६ | अनिश्चित उत्पन्न | ०५ | ०८ | १४ | ०३ | ३० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

तक्ता क्र.४.५८ मधील परतफेड व थकबाकीचे प्रमाण व तक्ता क्र. ४.६२ मधील कर्जाच्या वापराचे प्रमाण पाहता कर्ज थकित असण्याच्या कारणांचा शोध घेणे अनिवार्य आहे. तक्ता क्र. ४.६३ मधील दिलेली कारणे प्रत्येक कर्जदारांच्या उत्तरामध्ये दोन–तीन कारणांचा समावेश असल्याने शेकडेवारी न काढता ढोबळमानाने आकडेवारीची नोंद केलेली आहे. त्यानुसार थकबाकीच्या कारणांमध्ये अनिश्चित उत्पन्न असणे हे कारण अधिक जास्त कर्जदारांच्या उत्तरामध्ये आढळते. त्यानंतर महागाई, इतरांची देणी, व्यसन व क्वचित आजारपण असा कारणांचा प्राधान्यक्रम आढळतो. तसेच जामखेड तालुक्यातील कलावंतांचे प्रमाण पाहता त्याठिकाणी, व्यसन, इतरांची देणी, महागाई, अनिश्चित उत्पन्न या कारणांचा समावेश सर्वाधिक आहे. तर नेवासा तालुक्यामध्ये शेती व्यवसायामुळे अनिश्चित उत्पन्न हे कारण जास्त दिल्याचे दिसते. तर नगर तालुक्यामध्येसुध्दा व्यसन, इतरांची देणी, महागाई, अनिश्चित उत्पन्न यावर जोर दिलेला आहे. तर शेवगाव तालुक्यामध्ये महागाईमुळे कर्ज थकित राहिल्याचे कारण जास्त दिले जाते. अशाप्रकारे कर्ज थकबाकी असणाऱ्या कारणांचे विश्लेषण करता येईल.

## ४.१२. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची शेतीविषयक माहिती–


**तक्ता क्र. ४.६४**

**शेती असणाऱ्या कुटुंबांची विभागणी**

| अ. क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शेती असणारे | ३३ (२८.४५) | ७९ (७५.९६) | ३४ (३३.०१) | ६४ (६५.९८) | २१० (५०.००) |
| २ | शेती नसणारे | ८३ (७१.५५) | २५ (२४.०४) | ६९ (६६.९९) | ३३ (३४.०२) | २१० (५०.००) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

**आलेख क्र. ४.१४**




आधार – तक्ता क्र.४.६४

नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव तालुक्यातील कोल्हाटी जमातीच्या एकुण ४२० कुटुंबांची पाहणी केली असता त्यामधील काही कुटुंबांकडे स्वतःची शेत जमीन आहे तर काही कुटुंब भूमिहीन आहेत. तर भूमिहीन असलेले पारंपारिक व्यवसाय किंवा मजूरी करुन आपला उदरनिर्वाह करीत आहेत. अशा कुटुंबांची शेती असणारे व शेती नसणारे अशी दोन प्रकारात तालुकानिहाय विभागणी तक्ता क्र. ४.६४ मध्ये दिलेली आहे. त्यानुसार एकुण ४२० कुटुंबांपैकी

२१० कुटुंबे म्हणजेच ५० टक्के कुटुंबे ही भूधारक असून २१० कुटुंबे ही भूमिहीन आहेत म्हणजेच ५० कुटुंबांकडे स्वतःची शेती नाही. एकंदरित भू–धारक व भूमिहीन कुटुंबांचे प्रमाण सारखे असले तरी उत्पन्नातील विषमता, आर्थिक मागासलेपणा यांवर हे प्रमाण प्रभाव टाकते. या विभागणीचा तालुकानिहाय अभ्यास केला असता भू–धारक कुटुंबांपैकी सर्वात जास्त नेवासा तालुक्यातील ७९ कुटुंबे असून (७५.९६ टक्के) प्रमाणात आहेत तर त्याखालोखाल शेवगाव तालुक्यातील भू धारकांचा क्रमांक येतो. शेवगाव तालुक्यामध्ये ६४ कुटुंबे (६५.९८ टक्के) प्रमाणात भूधारक आहेत तर नगर व जामखेड मध्ये भूधारकांचे प्रमाण अत्यल्प ३३ (२८.४५ टक्के) व ३४ (३३.०७ टक्के) आहे यावरुन असा निष्कर्ष निघतो की नेवासा तालुका भू–धारक कुटुंबामध्ये आघाडीवर असून नगर व जामखेडमध्ये भूमिहीन कुटुंब अधिक असल्याचे दिसते.

**तक्ता क्र. ४.६५**

**शेतीबद्दलचे विवरण**

| अ.क्र. | तपशिल | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वंशपरंपरेने | २७ (८१.८२) | ६३ (७९.७५) | २८ (८२.३५) | ६३ (९८.४४) | १८१ (८६.१९) |
| २ | विकत | ०६ (१८.१८) | १६ (२०.२५) | ६ (१७.६५) | १ (१.५६) | २९ (१३.८१) |
| | एकुण | ३३ | ७९ | ३४ | ६४ | २१० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र.४.६५ मध्ये दिल्याप्रमाणे जे २१० भूधारक कुटुंब आहेत त्यांच्या शेतीचे स्वरुप वंशपरंपरेने किंवा विकत घेतली आहे या दोन प्रकारचे आहे. त्यापैकी एकुण २१० भूधारकांपैकी १८१ कुटुंबाकडे वंशपरंपरेने शेती असल्याचे दिसते तर त्याचे प्रमाण (८६.१९ टक्के) आहे. २९ कुटुंबांनी म्हणजेच (१३.८१ टक्के) प्रमाणात शेती विकत घेतलेली आहे. यावरुन चारही तालुक्यांमध्ये वंशपरंपरेने शेती असल्याचे दिसते तर तालुकानिहाय तुलना केली असता नेवासा व शेवगाव या दोन्ही तालुक्यांमध्ये ही ६३ कुटुंबे एवढी समान संख्या आहे. त्याचप्रमाणे ४ तालुक्यामध्ये एकुण २० शेती विकत घेणाऱ्या कुटुंबांपैकी केवळ नेवासा

तालुक्यामध्ये १६ कुटुंब संख्या असून ती (५५.१८ टक्के) एवढी एकुण विकत घेणाऱ्याच्या निम्म्यापेक्षा जास्त आहे. अशाप्रकारे वरील माहिती नुसार नेवासा तालुका हा सर्वदृष्टया शेती संपन्न असल्याचे दिसते. तर शेवगाव तालुक्यामध्ये असणारे सर्व भू–धारक वंशपरंपरेने शेती प्राप्त आहेत.

**तक्ता क्र. ४.६६**

**शेती व्यवसायासंबंधी विवरण**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्वतः कसणारे | १९<br>(५७.५८) | ६८<br>(८६.०८) | २२<br>(६४.७१) | ५५<br>(८५.९४) | १६४<br>(७८.१०) |
| २ | खंडाने देणारे | ४<br>(१२.१२) | ५<br>(६.३३) | ४<br>(११.७६) | ५<br>(७.८१) | १८<br>(८.५७) |
| ३ | पडीक | १०<br>(३०.३०) | ६<br>(७.५९) | ८<br>(२३.५३) | ४<br>(६.२५) | २८<br>(१३.३३) |
| | एकुण | ३३ | ७९ | ३४ | ६४ | २१० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र.४.६६ मध्ये केलेल्या प्रत्यक्ष पाहणीनुसार एकुण ४२० कुटुंबांपैकी ५० टक्के कुटुंबांकडे शेती असल्याचे आढळले परंतु ते सर्वच शेती कसतात असे नाही तर काही भांडवलाचा अभाव, नोकरीनिमित्त, मनुष्यबळ अभाव, अनिश्चित स्वरुपाचा पाऊस, या कारणाने स्वतःची शेती खंडाने देतात किंवा पडीक स्वरुपात ठेवतात. अशा कुटुंबांचे प्रमाण तक्ता क्र.६.२३ मध्ये दिले आहे. त्यानुसार एकुण शेती असणाऱ्या २१० कुटुंबांपैकी १६४ कुटुंबे स्वतः शेती कसतात त्यांचे प्रमाण (७८.१० टक्के)) तर १८ कुटुंबे खंडाने कसण्यासाठी देतात त्यांचे प्रमाण (८.५७ टक्के)) असून २८ कुटुंबे (१३.३३ टक्के)) आपली शेती पडीक ठेवतात यावरुन शेती स्वतः कसणाऱ्यांचे प्रमाण जास्त असून विविध कारणास्तव शेती अनुत्पादक स्वरुपात म्हणजेच पडीक ठेवण्याची वृत्ती कुटुंबांमध्ये जास्त आढळते.

## तक्ता क्र. ४.६७

## शेतीपासून मिळणारे उत्पन्न

| अ.क्र. | तपशील (रक्कम रु) | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १० हजार ते २० हजार | ७ (३१.८२) | ११ (१५.९४) | ०३ (१३.०४) | १२ (२०.६९) | ३३ (१९.१९) |
| २ | २० हजार ते ४० हजार | ९ (४०.९१) | १३ (१८.८४) | १७ (७३.९१) | १७ (२९.३१) | ५६ (३२.५६) |
| ३ | ४० हजार ते ८० हजार | ४ (१८.१८) | १६ (२३.१९) | १ (४.३५) | १३ (२२.४१) | ३४ (१९.७७) |
| ४ | ८० हजाराच्या पुढे | २ (९.०९) | २९ (४२.०३) | २ (८.७०) | १६ (२७.५९) | ४९ (२८.४९) |
| | एकुण | २२ | ६९ | २३ | ५८ | १७२ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.६६ मधील स्वतः जमीन कसणारे व खंडाने जमीन कसण्यासाठी देणाऱ्या उत्तरदात्यांपैकी अनेकांनी शेतीतून काहीच उत्पन्न मिळत नाही असे उत्तर दिले. तर ज्यांनी उत्पन्नाची माहिती दिली त्यांची विभागणी तक्ता क्र. ४.६७ मध्ये देण्यात आली आहे. त्यानुसार १७२ भू–धारक कुटुंब प्रमुखांपैकी सर्वात जास्त म्हणजेच ५६ (३२.५६ टक्के)) कुटुंबांना २० ते ४० हजार या गटात उत्पन्न प्राप्त करणाऱ्या कुटुंबांची संख्या ४९ (२८.४९ टक्के) आहे. जास्तीत जास्त उत्पन्न मिळविणाऱ्या उत्पन्न गटामध्ये नेवासा तालुक्यातील सर्वाधिक म्हणजेच २९ कुटुंबांचा समावेश होतो. तर जामखेड व नगर तालुक्यामध्ये केवळ २ भूधारक ८० हजारपेक्षा जास्त शेतीपासून उत्पन्न प्राप्त करतात. त्याचप्रमाणे ४० ते ८० हजार उत्पन्न गटात एकुण ३४ कुटुंबांपैकी नेवासा प्रथम क्रमांकावर असून या गटातील कुटुंब संख्या १६ कुटुंबे (२३.१९ टक्के)) या प्रमाणात आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की एकुण चारही तालुक्यांमधील भूधारकांपैकी उच्च उत्पन्न गटामध्ये नेवासा व शेवगाव तालुक्यातील कुटुंबांचा समावेश असून निम्न व मध्यम उत्पन्न गटामध्ये नगर व जामखेड तालुक्यातील कुटुंबांचा समावेश होतो. तसेच नेवासा तालुक्यामध्ये पारंपारिक व्यवसायाचा अभाव व आर्थिक सुबत्ता यासाठी तालुक्यातील शेती प्रधान अर्थव्यवस्था कारणीभूत आहे.

**तक्ता क्र. ४.६८**

**शेतीसाठी कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्ज घेणारे | ०१ | १३ | ०३ | ०६ | २३ (१०.९६) |
| २ | न घेणारे | ३२ | ६६ | ३१ | ५८ | १८७ (८९.०४) |
| | एकुण | ३३ | ७९ | ३४ | ६४ | २१० (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

शेतीसाठी कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण नगर,नेवासा,जामखेड व शेवगाव या चारही तालुक्यांमध्ये किरकोळ असल्याचे दिसते. एकुण २१० भू–धारकांपैकी केवळ २३ कुटुंबांनी (१०.९६ टक्के) शेतीसाठी कर्ज घेतले आहे तर १८७ कुटुंबांनी शेतीसाठी कर्ज घेतले नाही त्यांचे प्रमाण (८९.०४ टक्के) आहे तसेच २३ कर्ज घेणाऱ्या भूधारक कुटंबांपैकी सर्वाधिक कर्ज नेवासा तालुक्यातील १३ कुटुंबांनी घेतले असून सर्वात कमी नगर तालुक्यातील केवळ ०१ कुटुंबाने घेतलेले आहे. तक्ता क्र.४.६८ मधील माहितीनुसार नेवासा तालुका वगळता नगर, जामखेड, शेवगाव तालुक्यांमधील शेतीवर कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे.

**तक्ता क्र. ४.६९**

**शेतीसाठीच्या कर्जाचे विवरण**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०,००० ते २५,००० | ०१ | ०२ | ०१ | ० | ०४ |
| २ | २५,००० ते ५०,००० | ० | ०३ | ०१ | ०१ | ०५ |
| ३ | ५० हजार ते १ लाख | ० | ०३ | ० | ०४ | ०७ |
| ४ | १ लाखाच्या पुढे | ० | ०५ | ०१ | ०१ | ०७ |
| | एकुण | ०१ | १३ | ०३ | ०६ | २३ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

एकुण २१० भूधारकांपैकी २३ भूधारकांनी शेतीसाठी कर्ज घेतलेले आहे. या १०.९६ टक्के कर्जधारकांनी घेतलेल्या कर्जाची रक्कमेची विभागणी ४ टप्प्यात करण्यात आली आहे.

त्यापैकी नगरमध्ये घेतलेले ०१ कर्ज १० ते २५ हजार या टप्प्यातील आहे. तर सर्वाधिक शेतीसाठी कर्ज घेतले असणारा तालुका नेवासामध्ये १ लाखाच्यापुढे असणाऱ्या रक्कमेचे कर्ज सर्वात जास्त घेतले आहे. त्याचप्रमाणे शेवगाव तालुक्यामध्ये ५० हजार ते १ लाख या टप्प्यातील कर्जाचे प्रमाण जास्त म्हणजे ४ कर्जधारकांनी घेतले आहे.

**तक्ता क्र. ४.७०**

**शेतीसाठी कर्जपुरवठा करणारे स्त्रोत**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विविध कार्यकारी सोसायटी | ०१ | ११ | ०२ | ०६ | २० |
| २ | पतसंस्था | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ३ | बँका | ० | ०२ | ०१ | ० | ०३ |
| | एकुण | ०१ | १३ | ०३ | ०६ | २३ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

तक्ता क्र. ४.७० मधील प्रत्यक्ष पाहणीनुसार शेतीसाठी सर्वाधिक कर्ज विविध कार्यकारी सोसायटीच्या माध्यमातून कर्जे घेतलेले दिसते. एकुण शेतीच्या २३ कर्जदारांपैकी नेवासा तालुक्यांतील ११ कर्जधारकांनी सोसायटीमार्फत कर्ज घेतले असून बँकेतील कर्जाचा वापर ०३ कुटुंबांनी केला आहे. तर नगर व शेवगावमध्ये केवळ विविध कार्यकारी सोसायटीतील कर्जाला कर्जधारकांनी प्राधान्य दिलेले दिसते. जामखेडमध्ये ०२ कुटुंबांनी विविध कार्यकारी सोसायटी व १ कुटुंबाने बँकेतून कर्जे घेतले आहे.

**तक्ता क्र. ४.७१**

**परतफेड व थकबाकीचे स्वरुप**

| अ.क्र. | तपशिल | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नियमित कर्ज परतफेड करणारे | ०० | ०४ | ०० | ०० | ०४ |
| २ | थकबाकीदार | ०१ | ०९ | ०३ | ०६ | १९ |
| | एकुण | ०१ | १३ | ०३ | ०६ | २३ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

तक्ता क्र. ४.७१ नुसार नगर, जामखेड व शेवगाव या तालुक्यांमधील शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड झालेली नसून त्या तीनही तालुक्यांमधील कर्जदारांचा समावेश थकबाकीदारांमध्ये होतो. तर नेवासा तालुक्यातील १३ कर्जदारांपैकी ०४ कर्जदार कुटुंबांनी कर्जाची परतफेड केलेली आहे. म्हणजेच ०९ कर्जदार कुटुंबांचा समावेश थकबाकीदारांमध्ये होतो. यावरुन चारही तालुक्यांमध्ये शेतीसाठीच्या कर्जाची थकबाकीदारांचे प्रमाण जास्त आहे.

**तक्ता क्र. ४.७२**

**अर्थसहाय्य मंडळ व बचत गटातील सहभागाचे कुटुंबाचे प्रमाण**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भिशी मंडळ | ०१ | ०५ | ०३ | ०० | ०९ |
| २ | बचत गट | ०६ | १५ | १३ | ०७ | ४१ |
| | एकुण | ०७ | २० | १६ | ०७ | ५० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

तक्ता क्र. ४.७२ मध्ये दिलेल्या प्रत्यक्ष पाहणीनुसार नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव तालुक्यातील ४२० कुटुंबांपैकी अगदी कमी सहभाग हा भिशी मंडळ व बचत गटात असल्याचे दिसते. एकुण ४२० कुटुंबांपैकी केवळ ०९ कुटुंबांचा भिशी मंडळामध्ये सहभाग असून त्यापैकी सर्वाधिक नेवासा तालुक्यातील ०५ कुटुंबांचा सहभाग आहे. तर एकुण ४२० कुटुंबांपैकी ४१ कुटुंबांचा बचत गटामध्ये सहभाग आहे. त्यापैकी नेवासा तालुक्यामधील सर्वाधिक १५ कुटुंबांचा यात समावेश होतो यावरुन असा निष्कर्ष निघतो की कोल्हाटी जमातीची ४२० कुटुंबांमध्ये अर्थसहाय्य गटांचे सहभाग प्रमाण अत्यल्प आहे. कारण उत्पन्नाची पातळी बघता उदरनिर्वाहासाठी उत्पन्न पुरत नसल्याने भिशी व बचत गटांना ही कुटुंबे प्राधान्य देत नाहीत. त्याचप्रमाणे इतर समाजातील होणाऱ्या आर्थिक व्यवहारांपासून ही कुटुंबे अलिप्त राहतात असे दिसते.

## तक्ता क्र. ४.७३

## आर्थिक संपत्तीच्या स्वरुपानुसार विभागणी

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सोने | २० | ४० | १५ | ३० | १०५ (२५.००) |
| २ | प्लॉट | १० | २५ | ५ | १ | ४१ (९.७६) |
| ३ | शेती | ३३ | ७९ | ३४ | ६४ | २१० (५०.००) |
| ४ | बँकेत शिल्लक | १९ | ६३ | १५ | ५५ | १५७ (३७.३८) |
| | एकुण | ८२ | २०७ | ६९ | १५० | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कोल्हाटी जमातीतील कुटुंबांचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करत असताना केवळ व्यवसाय व उत्पन्न यांना महत्व न देता कुटंबांकडे असणाऱ्या आर्थिक संपत्तीच्या पाहणीला महत्व दिले आहे. कारण या चलावरुन आर्थिक विषमता व आर्थिक विकास स्पष्ट होण्यास मदत होते. तक्ता क्र. ४.७३ मध्ये आर्थिक संपत्तीमध्ये सोने, प्लॉट, शेती व बँकेतील रक्कम यांचा समावेश करण्यात आला आहे. एका कुटुंबांकडे वरीलपैकी एक किंवा अनेक स्वरुपात आर्थिक संपत्ती असू शकते त्यामुळे एकंदरित ढोबळमानाने विश्लेषण केले असता एकुण ४२० कुटुंबांपैकी सर्वाधिक २१० कुटुंबांकडे (५० टक्के) शेती स्वरुपात संपत्ती आहे. तर १५७ कुटुंबांचे (३७.३८ टक्के) बँकेत पैसे ठेवले जातात. १०५ कुटुंबांकडे (२५.०० टक्के) सोने व दागिने स्वरुपात मालमत्ता आहे तर सर्वात कमी संख्या प्लॉट असणाऱ्या कुटुंबांची ४१ (९.७६ टक्के) आहे. शेती असणाऱ्या २१० कुटुंबांपैकी सर्वात जास्त नेवासा तालुक्यातील कुटुंबांचा समावेश होतो तर नगर, जामखेड तालुक्यातील शेती कमी प्रमाणात आहे. सोने व प्लॉट असणाऱ्यामध्ये व बँकेत पैसे ठेवणाऱ्यांमध्येसुदधा नेवासा तालुक्यातील कुटुंबे अग्रेसर आहेत तर नगर व जामखेड तालुक्यातील प्रमाण अत्यंत कमी आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, शिक्षण व शेती संपन्नता यामुळे नेवासा व शेवगाव तालुक्यातील जमातीची आर्थिक संपत्ती बऱ्यापैकी समाधानकारक आहे तर नगर व जामखेड याठिकाणी शिक्षण व पारंपारिक व्यवसायामुळे कुटुंबांची संपत्ती अपूरी आहे.

## ४.१३. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची खर्च विषयक स्थिती–

**तक्ता क्र. ४.७४**

**कुटुंबाच्या दरमहा खर्चाची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अन्नधान्य व वस्तू | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |
| २ | घर/निवास दुरुस्ती | १० | २५ | १० | २५ | ७० |
| ३ | शिक्षण | ०५ | ४० | ०५ | २५ | ७५ |
| ४ | दवाखाना | १५ | २० | ३५ | २८ | ९८ |
| ५ | धार्मिक | ४० | ५ | ५० | ५ | १०० |
| ६ | करमणूक | ० | ०५ | ० | ०२ | ०७ |
| ७ | व्यसन | ३० | ०२ | ३० | ०५ | ६७ |
| ८ | कर्ज परतफेड | ०९ | १० | १६ | १० | ४५ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

कोल्हाटी जमातीतील कुटुंबांच्या खर्चाचा विचार केला असता तक्ता क्र. ४.७४ मध्ये केवळ उपभोग्य वस्तूंचा व दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा समावेश केला आहे. त्यानुसार एकुण ४२० कुटुंबांपैकी १०० टक्के कुटुंबांना करावा लागणारा खर्च म्हणजे अन्नधान्य व वस्तू प्राधान्य क्रमावर आहेत तर केवळ ७० कुटुंबांमध्ये घर/निवासाची दुरुस्ती केली जाते. ७५ कुटुंबांमध्ये शिक्षणावर खर्च केला जातो त्यापैकी नेवासा तालुक्याचे प्रमाण प्रथम क्रमांकावर असून नगर व जामखेड मध्ये शिक्षणावर नगण्य खर्च केला जातो तर शेवगाव मध्ये बऱ्यापैकी शिक्षणावर खर्च केला जातो. एकुण ४२० कुटुंबांपैकी ९८ कुटुंबांमध्ये दवाखान्याचा खर्च उद्‌भवतो तर १०० कुटुंबांमध्ये जमातीतील धार्मिक विधीवर खर्च केला जातो. यामध्ये नगर व जामखेड तालुका प्रथम क्रमांकावर असून नेवासा व शेवगाव मध्ये धार्मिक विधीवर किरकोळ कुटुंब खर्च करताना दिसतात. करमणूक व या ४२० कुटुंबांचा संबंध दिसत नाही कारण केवळ नेवासा तालुक्यातील ०५ व शेवगाव तालुक्यामधील ०२ कुटुंबांमध्ये करमणूकीवर खर्च केला जातो तर नगर व जामखेड तालुक्यातील उत्पन्न पातळी व जीवनशैली पाहता त्याठिकाणी करमणूकीवर केवळ २ कुटुंबांमध्ये खर्च केला जातो. व्यसनावरील खर्चाचा अभ्यास केला असता नेवासा तालुक्यामध्ये व्यवसनावरील खर्च आढळतो तर नगर व जामखेड दोन्ही तालुक्यांमधील व्यसनमानावरील

खर्चाचे प्रमाण जास्त असून ३० कुटुंबांमध्ये व्यसनावर खर्च केला जातो तर शेवगाव तालुक्यामध्ये केवळ ०५ कुटुंबांमध्ये व्यसनावर खर्च केला जातो. एकुण ४२० कुटुंबांपैकी ४५ कुटुंबांच्या खर्चामध्ये कर्जाची परतफेड याबाबीवरील खर्चाचा समावेश होतो यावरुन कोल्हाटी जमातीच्या ४ तालुक्यामधील कुटुंबांचा दैनंदिन खर्च, धार्मिक विधी, दवाखाना, या बाबींवर सर्वाधिक कुटुंबांचा खर्च होतो तर करमणूक, कर्जफेड याबाबींवर सर्वात कमी कुटुंबांचा खर्च होतो. तसेच उत्पन्नाच्या तुलनेत हा खर्च नक्कीच भागत नसल्याचे दिसते.

## ४.१४. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची बचतविषयक स्थिती–

**तक्ता क्र. ४.७५**

**बचतीचे स्वरुप**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बचत करणारी कुटुंबे | ४३ (३७.०६) | ४१ (३९.४२) | २० (१९.४१) | ३८ (३९.१८) | १४२ (३३.८१) |
| २ | बचत न करणारी कुटुंबे | ७३ (६२.९४) | ६३ (६०.५८) | ८३ (८०.५९) | ५९ (६०.८२) | २७८ (६६.१९) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

अर्थशास्त्रानुसार कुटुंब व व्यक्तीची बचत ही उत्पन्न व उपभोगावर अवलंबून असते. बचत= उत्पन्न–उपभोग या समीकरणानुसार उपभोग खर्च उत्पन्नापेक्षा जास्त असल्यास बचत ही ऋणात्मक असते. म्हणजेच बचत होण्यासाठी उपभोग खर्चापेक्षा उत्पन्न अधिक असले पाहिजे. तक्ता क्र. ४.७५ मध्ये दिलेल्या प्रत्यक्ष पाहणीनुसार नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या निवडलेल्या चार तालुक्यांमधील ४२० कुटुंबांपैकी अगदी थोडया १४२ कुटुंबांमध्ये बचत होत आहे. त्यांचे प्रमाण (३३.८१ टक्के) आहे. ही बचत या चार तालुक्यांमधील नोकरी करणारे, शेती संपन्न, मोठे व्यावसायकि, कलाकेंद्र मालक यांच्या कुटुंबांची होताना दिसते. तर २७८ कुटुंबांची बचत होत नाही. त्यांचे प्रमाण (६६.१९ टक्के)) असून यामध्ये पारंपारिक व्यवसाय करणारे स्त्री–पुरुष, मोलमजूरी व शेत मजूरी करणारे रोजगार उपलब्ध नसणारे कुटुंब यांचा समावेश होतो. कारण (६६.१९ टक्के)) कुटुंबांना त्यांच्या उत्पन्नात मूलभूत गरजा पूर्ण

होत नाहीत. ते बचत कशी करणार? बचत होणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण नगर, नेवासा, शेवगाव या तालुक्यामध्ये जेमतेम सारखे आहे. परंतु जामखेड मध्ये बचत करणाऱ्या कुटुंबांची संख्या केवळ (१९.४१ टक्के) आहे. यावरुन जामखेड तालुका हा उत्पन्न स्पर्धेत मागास असल्याचे दिसते.

**तक्ता क्र. ४.७६**
**बचत न होण्याची कारणे**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दैनंदिन खर्च | ७३ | ६३ | ८३ | ९७ | २७८(१००) |
| २ | कर्ज | ०९ | ०५ | ०८ | ०३ | २५(८.९९) |
| ३ | धार्मिक विधी | ६० | ०२ | ६५ | ४२ | १६९(६०.८०) |
| ४ | व्यसन | २० | ११ | २० | १० | ६१(२१.९४) |
| ५ | आजारपण | ०८ | ०५ | २५ | ०५ | ४८(१७.२६) |
| ६ | शिक्षण | २५ | ३५ | १२ | १० | ८२(२९.५०) |
| | एकुण | ७३ | ६३ | ८३ | ९७ | २७८ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र.४.७५ मध्ये केलेल्या प्रत्यक्ष पाहणीनुसार एकुण ४२० पैकी २७८ म्हणजेच (६६.१९) कुटुंबांची बचत होत नाही. या कुटुंबांची बचत न होण्यामागे त्यांचे विविध खर्च कारणाभूत ठरतात. तक्ता क्र. ४.७६ मध्ये या खर्चाची तालुकानिहाय विभागणी करण्यात आली आहे. त्यानुसार एकुण १००टक्के कुटुंबांचा दैनंदिन खर्च हे बचत न होण्यामागचे कारण आहे. तर त्याखालोखाल जमातीतील धार्मिक विधीला (६०.८० टक्के) बचत न होण्याचे कारण मानले जाते. त्याखालोखाल शिक्षण (२९.५० टक्के), व्यसन (२१.९४ टक्के), आजारपण (१७.२० टक्के) असा बचत न होण्याच्या कारणांचा क्रम दिसून येतो. तर सर्वात कमी बचत न होण्याचे कारण कर्ज केवळ (८.९९ टक्के) कुटुंबांच्या उत्तरामध्ये आहे. कारण या कुटुंबांमध्ये कर्जाचे प्रमाणही कमी आहे. यावरुन विविध बचत न होण्याची कारणे स्पष्ट होताना जमातीतील धार्मिक बाबींचा पगडा स्पष्ट होतो.

## ४.१५. अभ्यासक्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची स्थलांतरणाची स्थिती –

**तक्ता क्र. ४.७७**

**स्थलांतरीत कुटुंबांची संख्या**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | होय | १९ | १६ | १५ | ११ | ६१(१४.५३) |
| २ | नाही | ६९ | ७३ | ५२ | ७२ | २६६(६३.३३) |
| ३ | तात्पुरते | २८ | १५ | ३६ | १४ | ९३(२२.१४) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

स्थलांतरण हा घटक व्यक्तीच्या वर्तमान व भविष्यावर खूप प्रभाव पाडताना दिसतो. कुटुंबांचे स्थलांतरण झाल्याने त्या कुटुंबाला काही अनुकूल तर काही प्रतिकूल परिणामांना सामोरे जावे लागते. तसेच कुटुंबाच्या आर्थिकतेवरही परिणाम होतो. त्याचप्रमाणे कोल्हाटी जमातीचा सामाजिक व आर्थिक अभ्यास करत असताना स्थलांतरण या घटकाचे अनन्य साधारण महत्व आहे. कारण या समाजाचा पारंपारिक व्यवसाय हा भटकंती करत नाचणे, मनोरंजनाचे कार्य करणे हा असून आजही नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव तालुक्यातील कुटुंबे भटकंती करताना दिसतात. त्यांच्या या स्थलांतराचे दोन प्रकारचे स्वरुप विचारात घेतले आहे. तक्ता क्र. ४.७७ मध्ये दिल्याप्रमाणे स्थलांतरण झालेले कुटुंब, स्थलांतरण न झालेले कुटुंब, तात्पुरत्या स्वरुपात भटकंती म्हणजेच स्थलांतरित कुटुंब अशी तालुकानिहाय विभागणी दिलेली आहे. त्यानुसार एकुण ४ तालुक्यांमधील ४२० कुटुंबांपैकी ६१ कुटुंबे (१४.५३ टक्के) स्थलांतरीत झालेली आहेत. २६६ कुटुंबे (६३.३३ टक्के) स्थलांतरण न झालेली आहेत तर तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरण करणारी कुटुंब संख्या ९३ असून त्यांचे प्रमाण (२२.१४ टक्के) आहे. कायमचे स्थलांतरण केलेल्या कुटुंबांमध्ये नगर तालुक्यातील सर्वात जास्त कुटुंबांचा समावेश होतो तर स्थायिक असणाऱ्या कुटुंबांमध्ये नेवासा व शेवगाव तालुक्यातील सर्वाधिक कुटुंबांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे चारही तालुक्यामध्ये ज्या स्त्री व पुरुष पारंपारिक व्यवसाय करतात त्यापैकी ९३ कुटुंब हे नाचगाणे, मनोरंजन, तमाशा या क्षेत्रामुळे

सातत्याने भटकंती करतात व तात्पुरते स्थलांतरण घडते. अशाप्रकारे तीन स्वरुपामध्ये स्थलांतरणाचे विश्लेषण समोर येते.

## ४.१६. अभ्यासक्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची स्थलांतरणाची कारणे व परिणाम–

**तक्ता क्र. ४.७८**

**स्थलांतरणाचे कारण**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नोकरी निमित्त | ०१ | ०३ | ०१ | ०२ | ०७(४.५४) |
| २ | पारंपारिक व्यवसायानिमित्त | २८ | १५ | ३६ | १४ | ९३(६०.३९) |
| ३ | शिक्षणा निमित्त | ०२ | ०५ | ०१ | ०२ | १०(६.५०) |
| ४ | इतर | १६ | ०८ | १३ | ०७ | ४४(२८.५७) |
| | एकुण | ४७ | ३१ | ५१ | २५ | १५४ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

स्थलांतरित कुटुंबांचे प्रमाण तक्ता क्र. ४.७७ मध्ये अभ्यासल्यानंतर त्या कुटुंबांच्या कारणांचा अभ्यास तक्ता क्र.४.७८ मध्ये करण्यात आला आहे. या कारणांमध्ये प्रामुख्याने नोकरी, पारंपारिक व्यवसाय, शिक्षण व इतर कारणे यांचा समावेश करण्यात आला आहे. एकुण १५४ स्थलांतरित कुटुंबांपैकी सर्वाधिक स्थलांतरण पारंपारिक व्यवसायामुळे झालेले दिसते. ९३ कुटुंबे (६०.३९ टक्के) पारंपारिक व्यवसायामुळे स्थलांतरण केलेली आहेत. त्यामध्ये जामखेड तालुक्यातील कुटुंबांची संख्या सर्वाधिक तर नेवासा व शेवगाव तालुक्यातील कुटुंबांची संख्या सर्वात कमी आहे. त्यानंतर चारही तालुक्यांमध्ये ४४ कुटुंबांचे इतर कारणानिमित्त स्थलांतरण झालेले दिसते. तसेच १५४ स्थलांतरित कुटुंबांपैकी नोकरी व शिक्षणानिमित्त स्थलांतरण झालेले कुटुंब खूप कमी प्रमाणात आहेत. यावरुन पारंपारिक व्यवसाय व दैनंदिन जीवन जगत असताना निर्माण होणाऱ्या इतर कारणांमुळे चारही तालुक्यांमध्ये स्थलांतरण अग्रक्रमाने झालेले दिसते.

**तक्ता क्र. ४.७९**

**स्थलांतरणाचे प्रकार**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गावाकडून शहराकडे | १६ | १२ | १५ | ११ | ५४(८८.५२) |
| २ | शहराकडून शहराकडे | ०३ | ०४ | ०० | ०० | ०७(११.४८) |
| ३ | शहराकडून गावाकडे | ०० | ०० | ०० | ०० | (००.००) |
| | एकुण | १९ | १६ | १५ | ११ | ६१ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

नगर,नेवासा, जामखेड व शेवगाव तालुक्यांमधील स्थलांतर न झालेले स्थायिक व तात्पुरते स्थलांतरण झालेले कुटुंबे वगळता एकुण ६१ कायमस्वरुपी स्थलांतरित झालेल्या कुटुंबांच्या स्थलांतरणाच्या प्रकाराची विभागणी तक्ता क्र. ४.७९ मध्ये दिल्याप्रमाणे करण्यात आली आहे. त्यानुसार एकुण ६१ कायमस्वरुपी स्थलांतरण कुटुंबांपैकी ५४ कुटुंबांचे गावाकडून शहराकडे स्थलांतरण झालेले आहे. त्यांचे प्रमाण (८८.५२ टक्के) आहे तर केवळ ०७ कुटुंबांचे स्थलांतरण (११.४८ टक्के) प्रमाणात शहराकडून शहराकडे झालेले आहे. तर शहराकडून गावाकडे चारही तालुक्यामधील एकही कुटुंब स्थलांतरित झालेले नाही. यावरुन गावाकडे रोजगार व पारंपारिक व्यवसायास वाव मिळत नसल्याने उदरनिर्वाहासाठी मोठया प्रमाणात शहरांकडे स्थलांतरण झालेले दिसते. तर शहराकडून ग्रामीण भागात जाण्यास एकही कुटुंब उत्साहित झाल्याचे दिसत नाही.

**तक्ता क्र. ४.८०**

**स्थलांतरणापूर्वी व स्थलांतरणानंतरची आर्थिक सुधारणाबाबतची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुधारणा झाली असे म्हणणारे | १५ | १५ | १० | ०९ | ४९(८०.३२) |
| २ | सुधारणा नाही झाली असे म्हणणारे | ०४ | ०१ | ०५ | ०२ | १२(१९.६८) |
| | एकुण | १९ | १६ | १५ | ११ | ६१ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

स्थलांतरण या घटकांचा आर्थिक परिस्थीतीवर मोठया प्रमाणात अनुकुल किंवा प्रतिकूल परिणाम होतो. हा परिणाम व संबंध अभ्यासण्यासाठी कायमस्वरुपी स्थलांतरीत ६१ कुटुंबांची प्रत्यक्ष पाहणी केली असता तक्ता क्र. ४.८० मध्ये दिलेली माहिती स्पष्ट होते. त्यानुसार एकुण ६१ कायम स्वरुपी स्थलांतरित कुटुंबांपैकी ४९ कुटुंबाच्या आर्थिक परिस्थिती व राहणीमानात सुधारणा झाली आहे. त्यांचे प्रमाण (८०.३२ टक्के) आहे. त्यापैकी नगर व नेवासा या दोन्ही तालुक्यातील स्थलांतरित ६१ कुटुंबांपैकी १२ कुटुंबांची आर्थिक व राहणीमानात सुधारणा झाली नाही असे मत आहे. त्यांचे प्रमाण (१९.६८ टक्के) आहे. त्यापैकी नगर व जामखेड तालुक्यातील कुटुंबांची स्थलांतरणानंतरही सुधारणा न होण्याची संख्या जास्त आहे. यावरुन असे दिसते की स्थलांतरण झाल्यानंतर कोल्हाटी कुटुंबांतील आर्थिक व राहणीमान सुधारणेस वाव मिळत आहे.

## ४.१७. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमात व शासकीय योजनांचा आढावा –

**तक्ता क्र. ४.८१**

**शासकीय योजनांविषयी माहिती बाबत**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | माहिती असणारे | ९५<br>(८०.९०) | ७०<br>(६७.३१) | ५९<br>(५७.२८) | ९६<br>(९८.९७) | ३२०<br>(७६.१९) |
| २ | माहिती नसणारे | २१<br>(१८.१०) | ३४<br>(३२.६९) | ४४<br>(४२.७२) | ०१<br>(१.०३) | १००<br>(२३.८१) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव या चार तालुक्यामंधील इतर आर्थिक बाबींचा अभ्यास केल्यानंतर एकुण निवडलेल्या ४२० कुटुंबांमध्ये शासनाच्या सवलती, योजना याविषयी दृष्टीकोन जाणून घेण्यात आला आहे. जमातीतील पारंपारिक व्यवसायाचे प्रमाण व निरक्षरता तसेच सरकार दरबारापासून अलिप्तता यामुळे अनेक कुटुंबांना आपणासाठी नेमक्या कोणत्या

सवलती व योजना शासनाकडून दिल्या जातात याची जाणीव नाही तर त्यामध्ये आर्थिक, शैक्षणिक, शेतीविषयक सवलती, कर्जविषयक सवलती यांचा समावेश होतो याचीही माहिती त्यांना नाही. तक्ता क्र. ४.८१ मध्ये माहिती असणाऱ्या व नसणाऱ्या कुटुंबांची विभागणी करण्यात आली आहे. ही माहिती उत्तरदाता कुटुंबप्रमुख व उपलब्ध कुटुंब सदस्य यांच्या मदतीने नोंदविण्यात आली आहे. त्यानुसार एकुण ४२० कुटुंबांपैकी ३२० कुटुंबांना कोल्हाटी जमातीसाठी असणाऱ्या शासकीय योजनांविषयक माहिती आहे तर त्यांचे प्रमाण (७६.१९ टक्के) आहे. तसेच १०० कुटुंबांना या शासकीय योजनांची माहिती नाही म्हणजेच (२३.८१ टक्के) कुटुंब यापासून अलिप्त आहेत. माहिती असणाऱ्या कुटुंबांपैकी सर्वात कमी माहिती जामखेड तालुक्यातील कुटुंबांना आहे. तर माहिती नसणाऱ्या कुटुंबांमध्ये सर्वात जास्त जामखेड तालुक्यातील कुटुंबांचा समावेश होतो.यावरुन जामखेड तालुक्यातील कुटुंबांना शासकीय योजनांविषयी कमी माहिती असल्याचे निष्कर्ष निघतो. तर शेवगाव तालुक्यामध्ये शासकीय योजनां संदर्भात अधिक माहिती असल्याचे दिसते.


**तक्ता क्र. ४.८२**

**विविध शासकीय योजनांचे लाभार्थी कुटुंब**

| अ.क्र. | योजनेचा तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | घरकुल | ०३ | ०० | ०६ | ०९ | १८ |
| २ | वृध्दापकाळ पेन्शन | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |
| ३ | कलाकार मानधन | ०१ | ०० | ०३ | ०१ | ०५ |
| ४ | वसंतराव नाईक महामंडळ कर्ज | ०० | ०० | ०० | ०७ | ०७ |
| | एकुण | ०५ | ०० | ०९ | १७ | ३१ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

**आलेख क्र. ४.१५**




आधार – तक्ता क्र. ४.८२

तक्ता क्र. ४.८२ मध्ये दिल्याप्रमाणे बऱ्यापैकी कुटुंबांना शायकीय योजनांची माहिती असूनही प्रत्यक्षात या योजनांचे लाभार्थी कुटुंब खूपच कमी आढळले आहेत. एकुण ४२० कुटुंबांपैकी केवळ १८ कुटुंब घरकुल चे लाभार्थी आहेत. केवळ नगर तालुक्यातील एका कुटुंबाला वृध्दापकाळ पेन्शन मिळत आहे. केवळ ०५ कलावंतीन कुटुंबप्रमुख स्त्री असणाऱ्यांना कलाकार मानधन मिळत आहे. आणि तेही खूप अंतराने मिळते. ७ कुटुंबांना वसंतराव नाईक महामंडळाचे कर्ज मिळाले आहे तेही लहान व छोटया उदयोगांसाठी अशाप्रकारे ३१ लाभार्थी कुटुंबांपैकी शेवगाव तालुक्यामध्ये १७ लाभार्थी कुटुंबांचा समावेश होतो कारण त्याठिकाणी बोधेगाव या गावातील कोल्हाटी जमातीचे सरपंच श्री. रामजी अंधारे यांनी तो आपल्या जातबांधवांना मिळवून देण्यात यश प्राप्त केले. एकंदरीत एकुण ४२० कुटुंबांपैकी अगदी किरकोळ कुटुंबांना शायकीय योजनांविषयी लाभ मिळाल्याचा निष्कर्ष निघतो.

## ४.१८. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची राहणीमानासंबंधी माहिती–

**तक्ता क्र. ४.८३**

**निवासाच्या मालकी हक्कासंबंधी विश्लेषण**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्वतःचे घर | १०९ (९३.९७) | १०० (९६.१५) | ९४ (९१.२६) | ९१ (९३.८१) | ३९४ (९३.८१) |
| २ | भाडयाने | ०७ (६.०३) | ०४ (३.८५) | ०९ (८.७४) | ०६ (६.१९) | २६ (६.१९) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.८३ मध्ये नगर,नेवासा, जामखेड व शेवगाव या चार तालुक्यांतील निवडलेल्या ४२० कुटुंबांची प्रत्यक्ष पाहणी केली असता त्यांच्या राहत्या घराची स्थिती व मालकी याबद्दल माहिती मिळते. प्रत्यक्ष निरिक्षणातून घरासंबंधी स्थिती लक्षात येण्यास मदत होते. एकुण ४२० कुटुंबांपैकी ३९४ कुटुंबांचे स्वतःचे घर आहे. त्यांचे प्रमाण (९३.८१ टक्के) आहे. त्यापैकी नेवासा तालुक्यामध्ये सर्वात जास्त स्वतःचे घरे आहेत. केवळ २६ कुटुंब हे भाडयाच्या घरामध्ये राहतात त्यांचे प्रमाण ६.१९ टक्के आहे. त्यापैकी जामखेड तालुक्यामध्ये भाडयाने  राहणाऱ्या कुटुंबांची संख्या तुलनात्मकदृष्टया जास्त आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, एकुण चारही तालुक्यांमध्ये स्वतःचे घर असणाऱ्या कुटुंबांची संख्या अधिक असून निवारा या मूलभूत घटकाबाबतची स्थिती समाधानकारक आहे.

**तक्ता क्र. ४.८४**

**निवासासंबंधी विश्लेषण**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | झोपडी | ०१(०.८६) | ०० | ०० | ०१(१.०३) | ०२(०.४८) |
| २ | पत्रे | ६७(५७.७६) | ६१(५८.६५) | ४१(३९.८१) | ५८(५९.७९) | २२७(५४.०५) |
| ३ | स्लॅब | ४८(४१.३८) | ४३(४१.३५) | ६२(६०.१९) | ३८(३९.१८) | १९१(४५.४८) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ०९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.८४ मधील माहितीनुसार घरासंबंधी मालकी विचारात घेतल्यानंतर घराचा प्रकार विचारात घेणे गरजेचे आहे कारण केवळ मालकी महत्वाची नसून घराचे स्वरुपसुध्दा तेवढेच महत्वाचे वाटते. छप्प्र, पाल या स्वरुपाची घरे सद्यस्थितीत एकाही कुटुंबाचे आढळले नाही. केवळ ०२ कुटुंबांच्या झोपडयांमध्ये निवास दिसून आला. तर एकुण ४२० कुटुंबांपैकी २२७ कुटुंबांच्या घराचे स्वरुप पत्र्याचे होते. त्यांचे प्रमाण (५४.०५ टक्के) आहे. शेवगावमध्ये सर्वात जास्त पत्र्याची घरे आढळली तर जामखेड मध्ये सर्वात कमी पत्र्याची घरे आहे. १९१ कुटुंबांची घरे स्लॅबची आहेत. त्यांचे प्रमाण (४५.९८ टक्के) आहे. त्यापैकी जामखेड तालुक्यामध्ये सर्वात जास्त स्लॅबची घरे असून शेवगाव तालुक्यामध्ये सर्वात कमी स्लॅबची घरे आहेत. यावरुन असा निष्कर्ष निघतो, की चारही तालुक्यामध्ये पत्र्याच्या घरांचे प्रमाण सर्वात जास्त व त्याखालोखाल स्लॅबची घरे आहेत. तर छप्पर, पाल, झोपडी अशा स्वरुपाची घरे सद्यस्थितीत आढळत नाहीत. ही राहणीमान व आर्थिक विकास यासंबंधी समाधानकारक बाब आहे.

**तक्ता क्र. ४.८५**

**घरातील उपभोग्य वस्तूनुसार विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | टेप/रेडिओ | ६० | ४४ | २७ | ४० | १७१ |
| २ | फॅन | ३४ | ६५ | २२ | ४२ | १६३ |
| ३ | फ्रिज | ११ | ३२ | १२ | २५ | ८० |
| ४ | दिवाण/पलंग | ३० | ५६ | २० | ४० | १४६ |
| ६ | कपाट | ७० | ५८ | ४१ | ६० | २२९ |
| ७ | मिक्सर | २२ | ५१ | २५ | ४२ | १४० |
| ८ | टु व्हीलर | १९ | ३० | १५ | १८ | ८२ |
| ९ | फोरव्हीलर | ०१ | ०४ | ०१ | ०२ | ०८ |
| १० | मोबाईल | ११६ | १०४ | ९० | ९५ | ४०५ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून कुटुंबाचा उपभोग व उत्पन्न यांचा एकमेकांवर परिणम होतो व त्यामधून बचत संकल्पनेला प्रोत्साहन मिळते. प्रत्येक कुटुंबाचे राहणीमान, उपभोग्य वस्तू,

चैनीच्या वस्तू यांची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर त्या कुटुंबाची प्रगतीचा अंदाज घेण्यास मदत होणार आहे. नगर,नेवासा, जामखेड व शेवगाव या चार तालुक्यांमधील एकुण ४२० कुटुंबांपैकी मोबाईल ही जीवनावश्यक वस्तू ४०५ कुटुंबांमध्ये सर्वाधिक प्रमाणात टक्के आढळली. त्यानंतर कपाट २२९ टेप, फॅन, दिवाण/पलंग, मिक्सर, या सर्वसाधारण परवडणाऱ्या वस्तूंचा उपभोग बऱ्याच कुटुंबांमध्ये दिसतो. परंतु, ज्यांच्या किंमती जास्त आहेत अशा अल्प व मध्यम उत्पन्न गटातील लोकांनाच परवडणाऱ्या वस्तूंचे प्रमाण कमी असून टू व्हीलर ८२, फ्रिज ८० तर फोर व्हीलर ८ कुटुंबांकडे आहे. एकुण ४२० कुटुंबांपैकी मोठया प्रमाणातील लोक वरील उपभोग्य वस्तूपैकी काहीच नसलेले आहेत. तर दैनंदिन व सामूहिक वस्तूंचे प्रमाणात एकंदरित जास्त आहे. तर महागडया चैनीच्या वस्तूंचे प्रमाण अत्यल्प आहे आणि ते नोकरी करणाऱ्या सुशिक्षीत कुटुंबांमध्ये अधिक आहे.

## ४.१९. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांची राजकीय जागरुकता विषयक माहिती–

**तक्ता क्र. ४.८६**

**मतदानविषयक माहिती**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मतदान करणारे | ९७ (८३.६२) | ९० (८६.५४) | ७० (६७.९६) | ७४ (७६.२९) | ३३१ (७८.८१) |
| २ | मतदान न करणारे | १९ (१६.३८) | १४ (१३.४६) | ३३ (३२.०४) | २३ (२३.७१) | ८९ (२१.१९) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

मतदान करणे हे स्वतंत्र भारतातील प्रत्येक नागरिकाचा राजकीय अधिकार व कर्तव्य आहे. याची जाणीव या समाजातील विशिष्ट घटकाला अजूनही झाली नाही असे चित्र दिसते. एकुण ४२० कुटुंबप्रमुखांपैकी ३३१ कुटुंबप्रमुख (७८.८१ टक्के) मतदान करतात तर ८९ कुटुंब प्रमुख (२१.१९ टक्के) या प्रमाणात मतदान करत नाहीत. मतदान न करणाऱ्या कुटुंब प्रमुखांमध्ये जामखेड तालुक्यातील सर्वात जास्त कुटुंबप्रमुखांचे प्रमाण (३२.०४ टक्के) आहे

तर सर्वात कमी नेवासा तालुक्यामध्ये मतदान न करणाऱ्या कुटुंबप्रमुखांचे प्रमाण (१३.४६ टक्के) आहे. यावरुन अजूनही मतदानाचे महत्व या जमातीला पटवून देण्याची गरज वाटते. कारण भटकंती, राजकीय अनास्था, शासकीय उदासीनता,निराशा यामुळे मतदान करण्याबाबत अनेक कुटुंबप्रमुख निरुत्साही आहेत.

**तक्ता क्र. ४.८७**

**शिधापत्रक/रेशनकार्ड असणाऱ्यांची संख्या**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रेशनकार्ड असणारे | ११२ (९६.५५) | १०२ (९८.०८) | १०२ (९९.०३) | ९४ (९६.९१) | ४१० (९७.६२) |
| २ | रेशनकार्ड नसणारे | ०४ (३.४५) | ०२ (१.९२) | ०१ (०.९७) | ०३ (३.०९) | १० (२.३८) |
| | एकुण | ११६ | १०४ | १०३ | ९७ | ४२० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

सार्वजनिक धान्य वितरण व्यवस्थेनुसार शासन या जमातीला नेमके कोणत्या गटामध्ये समाविष्ट केले आहे याचे एकंदरित चित्र समोर येण्यास मदत होते. अनेक कुटुंबांकडे केशरी रंगाचे रेशनकार्ड असून त्यावर तात्पुरते बीपीएल असा शिक्का मारुन देण्यात आल्याचे दिसून आले. रेशनकार्ड असणाऱ्यांची संख्या बऱ्यापैकी असून एकुण ४२० कुटुंबांपैकी ४१० म्हणजेच (९७.६२ टक्के) कुटुंबांकडे रेशन कार्ड आहे. तर भटकंती, कागदपत्रांची जुळवाजुळव, तांत्रिक अडचणी या कारणांमुळे केवळ १० कुटुंबांकडे (२.३८ टक्के) प्रमाणात रेशनकार्ड नाही म्हणजेच शिधापत्र सर्वजणांकडे आहे.

## ४.२०. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या पारंपारीक कलावंतीण स्त्री व्यवसायासंबंधी आर्थिक विश्लेषण–

कोल्हाटी जमातीचा व्यवसाय पूर्वीपासून नाचकाम करणे, कसरतीचे खेळ, मनोरंजन हा आहे. परंतु आधुनिक काळात या शिक्षण व परिवर्तनामुळे या जमातीने इतर उदरनिर्वाहाच्या साधनांचा आधार घेतला असून अगदी थोडया प्रमाणात म्हणजेच (३०.४० टक्के) जमात अहमदनगरमधील नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव या निवडक तालुक्यांमध्ये मनोरंजनाचे

कार्य करताना दिसते. हे पारंपारिक कार्याचे स्वरुप निश्चितच पूर्वीपेक्षा वेगळे असून त्यामध्ये पूर्वी जे रस्त्यावर नाचकाम होत होते ते आता तो सुसज्ज हॉलमध्ये, खोल्यांमध्ये घेऊन त्यास बैठक, शो, मैफिल असे स्वरुप आले आहे. यामध्ये सद्यस्थितीत तमाशा फड, दिवाणखाना व कलाकेंद्र असे प्रकार पडतात. त्यापैकी निवडलेल्या कलावंतीन स्त्री कुटुंबप्रमुखांपैकी दिवाणखाना व कलाकेंद्राशीसंबंधी सर्वेक्षणात मिळालेली माहिती पुढीलप्रमाणे

**तक्ता क्र. ४.८८**

**व्यवसाय करारासंबंधी विश्लेषण**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कलाकेंद्र मालक | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | मालकीण | ५८ (३५.८०) | १७ (१०.४९) | ५५ (३३.९५) | ३२ (१९.७५) | १६२ (१००.००) |
| ३ | दलाल | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | यजमान | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | एकुण | ५८ | १७ | ५५ | ३२ | १६२ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

व्यवसायामध्ये प्रामुख्याने समाविष्ट घटक म्हणजे कलाकेंद्र मालक, पार्टी मालकीण व येणारा प्रेक्षक वर्ग होय. यापैकी कलावंतीन स्त्रीच्या करार कलाकेंद्र मालक यांच्यातील केंद्रबिंदू म्हणजे पार्टी मालकीण होय. यासंबंधीची माहिती तक्ता क्र. ४.८८ मध्ये निदर्शनास येते. एकुण १६२ कलावंतीन उत्तरदात्यांच्यानुसार कलाकेंद्र मालक व कलावंतीन नर्तिकी या दोन्हींचा करार पार्टी मालकिणीबरोबर असतो.

**तक्ता क्र. ४.८९**

**कराराचे स्वरुप**

| क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लेखी | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | तोंडी | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ३ | विश्वास | ५८(३५.८०) | १७(१०.४९) | ५५(३३.९५) | ३२(१९.७५) | १६२(१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

प्रत्यक्ष पाहणीत एकुण १६२ कलावंतीन स्त्री कुटुंबप्रमुखांपैकी १०० टक्के स्त्रियांचे कराराचे स्वरुप तोंडी स्वरुपाचे आहे. त्यांच्यामते, या व्यवसायामध्ये आपापसातील विश्वासाला जास्त महत्व दिले जाते. सर्व कलावंत पाटर्या प्रसिध्द व परिचयाच्या असल्याने या ठिकाणी लेखी स्वरुपाचे करार होत नाहीत. त्याचप्रमाणे उत्पन्न–खर्च या बाबी कलावंत साथीदार व पार्टी मालकीन यांच्याशी सामूहिकरित्या निगडित असल्याने तोंडी कराराचे स्वरुप सर्वत्र आढळून येते.

**तक्ता क्र. ४.९०**

**करार अटीनुसार विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जमीन देणे | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | घर बांधून देणे | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ३ | कायमचा आधार | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | मुले सांभाळण्याची हमी | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ५ | रोख रक्कम स्वरुपात | ५८ (३५.८०) | १७ (१०.४९) | ५५ (३३.९५) | ३२ (१९.७५) | १६२ (१००.००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

ज्यावेळी कलाकेंद्र मालक व कलावंत पार्टी मालकीन यांच्यामध्ये करार होतो. तो रोख रक्कम स्वरुपाचा असून कलावंत व पार्टी मालकीन यामध्येही येणारे उत्पन्न हे रोख स्वरुपातच दिले जाते. करारातील समाविष्ट कलाकार आर्थिकदृष्टया मागासलेले व कर्जबाजारीपणा यांनी ग्रासलेले असल्याने तक्ता क्र. ४.९० मध्ये दिल्याप्रमाणे या सहाय्यक कलाकारांना जीवनाच्या मुलभूत गरजांची पूर्तता उदा. जमीन, घर, कायमचा आधार, मुले सांभाळणे अशा गरजांची पूर्तता हे उद्दिष्ट नसून केवळ उदरनिर्वाह करुन रोख रक्कम ताब्यात घेणे हे उद्दिष्ट असल्याचे दिसून येते. अभ्यासातील पाहणीवरुन एकुण १६२ कलावंतीन स्त्रीयांच्या उत्तरावरुन अशा स्वरुपाचे करार होत असल्याचे स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ४.९१**

**मिळणाऱ्या पैशावरील अधिकाराची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कलाकेंद्र मालक | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | मालकीण | ५८ (३५.८०) | १७ (१०.४९) | ५५ (३३.९५) | ३२ (१९.७५) | १६२ (१००.००) |
| ३ | दलाल | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | यजमान | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ५ | स्वतः | ०० | ०० | ०० | ०० | ०० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.९१ मध्ये दिल्याप्रमाणे एकुण १६२ कलावंतांचे रोख स्वरुपातील मिळकत असते. परंतु मिळणारे उत्पन्नावर केवळ स्वतः कलावंतांचा अधिकार नसून १६२ कलावंतांच्या मतावरुन ते उत्पन्न पार्टी मालकीणीच्या ताब्यात जाते. त्यानंतर पार्टीतील सहभागी कलावंत व मालकीण यांचे हिस्से ठरलेले असतात त्यानुसार त्या उत्पन्नाची विभागणी केली जाते.

**तक्ता क्र. ४.९२**

**आर्थिक मालकीनुसार विभागणी**

| अ. क्र. | तपशील | नगर | | नेवासा | | जामखेड | | शेवगाव | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्वतः | मालकीन | स्वतः | मालकीन | स्वतः | मालकीन | स्वतः | मालकीन |
| १ | बैठकीचे | ०० | ५८ | ०० | १७ | ०० | ५५ | ०० | ३२ |
| २ | कराराचे | ०० | ५८ | ०० | १७ | ०० | ५५ | ०० | ३२ |
| ३ | शोचे | ०० | ५८ | ०० | १७ | ०० | ५५ | ०० | ३२ |
| ४ | वैयक्तिक | ५८ | ०० | १७ | ०० | ५५ | ०० | ३२ | ०० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८

कलाकेंद्रात होणारे बैठकीचे उत्पन्न, कराराचे उत्पन्न, शोचे उत्पन्न या सर्वांवर आर्थिक मालकी ही पार्टी मालकिणीची असून त्यामधून सर्वांचा सामूहिक खर्च वजा करुन उरलेले

उत्पन्न ठरलेल्या हिस्स्यानुसार विभागून दिले जो. तक्ता क्र. ४.९२ मध्ये दिल्याप्रमाणे एकुण १६२ कलावंतीनींच्या बैठकीचे, कराराचे, शो चे आर्थिक मिळकतीवर पार्टी मालकीणीचा अधिकार असतो. परंतु कराराव्यतिरिक्त वैयक्तिक व्यवहारातून मिळालेले कलावंतीनीचे उत्पन्न केवळ तिचे स्वतःचे असते.

**तक्ता क्र. ४.९३**

**कलाप्रदर्शन करताना उधळपट्टी(दौलतजादा)चे विश्लेषण**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दौलतजादा स्वीकारणारे | ३० (१८.५२) | ०४ (२.४७) | १३ (८.०२) | ०७ (४.३२) | ५४ (३३.३३) |
| २ | दौलतजादा न स्वीकारणारे | २८ (१७.२८) | १३ (८.०२) | ४२ (२५.९३) | २५ (१५.४३) | १०८ (६६.६७) |
| | एकुण | ५८ (३५.८०) | १७ (१०.४९) | ५५ (३३.९५) | ३२ (१९.७५) | १६२ (१००.००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

प्रत्यक्ष पाहणीनुसार तक्ता क्र. ४.९३ मध्ये दिल्याप्रमाणे सर्वच ठिकाणी दौलतजादा होते व ती स्वीकारली जाते असे नाही तर दौलतजादा काही ठिकाणी स्वीकारली जाते तर काही ठिकाणी स्वीकारली जात नाही. तक्ता क्र. ४.९३ नुसार एकुण १६२ स्त्री कलावंतीन कुटुंबप्रमुखांपैकी ५४ स्त्रिया दौलतजादा उत्पन्न स्वीकारणाऱ्या आहेत. त्यांचे प्रमाण (३३.३३ टक्के) आहे. तर १०८ कलावंतीनी कुटुंबप्रमुख स्त्रिया नियमानुसार दौलतजादा स्वीकारत नाहीत. त्यांचे प्रमाण (६६.६७ टक्के) हे दौलतजादा स्वीकारणाऱ्यांपेक्षा जास्त आहे. येणारा प्रेक्षक वर्ग हा पार्टी मालकीन व कलाकेंद्र मालक यांच्याबरोबर ठरलेल्या रक्कम अदा करुन मनोरंजनासाठी बसलेला असतो. परंतु करमणूक करुन घेताना तो ज्या पैशाची उधळपट्टी करतो त्यास दौलतजादा असे म्हणतात.

**तक्ता क्र. ४.९४**

**दौलतजादा(उधळपट्टी)तून मिळणाऱ्या उत्पन्नाची मालकी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कलाकेंद्र मालक | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | पार्टी मालकीण | ३०(१८.५२) | ०४(२.४७) | १३(८.०२) | ०७(४.३२) | ५४(३३.३३) |
| ३ | दलाल | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | वडील/भाऊ | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ५ | स्वतः | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | एकुण | ३०(१००) | ०४(१००) | १३(१००) | ०७(१००) | ५४(१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.९४ मध्ये दिल्याप्रमाणे एकुण ५४ कलावंतीन कुटुंबप्रमुख स्त्रिया दौलतजादा स्वीकारत असल्या तरी त्यावर संपूर्ण त्यांची मालकी नसून ते उत्पन्न पुन्हा पार्टी मालकीनीच्या ताब्यात देणे बंधनकारक असते. तक्ता क्र. ४.९४ मध्ये दिल्याप्रमाणे १०० टक्के कलावंतीन स्त्रिया पार्टी मालकिणीकडे ते दयावे लागते असे म्हणतात. यावरुन त्यावर सामूहिक हक्क असल्याचे दिसते.

**तक्ता क्र. ४.९५**

**कलावंतीणीच्या व्यवसायकाळातील मूलभूत खर्च करणाऱ्यांची विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कलाकेंद्र मालक | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | पार्टी मालकीण | ५८ (३५.८०) | १७ (१०.४९) | ५५ (३३.९५) | ३२ (१९.७५) | १६२ (१००.००) |
| ३ | दलाल | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | वडील/भाऊ | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ५ | स्वतः | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | एकुण | ५८ | १७ | ५५ | ३२ | १६२ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कलावंतीन स्त्री तसेच इतर कलाकार हे कुटुंबांमधील व्यक्ती राहत्या ठिकाणी ठेवून स्वतंत्र कलाकेंद्रामध्ये निवास करत असतात. त्यांचा रोजचा होणारा खाणे, पिणे व इतर खर्च मालकीण करत असते. परंतु मालकीण तो खर्च मिळणाऱ्या उत्पन्नातून करत असते. मिळणारे उत्पन्न खर्च वजा करुन हिस्स्यानुसार विभागून दिले जाते. यावरुन प्रत्यक्षरित्या तो खर्च मालकणी करत असली तरी तो सामुहिक उत्पन्नातून होत असतो. दर ४ दिवसांनी हा उत्पन्न–खर्चाचा हिशोब होतो. तक्ता क्र. ४.९५ नुसार एकुण १६२ कलावंतीनीच्या खर्चाचा हिशोब पार्टी–मालकिणीच्या ताब्यात असतो.

**तक्ता क्र. ४.९६**

**व्यवसायाच्या स्थानानुसार विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुठेही | ४० (२४.६९) | १० (६.१७) | ३८ (२३.४६) | २० (१२.३५) | १०८ (६६.६७) |
| २ | कारखाना | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ३ | बाजारपेठेच्या बाजूला | ०६ (३.७०) | ० (०.००) | ०२ (१.२३) | ०४ (२.४७) | १२ (७.४१) |
| ४ | गजबजलेल्या शहरांच्याजवळ | १२ (७.४१) | ०७ (४.३२) | १५ (९.२६) | ०८ (४.९४) | ४२ (२५.९३) |
| ५ | सधन शेतकऱ्यांच्या आश्रयाला | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | एकुण | ५८ | १७ | ५५ | ३२ | १६२ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

सद्यस्थितीत प्रचलित असणारा कोल्हाटी जमातीतील स्त्रिया करीत असणारा पारंपारिक व्यवसाय तमाशा फंड, दिवाणखाना, कलाकेंद्र याठिकाणी चालतो. नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव याठिकाणी असणाऱ्या एकुण १६२ कलावंतीन स्त्रियांना व्यवसायाचे स्थान विचारले असता कलावंतीन कुटुंबप्रमुख स्त्रिया व्यवसाय कुठेही चालतो असे म्हणतात. (७.४१ टक्के) कलावंतीन कुटुंबप्रमुख स्त्रियांच्या मते हा व्यवसाय बाजारपेठेच्या बाजूला चालतो तर

(२५.९३ टक्के) कलावंतीन कुटुंबप्रमुख स्त्रियांच्या मते हा व्यवसाय गजबजलेल्या शहरांच्याजवळ चालतो. कारखाना, शेतकऱ्यांच्या शेतात, ओसाड ठिकाणी या व्यवसायाचे स्थान नाही असे १०० टक्के कलावंतीन कुटुंबप्रमुख स्त्रियांचे मत आहे. यावरुन हा मनोरंजन व करमणूकीचा व्यवसाय कुठेही चालतो परंतु गजबजलेल्या ठिकाणी सर्वाधिकपणे चालू असतो.

**तक्ता क्र. ४.९७**

**व्यवसायाचा कालावधी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२ महिने | ४० (२४.६९) | १० (६.१७) | ३८ (२३.४६) | २० (१२.३५) | १०८ (६६.६७) |
| २ | ६ महिने | १२ (७.४१) | ०७ (४.३२) | १५ (९.२६) | ०८ (४.९४) | ४२ (२५.९३) |
| ३ | ४ महिने | ०६ (३.७०) | ० (०.००) | ०२ (१.२३) | ०४ (२.४७) | १२ (७.४१) |
| ४ | ३ महिने | ० | ० | ० | ० | ० |
| | एकुण | ५८ | १७ | ५५ | ३२ | १६२ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

पूर्वी मनोरंजनाचे साधन व कार्य म्हणजे केवळ कोल्हाटी जमात हे समीकरण होते. परंतु सद्यस्थितीत मात्र करमणूकीची साधने वाढले आहेत. एकुण १६२ कलावंतीन स्त्रियांपैकी (६६.६७ टक्के) टक्के स्त्रियांच्या मते हा व्यवसाय प्रेक्षक उपलब्ध असतील तेव्हा म्हणजेच १२ महिने चालू असतो. तर (२५.९३ टक्के) कलावंतीन स्त्रियांच्यामते काही कालावधी काम करुन प्रेक्षकवर्ग नसल्यास किंवा कौटुंबिक समस्या सोडविण्यासाठी कुटुंबांकडे जावे लागते. त्यामुळे सरासरी हा व्यवसाय ६ महिने चालतो व (७.४१ टक्के) कलावंतीन स्त्रिया ज्या फार कमी काळ कलाकेंद्रात व जास्त काळ कुटुंबात असतात त्यांच्यामते या व्यवसायाचा कालावधी ४ महिने असतो. यावरुन कलावंतीनीच्या व प्रेक्षकांच्या सोयीनुसार हा व्यवसाय १२ महिने चालू असतो.

**तक्ता क्र. ४.९८**

**व्यवसायकाळात मुलांच्या आर्थिक संगोपनाची जबाबदारी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कलावंत | ५८ (३५.८०) | १७ (१०.४९) | ५५ (३३.९५) | ३२ (१९.७५) | १६२ (१००.००) |
| २ | ठेवलेला माणूस | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | मालक | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | मालकीण | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | दलाल | ० | ० | ० | ० | ० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कलावंतीन स्त्रीचा कुटुंबाचा विचार केला असता तिला कलाकेंद्रात तिचे कुटुंब घेवून निवास करण्याची अनुमती नसते. त्याचप्रमाणे लहान मुलबाळ असल्यास व्यवसाय व कामात अडथळा निर्माण होऊ नये म्हणून तिला कुटुंबातील इतर सदस्य आई–वडिल, भाऊ–भावजया, नातेवाईक, हॉस्टेल इ. ठिकाणी मुलाची संगोपनासाठी ठेवावे लागते. परंतु तक्ता क्र. ४.९८ मध्ये मुलांच्या संगोपनाची आर्थिक जबाबदारी विचारात घेतली असून त्यानुसार १६२ कलावंतीण स्त्री कुटुंबप्रमुखांना १०० टक्के स्वतः आपल्या लेकरांचा आर्थिक भार उचलावा लागतो. त्या मुलांचे वडिल प्रत्यक्षरित्या त्या मुलांचे संगोपनाची जबाबदारी स्वीकारत नसून या स्त्रियांना स्वतःलाच ही जबाबदारी पार पाडावी लागते.

**तक्ता क्र. ४.९९**

**भविष्यकाळासाठी बचतीसंबंधी तरतूद विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगदी बचत | १५ (९.२६) | ०५ (३.०९) | १० (६.१७) | ०५ (३.०९) | ३५ (२१.६९) |
| २ | शेती | ०० (०.००) | १० (६.१७) | ०० (०.००) | ०५ (३.०९) | १५ (९.२५) |
| ३ | घर | ५५ (३३.९५) | १५ (९.२६) | ४५ (२७.७८) | ३० (१८.५२) | १४५ (८९.५०) |
| ४ | सोने/दागिने | १० (६.१७) | ०३ (१.८५) | ० (०.००) | ०१ (०.६२) | १४ (८.६४) |
| ५ | यातील काहीच नाही | ०३ (१.८५) | ०२ (१.२३) | १० (६.१७) | ०२ (१.२३) | १७ (१०.४९) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कोल्हाटी जमातीची कलावंतीण स्त्रीचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे जोपर्यंत तिचे तारुण्य व लावण्य आहे तोपर्यंत तिची आर्थिक मिळकत चालू असते. तिचे कुटुंब तिच्या तारुण्य व नाचकाम यावर पूर्णपणे अवलंबून असते. वृध्दापकाळात त्या स्त्रीचे उदरनिर्वाहाचे साधन लुप्त होते. त्यावेळी तिने व्यवसायकाळात असताना भविष्यासाठी केलेली बचत तिला उपयोगी पडते. एकुण १६२ कलावंतीण स्त्री कुटुंबप्रमुखांना त्यांच्या भविष्यकाळासाठी बचतीसंबंधी तरतूद विचारली असता एकुण १६२ कलावंतींनीपैकी (२१.६० टक्के) कलावंतीनीकडे नगदी बचत (९.२५ टक्के) कलावंतीनीकडे शेती(८९.५० टक्के) कलावंतीनीकडे घर (८.६४ टक्के) कलावंतीनीकडे सोने/दागिने, तर (१०.४९ टक्के) कलावंतीनीकडे यातील काहीच नाही असे आढळते. यावरुन कलावंतीनीकडे घर असण्याचे प्रमाण सर्वाधिक असून नगदी बचत, सोने/दागिने, आणि शेतीचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसते. तसेच १६२ पैकी अनेक कलावंतीनींकडे यापैकी काहीच नसल्याचे दिसते.

**तक्ता क्र. ४.१००**

**व्यवसायामुळे सद्यस्थितीतील आर्थिक बदल**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बँक शिल्लक | १५ (९.२६) | ०५ (३.०९) | १० (६.१७) | ०५ (३.०९) | ३५ (२१.६०) |
| २ | शेती व घर | ५५ (३३.९५) | १५ (९.२६) | ४५ (२७.७८) | ३० (१८.५२) | १४५ (८९.५०) |
| ३ | यातील काहीच नाही | ०३ (१.८५) | ०२ (१.२३) | १० (६.१७) | ०२ (१.२३) | १७ (१०.४९) |
| ४ | होते पण विक्रीला काढले | ०५ (३.०९) | ० (०.००) | ०७ (४.३२) | ०१ (०.६२) | १३ (८.०२) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

प्रचलित समाजव्यवस्थेमध्ये कलावंतीनींकडे बघण्याचा हीन दृष्टीकोन व ती ऐशोआरामाचे जीवन जगत असल्याचा आहे. तीचे विवाह होत नसल्याने भविष्यातील तिला मुलाबाळांच्या शिक्षण, संगोपन, वृध्दापकाळासाठी थोडी–फार तरतूद म्हणून तिला मुले होणाऱ्या संबंधित पुरुषांकडून सोय करुन ठेवते. हीच तरतूद विवाहित स्त्रीने केली तर तिचा दूरदृष्टीकोन हिताचा परंतु तेच कलावंतीन स्त्रीकडे असल्यास त्याकडे हीन व स्वार्थी दृष्टीकोनातून बघितले जाते असे लक्षात येते. तक्ता क्र. ४.१०० मध्ये दाखविल्याप्रमाणे एकुण १६२ कलावंतीन स्त्रियांपैकी २१.६० टक्के स्त्रियांकडे बँक शिल्लक आहे. ८९.५० टक्के कलावंतीन स्त्रियांकडे शेती व घर आहे. १०.४९ टक्के कुटुंब प्रमुख स्त्रियांकडे यातील काहीच नाही तर ८.०२ टक्के कलावंतीण स्त्रियांकडे शेती व घर होते पण विक्रीला काढलेले आहे म्हणजेच आर्थिक समस्यांमुळे त्याची विल्हेवाट लावण्यात आली आहे.

## तक्ता क्र. ४.१०१

## पारंपारिक व्यवसायामुळे कौटुंबिक उदरनिर्वाहासंबंधी विश्लेषण

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उदरनिर्वाह प्रश्न सुटला म्हणणारे | १० (६.१७) | १० (६.१७) | ०४ (२.४७) | ०७ (४.३२) | ३१ (१९.१४) |
| २ | उदरनिर्वाह प्रश्न सुटला नाही म्हणणारे | २७ (१६.६७) | ०५ (३.०९) | ४८ (२९.६३) | २३ (१४.२०) | १०३ (६३.५८) |
| ३ | सांगता येत नाही | २१ (१२.९६) | ०२ (१.२३) | ०३ (१.८५) | ०२ (१.२३) | २८ (१७.२८) |
| | एकुण | ५८ (३५.८०) | १७ (१०.४९) | ५५ (३३.९५) | ३२ (१९.७५) | १६२ (१००.००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कलावंतीन स्त्रीची आर्थिक सद्यस्थिती व भविष्यासंबंधी तरतूद विचारात घेता पारंपारिक व्यवसायामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न नेमका सुटला की नाही जे जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. एकुण १६२ कलावंतीन स्त्री कुटुंब प्रमुख स्त्रियांपैकी १९.१४ स्त्रियांच्या म्हणण्यानुसार त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटला तर ६३.५८ टक्के स्त्रियांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटला नाही. तर १७.२८टक्के कलावंतीण स्त्रियांना या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. यावरुन सर्वाधिक प्रमाणात कलावंतीन स्त्रियांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न पारंपारिक व्यवसायातून सुटला नाही म्हणजेच त्या व त्यांचे कुटुंब आर्थिकदृष्टया आजही सक्षम नाहीत.

**तक्ता क्र. ४.१०२**

**रसिकांचा कलावंतीनीबद्दलचा दृष्टीकोन**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कलेचा आस्वाद | ०६ (३.७०) | ०५ (३.०९) | १५ (९.२६) | ०४ (२.४७) | ३० (१८.५२) |
| २ | मनोरंजन | १० (६.१७) | १२ (७.४१) | १२ (७.४१) | १० (६.१७) | ४४ (२७.१६) |
| ३ | वेळ घालविणे | ०१ (०.६२) | ०२ (१.२३) | ०१ (०.६२) | ०० (०.००) | ०४ (२.४७) |
| ४ | उधळपट्टी करणे | ५० (३०.८६) | १७ (१०.४९) | ४० (२४.६९) | २५ (१५.४३) | १३२ (८१.४८) |
| ५ | उपभोग घेणे | ०५ (३.०९) | ०४ (२.४७) | ०३ (१.८५) | ०२ (१.२३) | १४ (८.६४) |
| ६ | स्त्री–सुखाची अपेक्षा | ३० (१८.५२) | ०५ (३.०९) | १५ (९.२६) | १७ (१०.४९) | ६७ (४१.३६) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

आधुनिक मनोरंजनाच्या साधनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे व शौकीन लोकांकडील पैसाही वाढत आहे. रसिकांचा कलावंतीनीबद्दलचा दृष्टीकोन तक्ता क्र. ६.५८ मध्ये वेगवेगळया स्वरुपामध्ये मांडला आहे. एकुण १६२ कलावंतीन स्त्री कुटुंबप्रमुखांपैकी सर्वाधिक ८१.४८ टक्के स्त्रियांचे म्हणण्यानुसार रसिक उधळपट्टी करण्यासाठी येतात. ४१.३६ टक्के रसिक स्त्री–संबंधाच्या अपेक्षेने येतात. केवळ १८.५२ टक्के व २७.१६ टक्के रसिक कलेचा आस्वाद व मनोरंजनासाठी येतात. पैसा असूनही धावत्या युगात वेळ कमी लोकांकडे आहे त्यामुळे केवळ २.४७ रसिक वेळ घालविण्यासाठी येतात. तर ८.६४ टक्के रसिक उपभोग घेण्यासाठी येतात. यावरुन रसिक कलावंतीनीवर कलेची कदर व मनोरंजन यात फारसा उत्साह नसून स्त्री संबंधाच्या अपेक्षेने येतात.

## तक्ता क्र. ४.१०३

## विशेष बैठकीचा अधिकार

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दलाल | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | पार्टी मालकीन | ५८ (३५.८०) | १७ (१०.४९) | ५५ (३३.९५) | ३२ (१९.७५) | १६२ (१००.००) |
| ३ | स्वतः | ०० | ०० | ०० | ०० | ०० |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कलाकेंद्र व दिवाणखाना या दोन्ही मनोरंजानाच्या ठिकाणी विशेष बैठक घेतली जाते. ही विशेष बैठक पार्टी मालकणी, कलाकेंद्र मालक यांच्या संमतीने होते. कारण ही महत्वाची जबाबदारी असून एकुण १६२ कलावंतीन स्त्री कुटुंबप्रमुखांपैकी १०० टक्के स्त्रियांच्या विशेष बैठकीचे अधिकार पार्टी मालकीणीकडे असतात असे तक्ता क्र. ४.१०३ मध्ये दिल्याप्रमाणे दिसते.

## तक्ता क्र. ४.१०४

## विशेष बैठकीतील प्रेक्षकवर्गाची विभागणी

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गावातील श्रीमंत | ५० | १५ | ५२ | २५ | १४२(८७.६५) |
| २ | सधन शेतकरी | ०० | ०८ | ०५ | ०४ | १७(१०.४९) |
| ३ | नेते | ०२ | ०० | ०१ | ०१ | ०४(२.४६) |
| ४ | शौकीन | ३० | १७ | ५० | ३० | १२७(७८.३९) |
| ५ | व्यापारी | २० | ०० | ०० | ०० | ९८(६०.४९) |
| | एकुण | | | | | १६२ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.१०४ मध्ये विशेष बैठकीसाठी असणाऱ्या प्रेक्षकवर्गाची विभागणी केलेली असून यामध्ये प्रामुख्याने गावातील श्रीमंत, सधन शेतकरी, नेते राजकारणी लोक, शौकिन, व्यापारी यांचा समावेश केला आहे. यामध्ये प्रामुख्याने सर्वाधिक म्हणजेच ८७.६५ टक्के कलावंतीन स्त्रीयांच्यामते गावातील श्रीमंत व आर्थिक संपन्नता असणारे लोक विशेष बैठकीला येतात. ७८.३९ टक्के स्त्रियांच्या मते, शौकीन लोक विशेष बैठकीला येतात. व्यापारी या बैठकींना उपस्थित असतात असे म्हणणाऱ्या स्त्रियांची संख्या ६०.४९ टक्के आहे. तर सधन शेतकरी व नेते यांचे या बैठकीला येण्याचे प्रमाण कमी असल्याचे कलावंतीन म्हणते. यावरुन थोडया–फार फरकाने या सर्वांची विशेष बैठकीला उपस्थिती असते.

**तक्ता क्र. ४.१०५**

**विशेष बैठकीचे आर्थिक प्राप्तीची विभागणी**

| अ.क्र. | तपशील (रक्कम रु) | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५००–१००० | ४० (२४.६९) | १० (६.१७) | ४५ (२७.७८) | ३० (१८.५२) | १२५ (७७.१६) |
| २ | १०००–२००० | १६ (९.८८) | ०६ (३.७०) | ०८ (४.९४) | ०१ (०.६२) | ३१ (१९.१४) |
| ३ | २०००–५००० | ०२ (१.२३) | ०१ (०.६२) | ०२ (१.२३) | ०१ (०.६२) | ०६ (३.७०) |
| ४ | ५००० पेक्षा जास्त | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | ५८ (३५.८०) | १७ (१०.४९) | ५५ (३३.९५) | ३२ (१९.७५) | १६२ (१००.००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कलावंतीन स्त्रियांच्या प्रत्यक्ष पाहणीमध्ये असे लक्षात आले की, विशेष बैठकीचे विशिष्ट भाडे ठरलेले असते. त्यामध्ये ए.सी. व नॉन एसी असे प्रकार पडतात. प्रत्येक कलाकेंद्राचे व प्रत्येक पार्टीचे भाडे वेगवेगळ असू शकते. तक्ता. ४.१०५ मध्ये दाखविल्याप्रमाणे या रक्कमेचे व आर्थिक प्राप्तीचे ४ विभागात विभागणी केलेली आहे. त्यामध्ये सर्वात कमी रक्कम ५००–१००० या गटात ७७.१६ टक्के कलावंतीन स्त्रियांची संख्या आहे. १००० ते

२००० या गटात १९.१४ टक्के कलावंतीन स्त्रियांची संख्या आहे तर २०००–५००० या गटात अगदी कमी ३.७० टक्के स्त्रियांचा समावेश होतो. तर ५००० पेक्षा जास्त भाडे असणाऱ्या स्त्रियांमध्ये एकही कलावंतीन आढळली नाही. यावरुन नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव या ठिकाणच्या कलावंतीन स्त्रियांना ५०० ते १००० या दरम्यान विशेष बैठकीची आर्थिक प्राप्ती होते.

**तक्ता क्र. ४.१०६**

**कलावंतीण स्त्रीच्या जातीनुसार विभागणी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोल्हाटी | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | मुस्लिम | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ३ | दलित | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | इतर सर्व जात/धर्माच्या | ५८ (३५.८०) | १७ (१०.४९) | ५५ (३३.९५) | ३२ (१९.७५) | १६२ (१००.००) |
| | एकुण | ५८ | १७ | ५५ | ३२ | १६२ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव या तालुक्यांमधील प्रत्यक्ष पाहणीनुसार एकुण १६२ कलावंतीन स्त्री कुटुंबप्रमुखच नाही तर एकुण ४२० कुटुंबांचे मत असेच आहे की, सद्यस्थितीत कला केंद्र, दिवाणखाना, तमाशाफड या मनोरंजन साधनांमध्ये केवळ कोल्हाटी जमात नसून हे कार्य मिश्रणाने होत आहे. या कोल्हाटी जमातीच्या पारंपारिक व्यवसायामध्ये हिंदू, मुस्लिम, दलित, ख्रिश्चन इतर जाती/धर्माच्या स्त्रियांचा समावेश आहे. पूर्वी हे मनोरंजनाचे, नृत्य, गायन, वादन कार्य प्रामुख्याने कोल्हाटी जमातच करत असे परंतु कालांतराने आर्थिक प्राप्ती व सोपा मार्ग म्हणून सर्व जाती व जमातीतील स्त्रिया याठिकाणी नाचकाम करताना आढळतात असे नमुना दाखल निवडलेल्या १६२ कलावंतीन स्त्रियांचे १०० टक्के म्हणणे आहे.

### तक्ता क्र. ४.१०७

### स्त्री कलावंतीणीच्या समस्यांचे वर्गीकरण

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विवाह | ५८ (३५.८०) | १७ (१०.४९) | ५५ (३३.९५) | ३२ (१९.७५) | १६२ (१००) |
| २ | मुलांची समस्या | ५८ (३५.८०) | १७ (१०.४९) | ५५ (३३.९५) | ३२ (१९.७५) | १६२ (१००) |
| ३ | रखेली असण्याची समस्या | ४० (२४.६९) | १० (६.१७) | ०५ (३.०९) | १० (६.१७) | ६५ (४०.१२) |
| ४ | विश्वासू पुरुषाची समस्या | ५८ (३५.८०) | १७ (१०.४९) | ५५ (३३.९५) | ३२ (१९.७५) | १६२ (१००) |
| ५ | दैनंदिन जगण्याची समस्या | ५८ (३५.८०) | १७ (१०.४९) | ५५ (३३.९५) | ३२ (१९.७५) | १६२ (१००) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कलावंतीनीचे जीवन हे वरुन जरी सोपे व झगमगते दिसत असले तरी तिच्या जिवनाचा खडतर प्रवास डॉ. किशोर काळे यांच्या कोल्हाटयाचं पोर या आत्मचरित्रातून पहायला मिळतो. दैनंदिन जीवन जगत असताना तिला अनेक समस्या व अवहेलनांना सामोरे जावे लागते. तक्ता क्र. ४.१०७ मध्ये त्यांच्या समस्यांची विभागणी व प्रमाण दिलेले आहे. त्यावरुन विवाह, मुलांची समस्या, विश्वासू पुरुषाची समस्या, दैनंदिन जीवन जगण्याची समस्या या समस्या १०० टक्के स्त्रियांना भेडसावतात तर रखेली असण्याची समस्या (४०.१२ टक्के) स्त्रियांना जाणवते. कारण या व्यवसायातील सर्वच स्त्रिया रखेल म्हणून जीवन जगत नाहीत. या स्त्रियांच्या समस्या मन हेलावून टाकणाऱ्या वाटतात. विवाह न करता मुलांसहित जीवन जगत असताना किती प्रसंगांना सामोरे जावे लागते. तरीही या स्त्रिया न खचता निडर आयुष्याला झुंज देत असतात.

**तक्ता क्र. ४.१०८**

**व्यवसायकाळाव्यतिरिक्त मुलांच्या संगोपनाची जबाबदारी**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्वतः | ४०<br>(२४.६९) | १२<br>(७.४१) | ५०<br>(३०.८६) | २७<br>(१६.६७) | १२९<br>(७९.६३) |
| २ | आई–वडील | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ३ | भाऊ | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | संबंधित पुरुष | १८<br>(११.११) | ०५<br>(३.०९) | ०५<br>(३.०९) | ०५<br>(३.०९) | ३३<br>(२०.३७) |
| | एकुण | ५८ | १७ | ५५ | ३२ | १६२ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ४.१०७ मध्ये दिल्याप्रमाणे कलावंतीन म्हणून खडतर जीवन जगत असतात. या प्रवासामध्ये तिची महत्वाची जबाबदारी म्हणजे व्यवसाय काळात आपल्या मुलांची काळजी तिला घ्यावीच लागते परंतु काही स्त्रिया विश्वासू पुरुष भेटल्यावर हा व्यवसाय सोडून देतात. व्यवसायकाळा व्यतिरिक्त या मुलांची जबाबदारी कोण स्वीकारणार हा मोठा प्रश्न आहे. कारण बापाच्या नावाशिवाय या मुलांना संगोपनासठी आर्थिक पाठबळीची गरज असते. तक्ता क्र. ४.१०८ मधील प्रत्यक्ष पाहणीनुसार एकुण १६२ कलावंतीण स्त्री कुटुंब प्रमुखांपैकी ७९.६३ टक्के स्त्रियांना स्वतःलाच व्यवसायकाळाव्यतिरिक्त मुलांच्या संगोपनाची जबाबदारी घ्यावी लागते. तर केवळ २०.३७ कलावंतीण स्त्रियांच्या मुलांचे संगोपन व्यवसायकाळातव्यतिरिक्त संबंधीत पुरुष म्हणजेच मुलांचे वडील करतात. यावरुन मोठया प्रमाणात या स्त्रियांना मुलांची जबाबबदारी व्यवसायकाळात व व्यवसायकाळा व्यतिरिक्त स्वतःलाच घ्यावी लागते.

## तक्ता क्र. ४.१०९

## मुलांना नाव लावण्यासंबंधी विश्लेषण

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्वतः | ४८<br>(२९.६३) | १५<br>(९.२६) | ५२<br>(३२.१०) | २८<br>(१७.२८) | १४३<br>(८८.२७) |
| २ | स्वतःच्या आईचे | ०२<br>(१.२३) | ००<br>(०.००) | ०१<br>(०.६२) | ००<br>(०.००) | ०३<br>(१.८५) |
| ३ | स्वतःच्या वडिलांचे | ०३<br>(१.८५) | ०२<br>(१.२३) | ००<br>(०.००) | ०२<br>(१.२३) | ०७<br>(४.३२) |
| ४ | संबंधीत पुरुषांचे | ०५<br>(३.०९) | ००<br>(०.००) | ०२<br>(१.२३) | ०२<br>(१.२३) | ०९<br>(५.५६) |
| | एकुण | ५८ | १७ | ५५ | ३२ | १६२ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

मुले लहान आहेत तोपर्यंत कलावंतीन स्त्रीला मुलांच्या नाव लावण्याबंसधी प्रश्न नसतो. परंतु मुलांना शाळेत घालताना मात्र मुलांच्या पुढे नाव लावण्यासंबंधी समस्या निर्माण होतात. एकुण १६२ कलावंतीन स्त्री कुटुंबप्रमुखांपैकी १४३ (८८.२७ टक्के) स्त्रिया मुलांच्यापुढे स्वतःचे नाव लावतात. केवळ ५.५६ टक्के स्त्रिया स्वतःच्या वडिलांचे नाव लावतात तर खूप कमी १.८५ टक्के स्त्रिया स्वतःच्या आईचे नाव लावतात. यावरुन मुलाच्या नावापुढे वडिलांच्या नावाऐवजी आईचे नाव मोठया प्रमाणात लावले जाते तर खूप कमी पुरुष आपले नाव या मुलांना देतात.

**तक्ता क्र. ४.११०**

**कलावंतीन स्त्रीची जीवनाविषयी अपेक्षा**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गृहिणी | ३० | ०८ | ३५ | १८ | ९१ (५६.१७) |
| २ | शिकून नोकरी करणे | २० | ०० | ०० | १२ | ३२ (१९.७५) |
| ३ | इतर व्यवसाय करणे | ०० | ०५ | १० | ०० | १५ (९.२५) |
| ४ | आहे त्यात समाधानी | ०८ | ०४ | १० | ०२ | २४ (१४.८१) |
| | एकुण | ५८ | १७ | ५५ | ३२ | १६२ |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कलावंतीण स्त्री आर्थिक विवंचना जातिव्यवस्था, कौटुंबिक जबाबदारी याने पिचलेली असल्यामुळे लहान वयात तिला पारंपारिक व्यवसायाचा आधार घ्यावा लागत आहे. परंतु कालांतराने तिला तिच्या स्वप्नांची जाणीव होते. तिच्या अपेक्षा पल्लवीत होतात. प्रत्यक्ष पाहणीनुसार कलावंतीन स्त्रीची जीवनाविषयी अपेक्षा विचारण्यात आली. तक्ता क्र. ४.११० मध्ये दिल्याप्रमाणे एकुण १६२ स्त्री कुटुंब प्रमुखांपैकी सर्वाधिक ५६.१७ टक्के स्त्रियांचे सर्वसााधारण स्वप्न गृहिणी बनण्याचे आहे. तर १९.७५ टक्के स्त्रियांना शिक्षण व सर्वसामान्य जीवनाची गोडी असल्याचे दिसते. त्यांनी शिकून नोकरी करण्याची अपेक्षा व्यक्त केली. १४.८१ टक्के स्त्रिया या जीवन विषयक उदासीन वाटतात त्यांची जीवनाकडून काहीच अपेक्षा नसून त्या आहे त्या परिस्थितीत समाधानी आहेत. त्याचे कारण पर्याय नाही असे त्या म्हणतात. तर केवळ (९.२५ टक्के) कलावंतीन स्त्रियांना पारंपारिक व्यवसाय सोडून उदरनिर्वाहासाठी इतर व्यवसायाची अपेक्षा आहे. तक्ता क्र. ४.११० वरुन एकुण कलावंतीण स्त्रियांमध्ये कौटुंबिक जीवन जगण्याची आस सर्वाधिक स्त्रियांना असल्याची दिसते.

**तक्ता क्र. ४.१११**

**व्यवसायामुळे कुटुंब व जीवनावरील परिणाम**

| अ.क्र. | तपशील | नगर | नेवासा | जामखेड | शेवगाव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुलांच्या पालनपोषणाची हेळसांड | ५८ | १७ | ५५ | ३२ | १६२ (१००) |
| २ | शाळेची फी/ व्यवस्था गैरसोय | १० | १२ | २५ | ०८ | ५५ (३३.९५) |
| ३ | मुलांकडे दुर्लक्ष | ५८ | १७ | ५५ | ३२ | १६२ (१००) |
| ४ | बहिण–भाऊ दुरावा | ०२ | ०५ | ० | ०१ | ०८ (४.९३) |
| ५ | कुटुंब सोडावे लागते | ५८ | १७ | ५५ | ३२ | १६२ (१००) |
| ६ | कुटुंबाला नावे ठेवली जातात | ५८ | १७ | ५५ | ३२ | १६२ (१००) |
| ७ | मुलांना वाईट वळण लागते | ०५ | ०४ | १० | ०९ | २८ (१७.२८) |
| ८ | मुले व्यसनी बनतात | ०५ | ०४ | १० | ०९ | २८ (१७.२८) |

आधार–प्रत्यक्ष पाहणी ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७–१८
टिप– कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

कोल्हाटी जमातीमधील कलावंतीन स्त्रियांपैकी बहुतांश स्त्रियांवर कौटुंबिक आर्थिक जबाबदारी असून कुटुंब व या स्त्रियांचा केवळ आर्थिक संबंध न येता सामाजिक संबंध येतो. म्हणजेच पारंपारिक व्यवसायाचा कुटुंबांवर परिणाम होताना दिसतो. ज्यावेळी ही स्त्री पोटापाण्यासाठी जागोजागी भटकंती करत असते त्यावेळी तिच्यामागे तिच्या मुलांच्या व कुटुबांच्या जीवनमार्गात अनेक अडचणी येतात. तक्ता क्र. ४.१११ मध्ये या परिणम व अडचणींची विभागणी केली असून प्रत्यक्ष पाहणीनुसार मुलांच्या पालन पोषणाची हेळसांड, मुलांकडे दुर्लक्ष, कुटुंब सोडून भटकंती करावी लागते. कुटुंबाला नावे ठेवली जातात या समस्या व परिणाम १०० टक्के कलावंतीन कुटुंब प्रमुख स्त्रियांना भोगावे लागतात तर (३३.९५टक्के) कलावंतीनींना मुलांच्या शिक्षणाची फीची गैरसोय होते. (१७.२८ टक्के) कलावंतीनींना मुलांच्या

संदर्भात परिणाम जाणवतात त्यामध्ये मुलांना वाईट वळण लागते. मुले व्यसनी बनतात अशा स्वरुपाचे परिणाम दिसतात. खूप कमी स्त्रियांना (४.९३ टक्के ) बहिण–भाऊ दुरावा जाणवतो कारण अनेक कुटुंब विभक्त असून सद्यस्थितीत भाऊ स्वतः काहीतरी स्वतंत्र व्यवसाय करताना दिसतो.

## ४.२१. गृहितकृत्याची पडताळणी–

**प्रस्तावना–**

अहमदनगर जिल्हयातील कोल्हाटी जमातीच्या अभ्यासासाठी प्रश्नावलीनुसार व गृहितकांशी अनुसरुन गृहितकृत्य पडताळणी पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे. एकुण संशोधनातील हा महत्वपूर्ण टप्पा असून त्यासाठी काय स्क्वेअर ($X^2$ ) व टी टेस्ट ( T-test ) या दोन्ही सांख्यिकीय प्रणालीचा वापर केला आहे. समाजशास्त्रीय संशोधनात निवडलेल्या चलाचा नेहमीच परस्पराशी सहसंबंध काढणे शक्य होत नाही. तसेच चलातील नैमित्तीक संबंध व त्याचे स्पष्टीकरण सहसंबंध गुणक t चाचणी या सांख्यिकीय प्रणालीचा वापर करुन काढणे शक्य नसते तेव्हा ही संख्याशास्त्रीय पध्दती वापरुन चलांमधील नैमित्तिक संबंध दर्शवून या चलांचा अभ्यास करणे सोयीचे ठरते. ही पध्दती वापरताना खालील दोन अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

१. या पध्दतीत वापरण्यात येणाऱ्या दोन चलांची एकुण वारंवारिता ५० पेक्षा कमी नसावी.

२. प्रत्येक रकान्यातील वारंवारिता ५ पेक्षा कमी नसावी.

या अनुषंगाने $X^2$ ही सांख्यिकीय पध्दती वापरताना उत्तरदात्यांची एकुण संख्या ४२० असल्यामुळे एकुण वारंवारिता ५० पेक्षा अधिक आहे. ४२० उत्तरदात्यांचे वर्गीकरण केले असता काही रकान्यातील वारंवारिता ५ पेक्षा कमी आढळल्यामुळे त्याचे विलीनीकरण करुन लिहिण्यात आले आहे. परिणामी स्तंभ करावे लागले. एकुण ८ गृहितकृत्य असल्याने एकुण ८ तक्त्यांमध्ये हे सांख्यिकीय विश्लेषण मांडण्यात आला असून त्याचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे.

उत्तरदात्या कुटुंबप्रमुखांचे शिक्षण व व्यवसाय या चलातील संबंधांचा अभ्यास करण्यासाठी एकुण ४२० कुटुंब प्रमुखांचे शिक्षण व व्यवसायाचे वर्गीकरण करण्यात आले असून ते पुढील तक्त्यामधील कंसातील संख्या त्या रकान्यातील अपेक्षित वारंवारिता दर्शविते.

Hypothesis 1- **कोल्हाटी जमातीची शैक्षणिक प्रगतीनुसार आर्थिक व व्यावसायिक स्तरामध्ये परिवर्तन भिन्नता दिसते.**

**तक्ता क्र. ४.११२**

| शिक्षण/व्यवसाय | पारंपारिक व्यावसाय | शेती | नोकरी | व्यापार व उद्योग | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| माध्यमिक पर्यंत | १५९ (१३७.२१) | ९६ (९०.९३) | १२ (३८.९७) | ७४ (७३.८८) | ३४१ |
| उच्च माध्यमिक | ०८ (३१.७९) | १२ (२१.०७) | १० (९.०३) | ०५ (१७.१२) | ३५ |
| उच्चशिक्षित | ०२ | ०४ | २६ | १२ | ४४ |
| एकुण | १६९ | ११२ | ४८ | ९१ | ४२० |

$\chi^2$ = १४२.८ df = ६ P = ०.०००१ carmers value = ०.४१२३

स्वाधीनता मात्रा ६ साठी $\chi^2$ सारणी मूल्य ०.०५ स्तरासाठी ११.०७० आणि ०.०१ स्तरासाठी १५.०८६ इतके आहे. सारणी मूल्यापेक्षा $\chi^2$ मूल्य खूप जास्त आहे म्हणून संशोधनासाठी घेतलेली संशोधन परिकल्पना (H1) कोल्हाटी जमातीची शैक्षणिक प्रगतीनुसार आर्थिक व व्यावसायिकस्तरामध्ये परिवर्तन भिन्नता दिसते ही परिकल्पना स्वीकारावी लागेल आणि शून्य परिकल्पना(H0) कोल्हाटी जमातीची शैक्षणिक प्रगतीनुसार आर्थिक व व्यावसायिक स्तरामध्ये परिवर्तन भिन्नता दिसत नाही या परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

थोडक्यात असे म्हणता येईल की, कोल्हाटी समाजाचा व्यवसाय आणि शिक्षण यामध्ये सकारात्मक संबंध आढळून येतो. शिक्षणाचा व्यवसाय निवडीवर परिणाम होतो म्हणून अभ्यासांतर्गत वापरण्यात आलेली दोन्ही चले परस्परांवर अवलंबून असून त्यांचा परस्परांशी संबंध आहे.

Hypothesis 2- **कोल्हाटी जमातीचा पारंपारिक व्यवसाय शैक्षणिक प्रगतीतील अडथळा आहे.**

**तक्ता क्र. ४.११३**

| शिक्षण प्रतिक्रिया | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | उच्च शिक्षीत | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| होय | ०९<br>९.०१ | ०७<br>८.८२ | १८<br>१३.८४ | ०३<br>३.२५ | ०२<br>४.०९ | ३९ |
| नाही | ८८<br>८७.९९ | ८८<br>८६.१८ | १३१<br>१३५.१६ | ३२<br>३१.७५ | ४२<br>३९.९१ | ३८१ |
| एकुण | ९७ | ९५ | १४९ | ३५ | ४४ | ४२० |

$\chi^2$ = २.९९ df = ४ P = ०.५५ carmers value = ०.०८४४

स्वाधीनता मात्रा = (C-1) (R-1)

= (५-१) (२-१)

= ४ x १

= ४

स्वाधीनता मात्रा ४ साठी $\chi^2$ सारणी मूल्य ०.०५ स्तरासाठी ९.४४८ आणि ०.०१ स्तरासाठी १३.२७७ इतके आहे. सारणी मूल्यापेक्षा $\chi^2$ मूल्य खूपच कमी आहे म्हणून संशोधनासाठी घेतलेली संशोधन परिकल्पना(H1) कोल्हाटी जमातीच्या पारंपारिक व्यवसाय शैक्षणिक प्रगतीतील अडथळा आहे या परिकल्पनेचा त्याग करावा लागेल आणि शून्य परिकल्पना(H0)कोल्हाटी जमातीचा पारंपारिक व्यवसाय शैक्षणिक प्रगतीतील अडथळा नाही ही परिकल्पना स्वीकार करावी लागेल.

थोडक्यात असे म्हणता येईल की कोल्हाटी समाजाचा व्यवसाय आणि शिक्षण यांचा सहसंबंध आढळून येत नाही. म्हणून अभ्यासांतर्गत वापरण्यात आलेली दोन्हीही चले शिक्षण आणि व्यवसाय स्वतंत्र असून त्यांचा परस्परांशी संबंध नाही.

Hypothesis 3. **कोल्हाटी जमातीच्या उदरनिर्वाहाच्या साधनांमध्ये परिवर्तन व विविधता आहे.**

**तक्ता क्र. ४.११४**

| काळ | पूर्वीचा व्यवसाय | सध्याचा व्यवसाय |
|---|---|---|
| पारंपारिक व्यवसाय | १७१ | १६९ |
| शेती | १३० | ११२ |
| नोकरी | ०८ | ४८ |
| उदयोग व व्यापार | १११ | ९१ |
| एकुण | ४२० | ४२० |

| | | |
|---|---|---|
| प्रतिसादक | ४२० | ४२० |
| मध्यमान | २.१४०५ | २.१४५२ |
| प्रमाण विचलन | १.२१ | १.१६ |
| सहसंबंध गुणक | ५६.५३% | ५४.०७% |
| सहसंबंध | ०.९३ | |

स्वाधीनता मात्रा(df) = (N-1) = ४२०-१ = ४१९

०.०५ स्तरासाठी Table value = १.९६

०.०१ स्तरासाठी Table value = २.५८

४१९ स्वाधीनता मात्रेसाठी ‘t’ Table मधील ०.०५ स्तरासाठी आणि ०.०१ स्तरासाठीच्या किंमतीपेक्षा ‘t’ मूल्य कितीतरी पट जास्त आहे म्हणून मध्यमानातील फरक सार्थ आहे. याठिकाणी संशोधन परिकल्पना (H1) कोल्हाटी जमातीच्या उदरनिर्वाहाच्या साधनांमध्ये भूतकाळ व वर्तमानकाळ यामध्ये परिवर्तन व विविधता आहे या परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल आणि शून्य परिकल्पना(H0) कोल्हाटी जमातीच्या उदरनिर्वाहाच्या साधनांमध्ये भूतकाळ व वर्तमानकाळ यामध्ये परिवर्तन व विविधता नाही या परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

थोडक्यात असे म्हणता येईल की कोल्हाटी जमातीच्या उदरनिर्वाहाच्या साधनामध्ये परिवर्तन झाले आहे.

Hypothesis 4 - **कोल्हाटी जमातीमध्ये धार्मिकता व अंधश्रध्देचा पगडा असून भटकंतीचे जीवन दिसते.**

**तक्ता क्र. ४.११५(अ)**

| शिक्षण | निरक्षर | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | उच्च शिक्षित | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| धार्मिक आचरण | | | | | | |
| होय | ९०<br>८१.९९ | ७९<br>८०.३ | १२९<br>१२५.९४ | २५<br>२९.५८ | ३२<br>३७.१९ | ३५५ |
| नाही | ०७<br>१५.०१ | १६<br>१४.७ | २०<br>२३.०६ | १०<br>५.४२ | १२<br>६.८१ | ६५ |
| एकुण | ९७ | ९५ | १४९ | ३५ | ४४ | ४२० |

$\chi^2$ = १४.९४ df = ४ P = ०.००४८ carmers value = ०.१८८६

स्वाधीनतामात्रा ४ साठी $\chi^2$ सारणी मूल्य ०.०५ स्तरासाठी ९.४४८ आणि ०.०१ स्तरासाठी १३.२७७ इतके आहे. सारणी मूल्यापेक्षा मूल्य जास्त आहे म्हणून संशोधनासाठी घेतलेली संशोधन परिकल्पना (H1) कोल्हाटी जमातीमध्ये धार्मिकता व अंधश्रध्देचा पगडा आहे ही परिकल्पना स्वीकारावी लागेल आणि शून्य परिकल्पना(H0) कोल्हाटी जमातीमध्ये धार्मिकता व अंधश्रध्देचा पगडा आहे या परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

**तक्ता क्र. ४.११५(ब)**

| व्यवसाय | पारंपारिक व्यवसाय | शेती | नोकरी | उदयोग व व्यापार | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| प्रतिक्रिया | | | | | |
| होय | ९३<br>४४.२६ | ०५<br>२९.३३ | ०५<br>१२.५७ | ०७<br>२३.८३ | ११० |
| नाही | ७६<br>१२४.७४ | १०७<br>८२.६७ | ४३<br>३५.४३ | ८४<br>६७.१७ | ३१० |
| एकुण | १६९ | ११२ | ४८ | ९१ | ४२० |

$\chi^2$ = १२२.३४ df = ३ P = <.०००१ carmers value = ०.५३९७

स्वाधीनता मात्रा (df)३ साठी $\chi^2$ सारणी मूल्य ०.०५ स्तरासाठी ७.८१५ आणि ०.०१

स्तरासाठी ११.३४५ इतके आहे. सारणी मूल्यापेक्षा $X^2$ मूल्य खूपच जास्त आहे. म्हणून संशोधनासाठी घेतलेली संशोधन परिकल्पना(H1) कोल्हाटी जमातीमध्ये व्यावसायानुसार अजूनही भटकंतीचे जीवन दिसते ही परिकल्पना स्वीकारावी लागेल आणि शून्य परिकल्पना (H0) कोल्हाटी जमातीमध्ये व्यावसायानुसार अजूनही भटकंतीचे जीवन दिसत नाही या परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

थोडक्यात असे म्हणता येईल की, कोल्हाटी समाजातील धार्मिकता व अंधश्रध्दा आणि शिक्षण यांचा परस्परसंबंध आहे. शिक्षणामुळे धार्मिकता व अंधश्रध्दा यात परिवर्तन होते. म्हणून अभ्यासांतर्गत असणारी दोन्ही चले परस्परांवर अवलंबून असून त्यांचा परस्परांशी संबंध आहे. कोल्हाटी समाजामध्ये त्यांचा व्यवसाय आणि त्यांची भटकंती यामध्ये संबंध आढळून येतो म्हणून संशोधनामार्फत असणारी व्यवसाय व स्थिर आणि भटकंतीचे प्रमाण दोन्ही चले परस्परांवर अवलंबून असून परस्परांशी संबंधीत आहेत.

Hypothesis 5 - **कोल्हाटी जमातीतील पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना विविध समस्या आढळतात.**

**तक्ता क्र. ४.११६**

| व्यावसाय | पारंपारिक व्यवसाय | इतर व्यवसाय | एकुण |
|---|---|---|---|
| प्रतिक्रिया | | | |
| होय | १३१<br>११४.१७ | १६५<br>१८१.८३ | २९६ |
| नाही | ३१<br>४७.८३ | ९३<br>७६.१७ | १२४ |
| एकुण | १६२ | २५८ | ४२० |

$X^2$ = १३.६७ df = १

स्वाधीनता मात्रा १ साठी $X^2$ सारणी मूल्य ०.०१ स्तरासाठी ३.८४ आणि ०.०१ स्तरासाठी ६.६३ इतके आहे. सारणी मूल्यापेक्षा $X^2$ मूल्य खूपच जास्त आहे म्हणून संशोधनासाठी घेतलेली संशोधन परिकल्पना (H1) कोल्हाटी जमातीतील पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना विविध समस्या आढळतात ही परिकल्पना स्विकारावी लागेल आणि शून्य

परिकल्पना(H0) कोल्हाटी जमातीतील पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना विविध समस्या आढळतात नाहीत या परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

यावरुन असे स्पष्ट होते की, पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना इतर व्यवसाय करणाऱ्यांपेक्षा जास्त समस्या आढळून येतात.

## ४.२२. अर्थनिर्वचन (Interpretation) –

प्राचीन काळापासून हिंदू समाजाची रचना चातुर्वर्ण्यावर आधारलेली आहे. त्यासंबंधीचे उल्लेख धर्मग्रंथात विशेषतः स्मृतिग्रंथात स्पष्ट केलेले आहेत. या धर्मग्रंथांनी प्राचीनकाळापासून वर्णानुसार उच्च वर्णियांकडून कनिष्ठ वर्णियांची अवहेलना कशा पध्दतीने चालविली आहे हे प्रस्तुत संशोधन अभ्यासातील पहिल्या प्रकरणात संदर्भासहित स्पष्ट केले आहे. परंतु या कनिष्ठ वर्णातील जनसमुदाय आजही त्याच चौकटीत बांधलेला आहे ही आश्चर्यचकित करणारी बाब आहे. ही श्रेणी व स्तरबध्द समाजव्यवस्था प्राचीन काळापासून आजतागायत समाजासाठी अनुकूल व प्रतिकूल ठरली यावर अनेक मत मतांतरे आहेत. या परिस्थिती निर्मितीसाठी अनेक आर्थिक, भौगोलिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक कारणे दिली जातात. वर्णव्यवस्थेला फाटे फुटल्यामुळे अनेक जाती निर्माण झाल्या व या जाती आपल्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक बांधिलकीमध्ये आपले जीवन व्यतीत करु लागल्या. त्यांनी आजही आपला कोष सोडला नाही याचे उदाहरण म्हणजे कोल्हाटी जमात होय. संशोधन अभ्यासामध्ये अहमदनगर जिल्हयातील कोल्हाटी जमातीचा अभ्यास करताना या जमातीची आर्थिक व सामाजिक माहितीचे विश्लेषण केले असता, प्राथमिक माहिती व दुय्यम माहिती यामध्ये साम्य आढळते. इतिहासकार, मानववंश शास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ , समाजशास्त्रज्ञ यांनी १८ व्या व १९ व्या शतकात मांडलेले सिध्दांत व तत्वे सदयस्थितीत म्हणजेच २१ व्या शतकातील जमातीला लागू होतात. अडीच हजार वर्षापूर्वीची स्थिती व सद्यस्थितीत असणारी पारंपारिक व सांस्कृतिक चौकट या जमातीतील दारिद्र्याला पोषक व विकासाला मारक ठरत आहे. दरिद्री लोकांच्या जीवनाचा अभ्यास अनेक तज्ञांनी केला आहे. त्यांच्या जीवनातील ठळकपणे दिसून येणारी लक्षणे सर्वत्र समान आहेत. भारतीय समाजविज्ञान कोश खंड – ३रा (१९८९) मध्ये दरिद्री लोकांची संस्कृती म्हणजे काय व हे चक्र कसे सुरु असते यासंबंधी विवेचन पुढीलप्रमाणे दिले आहे.

"सामाजिक व सांस्कृतिक दारिद्र्य, अस्थिर कौटुंबिक जीवन, भावनिक समस्या व गुन्हेगारी प्रवृत्ती ही त्याची प्रमुख लक्षणे आहेत. दरिद्री वर्गात मोडणाऱ्या लोकांचा दृष्टीकोन भयभीत, निराश, अस्वस्थ, दैववादी असतो. अशावृत्तीला अनेकदा 'दरिद्री लोकांची संस्कृती' असे संबोधण्यात येते. त्यांचे कौटुंबिक जीवन भयग्रस्त, अत्यंत कष्टदायक म्हणून कडवटपणाचे बनते. अशा शारिरीक आणि भावनिक कोंडमाऱ्याच्या परिस्थितीत लहान मुले मोठी होत असल्यामुळे साहजिकच ती मोठी झाल्यावर आपल्या आई–वडिलांसारखीच त्रस्थ व कष्टप्रद व बेगुमान जीवन जगतात व ते एक चक्रच चालू राहते".[१]

यावरुन दारिद्र्याचे चक्र कमी ही एक संस्कृती बनली आहे. जी कोल्हाटी जमातीमध्येसुध्दा काही अंशी रुजलेली दिसते व इतर रुढी, परंपरा, संस्कृतीबरोबरच ही जमात दरिद्र्याच्या संस्कृतीला भेदण्याऐवजी त्याची जोपासना करताना दिसते असे म्हणता येईल.

दारिद्र्याची संस्कृती ही संकल्पना अभ्यासण्यासाठी तसेच कोल्हाटी जमातीच्या संकल्पनेशी संबंध अभ्यासण्यासाठी काही समाजशास्त्रीय संकल्पना व त्याबाबत अर्थतज्ञ व समाजशास्त्रज्ञांची मते यांचा विचार होणे अनिवार्य आहे. त्यापैकी दारिद्र्याशी निकटचा संबंध असणारी 'सामाजिक स्तरीकरण' या संज्ञेचा अभ्यास क्रमप्राप्त ठरतो. भारतीय समाज विज्ञान कोश खंड–५ (प्र. आ. १९९१) मध्ये दिल्याप्रमाणे "समाजातील सभासदांच्या गरजांची पूर्ती मानवी व नैसर्गिक साधन संपत्तीद्वारे होणे ही समाजाची व सभासदांचीही मुलभूत गरज आहे. या गरजेपोटी कराव्या लागणाऱ्या कार्यांमध्ये भिन्नता येणे साहजिकच असून कार्ये निर्धारणातून विविध भूमिका, मार्ग, कर्तव्य, प्रतिष्ठा, नियम यानुसार समाजात गट निर्माण झाले. अशा गटांमुळे सामाजिक व संस्थात्मक कार्याची पूर्तता होते. निरनिराळी पदे किंवा स्थाने निर्माण होतात. अर्थातच त्यानुसार प्रत्येक व्यक्तिला मिळणाऱ्या सोयी सुविधा वेगवेगळया असतात. अशा विषमतेमुळे निर्माण होणारे स्तर, श्रेणी वा गट यांच्या रचनेला आणि व्यवस्थेला समाजशास्त्रीय परिभाषेत 'सामाजिक स्तरीकरण' (Social Startification) अशी संज्ञा आहे. इ.स. १९४० पासून 'सामाजिक स्तरीकरण' ही संज्ञा रुढ झाली. तत्पूर्वी ती सामाजिक वर्गाच्या संदर्भात वापरली जात असे वर्ग व्यवस्था हे त्याचे ठळक उदाहरण दिले जाते."

वरीलप्रमाणे १९व्या शतकात उदयास आलेल्या सामाजिक स्तरीकरण या व्यवस्थेचा

कोल्हाटी समाज बळी पडला आहे असे म्हणता येईल. या स्तरीकरणामुळे सामाजिक अन्याय व भेदभाव निर्माण झालेला दिसतो.

भारतीय समाज विज्ञान कोश खंड ५ मध्ये मार्क्स, मॅक्स वेबर यांची समाजातील वर्ग, पक्ष अशा स्वरुपाचे विवेचन श्रेष्ठ व कनिष्ठ हा भेदभाव स्पष्ट करण्यास पुढील प्रमाणे मदत करतो.

**मार्क्सचा सिध्दांत–**

सामाजिक स्तरीकरणाच्या संदर्भात मार्क्सचा विचार सर्वप्रथम केला जातो. आर्थिक रचनेनुसार समाजात पडणाऱ्या गटांकडे मार्क्सने लक्ष वेधून घेतले. संपूर्ण समाजरचनेच्या पायाशी आर्थिक रचना आधारभूत आहे हा विचार त्याने मांडला. समाजशास्त्रीय विश्लेषणातून हा विचार लक्षात घ्यावा लागतो. मार्क्सच्या मते, “समाजाचे प्रमुख दोन वर्गात विभाजन होते. एक विविध उत्पादन कार्यात गुंतलेला व सर्वांवर वर्चस्व गाजविणारा मालक वर्ग आणि दुसरा वर्ग म्हणजे हे मालक ज्यांना रोजगार पुरवितात तो कामगार वर्ग. त्याच्या वर्ग संघर्षाचा व वर्गविहीन समाजाचा विचारही नंतरच्या विचारवंतांनी उचलून धरला.”[२]

**मॅक्स वेबर सिध्दांत–**

मार्क्सनंतर या संदर्भात ठळक नाव म्हणजे मॅक्स वेबर. मार्क्सच्या विचारात त्याने बऱ्याच सुधारणा केल्या. अर्थात बौध्दिक व वैचारिक क्षेत्रात मार्क्स एक प्रभावी व्यक्तिमत्व होते. तेव्हा मॅक्स वेबरचा विचार नुकताच आकार घेऊ लागला होता. “वर्ग, दर्जा, पक्ष अशा तिहेरी भूमिकेतून त्याने स्तरीकरणाचा सिध्दान्त मांडला. पध्दतशीर, सुस्पष्ट व आवश्यक अशा भेदानुसार त्याने याचे विवरण करुन ‘दर्जात्मक गट’ अशी संज्ञा वापरली. नंतरच्या काळात इ.स. १९४५ मध्ये मूर ने व इ.स. १९४९ मध्ये डेव्हिस ने या संकल्पनेचा विकास केला. त्यांनी आधुनिक सामाजिक विज्ञानाच्या आधारे प्रतिष्ठाविषयक कल्पनांचा त्यात समावेश केला. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रतिष्ठा या कल्पनेचा आढळ होतो असे त्यांनी प्रतिपादन केले.”[३]

वरील भारतीय समाज विज्ञान कोश खंड–५ (प्र.आ.१९९१) मध्ये दिल्याप्रमाणे सामाजिक स्तरीकरणाची संकल्पना १९ व्या शतकाच्या पूर्वी उदयास आलेली असून त्यासंबंधी मार्क्स, मॅक्स वेबर या समाजशास्त्रज्ञांनी आर्थिकता व सामाजिकता यांचा मेळ घालून

सामाजिक स्तरीकरणाविषयी विचार स्पष्ट केले आहेत. "समाजातील स्तरानुसार जे गट व समूह निर्माण झाले त्यामधील भूमिकेला महत्व देऊन मांडण्यात येणारा कोणताही सिध्दांत किंवा सिध्दांताचा समुच्चय संघर्ष या संज्ञेने ओळखला जातो. इ. स. पूर्व काळातील पॉलिबस या विचारवंतांपासून तर आधुनिक काळातील राल्फ डाहरेन डॉर्फ व लेव्हिस कोझर (इ. स. १९५० व १९६०) यांच्यापर्यंत अनेकांनी संघर्ष सिध्दांताच्या माध्यमातून समाज जीवनाचे अध्ययन केल्याचे आढळून येते".[४]

अनेक विचारवंत सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून संघर्ष सिध्दांताकडे पाहतात. संघर्षाच्या भूमिकेतून समाज जीवनातील प्रक्रियांचे अध्ययन पध्दती म्हणजे हा सिध्दांत होय. या सिध्दांतासंबंधी रॅडॉल कॉलिन्स, लेव्हीस ए. कोझर यांनी महत्वपूर्ण सिध्दांत मांडला असून सामाजिकरणाच्या संदर्भात सी. एच. कूली या समाज शास्त्रज्ञाने मांडलेला सिध्दांत प्रस्तुत अभ्यासा मध्ये मार्गदर्शक ठरतो.

**सामजिक संघर्षाच्या कार्याविषयी कोझर यांचे विचार[५]–**

लेव्हिस ए. कोझर या आजच्या अत्यंत प्रभावी समाजशास्त्रज्ञाने समाजशास्त्राला जे योगदान दिलेले आहे. त्यातील एक महत्त्वाचे योगदान संघर्ष संकल्पनेविषयीचे आहे. १९५६ मधील आपल्या 'Functions of Social conflict' (सामाजिक संघर्षाची कार्ये) या ग्रंथात त्याने संघर्षाविषयी विश्लेषण करुन सविस्तर विवेचन केलेले आहे. त्यांच्यामते समूहांतर्गत संघर्ष अंतिमतः समूहामध्ये ऐक्य व सुसंवाद राहण्याच्यादृष्टीने हितकर ठरत असले तरी प्रत्येक प्रकारचा संघर्ष समूहाच्यादृष्टीने लाभदायक असतोच असे नाही. कोणत्या कारणास्तव संघर्ष होतो यावर संघर्षामुळे मिळणारा फायदा–तोटा ठरत असतो.

**संघर्ष सिध्दान्त आणि सामाजिक स्तरीकरण यांवर कॉलिन्सचे विचार[६]–**

रॅडॉल कॉलिन्स या समाजशास्त्रज्ञाने आपला संघर्ष सिध्दांत मांडत असताना सामाजिक स्तरीकरणावर चर्चा करुन स्तर व संघर्ष यांच्यातील संबंध स्पष्ट केला आहे. आपल्या स्तरीकरण संघर्ष सिध्दांताचे मुलाधार म्हणून कॉलिन्सने तीन तत्वे विशद केलेली आहेत.

१. लोक स्वतःच बांधलेल्या आत्मनिष्ठ जगात राहतात.

२. व्यक्तिच्या आत्मनिष्ठ अनुभवावर इतर लोक सत्तेद्वारे प्रभाव टाकतात आणि त्यावर नियंत्रणही ठेवतात.

३. गटातील लोक त्यांना विरोध करणाऱ्या व्यक्तींवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतात.

**कूलेची सामाजीकरणारची उपपत्ती[७] –**

सी. एच. कूली या समाजशास्त्रज्ञाने सामाजिकरणाच्या संदर्भात 'दर्पणातील आत्मदर्शनाचा' (Looking glass self) सिध्दांत मांडलेला आहे. समाजातील इतर व्यक्तिंना आपण कसे वाटतो, कसे दिसतो, इतरांना काय वाटते यावरुन स्वतःविषयीची प्रतिमा तयार करणे, स्वतःविषयी निष्कर्ष काढणे म्हणजे 'दर्पणातील आत्मदर्शन' होय. या उत्पत्तीत इतरांच्या वृत्तीवरुन आत्मप्रतिमा तयार केली जाते म्हणूनच तो म्हणतो, आत्मप्रतिमा म्हणजे संपर्कात आलेल्या माणसांच्या दृष्टीकोनातून प्रतिबिंबित होणाऱ्या परीवर्तनाचे संयुक्त रुप असते. समाजरुपी आरशात आपण कसे दिसतो यावरुन व्यक्ति स्वतःविषयी मूल्यांकन करते. अशा मूल्यांकनामधूनच न्यूनगंड व्यक्तिमध्ये निर्माण होतात.

वरिलप्रमाणे कोझर, कॉलिन्स, कूले या समाजशास्त्रज्ञांनी मांडलेल्या सिध्दांतामध्ये संघर्ष सिध्दांत व सामाजिक स्तरीकरण यांचा संबंध स्पष्ट केला आहे. कोझर यांनी संघर्ष हा सामाजिक बंधने झुगारुन लावण्यासाठी कितपत महत्वाचा आहे व त्यातून सामाजिक परिवर्तन कसे शक्य आहे याविषयी चर्चा केली आहे. मार्क्स व वेबर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन कॉलिन्स यांनी समाजातील वरिष्ठ वर्गाने आपल्या सभासदांसाठी उच्च प्रतीची, सुस्पष्ट अशी विचारप्रणाली विकसित केली व ही व्यवस्था कनिष्ठ सामाजिक वर्गावर लादली. आपले अस्तित्व धोक्यात येऊ नये म्हणून कनिष्ठ वर्गाने ती स्वीकारली असे कॉलिन्स सहमती दर्शवितात.

त्याचप्रमाणे कनिष्ठ वर्ग आहे त्यात समाधानी का असावा? याचे उत्तर कुले यांच्या उपपत्तीमधून मिळण्यास मदत होते की, व्यक्ती इतरांच्या दृष्टीकोनातून स्वतःविषयीची प्रतिमा व निष्कर्ष काढतो.

समाजशास्त्रज्ञांबरोबरच सामाजिक विषमता आणि आर्थिक विषमता यांमधील परस्पर संबंध स्पष्ट करण्यामध्ये अर्थशास्त्रज्ञांचे योगदान विचारात घेणे गरजेचे आहे. मार्क्स बरोबरच गुन्नार मिर्डालने केलेली आर्थिक विकास आणि विषमतेची अभ्यासपूर्ण मिमांसा पुढीलप्रमाणे–

'एशियन ड्रामा' हा प्रा. गुन्नार मिर्डालने लिहिलेला एक प्रसिध्द त्रिखंडीय ग्रंथ आहे. या ग्रंथाचे पूर्ण नाव 'ॲन इन्क्वायरी इन टू द पॉव्हर्टी ऑफ नेशन्स' हे आहे. या ग्रंथात दक्षिण आशियाई राष्ट्रातील विकास समस्यांचे व्यापक असे विश्लेषण केलेले आहे. मिर्डाल यांच्यामते, ''अविकसित राष्ट्रांनी विकासाबाबतच्या पारंपारिक जुन्या कल्पनाा झुगारुन दिल्याशिवाय संपन्न आणि विपन्न राष्ट्रांमधील विषमतेची दरी वा अंतर बुजले जाणे अशक्य आहे''.[८]

मिर्डाल यांनी आंतरराष्ट्रीय आर्थिक व सामाजिक घटकांच्या कार्यावरुन विकसनशील देशांमध्ये असणाऱ्या जुन्या व भुरसटलेल्या पारंपारिक विचारांवर आघात केला आहे. यावरुन हा सिध्दांत देशातंर्गत आर्थिक व सामाजिक विषमतेलाही लागू होतो. कारण मिर्डाल यांनी मांडलेले विस्तारक व प्रतिसारक परिणाम हे आजच्या समाज व्यवस्थेचे एक विदारक सत्य आहेत. अर्थशास्त्राचे जनक 'ॲडम स्मिथ' यांच्या काळात राष्ट्रांची संपत्ती कशी निर्माण होते हा विकासासंबंधी महत्वाचा प्रश्न होता परंतु आज राष्ट्रामध्ये मोठया संख्येने बहिस्कृत ठरलेल्या जाती व जमातीमध्ये दारिद्रयाच्या भीषण परिस्थितीचे अस्तित्व असताना संपत्तीची चर्चा करणे केवळ व्यर्थ आहे. या सत्यावर मिर्डाल यांनी लक्ष वेधून त्यामागील कार्यकारण संबंध स्पष्ट करण्याचे काम केले आहे. वरीलप्रमाणे प्रस्तुत अभ्यासाचे अर्थ निर्वचन करत असताना दुय्यम साहित्याच्या आधारे कोल्हाटी जमात व इतर संबंधीत भटक्या जमातींना जातिव्यवस्था व प्रामुख्याने वर्णव्यवस्थेपासूनच आपले स्थान ठरवून दिलेले होते. परंतु जुन्या संकल्पनांना चिकटून राहिलेली जमात आज आधुनिक मार्गावर चालण्यास तयार नाही किंवा त्यांची इच्छा नाही असे म्हणता येईल कारण आपण जे करत आहोत त्यासाठीच आपला जन्म झाला आहे अशा दैववादी संकल्पनांना कवटाळून बसलेल्या बऱ्यापैकी कुटुंबांमध्ये प्राथमिक निरीक्षणामध्ये निष्कर्ष प्रकर्षाने जाणवतो. परंतु काही अंशी जमातीतील कुटुंबांनी जातिव्यवस्था व दारिद्रयाची संस्कृती भेदण्यास सुरुवात केली आहे ही बाबही कौतुकास्पद आहे . त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. उरलेल्या कुटुंबांना अजूनही योग्य प्रबोधन, मार्गदर्शनाची गरज आहे. कारण मिर्डाल यांनी सांगितल्याप्रमाणे गरिबी (दारिद्रय) हेच गरिबीचे (दारिद्रयाचे) कारण आहे हे नाकारता येणार नाही व ही गरिबी किंवा दारिद्रय दूर करण्यासाठी ठळक शिफारशी प्रस्तुत संशोधनात मांडण्यात आल्या आहेत.

## ४.२३. सारांश–

प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कौटुंबिक स्थिती, शैक्षणिक स्थिती, मुलांमुलींच्या भविष्यासंबंधी दृष्टीकोन, आरोग्यविषयक स्थिती, धार्मिक व सामाजिक दृष्टीकोन, गुन्हेगारीसंबंधी माहिती या सर्व बाबींचे विश्लेषण करण्यात आले आहे यावरुन असे स्पष्ट होते की, अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांमध्ये पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांमध्ये शिक्षणाचा अभाव आहे त्यामुळे ती कुटुंबे जमातीच्या धार्मिक रुढी, परंपरांचे आचरण करताना दिसतात. तसेच आजही जातीला महत्व देताना दिसतात. याउलट ज्या कुटुंबांमध्ये शिक्षणाचा प्रभाव आहे ती कुटुंबे या प्रथा टाळताना दिसतात. प्रत्यक्ष पाहणीनुसार शिक्षित कुटुंबांनी जातीपेक्षा मनुष्याला जास्त महत्व दिल्याचे दिसते. प्रस्तुत प्रकरणामध्ये शिक्षण व धार्मिकता, शिक्षक व आरोग्य, शिक्षण व सामाजिक दृष्टीकोन, शिक्षण व राहणीमान, शिक्षण व गुन्हेगारीप्रवृत्ती यांचे स्पष्टीकरण मिळण्यास मदत झाली आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये कोल्हाटी जमातीच्या सर्व आर्थिक बाबींशी संबंधीत तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यामध्ये अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातींच्या कुटुंबांची रोजगारस्थिती, उत्पन्नविषयक स्थिती, कर्जविषयक स्थिती, शेतीविषयक माहिती, खर्च व बचत विषयक स्थिती, राहणीमानविषयक स्थिती तसेच आर्थिकतेचा निर्देशक मानला जाणारा स्थलांतरण या संकल्पनेशी निगडीत स्थलांतरणाविषयक माहिती, शासन दरबारी कोल्हाटी जमातीसाठी असणाऱ्या विविध योजना व सवलती, अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी कुटुंबांच्या नागरीकत्वासंबंधी नोंदी, या सर्व चलांचा आधार घेऊन निवडक कुटुंबांची आर्थिकता अभ्यासण्यात आली आहे. त्याचप्रमाणे या जमातीतील विशेष केंद्रीकरण असणारा भाग म्हणजे अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांतील कलावंतीन स्त्रीच्या आर्थिकतेसंबंधी माहितीचे प्रस्तुत प्रकरणात विश्लेषण करण्यात आले आहे. संशोधन अभ्यासासाठी गृहीत धरण्यात आलेल्या गृहीत कृत्यांची पडताळणी या प्रकरणाच्या अंतीम टप्प्यात करण्यात आली आहे.

## संदर्भ ग्रंथ–


१. संपादक – स. मा. गर्गे, भारतीय समाजविज्ञान कोश खंड ३ रा, मुद्रक चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय, सदाशिव पेठ, पुणे प्र. आ. १९८९, पृ. क्र. ५९

२. संपादक – स. मा. गर्गे, भारतीय समाज विज्ञान कोश खंड ३ रा, मुद्रक चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय, सदाशिव पेठ, पुणे प्र. आ. १९८९, पृ. क्र. ५६

३. तत्रैव, पृ. क्र. ५७

४. संपादक – बी. आर. जोशी, डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड १, डायमंड प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००७, पृ. क्र. ४८५

५. संपादक – बी. आर. जोशी, सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिध्दांताचा कोश समाजशास्त्र – मानवशास्त्र, डायमंड प्रकाशन, पुणे, प्र. आ. जून २००८, पृ. क्र. १४३

६. तत्रैव, पृ. क्र. ११०

७. तत्रैव, पृ. क्र. १४१

८. संपादक – जॉन्सन बोर्जेस, डायमंड अर्थशास्त्र कोश, डायमंड प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००८ पृ. क्र. ३०

# प्रकरण पाचवे

## संशोधन सारांश, निष्कर्ष व शिफारशी

| | |
|---|---|
| ५.१ | प्रस्तावना |
| ५.२ | निष्कर्ष |
| ५.३ | शिफारशी |
| ५.४ | सारांश |

# प्रकरण पाचवे

# संशोधन सारांश, निष्कर्ष व शिफारशी

## ५.१. प्रस्तावना–

महाराष्ट्रामध्ये भटक्या विमुक्त जाती – जमातीपैकी कोल्हाटी ही एक कलावंत जमात आहे. या जमातीची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यासण्यासाठी अहमदनगर जिल्हयाची निवड करण्यात आली आहे. अहमदनगर जिल्हयातील नगर, नेवासा, जामखेड, शेवगाव या तालुक्यातील ४२० कुटुंबांचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करुन त्या अभ्यासातून विविध निष्कर्ष काढण्यात आले असून प्रबंधात सुरुवातीला स्पष्ट केल्याप्रमाणे निघालेले निष्कर्ष अहमदनगर जिल्हयातील अभ्यास क्षेत्रासाठीच मर्यादित आहेत. संशोधकाने अनुसूची व प्रत्यक्ष निरिक्षणाच्या आधारे अभ्यासक्षेत्रातील सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक, कौटुंबिक,आर्थिक जीवनाचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये याबाबीसंबंधी निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. तसेच त्यावर शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत.

## ५.२. निष्कर्ष–

संशोधन अभ्यासावरुन काढण्यात आलेल्या निष्कर्षांची विभागणी तीन विभागात करण्यात आली आहे. कोल्हाटी जमातीचे सामाजिक स्थितीविषयीचे निष्कर्ष, कोल्हाटी जमातीच्या आर्थिक स्थितीविषयक निष्कर्ष आणि कलावंतीन कुटुंबप्रमुख स्त्रीच्या आर्थिक स्थितीविषयक निष्कर्ष ते पुढीलप्रमाणे

### ५.२.१. कोल्हाटी जमातीच्या सामाजिक स्थितीविषयक निष्कर्ष–

कोणत्याही सामाजिक संशोधनाचे शास्त्रीय निष्कर्ष हा संशोधनाचा गाभा असतो. अहमदनगर जिल्हयातील कोल्हाटी जमातीच्या सामाजिक स्थितीच्या अभ्यासावरुन पुढील निष्कर्ष मांडले आहेत.

१. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीच्या एकुण ५९० कुटुंबांपैकी ४२० कुटुंबांच्या अध्ययनानुसार नगर तालुक्यामध्ये ११६ कुटुंबे, नेवासा तालुक्यामध्ये १०४ कुटुंबे, जामखेड तालुक्यामध्ये १०३ कुटुंबे, शेवगाव तालुक्यामध्ये ९७ कुटुंबे अशी कुटुंब संख्या आढळते. अहमदनगर जिल्हयातील एकुण १४ तालुक्यांपैकी या ४ तालुक्यामध्ये ७० टक्के पेक्षा जास्त या जमातीचे केंद्रीकरण झालेले आहे.

२. अभ्यासक्षेत्रातील प्रत्यक्ष पाहणीनुसार एकुण लोकसंख्या २०८९ आहे. तर त्यापैकी पुरुष लोकसंख्या ९३१ व स्त्री लोकसंख्या ११५८ आहे. यावरुन स्त्री किंवा मुलींच्या जन्माचे या जमातीत स्वागत होत असल्याचे दिसते. आजही अनेक कुटुंबांमध्ये मुलगी म्हणजे उत्पन्नाचे साधन मानले जाते. म्हणूनच स्त्रीयांची संख्या पुरुषांच्या तुलनेत जास्त आहे असे म्हणता येते.

३. एकुण लोकसंख्येबरोबरच कुटुंब प्रमुखांचा विचार केला असता एकुण ४२० कुटुबांपैकी १७९ कुटुंब प्रमुख हे स्त्रिया असल्याचे दिसते. २४१ कुटुंबप्रमुख हे पुरुष असल्याचे दिसते. कोल्हाटी जमातीमध्ये पूर्वी पूर्णपणे मातृसत्ताक पध्दतीचे अस्तित्व होते. परंतु काही प्रमाणात आज ते बदललेले दिसते. ५७.३८ टक्के कुटुंबांमध्ये पुरुषप्रधान कारभार आहे तर ४२.६२ टक्के कुटुंबांमध्ये आजही स्त्रिया उदरनिर्वाहाबरोबरच घरातील निर्णय घेताना दिसतात. यावरुन मातृसत्ताक पध्दती पुर्णपणे बंद झाली असे म्हणता येणार नाही तर त्यामध्ये परिवर्तन आढळते. ही समाधानकारक बाब आहे की कुटुंबातील स्त्रियांव्यतिरिक्त पुरुष आळस झटकून उदरनिर्वाहासाठी धडपड करत आहेत.

४. निवडलेल्या नगर, नेवासा, जामखेड व शेवगाव या तालुक्यांमधील गावनिहाय कोल्हाटी जमातीची कुटुंब संख्या अभ्यासली असता प्रत्येक तालुक्यामध्ये एखादया गावामध्ये खूप मोठया प्रमाणात कोल्हाटी कुटुंब असणारी वस्ती आहे. तर उरलेल्या इतर गावांमध्ये तुरळक कोल्हाटी कुटुंब संख्या आहे. यावरुन कोल्हाटी जमातीची कुटुंबे निवडलेल्या अभ्यास क्षेत्रामध्ये विखुरलेल्या अवस्थेत वास्तव्य करताना दिसतात.

५. अभ्यासक्षेत्रातील एकुण २०८९ लोकसंख्येपैकी कोल्हाटी कुटुंबांमध्ये ० ते ५ वयोगटातील सदस्य संख्या ८.४१ टक्के आहे. ६ ते १४ वयोगटातील सदस्य संख्या १३.४० आहे. तर कर्ती लोकसंख्या १५ ते ६० या वयोगटातील सदस्य संख्या ७३.८२ टक्के आहे. व शेवटी ६१ च्या पुढे वय असणाऱ्या वृध्दगटातील सदस्य संख्या ४.६४ टक्के आहे. यावरुन अभ्यासक्षेत्रातील कोल्हाटी कुटुंबांमध्ये बालके व वृध्द सदस्यांचे प्रमाण कमी असून काम करणाऱ्या उत्पादक सदस्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

६. अभ्यासक्षेत्रातील प्रत्यक्ष पाहणीनुसार एकुण ४२० कुटुंबांपैकी एकही कुटुंबाचे धर्मांतर झालेले दिसत नाही. ते १०० टक्के सर्वजणांचा धर्म हिंदू असल्याचे स्पष्ट होते तर या कुटुंबांची विभागणी त्यांच्या रळयानुसार गोष्ट/कुळ होत असल्याचे दिसते. एकुण १२

रळयांपैकी चंदनवाले, गांगवेवाले, भोरजेवाले, मुसवादवाले, नैय्यवाले,कच्चरवाले असे ६ रळे प्रामुख्याने आढळतात.

७. कोल्हाटी जमातीतील कलावंतीण स्त्रीयांचा विवाह होत नाही. त्यामुळे विवाहित व अविवाहित कुटुंब प्रमुखांच्या संख्येमध्ये तफावत आहे. २४६ कुटुंब प्रमुख म्हणजेच ५८.५७ टक्के कुटुंब प्रमुख विवाहीत असून १७४ ४१.४३ टक्के कुटुंब प्रमुख अविवाहित आहेत. यामध्ये अविवाहित कुटुंब प्रमुखांमध्ये प्रामुख्याने पारंपारिक व्यावसाय करणाऱ्या कलावंतीन स्त्रियांचा समावेश आहे.

८. शिक्षण हा जमातीच्या विकास व परिवर्तनाच्या वाटचालीचा मूळ निर्देशक असल्याने शैक्षणिक स्थितीचा निष्कर्ष प्रस्तुत संशोधनासाठी महत्वाचा ठरतो. एकुण ४२० नमुना कुटुंबांच्या कुटुंबप्रमुखांच्या शैक्षणिक स्थितीनुसार २३.०९ टक्के कुटुंबप्रमुख शाळेतच गेले नाहीत म्हणजेच निरक्षर आहेत. या शिक्षितांपैकी १०.४७ टक्के कुटुंबप्रमुख उच्चशिक्षित म्हणजेच पदवी प्राप्त व त्यापेक्षाही अधिक प्राविण्य मिळविलेले आहेत. तर उच्च माध्यमिक पर्यंत शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण ६६.४२ टक्के आहे. कुटुंबप्रमुखांची शैक्षणिक स्थिती अभ्यासल्यानंतर एकुण लोकसंख्येची शैक्षणिक स्थितीची नोंद महत्वाची ठरते. एकुण २०८९ कोल्हाटी लोकसंख्येपैकी निरक्षर सदस्यांचे प्रमाण १८.४८ टक्के आहे. उच्चशिक्षीतांचे प्रमाण १७.२८ टक्के आहे. तर उच्च माध्यमिक पर्यंत म्हणजेच ७९.१२ टक्के पर्यंत आहे.

९. अभ्यासक्षेत्रातील ७८.८१ टक्के कुटुंब प्रमुखांना शिक्षण अर्ध्यावर सोडावे लागले त्यासाठी आर्थिक परिस्थिती ७५ टक्के कारणीभूत असल्याचे दिसते यावरुन असा निष्कर्ष निघतो की, आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने शिक्षणाशिवाय होणाऱ्या उदरनिर्वाहाकडे ही जमात झुकलेली आहे. शिक्षण अर्धवट सोडून पारंपारिक व्यवसाय व इतर साधनांचा वापर करुन कुटुंबातील सदस्यांच्या उदरनिर्वाहाकडे कुटुंब प्रमुख व इतर सदस्यांचा कल आहे.

तसेच जे शिक्षण घेतात त्यांनाही कोल्हाटी जमात म्हणून वावरत असताना न्यूनगंड निर्माण झाल्याचे दिसते. आपली आई, बहीण, मावशी नाचकाम करतात हया वास्तवतेशी जुळवून घेत मुला–मुलींना शिक्षण घेणे अडचणीचे ठरते असे दिसते.

१०. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी कुटुंबांमध्ये ४० टक्के कुटुंब प्रमुख पारंपारिक व्यवसायाशी संबंधित असून एकुण लोकसंख्येपैकी १६.४८ टक्के कुटुंबातील सदस्य पारंपारिक व्यवसाय

करतात. परंतु असे असूनही मुला–मुलींच्या भविष्य व उदरनिर्वाहासंबंधी कुटुंब प्रमुखांचे मत बऱ्यापैकी समाधानकारक आहे. ४२० कुटुंब प्रमुखांपैकी १९४ कुटुंब प्रमुख मुलांना भविष्यात नोकरी तर १०४ कुटुंब प्रमुख मुलांना उच्चशिक्षीत बनविण्याचे मत व्यक्त करतात. १३९ कुटुंब प्रमुख मुलींचे लग्न लावून देणार असून ७९ कुटुंब प्रमुख मुलींना उच्चशिक्षित बनविण्याचे मत व्यक्त करतात. तर मुलांकडे कुटुंब प्रमुख असणारा दृष्टीकोन बघता २१२ कुटुंब प्रमुख मुलांना स्वतंत्र निर्णय क्षमता देण्यावर विश्वास ठेवतात तर १४५ कुटुंब प्रमुख आपल्या मुलींना पारंपारिक व्यवसायाच्या विळख्यात न सापडू देण्याची काळजी घ्यायची आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, जमातीमध्ये मुलीकडे उत्पन्नाचे साधन म्हणून पाहणे व मुलगा उत्पन्नाचे साधन नाही म्हणून दुर्लक्ष करणे यामध्ये बऱ्यापैकी परिवर्तन असून मुला–मुलींना उच्चशिक्षित करुन सक्षम बनविण्याची सुरुवात कोल्हाटी जमातीमध्ये होत आहे. अगदी थोडया प्रमाणात कुटुंब प्रमुख या मताच्या विरुध्द असून त्यांच्यासाठी अजूनही प्रबोधन व आर्थिक आधाराची गरज आहे.

११. कोल्हाटी जमातीमध्ये इतर भटक्या विमुक्त जाती जमातींच्या तुलनेत व्यसनांचे प्रमाण कमी आढळते. पारधी, डोंबारी, कातकरी या जमातीमध्ये व्यसनाला ज्या प्रमाणात महत्व दिले जाते. त्याप्रमाणात कोल्हाटी जमातीने शिक्षणाबरोबरच व्यसनाच्या आहारी जाण्याचे प्रमाण कमी आहे. एकुण २०८९ कोल्हाटी लोकसंख्येपैकी २८२ लोक व्यसन करतात. तर १८०७ लोकसंख्या निर्व्यसनी आहे. त्यापैकी २०.१९ टक्के पुरुष व्यसने करतात तर ७९.८१ टक्के पुरुष निर्व्यसनी आहेत व ९.१२ टक्के स्त्रिया व्यसने करतात तर ९१.८८ टक्के स्त्रिया व्यसने करत नाहीत. यावरुन स्त्रीयांच्या तुलनेत पुरुषांचे व्यसनाचे प्रमाण जास्त आहे. तर एकुण लोकसंख्येतील निर्व्यसनी लोकसंख्या कमी आहे. व्यसनांमध्ये प्रामुख्याने गुटखा, तंबाखू खाणे, दारु पिणे या व्यसनांचे प्रमाण जास्त आहे.

१२. अभ्यास क्षेत्रातील विवाहित कुटुंबाच्या अभ्यासानुसार २४६ विवाहितांपैकी केवळ २० विवाह आंतरजातीय आहेत. ९१.८७ टक्के विवाह जातीय विवाह आहेत यावरुन आंतरजातीय विवाहाची पध्दत कोल्हाटी जमातीत कमी प्रमाणात असल्याचे दिसते.

१३. एकुण ४२० कुटुंबांपैकी १५९ (३७.८६ टक्के) कुटुंब प्रमुख जातीला महत्व देतात तर २६१ (६२.१४ टक्के) कुटुंब प्रमुख हे मनुष्याला महत्व देतात. यावरुन आजही जातीचे वर्चस्व

पूर्णपणे नष्ट झाले नसून ३७.८६ टक्के कुटुंबांमध्ये जातीव्यवस्थेचा पगडा आहे तर ६२.१६ टक्के या मोठया प्रमाणातील लोक आधुनिकतेकडे वाटचाल करण्याची तयारी दर्शवितात.

१४. एकुण ४२० नमुना कुटुंबांपैकी आजही १०० कुटुंबे २३.८१ टक्के प्रमाणात भटके जीवन जगतात तर ३२० कुटुंबे ७६.१९ टक्के प्रमाणात स्थिर जीवन जगतात यावरुन असे स्पष्ट होते की, आजही जे आर्थिकता व जातिव्यवस्थेच्या चौकटीत राहून पारंपारिक व्यवसाय करतात ते २३.८१ टक्के कुटुंब प्रमुख भटकंतीचे जीवन जगतात. तर प्रामुख्याने इतर व्यवसाय करणारे ७६.१९ टक्के कुटुंब स्थिरस्थावर झालेली आहेत.

१५. कोल्हाटी जमातीच्या नमुना कुटुंबांची धार्मिकता व अंधश्रध्दा विचारात घेतली असता पुढील महत्वपूर्ण निष्कर्ष समोर येतो की, जमातीमध्ये आजही मोठया प्रमाणात देवावर विश्वास ठेवणे, नवस करणे, बळी देणे, नामकरण, पाचवी, मुंजविधी, तिसरा, दशक्रिया, तेरावा, समाजाच्या यात्रा व उत्सव करणे, सूतक पाळणे या धार्मिक रुढी व प्रथांची अंमजबजावणी केली जाते. एकुण ४२० कुटुंबांपैकी ८४.५२ टक्के कुटुंबे या प्रथा नित्यनियमाने करतात तर केवळ १५.४८ टक्के कुटुंबे या प्रथा करत नाहीत. यावरुन कोल्हाटी जमातीमध्ये धार्मिकता व अंधश्रध्देचा पगडा आहे असे स्पष्ट होते.

१६. कोल्हाटी जमातीसंबंधी संदर्भ ग्रंथाचा आढावा व प्रत्यक्ष पाहणीतील अनुभवांनुसार जातपंचायत कायदा निर्माण होण्यापूर्वी जातपंचायतीचे वर्चस्व मोठया प्रमाणात होते व आजही ६८.१० टक्के कुटुंब प्रमुखांचा जातपंचायतीवर विश्वास आहे. तर ५८.८१ टक्के कुटुंब प्रमुख जातपंचायतीतील आरोपीला होणाऱ्या बहिष्कार या शिक्षेचे समर्थन करतात. यावरुन कोल्हाटी जमातीतील जातपंचायतीविषयी असणारी आस्था व त्यांचा दृढ सामाजिक दृष्टीकोन स्पष्ट होतो. शिक्षणाचा अभाव व शासकीय कार्यालय उदा. कोर्ट, कचेरी यापासूनची अलिप्तता या कारणांमुळे सोपी पध्दतीची ओढ त्यांच्या या मतांमधून स्पष्ट होते.

१७. कोल्हाटी जमातीतील मुला–मुलींचे छंद व कलाकौशल्यामध्ये विविधता आढळते. ज्या कुटुंबांमध्ये पारंपारिक व्यवसायाचे अस्तित्व आहे. त्याठिकाणी मुला–मुलींचे गायन, नृत्य,वादन असे छंद समोर आले तर ज्याठिकाणी कुटुंबांमध्ये नाचकाम नाही त्याठिकाणी मुलां–मुलींचे वक्तृत्व, वादविवाद असे छंद दिसून आले. यावरुन असा निष्कर्ष निघतो की कुटुंबातील वातावरण व संस्कृतीचा मुलांच्या छंद व कौशल्यावर प्रभाव पडतो.

१८. वैदयकिय सुविधा व आरोग्यविषयक अभ्यासावरुन असे दिसते की, ३३.५७ टक्के कुटुंबे प्राथमिक उपचारासाठी सरकारी दवाखान्यात जातात तर ६६.४३ टक्के कुटुंब प्राथमिक उपचारासाठी खाजगी दवाखान्यात जातात. यावरुन शासकीय आरोग्य सेवांचा लाभ घेण्यासंदर्भात या जमातीतील कुटुंबांची आरोग्यविषयक अनास्था लक्षात येते.

त्याचप्रमाणे महिला बाळंतपणाबाबत ८१ कुटुंबामधील स्त्रियांचे बाळंतपण घरी झाल्याचे दिसते. तर ३२७ महिला दवाखान्यात बाळंतपण झालेल्या आहेत. यावरुन महिलांचे दवाखान्यात बाळंतपण करण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळेच बाळंतपणातील आई व बाळाच्या मृत्यूचे प्रमाण अगदी नगण्य आहे.

कुटुंब नियोजनाबाबत स्थिती समाधानकारक असल्याचे दिसते. ८९.५२ टक्के कुटुंब प्रमुखांनी कुटुंब नियोजन केले असून त्यामुळे लोकसंख्या वाढीस आळा घालण्यास मदत होईल. तसेच कोल्हाटी कुटुंबांमधील किरकोळ आजारांचे म्हणजेच सर्दी,खोकला, ताप यांचे प्रमाण ७० टक्के आढळते. परंतु कॅन्सर, एड्स, कावीळ असे जीवघेण्या आजारांचे प्रमाण केवळ ९.१ टक्के आहे. यावरुन जमातीमध्ये रोगराईचे प्रमाण कमी असल्याचे स्पष्ट होते. कोल्हाटी कुटुंबांमध्ये दररोज दात घासणे, आंघोळ, कपडे धुणे या राहणीमानासंबंधी चांगल्या बाबी आढळतात. त्यामुळे रोगराईचे प्रमाण कमी आहे. तसेच घरगुती उपचार न करता ८० टक्के कुटुंबे दवाखान्यांकडे धाव घेताना दिसतात.

१९. कोल्हाटी जमात ४२ गुन्हेगारी जमातीपैकी एक असून ज्या २८ जमाती या कायदयातून मुक्त करण्यात आल्या त्यामध्ये कोल्हाटी जमातीचा उल्लेख आहे. त्यामुळे गुन्हेगारी जमात या शिक्क्यापासून दूर आहे. एकुण ४२० कुटुंबांपैकी केवळ १० कुटुंबांमध्ये किरकोळ गुन्हातील गुन्हेगार आढळले आहेत. यावरुन खूप कमी २.३८ टक्के प्रमाण गुन्हेगारीचे दिसते. तर ९७.६२ टक्के कुटुंबे ही गुन्हेगारीप्रवृत्ती पासून अलिप्त आहेत. कारण या जमातीला कलावंत जमात म्हणून ओळखले जात असून गुन्हेगारी प्रवृत्ती पासून अलिप्त आहेत. कारण या जमातीला कलावंत जमात म्हणून ओळखले जात असून गुन्हेगारीवृत्ती यांमध्ये खूप क्वचित कमी प्रमाणात आहे.

### ५.२.२. कोल्हाटी जमातीच्या आर्थिक स्थितीविषयक निष्कर्ष–

अभ्यास क्षेत्रातील सामाजिक स्थितीचे निष्कर्षाची नोंद घेतल्यानंतर आर्थिक निष्कर्ष पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१. कोल्हाटी जमातीचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून करण्यात आला असला तरी आर्थिक निष्कर्षामध्ये रोजगार व व्यवसाय स्थितीसंबंधी विश्लेषण महत्वाचे ठरते. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी कुटुंबांपैकी पूर्वीचा व्यवसाय व सध्याचा व्यवसाय यामध्ये विविधता व परिवर्तन आहे. हे परिवर्तन पारंपारिक व्यवसायामध्ये नसून नोकरी व व्यापार उदयोग म्हणजेच इतर व्यवसायामध्ये आहे. पूर्वी ६१ टक्के कुटुंबांमध्ये पारंपारिक व्यवसाय केला जातो. पूर्वी ३१ टक्के कुटुंबे शेती करत होती ते कमी होऊन २७ टक्के कुटुंबे शेती करतात. पूर्वी केवळ २ टक्के कुटुंबांमध्ये नोकरी केली जात होती. सध्या ११ टक्के कुटुंबांमध्ये नोकरी केली जाते. व्यापार व उदयोग करणाऱ्यांचे पूर्वी २६.४२ टक्के प्रमाण होते तर सध्या त्यामध्ये घट झाली असून २१.६६ टक्के झाले आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की जी कुटुंब पूर्वी पारंपारिक व्यवसाय करत होती ती आजही पारंपारिक व्यवसाय व सांस्कृतिक दारिद्र्यामध्ये अडकलेली आहेत. परंतु शेती, नोकरी, उदयोग व व्यापार या इतर व्यवसायांमध्ये परिवर्तन आहे. शेती व उदयोग करणाऱ्यांचे प्रमाण कमी होऊन शिक्षणात वाढ होऊन नोकरी करणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. ही एक समाधानकारक स्थिती रोजगारविषयक दिसून येते.

२. सध्याच्या स्थितीत जे १६२ कुटुंब पारंपारिक व्यवसाय करतात त्यांच्या बाबतीतील विभागणी केली असता पुढील निष्कर्ष निघतात. त्यापैकी १५ टक्के कुटुंब प्रमुख स्त्रिया पूर्वी रस्त्यावर कसरतीचे खेळ करत होत्या. तर १९ टक्के कुटुंब प्रमुख स्त्रिया तमाशा फडात काम करत आहेत. १९ टक्के कुटुंब प्रमुख स्त्रिया दिवाणखान्यामध्ये नाचकाम करतात. ३४ टक्के कुटुंब प्रमुख स्त्रिया कलाकेंद्रात नाचकाम करतात. ११ टक्के कुटुंब प्रमुख स्त्रिया संगीतबारी(पार्टी) मालकीण म्हणून काम करतात तर केवळ २ टक्के कुटुंब प्रमुख स्त्रिया कलाकेंद्राच्या मालकीण आहेत. यावरुन तमाशा व दिवाणखाना यामध्ये नाचकाम करणाऱ्या स्त्रियांची संख्या जेमतेम असून कलाकेंद्रात नाचकाम करणाऱ्या स्त्रियांची संख्या सर्वात जास्त आहे. बऱ्यापैकी स्त्रिया पार्टी मालकिणी म्हणून कार्यरत आहेत तर कलाकेंद्र मालकीणींची संख्या नगण्य आहे. एकुण २४१ पुरुष कुटुंब प्रमुखांपैकी केवळ ०२.टक्के पुरुष कुटुंब प्रमुख

पारंपारिक व्यावसाय करतात. यावरुन असा निष्कर्ष निघतो की कोल्हाटी जमातीमध्ये पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची पारंपारिक व्यावसायाकडे जाण्याची प्रवृत्ती प्रचंड मोठया प्रमाणात आहे. कारण सदयस्थितीत ३९ टक्के स्त्रिया पारंपारिक व्यावसाय करतात तर केवळ २ टक्के पुरुष पारंपारिक व्यावसाय करतात.

३. अभ्यास क्षेत्रातील एकुण ४२० कुटुंबांमधील कुटुंबातील व्यक्तिंच्या व्यवसायाचा अभ्यास केला असता त्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या सदस्यांची संख्या सर्वाधिक ३५.६८ टक्के आहे. त्याखालोखाल गृहिणी कुटुंब सदस्यांची संख्या १८.१५ टक्के आहे. नंतर पारंपारिक व्यवसाय करणारे १६.४८ टक्के सदस्य दिसून येतात. शेती व नोकरी करणारे जेमतेम ७ ते ८ टक्के च्या दरम्यान आहेत. इतर व्यवसाय करणारे ९.२० टक्के सदस्य आहेत. मजूरी व उदयोग व्यावसाय करणारे ६ टक्के च्या जवळपास सदस्य आहेत. यावरुन असे दिसते की,पूर्वी शिक्षण न मिळाल्याने ज्यांनी पारंपारिक व्यावसायाचा आधार घेतला त्या कुटुंबामधून सध्या मुलांना शिक्षण देण्याचे प्रमाण वाढले असून पुढच्या भावी पिढीसाठी ते पारंपारिक व्यवसायाव्यतिरिक्त इतर व्यवसायांचा मार्ग मोकळा करताना दिसतात.

४. एकुण नमूना कोल्हाटी कुटुंबांपैकी ४६ टक्के कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ५० हजार पर्यंत आहे. १६.४३ टक्के कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न १ लाख ते २ लाख या दरम्यान आहे. तर २ ते ५ लाखाच्या पुढे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण १६.९० टक्के आहे. यावरुन दारिद्ररेषेखालील उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांची संख्या ५०टक्के पर्यंत आहे. परंतु या सर्वच कुटुंबांना दारिद्रयरेषेखाली नावे नोंदवून दाखले मिळाल्याचे दिसत नाही. ५० टक्के पैकी बऱ्याच कुटुंबांची शासकीय सर्वेक्षणाच्या वेळी जाणीवपूर्वक नोंद केली गेली नाही. तर काही कुटुंबांची नोंद जातीच्या दाखल्यासाठीच्या प्रक्रियेतील गुंतागुंत, जाचक अटी, कागदपत्रांचा व पुराव्यांचा अभाव यामुळे झाली नाही असे दिसते. एकुण नमुना कुटुंबांमध्ये जे नोकरी, मोठे उदयोग व व्यवसाय करतात ते सर्वजण मध्यम व उच्च वार्षिक उत्पन्न गटामध्ये मोडतात परंतु जे शेती व पारंपारिक व्यवसाय करतात त्या सर्वांचा समावेश अल्प व अतिअल्प वार्षिक उत्पन्न गटात होताना दिसतो.

५. वरीलप्रमाणे मासिक उत्पन्नाची स्थिती काही वेगळी नसून समान आहे. उच्च मासिक उत्पन्न गटामध्ये १० हजाराच्या पुढे वेतन असणाऱ्या कुटुंबांमध्ये नोकरदार, निश्चित उत्पन्न मिळणारे,

मोठे उदयोग व व्यवसाय करणारे, सरकारी नोकरी करणारे यांचा समावेश असून त्यांचे प्रमाण एकुण कुटुंब संख्येच्या तुलनेत कमी आहे. तर अल्प व अतिअल्प मासिक वेतन ३ हजार ते ६ हजार, दीड हजार ते ३ हजार या दरम्यान वेतन असणाऱ्या कुटुंबांची संख्या ५० टक्के पेक्षा म्हणजेच निम्म्यापेक्षा जास्त आहे.

यावरुन कोल्हाटी जमातीमध्ये आर्थिक विषमता जास्त असल्याचे दिसते व त्यास शिक्षण व व्यवसाय हे दोन्ही घटक परिणामकारक आहेत.

६. अभ्यास क्षेत्रातील एकुण नमुना कुटुंबांच्या वार्षिक व मासिक उत्पन्नाचे तसेच त्यांच्या सध्याच्या व पूर्वीच्या व्यवसायाची नोंद घेतल्यानंतर त्यांच्या सध्याच्या व पूर्वीच्या आर्थिक स्थितीबाबत निष्कर्ष पुढे येतात. आर्थिक परिस्थिती पूर्वी उत्तम, चांगली होती असे म्हणणाऱ्या कुटुंबांची संख्येत सद्यस्थितीत वाढ झाली असून शिक्षणाचा प्रभाव व आधुनिकतेकडे वाटचाल यामुळे नोकरी व उदयोग यांच्या आधाराने पूर्वीच्या तुलनेत उत्तम व चांगली आर्थिक स्थिती दिसून येते. तर पूर्वी आर्थिक परिस्थिती वाईट होती असे म्हणणाऱ्या कुटुंबांमध्येसुध्दा वाढ झाली आहे कारण जे पूर्वी पारंपारिक व्यावसाय करणारी कुटुंबे होती त्यांची पारंपारिक व्यवसाय करण्याचे प्रमाण तेवढेच आहे. ज्या कलावंतीन स्त्रीया पूर्वी पारंपारिक व्यावसायामुळे आर्थिक परिस्थिती बरी असे म्हणत आहेत त्यांना वयोमानानुसार कलेच्या जीवनामध्ये उत्पन्नाचा अभाव, नैराश्य, अवहेलना, तिरस्कार यांबरोबर त्यांच्या मिळकतीचा मार्ग बंद झाला असल्याचे दिसते व नेमकी त्यांचीच आर्थिक परिस्थिती सद्यस्थितीत वाईट असल्याचे दिसते.

याठिकाणी एक गोष्ट प्राममुख्याने दिसते की, वार्षिक व मासिक उत्पन्न कमी असून रोजगार नसून नविन व्यवसाय सुरु करण्याची इच्छा नसणारे ७५ टक्के कुटुंब प्रमुख आहेत. त्यांच्या नवीन व्यवसाय न करण्यामागे प्रामुख्याने आत्मविश्वासाची कमतरता, आळस, भांडवलाची कमतरता, उत्पन्नाच्या सोप्या मार्गांची लालसा अशी कारणे दिसून आली.

७. अभ्यास क्षेत्रातील नमुना कोल्हाटी कुटुंबांचा कर्जविषयक अभ्यास केला असता असा निष्कर्ष निघतो की, केवळ १०.०७ टक्के कुटुंबांमध्ये कर्ज घेतले आहे तर ८९.२९ टक्के कुटुंबांनी कर्जाचा आधार घेतलेला नाही. २५ टक्के कुटुंबांना नवीन व्यावसाय करण्याची इच्छा असूनही केवळ १०.७१ टक्के कुटुंब कर्ज प्रक्रियेकडे वळतात. यावरुन कोल्हाटी जमातीतील कुटुंब कर्जाबाबत निराशावादी व उदासीन असल्याचे दिसते. तसेच कर्जबाजारीपणाचे प्रमाण

कमी आहे ही एकादृष्टीने समाधानकारक बाब आहे असे दिसते. ज्या १०.७१ टक्के कुटुंबांनी कर्जे घेतली आहेत. त्यापैकी बँकांकडून कर्जे घेण्याचे प्रमाण ५० टक्के पेक्षा जास्त आहे म्हणजेच शासन दरबारी मदतीपर्यंत ही जमात जात आहे. तर अत्यंत गरजू कुटुंबे अन्य व्यक्ती, सावकार, पतसंस्था, नातेवाईक असा फार थोडया प्रमाणात आधार घेताना दिसतात.

यावरुन कर्जविषयक दृष्टीकोन राष्ट्रीयकृत बँकाकडून अधिकृत कर्ज घेण्याचा दिसतो. कर्ज घेतलेल्या ४५ कुटुंबांपैकी २६.६७ टक्के नियमित कर्जे परतफेड करतात तर ७३.३३ टक्के कुटुंबांचे थकबाकीदारांमध्ये समावेश होतो. तसेच याठिकाणी बँकेतून कर्जे घेतल्याने घर, शेती, सोने असे तारण देवून कर्जे घेण्याचे प्रमाण जास्त आहे. त्याचप्रमाणे बॅकेच्या व्याजदराने ११ टक्के किंवा १४ टक्के व्याजदराने ही कर्ज जास्त प्रमाणात घेतली असून खूप आर्थिक निकड भागविण्यासाठी थोडया प्रमाणात २० टक्के व्याजदराने कर्ज घेतलेले दिसते. कर्जाच्या कारणांचा अभ्यास केला असता सर्वाधिक १७ कुटुंबांनी कर्ज व्यवसायासाठी घेतलेले असून इतर बाकी २८ कर्ज केवळ अनुत्पादक कारणासाठी घेतली आहेत.

वरील कर्जविषयक माहितीवरुन नमुना कुटुंबामध्ये कर्जाचे प्रमाण अत्यल्प आहे. उत्पादक कर्जापेक्षा अनुत्पादक कर्जाचे प्रमाण जास्त असल्याने थकबाकीचे प्रमाण जास्त आहे व दिलेल्या कारणासाठी कर्जाचा वापर ४५ कर्जदारांपैकी केवळ १४ कर्जदार करताना दिसतात. तर ३१ कर्जदारांमध्ये व्यसन, इतरांची देणी, महागाई, अनिश्चित उत्पन्न या कारणामुळे कर्जाचा योग्य वापर होत नाही.

८. एकुण ४२० नमुना कोल्हाटी कुटुंबांपैकी ५० टक्के कुटुंबे भूधारक आहेत तर ५० टक्के कुटुंबे ही भूमीहीन आहेत. एकुण ४ नमुना तालुक्यांमधील भूधारक कुटुंबांचे प्रमाण नेवासा तालुक्यामध्ये सर्वाधिक आहे तर नगर तालुक्यामध्ये सर्वात कमी आहे. एकुण २१० भूधारकां पैकी ८६.१९ टक्के, शेतीजमीनी या वंशपरंपरेने मिळालेल्या आहेत. तर केवळ १३.८१ टक्के कुटुंबांनी त्या विकत घेतल्या आहेत. भूधारकांपैकी ७८.१० टक्के भूधारक स्वतः कुटुंबांतील व्यक्तिंसह शेती करतात तर ८.५७ टक्के भूधारक कुटुंबात शेती करण्याजोगे सदस्य नसल्याने खंडाने शेती करण्यासाठी देतात. १३.३३ टक्के भूधारकांची शेती पाण्याचा अभाव, भांडवलाचा अभाव, मनुष्यबळ नसल्याने आपली शेती पडीक ठेवतात. यावरुन शेती असणाऱ्यासंबंधी माहिती मिळते की, मोठया प्रमाणात शेती वंशपरंपरागत असून पडीक असण्याचे प्रमाण जास्त

आहे. असणाऱ्या सर्वच जमीनी उत्पादक नाहीत.

९. शेती असणाऱ्या ७८.१० टक्के भूधारकांच्या शेतीपासूनच्या उत्पन्नाचा अभ्यास केला असता ५० टक्के भूधारकांचे शेती उत्पन्न ८० हजारच्या पुढे आहे. प्रामुख्याने नेवासा तालुक्यामधील भूधारकांचा उच्च शेती उत्पन्न गटामध्ये होतो. तर नगर व जामखेड तालुक्यांमधील भूधारक कुटुंबांच्या शेतजमीनी खंडाने व पडीक ठेवण्याचे प्रमाण जास्त आहे. कारण नेवासा व शेवगावमध्ये पारंपारिक व्यवसायाचे प्रमाण कमी असल्याने उदरनिर्वाहासाठी शेतीचा उपयोग केला जातो परंतु नगर व जामखेड या तालुका ठिकाणी पारंपारिक व्यावसायास वाव असल्याने शेती करण्यास उत्सुकता कमी दिसते.

शेती उत्पन्नाचा विचार केला असता अनिश्चित उत्पन्नामुळे कुटुंबांच्या मुलभूत गरज भागविणे शक्य होत नसल्याचे चित्र समोर येते. नेवासा तालुक्यातील बेलपिंपळगाव, जामखेड तालुक्यातील खांडवी अशा ठराविक ठिकाणी शेती संपन्नता व समाधानकारक स्थिती दिसते. इतर ठिकाणी शेतीवर अवलंबून असणाऱ्या कुटुंबांची स्थिती चिंताजनक आहे.

१०. एकुण शेती असणाऱ्या २१० कुटुंबांपैकी केवळ ११ टक्के कुटुंबांनी शेतीसाठी कर्ज घेतलेले आहे. यावरुन शेती-कर्जाचे प्रमाण अल्प असल्याचे दिसते. या कर्जामध्ये ५० हजार ते १लाख व १ लाखाच्या पुढे असणाऱ्या कर्जाचे प्रमाण जास्त असून २३ कर्जधारकांपैकी २० शेती कर्जधारकांनी विविध कार्यकारी सोसायटीच्या माध्यमातून कर्ज घेतलेले आहे. केवळ ३ शेती कर्जधारकांनी बँकेतून कर्ज घेतले आहे. एकुण २३ शेती धारकांपैकी केवळ ४ कर्जधारक नियमित कर्जाची परतफेड करतात तर १९ कर्जधारक थकबाकीदार आहेत. अनिश्चित उत्पन्न हे कर्जाच्या थकबाकीचे प्रमुख कारण दिसते.

११. एकुण नमुना ४२० कोल्हाटी कुटुंबांच्या मासिक खर्चाचे वर्गीकरण अभ्यासताना अन्नधान्य व गृहोपयोगी वस्तूंवर १०० टक्के कुटुंबांचा खर्च होत आहे. त्याखालोखाल धार्मिक विधीवर २५ टक्के कुटुंबांचा खर्च होताना दिसतो. त्याखालोखाल दवाखाना, शिक्षण, व्यसन, कर्जाची परतफेड असा खर्चाचा प्राधान्यक्रम दिसून येतो. यावरुन असे दिसते की, कोल्हाटी जमातीमध्ये मूलभूत खर्चानंतर धार्मिक विधीवर मोठया प्रमाणात खर्च केला जातो. तसेच ज्या ठिकाणी मूलभूत गरजा भागविणे कठीण आहे अशा कुटुंबांमध्येसुध्दा दैवी नवस, यात्रा यांना प्राधान्य दिले जाते. ज्याठिकाणी पारंपारिक व्यवसाय व शिक्षणाचा अभाव आहे त्याठिकाणी

धार्मिक विधी व परंपरांचे प्रस्थ दिसते.

१२. उत्पन्न व खर्च यामधील फरक म्हणजे बचत होय. अर्थशास्त्रीय संकल्पनांपैकी बचत ही संकल्पना जमातीतील कुटुंबांचा विकास व प्रगतीस हातभार लावण्यास मदत करते. एकुण नमुना कोल्हाटी ४२० कुटुंबांपैकी बचत करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ३३.८१ टक्के आहे तर बचत न होणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण जास्त ६६.१९ टक्के आहे.

यावरुन बचतीचे प्रमाण कमी असल्याचे दिसते. महागाई, दैनंदिन खर्च, धार्मिक विधी, शिक्षण, व्यसन, आजारपण, कर्ज असा बचत न होण्यामागच्या कारणांचा प्राधान्यक्रम दिसून येतो. याठिकाणी पुन्हा बचतीस अडथळा म्हणून दैनंदिन खर्चानंतर धार्मिक विधीचे प्रमाण जास्त असल्याचे दिसते.

१३. स्थलांतरण हा घटक प्रत्येक जमात व कुटुंबांच्या सामाजिकता व आर्थिकता यांवर परिणाम करताना दिसतो. कोल्हाटी जमात भटक्या विमुक्त जमातीपैकी असून ती नाचगाणे व मनोरंजन करणारी कलावंत जमात आहे. या जमातीने आजही आपल्या पारंपारिक व्यवसायाचा वारसा जपला आहे. आजही ४० टक्के कुटुंब व्यवसायानिमित्त भटकंती करताना दिसतात परंतु या कुटुंबांमधील कुटुंब प्रमुख एकमेव व तात्पुरत्या स्वरुपात भटकत असून विसाव्यासाठी पुन्हा स्वघरी परत येतो. त्यामुळे कायमस्वरुपी स्थलांतरित कुटुंबांमध्ये त्यांचा समावेश न करता स्थलांतरणाची तीन प्रकारे विभागणी केली आहे. त्यामध्ये स्थिर, कायमस्वरुपी स्थलांतरित व तात्पुरते स्थलांतरित असे तीन विभाग करण्यात आले आहेत. त्यानुसार एकुण नमुना कुटुंबांपैकी ६३.३३ टक्के कुटुंब प्रमुख सदयस्थितीत स्थिर जीवन जगत आहेत. तर २२.१४ टक्के कुटुंब प्रमुख पारंपारिक व्यवसायानिमित्त तात्पुरत्या स्वरुपात भटकत आहेत. तर केवळ १४.५३ टक्के कुटुंब प्रमुख कुटुंबासहित कायमचे स्थलांतरीत झालेले आहे. यावरुन स्थिर व तात्पुरत्या स्थलांतरणाचे प्रमाण जास्त असून कायमचे स्थलांतरित कमी प्रमाणात असल्याचे दिसते. तात्पुरते व कायम स्थलांतरित १५४ कुटुंबांपैकी ४.५४ टक्के नोकरीनिमित्त, ६०.३९ टक्के पारंपारिक व्यावसायानिमित्त, ६.५० टक्के शिक्षणानिमित्त तर २८.५७ टक्के इतर वैयक्तिक कारणांनिमित्त स्थलांतरित झालेले दिसतात यावरुन कोल्हाटी जमातीच्या पारंपारिक व्यवसाय हा कुटुंबांची भटकंती घडवून आणल्याचे प्रमुख कारण आहे असे दिसते.

१४. कायमस्वरुपी स्थलांतरित झालेल्या ६१ कुटुंबांपैकी ८०.३२ टक्के कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये स्थलांतरणानंतर सुधारणा झाल्याचे दिसते तर १९.६८ टक्के कुटुंबांची स्थलांतरणानंतरही आर्थिक परिस्थिती त्याच पातळीवर आहे. शिक्षण व नोकरीनिमित्त स्थलांतरित कुटुंबांची स्थिती सुधारली तसेच धरणामध्ये घरे व शेती गेलेल्या काही कुटुंबांची स्थिती शासनाने दिलेल्या मोबदल्यावर अवलंबून राहिल्याने बिकट व निम्न पातळीला गेली. काही धरणग्रस्तांना या स्थलांतरणातून अनुकूल परिणाम आढळलेले आहेत.

१५. अभ्यास क्षेत्रातील कोल्हाटी जमातीचे एकुण नमुना कुटुंब व त्यांना असणारी शासकीय योजनांची माहिती याबाबत ७६.१९ टक्के कुटुंबांना शासकीय योजनांची माहिती असल्याचे दिसते तर २३.८१ टक्के कुटबांना शासकीय योजनांची माहिती नाही असे दिसते. यावरुन मोठया प्रमाणावर जमात शासकीय योजनांपासून अलिप्त असल्याचे म्हणता येते. त्याचप्रमाणे माहिती असणाऱ्या ३२० कुटुंबांपैकी म्हणजेच ७६.१९ टक्के कुटुंबांपैकी केवळ ३१ कुटुंबांना उपलब्ध असणाऱ्या योजनांचा लाभ मिळतो. म्हणजेच जेमतेम १० टक्के कुटुंबे या योजनांपर्यत पोहचले आहेत. या योजनांपैकी १८ कुटुंब घरकुल लाभार्थी, ७ कुटुंबांना वसंतराव नाईक महामंडळ कर्ज, ५ कलावंतीन स्त्रीयांना कलाकार मानधन व केवळ १ कुटुंब प्रमुखाला वृध्दापकाळ पेन्शन प्राप्त झाले आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, कोल्हाटी जमातीसाठी असणाऱ्या योजना व सवलती अतिशय कमी असून त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न ही जमात करत नाही. त्यासाठी असणारी किचकट प्रक्रिया, कागदपत्रांचा अभाव, धडपडीवृत्तीचा अभाव यामुळे शासन दरबारी मिळणाऱ्या मदतीपासून ही जमात वंचित व अलिप्त आहे असे म्हणता येईल.

१६. निवासासंबंधी स्थितीचे विश्लेषण नमुना कुटुंबांमध्ये निश्चितच समाधानकारक आहे. कारण एकुण ४२० कुटुंबांपैकी ३९४ (९३.८१ टक्के) कुटुंबांकडे स्वतःचे घर आहे तर केवळ २६(६.१९ टक्के) कुटुंबे भाडयाच्या घरात राहतात. यावरुन व्यक्तिच्या मूलभूत गरजांपैकी महत्वाची गरज घर ही या जमातीतील ९४ टक्के लोकांकडे मालकीची आहे.

एकुण ४२० कुटुंबांच्या घरांपैकी केवळ २ कुटुंबे झोपडीमध्ये राहतात. ५४ टक्के कुटुंब पत्र्याच्या घरात तर ४५.४८ टक्के कुटुंब स्लॅबच्या घरात राहतात. याव्यतिरिक्त त्यांच्या घरामध्ये ५० टक्के कुटुंबांमध्ये टेप, फॅन, दिवाण, कपाट, मोबाईल, मिक्सर या किरकोळ

वस्तूसुध्दा उपलब्ध नव्हत्या तर सरासरी २० टक्के कुटुंबांमध्ये फ्रीज, टु व्हिलर यावस्तू आढळल्या तर केवळ ८ कुटुंब प्रमुखांकडे फोर व्हीलर होती. यावरुन अगदी अल्प प्रमाणातील कोल्हाटी कुटुंबांकडे चैनीच्या वस्तू असून मोठया प्रमाणातील कुटुंबांकडे मुलभूत वस्तूची उपलब्धता नाही यावरुन आर्थिक विषमता मोठया प्रमाणात असल्याचे दिसते.

१७. एकुण ४२० कुटुंबांपैकी ७८.८१ टक्के कुटुंबप्रमुख मतदान करतात तर २१.१९ टक्के कुटुंबप्रमुख आपल्या मतदानाचा हक्क बजावत नाहीत यावरुन बऱ्यापैकी कुटुंबांना मतदानाबद्दल निरागस दृष्टीकोनसमोर येतो. तसेच मोठया प्रमाणात कुटुंब प्रमुख व्यवसायानिमित्त एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकंती करत असल्याने ते मतदानासाठी उपलब्ध नसतात. कलावंतीण स्त्रिया नाचकामानिमित्त वारंवार बाहेरगावी असल्याने तसेच शासनाचे त्यांच्याकडे होणारे दुर्लक्ष यामुळे त्यांना नागरिकत्वाची जाणीव नाही असे म्हणता येते.

१८. एकुण नमुना कुटुंबांपैकी ९७.६२ टक्के कुटुंबांकडे रेशनकार्ड आहे तर केवळ २.३८ टक्के कुटुंबाकडे रेशनकार्ड नाहीत. यामध्ये पुन्हा केशरी रंगाचे रेशनकार्ड व पिवळया रंगाचे रेशनकार्ड असे प्रकार पडतात. एकुण ४१० रेशनकार्डधारक कुटुंबांपैकी २६३ कुटुंबांकडे पिवळे व केशरी रंगाचे रेशनकार्ड आहे.

**५.२.३. कोल्हाटी जमातीतील कलावंतीन स्त्रीच्या आर्थिक स्थितीविषयक निष्कर्ष –**

प्रत्यख पाहणीनुसार एकुण नमुना कोल्हाटी कुटुंबांपैकी ४० टक्के कुटुंबांचा संबंध पारंपारिक व्यवसायाशी आहे तर त्यापैकी ३०.४०टक्के कुटुंबामधील स्त्रीया विविध मार्गांनी नाचकाम, मनोरंजन करुन कुटुंबांतील व्यक्तिंचे पालनपोषण करताना दिसतात. या कुटुंब प्रमुख १६२ स्त्रियांच्या आर्थिक बाबीसंबंधी निष्कर्ष पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१. दिवाणखाना व कलाकेंद्राशी संबंधीत या स्त्रियांच्या करारासंबंधी पार्टी(संगीतबारी) मालकीण सर्व निर्णय घेत असते म्हणजेच कलाकेंद्र मालक व कलाकार यांच्यामधील मध्यस्थ म्हणजे पार्टी मालकीण होय.

२. कलाकेंद्र मालक व पार्टी मालकीण यांच्यामध्ये होणारा करार तोंडी असून त्यामध्ये १०० टक्के विश्वास ठेवण्यावर महत्व दिले जाते. कोणत्याही प्रकारची लेखी प्रक्रिया या आर्थिक व्यवहारांमध्ये होत नाही.

३. मालक,मालकीण व कलाकार यांमध्ये होणारे देणे–घेणे अशा स्वरुपाचे आर्थिक व्यवहार पूर्ण

रोख स्वरुपात होतात. जमीनी देणे, घर बांधून देणे, कायमचा आधार, मुलांचे संगोपन अशा अटी याठिकाणी केल्या जात नाहीत.

४. ज्यावेळी कलाकार कला सादर करतात त्याठिकाणी मिळणारा पैसा तसेच उधळपट्टी या सर्वांवर प्रथम संगीतबारी (पार्टी) मालकीणीचा अधिकार असतो. कलाकेंद्र मालक व येणाऱ्या प्रेक्षकवर्गाकडून मिळणारे उत्पन्न हे मालकीणीच्या ताब्यात जाते व त्यानंतर त्याचा हिस्सा ठरविल्याप्रमाणे सामुहिक वाटणी होते. वाटणी होण्यापूर्वी त्यामधून दैनंदिन सामुहिक खर्च वजा केला जातो व त्यानंतर उत्पन्नाची हिस्स्यानुसार वाटणी होते.

५. कलाकारांमधील प्रत्येकाचा हिस्सा ठरविलेला असतो. बैठकीचे, शो चे, इतर बाहेरील कार्यक्रमाचे उत्पन्न एकत्रित करुन उत्पन्न–खर्च = हिस्सा असा हिशोब करुन मिळणाऱ्या उत्पन्नाची सर्व विभागणी पार्टी मालकीणीच्या ताब्यात असते.

६. दिवाणखाना व कलाकेंद्र या माध्यमातून होणाऱ्या मनोरंजनाच्या व्यवसायाची निश्चित अशी जागा ठरलेली नसते. तालुकानिहाय प्रत्यक्ष पाहणीतून हा व्यवसाय कुठेही चालतो. केवळ प्रतिष्ठीत लोकांच्या वास्तवाच्या आजूबाजूला चालत नसून बाजारपेठेच्या बाजूला, गजबजलेल्या शहरांच्या जवळ म्हणजेच ज्याठिकाणी प्रेक्षकवर्ग येण्या–जाण्याची सोय पाहून हा व्यवसाय कुठेही चालताना दिसतो.

७. या मनोरंजन व्यवसायावर बाहय घटकांचा प्रभाव पडत नसल्याने १२ महिने चालतो असे ६६.६७ टक्के कलावंतीनींची मते आहेत. काही कलाकार थोडा वेळ कुटुंबांतील सदस्य व मुले यांना देतात तर काही कौटुंबिक समस्यांमुळे कुटुंबांमध्ये येणे–जाणे चालू ठेवतात. अशा २५.९३ टक्के कलावंतीन स्त्रीयांच्यामते हा व्यवसाय ६ महिने चालतो आणि केवळ ७.४१ टक्के कलावंतीनीच्या मते, हा व्यवसाय ४ महिने चालतो. प्रत्येकाचा आराम व घरी जाण्याचा कालावधी वेगवेगळा असल्याने हा व्यवसाय १२ महिने चालतो असे दिसते.

८. कलावंतीन स्त्रीसाठी सर्वात गंभीर व संवेदनशील समस्या म्हणजे विवाह न करता जन्मलेल्या मुलांचे संगोपन करणे. व्यवसायकाळात मुलांच्या आर्थिक संगोपनाची जबाबदारी १०० टक्के कलावंतीन स्त्री कुटुंब प्रमुखांच्या मते, स्वतःची असते. त्यानंतर त्या स्त्रीने हा व्यवसाय सोडला तर ज्या पुरुषापासून तिला अपत्य झाले आहे त्याने तिचा विश्वास संपादन करुन तिला आयुष्यभर सांभाळण्याची हमी दिली तर व्यवसाय काळानंतर २०.३७ टक्के

स्त्रियांच्या मते, तो संबंधित पुरुष मुलांचे संगोपन करतो तर ७९.६३ टक्के स्त्रिया व्यवसायकाळानंतर आजची मुलांचे संगोपन स्वतः करतात.

९.एकुण नमुना कलावंतीण स्त्रियांपैकी १०.४९ टक्के स्त्रियांकडे कोणतीही भविष्यकाळासाठीची बचतीची तरतूद नाही तर अगदी थोडया मोजक्या स्त्रियांकडे नगदी रोख, शेती, दागिने आहेत. परंतु घर हे परंपरागत स्वरुपात बऱ्याच कुटुंबांकडे असल्याने ८९.५० टक्के स्त्रीयांकडे निवासासाठी स्वतःचे घर आहे. या कलावंतीन म्हणून व्यावसाय करत असताना त्यांच्या आर्थिक स्थितीत कोणताच बदल होत नाही. परंतु एखादया पुरुषाने संभाळ करण्याची हमी दिली असता आर्थिक स्थितीमध्ये अनुकूल बदल घडून येतात असे ५० टक्के स्त्रीयांचे म्हणणे आहे. आजही एकुण नमुना कलावंतीन कुटुंबप्रमुख स्त्रीयांपैकी ६३.५८ टक्के स्त्रिया या व्यवसायातून उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटला नाही असे दिसते तर १७.२८ टक्के स्त्रियांना या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही किंवा त्यांनाच त्याचे उत्तर स्पष्ट होत नाही.

१०. विशेष बैठकीचा अधिकार केवळ कलाकेंद्र मालक व पार्टी मालकीण यांना असून याबैठकीमध्ये ८७.६५ टक्के गावातील श्रीमंत, ७८.३९ टक्के गावातील शौकीन व्यक्ति, ६०.४९ टक्के व्यापारी व केवळ १०.४९ टक्के सधन शेतकरी यांचा समावेश होतो. यावरुन समाजातील विविध स्तरांमधून मनोरंजनासाठी व करमणूकीसाठी पुरुषांची येणे–जाणे असते. ७७.१६ टक्के स्त्रियांच्या मते या विशेष बैठकीतून ५००–१००० रु पर्यंत आर्थिक प्राप्ती होते. १०००–२००० रु पर्यंत १९.१४ टक्के स्त्रियांच्यामते आर्थिक प्राप्ती होते. तर २०००–५००० रु पर्यंत ३.७० टक्के स्त्रियांच्या मते आर्थिक प्राप्ती होते. परंतु या बैठकीमध्ये सुध्दा पुन्हा पार्टी मालकीण, कलाकार या सर्वांचा सामुहिक हिस्सा असतो.

११. नाचकाम व नृत्य हे मनोरंजनाचे कार्य पारंपारिक व्यवसाय कोल्हाटी जमातीचा असला तरी आज या व्यवसायात १०० टक्के इतर सर्व जात व धर्माच्या स्त्रियांचा समावेश होतो.

१२. कलावंतीनीकडे पाहून तिचे जीवन सोपे व झगमगते दिसत असले तरी तिच्या जीवनाचा खडतर प्रवास तिच्या समस्यांकडे नजर टाकल्यावर समोर येतो. एकुण नमुना कुटुंबांपैकी १०० टक्के कलावंतीन स्त्रीयांना एकुण नमुना कुटुंबांपैकी १०० टक्के कलावंतीन स्त्रीयांना कुटुंब प्रमुख असताना विवाह, मुलांचे संगोपन व नाव लावण्याची समस्या, विश्वासू पुरुषाची समस्या, दैनंदिन जीवन जगण्याची समस्या यांचा सामना करावा लागतो. त्यापैकी ४०.१२ टक्के

स्त्रीयांना रखेली असण्याची समस्या व त्यापासून होणारी अवहेलना यांचा सामना करावा लागतो. यावरुन एक कुटुंब प्रमुख कलावंतीन स्त्री म्हणून जगताना कुटुंबाची जबाबदारी, समाजाला झुगारण्याचे बळ तिच्या पंखात नसताना अनेक अपमान सहन करतात. त्यात समाधानी राहण्याचा प्रयत्न करते. त्याचबरोबर तिला अनेक मन  हेलावून टाकण्याऱ्या समस्या भेडसावत असतात.

१३. एकुण १६२ कलावंतीण स्त्री कुटुंबप्रमुखांपैकी ८८.२७ टक्के स्त्रिया आपल्या मुलांना संबंधीत पुरुषाचे नाव न लावता स्वतःचे नाव लावतात. ८५ टक्के स्वतःचे, ४.३२ स्वतःच्या वडिलांचे तर केवळ ५.५६ टक्के स्त्रिया संबंधीत पुरुषाचे नाव लावतात. नाव लावण्यासंबंधीत शासनाच्या कायदेशीर आदेशानंतर कोल्हाटी जमातीतील स्त्रियांचा या समस्येतून बऱ्यापैकी बचाव होत आहे.

१४. या स्त्रीयांना त्यांचे स्वप्न व अपेक्षांसंबंधी मते विचारली असता ५६.१७ टक्के स्त्रियांना गृहिणी बनायचे आहे. १९.७५ टक्के स्त्रियांना शिक्षण व नोकरीची आशा आहे. ९.२५ टक्के स्त्रियांना नविन काहीतरी व्यवसाय करुन या व्यवसायातून बाहेर पडायचे आहे. तर १४.८१ टक्के स्त्रिया आहे त्यात समाधानी आहे असे उत्तर देतात.

यावरुन या स्त्रियांना कुठेतरी या जीवनाचा कंटाळा आला असून आपला संसार असावा अशी जीवनाकडून अपेक्षा दिसते.

१५. कलावंतीन स्त्री हा व्यवसाय करीत असताना त्याची प्रतिकूल परिणामांची झळ तिच्याबरोबर तिच्या कुटुंबालाही बसते. यामध्ये १०० टक्के होणारे परिणामांमध्ये मुलांच्या पालन पोषणाची हेळसांड, मुलांकडे दुर्लक्ष, कुटुंबांपासून दूर रहावे लागते, कुटुंबाला नावे ठेवली जातात यांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे ३३.९५ टक्के पेक्षा जास्त स्त्रियांच्या मुलांच्या शाळेची फी व व्यवस्था होत नाही असे म्हणणे आहे. १७.२८ टक्के स्त्रियांच्या मुलांना या व्यावसायामुळे वाईट वळण लागते व मुले व्यसनी बनली आहेत.

यावरुन नाचणारी स्त्रीचा व्यवसाय तिच्याबरोबरच तिच्या कुटुंबावरही घातक परिणाम करताना दिसतो. कारण ती बंधने, जबाबदारी व आर्थिक विवंचनेमध्ये अडकून पडलेली असते व तिला तिच्या मुले व कुटुंबांकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नाही.

## ५.३. शिफारशी –

### ५.३.१. सामाजिक –

१. प्रस्तुत संशोधनामध्ये स्पष्ट झालेला जातिव्यवस्था व सामाजिक स्तरीकरणाचा पगडा नष्ट होण्यासाठी सामाजिक पातळीवर सामाजिक संस्थांकडून विशेष प्रयत्न केले जावे.

२. कोल्हाटी जमात अप्रत्यक्षरित्या बहिष्कृत असल्यासारखे जीवन जगत आहे. केवळ कारण त्यांचे व्यवसाय व सामाजिक कलंक आहे. तो नष्ट होण्यासाठी जमातीतील शिक्षित जमावाने प्रबोधन कार्य हाती घेऊन प्रयत्न करावेत.

३. समाजातील उच्च–निच्च दरी कमी करण्यासाठी वर्ग, श्रेणी, स्तर, दर्जा या संकल्पनांचा ऱ्हास होणे गरजेचे आहे. त्यासाठी शैक्षणिक सुविधांमध्ये वाढ करण्यात यावी. परंतु शैक्षणिक सवलती या जात या संकल्पनेवरुन न ठरविता बौध्दिक व आर्थिक संपन्नतेवरुन ठरविल्या जाव्यात.

४. कोल्हाटी जमातीत आजही ४० टक्के कुटुंबांमधील मुलींना शिक्षण व विवाहास प्रोत्साहन मिळत नाही त्यासाठी प्रत्यक्षात या जमातीतील मुला–मुलींना उच्च शिक्षणास प्रवृत्त करावे.

५. कोल्हाटी जमातीतील अनेक जण न्यूनगंड मनात बाळगून शिक्षणापासून आलिप्त आहेत. त्यांच्या शिक्षणासाठी विशेष सवलती उपलब्ध करुन त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

६. समाजात वावरताना एकूणच अशिक्षित व नाचकाम व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांमध्ये आत्मविश्वासाची कमतरता जाणवते. त्यांच्या मागास विचारांवर शैक्षणिक पातळी वाढविणे हा एकमेव उपाय असून शासनाने या कोल्हाटी जमातीतील मुलांसाठी फिरत्या शाळा(School on Wheels) सुरु कराव्यात. त्यांच्यातील नृत्य व गायन केवळ या गुणांचा विकास कौटुंबिक वातावरणामुळे होत आहे. परंतु तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन करुन नवीन पीढीमधील सृजनशील गुणांना वाव दिला पाहिजे. जेणेकरुन ही मुले शिक्षण प्रवाहातून बाहेर न पडता त्यांना रोजगाराची साधने उपलब्ध होतील.

७. कोल्हाटी जमात तसेच भटक्या विमुक्त जमातीतील मुलांसाठी नमुना निवड क्षेत्रामध्ये एकही आश्रमशाळा किंवा वसतीगृहे आढळली नाही. त्यांची उपलब्धता करण्यात यावी.

८. जमातीतील आर्थिकस्तर पाहता अनेक कुटुंबांना मुलभूत गरजा भागविणे शक्य नाही.

त्यामुळे मुलांचे शिक्षण, खाणे–पिणे, कपडे, शैक्षणिक साहित्य यांच्या खर्चाच्या भीतीने पालक मुलांना शाळेत पाठवित नाहीत. या मुलांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना, शैक्षणिक साहित्य वाटप योजना अशा शैक्षणिक योजना प्रभावीपणे राबवाव्यात. त्यामध्ये स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी.

९. जमातीमध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण पाहता ही समस्या आर्थिक, सामाजिक प्रगतीतील मोठा अडथळा असल्याचे दिसते. त्याच–त्याच वातावरणात मुलांचे संगोपन होत असल्याने मुलांना व्यसन व वाईट वळणे लागण्याची शक्यता जास्त आहे. त्यामुळे नविन पिढी व जुनी पिढी यांच्यातील अंतर राखण्यासाठी मुलांना शहराच्या ठिकाणी वसतीगृह, शाळा, दवाखाने यांची शासनाने सोय करावी. गावोगावी व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न करावेत.

१०. कोल्हाटी जमातीतील गंभीर सामाजिक समस्या म्हणजे मुलींचे विवाहाचे प्रमाण होय. हे प्रमाण बऱ्यापैकी वाढले असले तरी विवाह न करता नाचकाम करणे आजही पूर्णपणे बंद झालेले नाही. आजही जातीमध्ये मोठया प्रमाणात मुलीच्या जन्मावर खूश होऊन उत्पन्नाचे साधन म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. यासाठी समाजबांधवांनी एकत्र येऊन नृत्य व कला हे केवळ मनोरंजनापुरते मर्यादित ठेवले पाहिजे. तसेच जास्तीत जास्त मुलींना शिक्षण देऊन त्यांचे विवाह करण्यावर भर दिला जावा. यासाठी विवाहमंडळे स्थापन करण्यात यावीत.

११. कोल्हाटी जमात ही व्यवसायानिमित्त भटकंती करत असते. कलावंतांना फिरत्या वैद्यकिय सोयी–सुविधा उपलब्ध करुन देण्याची सोय व्हावी. कलावंतीनीला तसेच इतर कुटुंबांमधील गरोदर मातेला सकस व पोषक आहार उपलब्ध करुन, लोहयुक्त गोळया प्रति महिना वाटप याबाबींची शासकीय आरोग्य खात्याने दखल घ्यावी.

१२. भटक्या विमुक्त जाती व जमातींची वस्ती असणाऱ्या ठिकाणी अंगणवाडी असावी. या अंगणवाडीमध्ये प्रशिक्षित शिक्षिका व लहान बालकांना आकर्षित करण्याजोग्या सोयी–सुविधा असाव्यात. ज्यामधून बालकांचे लक्ष शिक्षणाकडे जाऊन शिक्षण हे त्यांचे आकर्षण बनण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

१३. अनेक ठिकाणी कोल्हाटी जमात अत्यंत दुर्गम व खेडयाच्या ठिकाणी वसलेली दिसते. त्यामुळे समाज कुठे चालला आहे? आधुनिकता, परिवर्तन यापासून हा समाज अलिप्त आहे. त्यांना या वातावरणातून बाहेर काढून समाजातील इतर वातावरणाशी ओळख करुन दिली

पाहिजे.

१४. कोल्हाटी जमातीतील कर्जाचे प्रमाण मोठे नाही, परंतु बरीच कर्जे धार्मिक विधी, अंधश्रध्दा यासाठी घेतलेली आहेत. म्हणजेच अंधश्रध्दा व धार्मिकता यांचा पगडा कमी करण्याची गरज आहे. त्यासाठी मार्गदर्शक व समुपदेशनाची गरज असून जातपंचायत कायदा, अंधश्रध्दा निर्मूलन कायदा यांची समाजाला ओळख करुन दिली पाहिजे. त्याचप्रमाणे धार्मिक पगडा कमी व्हावा यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजे.

१५. अनुसूचित जाती व जमातीच्या संरक्षणासाठी ज्याप्रमाणे ॲट्रॉसिटी कायदा लागू आहे. त्याचप्रमाणे कोल्हाटी जमातीच्या कुटुंबांच्या संरक्षणासाठी ॲट्रॉसिटी कायदा अग्रक्रमाने लागू करण्यात यावा.

### ५.३.२. आर्थिक शिफारशी –

१. कोल्हाटी जमातीतील एकुण व्यावसायिक स्थिती पाहता शासकीय नोकरदार, खाजगी नोकरदार यांचे प्रमाण कमी आहे. शासकीय परिक्षांबद्दलची तळागाळातील लोकांना माहिती मिळत नाही. त्यामुळे शासनाने मोफत मार्गदर्शन शिबीरे, प्रबोधन वर्ग, व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम या जमातीसाठी राबवावेत.

२. प्रत्यक्षात भू–धारक असूनही शेती करणाऱ्यांची संख्या निम्याने कमी आहे. यासाठी जलसिंचनासाठी अल्पदराने कर्जे, कमी दराने शेती अवजारे, बी–बीयाणे, शेती संबंधीत साधने यांची उपलब्धता करुन देणे आवश्यक आहे. त्यासाठी कोल्हाटी जमात ज्या एन.टी.–ब प्रवर्गात मोडते त्यासाठी इतर एस.सी./एस.टी. साठी असणाऱ्या योजना लागू करण्यात याव्यात.

३. कोल्हाटी जमातीतील महिलांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी स्त्री उदयोजकता, स्त्रियांचा व्यावसायिक सहभाग, विविध क्षेत्रात कोल्हाटी महिलांना प्राधान्य व प्रतिनिधित्व देणे इ. कार्यक्रमांमध्ये वाढ केली पाहिजे. महिला मार्गदर्शक शिबीरांचे आयोजन करावे त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसहाय्य गट, शाळा व महाविद्यालय यांची मदत घ्यावी.

४. प्रत्यक्ष पाहणीमध्ये या जमातीतील कुटुबांचा बचत गट, भिशी या आर्थिक सहाय्यता गटांमध्ये सहभाग कमी आहे. ही जमात व्यावसायानिमित्त भटकंती करीत असल्याने अशा आर्थिक गटांमध्ये सहभागासाठी उत्साह कमी दिसतो. त्यांचा बचत गट, भिशी मंडळ,

शासनाच्या काही आर्थिक निधी गटांमध्ये जास्तीत जास्त सहभाग वाढण्यासाठी सर्व प्रथम त्यांच्या स्थिरीकरणावर भर दिला पाहिजे.

५. शिधापत्रकासाठी सर्वेक्षण करुन वगळलेल्या कुटुंबांना नवीन दारिद्रय रेषेखालील यादीत समाविष्ट करुन घ्यावे.

६. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत शिधापत्रकावर मिळणारे धान्य व इतर खादय पदार्थ यांच्या पुरवठयात  खादय पदार्थांच्या संख्येत उदा. दूध, तेल, डाळी,फळे, इ. अशा कुपोषण व उपासमारी दूर करणाऱ्या पौष्टीक पदार्थांचा समावेश करावा.

७. कोल्हाटी जमातीच्या पुर्नवसनासाठी राज्य व केंद्र वार्षिक अंदाजपत्रकामध्ये विशेष आर्थिक निधीची तरतूद करण्यात यावी.

८. विधानसभा/ विधान परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणूक पदांसाठी कोल्हाटी जमातीसाठी (एन.टी.–ब) यांच्या प्राधान्यक्रमाबाबत राजकीय पक्षांनी लक्ष दयावे.

१०. सहकार क्षेत्रामध्ये भटक्या विमुक्त जाती व जमतींसाठी १ जागा(आरक्षण) असते. त्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (ग्रामपंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषद) भटक्या विमुक्तांना राखीव जागा मिळाव्यात.

११. कोल्हाटी जमातींसाठी विशेष कोणतीही योजनेची तरतूद नसून त्यांना मिळणाऱ्या मोजक्या योजना व सवलती एन.टी.– ब प्रवर्गातून मिळतात. त्यामुळे प्रत्यक्ष पाहणीत घरकूलाशिवाय अन्य कोणत्याही सवलतीचे लाभार्थी आढळले नाहीत म्हणून कोल्हाटी जमातीसाठी विशेष योजना व सवलतींची तरतूद करावी. उदा. रमाई आवास योजना(घरकुल)

१२. कोल्हाटी जमातीतील निराधार, भूमीहीन कुटुंबांना अनुसूचित जाती व जमातीप्रमाणे योजनांचा लाभ मिळावा. उदा. सभाजी गायकवाड सबलीकरण योजना

१३. प्रत्यक्ष पाहणीमध्ये जे कोल्हाटी कुटुंब अल्पभूधारक आहेत त्या बहुतांश कुटुंबाकडे विहीर खोदणे, विहीर दुरुस्ती, साठी अनुदान मिळाले नाहीत. विशेष घटक योजनेअंतर्गत सर्वाना समान रुपात अनुदान मिळावे.

१४. कोल्हाटी जमातीतील पारंपारिक व्यवसाय करणारी कुटुंबे भारतीय कला व संस्कृतीचे संवर्धन करीत असल्याने त्यांचे मानधन व निवृत्ती वेतन यासाठी भरीव आर्थिक तरतूद

करावी.

१५. कलाकारांना दिले जाणारे मानधन, तसेच इतर योजना यासाठी शासनाने लाभार्थींची विशिष्ट संख्या ठरविली आहे. त्यामुळे सर्व कुटुंबांना किंवा व्यक्तिंना लाभ मिळण्यास मर्यादा येतात. त्यासाठी कोटा न ठेवता पात्र लाभार्थींना मानधन मंजूर करावे.

१६. प्रत्यक्ष पाहणीमध्ये वार्षिक व मासिक उत्पन्न कमी असणाऱ्या कोल्हाटी कुटुंबांची संख्या जास्त आहे. त्यासाठी शासनाने रोजगार व दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमांवर भर दयावा.

१७. वसंतराव नाईक महामंडळाअंतर्गत मिळणारी आर्थिक मदत भटक्या विमुक्त जाती व जमाती मध्ये एकुण ४२ जाती–जमातींचा समावेश होतो. त्यामध्ये लाभधारकांची संख्या अधिक असल्याने कोल्हाटी जमातीचे लोक या योजनेपर्यंत पोहचू शकत नाहीत. त्यासाठी वरील प्रकारचे विशेष आर्थिक महामंडळ एन.टी.–ब प्रवर्गासाठी निर्माण करुन कोल्हाटी जमातीसाठी अधिक आर्थिक मदत मिळवून दयावी.

**५.३.३. कलावंतांसाठी विशेष शिफारशी–**

१. शासनाने कलावंतांसाठी (नर्तिकी, नर्तक, तबला/पेटीवादक, सोंगाडया इ.) साठी वेतन नियमावली निश्चित करुन त्याची अंमलबजावणी सक्तीची करावी.

२. कलावंतांना आर्थिक हातभार मिळावा यासाठी एखादया जोड व्यवसायाचे प्रशिक्षण व उदयोग सुरु करण्यासाठी मूलभूत भांडवल पुरवण्याची सोय करावी.

३. कलावंतांना संगीतबारी, दिवाणखाना याव्यतिरिक्त नगरपालिका, महानगरपालिकांनी उभारलेले नाटयगृहांप्रमाणे कलाकेंद्र उपलब्ध करुन दयावेत. ज्याठिकाणी एकच मक्तेदार नसून त्यासाठी स्थानिक स्वराजय संस्थांना राज्य शासनाने अनुदान दयावे.

४. संगीतबारीतील कलावंतांना तक्रार निवारण केंद्र उपलब्ध करुन दयावेत. त्यामध्ये जेष्ठ कलावंतांना प्रतिनिधित्व देवून विशेष करुन स्त्री कलावंतांवर कोणताही शारिरीक अत्याचार होणार नाही. संपत्तीधारक उच्चभ्रू वर्ग या कलावंतीण स्त्रियांच्या आर्थिक मजबूरीचा फायदा घेणार नाहीत व त्यांचे शोषण होणार नाही याची या केंद्राद्वारे दखल घेतली जाईल.

५. कलाकेंद्रांवर असणारी खाजगी मालकी नष्ट करुन संस्थात्मक मालकी प्रस्थापित व्हावी. त्यासाठी कलाकारांची सहकारी संस्था व संघटना कलाकारांच्या आर्थिक विकासासाठी कार्य करेल.

६. सर्व प्रकारच्या कलावंतांना विशिष्ट वयाच्या मर्यादेत ठराविक रक्कमेची निवृत्ती वेतन लागू केली पाहिजे. पुन्हा काही कालमर्यादेनंतरही पेन्शन वाढविण्यात यावी कारण वृध्दापकाळात आर्थिक गैरसोय होते.

७. वृध्द कलावंतांना मिळणारे मानधन हे त्यांच्यापर्यंत पोहचत नाही असे प्रत्यक्ष पाहणीमध्ये स्पष्ट झाले असून त्याची शासनाने दखल घ्यावी. प्रत्येक कलावंताला दिले जाणारे मानधन मर्यादित कलाकार संख्या, मर्यादित कालावधी, मर्यादित रककम, किचकट प्रक्रिया, कागदपत्रांची यादी, पुरावे अशा अटींमध्ये बांधलेले असून त्यामुळे ते मानधन हक्क असणाऱ्यांना मिळत नाही. त्यासाठी नियम व अटी शिथील करुन साधी व सोपी अशिक्षित वृध्द कलावंतांना करता येईल अशी प्रक्रिया निर्माण करावी.

८. कलावंत वर्गाची केवळ राज्यशासनाने नव्हे तर केंद्र शासनानेही दखल घ्यावी.

९. कोल्हाटी जमातीतील कलावंतांना एकटेपणा व अवहेलना त्यांच्या वृध्दापकाळात प्रकर्षाने जाणवते अशावेळी शासनाने अथवा सामाजिक संस्थांनी स्वतंत्र कलावंत वृध्दाश्रम सुरु करावेत.

१०. कोल्हाटी जमातीतील अनेक कलावंत स्वबळावर विदेशी दौरा करुन आपली कला व भारतीय संस्कृतीचे नाव उज्वल करुन आले आहेत. त्यांच्या नावलौकिकाची जबाबदारी शासनाची असून त्यांच्या गुणगौरवाची दखल शासनाने घ्यावी.

११. कलावंतांप्रती असणारा हीन दृष्टीकोन कमी करुन समाजाने–संस्थांनी त्यांच्या व्यावसायिक प्रतिष्ठा व वैयक्तिक सन्मान जपण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

१२. कलावंतावर दौलतजादाच्या मोहापायी अश्लिल सादरीकरणाची मागणी होत असेल तर त्यासाठी कडक कारवाई करण्यात यावी.

१३. कलाकेंद्र मालक, पार्टी मालकीणीला उचल देतात व पार्टीमालकीणी कलाकारांना उचल देतात. हे कर्जाचे चक्र आयुष्यभर संपत नाही व कलावंतांची आर्थिक कुचंबना वाढते. त्यासाठी मालक, मालकीण, सावकार यांच्याकडून कर्ज न घेता शक्यतो राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँकांकडूनच कर्ज घेतले जावे यासाठी प्रयत्न व्हावेत.

१४. कलावंतांना कुटुंब नियोजन, व्यक्तिमत्व विकास, मुलांचे योग्य संगोपन इ. बाबत समाज सुधारकांनी प्रबोधन करावे. त्यातून  मुलांकडे बघण्याचादृष्टीकोन बदलून मुलांना वेळ देण्याचा

प्रयत्न करतील.

१५. कलावंतांचा कार्यभार व वेळ किचकट असल्याने, त्यांच्या कलाकेंद्राच्याजवळ बालसंगोपन केंद्र स्थापन करुन कलावंतांच्या बायकांना पोषक व सकस आहार पुरवठा, आरोग्य सेवा पुरवठा, बालकांची योग्य काळजी घेणे इ. कार्ये बालसंगोपन केंद्रामधून करावीत जेणेकरुन आई व लेकराची जास्त काळ ताटातूट होणार नाही व मुलांच्या संगोपनास आधार प्राप्त होईल.

१६. कलावंतांच्या मुलांना नृत्य, गायन, वादन या व्यतिरिक्त वातावरण मिळत नसल्याने शाळा व महाविद्यालयांमधून या मुलांना वाचन, पर्यटन, पोहणे, संशोधन, शारिरीक खेळ व कसरती कराटे, कलाकुसरीच्या वस्तू बनविणे अशा विविध गुणांमध्ये पारंगत करण्याचे प्रयत्न केले पहिजेत. जेणेकरुन ही मुले उदरनिर्वाहासाठी पारंपारिक व्यवसाय नाचकाम याकडे वळणार नाहीत.

## ५.४. सारांश–

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन अभ्यासक्रमामधील विश्लेषणाअंतर्गत निष्कर्ष व शिफारशी मांडण्यात आल्या असून यामध्ये कोल्हाटी जमातीतील कुटुंबांची कौटुंबिक, शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक, आरोग्य,आर्थिक, सांस्कृतिक निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. या निष्कर्षामधून कोल्हाटी जमातीची वाटचाल लक्षात येते. कोल्हाटी जमातीमध्ये पारंपारिक व्यवसाय, अंधश्रध्दा, धार्मिकता, सांस्कृतिक आचरण पध्दती यांचा पगडा आढळतो. त्याचप्रमाणे समाजातील परिवर्तनाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. अनेक कुटुंबांमधील तरुण पिढी शिक्षण घेताना दिसते व अनेक कुटुंबप्रमुखांच्या उदरनिर्वाहाच्या साधनांमध्ये परिवर्तन व विविधता आढळते. कोल्हाटी जमातीचे भवितव्य हे पूर्णपणे तरुण पिढीच्या हातात आहे असे म्हणायला हरकत नाही. परंतु तरुण पिढीला शासनाच्या मदतीचा हात मिळाला तर उज्वल भविष्य निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. कोल्हाटी जमातीचा सामाजिक–आर्थिक अभ्यास (विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा) हा संशोधन विषय कोल्हाटी जमातीची कामगिरी, संस्कृती, समस्यांची उकल यांची ओळख होण्याच्यादृष्टीने निवडण्यात आला आहे. या संशोधन अभ्यासातील निष्कर्ष व शिफारसींमधून जमातीतील लोकांच्या समस्या शासनापुढे येतील अशी संशोधक व जमातीतील एक घटक म्हणून अपेक्षा व्यक्त करते.

## संदर्भ सूची (**Biblography**) –

### पुस्तके –


१. Gazzater of The Bombay Presidency (Ahamadnagar District) Vol XVII Gov.Central Press, Bombay, F.P.1884, R.P. 2003

२. Syed Siraj Ul Hassan, 'The Caste & Tribes of H. E. H. The Nizam's Dominions, Vol-I, The Time Press Bombay, F.P.1920

३. G. S. Ghurye, 'Caste & Race in India, Kegan paul, Trench, Trubner & Co. Ltd., LONDON, F.P.1932

४. नामदेव व्हटकर, 'भारतातील जातिभेद आणि त्यावर उपाय', यशश्री प्रकाशन,कोल्हापूर, द्वि.आ. १९६७

५. शारदा देशमुख,'शिवकालातील व पेशवाईतील स्त्री–जीवन', रं. श्री. सरदेशपांडे, कार्यवाह, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ४११००९, प्र.आ.१९७३

६. R.V. Russell, 'The tribes & castes of the central provinces of India', Vol - III, Cosmo publications, Delhi, F.P. 1916, R.P. 1975

७. इरावती कर्वे, हिंदू समाज–एक अन्वयार्थ, मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्र.आ.ऑगस्ट १९७५

८. S.V. Ketkar, 'History of Caste In India' Low price publication, Delhi, F. P.1909

९. R. E. Enthoven, 'The Tribes & Castes of Bombay', Asian Education services, New Delhi, First printed F. P. 1922 R.P. 1990

१०. श्री. व्यं. केतकर, 'भारतीय समाज शास्त्र', वरदा बुक्स, पुणे (प्रकाशन क्र. ६४४) प्र. आ. १९३६, द्वि. आ. १९९४

११. त्रिं. ना. आत्रे, 'गावगाडा', वरदा बुक्स, पुणे, प्र.आ.१९१५, तृ.आ.१ जानेवारी १९८९, पुनर्मुद्रण १ जानेवारी १९९५

१२. K. S. Singh, PEOPLE OF INDIA National Series Volume V, India's Communities, Oxford University Press, Mumbai, F.P.1998.

१३. गोविंद कालेलकर, ‘ मुंबई इलाख्यातील जाती’, वरदा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९२८, द्वि.आ. १९९९

१४. रामनाथ चव्हाण, ‘जाती आणि जमाती’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे प्र. आ.१९८९, तृ. आ. २०००

१५. रामनाथ चव्हाण, ‘वेदनेच्या वाटेवरुन’, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, प्र. आ. २०००

१६. रामनाथ चव्हाण, ‘भटक्या विमुक्तांची जात पंचायत’, खंड–१, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, प्र. आ. २००२

१७. K. S. Singh, ‘People of India Maharashtra’, Popular prakashan Pvt. Ltd. Mumbai, F. P. 2004

१८. रामनाथ चव्हाण, ‘भटक्या विमुक्तांची जातपंचायत’, खंड–२, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, प्र. आ. २००४

१९. रामनाथ चव्हाण, ‘भटक्या विमुक्तांची जातपंचायत’, खंड–३, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, प्र. आ. २००६

२०. यशवंत सुमंत व द. दि. पुंडे, ‘महाराष्ट्रातील जातिसंस्थेविषयक विचार’, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९८८, पुर्नमुद्रण २००६

२१. सतीशकुमार जाधव, ‘कोल्हाटी समाज आणि संस्कृती’, लोकविद्या प्रकाशन, प्र. आ. २०१०

२२. नागनाथ धो. कदम, ‘महाराष्ट्रातील भटका समाज, संस्कृती व साहित्य’, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ.१९९५, पुर्नमुद्रण २०१३

२३. रामनाथ चव्हाण, ‘भटक्या विमुक्तांचे अंतरंग’, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९८९, पुर्नमुद्रण २०१३

२४. उत्तम कांबळे, ‘भटक्यांचे लग्न’, मनोविकास प्रकाशन, पुणे, पुर्नमुद्रण २०१५

**आत्मचरित्र–**

१. गोपीचंद पवार, ‘कोल्हाट उडी’, शब्ददान प्रकाशन, नांदेड, प्र.आ.१९९८

२. लक्ष्मण माने, ‘उपरा’, ग्रंथाली प्रकाशन, सातारा, प्र.आ. १९८०, पुर्नमुद्रण २०००

३. किशोर काळे, ‘कोल्हाटयाचं पोर’, ग्रंथाली प्रकाशन, सातारा, प्र. आ.१९९४,पुर्नमुद्रण, २००९

४. लक्ष्मण गायकवाड ‘उचल्या’, श्री विद्या प्रकाशन, पुणे,प्र. आ. १९८७, पुर्नमुद्रण २०१३

**वैचारिक लेख–**

१. लक्ष्मण माने, ‘भटक्यांचे भारुड’, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र.आ. २००३, पुर्नमद्रण २००६

२. लक्ष्मण माने, ‘बंद दरवाजा’, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र. आ.१९८४, पुर्नमुद्रण २००९

३. लक्ष्मण माने, ‘पालावरच जग’, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र. आ.१९८४, पुर्नमुद्रण २००९

४. लक्ष्मण माने, ‘का कराचं शिकुन’?, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र. आ. २००३

५. आर. जी. दांडगे, ‘भटक्या विमुक्तांचे प्रश्न व उपाय’, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००२, पुर्नमुद्रण २०१४

**नियतकालिके व मासिके –**

१. ‘पैस’ स्मरणिका, संपादक– सुमती लांडे, मुळा एज्युकेशन सोसायटी, सोनई,ता. नेवासा, ७० वे अखिल भारतीय महाराष्ट्र साहित्य संमेलन विशेषांक, १९९७

२. गो. गं. मुसळे,‘अखिल महाराष्ट्र कोल्हाटी समाज सेवा संघ ऐतिहासिक स्मरणिका’, प्रकाशक – अखिल महाराष्ट्र राज्य कोल्हाटी समाज सेवा संघ, पुणे २१ डिसेंबर, १९९८

३. वाहरु सोनवणे, अध्यक्षीय भाषण– ‘हाकारा’, वर्ष–१२वे, अंक–पहिला, दुसरा, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, जाने–जून १९९१

४. प्र. ल. गावडे, आदिवासींच्या शिक्षणातील अडथळा– भाषा, हाकारा, वर्ष १७ वे अंक चौथा, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, ऑक्टोबर–डिसेंबर १९९६

५. अरविंद सी. राणे, आदिवासींच्या शिक्षणातील मुख्य समस्या, हाकारा, वर्ष २१ वे, अंक–चौथा, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, ऑक्टोबर–डिसेंबर २०००

६. धैर्यशील शिरोळे, ‘आदिवासी स्त्री जीवन एक अल्पसा परिचय’, हाकारा, विशेषांक २००६ महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

७. श्रीराम गडगर, ‘दलित व दलितेतर कथाकार’, समक्ष–समीक्षा त्रैमासिक, वर्ष–पहिले, अंक–तिसरा, शब्दाली प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०११

८. यशवंत मनोहर (अध्यक्षीय भाषण) ‘साहित्यकापुढील जळते प्रश्न’, सक्षम समिक्षा त्रैमासिक, शब्दाली प्रकाशन (जाने–फेब्रू–मार्च २०१५)

९. गंगाधर पानतावणे, ‘डॉ. बाबासाहेबांचे वैचारिक लेख’, सक्षम समिक्षा त्रैमासिक, शब्दाली प्रकाशन (एप्रिल–मे–जून २०१५)

१०. कृष्णा राठोड, ‘बंजारा समाज आणि आर्युवेद अभ्यास’, गोरवाणी, वर्ष सातवे, अंक ४, संपादक–रमेश आत्माराम जाधव, (ऑक्टोबर ते डिसेंबर, २०१४)

११. पंडित कांबळे, ‘समाज वास्तव मांडणारा कथा संग्रह’, गोरवाणी, वर्ष आठवे, अंक एक, संपादक – रमेश आत्माराम जाधव, (जानेवारी ते मार्च २०१६)

१२. अनुराधा भिडे, ‘संत जनाबाई– काही बरोबर तर काही चुकीच्या समजुती’, मराठी संशोधन पत्रिका, वर्ष –६३, अंक–२, मराठी संशोधन मंडळ, मुंबई, एप्रिल–जून २०१६

**विद्यावाचस्पती शोध प्रबंध–**

१. गणपत लक्ष्मण इंगोले, ‘पेशवेकालीन स्त्री–जीवन १७०८–१८१८’, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९८३

२. पंढरीनाथ धनाजी काळे, ‘मराठी तमाशा(एक कला प्रकार)उद्‌गम आणि वाटचाल’ (उद्‌गम ते इ.स.१९८२), पुणे विद्यापीठ, पुणे, १९८४

३. आदम मोहम्मद शिकलगार, ‘पुणे जिल्हयातील नागरी वसाहतीतील स्थलांतरित शिकलगार जमात’ (सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा एक अभ्यास) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, ऑगस्ट १९९९

४. गणपत राठोड, ‘बीड जिले के बंजारा लोकगीतों का अध्ययन’, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, मई २०००

५. बंडू हरिभाऊ किर्दक, ‘अकोला जिल्हयातील बेलदार जमातीचा समाजशास्त्रीय–अभ्यास’, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, २००५

६. सतीशकुमार जाधव, ‘कोल्हाटी समाज आणि संस्कृती : एक ऐतिहासिक अध्ययन’, स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, एप्रिल २००७

७. बाळासाहेब बळे, ‘ महाराष्ट्रातील पारधी समाजाच्या लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास’ (लोकजीवन व लोकसंस्कृतीच्या विशेष संदर्भात), पुणे विद्यापीठ, पुणे २००८

८. निवृत्ती मिसाळ, ‘धनगर समाजाचे लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास’ (अहमदनगर जिल्हयाच्या संदर्भात), पुणे विद्यापीठ, पुणे, एप्रिल २००९

९. महादेव दत्तु डोंगरे, ‘पुणे जिल्हयातील कातकरी जमातीचा सामाजिक – आर्थिक अभ्यास’, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, मे २०१०

१०. वाल्मिक दगडू परहर, ‘रत्नागिरी जिल्हयातील कातकरी समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे चिकित्सक अध्ययन’ (२००० ते २००९), पुणे विद्यापीठ, पुणे , मे २०१२

११. सुरेश विठ्ठलराव पाथरकर, ‘रायगड जिल्हयातील आदिवासींचे लोकजीवन प्रगतीचा इतिहास’ (१९०१ ते १९८१), टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, मार्च २०१२

१२. अरुण रामराव चव्हाण, ‘विमुक्त जाती व भटक्या जमातींचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास : संदर्भ मराठवाडा व विदर्भ’, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, डिसेंबर २०१३

१३. अशोक शिवाजी सरवदे, ‘बीड जिल्हयातील अनुसूचित जातीचे आर्थिक व सामाजिक अध्ययन’, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, २०१३

१४. सुलभा कोरेकर, ‘पारधी समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास’(विशेष संदर्भ उस्मानाबाद जिल्हा), टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१३

१५. भूषण अण्णा वायकर, ‘महाराष्ट्रातील तमाशा व्यवसायाचे अर्थशास्त्र एक अध्ययन २००७–०८ ते २०११–१२’, पुणे विद्यापीठ, पुणे, २०१३

१६. नितीन नारायण भालेराव, ‘भटक्या विमुक्तांचे वैचारिक लेख’, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे, मार्च २०१५

१७. संदीप रतन कांबळे, ‘अहमदनगर जिल्हयातील भलरी लोकगीतांचा वाड.मयीन आणि सामाजिक अभ्यास’, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, २ सप्टेंबर,२०१५

**विद्यानिष्णांत शोधनिबंध –**

१. अमोल तुकाराम माने, ' महाराष्ट्रातील गोंधळी समाज : सामाजिक व आर्थिक विश्लेषण' (विशेष संदर्भ परभणी शहर व बोरी गावासंदर्भात) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे २००८

२. शेळके प्रताप शिवाजीराव, 'उस्मानाबाद जिल्हयातील पारधी समाजाचा आर्थिक व सामाजिक अभ्यास' (कळंब तालुका संदर्भात) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे २०१०

## अनुसूची क्र. १

## कुटुंब प्रमुख पुरुष असताना

### अ) कौटुंबिक

१. नाव ( कुटुंबप्रमुखाचे) :---------------------------------

२. संपूर्ण पत्ता :---------------------------------

-------------------पीन कोड नं.------

३. मोबाईल नंबर :---------------------------------

४. गावापासून वस्तीचे अंतर :- ------------ कि.मी.

५. वय :--------------------------------------

६. धर्म :--------------------------------------

७. जात:--------------------------------------

८. रळा :--------------------------------------

९. मातृभाषा :--------------------------------------

१०. समाजाची बोलीभाषा :---------------------------------

११. लग्न झाले आहे काय? अ) विवाहित ☐ ब) अविवाहित ☐

१२. पुढीलपैकी तुमची कुटुंब पध्दती कोणती - अ) संयुक्त ☐ ब) विभक्त ☐

१३. शिक्षण :-

१४. तुम्हाला शिक्षण सोडावे लागले का? होय ☐ नाही ☐

१५. शिक्षण सोडण्याचे कारण कोणते

अ) आर्थिक परिस्थिती ब) मर्जीने

क) आई वडिलांनी सोडायला लावले ड ) इतर

१६. कुटुंबातील सदस्य संख्या :-

| अ.क्र. | नावे | नाते | वय | शिक्षण | शिक्षणाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |

१७. सरकारी शाळेचे पालापासून अंतर-----------कि.मी.

१८. मुले-मुली शाळेत/बालवाडीत/अंगणवाडीत जातात का? होय ☐ नाही ☐

नसल्यास का नाही

----------------------------------------------

१९. शाळेत मुला-मुलींना सर्वात मागे बसवतात/पुढे बसवतात -

कारण-------------------------------------------

२०. शाळेतील इतर समाजाची मुले-मुली तुमच्या मुलांना चोर म्हणून चिडवतात का?

होय ☐ नाही ☐

२१. शाळेत मुलांना जाती व्यवस्थेचा त्रास जाणवतो का? होय ☐ नाही ☐

२२. शाळेतील शिक्षक जातीवरुन वेगळी वागणूक देतात का? होय ☐ नाही ☐

२३. मुलांना तुम्ही काय बनवू इच्छिता

अ) पारंपारिक व्यवसाय ब) नोकरी

क) उच्चशिक्षीत ड) अधिकारी इ) इतर

२४. मुलगी असल्यास काय स्वप्न पाहता

अ) लग्न लावून दयायचे आहे ब) उच्चशिक्षीत बनवायचे आहे

क) लग्नानंतर शिक्षणास परवानगी ड) नोकरी लावून सक्षम बनवायचे

इ) समाजाचा पारंपारिक व्यवसाय

२५. स्वतःच्या मुलांकडे लक्ष देऊ शकता का? होय ☐ नाही ☐

२६. नसल्यास कोण लक्ष देते?:--------------------------------

२७. कुटुंबामध्ये मुलगा व मुलगी फरक करता का? होय ☐ नाही ☐

२८. मुलगा असल्यास काय विचार करता

अ) उत्पन्नाचे साधन नाही म्हणून दुर्लक्ष

ब) मुलाला स्वतंत्र निर्णय क्षमता दयायची

क) पुढे संरक्षण देण्यात यशस्वी होईल याची खात्री

ड) पारंपारिक धंदयात अडथळा वाटतो

२९. मुलगी असल्यास काय विचार करता

अ) उत्पन्नाचे साधन म्हणून पाहिले जाते

ब) तिला वाढविताना काळजी घेता

क) मुलगी म्हणून पारंपारिक विळख्यात सापडेल याची काळजी वाटते

ड) तिला शिकवून सक्षम बनविण्याचा विचार

३०. व्यसन(सवयी)–

| अ.नं. | व्यसनाचा प्रकार | पुरुष | स्त्रीया | मुले | मुली | संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गुटखा खाणे | | | | | |
| २ | तंबाखू खाणे | | | | | |
| ३ | बीडी, सिगारेट | | | | | |
| ४ | दारु पिणे | | | | | |
| ५ | गांजा | | | | | |
| ६ | इतर | | | | | |

३१. तुमच्या भाऊ बहिणींची नावे–

| अ.क्र. | नाव | वय | शिक्षण | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |

३२. आईवडिलांनी किती भावंडांची लग्न करुन दिली.-------------------

३३. कुटुंबात किती आंतरजातीय विवाह झाले? ---------------------

३४. असल्यास कोण कोणत्या जाती व धर्मांमध्ये झाला------------------

३५. जातीला महत्व देता की मनुष्याला----------------------------

३६. आपला विवाह संस्कार कोणत्या पद्धतीने झाला

अ) रुढी प्रमाणे ब) हिंदू संस्कृतीप्रमाणे

क) नोंदणीकृत इ) इतर

३७. अजूनही भटके जीवन जगतात का? होय ☐ नाही ☐

**ब) धार्मिक व सामाजिक :–**

१ आपला देवधर्मावर विश्वास आहे काय? होय ☐ नाही ☐

२. आपण कोणकोणत्या देवतांना मानता? -------------------

३. आपण कोणकोणत्या देवांची पूजा करता?----------------

४. नवस करता काय? होय ☐ नाही ☐

५. होय असल्यास नवस कसे फेडता –

अ. बळी देऊन ब. साधे जेवण देऊन

क. दान करुन ड. देवाला वाहून

६. मुला/मुलीचा नामकरण विधी केला जातो का? होय ☐ नाही ☐

७. पाचवीचा विधी केला जातो का? होय ☐ नाही ☐

८. मुंजविधी केला जातो का? होय ☐ नाही ☐

९. समाजाच्या स्वतंत्र यात्रा उत्सव करता काय? होय ☐ नाही ☐

१०. करीत असल्यास देव कोणते?

१.------------२.----------- ३.--------------

११. मृत्यू विधी कसा केला जातो

अ. दफन ब. अग्निदहिनी क. इतर

१२. सुतक किती दिवस पाळले जाते :- -------

१३. तिसरा घातला जातो का? होय ☐ नाही ☐

१४. दशक्रिया विधी केला जातो का? होय ☐ नाही ☐

१५. दशक्रिया विधीला जेवण काय केले जाते

अ. शाकाहारी ब. मांसाहारी क. दोन्हीही

१६. तेरावा घातला जातो का? होय ☐ नाही ☐

१७. उपवास करता का? होय ☐ नाही ☐

१८. उपवास कशासाठी करता?:-----------------

१९. होय असल्यास कोणत्या देवसाठी उपवास करताः------------

२०. आपले कुलदैवत कोणते :-------------------

२१. कोणकोणत्या तीर्थक्षेत्राशी आपला संबंध आहे :------------

२२. आपण कोणकोणते व्रत करता :------------------

२३. आपण कोण-कोणत्या यात्रांना जाता :-----------------

२४. कोणकोणते सण साजरे करतात :------------------

२५. पारंपारिक पोशाख कोणता :-

अ. पुरुष :-------------------------------

ब. स्त्री :--------------------------------

२६. पारंपारिक दागदागिने कोणते :--------------------

२७. खाण्यापिण्याचे पदार्थ कोणते :-------------------

२८. श्रध्दास्थान कोणते :--------------

२९. जात पंचायतीचे स्वरुप कसे आहे?

३०. जात पंचायतीवर विश्वास आहे का? होय ☐ नाही ☐

३१. जातपंचायत सद्यस्थितीत आहे काय? होय ☐ नाही ☐

३२. जातपंचायत कोण-कोणत्या ठिकाणी भरते?

अ.-----------ब.----------- क.------------

३३. जातपंचायतीच्या पंचांची निवड कोण करते?

अ. वंश परंपरेनुसार ब. नामनिर्देशित क. निवड पध्दती

३४. जातपंचायतीच्या निर्णयाचे परिणाम :-

---------------------------------------------

३५. जातपंचायतीत बहिष्कार टाकला जातो का? होय ☐ नाही ☐

३६. तुम्ही त्याचे समर्थन करता का? होय ☐ नाही ☐

३७. तुम्हाला बहिष्कृत ठरविल्यास काय कराल?

---------------------------------------------

**क) कुटुंबातील मुलामुलींच्या कला कौशल्याबद्दल माहिती :-**

१. कोणकोणते खेळ आवडतात.

खो-खो ☐ कबड्डी ☐ व्हॉलीबॉल ☐ फूटबॉल ☐ बास्केटबॉल ☐

कुस्ती ☐ बॅटबॉल ☐ लांब उडी ☐ उंचउडी ☐ पोहणे ☐

१. पुढीलपैकी छंद

गायन ☐ वादन ☐ अभिनय ☐ नृत्य ☐ वक्तृत्व ☐ वादविवाद ☐

**ड) आरोग्यासंबंधी माहिती-**

१. तुम्ही वैद्यकीय सेवा कोठे घेता सरकारी ☐ खाजगी ☐

२. वस्तीपासून सरकारी दवाखान्याचे अंतर.........................कि.मी.

३. वस्तीपासून खाजगी दवाखान्याचे अंतर..........................कि.मी.

४. महिला बाळंतपण कुठे करतात - पालावर/घरी दवाखान्यात

५. बाळंतपणात कुटुंबातील गेल्या १० वर्षातील मृत्यू-

अ. आईचा ब. बाळाचा क. आई व बाळाचा

६. कुटुंब नियोजन केले आहे का? होय ☐ नाही ☐

७. मुले-मुली आजारी पडल्यावर त्यांना दवाखाण्यातील औषध, इंजेक्शन देता का?

८. सरकारी आरोग्य कर्मचारी पालावर येतात का? होय ☐ नाही ☐

९. रोग प्रतिकार शक्ती कमी ☐ मोठया प्रमाणात ☐

१०. नेहमी होणारे संसर्ग रोग/आजार ------------------------------

११. नेहमी होणारे मोठे रोग/आजार --------------------------------

१२. नियमीत दात घासता का? होय ☐ नाही ☐

१३. कपडे किती दिवसांनी धुता?

दररोज ☐ दोन/तीन ☐ आठवडा ☐ नक्की नाही ☐

१४. आंघोळ किती दिवसांनी करता?

दररोज ☐ दोन/तीन ☐ आठवडा ☐ नक्की नाही ☐

१५. मुला-मुलींना समतोल आहार मिळतो का? होय ☐ नाही ☐

**इ ) गुन्हेगारीबद्दल माहिती-**

१. कुटुंबांतील अविवाहित मुला-मुलींवर चोरीच्या केसेस झालेल्या आहेत काय?

होय ☐ नाही ☐

२. तुम्हाला कोणत्या गुन्हयात अटक झाली होती?

१. खून २. दरोडा ३. जबरी चोरी

४. चोरी ५. फसवणे ६. खिसे कापणे

७. दारुबंदी ८. जुगार ९. शरीरविक्रय

१०. संशयावरुन ११. बलात्कार १२.छेडछाड

१३. हाप मर्डर १४. सरकारी कामात अडथळा

३. शिक्षा झाली का? होय ☐ नाही ☐ किती शिक्षा झाली----------

४. कोणत्या कोर्टात केसेस चालल्या---------------

५. आतापर्यंत किती वेळा चोरी केली अथवा आरोप होते? एक ☐ दोन ☐ अनेक ☐

६. अटक झाल्यावर सुटका होण्यासाठी पोलिस पैसे घेतात का? होय ☐ नाही ☐

**ई) आर्थिक बाबींसंबंधी माहिती :-**

१. पूर्वीचा व्यवसाय----------------------------------------

२. सध्याचा व्यवसाय - ------------------------------------

३. तुमच्या वडिलांचा ---------------------------------------

४. तुमच्या आजोबांचा -------------------------------------

५. आपल्या घराण्याचा पूर्वापार चालत आलेला व्यवसाय - ----------------

६. कुटुंबातील व्यक्तींचा व्यवसाय -

| अ.क्र. | नाव | वय | व्यवसाय | उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |

७. तुमच्या कुटुंबातील कोणी रोजगारासाठी गावाबाहेर, देशाबाहेर गेले आहे काय?

होय ☐ नाही ☐

८. होय असल्यास कुठे व कोणत्या रोजगारासाठी गेले आहेत?

-------------------------------------------------------

९. तुमच्या कुटुंबाचे एकुण मासिक उत्पन्न किती?

अ) १,५०० ते ३,००० ब) ३,००० ते ६,०००

क) ६,००० ते १०,००० ड) १०,००० पेक्षा जास्त

१०. तुमच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती कशी आहे?

उत्तम ☐ चांगली ☐ बरी ☐ वाईट ☐

११. जेव्हा पारंपारिक व्यवसाय तुमच्या उदरनिर्वाहाचे साधन होते तेव्हा तुमच्या कुटुंबांची आर्थिक स्थिती कशी होती?

उत्तम ☐ चांगली ☐ बरी ☐ वाईट ☐

१२. आपण व्यवसायात समाधानी आहात काय? होय ☐ नाही ☐

१३. नाही उत्तर असल्यास का नाही? कारणे कोणती?

-------------------------------------------------------

१४. नोकरदार असल्यास कौटुंबिक आर्थिक गरजा पूर्ण होतात काय? होय ☐ नाही ☐

१५. नवीन व्यवसाय सुरु करण्याची इच्छा आहे काय? होय ☐ नाही ☐

१६. नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी उपलब्ध साधने आहेत काय?

१) जागा २) भांडवल ३) पाणी

४) कच्चा माल ५) मनुष्य बळ ६) बाजारपेठ

१७. या व्यतिरिक्त इतर साधने आहेत काय?

-------------------------------------------------------

१८. व्यवसायासाठी कर्ज काढले होते का? होय ☐ नाही ☐

अ) सावकार ब) नातेवाईक क) पतसंस्था

ड) बँका इ) अन्य व्यक्ती

१९. असल्यास किती

अ) १०,००० ते ५०,००० ब) ५०,००० ते १,००,०००

क) १,००,००० ते ५,००,००० ड) ५,००,००० पुढे

| कर्ज घेणाऱ्या व्यक्तीचे नाव | कर्ज रक्कम | परतफेड रक्कम | थकबाकी | तारण | व्याज दर |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |

२०. कर्ज काढण्याचे कारण?

अ) लग्न ब) घर बांधकाम क) धार्मिक विधी

ड) शिक्षण इ) आजारपण ई) व्यसन

ई) व्यवसाय

२१. घेतलेल्या कर्जाचा वापर दिलेल्या कारणासाठीच करता काय?

अ) होय ब) अल्प प्रमाणात

क) बऱ्याच प्रमाणात ड) नाही

२२. कर्ज थकीत राहण्याची कारणे कोणती?

अ) इतरांची देणी दिल्यामुळे ब) व्यसन

क) मृत्यू ड) आजारपण

इ) महागाई ई) अनिश्चित उत्पन्न

२३. कर्ज थकबाकी कमी करण्यासाठी तुम्ही कोणते विशेष उपाय योजले?

----------------------------------------------

२४. शेती आहे का? होय ☐ नाही ☐

२५. असल्यास अ) वडिलोपार्जित ब) विकत

२६. शेती कोणाच्या नावे आहे?---------------------------------

२७. शेती कोठे आहे?--------------------------------------

२८. राहत्या ठिकाणापासून शेतीचे अंतर किती?----------------------

२९. जमिनीबद्दलचे विवरण सांगा.

| प्रकार | एकुण एकर | वंशपरंपरेने | विकत | एकुण |
|---|---|---|---|---|
| बागायत | | | | |
| जिरायत | | | | |

३०. शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे विवरण.

| अ.क्र. | पिकाचे नाव | कालावधी | एकुण उत्पन्न | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

३१. शेतीपासूनचे एकुण उत्पन्न------------

३२. जमीन कोण कसते? स्वतः ☐ दुसऱ्याला कसायला देता ☐

३३. दुसऱ्याला कसायला देत असल्यास वार्षिक खंड किती?----------

३४. शेती घेण्यासाठी कोणत्या मार्गाचा वापर केला?

अ) कर्ज ब) उसने पैसे घेऊन क) पहिली मालमत्ता विकून

३५. शेतीसाठी कर्ज घेतले असल्यास किती?

| अ.क्र. | कोणाकडून घेतले | कर्ज रक्कम | तारण | परतफेड | थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |

३६. शेती व्यवसायामध्ये आर्थिक गरजा पूर्ण होतात का? होय ☐ नाही ☐

| मागील वर्षाचे उत्पन्न | खर्च | चालू वर्षाचे उत्पन्न | खर्च | उत्पन्न व खर्चातील फरक | बचत |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

३७. तुमच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह कशावर चालतो?

शेती ☐ नोकरी ☐ पारंपारिक व्यवसाय ☐ इतर ☐

३८. तुमच्या कुटुंबातील कोणी बि.सी.मंडळ, बचत गटाचे सभासद आहे काय? होय ☐ नाही ☐

असेल तर कोणत्या?

----------------------------------------

३९. तुमची संपत्ती पुढील कोणत्या स्वरुपात जमा आहे.

सोने ☐ प्लॉट ☐ शेती ☐ बँकेत ☐ इतर ☐

४०. तुमच्या कुटुंबाचा दरमहा खालील बाबींवर होणारा खर्च?

अ) अन्नधान्य व उपभोगीय वस्तू(कापड, भांडी इ.) ब) घर/निवास दुरुसती

क) शिक्षण ड) दवाखाना ई) धार्मिक

ई) करमणूक उ) व्यसन ए) कर्ज परतफेड

ऐ) इतर

४१. तुमच्या कुटुंबांचा प्रासंगीक खर्च?

अ) मुलांचे लग्न ब) मुलींचे लग्न

क) जत्रा, वाढदिवस ड) इतर

४२. आपली बचत कमी आहे असे वाटते का? होय ☐ नाही ☐

४३. बचत कमी असण्याची कारणे कोणती?

अ) दैनंदिन खर्च　　ब) कर्ज　　क) धार्मिक विधी　　ड) व्यसन

इ) आजारपण　　ई) शिक्षण

४४. तुमचे मूळ गाव कोणते? --------------------

४५. तुमचे स्थलांतरण झाले आहे काय?　　होय ☐　　नाही ☐

झाले असल्यास कोणी केले?

अ) वडिलांनी　　ब) आजोबांनी

क) स्वतः　　ड) मुलाने

४६. झाले असल्यास कारणे?

अ) नोकरीनिमित्त　　ब) व्यवसायनिमित्त

क) शिक्षणानिमित्त　　ड) इतर

४७. स्थलांतराचा प्रकार?

गावाकडून शहराकडे / शहराकडून शहराकडे / शहराकडून गावाकडे

४८.

| स्थलांतरापूर्वीचे उत्पन्न | खर्च | बचत | स्थलांतरानंतरचे उत्पन्न | खर्च | बचत |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

४९. स्थलांतर केल्याने तुमच्या राहणीमानात सुधारणा झाली आहे काय? होय ☐ नाही ☐

५०. शासकीय योजनांविषयी माहिती आहे का? होय ☐　　नाही ☐

५१. आपल्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यास खालीलपैकी शासनाच्या एखादया योजनेचा लाभ मिळाला आहे काय?

अ) घरकुल　　ब) वृध्दापकाळ पेन्शन

क) कलाकार मानधन　　ड) वसंतराव नाईक महामंडळ कर्ज

५२. शासनाकडून तुमच्या समाजातील मुला-मुलींना शैक्षणिक सवलती मिळतात काय?

होय ☐　　नाही ☐　　असतील तर खालील प्रकारच्या कोणत्या?

अ) शासनाकडून मुला-मुलींना शिष्यवृत्ती मिळते.

ब) शासनाकडून मुला-मुलींना शिक्षणासाठी कर्ज मिळते.

५३. या व्यतिरिक्त शासनाकडून तुमच्या समाजातील मुला–मुलींना शैक्षणिक सवलती मिळत असल्यास त्या कोणत्या?

---------------------------------------------------------

५४. तुमच्या मुलांमुलींसाठी शासकीय वसतीगृहे आहेत का? होय ☐ नाही ☐

५५. असल्यास कोठे आहे--------------------------------------

५६. घरात अपंग असल्यास शासकीय योजनेचा लाभ मिळतो का? होय ☐ नाही ☐

५७. असल्यास कोणता?------------------------------------------

५८. तुमचा/तुमच्या कुटुंबातील कुणाचा धार्मिक मंडळात/शैक्षणिक संस्था/ स्थानिक स्वराज्य संस्था/ विकास काम सोसायटी आदीमध्ये सहभाग आहे काय? होय ☐ नाही ☐

असेल तर कोणत्या?-------------------------------------------

५९. तुमच्या स्थिरीकरणासाठी शासनाची भूमिका/योगदान काय आहे?

---------------------------------------------------------

**उ) राहणीमानाची स्थितीः–**

१. या गावात/शहरात कुटुंब आल्याचे वर्ष............ स्थायिक ☐ तात्पुरते ☐

२. कायमच्या वास्तव्यापासून साधारणपणे किती दूरचा प्रवास करतात......... कि.मी.

३. प्रवासाचे साधन काय?

| | | |
|---|---|---|
| १. बैलगाडी | २. सायकल | ३. मो.सायकल |
| ४. जीप | ८. एस.टी. | ९. रेल्वे |
| १०. पायी | ११. इतर – | |

४. भोवतालची स्थिती–

डोंगर ☐ माळराण ☐ दऱ्या–खोऱ्या ☐ फॉरेस्ट ☐ गाव/शहर ☐

५. शेजारी इतर समाजाची वस्ती आहे का? होय ☐ नाही ☐

कोणाची आहे--------------

६. घर स्वतःचे आहे काय? होय ☐ नाही ☐

होय असल्यास कोणाच्या नावावर आहे.------------------------

७. राहत्या ठिकाणची स्थिती –

पाल ☐ छप्पर ☐ झोपडी ☐ पत्रे ☐ स्लॅब ☐ फूटपाथ ☐

७. संडासची व्यवस्था– होय ☐ नाही ☐

८. अंघोळीची व्यवस्था–   होय ☐   नाही ☐

९. झोपडी/पाल/घराभोवती स्वच्छता आहे ☐ की घाण ☐

१०. तुमच्या घरात वीज आहे का?होय ☐   नाही ☐

११. घरातील वस्तू –

| | | | | |
|---|---|---|---|---|
| टेप ☐ | फ्रीज ☐ | टेबल ☐ | मिक्सर ☐ | जीप ☐ |
| रेडिओ ☐ | दिवाण ☐ | खूर्ची ☐ | सायकल ☐ | कार ☐ |
| फॅन ☐ | पलंग ☐ | कपाट ☐ | मो.सायकल ☐ | मोबाईल ☐ |

१२. रेशनिंग कार्ड काढले आहे का?   होय ☐   नाही ☐

१३. मतदान करता का?   होय ☐   नाही ☐

## अनुसूची क्र. २
## कुटुंब प्रमुख कलावंतीण स्त्री असताना

### अ) कौटुंबिक

१. नाव ( कुटुंबप्रमुखाचे)-कलावंतीण स्त्री :---------------------

२. कलाकेंद्राचे नाव व पत्ता :---------------------------
---------------------------

३) संपूर्ण पत्ता :--------------------------------
--------------------पीन कोड नं.----

४. मोबाईल नंबर :--------------------------------

५. गावापासून वस्तीचे अंतर :- ------------ कि.मी.

६. वय :---------------------------------------

७. धर्म :---------------------------------------

८. जात :---------------------------------------

९. रळा :---------------------------------------

१०. मातृभाषा :---------------------------------------

११. समाजाची बोलीभाषा :-----------------------------------

१२. लग्न झाले आहे काय? अ) विवाहित ☐ ब) अविवाहित ☐

१३. पुढीलपैकी तुमची कुटुंब पध्दती कोणती - अ) संयुक्त ☐ ब) विभक्त ☐

१४. शिक्षण :-

१५. तुम्हाला शिक्षण सोडावे लागले का? होय ☐ नाही ☐

१६. शिक्षण सोडण्याचे कारण कोणते

अ) आर्थिक परिस्थिती ब) मर्जीने

क) आई वडिलांनी सोडायला लावले ड ) इतर

१७. कुटुंबातील सदस्य संख्या :-

| अ.क्र. | नावे | नाते | वय | शिक्षण | शिक्षणाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |

१८. सरकारी शाळेचे पालापासून अंतर-----------कि.मी.

१९. मुले-मुली शाळेत/बालवाडीत/अंगणवाडीत जातात का? होय ☐ नाही ☐

नसल्यास का नाही

---------------------------------------------------

२०. शाळेत मुला-मुलींना सर्वात मागे बसवतात/पुढे बसवतात -

कारण----------------------------------------------

२१. शाळेतील इतर समाजाची मुले–मुली तुमच्या मुलांना चोर म्हणून चिडवतात का?

होय ☐ नाही ☐

२२. शाळेत मुलांना जाती व्यवस्थेचा त्रास जाणवतो का? होय ☐ नाही ☐

२३. शाळेतील शिक्षक जातीवरुन वेगळी वागणूक देतात का? होय ☐ नाही ☐

२४. मुलांना तुम्ही काय बनवू इच्छिता

अ) पारंपारिक व्यवसाय ब) नोकरी

क) उच्चशिक्षीत ड) अधिकारी इ) इतर

२५. मुलगी असल्यास काय स्वप्न पाहता

अ) लग्न लावून दयायचे आहे ब) उच्चशिक्षीत बनवायचे आहे

क) लग्नानंतर शिक्षणास परवानगी ड) नोकरी लावून सक्षम बनवायचे

इ) समाजाचा पारंपारिक व्यवसाय

२६. स्वतःच्या मुलांकडे लक्ष देऊ शकता का? होय ☐ नाही ☐

२७. नसल्यास कोण लक्ष देते?:--------------------------------

२८. कुटुंबामध्ये मुलगा व मुलगी फरक करता का? होय ☐ नाही ☐

२९. मुलगा असल्यास काय विचार करता

अ) उत्पन्नाचे साधन नाही म्हणून दुर्लक्ष

ब) मुलाला स्वतंत्र निर्णय क्षमता दयायची

क) पुढे संरक्षण देण्यात यशस्वी होईल याची खात्री

ड) पारंपारिक धंदयात अडथळा वाटतो

३०. मुलगी असल्यास काय विचार करता

अ) उत्पन्नाचे साधन म्हणून पाहिले जाते

ब) तिला वाढविताना काळजी घेता

क) मुलगी म्हणून पारंपारिक विळख्यात सापडेल याची काळजी वाटते

ड) तिला शिकवून सक्षम बनविण्याचा विचार

३१. व्यसन(सवयी)–

| अ.नं. | व्यसनाचा प्रकार | पुरुष | स्त्रीया | मुले | मुली | संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गुटखा खाणे | | | | | |
| २ | तंबाखू खाणे | | | | | |
| ३ | बीडी, सिगारेट | | | | | |
| ४ | दारु पिणे | | | | | |
| ५ | गांजा | | | | | |
| ६ | इतर | | | | | |

३२. तुमच्या भाऊ बहिणींची नावे–

| अ.क्र. | नाव | वय | शिक्षण | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |

३३. आईवडिलांनी किती भावंडांची लग्न करुन दिली.------------------

३४. कुटुंबात किती आंतरजातीय विवाह झाले? --------------------

३५. असल्यास कोण कोणत्या जाती व धर्मांमध्ये झाला-----------------

३६. जातीला महत्व देता की मनुष्याला--------------------------

३७. आपला विवाह संस्कार कोणत्या पद्धतीने झाला

अ) रुढी प्रमाणे ब) हिंदू संस्कृतीप्रमाणे

क) नोंदणीकृत इ) इतर

३८. अजूनही भटके जीवन जगतात का? होय ☐ नाही ☐

**ब) धार्मिक व सामाजिक :–**

१. आपला देवधर्मावर विश्वास आहे काय? होय ☐ नाही ☐

२. आपण कोणकोणत्या देवतांना मानता? ------------------

३. आपण कोणकोणत्या देवांची पूजा करता?---------------

४. नवस करता काय? होय ☐ नाही ☐

५. होय असल्यास नवस कसे फेडता –

अ. बळी देऊन ब. साधे जेवण देऊन

क. दान करुन ड. देवाला वाहून

६. मुला/मुलीचा नामकरण विधी केला जातो का? होय ☐ नाही ☐

७. पाचवीचा विधी केला जातो का? होय ☐ नाही ☐

८. मुंजविधी केला जातो का? होय ☐ नाही ☐

९. समाजाच्या स्वतंत्र यात्रा उत्सव करता काय? होय ☐ नाही ☐

१०. करीत असल्यास देव कोणते?

१.------------२.----------- ३.--------------

११. मृत्यू विधी कसा केला जातो

अ. दफन ब. अग्निदहिनी क. इतर

१२. सुतक किती दिवस पाळले जाते :- -------

१३. तिसरा घातला जातो का? होय ☐ नाही ☐

१४. दशक्रिया विधी केला जातो का? होय ☐ नाही ☐

१५. दशक्रिया विधीला जेवण काय केले जाते

अ. शाकाहारी ब. मांसाहारी क. दोन्हीही

१६. तेरावा घातला जातो का? होय ☐ नाही ☐

१७. उपवास करता का? होय ☐ नाही ☐

१८. उपवास कशासाठी करता? :-----------------

१९. होय असल्यास कोणत्या देवसाठी उपवास करताः-----------

२०. आपले कुलदैवत कोणते :------------------

२१. कोणकोणत्या तीर्थक्षेत्राशी आपला संबंध आहे :------------

२२. आपण कोणकोणते व्रत करता :-----------------

२३. आपण कोण-कोणत्या यात्रांना जाता :---------------

२४. कोणकोणते सण साजरे करतात :-----------------

२५. पारंपारिक पोशाख कोणता :-

अ. पुरुष :------------------------------

ब. स्त्री :-------------------------------

२६. पारंपारिक दागदागिने कोणते :-------------------

२७. खाण्यापिण्याचे पदार्थ कोणते :-------------------

२८. श्रध्दास्थान कोणते :--------------

२९. जात पंचायतीचे स्वरुप कसे आहे?

३०. जात पंचायतीवर विश्वास आहे का? होय ☐ नाही ☐

३१. जातपंचायत सद्यस्थितीत आहे काय? होय ☐ नाही ☐

३२. जातपंचायत कोण-कोणत्या ठिकाणी भरते?

अ.-----------ब.----------- क.------------

३३. जातपंचायतीच्या पंचांची निवड कोण करते?

अ. वंश परंपरेनुसार ब. नामनिर्देशित क. निवड पध्दती

३४. जातपंचायतीच्या निर्णयाचे परिणाम :-

--------------------------------------------

३५. जातपंचायतीत बहिष्कार टाकला जातो का? होय ☐ नाही ☐

३६. तुम्ही त्याचे समर्थन करता का? होय ☐ नाही ☐

३७. तुम्हाला बहिष्कृत ठरविल्यास काय कराल?

--------------------------------------------

**क) कुटुंबातील मुलामुलींच्या कला कौशल्याबद्दल माहिती :-**

१. कोणकोणते खेळ आवडतात.

खो-खो ☐ कबड्डी ☐ व्हॉलीबॉल ☐ फूटबॉल ☐ बास्केटबॉल ☐

कुस्ती ☐ बॅटबॉल ☐ लांब उडी ☐ उंचउडी ☐ पोहणे ☐

१. पुढीलपैकी छंद

गायन ☐ वादन ☐ अभिनय ☐ नृत्य ☐ वक्तृत्व ☐ वादविवाद ☐

**ड) आरोग्यासंबंधी माहिती-**

१. तुम्ही वैद्यकीय सेवा कोठे घेता सरकारी ☐ खाजगी ☐

२. वस्तीपासून सरकारी दवाखान्याचे अंतर.........................कि.मी.

३. वस्तीपासून खाजगी दवाखान्याचे अंतर..........................कि.मी.

४. महिला बाळंतपण कुठे करतात - पालावर/घरी दवाखान्यात

५. बाळंतपणात कुटुंबातील गेल्या १० वर्षातील मृत्यू-

अ. आईचा ब. बाळाचा क. आई व बाळाचा

६. कुटुंब नियोजन केले आहे का? होय ☐ नाही ☐

७. मुले-मुली आजारी पडल्यावर त्यांना दवाखाण्यातील औषध, इंजेक्शन देता का?

८. सरकारी आरोग्य कर्मचारी पालावर येतात का? होय ☐ नाही ☐

९. रोग प्रतिकार शक्ती कमी ☐ मोठया प्रमाणात ☐

१०. नेहमी होणारे संसर्ग रोग/आजार -------------------------------

११. नेहमी होणारे मोठे रोग/आजार --------------------------------

१२. नियमीत दात घासता का? होय ☐ नाही ☐

१३. कपडे किती दिवसांनी धुता?

दररोज ☐ दोन/तीन ☐ आठवडा ☐ नक्की नाही ☐

१४. आंघोळ किती दिवसांनी करता?

दररोज ☐ दोन/तीन ☐ आठवडा ☐ नक्की नाही ☐

१५. मुला-मुलींना समतोल आहार मिळतो का? होय ☐ नाही ☐

**इ ) गुन्हेगारीबद्दल माहिती-**

१. कुटुंबांतील अविवाहित मुला-मुलींवर चोरीच्या केसेस झालेल्या आहेत काय?

होय ☐ नाही ☐

२. तुम्हाला कोणत्या गुन्हयात अटक झाली होती?

१. खून २. दरोडा ३. जबरी चोरी

४. चोरी ५. फसवणे ६. खिसे कापणे

७. दारुबंदी ८. जुगार ९. शरीरविक्रय

१०. संशयावरुन ११. बलात्कार १२.छेडछाड

१३. हाप मर्डर १४. सरकारी कामात अडथळा

३. शिक्षा झाली का? होय ☐ नाही ☐ किती शिक्षा झाली----------

४. कोणत्या कोर्टात केसेस चालल्या---------------

५. आतापर्यंत किती वेळा चोरी केली अथवा आरोप होते? एक ☐ दोन ☐ अनेक ☐

६. अटक झाल्यावर सुटका होण्यासाठी पोलिस पैसे घेतात का? होय ☐ नाही ☐

**ई) आर्थिक बाबींसंबंधी माहिती :-**

१. पूर्वीचा व्यवसाय---------------------------------------

२. सध्याचा व्यवसाय - -------------------------------------

३. तुमच्या वडिलांचा ---------------------------------------

४. तुमच्या आजोबांचा -------------------------------------

५. आपल्या घराण्याचा पूर्वापार चालत आलेला व्यवसाय - ----------------

६. कुटुंबातील व्यक्तींचा व्यवसाय -

| अ.क्र. | नाव | वय | व्यवसाय | उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |

७. तुमच्या कुटुंबातील कोणी रोजगारासाठी गावाबाहेर, देशाबाहेर गेले आहे काय?

होय ☐ नाही ☐

८. होय असल्यास कुठे व कोणत्या रोजगारासाठी गेले आहेत?

-----------------------------------------------

९. तुमच्या कुटुंबाचे एकुण मासिक उत्पन्न किती?

अ) १,५०० ते ३,००० ब) ३,००० ते ६,०००

क) ६,००० ते १०,००० ड) १०,००० पेक्षा जास्त

१०. तुमच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती कशी आहे?

उत्तम ☐ चांगली ☐ बरी ☐ वाईट ☐

११. जेव्हा पारंपारिक व्यवसाय तुमच्या उदरनिर्वाहाचे साधन होते तेव्हा तुमच्या कुटुंबांची आर्थिक स्थिती कशी होती?

उत्तम ☐ चांगली ☐ बरी ☐ वाईट ☐

१२. आपण व्यवसायात समाधानी आहात काय? होय ☐ नाही ☐

१३. नाही उत्तर असल्यास का नाही? कारणे कोणती?

-----------------------------------------------

१४. नोकरदार असल्यास कौटुंबिक आर्थिक गरजा पूर्ण होतात काय? होय ☐ नाही ☐

१५. नवीन व्यवसाय सुरु करण्याची इच्छा आहे काय? होय ☐ नाही ☐

१६. नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी उपलब्ध साधने आहेत काय?

१) जागा २) भांडवल ३) पाणी

४) कच्चा माल ५) मनुष्य बळ ६) बाजारपेठ

१७. या व्यतिरिक्त इतर साधने आहेत काय?

-----------------------------------------------

१८. व्यवसायासाठी कर्ज काढले होते का? होय ☐ नाही ☐

१) सावकार २) नातेवाईक ३) पतसंस्था

४) बँका ५) अन्य व्यक्ती

१९. असल्यास किती

१) १०,००० ते ५०,००० २) ५०,००० ते १,००,०००

३) १,००,००० ते ५,००,००० ४) ५,००,००० पुढे

| कर्ज घेणाऱ्या व्यक्तीचे नाव | कर्ज रक्कम | परतफेड रक्कम | थकबाकी | तारण | व्याज दर |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |

२०. कर्ज काढण्याचे कारण?

अ) लग्न ब) घर बांधकाम क) धार्मिक विधी

ड) शिक्षण इ) आजारपण ई) व्यसन

ई) व्यवसाय

२१. घेतलेल्या कर्जाचा वापर दिलेल्या कारणासाठीच करता काय?

अ) होय ब) अल्प प्रमाणात

क) बऱ्याच प्रमाणात ड) नाही

२२. कर्ज थकीत राहण्याची कारणे कोणती?

अ) इतरांची देणी दिल्यामुळे ब) व्यसन

क) मृत्यू ड) आजारपण

इ) महागाई ई) अनिश्चित उत्पन्न

२३. कर्ज थकबाकी कमी करण्यासाठी तुम्ही कोणते विशेष उपाय योजले?

-----------------------------------------------

-----------------------------------------------

२४. शेती आहे का? होय ☐ नाही ☐

२५. असल्यास अ) वडिलोपार्जित ब) विकत

२६. शेती कोणाच्या नावे आहे?--------------------------------

२७. शेती कोठे आहे?---------------------------------------

२८. राहत्या ठिकाणापासून शेतीचे अंतर किती?---------------------

२९. जमिनीबद्दलचे विवरण सांगा.

| प्रकार | एकुण एकर | वंशपरंपरेने | विकत | एकुण |
|---|---|---|---|---|
| बागायत | | | | |
| जिरायत | | | | |

३०. शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे विवरण.

| अ.क्र. | पिकाचे नाव | कालावधी | एकुण उत्पन्न | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |

३१. शेतीपासूनचे एकुण उत्पन्न------------

३२. जमीन कोण कसते? स्वतः ☐ दुसऱ्याला कसायला देता ☐

३३. दुसऱ्याला कसायला देत असल्यास वार्षिक खंड किती?----------

३४. शेती घेण्यासाठी कोणत्या मार्गाचा वापर केला?

अ) कर्ज ब) उसने पैसे घेऊन क) पहिली मालमत्ता विकून

३५. शेतीसाठी कर्ज घेतले असल्यास किती?

| अ.क्र. | कोणाकडून घेतले | कर्ज रक्कम | तारण | परतफेड | थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |

३६. शेती व्यवसायामध्ये आर्थिक गरजा पूर्ण होतात का? होय ☐ नाही ☐

| मागील वर्षाचे उत्पन्न | खर्च | चालू वर्षाचे उत्पन्न | खर्च | उत्पन्न व खर्चातील फरक | बचत |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

३७. तुमच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह कशावर चालतो?

शेती ☐ नोकरी ☐ पारंपारिक व्यवसाय ☐ इतर ☐

३८. तुमच्या कुटुंबातील कोणी बि.सी.मंडळ, बचत गटाचे सभासद आहे काय? होय ☐ नाही ☐

असेल तर कोणत्या?

-----------------------------------------

३९. तुमची संपत्ती पुढील कोणत्या स्वरुपात जमा आहे.

सोने ☐ प्लॉट ☐ शेती ☐ बँकेत ☐ इतर ☐

४०. तुमच्या कुटुंबाचा दरमहा खालील बाबींवर होणारा खर्च?

अ) अन्नधान्य व उपभोगीय वस्तू(कापड, भांडी इ.) ब) घर/निवास दुरुसती

क) शिक्षण ड) दवाखाना ई) धार्मिक

ई) करमणूक उ) व्यसन ए) कर्ज परतफेड

ऐ) इतर

४१. तुमच्या कुटुंबांचा प्रासंगीक खर्च?

अ) मुलांचे लग्न    ब) मुलींचे लग्न

क) जत्रा, वाढदिवस    ड) इतर

४२. आपली बचत कमी आहे असे वाटते का? होय ☐ नाही ☐

४३. बचत कमी असण्याची कारणे कोणती?

अ) दैनंदिन खर्च    ब) कर्ज    क) धार्मिक विधी    ड) व्यसन

इ) आजारपण    ई) शिक्षण

४४. तुमचे मूळ गाव कोणते? --------------------

४५. तुमचे स्थलांतरण झाले आहे काय? होय ☐ नाही ☐

झाले असल्यास कोणी केले?

अ) वडिलांनी    ब) आजोबांनी

क) स्वतः    ड) मुलाने

४६. झाले असल्यास कारणे?

अ) नोकरीनिमित्त    ब) व्यवसायनिमित्त

क) शिक्षणानिमित्त    ड) इतर

४७. स्थलांतराचा प्रकार?

गावाकडून शहराकडे / शहराकडून शहराकडे / शहराकडून गावाकडे

४८.

| स्थलांतरापूर्वीचे उत्पन्न | खर्च | बचत | स्थलांतरानंतरचे उत्पन्न | खर्च | बचत |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

४९. स्थलांतर केल्याने तुमच्या राहणीमानात सुधारणा झाली आहे काय? होय ☐ नाही ☐

५०. शासकीय योजनांविषयी माहिती आहे का? होय ☐ नाही ☐

५१. आपल्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यास खालीलपैकी शासनाच्या एखादया योजनेचा लाभ मिळाला आहे काय?

अ) घरकुल    ब) वृध्दापकाळ पेन्शन

क) कलाकार मानधन    ड) वसंतराव नाईक महामंडळ कर्ज

५२. शासनाकडून तुमच्या समाजातील मुला–मुलींना शैक्षणिक सवलती मिळतात काय?

होय ☐ नाही ☐

असतील तर खालील प्रकारच्या कोणत्या?

अ) शासनाकडून मुला–मुलींना शिष्यवृत्ती मिळते.

ब) शासनाकडून मुला–मुलींना शिक्षणासाठी कर्ज मिळते.

५३. या व्यतिरिक्त शासनाकडून तुमच्या समाजातील मुला–मुलींना शैक्षणिक सवलती मिळत असल्यास त्या कोणत्या?

-------------------------------------------------

५४. तुमच्या मुलांमुलींसाठी शासकीय वसतीगृहे आहेत का? होय ☐ नाही ☐

५५. असल्यास कोठे आहे------------------------------------

५६. घरात अपंग असल्यास शासकीय योजनेचा लाभ मिळतो का? होय ☐ नाही ☐

५७. असल्यास कोणता?--------------------------------------

५८. तुमचा/तुमच्या कुटुंबातील कुणाचा धार्मिक मंडळात/शैक्षणिक संस्था/ स्थानिक स्वराज्य संस्था/ विकास काम सोसायटी आदीमध्ये सहभाग आहे काय? होय ☐ नाही ☐

असेल तर कोणत्या?-----------------------------------------

५९. तुमच्या स्थिरीकरणासाठी शासनाची भूमिका/योगदान काय आहे?

-------------------------------------------------

-------------------------------------------------

**उ) राहणीमानाची स्थितीः–**

१. या गावात/शहरात कुटुंब आल्याचे वर्ष............. स्थायिक ☐ तात्पुरते ☐

२. कायमच्या वास्तव्यापासून साधारणपणे किती दूरचा प्रवास करतात......... कि.मी.

३. प्रवासाचे साधन काय?

| | | |
|---|---|---|
| १. बैलगाडी | २. सायकल | ३. मो.सायकल |
| ४. जीप | ८. एस.टी. | ९. रेल्वे |
| १०. पायी | ११. इतर – | |

४. भोवतालची स्थिती–

डोंगर ☐ माळराण ☐ दऱ्या–खोऱ्या ☐ फॉरेस्ट ☐ गाव/शहर ☐

५. शेजारी इतर समाजाची वस्ती आहे का? होय ☐ नाही ☐

कोणाची आहे-------------

६. घर स्वतःचे आहे काय? होय ☐ नाही ☐

होय असल्यास कोणाच्या नावावर आहे.----------------------

७. राहत्या ठिकाणची स्थिती -

पाल ☐ छप्पर ☐ झोपडी ☐ पत्रे ☐ स्लॅब ☐ फूटपाथ ☐

७. संडासची व्यवस्था- होय ☐ नाही ☐

८. अंघोळीची व्यवस्था- होय ☐ नाही ☐

९. झोपडी/पाल/घराभोवती स्वच्छता आहे ☐ की घाण ☐

१०. तुमच्या घरात वीज आहे का?होय ☐ नाही ☐

११. घरातील वस्तू -

| | | | | |
|---|---|---|---|---|
| टेप ☐ | फ्रीज ☐ | टेबल ☐ | मिक्सर ☐ | जीप ☐ |
| रेडिओ ☐ | दिवाण ☐ | खूर्ची ☐ | सायकल ☐ | कार ☐ |
| फॅन ☐ | पलंग ☐ | कपाट ☐ | मो.सायकल ☐ | मोबाईल ☐ |

१२. रेशनिंग कार्ड काढले आहे का? होय ☐ नाही ☐

१३. मतदान करता का? होय ☐ नाही ☐

**ऊ) पारंपारिक व्यवसायासंबंधी माहिती :-**

१. व्यवसायाचा करार कोणाशी करता?

अ. मालक ब. मालकीण क. दलाल ड. यजमान

२. कराराचे स्वरुप काय?

अ. लेखी ब. तोंडी क. विश्वास

३. करारामधल्या अटी कोणत्या?

अ. जमीन देणे ब. घर बांधून देणे क. कायमचा आधार

ड. मुले सांभाळण्याची हमी इ. रोख स्वरुप

४. मिळणाऱ्या पैशावर अधिकार कोणाचा

अ. मालक ब. मालकीण क. दलाल ड. यजमान इ. स्वतः

५. कोणते पैसे स्वतःचे आणि कोणते पैसे मालकाचे

अ. बैठकीचे ब. कराराचे क. शो चे ड. वैयक्तिक

६. कला प्रदर्शन करताना पैसे स्वीकारले जातात काय? होय ☐ नाही ☐

७. होय असल्याचे कसे आणि किती?

-----------------------------------------

८. ते पैसे कोणाला द्यावे लागतात?

अ. मालक   ब. मालकीण   क. दलाल   ड. वडील   इ. भाऊ   ई. स्वतः

९. व्यवसायाच्या काळात खाणे, पिणे व राहणे कोण चालविते?

अ. मालक   ब. मालकीण   क. दलाल   ड. वडील   इ. भाऊ   ई. स्वतः

१०. हा व्यवसाय किती महिने चालतो?

अ. १२ महिने   ब. ६ महिने   क. ४ महिने   ड. ३ महिने

११. हा व्यवसाय कुठे चालतो?

अ. कुठेही   ब. कारखान्याच्या शेजारी

क. व्यापारपेठेच्या बाजूला   ड. गजबजलेल्या शहरांच्या जवळ

इ. सधन शेतकऱ्यांच्या आश्रयाला

१२. हा करार तुम्ही केव्हा मोडता?

अ. मालक बेईमान झाला तर   ब. तुम्हाला पटले नाही तर

क. अन्य अत्याचार झाला तर   ड. रखेल म्हणून कोणी स्वीकारले तर

इ. कायम व्यवस्था केली तर

१३. व्यवसाय काळात मुलाच्या शिक्षण, खाणेपिणे, राहणे याचा खर्च कोण चालवितो?

अ. तुम्ही स्वतः   ब. ठेवलेला माणूस   क. मालक   ड. मालकीण

१४. म्हातारपणासाठी तुमच्याकडे काय तरतूद आहे.

अ. नगदी रुपात   ब. शेती   क. घर

ड. दागिन्याच्या रुपात   इ. यातील काहीच नाही

१५. आर्थिक स्थितीत कोणता बदल झाला.

अ. बॅक बॅलन्स   ब. शेती   क. घर

ड. सर्व होते पण विक्रीला काढले   इ. यातील काहीच नाही

१६. तुमच्या या व्यवसायामुळे कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटला का?

होय ☐   नाही ☐   सांगता येत नाही ☐

**ए) वैयक्तिक माहितीबद्दल–**

१. कलेच्या बदलत्या स्वरुपाबाबत तुमचे मत काय आहे.

अ. चांगले ब. वाईट क. सिनेमाकडे झुकलेले

ड. कलावंताला पुरेसे प्रशिक्षण नाही इ. कलेपेक्षा देहविक्रीकडे कल

ई.अस्थिर जीवन उ. सुखी संसाराची कल्पना

२. येणाऱ्या रसिकाला कलावंताबद्दल काय वाटते?

अ. कलेचा आस्वाद घ्यावा ब. मनोरंजन करावे क. वेळ घालवावा

ड. उधळपट्टी करावी इ. उपभोग घ्यावा

ई.वेगवेगळ्या स्त्रियांशी संबंध ठेवावा. उ. संपर्क साधावा.

३. येथे येणारे प्रेक्षक हे कलेचे खरे भोक्ते आहेत काय? होय ☐ नाही ☐

४. केवळ स्त्री संबंध प्रस्थापित व्हावेत अशी त्यांची इच्छा असते काय? होय ☐ नाही ☐

५. कुटुंब नियोजन साधनांचा वापर करता का? होय ☐ नाही ☐

६. होय असल्यास कोणती साधने वापरता

अ. कंडोम ब. गर्भनिरोधक गोळ्या

क. मुलेच होणार नाहीत अशी खाजगी औषधे ड. ऑपरेशन

७. स्त्री कलावंताच्या दैनंदिन जीवनाबद्दल काय वाटते

अ. कोणत्या गोष्टी आवडतात ब. कोणत्या गोष्टी आवडत नाही

क. त्यांच्या मुलांबद्दल काय वाटते ड. त्यांच्या लैंगिक जीवनाबद्दल काय वाटते

८. तुम्हाला कलाकार म्हणून प्रेक्षक कसे वागवितात

अ. कलेची कदर करतात ब. आश्रय देतात

क. शारीरिक उपभोग हेच त्यांचे ध्येय असते ड. केवळ मनोरंजनासाठी येतात

इ. मानसिक आधार देतात ई. त्यांच्या वर्तनाचा भरोसा नसतो

९. तुमच्या जीवनातील प्रेक्षकाकडून आलेला चांगला अनुभव सांगा.

अ.कलेची कदर केली ब. विवाह केला क. बक्षीस मिळाले

ड. संपत्ती मिळाली इ.जीवनात स्थैर्य आले ई. घर व जमीन मिळाली

१०. विशेष बैठक रात्री १२ नंतरच्या या कोण ठरवितो?

अ. दलाल ब. तुम्ही स्वतः क. मालक

ड. आई–वडिल इ. भाऊ

११. या बैठका घेणारे प्रेक्षक कोण असतात.

अ. गावातील श्रीमंत ब. नेते क. व्यापारी ड. सधन शेतकरी इ. शौकीन

१२. ते किती पैसे खर्च करतात?

अ. ५००–१००० ब.१०००–२००० क.२०००–५०००

ड. ५०००–१०००० इ.१०००० पेक्षा जास्त

१३. तुमच्याकडून त्यांची काय अपेक्षा असते.

अ. गोड बोलणे ब. सेवा करणे क. सलगी करणे

ड. जवळ बसणे इ. गप्पा मारणे ई. सुख दुःख सांगणे आणि ऐकणे

उ. शारीरिक सुख देणे

१४. त्या तुम्ही किती पूर्ण करता –

अ. सर्व अपेक्षा ब. काही अपेक्षा

क. शारीरिक सुखाशिवाय काहीही नाही ड. यातील काहीही नाही

१५. या बैठकीचा शेवट आस्वादामध्ये होतो की शरीरसंबंधात

अ. कधी आस्वादामध्ये ब. कधी शरीरसंबंधात

१६. कलावंतामध्ये कोणकोणत्या जातीचे कलावंत काम करतात.

अ. कोल्हाटी ब. मुस्लिम क. दलित ड. सर्व

१७. जातीमुळे तुमच्यात भांडणे होतात का? होय ☐ नाही ☐

१८. सगळयांचे प्रश्न सारखेच म्हणून तुम्ही एक दुसऱ्यांबद्दल जिव्हाळा दाखविता का?

होय ☐ नाही ☐

१९. आपल्याला स्त्री कलावंत म्हणून कोणत्या समस्या वाटतात?

अ. विवाह ब. मुलांची समस्या

क. रखेली असण्याची समस्या ड. विश्वासू पुरुषाची समस्या

इ.दैनंदिन जगण्याची समस्या

२०. ज्या पुरुषाकडून मुल झाले त्याची जबाबदारी कोण स्वीकारते?

अ. तुम्ही स्वतः ब. आईवडील

क. भाऊ ड. तो पुरुष आणि तुम्ही

२१. मुले झाले असल्यास कोणाचे नाव लावता?

अ. स्वतःचे ब. स्वतःच्या आईचे

क. स्वतःच्या वडिलांचे ड. ज्याच्यापासून मूल झाले त्या पुरुषाचे

२२. तुमच्या कुटुंबांमध्ये तुम्हाला कोणत्या समस्या आहेत.

अ. आई–वडिल काम करीत आहेत ब. भाऊ काम करीत नाही

क. भाऊ–बहिण लहान आहेत ड. शिक्षणाची समस्या

२३. कोणी तुमचाा मित्र आहे काय? होय ☐ नाही ☐

२४. प्रेमी आहे काय? होय ☐ नाही ☐

२५. तुम्हाला जीवनात काय व्हावेसे वाटते?

अ. सुंदर गृहिणी ब. शिकून नोकरी करणे

क. मुले असावीत ड. घर आणि संपत्ती असावी

२६. तुम्हास कोणत्या गोष्टी असाव्या वाटतात

अ. आपले लग्न व्हावे ब. झालेले लग्न टिकावे

क. मुले असावीत ड. घर आणि संपत्ती असावी

२७. आपल्या या व्यवसायामुळे मुलांवर कोणते परिणाम झाले असे तुम्हांस वाटते.

अ. मुलांच्या पालनपोषणाची हेळसांड

ब.शाळेत पाठविण्यासाठी पैसे मिळाले नाही किंवा व्यवस्था झाली नाही

क. मुलांकडे दुर्लक्ष होणे ड. बहीणभावांच्या भेटी होत नाही

इ. कुटुंब सोडावे लागते ई. कुटुंबाला नावे ठेवली जाते

उ. मुलांना वाईट वळण लागते ऊ. मुले व्यसनी बनतात

२८. या व्यवसायामुळे काय मिळाले असे तुम्हाला वाटते?

२९. या व्यवसायामुळे तुम्ही काय गमावले असे तुम्हाला वाटते?

३०. हा व्यवसाय सोडल्यास तुम्ही काय करु इच्छिता

अ. मालकीण बनणार ब. संगीतबारी चालविणार

क. दुसरा व्यवसाय करणार ड. गृहिणी होणार किंवा मुलांकडे लक्ष देणार

३१. तुमच्या जीवनाचे स्वप्न कोणते आणि ते साकार झाले का?

-------------------------------------------

३२. झाले नसल्यास तुम्ही कोणता प्रयत्न करीत आहात?

---------------------------------------------